MEHTA LIBRARY
The Maharaja Sayajirao University
of Baroda

Call No. BF
1651
J9-1

M.2128

M2128

BF 1651 .J9

# Jyotimala April : 1915 te March : 1918

---

1915-1918

---

Rs2.00

---

Mumbai

* **ज्योतिर्माला सन १८९६ कै. चिटणीसकृत**—यांत होराद्रेष्काण, सप्तमांश, नवमांश वगैरे कुंडल्या तयार करण्यांची रीत असून त्यांचे फलादेशाचें व द्वादश भाववर्णन उत्कृष्ट दिलें आहे. दशाविचारांत अष्टोत्तरी दशेचें गर्गमताप्रमाणें वर्णन केलें आहे. किंमत ०११२ आणे.

वरील * अशी खूण असलेलीं तीन पुस्तकें **मालेच्या** वर्गणीदारांस ट. व्ही. पी. खर्चासह किंमत १-४-० एक रुपया चार आणे.

**सन १९१७ सालचें रॅफेलचें एफिमरिज.** सदरहू पंचांगें आम्हीं मुद्दाम **ज्योतिर्मालेच्या** वाचकांचे सोईकरितां **लंडनहून** आगाऊ मागविलीं आहेत. यांमध्यें दररोजच्या ग्रिनविच माध्यानकालचे स्वष्ट ग्रह, त्यांची क्रांति, शर व इतर पुष्कळ उपयुक्त माहिती आहे. **मालेच्या** वर्गणीदारांस टपालखर्चासह किंमत आठ आणे. व्ही. पी. खर्च निराळा पडेल. इतरांस किं. आठ आणे व्ही. पी. व टपाल खर्च निराळा. प्रति फारच थोड्या असल्याकारणानें ज्यांची मागणी लवकर येईल त्यांनाच वरील सवलतीचा फायदा मिळेल.

**सूचना:**—वरील सर्व पुस्तकांस व्ही. पी. टपाल खर्च निराळा पडेल. ह्यांशिवाय सर्व प्रकारचीं पुस्तकें आमचेकडे मिळतील. **आमचीं सर्व पुस्तकें मुंबईस जी.जी.रेळे आणि कंपनी बुकसेलर्स, माधवबाग, मुंबई यांचेकडे मिळतील.**

# फलज्योतिषसंबंधानें कामें.

फलज्योतिषसंबंधानें सर्व प्रकारचीं कामें खालीं लिहिल्याप्रमाणें आकार घेऊन खात्रीपूर्वक तयार करून दिलीं जातील.

( १ ) सायन भावचलित कुंडलीवरून **आयुरारोग्य, संपत्ति, संतति, भाग्य, प्रवास** वगैरेसंबंधानें साधारण वर्णन. आकार रु. ३.

( २ ) सदरहूप्रमाणें वर्णन व पुढील दोन वर्षांचा भविष्यकालवर्णन आकार रु. ५.

( ३ ) कुंडलीचें वरीलप्रमाणें सूक्ष्म वर्णन व पुढील पांच वर्षांचे भविष्यकालनिर्णय आकार रु. १०.

( ४ ) वर्षफल सूक्ष्म महिनेवार आकार रु. ५.

( ५ ) जन्मकुंडलीवरून पहिल्या प्रश्नाचा सूक्ष्म रीतीनें खुलासा. पहिल्या प्रश्नास आकार रुपये ३ नंतरच्या पुढील प्रत्येक प्रश्नास रु. १ पडेल.

( ६ ) प्रश्नकुंडलीवरून प्रश्नाचा खुलासा. पहिल्या प्रश्नास रुपया एक नंतर प्रत्येक प्रश्नास आकार ०८ आणे.

सर्व प्रकारचा पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा. उत्तरास अर्धा आण्याचें तिकीट न आल्यास जबाब दिला जाणार नाहीं.

**मॅनेजर, ज्योतिर्माला आफीस,** दादर, मुंबई नंबर १४.

# विक्रीस तयार.

**बालबोध ज्योतिष**—ज्योतिषशास्त्राच्या मूलतत्वांचा सोप्या व सरल रीतीनें उहापोह ह्या ग्रंथामध्यें केला आहे. होतकरू व नवीन विद्यार्थ्यांस ह्या सारखा सरल माहिती देणारा दुसरा ग्रंथ मराठीमध्यें आढळणार नाहीं. पृष्ठसंख्या क्राऊन आकाराची ६४ असून ह्या ग्रंथांत खालील विषयांसंबंधानें माहिती आली आहे—(१) परिभाषा, (२) पंचांग म्हणजे काय, (३) कुंडली म्हणजे काय (४) आयुरारोग्य, (५) विद्या, (६) संपत्ति, (७) स्त्रीसुख, (८) संतति, (९) मित्रसुख व बऱ्यावाईट काळाचा विचार कसा करावा. किंमत ८६ आणे परंतु मालेच्या वर्गणीदारांस ८४ आणे. ट. ख. निराळा.

**मेदिनीय** किंवा **राष्ट्रीय ज्योतिष**—हा ग्रंथ प्रसिद्ध लेखक **राम नारायण** ह्यांनीं लिहिला असून या ग्रंथामध्यें राष्ट्रांच्या उन्नति–अवनतीसंबंधानें भविष्यें कशीं करावीं याचें सविस्तर विवेचन केलें आहे. महाराष्ट्रवाङ्मयांत हा ग्रंथ ह्या विषयावरील पहिलाच असून तो सर्वांगसुंदर आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. ह्या पर्यंत **संहितास्कंधासंबंधानें** मराठी भाषेंत शोधकबुद्धीनें लिहिलेला असा एकही ग्रंथ न झाल्यामुळें या अतिशय महत्वाच्या फलज्योतिषाच्या शाखेचें अध्ययन करण्याची सोय नव्हती व ही उणीव ह्या ग्रंथानें भरून काढिली आहे. किंमत ८१२ आणे. मालेच्या वर्गणीदारास किंमत ८८ आणे. ट. ख. निराळा.

**विवाहप्रदीप**—यांत द्वादशभाव, आयुर्मर्यादा, शरीरसुख, अनिष्टमंगळ, प्रीतियोग, विवाहकाळ, गुणमेळन इत्यादि गोष्टींचें पाश्चात्य व आर्यग्रंथाधारें पूर्ण विवेचन केलें असून आपली भावी वधू कशी असेल, तिला संतति कोणत्या प्रकाराची होईल, आपला विवाह केव्हां होईल वगैरे बऱ्याच गोष्टी हें पुस्तक वाचतांच कळतील. विवाह जुळविण्याचे प्रसंगीं वधूवरपत्रिकांचा शास्त्रीय दृष्टीनें विचार करणें असल्यास हें पुस्तक अवश्य वाचा. किं. ८८ आणे. मालेच्या वर्गणीदारास ८६ आणे. ट. ख. निराळा.

* **कै. चिटणीसकृत ग्रहसाधन पुस्तक**—यावरून रवि, चंद्र बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु, हर्शल, नेपच्यून हे ग्रह अंशात्मक पाहिजे त्या वर्षाचे पांच दहा मिनिटांत तयार करितां येतात. पंचांगसंग्रह नसेल त्यांस हें पुस्तक एक अमोल्य आहे. ग्रह ग्रहलाघवी किंवा इतर कोणत्याही पंचांगापेक्षां सूक्ष्म येत असून पुस्तकाचा उपयोग पुढील किंवा पाठीमागील हजारपांचशे वर्षांचा सहज करितां येतो. किं. ८८ आणे ट. ख. निराळा.

* **मुंबई अक्षांशावरून द्वादश भावसाधन व दशवर्ग सायन कोष्टकें**—या पुस्तकांत वरील कोष्टकें असून खेरीज सन १९१६ चे दैनिक स्पष्टग्रह आहेत. किं. ८६ आणे.

# मुंबई ज्योतिर्विद मंडळ.

या नांवाची संस्था कै. रा. रा. जीवन त्रिंबक चिटणीस यांनीं सन १८९२ सालीं फलज्योतिषशास्त्राचा उहापोह करण्याकरितां स्थापन केली. या संस्थेमार्फत गेल्या तीन वर्षापासून विद्यार्थी वर्गास ज्योतिषशास्त्रासंबंधी शिक्षण फुकट देण्यांत येतें. या संस्थेनें सध्यां मुंबई गोवाळीया टँकनजीक असलेल्या **टुटोरीअल हायस्कूलमध्यें** दर रविवारीं दुपारीं १ ते ४ स्टँ- टाईम वाजेपर्यंत विद्यार्थ्यांचे सोईकरितां दोन वर्ग सुरू केले आहेत. संस्थेस फलज्योतिषशास्त्राचेच पुस्तकांची लायब्ररी जोडली आहे. विद्यार्थी व मेंम्बर कडून वाचनालयाची वार्षिक वर्गणी दोन रुपये घेण्यांत येते. गरजूंनीं ह्या संस्थेचा अवश्य लाभ घ्यावा. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें.

सेक्रेटरी **मुंबई ज्योतिर्विद मंडळ,**

C/O म्यानेजर ज्योतिर्माला दादर, मुंबई नं. १४.

## फलज्योतिषसंबंधानें कामें.

फलज्योतिषसंबंधानें सर्व प्रकारचीं कामें खालीं लिहिल्याप्रमाणें आकार घेऊन वेळचे वेळेवर खात्रीपूर्वक तयार करून दिलीं जातील.

(१) सायन भावचलित कुंडलीवरून **आयुरारोग्य, संपत्ति, संतति, भाग्य, प्रवास** वगैरे संबंधानें साधारण वर्णन आकार रु. ३.

(२) सदरहूप्रमाणें वर्णन व पुढील दोन वर्षांचा भविष्यकालवर्णन आकार रु. ५

(३) कुंडलीचें वरीलप्रमाणें सूक्ष्म वर्णन व पुढील पांच वर्षांचे भविस्यकालनिर्णय आकार रु. १०.

(४) वर्षफल सूक्ष्म महिनेवार आकार रु. ५.

(५) जन्मकुंडलीवरून पहिल्या प्रश्नाचा सूक्ष्म रीतीनें खुलासा. पहिल्या प्रश्नास आकार रुपये ३ नंतरच्या पुढील प्रत्येक प्रश्नास रु. १ पडेल.

(६) प्रश्नकुंडलीवरून प्रश्नाचा खुलासा. पहिल्या प्रश्नास रुपया एक नंतर प्रत्येक प्रश्नास आकार ८८ आणे.

सर्व प्रकारचा पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा. उत्तरास अर्धा आण्याचें तिकीट न आल्यास जबाब दिला जाणार नाहीं.

म्यानेजर–ज्योतिर्माला दादर, मुंबई नं. १४.

# बालबोध ज्योतिष.

**ज्योतिर्मालेच्या** कांहीं वर्गणीदारांच्या सूचनेवरून हा ज्योतिषशास्त्राचीं मूलतत्त्वें शिकविणारा ग्रंथ तयार केला आहे. **मालेच्या** वर्गणीदारांस किंमत ०४ आणे. इतरांस ०६ आणे. ट. ख. निराळा.

**ज्योतिर्माला**—हें मासिक पुस्तक मुख्यत्वेंकरून फलज्योतिषावर दरमहा प्रसिद्ध होत असतें. दरमहा पृष्ठें १६ वार्षिक वर्गणी ट. ख. सह १॥ रुपया. वर्षारंभ एप्रिल पासून. मासिकांत भारतीय व इंग्लिश विद्वानांचे फलज्योतिषावरील विचार, निरनिराळ्या योगांच्या कुंडल्या व कुंडल्यांचीं वर्णनें, ज्योतिषविषयक निबंध आणि पत्रव्यवहार हे विषय सवडी सवडीनें येत असतात.

## सन १९१६ सालचे रॅफेलचे एफिमरिज.

सदरहू पंचांगें आम्हीं मुद्दाम **ज्योतिर्मालेच्या** वाचकांचे सोईकरितां **लंडनहून** आगाऊ मागविलीं आहेत. यांमध्यें दररोजच्या ग्रिनविच माध्यानकालचे स्वष्ट ग्रह, त्यांची क्रांति, शर व इतर पुष्कळ उपयुक्त माहिती आहे. **मालेच्या** वर्गणीदारांस टपालखर्चासह किंमत आठ आणे. व्ही. पी. खर्च निराळा पडेल. इतरांस किं. आठ आणे. व्ही. पी. व टपाल खर्च निराळा.

प्रति फारच थोड्या असल्याकारणानें ज्यांची मागणी लवकर येईल त्यांनाच वरील सवलतीचा फायदा मिळेल.

**विवाहप्रदीप** किं. ०८ आणे, **ग्रहसाधन** किं. ८ आणे. कै. चिटणीसकृत **ज्योतिर्माला** वर्ष २ रें किं. ०१२ आणे.

टपाल व व्ही. पी, खर्च निराळा. यांशिवाय ज्योतिषशास्त्रावरील आर्य व यूरोपीय पुस्तकें आम्हांकडे विकत मिळतील.

**ऐतिहासिक जुने लेख**—पुस्तक १ लें. चिटणीस घराण्याचा संक्षिप्त इतिहास व सनदापत्रें किं, ०४ आणे. ट. ख. निराळा.

म्यानेजर, ज्योतिर्माला दादर, मुंबई नं. १४.

GIFT
Date 21-5-59
Initial
M. 2128

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आभाचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रीद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कक्षमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽवृत्ति वर्ष १ लें. | एप्रिल १९१५. | अंक १ ला.

## आत्मपरिचय.

गणेशोवः पायात्प्रणमतगणेशं जगदिदम्
[illegible]शेन त्रातं नमइह गणेशाय महते ।
गणेशान्नास्त्यन्यत्त्रिजगति गणेशस्य महिमा
गणेशे मच्चित्तं निवसतु गणेशत्वमवमां ॥ १ ॥

विद्यावेदान्तशीर्षा कुलवरतिलका वेदव्याहानयाक्षा
गांधर्वायुर्धनुष्काऽर्थगुणसृणि धनुर्बाणयुक्ताऽऽर्णकास्या ।
मीमांसाधर्मकल्पश्रवणकुचगला या पुराणांवराढ्या
छन्दः शिक्षांऽघ्रिनासास्फुरतु मनसि सा ज्योतिरंतः स्वरूपा ॥ २ ॥

ज्योतिर्माला मासिक पुस्तक हें नांव जरी नवीन नसलें, तरी प्रस्तुतचा अंक हा त्याच्या जीर्णोद्धाराचा प्रथमांक आहे, हें ज्योतिषशास्त्रज्ञ आणि ज्योतिषशास्त्रप्रिय वाचकांनां कळविण्याचें काम

जितकें आनंददायक आहे, तितकेंच अशा जीर्णोद्धाराच्या प्रसंगीं आपल्या आर्य सांप्रदायाप्रमाणें प्रथमतः ईशचिंतन करण्याचें कामही अत्यंत संतोषदायक आहे. कोणतेंही लहान मोठें कार्य हातीं घ्यावयाचें असतां त्यास सुरवात करण्यापूर्वी भारतीय रिवाजाप्रमाणें नेहमीं वक्रतुंड गजाननाच्या मूर्तीचेंच मंगलाचरण करावें लागतें. सदरहु प्रमाणें प्रस्तुत मासिकाचे अंकास सुरवात करण्यापूर्वी त्या ज्ञानस्वरूपी, अज्ञानरूपभ्रांतीचें छेदन करणाऱ्या, ओंकाररूप, विघ्नांतक, गजाननास अनन्यभावें शरण जाऊन हातीं घेतलेल्या कार्यांत यशःप्राप्ती देण्याविषयीं प्रार्थना करणें हें आम्हीं आमचें आद्य कर्तव्य समजतों.

गजाननाचें स्तवन नेहमीं हातीं घेतलेल्या कार्यांत विघ्नाचें निवारण करित असतें. प्रस्तुत मासिकानें हातीं घेतलेल्या गूढ विषयाचें गूढ उकलण्यास नुसती मानवी शक्ति कुचकामाची आहे. हीं गूढ तत्वें उकलण्यास अशा जबरदस्त दैवी शक्तीची जरूर आहे कीं त्या शक्तीपुढें जगांत दिसणाऱ्या इतर विविध शक्ती अगदीं पंगु भासूं लागतात. ज्या दिव्य शक्तीनें ह्या अखिल विश्वास निर्माण केलें, जी स्थिरचरादि सर्व जीवजंतूंस पोषीत आहे, जिच्या सत्तेनें सर्व ग्रह, नक्षत्रें, प्रकाशित व अप्रकाशित अनंत गोल आकाशांत सुयंत्रित चालत आहेत, जिच्या कर्तृत्वशक्तीबद्दल कोणास कधींही पूर्ण कल्पना झाली नाहीं व होणारही नाहीं व जिच्या इच्छेच्या योगानें अनंत ब्रम्हांडाचे उदयास्त होतात अशा त्या अनंत व अगोचर भगवतीचें मंगलाचरण करण्याचें कामही फार संतोषदायक आहे. मंगल कार्याच्या प्रथमांकाची सुरवात मंगलप्रद आचरणांनींच करणें हा आजदिन तागायत आम्हां आर्यांचा परिपाठ आहे; त्यास अनुसरूनच शिरोभागीं लिहिलेल्या श्लोकानें, जिनें आम्हांस हें मासिक चालूं करण्याची प्रेरणा केली त्या जगचालक नारायणीचें यथाशक्ती नामस्मरण करून, तिच्याच प्रेरणेनें आम्हीं हातीं घेतलेल्या या कार्यांत तिनें आम्हांस सर्व प्रकारें यश द्यावें व 'ज्योतिर्माला' चिरंजीवी करावी अशी तिची व ज्या सद्गुरूच्या कृपाप्रसादानें ह्या मासिकाच्या अभिनवावृत्तीचा मांगलीक सुयोग आला त्याची मनोभावें करुणा भाकून मालेच्या कार्यभागाकडे वळतों.



हल्लींच्या शास्त्रीय युगांत सर्व शास्त्रांची झपाट्यानें प्रगति होत आहे व त्याच प्रमाणें सर्व शास्त्रांत श्रेष्ठ असें जें ज्योतिषशास्त्र त्याची अभिवृद्धि व्हावी म्हणून गुरुवर्य **कै. जीवन त्रिंबक चिटणीस** यांनीं कांहीं विशिष्ट हेतु पुढें ठेवून, सन १८९२ सालीं **"मुंबई ज्योतिर्विद् मंडळ"** या नांवाची संस्था स्थापन केली. नंतर सन १८९९ चे एप्रीलचे सुमारास संस्थेच्या ध्येयांतील 'ज्योतिषशास्त्रांवर अनुभवजन्य उत्तम व स्वस्त ग्रंथ प्रकाशित करणें' हा उद्देश पूर्ण करण्याकरितां **'ज्योतिर्माला'** नांवाचें मासिक पुस्तक सुरु केलें. फलज्योतिष शास्त्रावर मराठींत चर्चा करणारें हेंच प्रथम मासिक होतें. तो काल या शास्त्राच्या प्रगतीस प्रतिकूल होता. कारण ह्या शास्त्राचा पुरता एक आठवडाभरही अभ्यास न करतां केवळ हें एक जुनें शास्त्र आहे व साहेब लोक ह्या शास्त्रांवर विश्वास ठेवित नाहींत म्हणून कांहीं एकदेशी विद्वानांच्या मतें हें नादान व टाकाउ असें होऊन त्या काळीं अनेक लोकभ्रमांपैकीं एक आहे असें ठरलें होतें. अशा या प्रतिकूल काळांत अनेक संकटांमुळें या मासिकास दोनच वर्षांनीं मुक्काम करावा लागला. परंतु गुरुवर्य कै. जिवनराव यांनीं जी चळवळ उत्पन्न केली व जो छात्रवर्ग व मित्रवर्ग तयार केला, त्यांपैकींच एकानें पुढें नेटानें ह्या शास्त्राची एकनिष्ठपणानें अमोल्य अशी तेरा वर्षें से[illegible] केली. खडतर असें शास्त्रसेवेचें तेरा वर्षें तप करून **श्रीयुत विष्णु गोपाळ नवाथे** यांनीं पूर्वीची प्रतिकूळ परिस्थिती बदलून टाकिली आहे. अनेक ऐहिक अडचणीमुळें ज्योतिर्विद् नवाथे यांस आपलें मासिक पुस्तक बंद करावें लागलें. ज्यो. नवाथे यांनीं **'कुंडलीविज्ञान'** द्वारें जी एकनिष्ठपणें शास्त्रसेवा केली त्याबद्दल त्यांचा जितका गौरव करावा तितका थोडाच आहे. त्यांचे ठिकाणीं वसत असलेली कार्यदक्षता निःस्वार्थीपणा व चिकाटीनें हातीं घेतलेलें काम पूर्ण करण्याची तऱ्हा वगैरे गोष्टी लक्ष्यांत घेतल्या असतां कुंडलीविज्ञानद्वारें फलज्योतिषांचा जो उहापोह झाला तसा इतर कोणाकडून होईल असें आम्हांस वाटत नाहीं. गुरुवर्य कै. जीवनराव चिटणीस व ज्यो. नवाथे यांनीं चालविलेल्या शास्त्र संशोधनाची परंपरा कायम राहाणें अत्यंत जरूरीचें आहे व ही परंपरा कायम

ठेविण्याकरितां प्रस्तुत मासिकाच्या पूर्व जनकाची अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याच्या भक्तिपूर्ण महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन आम्ही ज्योतिर्मालेच्या जिर्णोद्धाराचें महत् कार्य शिरावर घेतलें आहे.

ज्योतिषशास्त्राचे **गणितज्योतिष** व **फलज्योतिष** असे दोन मुख्य विभाग आहेत. फलज्योतिष शास्त्राचे ( १ ) होरा किंवा जातक ( २ ) प्रश्न ( ३ ) मुहूर्त आणि ( ४ ) संहिता किंवा मेदिनीय असे मुख्य विभाग किंवा शाखा आहेत. ह्या सर्व शाखांवर एकवाक्यता नसलेले व सर्व शाखांच्या मिश्रणाचे किंवा स्वतंत्र शाखांवर निरनिराळे असे अनेक प्राचीन उपलब्ध व अनुपलब्ध संस्कृत ग्रंथ आहेत. विज्ञानकारानें ' जातकावर ' फारच श्रम करून त्या विभागापैकीं द्वादशभावफलवर्णनविभागाचा आपल्या तेरा वर्षांच्या करकीर्दींत चांगला व मार्मिक रीतीनें खल केला आहे. बाकी राहिलेल्या फलज्योतिष शास्त्राच्या इतर शाखांकडे अद्याप कोणाचेंही विशेष लक्ष गेलेलें दिसत नाहीं व त्याचमुळें त्या शाखांचा फारसा विचार झालेला नाहीं. त्याचप्रमाणें जातकांतील भविष्यकालनिर्णयविभागही अद्याप पर्यंत आपल्याकडे बाल्य दशेंत आहे. वराहमिहिरानें आपल्या वेळींच्या परिस्थितीकडे पाहून " **म्लेंच्छाहि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रमिदं स्थितम्** " असें म्हटल आहे व सांप्रत काळींही पाश्चिमात्य फलज्योतिषज्ञांच्या अटोकाट प्रयत्नांमुळें त्या देशांत हें शास्त्र चांगल्या रीतीनें परिणत झालें आहे; व वराहमिहिराचे तत्कालीन शब्द आजही खरे आहेत असें आपणास दिसून येतें. म्हणून ज्योतिर्मालेचें ध्येय विशेषतः **भविष्यकालनिर्णयविभाग, प्रश्न,** व **मुहूर्त** आणि साधल्यास **मेदिनीय फलज्योतिषा**चा क्रमानें व शास्त्रीय रीत्या उहापोह करून त्याबरोबरच **युरोपीय फलज्योतिषा**चा **तुलनात्मक अभ्यास** करणें हें आहे. हातीं घेतलेल्या कामांत ज्योतिषशास्त्राभिलाषी वाचक हस्तेंपरहस्तें आम्हांस शक्य ती मदत करतील अशी आमची पूर्ण खात्री आहे. या मालेच्या सुमनांचा सुगंध सर्व विद्वज्जनांस संतोषदायी व फलद्रुप होवो, अशी इच्छा प्रदर्शित करून, हा बराच लांबलेला आत्मपरिचय आटोपता घेतों.



# जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभाववर्णन.

अंशुमान् रवि जगताचा आधार आहे. सर्व प्राण्यांस जीवनशक्ति आणि चेतना हीं रवीपासून प्राप्त होतात. सूर्यमालेंतील असंख्य गोलांस त्याजपासूनच तेज प्राप्त होतें. रवि 'जगताच्या गति, स्थिति आणि लयाचें कारण' असल्यामुळें ज्योतिषशास्त्रांत रवीला फार प्राधान्य आलें आहे. कुंडलीमध्यें रवीवरून अनेक गोष्टींचा बोध होतो व त्या अनेक गोष्टींपैकीं नैसर्गिक स्वभाव किंवा शील दृग्गोचर होतें. स्वभाववर्णन करण्यांत रवि कोणत्या राशींत आहे, त्याबरोबर इतर ग्रहांचे कसे दृष्टियोग झाले आहेत व चंद्र कोणत्या राशींत आहे हें प्रथम पाहिलें पाहिजे. ज्योतिषशास्त्रांत चंद्र हा मनाचा कारक [illegible] म्हणून स्वभाव वर्णन करण्यांत तो ग्रह अवश्य विचारांत घेतला पाहिजे. इतक्या गोष्टी लक्ष्यांत घेऊन नंतर स्वभाव वर्णन केलें तरच वस्तुस्थितीशीं जुळतें असा आमचा अनुभव आहे. स्वभाव वर्णन करण्याकरितां इतक्या गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतात याची दादहि आमच्या येथील बऱ्याच ज्योतिर्विदांस नाहीं. कोणत्याहि मनुष्याची कुंडली हातीं घेतली असतां त्याचा स्वभाव वर्णन करणें ही प्रथम भूमिका होय. ही भूमिका ज्योतिर्मालेच्या वाचकांस लवकर साध्य व्हावी म्हणून प्रत्येक राशीमध्यें रवि आणि चंद्र असतांना त्यांची एकत्र फलें काय मिळतात यासंबंधानें स्वतःचा अनुभव देत आहों.

## मेष संक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

**मेष** ही राशिचक्रांतील आद्य, अग्नितत्त्वाची, प्रधान व चर राशि आहे. ह्या राशींत रवि प्रायः प्रत्येक वर्षी तारीख २१।२२ मार्चचे सुमारास संक्रमण करितो व तो तारीख २० एप्रिल पर्यंत त्या राशीमध्यें असतो. रवि मेषेंत असतांना ज्यांचा जन्म होतो ते लोक अधिकार व कीर्तिप्रिय असतात, प्रत्येक गोष्टींत किंवा कार्यांत पुढारीपणा किंवा प्रमुखता मिळविण्याची हांव बाळगणारे, स्वच्छंदी, दुसऱ्याचे हातांखालीं काम करणें म्हणजे महत् संकट मानणारे, सुधारणाप्रिय, आशावादी, उतावळे , परंतु हिम्मतवान, आपलें म्हणणें खरें करणारे, शीघ्रकोपी, उदार किंवा दिलदार स्वभावाचे,

निर्भिडपणानें स्पष्ट बोलणारे; साहसी, स्वतःविषयीं विशेष अभिमान बाळगणारे, कल्पक, कोंवळ्या मनाचे, मनांत मोठमोठ्या कल्पना योजणारे, पण हातून फारच थोड्या गोष्टी साधणारे, पुढील होणाऱ्या भावी स्थितीबद्दल उत्तम तऱ्हेनें अटकळ बांधणारे, भविष्यवादी, तासचेतास विचार तरंगांत घालविणारे, नाना तऱ्हेच्या नूतन गोष्टींची आवड बाळगणारे, प्रवासाचे शोकी, नाना तऱ्हेचे नूतन देश पाहण्याची इच्छा बाळगणारे, मानसिक सृष्टींत विशेष जागृत असल्याकारणानें व्यवहारदृष्ट्या पंगु, अति महत्वाकांक्षी, मोठमोठ्या धाडसाचे कृत्यांत उडी घालणारे, संकटास न जुमानणारे, सारासार विचार न करितां एकदम कोणत्याही गोष्टीला हात घालणारे, लोकांत पुढारीपणानें वागणारे, भांडखोर, लवकर चिडणारे, स्वतःचा स्वभाव ताब्यांत न ठेवणारे, सुमित्र, भाषण करण्यांत पटाईत, गमती असे असतात.

**प्राप्त स्थितीपेक्षां अधिक उन्नत स्थितीसाठीं सदोदित धडपण करणें हा मेषस्थ रवीच्या मनुष्याचा नैसर्गिक स्वभाव आहे.**

जन्मकाळीं मेष राशींत रवि असतां मस्तकास विकार, नेत्रविकार, मूत्रपिंडांचे विकार, विशेषतः मस्तकशूलापासून त्रास होण्याचा जास्त संभव असतो. मेष राशींत रवि असतां खालील प्रकारचे धंदे करणारे लोक आढळतात.

व्यवस्थापक, पुढारी, शिल्पशास्त्रज्ञ, कंपनी स्थापन करणारे, सामुद्रीक, मस्तुलिंग विद्या जाणणारे, दलाल, एजंट्स, अप्रेसर्स, सर्व्हेअर्स, सेल्समन्, गुप्तपोलीस, ट्राव्हलींग एजंट्स, इन्सपेक्टर्स. म्यानेजर्स, लेक्चरर्स, लहान लहान गोष्टी लिहिणारे, इस्टेट एजंट्स, फोटोग्राफर्स.

**रविचंद्राचे राशिपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाववर्णन.**

मेषेंत रवि व मेषेंत चंद्रः—तीव्र परंतु अस्थिर बुद्धि, कोणतेंही काम विचारापेक्षां स्फूर्तीनें करणारा, स्वतंत्र, आत्मविश्वासी, हट्टी, शीघ्रकोपी, लोकांत पुढारीपणानें वागणारा परंतु किंचित् स्वार्थी, मनुष्य उन्नत झालेला नसला तर फसविणारा व फुगाऊन सांगणारा, आत्मस्तुतिप्रिय, व ह्या



लोकांवर अविचारामुळें नाना • तऱ्हेचीं संकटें येतात. उन्नत झालेला असेल तर दुरदर्शी आणि ग्राहक शक्ति उत्तम असते. मानसिक त्रासामुळें व अविश्रांत श्रमामुळें मस्तविकार होण्याचा जास्त संभव असतो. ह्या योगावर जन्मणाराच्या स्वार्थीपणामुळें अहित होण्याचा विशेष संभव असतो.

मेषेंत रवि व वृषभेंत चंद्रः—कारस्थानी, बाताबेतानें वागणारा, विचारी, करारी, चिकाटीनें हातीं घेतलेल्या कार्यात यश मिळविणारा, निरोगी, आपलेंच म्हणणें खरें मानणारा, हा योग अधिकार व सांपत्तिक सुख चांगल्या प्रकारचें दर्शवितो व ह्या योगावर जन्मणारे लोक स्वतःच्या उद्योगामुळें उदयास येतील.

मेषेंत रवि व मिथुनेंत चंद्रः—उत्तम बुद्धिमत्ता परंतु श्रमसातत्याचा अभाव, अस्थिर बुद्धीचे, चंचल, कोणतेंही कृत्य करण्यापेक्षां बटबट विशेष करणारे, ह्या योगावर जन्मलेले लोक हुशार, हजर जबाबी, लेखक आणि विद्याव्यासंगी असतात व त्यांचा विद्या व प्रवास यामुळें उदय होईल.

मेषेंत रवि व कर्केंत चंद्रः—टीका करण्याची हांव बाळगणारे, महत्त्वाकांक्षी, किर्तीसाठीं हपापलेले, स्वभाव किरकिरा, मनोराज्य व कल्पनातरंगांत गुरफटणारे, खाण्यापिण्यांत विशेष सावधता न बाळगल्यास उत्तरोत्तर पाचकशक्ति कमी होत जाते. या योगावर जन्मणाऱ्या लोकांस बहुधा घरगुती संसारिक बाबतींत त्रास होतो.

मेषेंत रवि व सिंहेंत चंद्रः—अत्यंत उत्साही, धीरोदात्त, साध्य वस्तूंकरितां अत्यंत परिश्रम करणारा, धार्मिक, प्रामाणिक, कपड्यालत्याचा शोखी असतो. या योगावर जन्मलेला मनुष्य नशीबवान्, यशस्वी व अधिकारसंपन्न असतो व या लोकांचा धैर्य व साहस यामुळें उदय होतो.

मेषेंत रवि व कन्येंत चंद्रः—स्वकार्यतत्पर, नीटनेटका, रीतसर, विद्याव्यासंगी, व्यापारी दृष्टी ठेवणारा, विवेकबुद्धी बरीच जागृत असते. या योगावर जन्मणारांमध्यें विचारशक्ति, दूरदर्शीपणा, गायनवादन शास्त्राची गोडी आढळते. या योगावर लेखक, टीकाकार व स्वयंस्फूर्तीप्रचुर लोक आढळतात.

मेषेंत रवि व तुळेंत चंद्रः—या योगांत मेष राशीचे बरेच गुणधर्म समतोल होतात. गुणग्राहकता, कलाकौशल्याकडे ओढा, सौंदर्यप्रियता, प्रत्येक गोष्टींत तुलनात्मक विचार करण्याची खोड असते. या योगावर जन्मणारे लोक उत्तम सल्लामसलतगार व कायद्याचे धंद्यास लायक असतात. या लोकांस धंद्यांत भागीदारापासून फायदा होईल.

मेषेंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः—मनांत एक व बाह्य वर्तन निराळेंच दर्शविणारा, द्वेषी, परोत्कर्ष सहन न होणारा, स्वभाव रागीट, खुनशी, भांडखोर असतो हा योग जन्मकाळीं होणें इष्ट नाहीं.

मेषेंत रवि व धनेंत चंद्रः—दूरदर्शी, भविष्यवक्ता, तात्विक विचार करणारा, धार्मिक, सरळ, उतावळा, बडबड्या, योग्य काम करणारा असतो. साधारणपणें या लोकांच्या मध्यम आयुष्यापासून उदय होतो व प्रवासापासून नाना तऱ्हेचे फायदे होतात.

मेषेंत रवि व मकरेंत चंद्रः—कारस्थानी, स्वार्थी, चंचल मनाचा, महत्वाकांक्षी. कीर्तीची किंवा नांवालौकिकाची विशेष आवड बाळगणारा, चौकस, धनलोभी असतो. या योगावर जन्म पावणाऱ्या लोकांस वडिलार्जित संपत्तीचा लाभ होण्याचा संभव असतो.

मेषेंत रवि व कुंभेंत चंद्रः—विचारी, गंभीर, अभ्यासी, मानवी स्वभावाचें बारकाईनें निरीक्षण करणारा, सत्यप्रिय, स्थिरबुद्धीचा, गायनवादनाकडे प्रवृत्ति असते. या योगावर जन्मणाऱ्या लोकांस मित्रांमुळें लाभ किंवा उदय होईल.

मेषेंत रवि व मीनेंत चंद्रः—परोपकारी, उदार, असमाधानी, चालमेल्या, चिरचिऱ्या, अपकीर्ति व गुप्त शत्रुत्वापासून त्रास व अनेक दुःखें भोगावीं लागतात.




## प्रसिद्ध पुरुषांच्या कुंडल्यांचा संग्रह.

नंबर १.

# स्वामी विवेकानंद.

सायन लग्न.






भारतखंडामध्यें ज्या अनेक विभूति होऊन गेल्या व ज्यांच्या कर्तृत्वामुळें आपल्या देशास परदेशीं मान मिळतो, अशांपैकीं **स्वामी विवेकानंद** ही एक विभूति होऊन गेली. स्वामींचें नांव कोणास माहिती नाहीं असा एक सुशिक्षित मनुष्य आपल्या देशांत सांपडावयाचा नाहीं. अशा या लोकोत्तर विभूतीची कुंडलीहि लोकोत्तरच असावी यांत कांहीं नवल नाहीं. ज्योतिषी—विद्यार्थ्यांस या कुंडलीमध्यें इतरत्र पहावयास

न मिळणारे योग दृष्टीस पडतील. आणि धर्मप्रसारक, तत्वज्ञानी व धर्म-संस्थापक यांच्या जन्मकाळीं ग्रह–स्थिति कोणत्या प्रकारची असते ह्यासंबंधानें त्यांस बरोबर अटकळ करितां येईल. आतांपर्यंत झालेल्या धर्म–संस्थापकांपैकीं विश्वसनीय अशी फक्त येशुख्रिस्ताचीच कुंडली उपलब्ध आहे. स्वामी विवेकानंद व जीझस यांच्यां कुंडलींतील साम्य फारच आश्चर्य–कारक आहे हें पुढील वर्णनावरून दिसून येईल.

स्वामींच्या जन्मकाळीं **मकर** या चर राशीचा १८ वा अंश उदय पावत होता. उदित अंशाबरोबर महत्वकारक ग्रह **रवि** हा नवमेश **शुक्र** व शास्त्रीय राशींतील पंचमेश **बुध** ह्यांबरोबर क्षितिजावर येत होता. जन्मलग्नाधिपती **शनि** आपल्या उच्च राशींत **धर्म** ( नवम ) स्थानांमध्यें पूर्वोक्त बुध–शुक्रांच्या दृष्टींत आहे. ह्यामुळें स्वामींची शरीरयष्टि निरोगी भव्य व कणखर अशी होती. लग्नांतील रवीमुळें चेहऱ्यावर भव्यता व बुध–शुक्रांमुळें अपूर्व मनोवेधकता व दैवी तेज विलसत होतें.

ह्या कुंडलींत बुद्धि–योग फार अप्रतीम झाला आहे. पंचमाधिपती बुध, कुंभ या शास्त्रोय राशींत असून लग्नीं आहे, व लग्नाधिपती शनिबरोबर त्रिकोण योग करीत आहे. बुध शनीचा त्रिकोण योग प्रथम व नवमस्थानांतून व शास्त्रीय राशींतून होत आहे, यामुळें वेदांतासारखे कठीण विषयही सहज आकलन करितां येण्यासारखी बुद्धि प्राप्त झाली. बुधशनीच्या त्रिकोण योगामुळें बुद्धीस स्थैर्य, तत्वज्ञानाकडे ओढा, सत्य शोधनार्थ चिकित्सकता, स्वाभाविक त्यागशील व सत्वशील वृत्ती इत्यादि गुण दृष्टीस पडतात. आणि हाच योग शास्त्रोय राशींतून व बौद्धिक स्थानांतून होत असल्यास "अधिकस्याधिकं फलम्" असें समजावें. बुध–शनीच्या त्रिकोण योगांस १।५।९ हीं स्थानें व मिथुन, तूळ व कुंभ या राशी उत्तम होत. प्रस्तुत कुंडलींत दुसरा बुद्धि–योग बुध–चंद्राचा त्रिकोण योग हा होय. बुद्धीस तरतरीतपणा, विषय ताबडतोब आकलन करितां येणें, एकदा शिकलेला विषय कधींहि न विसरणें आणि समयसूचकता हे गुण बुध–चंद्र–त्रिकोण योगामुळें येतात. याहि योगास स्थानबल व राशिबल उत्तम प्रकारचें आहे. प्रथम,



पंचम व नवम या तीन अति महत्वाच्या स्थानांत रवि, गुरु, शनी व हर्शल हे प्रचंड गोल व त्यांजबरोबर दुसरे गोल बुध, शुक्र व चंद्र असल्यामुळें असाधारण बुद्धिमत्ता प्राप्त झाली होती. "तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्"!

लग्नेश शनि नवमांत उच्च व त्याचा बुध–शुक्रांशीं शुभ दृष्टियोग व नवमांत गुरु असल्यामुळें वर्तन अत्यंत पवित्र व नीति–मत्ता उच्च दर्जाची होती. बुद्धीचा कारक ग्रह बुध व मनाचा कारक ग्रह चंद्र यांचा त्रिकोण योग बुद्धि व मन यांची एकस्वरूपता दर्शवितो. पाश्चिमात्य ज्योतिष्यांच्या मतें तृतीय स्थान हें बुद्धिस्थान आहे. तृतीय स्थानासंबंधानें आमचा अनुभवहि तसाच आहे. ह्या स्थानांत असलेले ग्रह सुद्धां बुद्धीवर परिणाम करितात. प्रस्तुत कुंडलींत तृतीय स्थानांत नेप्च्यून हा ग्रह आहे. बुध व शुक्र हे ग्रह नेप्च्यून बरोबर द्विराश्यंतर हा शुभ दृष्टियोग करीत आहेत. हा योग अतींद्रिय विषयांत पारंगतता दर्शवितो. लग्नांतील शुक्र व तृतीयांतील नेप्च्यून यांच्या तृतीय–एकादश योगामुळें स्वामी ललितकलांमध्येंहि प्रविण होते.

वर लिहिलेल्या बुद्धि–योगांप्रमाणेंच वक्तृत्वासंबंधानेंहि अपूर्व योग झाला आहे. वक्तृत्वासंबंधानें सर्वसंमत असे कांहीं सामान्य नियम आहेत. ते असे:—

( १ ) लग्नांत बुध किंवा शुक्र आणि धनस्थानीं वायु राशी. ( मिथुन, तूळ किंवा कुंभ. )

( २ ) धनस्थानीं वायु राशींत शुभग्रह विशेषतः बुध किंवा शुक्र.

( ३ ) धनस्थानीं वायुराशी आणि दशमारंभीं बुध.

( ४ ) सप्तमांत वायुराशीमध्यें बुध किंवा शुक्र.

स्वामींच्या कुंडलींमध्यें, लग्नकेंद्रीं बुध शुक्र, वाक्स्थानीं कुंभ ही वायुराशी व वायुराशींत असलेलें ग्रह-पंचक, हा वक्तृत्वासंबंधानें अत्यंत प्रबल योग झाला आहे. आणि ह्याच योगामुळें "दैवी वक्ता" (an orator by Divine right) अशी परद्वीपांतरींहि ख्याती झाली.

कोणत्याहि कर्तृत्ववान् मनुष्याच्या कुंडलीमध्यें एक किंवा अनेक अभंग असे राजयोग लागतात. राजयोगांवाचून मनुष्य कीर्तिमान् व कर्तृत्ववान् होणें शक्य नाहीं. नुसते उच्च किंवा स्वगृहीं असलेल्या ग्रहामुळेंच राजयोग होतात असें नाहीं. राजयोग कोणत्या तत्वावर होतात हें ह्या लहानशा चरित्र लेखांत दाखवितां येणें अशक्य आहे. येथें फक्त आपल्यापुढें असलेल्या कुंडलींतील राजयोग देतों.

(१) भाग्येश व चतुर्थेश शुक्र. आणि धनेश व लाभेश गुरु हे केंद्र–कोणामध्यें. "**गुरु–शुक्र–शुभाधीशाः केंद्र कोणायगा यदि। अनेकयानसंपन्नो मंडलाधिपतिर्भवेत्** ॥

(२) लग्नेश व भाग्येश आणि लग्नेश व पंचमेश यांचा अन्योन्य योग.

(३) सर्व ग्रह केंद्र कोण व तृतीय एकादश या स्थानांमध्यें आणि लग्नेश उच्च असा नवमांमध्यें "**लग्नेश नवमे पुंसो भाग्यवान् जनवल्लभः। विष्णुभक्तः पटुर्वाग्मी**···· ॥

(४) लग्नामध्यें पंचमेश व नवमेश बुध-शुक्र यांची युति आणि कोणामध्यें गुरु.

वर सांगितलेल्या योगावर जन्मलेल्या मनुष्यास जगाच्या दृष्टीनें अत्यंत दुष्प्राप्य असें ऐश्वर्य, मान, धन, आणि कीर्ति मिळवितां आली असती परंतु ईश्वरेच्छा कांहीं निराळीच होती व त्या ईच्छेमुळेंच सर्व कर्तृत्वाचा ओघ एका विवक्षित कार्याकडेच वळावा म्हणून त्या कार्याला अनुरूप अशीच ग्रहयोजना झालेली आहे. प्रत्येक कुंडलींमध्यें नवग्रहांपैकीं एक ग्रह "**आत्मकारक**" असतो व ह्या आत्मकारक ग्रहाप्रमाणें मनुष्याचें येथील कार्य–क्षेत्र असतें. स्वामी विवेकानंद यांच्या कुंडलीमध्यें लग्नाधिपती शनि हा बुद्धि–दर्शक ग्रह बुध व मनदर्शक ग्रह चंद्र यांजबरोबर अनुक्रमें त्रिकोण योगानें व युतीनें संबंधित असून धर्मस्थानामध्यें उच्च आहे म्हणून आत्मकारक होतो. शनि हा तत्वज्ञान व योग यांचा कारक ग्रह आहे. नवम स्थानामध्यें बलवान् शनि असून शुभ संबंधित असेल तर **धर्म, तत्वज्ञान व योग** यांकडे स्वाभाविक प्रवृत्ति असते. **जीजस ख्राइस्ट** यांच्या कुंडलींत पंचमेश शनि नवमांत मिथून राशीचा आहे. **स्वीडनबर्ग** ह्याच्या



नवमांत स्वामी विवेकानंद यांजप्रमाणें उच्च शनि आहे. प्रख्यात जर्मन तत्ववेत्ता **कँट** याच्या नवमांत स्वगृहीचा शनि आहे. विस्तारभयास्तव दुसरीं उदाहरणें देतां येत नाहींत. असो, स्वामी विवेकानंद यांच्या आत्मकारक शनीनें धर्माच्या विस्तृत क्षेत्राकडे त्यांस आणिलें. सर्व जगामध्यें जडवादाचें अभ्युत्थान झाल्यामुळें त्याचा प्रतिकार करण्याकरितां स्वामी विवेकानंद यासारखा वाग्मी, प्रज्ञावंत आणि सद्गुरूच्या पूर्ण कृपेमुळें आत्मानुभवी, अशा नररत्नास ऋषींनीं निवडावें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. स्वामींच्या अवतार कृत्याकडे पाहून "**मी अविवेकाची काजळी। फेडूनि, विवेकदीप उजळी**" या कृष्ण–वाक्याचीं सत्यता पटते. "महत्काल लोटून गेल्यामुळें नष्टप्राय झालेला धर्म **भगवान् श्रीकृष्णांनीं** जसा प्रकट केला, त्याच प्रमाणें तोच सनातन धर्म प्राचीन ऋषींनीं **स्वामी विवेकानंद** यांचे मुखानें वदविला" असें ज्योतिषाचें सत्य ज्ञान असलेला ज्योतिषी म्हणेल.

धर्मसंस्थापक **जीजस् ख्राईस्ट** यांचें **तुला लग्न** होतें. तुला राशी समता व विश्वप्रेम व्यक्त करिते. स्वामी विवेकानंद यांचा लग्नाधिपती तुला राशींत होता. दोघांच्याहि नवमांत शास्त्रीय राशीचे शनि होते. जीजसच्या कुंडलींत पंचमेश व नवमेश यांचा अन्योन्य योग होता व स्वामींच्या कुंडलींत पंचमेश व नवमेश यांची युति होती. दोघांचेहि रवि मकर राशींत मंगळ मेषराशींत व गुरु तुला राशींत आहेत. हें ग्रहांचें साम्य खरोखर आश्चर्यकारक आहे !

स्वामी विवेकानंद यांच्या कुंडलीमध्यें बुद्धिमत्ता व वक्तृत्व यांचे द्योतक योग मागें दिलेच आहेत परंतु त्यांच्या सर्व आयुष्यामध्यें अत्यंत महत्वाचा योग म्हणजे **सद्गुरुकृपा** हा होय. गुरूचा विचार नवम स्थानावरून करितात. नवमेश व नवमस्थान हे बलवान् असून लग्नेशाशीं त्यांचा शुभ संबंध असल्यास गुरूपदेश होतो. लग्नांत, पंचमांत व नवमांत गुरु असून, नवमेश बलवान् असल्यास गुरूपदेशाचा योग येतो. स्वामी विवेकानंद यांच्या कुंडलींत नवमांत गुरु व शनि आणि नवमेश लग्नांत आहे. ह्या

योगांस राशिवळ उत्तम असल्यामुळें **परमहंस रामकृष्णां**सारखे सद्गुरु मिळाले.

स्वामी विवेकानंद यांच्या आयुष्यामध्यें घडलेल्या गोष्टींसंबंधानें **परिभ्रमण** आणि **दिनवर्ष** पद्धतीनें कसे योग आले होते हें येथें दाखवावयाचें होतें परंतु या चरित्रलेखाकरितां आंखलेली मर्यादा संपून गेल्यामुळें तो विचार आज तहकूब करणें भाग आहे. **रामनारायण.**

# जातक-मार्गोपदेशिका.

[ लेखकः—यशवंत केशव प्रधान ]

**जितकें कांहीं आपणास ठावें । तितकें हळु हळु शिकवावें ॥**
**शहाणें करून सोडावें । सकल जना ॥** (श्रीरामदास)

फलज्योतिष हें एक शास्त्र आहे. त्याचे योगानें सर्व स्थावर जंगमावर झालेले ग्रहांचे व तान्यांचे संस्कार दिसतात. ह्या शास्त्राची उत्पत्ति जगाचे प्रथम इतिहासासारखीच गूढ आहे. प्राचीन आर्य ऋषींनीं हें शास्त्र बरेंच पूर्णत्वास नेलें असून सर्व यूरोपीय राष्ट्रांस तें कालेंकरून प्राप्त झालेलें आहे. **न्यूटन, टायकोब्राहे,** आणि **केप्लर** हे ज्योतिर्विद होते त्याचप्रमाणें फलज्योतिषीहि होते. **मिल्टन् ड्रायडन्** हे कवि त्याचप्रमाणें **लॉर्ड बेकन्** व **आरिस्टाटल** हे तत्ववेत्तेही फलज्योतिषी होते. ह्या सर्व विद्वानांनीं फलज्योतिषाची सत्यता जगास दाखविली आहे, म्हणून हें शास्त्र विश्वसनीय असून विद्वान् लोकांस सदोदित आनंद देणारें आहे.

ज्योतिष-शास्त्ररूपी कल्पतरु फार प्राचीन काळीं ह्या आर्यभूमींत उद्भवून मोठ्या जोरानें वाढत होता. त्यास सतत लोकाश्रय व राजाश्रय यांचें उदक मिळत होतें. त्याच्या पुष्प-फलांचा आस्वाद घेऊन सर्व लोक तृप्त होत होते. त्याच्या पुष्पांचा सुवास ह्या देशांतच सर्वत्र पसरला होता असें नाहीं तर दूरदूरच्या देशांतही पसरला होता व फार प्राचीनकाळीं देखील परदेशीय



भक्तजनांकडून ह्यास सुधारणारूपी थोडें बहुत उदक मिळालें आहे. अशा ह्या आमच्या ज्योतिष-शास्त्रतरूची पुढें कांहीं काळानें वाढ खुंटली. त्यास त्याच्या भक्तजनांकडून चिकित्सा, चर्चा व कालांतरानें होणारे फरक वगैरे गोष्टीरूप उदक मिळेनासें झाल्याकारणानें त्याचे जोमदार हिरवे पल्लव जाऊन तो आज खुरटलेला दिसूं लागला आहे. प्राचीन काळीं मिळालेल्या पाण्यानें व मध्यंतरी कधीं कधीं प्राप्त झालेल्या जलबिंदूंनीं तो आज जीव धरून आहे व अद्याप कशीतरी आंबट कडू फळें देत आहे. परंतु ह्याच वृक्षाच्या बीजापासून उत्पन्न झालेला किंवा ह्याच्या योगानें पुनरुज्जीवन पावलेला परदेशीय ज्योतिष कल्पवृक्ष इतका जोमानें वाढला आहे व वाढत आहे कीं त्याच्या अध्ययनांत हजारों रसिक आकंठ स्वाद घेत आहेत. इतकें महदंतर दोन वृक्षांत पडण्याचें कारण केवळ नांवानें "आर्य" म्हणून भूषण मिरविणाऱ्या लोकांचा अधःपात व विलक्षण अंधश्रद्धा होय. आम्ही जर आमच्या पूर्वीच्या ओजस आर्य-धर्माचें व रीतीभातींचें अवलंबन करूं तर कालेंकरून आज दिसत असलेला हा खुरटलेला ज्योतिष कल्पवृक्ष खात्रीपूर्वक पुन्हा जोमानें वाढलेला आढळेल. तो जगत् चक्षु **सविता** आम्हां सर्वांस श्रेष्ठतम बुद्धि व सामर्थ्य देऊन निकृष्ट स्थितीप्रत गेलेलें ज्योतिषशास्त्र पूर्णावस्थेस आणण्याची प्रेरणा करो.

कोणतीहि भाषा शिकावयाची असतां आपणांस पूर्वी त्या भाषेची मूळाक्षरें अवश्य शिकावीं लागतात. त्याच न्यायानें आपणास जर "**तारकागणांची**" फलज्योतिषशास्त्ररूपी भाषा शिकणें आहे तर त्या भाषेच्या मुळाक्षरापासूनच सुरवात केली पाहिजे. ज्योतिषशास्त्रांत **ग्रह, तारे** व **राशि** ह्यांचें विवेचन केलेलें असतें. आतां आपण प्रथम ग्रहांचा विचार करूं.

## संज्ञा-विचार.

एखाद्या निरभ्र काळोख्या रात्रीं आपण आकाशाकडे पाहिलें असतां आपणांस सहस्त्रावधि तेजोमय गोल चमकत असलेले दिसतील. ह्या तेजोमय रत्नांकडे पाहून कोणास आनंद वाटणार नाहीं ? त्याचप्रमाणें ह्या असंख्य रत्नांची कोण गणती करूं शकणार आहे ? आपणांस पृथ्वीचे

वरील बाजूस आकाश दिसतें तसेंच दुसऱ्या बाजूसही आकाश आहे, व त्यांतही तारकागण आहेत. नुसत्या डोळ्यांनीं आपणांस सरासरी ६००० तारे दिसतात त्यांपैकीं ३००० मात्र आपणांस एकाच वेळीं दिसतात; व बाकीच्यांचें आपणांस क्रमानें दर्शन होतें. आपल्याभोंवती दूरवर पाहिलें असतां आकाश जमिनीला लागलेलें दिसतें. पृथ्वी आणि आकाश यांच्या स्पर्शानें झालेलें जें वर्तुल दिसतें तें **क्षितिज** होय. सूर्य, चंद्र आणि ग्रह उगवतांना जेथें दिसतात ती स्थानें क्षितिजांतच आहेत. सूर्य, चंद्र, ग्रह व तारे पूर्वेस उगवतात, पश्चिमेस मावळतात; पुन्हां दुसरे दिवशीं पूर्वेकडे उगवतात. परंतु ही त्यांची दैनिक गति वास्तविक नव्हे. ती भासमान आहे. पृथ्वी गोल असून स्वतःभोंवतीं पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. पृथ्वी ज्या कल्पित रेषेवर स्वतःभोंवतीं फिरते त्या रेषेस "**आंस**" किंवा "**अक्ष**" म्हणतात. आणि त्यांचे टोकांस "**ध्रुव**" म्हणतात. पृथ्वीचा आंस वाढविला असतां तोच आकाशाचा आंस होतो. आकाशाच्या आंसांचीं जीं टोकें ते आकाशाचे ध्रुव होत; व म्हणूनच दक्षिणोत्तर ध्रुव सांधणाऱ्या रेषेभोंवतीं सर्व "**भचक्र**" अथवा "**नक्षत्रमंडळ**" फिरत आहे असें दिसतें.

वरील विवेचनावरून दिसून येईल कीं सर्व तारा दिवसांतून एकदां सगळ्या आकाशांतून भ्रमण करितात व रोज थोड्या थोड्या पश्चिमेस सायंकाळीं उदय पावलेल्या दिसतात. ह्या दोन्ही गती भासमान आहेत. चंद्र, गुरु, शुक्र इत्यादिकांची मात्र स्थानें खरोखर पालटतात. बाकी सर्व तारांचें परस्परांमधील अंतर बदलत नाहीं. ह्या ताऱ्यांनाहि गति आहे. पण ती फार अल्प असल्याकारणानें दोन हजार वर्षांत झालेला फरक देखील लक्षांत येत नाहीं. म्हणून त्यांस स्थिरच समजतात. याप्रमाणें स्थिर आणि चर असे आकाशस्थ ज्योतींचे दोन प्रकार होतात. चरपैकीं बुधादि कांहीं तेजें सूर्याभोंवतीं फिरतात. जीं तेजें सूर्याभोंवतीं फिरतात त्यांस **ग्रह** म्हणतात व जीं तेजें दुसऱ्या ग्रहांभोंवतीं फिरतात त्यांस **उपग्रह** म्हणतात. आपली पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत आहे म्हणून शास्त्रीय दृष्ट्या तिची गणना ग्रहांमध्येंच केली पाहिजे. (अपूर्ण.)

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्आप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचिताद्आचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

| | | |
|---|---|---|
| अभिनवाऽवृत्ति वर्ष १ लें. | मे १९१५. | अंक २ रा. |

## ग्रहधर्मनिरूपण.

आत्मा रविः शीतकरस्तु चेतः सत्वं धराजः शशिजोऽथ वाणी ।
ज्ञानं सुखं देवगुरुर्मदश्च शुक्रः शनिः काल नरस्य दुःखम् ॥ १ ॥

फलज्योतिषशास्त्राची इमारत, प्राचीनकाळीं ज्ञात असलेले **सूर्यादि** सप्तग्रह व हल्लीं नूतन उपलब्ध झालेले **हर्शल** ( प्रजापति ) **नेप्च्यून** ( वरुण ) नांवाचे दोन ग्रह व **मेषादि** द्वादशराशि ह्यांवर उभारलेली आहे. ग्रह व राशि ह्यांचें जितकें सूक्ष्म ज्ञान होईल तितकें फलज्योतिषशास्त्राचे अध्ययनास फारच महत्वाचें आहे. करितां प्रस्तुत निबंधांत वाचकांस थोडक्यांत ग्रहांचे गुणधर्म, स्वभाव वगैरेंचें वर्णन करण्याचें योजिलें आहे.

### रवि.

**रवि** हा ग्रहमालेचा चालक असून सर्वांत बलाढ्य आहे. यापासून सर्व ग्रहांस प्रकाश मिळतो. आर्यग्रंथांत याला ग्रहपति, सर्व देवांचा स्वामी व

जगच्चक्षु वगैरे अन्वर्थक विशेषणांनीं संबोधिलें आहे. हा ग्रहमालेचा राजा असल्यामुळें सर्व महत् पददर्शक बाबती, दैवीशक्ति, आत्मा, अग्निदेवता, सरकार, राजदरबार, वगैरे गोष्टींचा कारक ग्रह मानितात. राशिचक्रांतील बलाढ्य अशा **सिंह**राशीचा तो अधिपति आहे.

कुंडलींत **रवि** बलवान् असतां ऐश्वर्य, शौर्य, मान, कीर्ति, दैवी व नैतिक सद्गुण, आरोग्य, अधिकार हीं सर्व प्राप्त होतात. रवीच्या अंमलाखालीं मनुष्यें उदार, सत्कृत्याभिलाषी, गरिबांचे कनवाळु, सत्यासाठीं भांडणारे आणि प्रतिभासंपन्न आढळतात. **रवि** निर्बली असतां अभिमानी, जुलमी व आपली बढाई सांगणारे असे असतात. **रवि** हा मनुष्याचे शरिरांतील हृदय, रुधिराभिसरण, जीवनशक्ति, कुंडलिनीशक्ति, हृदयाचे विकार, पाठींतले विकार, पित्तविकार आणि डोळ्यांचे विकार दर्शवितो.

### चंद्र.

**चंद्र** हा पृथ्वीचा उपग्रह असून आकारमानानें फारच लहान आहे. तो आपली पृथ्वीभोंवतालची प्रदक्षिणा सरासरी २८ दिवसांत पूर्ण करितो. राशिचक्रांत चंद्राचा फेरा सर्व ग्रहांपेक्षां लवकर होतो. व तो पृथ्वीस अति जवळ असल्यामुळें जन्म कुंडलींत फारच महत्त्वाचा आहे हा ग्रह कुंडलींत ज्या मानानें बलवान् असेल त्याप्रमाणें ऐहिक स्थिति आणि मानसिक बल असतें. राशिचक्रांतील जल, आर्द्र व चर अशा **कर्क** राशीचा तो स्वामी आहे.

राशिचक्रांतून **चंद्र** भ्रमण करित असतां ज्या ज्या राशींत तो **जन्मकालीं** किंवा **प्रश्नकालीं** असतो त्या राशीचे गुणधर्माप्रमाणें फळें उत्पन्न करितो. जातकांत चंद्रराशीचें अति महत्त्व मानिलें आहे. कारण चंद्र जन्मकालीं ज्या राशींत असतो त्या राशीचे स्वभावाप्रमाणें जन्मणाऱ्या प्राण्यांचा स्वभाव, मानसिक प्रगल्भता वगैरे गोष्टी आढळून येतात.

जीं मनुष्यें कर्क लग्न उदित असतां किंवा चंद्र लग्नीं उदित असतां जन्मास येतात तीं फार शीघ्र संस्कार ग्रहण करणारीं, मनोविकाराधीन व नाविन्यप्रिय असतात. त्यांच्या सर्व आयुष्यांत मनोविकारांचें विशेष



प्राधान्य असतें व त्यांच्या आयुष्यांत होणाऱ्या बऱ्या वाईट घडामोडी सर्वस्वीं जन्मकालीन प्राप्त झालेल्या परिस्थितीवर अवलंबून असतात. शरिरापैकीं पोट, स्तन, मेंदु, लाळ, लाळोत्पादक पिंड वगैरे अवयवांवर चंद्राचा अंमल आहे व तो त्यासंबंधीं विकार उत्पन्न करितो.

### मंगळ.

या ग्रहाचें आकारमान आणि त्यावरील वातावरण वगैरे गोष्टींत आपल्या पृथ्वीबरोबर पुष्कळ साम्य असल्याचें अर्वाचीन खवेत्त्यांचें मत आहे. यास आपल्यांत **भूमिपुत्र** असें नांव आहे. त्यावरून प्राचीन आर्यज्योतिर्विदांचें मत अर्वाचीन काळांतील खवेत्त्यांसारखेंच असावें असें मानण्यास हरकत नाहीं. हा आपल्या **रुधिर** नांवाप्रमाणें आकाशांत तांबड्या रंगानें चमकत असलेला दिसतो.

**मंगळ** हा ग्रह स्वभावानें धाडसी, लढवय्या, भांडखोर, रागीट व हेकेखोर असा आहे. हा ग्रह कुंडलींत निर्बली असतो त्या वेळीं स्वभाव भांडखोर, लबाड, खुनशी, दुष्ट आणि अति रागीट असतो. राशिचक्रांतील **मेष** व **वृश्चिक** राशींचा तो स्वामी आहे. हा ग्रह अनिष्ट असतां उष्णतेचे विकार, भयंकर व दोषिक ज्वर, प्लेग, कालरा गोंवर वगैरे सारख्या स्पर्शजन्य रोगांपासून त्रास उत्पन्न करितो.

### बुध.

हल्लीं प्रचारांत असलेल्या **भूमध्यस्थ** पद्धतीप्रमाणें हा ग्रह सूर्यापासून २८ अंशांपेक्षां फार दूर असलेला कधींहि आढळत नाहीं. त्यामुळें या ग्रहाचें दर्शन एककाळांस घडत नाहीं. जातकांत हा ग्रह चंद्रा इतकाच महत्त्वाचा आहे. कारण हा ग्रह कुंडलींत ज्या मानानें कमी अधिक बलवान् असतो त्या अनुरोधानें तो मानसिक आणि बौद्धिक उन्नति झालेली दर्शवितो.

ज्यांचे कुंडलींत **बुध चंद्रा**बरोबर त्रिरेकादश दृष्टियोग करीत असतो त्यांचें बुद्धिसामर्थ्य अप्रतिम असल्याचें आढळतें. हा ग्रह चातुर्य, मार्मिकपणा, शोधकबुद्धि, शास्त्रीय विषयाची आवड किंवा वाङ्मयाची गोडी वगैरे गोष्टींचा कारक आहे. राशिचक्रांतील **कन्या** व **मिथुन** राशीचा तो स्वामी आहे.

डोकें दुखणें, अडखळत बोलणें, तोतरें बोलणें, बहिरेपणा, नाना प्रकारचे मानसिक त्रास किंवा रोग बुध अनिष्ट असतां दर्शवितो. हा ग्रह ज्या इतर ग्रहांबरोबर युक्त किंवा दृष्ट असतां जसा शुभ असतो त्या प्रमाणें फलें उत्पन्न करितो, करितां ह्या ग्रहाचा फलादेशाचा विचार करिते वेळीं तो कोणत्या राशींत आहे, कसा व कोणाकडून दृष्ट आहे वगैरे गोष्टींचा पूर्ण विचार केला पाहिजे.

### गुरु.

हा ग्रह सूर्यमालेंतील सर्व ग्रहांपेक्षां आकारमानानें मोठा आहे; त्यास चार उपग्रह ( चंद्र ) आहेत व त्यांपैकीं एकाचें आकारमान वगैरे आपल्या पृथ्वीएवढें आहे. हा ग्रह अति शुभ असून न्यायप्रियता, नेमस्तपणा वगैरे गुण आणि सर्व चांगल्या गोष्टी आणि सुखें यांचा द्योतक आहे. ज्यांचे कुंडलींत हा ग्रह **लग्न, चंद्र** किंवा **बुध** यांचेबरोबर शुभयोग करीत असतो तीं माणसें उदार मनाचीं, न्यायी, प्रामाणिक व खुल्या दिलाचीं असतात. परंतु अशुभ दृष्टियोग करित असतां सांपत्तिक अडचण, मोठ्या लोकांची गैरमर्जी वगैरे गोष्टी दर्शवितो.

राशिचक्रांतील **धनु** व **मीन** या दोन राशींचा तो अधिपति आहे. हा ग्रह रक्तदोष, यकृताचे विकार, डबा, पानथरी, कावीळ वगैरे विकार उत्पन्न करितो.

### शुक्र.

ह्या ग्रहाचें आकारमान सरासरी आपल्या पृथ्वीएवढें आहे. परंतु हा ग्रह इतर ग्रहांपेक्षां बराच प्रकाशवान् असून याचें चंद्राचे चादण्याप्रमाणें स्वच्छ चांदणें पडलेलें पुष्कळ वेळां पाहण्यास मिळतें. **शुक्र बुधा**बरोबर युक्त असतां काव्य, ललितकला, चित्रकला, वाचनकला वगैरे गोष्टींत आवड व प्राविण्य देतो.

**शुक्र** लग्नीं उदित असतां चेहरा मोहक, भाषणशैली उत्तम, स्वभाव मनमिळाऊ, चार चौघांत मिसळणारा, कपड्यालत्त्यांत विशेष नीटनेटकेपणा बाळगणारा असा असतो. परंतु **शुक्र** जन्म कुंडलींत निर्बली असतां हलकट, निर्लज्ज, बीभत्स शब्दप्रिय वगैरे गोष्टी दर्शवितो.



राशिचक्रांतील **वृषभ** व **तूळ** राशी ह्या त्याच्या स्वगृह राशी मानतात. **शुक्र** वृषभ राशीपेक्षां तूळ राशींत जास्त बलवान् व शुभफलदायक असतो. हा ग्रह पापग्रहानें युक्त किंवा दृष्ट असतां अशुभ फलें उत्पन्न करितो. हा ग्रह मूत्राशयाचे विकार, उपदंशादि विकार, स्वतःच्या दुर्व्यसनापासून व अनीतिपथापासून होणारे रोग, वीर्यपात किंवा त्यापासून येणारी दुर्बलता वगैरे विकार उत्पन्न करितो.

### शनि.

सूर्यमालेंतील **शनि** हा ग्रह **हर्शल** व **नेपच्यून** या दोन ग्रहांखेरीज शेवटला असून **गुरूच्या** पलिकडे आहे. हा ग्रह आकाशांत काळसर, पिंगट रंगाचा दिसतो. ह्या ग्रहाभोंवती तीन वलयें असून हा आठ उपग्रहांनीं ( चंद्रांनीं ) वेष्टिलेला आहे म्हणजे जवळ जवळ तो **सूर्यमालेची** लहानशी प्रतिमाच आहे. व म्हणूनच त्यास आपल्या आचार्यांनीं सूर्यपुत्र हे नांव यथार्थ दिलें आहे असें कोणासही सहज वाटेल.

जन्मकुंडलींत **शनि** बलवान् असतां जन्मणारा कुशाग्रमति, मार्मिक, करडा किंवा कठोर, भिडस्त, कृपण, कंटक, मितभाषणी, काटकसरीनें खर्च करणारा, उद्योगी, व सभ्य स्वभावाचा असतो. **शनि** निर्बली असतां संशयी, पाजी, अधम, खुनशी स्वभावाचा होतो. सर्व ग्रहांत **शनि** हा फार पापफलें उत्पन्न करणारा आहे. **शनि** हा **रवि, चंद्र** किंवा **लग्ना**बरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां दंतविकार, नानातऱ्हेचे पुष्कळ काळ टिकणारे रोग, संधिवात, पक्षघात, एखाद्या अवयवांत बधिरपणा वगैरे रोग दर्शवितो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे **शनि** हा भीति, औदासिन्य व मृत्यु यांचा द्योतक ग्रह मानतात. राशिचक्रांतील **मकर** व **कुंभ** राशींचा तो अधिपति आहे.

### हर्शल ऊर्फ प्रजापति.

हा ग्रह अनेक आकस्मिक व विचित्र तऱ्हेच्या गोष्टी घडवितो. सर्व साधारणपणें हा ग्रह "पापग्रह" आहे असें मानतात व त्याप्रमाणें तो अनेक तऱ्हेची चमत्कारिक व कल्पना न करितां येण्याजोगीं पापफलें उत्पन्न करितो. परंतु जन्मकुंडलींत बलवान् असतां नाना तऱ्हेचीं शुभ फलें दर्शवितो. विशेषतः हा ग्रह निर्बली असतां संसारांत नाना तऱ्हेचे कष्ट,

स्त्रीसुखांत किंवा भर्तृसुखांत न्यूनपणा, तंटे, विचित्र तऱ्हेची वागणूक वगैरे गोष्टी दर्शवितो.

हा ग्रह ज्याचे कुंडलींत **लग्न चंद्र** किंवा **बुध** यांचेबरोबर शुभ दृष्टियोग करीत असलेला आढळतो त्या माणसांची बुद्धिमत्ता, मानसिक उन्नति चांगल्या प्रकारची आढळते व त्यांस विशेषतः अध्यात्मिक, गूढ, फलज्योतिष, सामुद्रिक, फ्रेनालाजी (मस्तुलिंगविद्या,) शास्त्रीय विषयाची गोडी, पुराणवस्तुप्रियता, वगैरे गोष्टी किंवा विषय आवडतात.

ह्या ग्रहास सहा उपग्रह असून ते उलट दिशेनें ह्याचे भोवतीं प्रदक्षिणा करितात. हा आकारमानानें लहान असल्याकारणानें दुरबिणीच्या सहाया-खेरीज नुसत्या डोळ्यांनीं क्वचित् दिसतो. हा ग्रह **वायूराशींत**—मिथुन, तूळ व कुंभ राशींत बलवान् असतो.

### नेपच्यून ऊर्फ वरूण.

हल्लीं ज्ञा असलेल्या सूर्यमालेंत **नेपच्यून** हा सर्वांत शेवटचा ग्रह आहे. वरूण या ग्रहाचा धर्म पाण्याप्रमाणें अस्थिर आहे. वारंवार विचार बदलणें, विश्वास ठेवण्यास अयोग्य, अस्थिर वगैरे गुण प्राधान्येंकरून आढळतात. जेव्हां हा ग्रह कुंडलींत बलवान् असून शुभग्रहानें दृष्ट असतो किंवा तो त्यावेळीं **बुध, चंद्र** यांचेबरोबर शुभ दृष्टियोग करित असतो त्यावेळीं बुद्धीची तीव्रता वाढवितो. अंतर्सृष्टींतील किंवा दैवी सृष्टींतील विचारांची प्रेरणा करून मन प्रगल्भ करितो. मनाचा कल अध्यामिकमार्गाकडे लागतो. परंतु तोच एखाद्या वाईट कुंडलींत पीडित असतां, वाईट वासना, मत्सर, लोभ वगैरे गोष्टी दर्शवितो.

नेपच्यूनच्या अंमलाखालची माणसें दुसऱ्याचें अनुकरण फार लवकर करितात. हा ग्रह जलतत्त्वापासून फायदे, गायन, तंतुवाद्य, काव्य, गूढ शास्त्रांची आवड, स्वप्न सृष्टीचे विचित्र अनुभव दर्शवितो. हा **कर्क** व **मीन** ह्या जलराशींत विशेष बलवान असतो. वरूण हा ग्रह बुधाबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां मज्जातंतूंचा क्षोभ होतो. व चंद्रास पीडित असतां शारीरिक व मानसिक स्वास्थ्य नसतें. सर्वसाधारणपणें हा ग्रह अशुभ फलें जास्त उत्पन्न करितो.



# जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभाववर्णन.

## वृषभ संक्रमणांत जन्म पावणाऱ्या

## स्त्री–पुरुषांचें स्वभाववर्णन.

वृषभ ही राशिचक्रांतील द्वितीय, स्थिर, पृथ्वीतत्त्वाचो आणि स्त्रीराशि आहे. या राशींत सूर्य दर वर्षी २०।२१ एप्रिलचे सुमारास प्रवेश करितो आणि २०।२१ मे पर्यंत ह्या राशींत असतो. रवीचें भ्रमण ह्या राशींतून होत असतां ज्यांचा जन्म होतो ते लोक धिम्मे स्वभावाचे, व्यवहारनिपुण, संथ, मोठ्या धीराचे, निश्चयी, दुराग्रही, पुराणमतवादी, सुखाभिलाषी, विश्वासु, प्रामाणिक, भाषणांत व आचरणांत काळजी घेणारे असे असतात. आत्मविश्वास आणि इच्छाशक्ति यांच्या जोरावर हे लोक आपलीं कार्यें पार पाडतात. ह्या लोकांची इच्छाशक्ति बरीच प्रबळ असते. वृषभस्थ रवीचे लोक अनुकूल परिस्थितींत सोशिक असतात परंतु प्रतिकूल स्थिति येतांच क्षुब्ध होतात. या लोकांस राग लवकर येत नाहीं परंतु आल्यावर दीर्घकालपर्यंत टिकतो. वृषभेंत रवि असतांना पुष्कळ वेळां मनुष्यें आळशी, तामसी व दीर्घद्वेषी असतात. परंतु ही स्थिति उन्नत नसलेल्या मनुष्यांची आहे. उन्नत झालेलीं वृषभस्थ रवीचीं मनुष्यें शांत, उदार आणि परोपकारी असतात. काटकसर करून संचय करण्याची प्रबल इच्छा या लोकांमध्यें असते. हे लोक जुन्या म्हणजे रूढमताचे अनुयायी असतात. स्वार्थपरायणता हा दोष थोड्याबहुत प्रमाणानें ह्या लोकांमध्यें आढळतो.

वृषभस्थ रवीच्या लोकांच्या इच्छा विचारांपेक्षां अधिक प्रबळ असतात व त्या **इच्छा कांहींहि झालें तरी धिम्मेपणानें पूर्ण करावयाच्या हा त्यांचा नैसर्गिक स्वभाव असतो.** वृषभेंत रवि असलेल्या लोकांची शरीरप्रकृति साधारण बळकट असते. त्यांस गळ्याचे किंवा छातीचे

रोग होतात. त्यांच्यामध्यें डाक्टर, वैद्य, पेढीवाले, गहाणाचा धंदा करणारे सावकार, कंट्राक्टर, शेतीवाडी करणारे, गुरांचे व्यापारी आणि फळांचा धंदा करणारे लोक आढळतात. ज्या धंद्यांत धिम्मेपणा आणि व्यवहारिक ज्ञान विशेष लागतें, अशा धंद्यांत हे लोक चांगले पुढें येतात.

## रविचंद्राच्या राशिपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाववर्णन.

**वृषभेंत रवि आणि मेषेंत चंद्रः—**वृषभस्थ रवीमुळें जी थोडीबहुत आळसाकडे प्रवृत्ति असते ती या योगानें नाहींशी होते. या योगांवर जन्मलेलीं मनुष्यें महत्त्वाकांक्षी असतात व साधारणपणें मध्यम वयाच्या सुमारास त्यांच्या भाग्योदयास सुरवात होते. **दृढोद्योगानें या लोकांचा उदय होतो.**

**वृषभेंत रवि आणि वृषभेंत चंद्रः—**या योगांवर जन्मलेले लोक आपल्या कृतनिश्चयापासून कधींहि मागें फिरत नाहींत. स्वकार्यतत्पर, रूढ मार्गाचेंच अवलंबन करणारे, स्वाभिमानी, किंचित् हट्टी व दुराग्रही असे असतात. त्यांच्या नियत कार्यात व विचारांत बदल व्हावयाचा नाहीं. **कार्यदक्षतेनें हे लोक उदयास येतात.**

**वृषभेंत रवि व मिथुनेंत चंद्रः—**ह्या योगांवर जन्मलेले लोक बरबर विचार करणारे, संसारांत गढलेले, व मनोवृत्तीच्या ताब्यांत असणारे असे असतात. **यांचा नातलगांमुळें उदय किंवा हानि होते.**

**वृषभेंत रवि व कर्केंत चंद्रः—**परदुःखापासून कळवळणारे, परोपकारी, मित्रांचे शोकी आणि प्रेमळ स्वभावाचे असे या योगांवर जन्मलेले लोक असतात. व त्यांस **गृहसौख्य चांगलें मिळतें.**

**वृषभेंत रवि आणि सिंहेंत चंद्रः—**या योगांवर जन्मलेले लोक गर्विष्ठ, आपलेंच म्हणणें खरें करणारे, आळशी, दुराग्रही आणि उद्दाम असे असतात. यांची सट्ट्याच्या व्यवहाराकडे प्रवृत्ति असते. यांचा **उच्च महत्त्वाकांक्षेमुळें उदय होण्याचा संभव असतो.**



**वृषभेंत रवि व कन्येंत चंद्रः—**पवित्र आचरणाचे, शुद्ध अंतःकरणाचे, काळजीपूर्वक काम करणारे, विवेकी, नीतिमान आणि गाजावाजा न करितां आपलें कार्य करणारे असे या योगाचे लोक असतात. **धनाचा काटकसरीनें उपयोग केल्यानें या लोकांचा उदय होतो.**

**वृषभेंत रवि आणि तुळेंत चंद्रः—**काव्य, कला यांचे शोकी, गुणग्राहक आणि विद्याभिलाषी असे या योगांवर जन्मलेले लोक असतात. **यांचा धोरणी भाषणानें उदय होतो.**

**वृषभेंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः—**आपमतलबी, स्वार्थी, दुसऱ्याचें मुळींच न ऐकणारे, तंटेखोर, आणि गर्विष्ठ असे या योगांवरील लोक असतात. **राजसेवेमुळें यांचा उदय होण्याचा संभव असतो.**

**वृषभेंत रवि व धनेंत चंद्रः—**या योगांवर जन्मलेले लोक प्रेमळ, उत्साही आणि श्रद्धाळु असतात. **यांचा प्रवासामुळें उदय होण्याचा संभव असतो.**

**वृषभेंत रवि आणि मकरेंत चंद्रः—**या योगांवर जन्मलेले लोक कारस्थानी, धोरणी, इच्छित कार्य पुरें करणारे, महत्वाकांक्षी, दीर्घोद्योगी, कर्तव्यदक्ष, स्वावलंबी आणि स्वाभिमानी असतात. **शिस्त आणि व्यवस्था या गुणामुळें यांचा उदय होतो.**

**वृषभत रवि आणि कुंभेंत चंद्रः—**या योगांवर जन्मलेलीं मनुष्यें स्थिर बुद्धीचीं, विश्वासू आणि अल्प संतोषी अशीं असतात. **स्नेहसंबंधानें यांचा उदय होतो.**


**वृषभेंत रवि व मीनेंत चंद्रः—**सुस्वभावी, शांतताप्रिय, मनोराज्यांत गढणारे आणि परोपकारी असे या योगांवर जन्मलेले लोक असतात. **यांचा उदय गुप्त किंवा खाजगी व्यवहारामुळें होतो.**

**सूचनाः—**जन्मकाळीं लग्नावर उदित असणारी राशि व इतर ग्रहांचे दृष्टियोग यांमुळें वरील वर्णनांत थोडाबहुत फरक होईल. ही गोष्ट मागील मेषेच्या वर्णनास व पुढील सर्व राशींच्या वर्णनासहि सारखीच लागू आहे.

# प्रसिद्ध पुरुषांच्या कुंडल्यांचा संग्रह.

## नंबर २ उदारधी ग्लॅडस्टन.

सा. ल.




ग्लॅडस्टन यांच्या जन्मकालीं पूर्वकेंद्रावर **मकर** या चर राशीचा ९वा अंश उदित होता. **लग्नाधिपति शनि** धनुराशींत लाभस्थानांत आणि **लग्नांत बुध व रवि** असल्यामुळें त्यांचें शरीर भव्य व बळकट, त्यांची मुद्रा गंभीर व विचारी होती. **मकर** राशि सर्व राशींमध्यें अत्यंत आश्चर्यकारक आहे. ही राशि जन्मकालीं लग्न केंद्रीं उदित असतां **महत्वाकांक्षा,** पुष्कळ कामें करण्याचा सोस, निरंतर व्यवसायमग्नता, हिशोबीपणा, श्रमसातत्य इत्यादि गुण पहावयास सांपडतात. ह्या गुणांचा **उत्तम** परिपोष कुंडलींत झालेल्या इतर योगांमुळें होतो ही गोष्ट येथें विसरतां कामा नये. प्रस्तुत कुंडलींत लग्न केंद्रीं मकर राशि आणि मकरेंत रवि व बुध असल्यामुळें **ग्लॅडस्टनच्या** अंगीं पूर्वोक्त मकर राशीचे





गुणधर्म चांगलेच दृग्गोचर झाले. "मिळवावयाचें पुष्कळच राहिलें आहे त्या अर्थीं मिळालें तें कांहींच नाहीं" या ग्लॅडस्टनच्या नेहमींच्या वाक्यावरून त्यांची महत्वाकांक्षा कोणत्या कोटींतील होती हें वाचकांनींच ठरवावें. **मकर** राशि **धार्मिकही** आहे. प्रस्तुत कुंडलींत लग्नेश शनि, सत्वगुणप्रधान अशा सुरगुरूबरोबर शुभ ( नव पंचम ) योग करीत आहे त्यामुळें **ग्लॅडस्टनसाहेब** आमरण स्वधर्मनिष्ठ, पापभीरू आणि उदार होते. पंचमेश **बुध** लग्नांत, गूढ राशींतील दशमस्थ **हर्शल** बरोबर त्याचा द्विराश्यंतर शुभ दृष्टियोग, तृतीय स्थानांत गुरु आणि त्याचे शुक्र, शनि व नेपच्यून या ग्रहांशीं झालेले नवपंचम योग हे सर्व योग अगाध विद्वत्तेचे दर्शक आहेत. गुरु हा प्राचीन भाषांचा कारक ग्रह आहे व बुध हा वक्तृत्वाचा कारक आहे. हे दोन्ही ग्रह प्रस्तुत कुंडलींत बौद्धिक स्थानांत असून त्यांजबरोबर इतर ग्रहांचे शुभ दृष्टियोग झाल्यामुळें **ग्लॅडस्टन** हे प्राचीन भाषा—**ग्रीक** व **लॅटिन** यांमध्यें आणि वक्तृत्वांत प्रवीण होते. केवळ वक्तृत्वामुळेंच त्यांचा उदय झाला. तृतीयेश मंगळ लग्नकेंद्रीं असून गुरूबरोबर द्विराश्यंतर दृष्टियोग करीत आहे, नवमेश शुक्र जरी व्ययस्थानांत आहे तरी गुरूबरोबर त्रिकोण योग करीत आहे व तृतीयांत

गुरु आहे. हे योग ग्रंथकर्तृत्वास उत्तम आहेत. त्यांनीं आपल्या आवडीच्या विषयांवर अनेक निबंध व स्वतंत्र ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचे आवडीचे विषय प्राचीन इतिहास, **होमर** कवि, **ग्रीक** भाषा, **राजकारण** आणि **धर्म** हे होते. दशमांतील हर्शलमुळें हे प्राचीन इतिहासाकडे वळले. तृतीयेश व नवमेश ह्या दोन्हींही स्थानांचे अधिपती धनेश गुरूबरोबर शुभ दृष्टियोगानें संबंधित आहेत आणि लेखनकलेचा कारक ग्रह बुध हा हर्शल बरोबर द्विराश्यंतर दृष्टियोग करीत आहे म्हणून त्यांस लेखन व्यवसायापासून अर्थप्राप्ति फारच चांगली होई. **ग्लॅडस्टन** यांस ग्रंथलेखनापासून दरसाल सरासरीनें दोन अडीच हजार पौंड मिळत असें नमुद केलेलें आढळतें.

विद्या—वक्तृत्वादिसंबंधानें वर जे योग दिले आहेत त्याच प्रमाणें, किंबहुना त्याहून अधिक बलवान् असे **राजयोग** प्रस्तुत कुंडलींत झाले आहेत. लग्नेश शनि लाभांत व त्याचा धनेश गुरूबरोबर नवपंचमयोग. येथें शनि गुरूच्या राशींत असून त्यावर गुरूची दृष्टि आहे. (नृपतिं नृपतुल्यं वा मंत्रिणमथ नायकं च सेनायाः जनयति गुरुणा दृष्टः सर्वापत् वर्जितं सौरः।। ) हा एक योग. लग्नेश लाभांत व दशमेश लग्नांत बलवान् असून धनेश व लाभेश अशा गुरूबरोबर शुभदृष्टि योग करीत आहेत, हा दुसरा योग. नवग्रहांपैकीं सात ग्रह उदित गोलार्धांत आहेत हा तिसरा योग. गुरूच्या राशींतील भाग्येश शुक्र व गुरु यांचा नवपंचम योग हा चौथा योग. (गजतुरगगोधनाढ्यं बहुपुत्रकलत्रमतिसुखिनम् गुरुणा दृष्टो गुरुभे जनयति शुक्रो महाविभवम्।।) प्रस्तुत कुंडलींत शनि, गुरु व मंगळ हे राजयोगकारक आहेत आणि महत्वाच्या स्थानांच्या (लग्न, दशम आणि भाग्य) अधिपतीबरोबर गुरु शुभ योगानें संबंधित आहे हा योग विशेष आहे. या योगांवर **ग्लॅडस्टन हे ब्रिटिश साम्राज्याचे चार वेळां मुख्य प्रधान** झाले. राजकुळांत जन्म न घेतां राजवैभव, धन, मान, कीर्ति व सत्ता मिळविण्यास कोणत्या प्रकारचे ग्रह—योग व्हावे लागतात याची कल्पना प्रस्तुत कुंडलीवरून वाचकांस होईल. **राम नारायण.**



आर्यफलज्योतिष शास्त्रांत नऊ ग्रह मुख्य धरण्याची चाल आहे. हे नऊ ग्रह **रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु** आणि **केतु** होत. राहु व केतु हे वास्तविक गोल नसून चंद्राचा भ्रमणमार्ग पृथ्वीच्या भ्रमणमार्गास ज्या दोन ठिकाणीं छेदितो त्यांपैकीं एका छेदनबिंदूला राहु व दुसऱ्याला केतु असें म्हणतात. अर्थात् राहु व केतु हे दोन कल्पित ग्रह आहेत. या छेदनबिंदूंना गति आहे, यामुळें यांचा ग्रहांमध्यें समावेश झाला असावा. अलीकडील उपलब्ध असलेले ग्रह **हर्शल** व **नेपच्यून** हे प्राचीन आर्यांस माहित असल्याचें आढळत नाहीं; तथापि धूमादिक अप्रकाशक ग्रहांचेंही कांहीं ग्रंथकारांनीं वर्णन केलें आहे.

वरील नऊ ग्रहांचीं व द्वादश राशींचीं लघुलेखन चिन्हें इंग्रजी ग्रंथांतून आढळतात. परंतु आर्यफलज्योतिषी ग्रहांचें आद्याक्षर त्या चिन्हांचेबद्दल उपयोगांत आणतात, म्हणजे **र**, हें आद्याक्षर रवीचें सूचक होय. **शु**, हें शुक्राचें सूचक होय. येणेंप्रमाणें पुढील ग्रहांचीं नांवें आद्याक्षरावरून **समजावीं.** राशींबद्दल लघुलेखन चिन्हें लिहित नाहींत परंतु त्या राशींचा दर्शक अंक लिहिण्याची चाल आहे. उदाहरणार्थ, रवि सिंहेत दर्शविणें असतां ५र ह्याप्रमाण दर्शवितात. कारण मेषराशीपासून क्रमानें आरंभ केला असतां सिंहराशि पांचवी येते.

पृथ्वीच्या पाठीवर तिच्या भोंवतीं दोन्हीं ध्रुवांपासून सारख्या अंतरावर जें पूर्वपश्चिम वर्तुळ कल्पितात त्यास **विषुववृत्त** म्हणतात. ज्या काळीं रात्र आणि दिवस समान असतात त्या कालास **विषुवकाल** म्हणतात. विषुववृत्तावर जीं स्थानें आहेत तेथें दिवस व रात्र हीं सर्व समान आहेत. म्हणून ह्या वृत्तास **विषुववृत्त** हे नांव पडलें आहे. ह्या वृत्तानें पृथ्वीची दोन अर्धें होतात. आपला देश उत्तर गोलार्धांत आहे. पृथ्वीवरच्या विषुव वृत्ताची पातळी वाढविली म्हणजे ती आकाशास जेथें छेदील तें आकाशाचें विषुववृत्त होय. पृथ्वीवर विषुववृत्तापासून उत्तरेकडील किंवा दक्षिणेकडील स्थानांचें जें अंतर त्यास **अक्षांश** म्हणतात. त्याच प्रमाणें आकाशांतील विषुववृत्तापासून ग्रहांचें अथवा ताऱ्यांचें जें उत्तर किंवा दक्षिण

अंतर त्यांस **क्रांति** म्हणतात. विषुववृत्तावर लंब होऊन दोन्ही ध्रुवांतून जाणारीं जीं अनेक वृत्तें कल्पिलीं आहेत त्यांस **याम्योत्तर वृत्तें** म्हणतात. पृथ्वीवर जसें एक मुख्य याम्योत्तरवृत्तापासून पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे जें अंतर त्यास **रेखांतर, रेखांश** किंवा **देशांतर** म्हणतात, त्याचप्रमाणें आकाशांत एक मुख्य याम्योतरवृत्त मानिलें आहे, त्यापासून पूर्वेस मोजलेलें तारांचें अगर ग्रहांचें जें अंतर त्यास **विषुवांश** म्हणतात. हे विषुववृत्तावर मोजतात. पृथ्वीच्या **दैनंदिन** भ्रमणामुळें सगळें विषुववृत्त २४ तासांत स्वतःभोवतीं प्रदक्षिणा करितें, म्हणजे २४ तासांत ३६० अं. विषुवांश फिरते. म्हणून विषुवांश हे अंशाच्या रूपानें किंवा तासाच्या रूपानें लिहीतात.

तारकागणांतून **सूर्य** ज्या वर्तुळमार्गानें फिरतोसा दिसतो त्यास **क्रांतिवृत्त** म्हणतात ( खरें म्हटलें असतां सूर्याचे भोंवतीं पृथ्वी फिरत आहे त्यामुळें आपणास सूर्य फिरत आहे असें भासतें. ) हा गमनपथ नियमित आहे. पृथ्वी आंसाभोंवतीं फिरते तेव्हां तिचा प्रत्येक बिंदु विषुववृत्ताशीं समांतर फिरतो. परंतु पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते ती विषुववृत्ताच्या दिशेनें फिरत नाहीं त्यामुळें सूर्य पृथ्वीभोंवती फिरतोसा दिसतो, तोही विषुववृत्तांतून फिरतांसा दिसत नाहीं. त्याचे फिरण्याचें क्रांतिवृत्त विषुववृत्तास तिर्कस छेदितें. हा तिर्कसपणा हल्लीं सुमारें २३ अं. २७ क. ४०.०४ विकला आहे. याला **क्रांतिवृत्ताचें तिर्यकत्व** Obliquity of the Earth असें म्हणतात.

आमच्या प्राचीन आर्यज्योतिषग्रंथांत क्रांतिवृत्ताचें तिर्यकत्व २४ अंश सांगितलें आहे व तें सुमारें चार हजार वर्षांचे पूर्वी खरोखर तितकेंच होतें. हें तिर्यकत्व थोडें थोडें कमी होत असतें व ह्याची गति अति सूक्ष्म आहे.

क्रांतिवृत्त व विषुववृत्त हीं दोन एकमेकांस जेथें छेदितात त्यांपैकीं एकास **वसंतसंपात** व दुसऱ्यास **शारदीयसंपात** म्हणतात. ह्या संपातबिंदूस दर वर्षास सरासरी पन्नास पूर्णांक व एक तृतियांश विकला विलोम गति आहे.

## राशि.

सर्व ग्रह **क्रांतिवृत्तांत** किंवा **राशिचक्रांत** फिरतात. राशिचक्र हें ३६० अंशांचें कल्पिलें आहे. क्रांतिवृत्ताचे समान अंतराचे बारा भाग



कल्पिले आहेत. ह्या प्रत्येक भागास **राशि** असें म्हणतात. म्हणून राशिचक्रांत बारा राशि आहेत. दर एक राशि ३० अंशांची आहे. एका अंशांत ६० कला असतात, व एका कलेंत ६० विकला असतात. राशिचक्राचा अथवा क्रांतिवृत्ताचा आरंभ सर्वानुमतें **मेष** राशीपासून होतो. मेष राशीचा आरंभ वसंतसंपातापासून होतो. हा संपात चल असल्याबद्दल मागें सांगितलें आहे. आपलेकडील बरेच ज्योतिर्विद रेवती योगताऱ्यापासून क्रांतिवृत्ताचे समान बारा भाग कल्पितात. संपात बिंदु व रेवती योगतारा ह्यांमधील जें अंतर त्यास **अयनांश** म्हणतात. निरयण राशिचक्राचे आरंभस्थानासंबंधानें भारतीय व आंग्ल ज्योतिर्विद् मंडळी यांचें एकमत नाहीं, त्यामुळें प्रत्येकाचे अयनांश निरनिराळे आढळतात. चल वसंतसंपातापासून द्वादश समविभागात्मक राशिचक्राचा आरंभ धरणारी गणना ती **सायन** गणना होय. रेवती नक्षत्राचे योगताऱ्यापासून किंवा दुसऱ्या एखाद्या स्थिर बिंदूपासून द्वादश समविभागात्मक राशिचक्राचा आरंभ मानणारी जी गणना ती **निरयण** गणना होय. सर्व यूरोप, अमेरिका, इतर राष्ट्रें व हिंदुस्थानांत कांहीं ठिकाणीं **सायण** गणना चालू आहे. प्राचीन आर्यांस सायन गणना पूर्ण अवगत होती परंतु कालांतरानें व अज्ञानामुळें सध्यां **निरयण** गणना आपल्या समाजांत रूढ झाली आहे. आम्हांस **सायन** पद्धति सशास्त्र व अनुभवशीर वाटते. सायन स्पष्ट ग्रहांतून इष्ट **अयनांश** वजा केले म्हणजे निरयण स्पष्ट ग्रह तयार होतात; व त्यामुळें दोन अथवा अधिक ग्रहांतील पूर्वी असलेलें राश्यात्मक किंवा अंशात्मक अंतर सारखेंच राहतें. हें वाचकांस अनुभवानें सहज कळेल. म्हणून भावात्मक किंवा परस्परांत होणाऱ्या दृष्टियोगानें उत्पन्न होणारीं फळें तींच असतात. परंतु जेव्हां आपणांस राशींचे अधिपतींवरून कोणत्याही भावफलांचा विचार करण्याचा प्रसंग येईल त्या वेळीं सायन खरें किंवा निरयण खरें याचा सहज अनुभव मिळेल

**सूर्य** संपातबिंदूंत आल्यावर उत्तरेस जाऊं लागतो. उत्तरसंपातला **वसंतऋतूचे** नांवावरून **वसंतसंपात** म्हणतात. वसंतसंपातावरून पहिलें ३०

अंशांचे भागाला **मेष** राशि असें म्हणतात. येणेंप्रमाणें दर एक राशि ३० अंशांचे अंतरानें राशिचक्रांत आहेत.

**मेष**, **वृषभ**, **मिथून**, **कर्क**, **सिंह**, **कन्या**, तूळ, **वृश्चिक**, धनु, **मकर**, **कुंभ** आणि **मीन** हीं राशींचीं नांवें आहेत. ज्या तारकापुंजांनीं मेष, वृषभादिक आकृति आकाशांत एका वेळीं बनल्या, ते तारकापुंज हल्लीं आकाशांत त्याच स्थितींत दिसत नाहींत. अश्विनी, भरणी, कृत्तिकादि २७ नक्षत्रें जीं आकाशांत दिसतात त्यांचा समावेश मेषादि स्थिर तारात्मक द्वादश राशींत झाला आहे, त्या राशींचा किंवा स्थिर तारात्मक नक्षत्रांचा व फलादि ग्रंथांकरितां ज्या मेषादिक संपातिक चर राशि मानिल्या आहेत, त्यांचा कांहींएक संबंध नाहीं, ही गोष्ट मूळ लक्ष्यांत ठेविली पाहिजे. सूर्य विषुव वृत्तावर आला म्हणजे तो मेषराशींत आला असें समजावें. हा **मेषसंक्रमणाचा** दिवस ता. २२।२३ मार्च असतो. ह्या दिवशीं दिवस आणि रात्र समान असते. मेष संक्रमणापासून ९० दिवसांनीं पुढें **कर्कसंक्रमण** होतें. ह्यावेळीं रात्रीची वृद्धि होते. कर्कसंक्रमणापासून पुढें ९० दिवसांनीं **तूळसंक्रमण** होतें. ह्या दिवशीं पुन्हां दिनमान आणि रात्रीमान समान असतें. तूळ संक्रमणापासून ९० दिवसांनीं पुढें **मकर संक्रमण** होतें. ह्यावेळीं दिनमान वाढतें. ऋतुकालदर्शक घड्याळाचे हे वरील चार भाग नैसर्गिक आहेत.

## राशिस्वरूप, स्वभाव, गुणधर्म इत्यादि.

राशिचक्र हा एक विराट् पुरुष अथवा काल पुरुष कल्पून त्याचे शरीरावर राशि दाखविल्या आहेत. त्या खालील क्रमानें येतात.

| राशि | आकार | कालपुरुषाचे अंगविभाग |
|---|---|---|
| मेष | मेंढ्याप्रमाणें | मस्तक |
| वृषभ | बैलाप्रमाणें | मुख; घसा; कंठ |
| मिथून | स्त्रीपुरुषाचें युग्म | हस्त, स्कंध |
| कर्क | खेंकड्याचा | उर स्थल, छाती |

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद‍ाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽवृत्ति वर्ष १ लें. | जून १९१५. | अंक ३ रा.

# प्रासंगिक विचार.

फल ज्योतिशास्त्राकडे चालू विसाव्या शतकांत विद्वानांचे लक्ष लागत आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. या शास्त्रास विद्वान्, स्वतंत्र विचारवान् व कर्त्या अशाच लोकांची फार आवश्यकता आहे. अद्याप पर्यंत तें कसें तरी जीव धरून आहे. त्यास विद्वानांचे घरचा आश्रय मिळाल्यास तें खात्रीनें सर्वांगसुंदर होऊन त्यांचे आदरास पात्र होईल.

फलज्योतिषशास्त्राचे **गणितज्योतिष**, **जातक किंवा होरा** ज्योतिष, **मेदिनीय** ज्योतिष, **प्रश्नज्योतिष**, व **मुहूर्तज्योतिष**, असे पांच मुख्य विभाग आहेत. गणितज्योतिषांत ग्रहाचें गणित, त्यांचे आकार, घटकावयव, उदयास्त वगैरे गोष्टींचा विचार होतो. **जातक किंवा होरा ज्योतिषांत** जन्मलेल्या प्राण्यांचे त्या वेळचे ग्रहस्थितीवरून त्यांचे आयुष्यांत होणाऱ्या सुखदुःखांचा विचार होतो. **मेदिनीय ज्योतिषांत** निरनिराळ्या ग्रहांचे संस्कार राष्ट्रांवर किंवा

देशांवर कसे काय होतात याचा विचार करितात. **प्रश्नज्योतिषांत** प्रश्न विचारलेल्या वेळेवरून विचारलेल्या प्रश्नसंबंधी गोष्टींचा विचार करितात. व **मुहूर्तज्योतिषांत** प्रत्येक कार्यास शुभाशुभ वेळ कसा असावा ह्याचा विचार होतो. एकच मनुष्यास ही ज्योतिशास्त्राचीं पांच अंगें पूर्ण अवगत असतील असें मानतां येत नाहीं. फार झालें तर ज्योतिष्यास प्रत्येक विभागाचें साधारण ज्ञान असून त्यास एखाद दुसरा विभाग पूर्णपणें माहित असेल. ज्योतिर्मालेंत क्रमानें सर्व विभागांचा उत्तम तऱ्हेनें विचार व्हावा म्हणून ज्यांचा निरनिराळे विभागावर पुष्कळ व्यासंग झालेला आहे अशा विद्वान लेखकांचा एक संघ बनवून त्यांतून मासिक चालवावें अशी योजना करण्याचा प्रयत्न चालू आहे. त्याप्रमाणें पुष्कळ विद्वान् ज्योतिष्यांस पत्रें लिहून आम्हांस ह्या कार्यांत हातभार लावण्याविषयीं विनंती केली आहे. कोणतीही संस्था एकट्याचे ज्ञानावर उभारली असतां त्या संस्थेवर त्या व्यक्तीचे सुखदुःखांमुळें अनेक आपत्तींचे प्रसंग येतात व हातीं घेतलेलें ध्येय कष्टसाध्य होतें, करितां ज्योतिर्मालेची संस्था एकट्यावर उभारण्याचा प्रयत्न मालाकारानें केला नसून, त्यास श्रमविभागाचें तत्व पूर्ण मान्य आहे व ह्या कार्यास सर्व विद्वान् ज्योतिर्वि_ हातभार लावीत आहेत व तसेच ते पुढें लावतील अशी खात्री आहे.

* * * *

गेल्या एप्रिल महिन्यांत अनेक नूतन मासिकें उदयास आलीं तर कित्येकांचे अभिनवावृत्तीचा सुयोग आला होता. असें होण्याचें ज्योतिषशास्त्र· दृष्ट्या. कारण काय झालें असावें किंवा वाङ्मयाची भरभराट होण्यास कोणती ग्रहस्थिति करणीभूत झाली आहे वगैरे गोष्टींचा खुलासा करण्याविषयीं **बालबोधाचे** संपादक रा. रा. गजानन भास्कर वैद्य बी. ए. यांनीं आम्हांस सूचना केली आहे त्याबद्दल चार शब्द आजच्या अंकांत देण्याचें आम्हीं योजिलें आहे.

कोणत्याही मनुष्य प्राण्याचे चालू वर्षांत होणाऱ्या सुखदुःखांचे गोष्टींची कल्पना त्यास चालू असलेल्या दशेनें, गोचरीनें, ताजिकनें, किंवा दिनवर्ष



पद्धतीनें ज्याला जी पद्धति ग्राह्य असेल त्यावरून करितात, त्याचप्रमाणें **मेदिनीय फलज्योतिषशास्त्रांत** देशांत किंवा राष्ट्रांत होणाऱ्या घडामोडींची कल्पना विशेषतः नूतनवर्षप्रवेशकालचे कुंडलीवरून करितात. ज्योतिषशास्त्रदृष्ट्या नूतन वर्षाचा आरंभ सूर्य **वसंतसंपातांत** किंवा **मेष** राशींत आला म्हणजे होतो. मेदिनीय ज्योतिषशास्त्रांत **मेषसंक्रमणास** अतिमहत्व आहे. हें मेषसंक्रमण बहुशः प्रत्येक वर्षी मार्च तारीख २१, २२चे सुमारास होतें. मेषसंक्रमणाचे इतकेंच महत्व **कर्क, तुला, व मकर** संक्रमणास आहे. मेष संक्रमणापासून बरोबर ९० दिवसांनीं **कर्कसंक्रमण** होतें, १८० दिवसांनीं **तुलासंक्रमण** होतें व २७० दिवसांनीं मकर संक्रमण होतें. हीं चार संक्रमणें मेदिनीय ज्योतिषशास्त्रांत अति महत्वाचीं मानतात. ज्याप्रमाणें नूतन वर्षाचा आरंभ मेषसंक्रमणापासून होतो त्याप्रमाणें प्रत्येक अमांत महिन्याचा आरंभ प्रतिपदेपासन होतो. म्हणून रविचंद्रसंयोगकालची कुंडली त्या त्या महिन्यांत होणाऱ्या गोष्टी दर्शवितात. ह्यावरून वाचकांचे लक्ष्यांत आलें असेलच कीं कोणत्याही चालू वर्षांत घडणाऱ्या गोष्टींचा विचार कर्तव्य असतां मेष, कर्क, तुला व मकर ह्या चार संक्रमणकालच्या कुंडल्या त्याच प्रमाणें चालू वर्षांत होणारे १२,१३रविचंद्र संयोगकालच्या कुंडल्या इतक्यांची विशेष आवश्यकता आहे. चालू वर्षी **मेषसंक्रमण** तारीख २१ मार्च सन १९१९ ह्या दिवशीं रात्रौ ९-४२ वाजतां ( मुंबई वेळ ) झालें आहे. त्या काळची कुंडली खालील प्रमाणें येत आहे. जागेच्या अभावामुळें स्पष्ट कुंडली न देतां त्या वेळचे स्पष्ट ग्रह व तन्वादि सहा भाव स्पष्ट दिले आहेत. **त्यावरून** वाचकांस सहज सायन भावचलित कुंडली मांडतां येईल.

**भाव**

| लग्न, | द्वितीय, | तृतीय, | चतुर्थ, | पंचम | षष्ठ. |
|---|---|---|---|---|---|
| वृश्चिक | धनु | मकर | कुंभ | मीन | मेष |
| २०अं | १९अं. | २०अं. | २२अं. | २४अं. | २३अं. |

ग्रह

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| रवि, | चंद्र, | मंगल, | बुध, | गुरु | शुक्र | शनि |
| मेष. | मिथुन, | मीन, | मीन, | मीन, | कुंभ, | मिथून. |
| ०-० | ९-२३ | ९-३४ | २-३४ | १०-६ | १७-१७ | २९-५३ |

| | | |
|---|---|---|
| हर्शल. | नेपच्यून. | राहू. |
| कुंभ, | कर्क, | कुंभ, |
| १४-१३ | २७-४९व. | २४-५२. |

ज्याप्रमाणें जन्मकालीन किंवा प्रश्नकुंडलीचे द्वादश स्थानांवरून निरनिराळ्या गोष्टींचा विचार करितात त्याचप्रमाणें मेदिनीयज्योतिषशास्त्रांत तृतीय स्थानावरून खालील गोष्टींचा बोध होतो.

रा ्ंतील किंवा देशांतील सर्व प्रकारच्या बातम्या पोंचविण्याचे साधनांचा—पोष्ट ऑफीसें, तारखातें, टेलीफोन, वर्तमानपत्रें, मासिकें, पुस्तकें—विषेशतः ज्यांचें अस्तित्व थोडक्याच काळांत नष्ट होणारें—विचार होतो. वाङ्मय व शिक्षण ह्याचाही ह्याच स्थानावर विचार करितात. सर्वसाधारणपणें राष्ट्रांतील बौद्धिक प्रगतीपर होणाऱ्या घडामोडी ह्या स्थानानें दर्शविल्या जातात. परंतु देशांतील मुलामुलींचे शाळेंतील शिक्षणाचा विचार कुंडलीचे पंचम स्थानावरून करितात. संक्रमण काळाचे कुंडलींतील तृतीय व नवम स्थानें हीं राष्ट्राची किंवा देशाची बुद्धिमत्ता वाङ्मयांत होणाऱ्या घडामोडी वगैरे गोष्टींची द्योतक स्थानें आहेत, करितां चालू मेषसंक्रमण काळीं ह्या दोन स्थानांत विशेष महत्वाचे योग झाले असले पाहिजेत असें तार्किक दृष्ट्या म्हणावें लागतें.

मेषसंक्रमणकाळीं तृतीय भावावर मकर ही चरराशि उदित आहे व त्या राशीचा अधिपति शनि हा मिथुन ह्या शास्त्रीय राशींत आहे. तृतीय स्थानांत कुंभ ह्या शास्त्रीय राशींत हर्शल व शुक्र आहे. नवम भावाचा अधिपति चंद्र हाही शास्त्रीय राशींत असून बुधाच्या घरी सप्तमांत आहे. शास्त्रीय राशींत असलेला चंद्र हा लवकर शुक्र व हर्शल ह्या दोन ग्रहांबरोबर त्रिकोण दृष्टियोग करण्यास जात आहे. नवम स्थानांत बलवान् असा नेपच्यून आहे.



नवम भावांत सिंहराशीचे बरेच अंश आहेत व त्यामुळें नवमाचा स्वामी रविहि होऊं शकतो व तो आपल्या उच्च राशींत पंचमांत आहे. पंचमेश गुरु हा लग्नेश मंगळ ह्यानें युक्त असा केन्द्रांत बलवान आहे. ही सर्व ग्रहस्थिति अनेक नूतन मासिकांचें आगमन दर्शविणारी आहे.

साधारणतः हर्शल हा ग्रह ज्या ज्या स्थानांत असतो त्या स्थानाच्या द्योतक गोष्टींत तो विलक्षणपणा व क्रांतिकारक घडामोडी करितो. येथें तो तृतीय या स्थानाचीं द्योतक वर्तमान पत्रें, मासिक पुस्तकें, नियतकालिकें ह्या सर्वांत वैलक्षण्य दर्शवीत आहे. तृतीय ह्या बौद्धिक स्थानांतील एकटा हर्शल ग्रह अनेक नूतन मासिकांचे उदयास्त भासविण्यास व जुन्या इंग्रजी दैनिकांचे वर्गणीचे दर एकदम कमी करून लोकांस चकित करण्यास कारणीभूत झाला आहे असें मानण्यासमुळींच हरकत नाहीं. चालू वर्षांत ह्या विक्षिप्त ग्रहामुळें आणखी किती नूतन मासिकें व वृत्तपत्रांचें उदयास्त आणि त्यांत विलक्षण घडामोडी होतात हें पाहणें आहे. एकंदरीनें पाहतां चालू वर्ष हें वाङ्मयाचे क्षेत्रांत क्रांतिकारक आहे असें म्हणावें लागतें.

मुद्रणकलेचा कारकग्रह बुध व जनमताचा कारकग्रह चंद्र याजबरोबर केन्द्रयोग करीत असून बुध मंगळाबरोबर युती करण्यास जात आहे. हा योग वर्षप्रवेशकाळीं चांगला नाहीं.

* * *

नवीन घरच्या बालबोधाचे टाइप जुळविण्याचे कामाचा आरंभ शके १८३७ चैत्र शुद्ध प्रतिपदा मंगळवार रोजीं सकाळीं १०—४८ वाजतां झाल्याचें कळतें. ज्योतिषशास्त्राचा असा एक सिद्धांत आहे कीं कोणत्याहि कार्याच्या आरंभाच्या वेळची ग्रहस्थिति कळली असतां त्या कार्यासंबंधाच्या बऱ्याच गोष्टींचा विचार त्या वेळेच्या कुंडलीवरून करतां येतो. वरील वेळीं लिहिल्याप्रमाणें तन्वादि द्वादश भाव व ग्रहस्थिति होतीः—

| तनु | द्वितीय | तृतीय | चतुर्थ | पंचम | षष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| मिथुन | कर्क | सिंह | कन्या | तूळ | वृश्चिक |
| १३-३१ | ९ | ४ | २ | ४ | ९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रवि | चंद्र | मंगळ | बुध | गुरु | शुक्र |
| मीन | मीन | मीन | कुंभ | मीन | कुंभ |
| २४-३५ | २९-३० | ५।१६ | २७।१९ | ९।४१ | ११।१ |
| | शनि | हर्शल | नेपच्यून | राहु | |
| | मिथुन | कुंभ | कर्क | कुंभ | |
| | २५-४१ | १३।५ | २७।४८ व, | २५-४१ | |

आरंभकाळीं मिथुन ही शास्त्रीय राशी उदित असून लग्नांत अष्टमेश व नवमेश शनि आहे. नवम स्थानामध्यें बुध, शुक्र व हर्शल हे कुंभ या शास्त्रीय राशींत आहेत. बुधशनीचा अन्योन्य योग असून ते नवमपंचम योग करीत आहेत. हे योग नवीन घरचा बालबोध संस्मरणीय कामगिरी करण्यास समर्थ आहे याचे द्योतक आहेत. दशमेश दशम स्थानांत, लाभेश मंगळावरोबर आहे आणि धनेश लाभस्थानांत आहे यामुळें सांपत्तिक स्थिति उत्तम राहील. नवम स्थानांतील शास्त्रीय राशींतील हर्शल, बुध व शुक्र आणि दशमांतील गुरु, रवि व मंगळ या योगांस दशमांतील रविचंद्राबरोबर शनीच्या केंद्रयोगानें फारच कमीपणा आणला आहे. चंद्र जनसमाजाचा कारक आहे व त्याबरोबर झालेल्या शनीच्या केंद्रयोगामुळें कित्येक लोकांस **बालबोधाची** कामगिरी पसंत पडणार नाहीं. शनि नवम ( धर्म ) स्थानाचा स्वामी आहे म्हणून धार्मिक मतामुळें तसा प्रसंग येईल असें वाटतें. रविशनीचा केंद्रयोग राजकीय वातावरणापासून संकटें उपस्थित करील असें वाटतें. कुंडलीमध्यें बलवान् असलेले लग्नेश व दशमेश बुध व गुरु बालबोधाच्या भावी संकटांचें निरसन करोत.



# जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभावर्णन.

## वृषभसंक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्री-पुरुषांचें स्वभाव वर्णन

**मिथुन** ही राशीचक्रांतील तृतीय, द्विस्वभाव, वायुतत्वाची आणि शास्त्रीय राशी आहे. या राशीमध्यें रवि दर वर्षीं २०।२१ मेचे सुमारास प्रवेश करतो आणि २०।२१ जून पर्यंत ह्या राशींत असतो. ज्यांच्या जन्मकाळीं मिथुनेमध्यें रवि असतो त्या लोकांचा शास्त्रीय विषय, विद्यार्जन व लेखन-वाचन यांजकडे स्वाभाविक ओढा असतो. थोड्या अधिक प्रमाणानें या सर्व लोकांमध्यें बुद्धि-तत्व जागृत असतें; हे लोक हातीं घेतलेलें काम पुरें करण्यापूर्वीच दुसरें काम हातीं घेतात. हे लोक अस्थिर, विनोदी, हजरजबाबी, हुशार, समाजांत मिळून मिसळून वागणारे, सभ्य आणि एकाच वेळीं दोन किंवा अधिक गोष्टी करणारे असतात. मिथुनेमध्यें रवि असलेले लोक कोणतेंही काम स्फूर्तीनें करण्यापेक्षां विचारानें करतात. कोणत्याहि गोष्टीचा साधकबाधक विचार करून योग्य निकाल देण्याचें काम ह्या लोकांच्या हातून चांगलें पार पडतें. दुसऱ्या-संबधानें टीका करण्यांत हे लोक बरेच तरबेज असतात.

मिथुनेमध्यें रवि असलेल्या लोकांची शरीरप्रकृति मध्यम बळकट असते. शक्तीबाहेर काम केल्यामुळें किंवा मानसिक श्रम अतिशय केल्यामुळें छातीचे रोग किंवा क्षय रोग होण्याचा संभव असतो. मानसिक श्रमांमुळें थकून जाऊन शरीरप्रकृति नादुरुस्त होते.

मिथुनेमध्यें रवि असलेल्या लोकांमध्यें वकील, सॉलिसिटर्स, कारकून, शिक्षक, वक्ते, चिटणीस, अकौंटन्टस्, पुस्तकें विकणारे, प्रवासी, बातमीदार, वृत्तपत्रकार, संपादक वगैरे लोक आढळतात. हे लोक एकाच वेळेस दोन किंवा अनेक धंदे करून संपत्ति मिळवितात.

## रविचंद्राच्या राशिपरत्वें होणाऱ्या संयोगानें स्वभाववर्णन.

**मिथुनेंत रवि व मेषेंत चंद्रः**—ह्या योगावर जन्मलेले लोक हुशार, चपळ, व्यवहारनिपुण, आणि दरदर्शी असतात. बौद्धिक व मानसिक प्रगति

ह्या लोकांची विशेष झालेली आढळते. **मित्रांमुळें ह्या लोकांचा उदय होईल.**

**मिथुनेंत रवि व वृषभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक स्थिर स्वभावाचे, किंचित् हट्टी, संग्रहशील आणि कारस्थानी असतात. कोणत्याहि गोष्टींत गौप्य राखण्याचा या लोकांचा विशेष कल असतो. **गौप्य व कारस्थान यामुळें या लोकांचा उदय होतो.**

**मिथुनेंत रवि व मिथुनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक हुशार, विद्याभिलाषी, शास्त्रीय विषयांचा व्यासंग करणारे, आत्मविश्वासी, शोधक आणि स्वातंत्र्यप्रिय असतात. **नातलगांमुळें किंवा लेखनव्यवसायामुळें या लोकांचा उदय होईल.**

**मिथुनेंत रवि व कर्केंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक कीर्तीचे अभिलाषी, महत्वाकांक्षी, अस्थिर आणि दुसऱ्याविषयीं सहानुभूति व कळकळ बाळगणारे असतात. **व्यापारामुळें या लोकांचा उदय होईल.**

**मिथुनेंत रवि व सिंहेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक साहसी, धैर्यवान्, सुखाभिलाषी, आणि लोकांत मिळून मिसळून वागणारे असतात. या लोकांमध्यें पुत्र-वात्सल्य विशेष असतें, व क्वचित् प्रसंगीं कवित्वशक्तिहि आढळते. **विलक्षण साहसामुळें यांचा उदय होईल.**

**मिथुनेंत रवि व कन्येंत चंद्रः**—या योगावर जन्मलेल्या लोकांमध्यें प्रत्येक गोष्टीचा बारकाईनें व व्यवस्थित रीतीनें विचार करण्याची संवय असते. हे लोक कुशाग्र बुद्धीचे असून स्वभावतःच टीकाकार असतात. **बारकाईनें व चौकसपणानें वागल्यामुळें या लोकांचा उदय होईल.**

**मिथुनेंत रवि व तूळेंत चंद्रः**—या योगामुळें मिथुनस्थ रवीच्यामुळें येणारा द्वयर्थी स्वभाव समतोल होतो. या योगावर जन्मलेले लोक सभ्य वर्तनाचे, शास्त्राभिलाषी, धार्मिक, न्यायी, शांतताप्रिय आणि विवेकी असतात. **कायदा किंवा कला यांच्या व्यासंगामुळें या लोकांचा उदय होईल.**

(अपूर्ण)



# प्रसिद्ध पुरुषांच्या कुंडल्यांचा संग्रह.

## नं. ३. भगवान् रामकृष्ण परमहंस.




**विवेकानंदनेतारं शांतमूर्तिं कृपानिधिम् ॥**
**वंदे तं विश्वसुहृदं रामकृष्णं जगद्गुरुम् ॥**

जगद्वंद्य स्वामी विवेकानंद व भगवान् रामकृष्ण परमहंस ही गुरु-शिष्यांची जोडी अलौकिक व अभेद्य आहे. एकाचे आठवणीबरोबर दुसऱ्याची आठवण होते. एकावांचून दुसऱ्यास शोभा नाहीं. इतका दोघांचा अन्योन्य निकट संबंध असल्यामुळें पहिल्या अंकांतील स्वामीजींचा ज्योतिष-शास्त्रदृष्ट्या चरित्रलेख वाचून त्यांच्या सद्गुरूंचें तसेंच चरित्र वाचण्याची वाचकांस इच्छा होणें साहजिक आहे. व ह्याच करितां प्रस्तुत अंकांत परमहंसांच्या कुंडलीसंबंधानें विचार करण्याचें योजिलें आहे.

रामकृष्ण परमहंस यांच्या जन्मकालीं सत्वगुणप्रधान अशा **मीन** राशीचा २०वा अंश स्वनवमांशीं पूर्व क्षितिजावर उदय पावत होता. उदित अंशाव-

रोबरच बुध उदय पावत असून लग्नाधिपति गुरु मेषराशीमध्यें लग्नवर्ति आहे. मीन राशीमध्यें रवि–चंद्र उदय पावले असून त्यांचे पाठोपाठ बुध, गुरु व शुक्र हे पूर्व क्षितिजावर येत आहेत. लग्नांत बुध, गुरु व शुक्र असल्यामुळें चेहेऱ्यावर आनंद, हास्य व दैवी तेज हीं मूर्तिमंत होतीं व ह्याच योगामुळें परमहंसांचें शरीरसौष्ठव उत्तम प्रकारचें होतें. त्यांचा स्वभाव लग्नांतील सुरगुरु-प्रमाणेंच परम शांत व अत्यंत उदार होता. त्यांचें अंत:करण लग्नीं उदय पावत असलेल्या मीन राशीप्रमाणें अत्यंत प्रेमळ व दयार्द्र होतें. मीनराशीसारखी भक्ती व प्रेमदर्शक राशी लग्नकेंद्रावर उदित असून ह्या राशीमध्येंच आत्मा, बुद्धि व मन ह्यांचे कारक ग्रह रवि, बुध व चंद्र हे उदित आहेत. ह्या अपूर्व योगास लग्न केंद्रीं होत असलेल्या गुरुशुक्रांच्या उदयामुळें फारच महत्व आलें आहे; व ह्याच योगांमुळें परमहंस, प्रेम आणि भक्तिरस यांचे सागर होते.

सा. लग्न




परमहंसांच्या कुंडलींतील जे योग त्यांस पूर्ण निवृत्तिपर बनविण्यास कारणीभूत झाले आहेत ते असे :—

( १ ) लग्नाधिपति गुरु हा नवमाधिपति मंगळ याबरोबर शुभ ( द्विराश्यंतर ) योग करीत आहे.



( २ ) लग्नेश व अंशपरत्वें नवमेश गुरु लग्नांत उदित असून, अतींद्रिय विषयांचा कारक ग्रह नेपच्यून त्याबरोबर द्विराश्यंतर दृष्टियोग करीत आहे.

( ३ ) अष्टम व व्यय हीं स्थानें मोक्ष आणि सिद्धविद्या यांचीं कारक आहेत. त्यांपैकीं प्रस्तुत कुंडलींत व्ययस्थानांत, मीन ह्या व्ययस्थानद्योतक राशींत रवि व चंद्र आहेत. व्ययस्थानांतील बलवान् हर्शल लग्नांतील शुक्राबरोबर द्विराश्यंतर दृष्टियोग करीत आहे.

( ४ ) अतींद्रिय व गूढ विद्येचे कारक ग्रह नेपच्यून ( वरूण ) व हर्शल ( प्रजापति ) आणि आत्मा व मन ह्यांचे कारक ग्रह रवि व चंद्र उदित गोलार्धांत आहेत. बुध, गुरु व शुक्र हे शुभ ग्रह उदयोन्मुख आहेत. रजोगुणप्रधान ग्रह मंगळ अनुदित गोलार्धांत असून तमोगुणप्रधान ग्रह शनि अस्तास जात आहे.

( ५ ) जन्माधिपति ( चंद्र राशीचा स्वामी ) गुरूवर इतर ग्रहांची दृष्टि नसून ( अर्थात् आर्य पद्धतीप्रमाणें ) फक्त तो शनीनें दृष्ट आहे. ( जन्माधिपः सूर्य सुतेन दृष्टः शेषैरदृष्टः पुरुषस्य सूतौ । आत्मीयदीक्षां कुरुते ह्यवश्यम् ......... ) हा शेवटचा प्रव्रज्या योग केंद्रामध्यें झाला असल्यामुळें फार बलवान् आहे. या सर्व प्रबल योगांमुळें परमहंसांस लहानपणा-पासूनच देवाचें वेड लागलें.

परमहंसांच्या कुंडलींत झालेले योग आणि सामान्य मनुष्यांच्या कुंडलींतील योग सारखेच फलदायी होतील असें वाटत नाहीं. प्रस्तुत कुंडलींतील एकच उदाहरण घ्या. लग्नकेंद्रामध्यें चतुर्थेश व सप्तमेश बुध उदित आहे. त्यानंतर लग्नेश, दशमेश व अंशपरत्वें होणारा भाग्येश गुरु हाही लग्नांत आहे. आणि धनभावाधिपति शुक्र हा सुद्धां पूर्व केंद्रांत आहे. म्हणजे चारही केंद्रांचे अधिपति, भाग्येश व धनेश यांसह पूर्व केंद्रीं आहेत ! हा योग प्रवृत्तिपर मनुष्याच्या कुंडलींत महत् भाग्याचा व गजांत लक्ष्मीचा कारक असून या योगामुळें त्या मनुष्याचें सर्व आयुष्य सुखांत व आनंदांत जाईल. परंतु परमहंसांनीं आपल्या सर्व आयुष्यामध्यें कोणत्याच नश्वर वस्तूचा परिग्रह केला नाहीं. परंतु ह्याचे उलट त्यांचेजवळ अध्यात्मिक संपत्ति अपार होती.

व या दृष्टीनें ते महत् भाग्यशाली व श्रीमान् होते. या उदाहरणावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं आपण प्रवृत्तिपर मनुष्यांच्या कुंडल्यांचा विचार ज्या दृष्टीनें करतों त्याच दृष्टीनें पूर्ण निवृत्तिपर मनुष्यांच्या कुंडल्यांचा विचार करणें चुकीचें ठरेल.

परमहंसांच्या कुंडलींत झालेल्या अनेक बलवान निवृत्तियोगांमुळें त्यांनीं आपल्या वयाच्या केवळ अकरावे वर्षीच निवृत्तिमार्ग स्वीकारला. ह्यावेळीं लग्नकेंद्रांत असलेला गुरु **दिनवर्ष पद्धतीनें** चलित लग्नाबरोबर युति करित होता. गुरूचे भ्रमण जन्मलग्नावरून चाललें होतें व हर्शल हा मूळ गुरूवरून भ्रमण करीत होता. ही सर्व ग्रहस्थिति विचार करण्यासारखी आहे. धूळाक्षरांची ओळख झाली असेल नसेल इतक्यांत बक्षिसाकरितां चाललेला विद्वानांचा वादविवाद त्यांच्या दृष्टीस पडला. विद्येचा उपयोग केवळ वादविवाद व द्रव्यार्जनाकरितां केला जात आहे हें पाहून त्यांस मनस्वी वाईट वाटलें. असली विद्या मुळींच शिकावयाची नाहीं असें ठरवून त्यांनीं शाळेस कायमचाच रामराम ठोकला. अ—क्षराचीच जेणेंकरून ओळख होईल अशी विद्या शिकावयाची असा निर्धार करून त्या कामास त्यांनीं आरंभ केला. या अ—लौकिक विद्येंत त्यांनीं इतकी सिद्धि मिळविली कीं लौकिक विद्येचे सागर परमहंसांपुढें आपणांस डबकीं म्हणवून घेऊं लागले. लग्नामध्यें शुभदृष्टिसंबंधित असलेले बुध, गुरु व शुक्र या ग्रहांमुळें झालेला विद्यायोग लौकिकी विद्येमध्यें फळास न येतां अध्यात्मिक विद्येकडे फळास आला.

परमहंसांसारख्या विभूति फारशा प्रसिद्धीस न येतां आपलें . नियत कार्य करून जावयाच्या परंतु परमहंसांच्या केंद्रामध्यें बुध, गुरु, शुक्र व शनि हे ग्रह आहेत. लग्नेश व चंद्र राशीचा स्वामी गुरु केंद्रामध्यें बलवान् आहे त्यामुळें त्यांचे शिष्य आर्यावर्ताच्या बाहेर जाण्यापूर्वीच त्यांचा कीर्तिपरिमल यूरोपखंडापर्यंत जाऊन पोंचला. **राम नारायण.**



# राशिधर्मनिरूपण.


**मा**गील अंकांत आम्ही थोडक्यांत सर्व ग्रहांचें गुणधर्मनिरूपण केलें आहे. त्याप्रमाणें चालू अंकांत द्वादश राशींचे गुणधर्म, स्वभाव वगैरे वर्णन करण्याचें योजिलें आहे. कोट्यावधि ग्रंथ फक्त ५२ वर्णांतूनच निर्माण झाले आहेत त्याच प्रमाणें सर्व ज्योतिष–शास्त्र द्वादश राशि व नऊ ग्रह ह्यांचे मिलनानेंच निर्माण झालें आहे. जितकें ग्रहांचें व राशींचें सूक्ष्म ज्ञान होईल तेवढें अवश्य आहे व त्या योगानें फलादेशाचें काम चांगल्या रीतीनें करतां येईल.

क्रांतिवृत्ताचे ३० अंशाचे द्वादश सम विभागास—**राशि** असें म्हणतात. राशिचक्राचा किंवा क्रांतिवृत्ताचा आरंभ **वसंतसंपाता**पासून होतो. मेष, वृषभ, मिथुन इत्यादिप्रमाणें क्रांतिवृत्ताचे द्वादश विभागांचीं नांवें आहेत. त्या प्रत्येकाचे आकार, गुणधर्म भिन्न आहेत. सर्व ग्रह क्रांतिवृत्तांतून फिरतात त्यामुळें ते आपआपल्या धर्माप्रमाणें व ज्या ज्या राशींत असतात त्या राशीप्रमाणें फलें उत्पन्न करतात. प्रत्येक राशीचे आकाराची व शरीरांतील कोणत्या विशिष्ट भागावर तिचा अंमल आहे याची कल्पना पुढें दिलेल्या चित्रपटावरून सहज करितां येईल.

## मेष.

**वसंतसंपाता**पासूनचे पहिल्या ३० अंशाचे विभागास **मेष** असें म्हणतात. ह्या राशीचा आकार **अज** म्हणजे मेंढा किंवा बोकडासारखा मानिलेला आहे. ह्या राशीचा स्वभाव, गुणधर्म इत्यादि अजासारखेच आहेत. ही राशि पुरुष, चर, अग्नि, ऋक्ष, अल्पप्रसव व पशु राशि आहे. शरीरांपैकीं मस्तक व चेहरा ह्यांवर ह्या राशीचा अंमल आहे. मेष राशीचे मनुष्यांत स्फूर्ति, आशा, महत्वाकांक्षा, प्रेरकशक्ति ह्यांचें प्राधान्य जास्त असतें, व त्यांचा बौद्धिककोश कल्पना, निरीक्षण शक्ति, शोधकता ह्यांचा बनलेला आढळतो.

जन्मकाळीं ही राशि पूर्व केंद्रावर उदय पावत असतां किंवा जन्मकाळीं ह्या राशींत चंद्र असतां स्वभाव तापट, उतावळा, रागीट, अतिमहत्वाकांक्षी, धाडसी, फिरण्याचा शोकी व बढाईखोर असतो.




ही राशि मंगळाचें स्वगृह मानतात; रवि ह्या राशीमध्यें असतां फार बलवान् असतो. ह्या राशींत शनि अशुभ फळें देतो. साधारणपणें गुरु ह्या राशींत शुभ फळें उत्पन्न करितो. जन्मकाळीं बुध मेषराशींत असतां स्वभाव अति चंचळ, अस्थिर, रागीट, भांडखोर, गणिताची आवड व कुशाग्र बुद्धि दर्शवितो. शुक्र या राशींत निर्बली असतो. हर्शल व नेपच्यून ह्या संबंधानें आज निश्चित असें कांहीं म्हणतां येत नाहीं. मेष राशीचा अंमल मस्तकावर आहे. व हर्शल हाही ग्रह बुद्धीवर विशेष परिणाम उत्पन्न करितो, करितां मेषराशींत हर्शल लग्न, तृतीय किंवा नवमांत असतां स्वभाव लहरी, नादी, विक्षिप्त, वाचनप्रिय, व शोधक करील.

मेषराशी लग्न, दशम केंद्रावर उदित असेल किंवा मेषराशींत रवि, चंद्र, मंगळ, गुरु व बुध हे ग्रह असून इतर बलवान् योग ज्यांचे कुंडलींत असतील तीं माणसें मोठीं कर्तृत्ववान व जगांत नांवालौकिकास आलेलीं आढळतील.



ज्यांचे जन्म काळीं पूर्व क्षितिजावर मेष उदय पावत असेल किंवा ह्या राशींत रवि किंवा चंद्र असतील तर त्या लोकांस पुष्कळ निद्रा, मानसिक व शारीरिक स्वास्थ्य, आनंदी व शांत स्वभावाचें मित्रमंडळ ह्या सर्वांची फारच आवश्यकता आहे. कारण त्रास, काळजी, अतिमेहनत, अतिवाचन वगैरेपासून ह्या लोकांस लवकर त्रास होतो. त्यांनीं विशेष मानसिक किंवा शारीरिक श्रम, काळजी, त्रास, अतिमेहनत ह्यांबद्दल सावधपणानें रहावें. त्यांनीं कामांसंबंधीं व विश्रांति-संबंधानें जितकें नियमितपणानें वागतां येईल तितकें वागावें. आहार मानसिक बल वाढविणारा असावा. उष्ण पदार्थ, मद्य, चहा कॉफी ह्यां सारखे उत्तेजक पदार्थांपासून शक्य तेवढें दूर रहावें. ह्या लोकांस फिरण्याच्या व्यायामापासून चांगला फायदा होतो. त्यांस विशेष घडामोडीच्या शहरांत राहिल्यापासून फायदा होतो. त्याचप्रमाणें रस्त्याचे कोंपऱ्यावरील घरांत व कोंपऱ्याकडील किंवा शेवटच्या खोलींत राहिल्यानें नैसर्गिक रीत्या बरें वाटतें.

मेषराशीचा रंग गुलाबी किंवा तांबडा आहे व **याकूत** नांवाचें रत्न मेषराशीच्या अंमलाखालीं आहे. मेषराशींचे लोकांचे आयुष्यांत **मंगळवारीं** बहुश: विशेष घडामोडी होतात.

## वृषभ.

**वृषभ** ही राशिचक्रांतील दुसरी राशि आहे. ह्या राशीचा आकार बैलासारखा आहे. ही स्त्री, स्थिर, पृथ्वी, प्रसव व पशुराशि आहे. ह्या राशीचा अंमल मान व कंठ ह्यावर आहे.

जन्मकाळीं ही राशि पूर्व केंद्रावर उदय पावत असतां किंवा चंद्र या राशींत असतां स्वभाव अभिमानी, खुनशी, दीर्घोद्योगी, जुन्या मतास चिकटून रहाणारा, दुराग्रही, ममताळु, राग आला असतां सारासार विचार न करणारा, मत्सरी, एकांतप्रिय, साधारण आळशी, विषयी, गर्विष्ठ असतो.

ही राशि शुक्राचें स्वगृह मानितात व चंद्र ह्या राशींत आपले उच्चांत असतो. ही राशी पृथ्वीतत्वाची असून शनि हा ग्रह पृथ्वीतत्वाचा असल्यामुळें ह्या राशींत साधारण चांगलीं फळें उत्पन्न करितो. रवि, बुध व गुरु हे या राशींत अनिष्ट फळें उत्पन्न करीत नाहींत.

मंगळ ह्या राशींत बरींच अनिष्ट फळें उत्पन्न करितो. वृषभ ही राशिचक्रांतील दुसरी राशी असल्यामुळें ह्या राशींत असलेले ग्रह धनस्थानासंबंधी घडामोडी करतात. ह्या राशीचा अंमल गळा किंवा कंठ ह्यांवर असल्यामुळें ह्या राशींत असलेले पापग्रह कंठविकार उत्पन्न करितात.

ह्या राशीचे जन्मकाळीं लग्न उदित असतां किंवा ह्या राशींत रवि, किंवा चंद्र असतां शरीरप्रकृति चांगली असते. ह्या राशींचे माणसाचा आहार पुष्कळ असतो व त्यामुळें यांचें शरीर वसामय व बोजड होतें. ह्या लोकांनीं आहारांत विशेष दक्ष राहावें. ज्यांत वसामय पदार्थ कमी असतील असे पदार्थांचें सेवन करावें. आहारासंबंधी शक्य तेवढी काळजी घ्यावी.

ह्या लोकांस शांत, विशेष छाया असलेलीं ठिकाणें, लहान लहान खेडीं, शहरांतील बजबज गडबड यांपासून शक्य तितक्या दूर ठिकाणीं राहिलें असतां प्रकृतीस बरें वाटतें. राहण्याकरतां चाळीच्या मधल्या खोल्या किंवा घराचा मध्य भाग ह्या लोकांस सुखकर वाटतो. ह्या राशीचे लोकांस **गोमेद** नांवाचे रत्नाचे धारणापासून फायदा होतो. या लोकांस **शुक्रवार** त्यांत विशेषतः—संध्याकाळचा विभाग चांगला जातो.

ह्या राशीचा रंग आपल्या ग्रंथांत श्वेत म्हणजे पांढरा मानिला आहे. परंतु युरोपीय ज्योतिर्विद ह्या राशीचा रंग पिंवळट हिरवा मानतात.



॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रींद्रघुवररचिताद्राचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽवृत्ति वर्ष १ लें. } जुलै १९१५. { अंक ४ था.

## स्फुट विचार.

तारिख ७ मे शुक्रवार रोजीं एका जर्मन पाणबोटीनें पाणतीर सोडून **ल्युसिटानिया** नांवाची एक अमेरिकन मेल बोट १४०० उतारूंसह बुडविली. ह्या अमानुष अत्याचारासंबंधाची सविस्तर हकीकत सर्वांस अवगत झाली आहे. ही ल्युसिटानिया बोट **प्रथम** ज्या वेळीं पाण्यांत सोडली त्या वेळेची कुंडली **'माडर्न ॲस्ट्रॉलॉजीचे'** जूनचे अंकांत दिली आहे. कोणत्याहि कार्याच्या आरंभ काळच्या ग्रहस्थितीवरून त्या कार्याच्या भावी परिस्थितीची अटकळ करतां येते; व कार्यारंभ काळची ग्रहस्थिति किती महत्वाची असते याची थोडीबहुत कल्पना वाचकांस व्हावी म्हणून ही कुंडली आम्ही मुद्दाम देत आहों.

ग्लासगो येथें तारीख ७ जून १९०६ रोजीं दुपारीं १२-३० चे सुमारास ही बोट प्रथम पाण्यांत सोडिली व त्या वेळीं कन्या या राशीचा २२ अंश पूर्व क्षितिजावर उदय पावत होता. त्या वेळचे तन्वादि षड्भाव व ग्रह खालीं लिहिल्या प्रमाणें होते.

## तन्वादि षड्भाव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तनु | धन | तृतीय | चतुर्थ | पंचम | षष्ठ |
| कन्या | तूळा | वृश्चिक | धनु | मकर | कुंभ |
| २१-३० | १३ | १२ | १८-३० | २६ | २८ अं. |

## स्पष्ट ग्रह.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रवि | चंद्र | मंगळ | बुध | गुरु | शुक्र |
| मिथुन | धनु | मिथुन | मिथुन | मिथुन | कर्क |
| १५-४९ | २४-५३ | २७-९ | १४-८ | १८-५ | १४-१३ |
| शनि | हर्शल | नेपच्यून | राहु | | |
| मीन | मकर | कर्क | सिंह | | |
| १४-४४ | ७-२१व | ९-१२ | १४-४८ | | |

वरील बोट पाण्यांत प्रथम सोडली त्या वेळेचा लग्नाधिपति बुध दशमांत आहे व शत्रुस्थानांतील व जळ राशींतील शनि बरोबर केंद्रयोग करीत आहे. चंद्र हा अष्टमेश जो मंगळ त्याबरोबर केंद्रांतून प्रतियोग करीत आहे. चतुर्थ या लय द्योतक स्थानांत हर्शल असून तो नेपच्यून ह्या **वरुण** देवतेच्या कारक ग्रहाबरोबर प्रतियोग करीत आहे. लग्नभावारंभीं उदित असलेला अंश चंद्र व मंगळाबरोबर केंद्रयोग करण्यास जात आहे. वरील सर्व योग ह्या बोटीचा अपघातानेंच नाश झाला पाहिजे असें दर्शवीत आहेत. ज्यांचें ज्योतिषशास्त्राचें अध्ययन सहा महिने देखील झालें नाहीं अशा नवशिक्या ज्योतिषानें सुद्धां असला कुयोगकारक काळ कोणत्याहि कार्यास घेतला नसता. असो. या एकाच उदाहरणावरून कोणत्याहि कार्यास आरंभ करते वेळीं शुभग्रहस्थिति किंवा शुभकाळ पहाणें किती जरूरीचें आहे ह्याची थोडीबहुत कल्पना करितां येईल.

* * *

तारीख ७ मे रोजीं ह्या बोटीस पाणतीर लागून जो अपघात झाला त्या वेळीं ह्या बोटीस प्रथम पाण्यांत लोटून ८ वर्षें व ११ महिने झाले होते. व बारावा महिना नुकताच लागला होता. **दिन वर्ष पद्धती**प्रमाणें ९ व्या वर्षाच्या शेवटच्या महिन्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें ग्रहस्थिति होती:—



चलित रवि हा मिथुन राशींत २४ अंश झाला होता व तो मूळच्या चंद्राबरोबर **प्रतियोग** करीत आहे. चलित चंद्र मेष राशींत २४ अंश असून मूळ कुंडलीचे अष्टमांतून भ्रमण करीत आहे.

चलित लग्न मिथुन राशीचे २८ अंश झालें असून मळच्या मंगळाबरोबर केंद्रयोग करीत आहे.

चलित मंगळ कर्कैंत २ अंश असून मूळ लग्नाधिपति बुध कर्कैंत १ ल्या अंशांत आहे. व तो चलित मंगळावरोबर युति करण्यास जात आहे.

ही सर्व ग्रहस्थिति ह्या बोटीचे प्रवासास प्रतिकूळ झाली असून लौकरच ह्या बोटीवर अनिष्ट प्रसंग येणार असें पूर्णपणें सुचवीत होती. ९ व्या वर्षाचे अखेरीस होत असलेले योग तारीख ७ मे रोजींच्या गोचरीच्या ग्रहानें फारच उत्तेजित झालेले आहेत. ह्या दिवशीं शनि मिथुन राशीचे २९ व्या अंशांत आहे व तो मूळच्या मंगळावर असून चलित लग्नाच्या अंशावरोबर केंद्रयोग करीत आहे. आणि लवकरच तो चलित मंगळ बुधाच्या युति बरोबर युति करण्यास जात आहे. मंगळ बुधाची युति म्हणजे **लग्नेश** व **अष्टमेश** यांची युति आहे हें येथें जरूर लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. गोचरीचा रवि व हर्शल यांचा केंद्रयोग याच दिवशीं होत आहे. गोचरीचें मंगळाचें भ्रमण कुंडलीचे **अष्टम** स्थानांतून होत होतें. वरील सर्व योग बोटीस अपघात होण्यास पुरेसे झाले नाहींत काय?

* * *

प्रत्येक कार्यास शुभाशुभ दिवस पहाण्याची पद्धति आपल्या देशांत इतकी रूढ झाली आहे कीं सबझूट मानणारे लोक देखील ह्या रूढीचे दास बनून आपल्या महत्वाच्या कृत्यांचा आरंभ आपल्या कल्पनेप्रमाणें असणाऱ्या शुभ दिवशीं करतात. परंतु ज्योतिषशास्त्राच्या अज्ञानामुळें वरील लोकांचे हातून ज्या हास्यास्पद चुका होतात त्यापैकीं एक उदाहरण म्हणून आमच्या वाचकांस सादर करण्याचा आमचा विचार आहे.

'आल्हाद' नांवाच्या नूतन वृत्तपत्राचा पहिला अंक ता. १७ मे १९१५ रोजीं निघाला आहे. ह्या दिवसाबद्दल पत्रकर्त्यानें प्रथमच खालीं लिहिल्याप्रमाणें म्हटलें आहे.

'प्रत्येक वर्षी कसल्याहि चांगल्या वाईट स्थितींत आपलें दर्शन भूलोकास देणाऱ्या, कधींहि क्षय न पावल्यामुळें 'अक्षय' नांवास सर्वथैव पात्र झालेल्या **अक्षय** तृतीयेच्या सुमुहूर्तावर आल्हाद जन्मास येत आहे. आपल्या जन्म-दिवसाप्रमाणें त्यानेंही 'अक्षय' व्हावें.......'

या दिवशीं सूर्योदयाचे सुमारास खालीं लिहिल्याप्रमाणें ग्रहस्थिति होती.

| रवि | चंद्र | मंगळ | बुध | गुरु | शुक्र |
|---|---|---|---|---|---|
| वृषभ | मिथुन | मेष | मिथुन | मीन | मेष — |
| २९-९ | २६-५६ | २३-१० | २१-४२ | २२-१८ | २३-५७ |
| शनि | हर्शल | नेपच्यून | राहु | | |
| कर्क | कुंभ | कर्क | कुंभ | | |
| ०-२८ | १९-४० | २८-३ | २१-५२ | | |

ह्या दिवशीं खालीं दिल्याप्रमाणें अशुभ योग झाले आहेत.

(१) जनसमाजाचा दर्शक ग्रह चंद्र हा लवकरच शनीबरोबर युति करण्यास जात आहे.

(२) चंद्र हा हर्शल ग्रहाबरोबर १३५ अंशाचा अशुभ दृष्टियोग करण्यास जात आहे.

(३) मनोरंजक व ललित वाङ्मयाचा कारक ग्रह शुक्र हा मंगळाबरोबर युक्त असून हे दोन्ही ग्रह नेपच्यून ह्या पापग्रहाबरोबर केंद्रयोग करणार आहेत.

(४) मुद्रणकलेचा व सर्वसाधारण वाङ्मयाचा कारक ग्रह बुध हा नेपच्यून बरोबर अर्ध केंद्रयोग किंवा ४५ अंशाचा अशुभ दृष्टियोग करीत आहे.

थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे ' आल्हादाचा" जन्म साडेसातीच्या मध्यामध्यें झाला आहे. असा हा दिव्य शुभदिन कोणत्या ज्योतिषग्रंथांत सांगितलेला आहे याची कोणास माहिती असल्यास त्यानें आम्हास जरूर कळवावें.



# राशिधर्म निरूपण.

## मिथुन.

मिथुन ही राशिचक्रांतील तृतीय राशि आहे. ह्या राशीचा आकार आर्यग्रंथांत नृयुग्मासारखा मानलेला आहे. परंतु ग्रीक पुराणांत ह्या राशीचा आकार दोन करडांचा मानलेला आहे. मिथुन ही राशि जरी मनुष्यराशि आहे तरी कधीं कधीं ह्या राशीवर जन्म पावणाऱ्या मनुष्यांचा तोंडवळा वगैरे हरिण किंवा बोकडासारखा असतो. व ह्या लोकांत माकडाचे अंगांत सहज दृग्गोचर होणारा खोडकरपणा व नकली स्वभाव विशेष आढळतो. ही राशि पुरुष, द्विस्वभाव, मनुष्य व वायुराशि आहे. मिथुन ही अल्पप्रसव राशि आहे असें मानण्यास मुळींच हरकत नाहीं. प्रायः ही राशि आपल्या द्विस्वभाव व जुळ्या आकाराप्रमाणें जुळी संतति देते. ह्या राशीचा अंमल हात, खांदे, बाहू, फूपुस व श्वासनलिका ( Lungs ) ह्यांवर आहे. व ह्यामुळें वरील अवयवांसंबंधी विकार होतात.

ह्या राशीचा विशेष अंमल असणाऱ्या मनुष्यांमध्यें अस्थिरपणा, गुळमुळीतपणा, संदिग्धता, अनिश्चयात्मकता, अस्वस्थता वगैरे गुण फारच पहाण्यासारखे असतात. ह्या राशीचे मनुष्यांत भित्रेपणा, घाबरेपणा किंवा मज्जातंतूंचा नबळेपणा, चंचलवृत्ति व अस्थिरता जास्त प्रमाणांत आढळते.

मिथुन लग्नावर जन्म पावणारीं मनुष्यें किंवा ज्यांच्या जन्मकाळीं रवि-चंद्र मिथुन राशींत असतो तीं मनुष्यें स्वभावानें ममताळु, उदार, विचारी व विद्याभिलाषी असतात. ह्या राशीवर जन्म पावणाऱ्या लोकांमध्यें दोन प्रकारचे लोक आढळतात. पहिल्या प्रकारचे लोकांत निवळ वाचनाची अति गोडी असते व हीं मनुष्यें दुसऱ्यांचे अनुकरण फार त्वरित करितात. हीं मनुष्यें माकडाप्रमाणें दुसऱ्याची हुबेहुब नकल करण्यांत बरीच तरबेज असतात. दुसऱ्या कोटींतील मनुष्यें चिकित्सक, शास्त्रीय विषयाची आवड बाळगणारे व विवेकी असतात.

ही राशि बुधाचें स्वगृह मानतात. ह्या राशीमध्यें हर्शल बलवान् असतो. **रवि, चंद्र, शुक्र, गुरु** कमी अधिक प्रमाणानें **शुभ** फळें उत्पन्न करितात. ही राशि शास्त्रीय विषयाची आवड, वाचनप्रियता, व बौद्धिक प्रगल्भता दर्शविणारी असल्यामुळें ह्या राशींत सर्वसाधारणपणें **बुध, हर्शल, रवि, चंद्र, शनि, शुक्र** व **गुरु** हे ग्रह क्रमानें बलवान् असतात. ह्या राशींत **रवि** किंवा **चंद्र** जन्मकाळीं असून तो **शनि,** किंवा **मंगळाकडून** दुष्ट अथवा पीडित असतां दमा, हात मोडणें फुफुसासंबंधी विकार, श्वासनलिकेचे विकार, किंवा क्षयरोग वगैरे विकार दर्शवितात.

मिथुन राशीचा अंमल श्वासनलिकेवर विशेष असल्यामुळें ह्या लोकांनीं प्राणायाम किंवा श्वसनक्रियेसंबंधीं व्यायाम अवश्य करावा. ह्या राशीचे लोकांनीं मानसिक श्रम बेताबातानें करावे. उबदार कपडे, मज्जातंतूंना पोषक व बौद्धिक सामर्थ्य वाढविणारा आहारविहार ह्या सर्वांची ह्या लोकांस फारच अवश्यकता आहे. डोंगराळ प्रदेश, मोठ्या इमारती किंवा घराचे वरचे मजले ह्यांमध्यें राहिल्यापासून फायदा होतो. ह्या राशीचा रंग अस्मानी किंवा फिकट पिंवळा असल्याचें पाश्चिमात्य ज्योतिर्विदांचें मत आहे. ह्या राशीचे लोकांस ५ ही संख्या विशेष लाभकारक असल्याचें मानितात. ह्या लोकांस **वैडूर्य**—गोमेदासारखे निळा हिरवा रंग असलेले रत्नाचे धारणापासून फायदा होतो. ह्या लोकांस **बुधवार** त्यांत सकाळचा विभाग शुभदायक असतो.

## कर्क.

कर्क ही राशिचक्रांतील चतुर्थ राशि आहे. ह्या राशीचा आकार खेंकड्यासारखा मानिला आहे. कर्क ही कीटक जलचर, व आर्द्र राशि आहे. शरिरांतील छाती—स्तनद्वय, पोट, पचनेंद्रियें, स्त्रियांचे शरीरांत दुग्ध उत्पन्न करणारे पिंड, पचनक्रियेस अवश्य लागणारा जठररस ह्या सर्वांवर कर्क राशीचा अंमल आढळतो. कर्क ही राशिचक्रांत स्त्रीराशि मानिली आहे व ह्या राशीमध्यें स्त्रियांचे अंगीं असलेली सर्व प्रकारची नैसर्गिक दुर्बलता विशेष प्रकारानें दृष्टोत्पत्तीस येते. हीं मनुष्यें स्वभावानें अस्थिर, कोंवळ्या मनाची, आपमतलबी, छांदिष्ट, सर्व गोष्टींत चिरचिर करणारीं, काटकसरीनें वागणारीं, व चिकाटीनें हातीं घेतलेलें काम करणारीं असतात.



कर्कलग्नावर जन्म पावणारीं मनुष्यें किंवा जन्मकाळीं ज्या लोकांच्या कुंडल्यांत रवि अथवा चंद्र कर्कराशींत असतो तीं मनुष्यें शरिरानें धष्टपुष्ट नसतात. ह्या लोकांवर जन्मकाळीं प्राप्त झालेल्या परिस्थितीचा विशेष परिणाम घडतो. हीं मनुष्यें स्वभावानें शांत, एकांतप्रिय, क्षुल्लक कारणानें मानसिक स्थैर्य घालविणारीं, शीघ्र संस्कार ग्रहण करणारीं, कधीं कधीं भित्र्या चंचल वृत्तीचीं, व आंतल्या गांठीचीं असतात. ह्या लोकांस जुन्या रीतिभाती व जुना धर्म यांचा फार अभिमान असतो. ह्या लोकांस आपल्या कुलाचा किंवा जातीचा इतिहास अथवा आयुष्यांत घडलेल्या मागील गोष्टी सांगणें फार आवडतें.

कित्येकांचे मतें कर्क लग्नावर जन्म पावणाऱ्या लोकांवर चंद्राच्या होणाऱ्या नित्य क्षयवृद्धीप्रमाणें परिणाम होतो. शुक्लपक्षांत त्यांच्यामध्यें विशेष उत्साह दिसतो. परंतु ह्याचे उलट स्थिति कृष्णपक्षांत आढळते.

कर्क राशि **चंद्राचें** स्वगृह मानतात. ह्या राशींत **गुरु** उच्च असतो. **रवि,** शुक्र व बुध हे साधारणपणें ह्या राशींत बलरहित असतात. ह्या राशींत **शनि** निर्बली असतो. मंगळ कर्कमध्यें असतां बरीच अनिष्ट फळें उत्पन्न करितो. कर्क ही जलतत्वाची राशी असल्यामुळें नेपच्यून ह्या राशींत बलवान् मानण्यास हरकत नाहीं. कर्कराशीमध्यें होणारी गुरुचंद्राची युति महद्भाग्यकारक मानतात. ही युति लग्न, पंचम, नवम, दशम, चतुर्थ, धनस्थान किंवा एकादश स्थानांत झाली असतां अधिक चांगलीं फळें अनुभवास येतात. कर्क ही चर राशि असल्यामुळें केंद्रीं उदय पावत असतां बलवान् असते. त्यांत विशेषतः ही राशि लग्नकेंद्रावर किंवा दशम केंद्रावर उदय पावत असतां ज्यास्त बलवान असते.

कर्क राशीचे माणसांवर सभोंवतालीं असलेल्या परिस्थितीचा विशेष परिणाम घडत असल्यामुळें ह्या राशीचे लग्नावर जन्म पावलेलीं मनुष्यें साधारणपणें अशक्त आढळतात. ह्या राशीचा अंमल विशेषतः जठरावर असल्यामुळें ह्या मनुष्यांनीं शुद्ध सात्विक आहार घ्यावा. अन्न पूर्णपणें शिजविलेलें असून ज्यामध्यें विशेष आम्लता उत्पन्न होत नाहीं अशा पदार्थांचें सेवन करावें. शक्य तेवढें मद्यापासून दूर रहावें. भावी संकटाचा विचार करणें, मानसिक श्रम ज्यास्त करणें, अति त्रास, अति विचार वगैरे गोष्टींपासून शक्य तेवढें दूर रहावें. कर्क राशीचे अमलाखालीं असणारीं मनुष्यें नेहमीं भलत्याच विचारानें आपलें नुकसान करून घेतात. जे रोग त्यांस झाले नसतील ते झाले आहेत असा त्यांस भास होतो. ह्या मनुष्यांस समुद्रप्रवासापासून फायदा होतो. ह्या लोकांनीं मद्य व सर्व प्रकारचीं औषधें यांपासून दूर रहावें. ह्या लोकांस सर्व प्रकारचे जलोपचारापासून फायदा होतो. ह्या लोकांनीं मोठमोठ्या जलाशयाजवळ, छायेंत किंवा रस्त्याच्या शेवटच्या टोंकाकडील घरांत रहावें. ह्या लोकांस **पाच** रत्नाचे धारणापासून फायदा वाटतो व ह्या लोकांस सोमवार विशेष शुभफलदायक असतो. ह्या राशीचा रंग पांढरा मानतात.

## सिंह.

सिंह ही राशिचक्रांतील पांचवी राशि आहे. हिचा आकार आर्य व यूरोपीय ग्रंथांत सिंहासारखा मानला आहे. ही पुरुष, स्थिर, अग्नि, अल्पप्रसव मानुषराशि आहे. ह्या राशीचा अमल हृदय ( Heart ), रुधिराभिसरणाची क्रिया करणारीं इंद्रियें, पाठाण, पाठाणीचा कणा यांवर आहे.

जन्मकाळीं ही राशि पूर्वकेन्द्रावर उदय पावत असतां किंवा ह्या राशींत रवि किंवा चंद्र असतां स्वभाव निष्कपटी, निर्मळ अंतःकरणाचे, धीट, उदार, थोर अंतःकरणाचे, ममताळु, सात्विक, असतो. सिंहलग्नावर जन्मणारीं माणसें सिंहाप्रमाणें हाडापेरानें मजबूत, कोणत्याच संकटास किंवा अडचणीस दाद न देणारे, स्वतंत्रताप्रिय, थोडेबहुत अभिमानी, निश्चयी व धाडसी असतात. ( अपूर्ण )



## मिथुन संक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

( मागील अंकाच्या ८ व्या पानापासून पुढें चालू. )

**मिथुनेंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक कठोर मनाचे, हट्टी, गर्विष्ठ, हेवेखोर, दुसऱ्यावर टीका करणारे व परोत्कर्ष सहन न करणारे असे असतात. **यांचा कायद्यापासून उदय होण्याचा संभव आहे.**

**मिथुनेंत रवि व धनेंत चंद्रः**—या योगावर जन्मास येणारे लोक उतावळे, अतिशय काम करणारे, सरळ मनाचे, अस्थिर व स्पष्टवक्ते असतात. यांचें भाषण स्फूर्तिजनक असतें. यांना कोणतेंही कार्य निश्चित व स्थिरपणानें करतां येत नाहीं. **प्रवासामुळें किंवा कार्यदक्षतेमुळें यांचा उदय होईल.**

**मिथुनेंत रवि व मकरेंत चंद्रः**—या योगावर जन्मास येणारे लोक कडक स्वभावाचे, स्वार्थी, अत्यंत व्यवहारी आणि प्रत्येक बाबतींत दुसऱ्यावर टीका करणारे असतात.

**मिथुनेंत रवि व कुंभेंत चंद्रः**—या योगावर जन्म पावणारे लोक स्थिर व गंभीर स्वभावाचे, उदार, विश्वासु, आणि शांत असे असतात. हा योग लेखनव्यवसाय किंवा कला यांचे अध्ययनास उत्तम आहे. **या लोकांचा उदय लेखनव्यवसाय किंवा मित्रमंडळापासून होण्याचा संभव आहे.**

**मिथुनेंत रवि व मीनेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक अस्वस्थ व अस्थिर स्वभावाचे, लहान सहान गोष्टींत मन घालून मानसिक त्रास करून घेणारे व लोकांवर उपकार करणारे असतात. या लोकांत आत्मविश्वास कमी असतो. **लोकोपयोगी संस्थांपासून उदय होण्याचा संभव आहे.**

# जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभाववर्णन.

## कर्कसंक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

कर्क ही राशीचक्रांतील चतुर्थ, आपतत्वाची, चर, बहुप्रसव आणि स्त्री राशि आहे. ह्या राशीमध्यें रवि दरवर्षी २१।२२ जूनचे सुमारास प्रवेश करतो आणि २०।२१ जुलईपर्यंत या राशीमध्यें असतो. रवीचें भ्रमण ह्या राशीमधून चाललें असतां ज्यांचा जन्म होतो ते लोक काटकसरी, कोमळ अंतःकरणाचे, भिऊन वागणारे परंतु आपला मुद्दा न सोडणारे, उद्योगी, कल्पनातरंगांत वाहणारे व महत्वाकांक्षी असतात. त्यांच्या वर्तनांत लहरीपणा विशेषेंकरून दृष्टीस पडतो. कर्कमध्यें रवि असणारे लोक प्रसंग विशेषीं अत्यंत चिकाटी दर्शवितात. ह्या लोकांस फिरण्याचा अतिशय नाद असतो.

कर्कमध्यें रवि असलेल्या लोकांची शरीरप्रकृति विशेष बळकट असते असें नाहीं. पोटांतील विकृति, अग्निमांद्य, अपचन व आंतड्याचे विकार होण्याचा संभव असतो.

कर्कमध्यें रवि असलेल्या लोकांमध्यें व्यवस्थापक, नित्य उपयोगाच्या वस्तूंचा क्रयविक्रय करणारे, वाणी, कप्तान, खलाशी वगैरे लोक आढळतात. स्त्रियांमध्यें दायीपणाचा धंदा करणाऱ्या आढळतात. ज्या धंद्यांत लोकांचा जास्त संबंध येतो, व जेथें पुष्कळ घडामोड होते अशा धंद्यांत, कर्कमध्यें रवि असलेले लोक यशस्वी होतात.

## रविचंद्रांच्या राशिपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाव-वर्णन.

**कर्कैंत रवि व मेषेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक महत्वाकांक्षी, साहसी, आत्मविश्वासी, व व्यवहारी असतात. समाजांत मानमान्यता मिळावी आणि आपलीं कृत्यें लोकांनीं पसंत करावी असें या लोकांस फार वाटतें. या लोकांच्या विनोदांत तीक्ष्णता किंवा प्रखरता विशेष असते. **धाडसानें हे लोक यशस्वी होतात.**



**कर्कैंत रवि व वृषभेंत चंद्रः**—या योगावर जन्म पावणारे लोक विचारी, लोकांची काळजी घेणारे, स्थिर बुद्धीचे, आग्रही, आपले विचार न सोडणारे व विशेषेंकरून नशीबवान् असतात. **राजकीय किंवा सामाजिक बाबतींत पडल्यास यश येण्याचा अधिक संभव आहे.**

**कर्कैंत रवि व मिथुनेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक जुन्या स्नेह संबंधास न तोडणारे असे असतात. यांच्या कल्पना विलक्षण व स्वभाव लवकर प्रक्षुब्ध होणारा असतो.

**कर्कैंत रवि व कर्कैंत चंद्रः**—या योगावर जन्म पावणारे लोक घरगुती व कौटुंबिक बाबतींत मग्न असतात. समाजांत प्रमुखपणानें असावें असें या लोकांना वाटतें. हे लोक स्वतंत्रपणानें व स्वच्छंदानें वागणारे आणि महत्वाकांक्षी असतात. **काटकसर व इस्टेटीची व्यवस्था यामध्यें हे लोक यशस्वी होतात.**

**कर्कैंत रवि व सिंहेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक आनंदी, उत्साही, गायनवादनाचे शोकी, चारचौघांत मिळूनमिसळून वागणारे आणि धंदे शिक्षणाची आवड असणारे असतात. हे लोक धोरणी व हजर-जबाबी असतात. **स्वतंत्र धंद्यांत यश येण्याचा अधिक संभव आहे.**

**कर्कैंत रवि व कन्येंत चंद्रः**—या योगावर जन्म पावणारे लोक व्यापारधंद्यांत निपुण व हुशार, सुस्वभावी आणि बुद्धिमान् असतात. **या लोकांचा उदय रूढ चालींचे अनुकरणापासून होईल.**

**कर्कैंत रवि व तूळेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक कोमल अंतःकरणाचे, उदार व लेखनवाचनाकडे प्रवृत्ति असणारे असतात. या योगावर जन्मणारे लेखक लवकर प्रसिद्धीस येतात. **कायद्यापासून या लोकांचा उदय होण्याचा संभव आहे.**

**कर्कैंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः**—या योगावर जन्म पावणारे लोक विलक्षण स्वभावाचे, खोल बुद्धीचे आणि स्थिर मताचे असतात. हे लोक व्यवस्था राखण्यास व अधिकार चालविण्यास योग्य असतात. **सरकारी नोकरींत उदय पावण्याचा अधिक संभव आहे.**

**कर्कैत रवि व धनेंत चंद्रः**—या योगावर जन्म पावणारे लोक दयाळु, परोपकारी व दूरदर्शी असतात परंतु स्थिर निश्चयाचे नसतात. **शिक्षकाच्या धंद्यापासून उदय होईल.**

**कर्कैत रवि आणि मकरेंत चंद्रः**—या योगावर जन्म पावणारे लोक व्यवहारी, काटकसरी आणि अस्थिर स्वभावाचे असतात. या योगामुळें शरीरप्रकृति व सांपत्तिक स्थिति या संबंधानें बरेच प्रसंग येतात. **जमीन-जुमला किंवा व्यवहारोपयोगी वस्तूंच्या व्यापारांत यश येईल.**

**कर्कैत रवि व कुंभेंत चंद्रः**—या योगावर जन्म पावणारे लोक सुस्वभावी, उदार व वाचनाभिलाषी असतात. **इस्टेट एजंसी किंवा सर्व्हेइंग यांमध्यें उदय होईल.**

**कर्कैत रवि व मीनेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक परोपकारी, सुस्वभावी व कोमल अंतःकरणाचे असतात. हे लोक नशीबवान् असून त्यांचें आयुष्य सौख्यांत जातें. **परोपकाराची कृत्यें करण्यांमध्यें उदय होईल.**

**सूचनाः**—मागील अंकांत ७ पानावर ‘ मिथुन संक्रमणांत ’ या शब्दां-ऐवजीं ‘ वृषभ संक्रमणांत ’ असे शब्द चुकीनें लिहिले गेले आहेत. वाचकांनीं हे शब्द दुरुस्त करावे.



# प्रसिद्ध पुरुषांच्या कुंडल्यांचा संग्रह.


## नं. ४ न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे.



**न्यायमूर्ति रानडे** यांच्या जन्मकालीं **कन्या** या द्विस्वभाव राशीचा १४ वा अंश उदित असून लग्नाधिपति बुध केंद्रामध्यें आहे. सुरगुरु उदित अंशा-वर त्रिकोण दृष्टीनें व लग्नाधिपतीवर द्विराश्यांतर दृष्टीनें पहात आहे. लग्नावर लग्नेशाची आणि शुभग्रहाची दृष्टि आहे म्हणून न्या. रानडे हे शरीरानें उंच, तेजस्वी व गंभीर होते. सप्तमांतील मंगळामुळें न्या. रानडे यांच्या चेहेऱ्या-वर किंचित् उग्रपणा होता. बुध–गुरूच्या लग्नावरील दृष्टीनें चेहेऱ्यावर विद्व-त्तेचें अपूर्व तेज होतें. कन्याराशीवर जन्म पावणारे लोक परिस्थितीचें योग्य ज्ञान करून घेऊन त्याप्रमाणें आपल्या कार्यक्षेत्राची मर्यादा आंखणारे, व्यवहारज्ञ, विवेकी आणि समयज्ञ असतात. प्रस्तुत कुंडलींत उदित अंशाच्या पंचमांत शनि व गुरु आहेत. ह्या शनि–गुरूच्या नवपंचम योगानें कन्या लग्नामुळें येणाऱ्या स्वभावांत समतोलपणा उत्पन्न झाला आहे.

प्रस्तुत कुंडलीमध्यें तावडतोब लक्षांत येणारा ठळक योग म्हटला म्हणजे अलौकिक बुद्धियोग हा आहे. बुद्धीच्या कारकग्रहाची ( बुधाची ) राशि

सा. ल.




लग्नकेंद्रीं आहे. लग्नेश केंद्रामध्यें हर्शल बरोबर युति-योग करीत असून पंचमांत झालेल्या शनि—गुरूच्या युतिबरोबर द्विराश्यंतर दृष्टियोग करीत आहे. पंचमेश शनि गुरूच्या युतीमध्यें व लग्नेश बुध हर्शलच्या युतींत असून या अति महत्वाच्या दोन युति योगांत द्विराश्यंतरयोग झालेला आहे. आणि हा योग केंद्रकोणांतून होत आहे हें त्यामध्यें वैशिष्य आहे. बुद्धिमान् पुरुषांच्या कुंडलीमध्यें बुध बलवान् असून बौद्धिक स्थानाशीं संबंधित नाहीं असें क्वचितच आढळेल. न्या. रानडे यांचा लग्नेश बुध, हर्शल, गुरु आणि पंचमेश शनि या तीनही प्रचंड ग्रहांशीं शुभसंबंधित आहे. हा योग लहान सहान नाहीं. कुंडलीमध्यें चार ग्रह शास्त्रीय राशींत आहेत आणि या चार ग्रहांपैकीं चंद्र मंगळाबरोबर शुभ ( द्विराश्यंतर ) दृष्टियोग करीत आहे. हा चंद्र मंगळाचा शुभ दृष्टियोग बुद्धीस तीक्ष्णपणा आणणारा आहे. न्या. रानडे पंचमांतील गुरु शनीप्रमाणें बुद्धिमान् तर होतेच परंतु बुधाबरोबर झालेला गुरु—शनीचा द्विराश्यंतर दृष्टियोग त्यांच्या बुद्धिमत्तेंत स्थैर्य आणि गंभीरता अधिक दर्शवीत आहे. केंद्रांतील गुरूच्या शुभ दृष्टींतील बुधहर्शलची युति न्या. रानडे यांची कल्पकता उच्च दर्जाची होती याची साक्ष देत आहे.



न्यायमूर्तींच्या कुंडलींत असाधारण बुद्धिमत्ता असण्याला गुरु, शनि व बुध हे ग्रह कारणीभूत झाले आहेत. व हे ग्रह ज्या विशिष्ट विषयांचे कारक म्हणून ज्योतिषशास्त्रांत मानिले आहेत तेच विषय न्यायमूर्तींचे विशेष आवडते होते. शनि व बुध कायद्याचे कारक आहेत. पंचमांतील स्वगृहींच्या शनीबरोबर केंद्रस्थ बुधाच्या शुभ दृष्टियोगामुळें न्यायमूर्तींना कायद्यामध्यें प्रावीण्य मिळवितां आलें. पंचमांतील आणि बुधाच्या शुभ दृष्टींत असलेल्या सुरगुरूमुळें न्या. रानडे भाषाशास्त्रांत निपुण होते. पंचमांतील शनिगुरूमुळें " धर्म " हा त्यांचा आवडीचा विषय होता. बुद्धिमानांच्या वाटणीला नेहमींच उत्तम धनयोग येतील असें नाहीं परंतु प्रस्तुत कुंडलींत बुद्धियोगाच्या जोडीला—धनयोग सुद्धां चांगला झाला आहे ( १ ) चारही केंद्रांचे अधिपती ( बुध व गुरु ) केंद्रकोणामध्यें आहेत. ( २ ) चंद्रापासून एकूनएक ग्रह स्थानपरत्वें नवम, दशम आणि एकादश या स्थानांमध्यें आहेत. ( ३ ) जन्मकुंडलीच्या केंद्र कोणामध्यें सहा ग्रह आहेत. ह्या बलवत्तर वैभवदर्शक योगामुळें रानडे हायकोर्टाच्या न्यायासनावर विराजमान झाले.

माधवराव रानडे हे बुद्धिमान् होते, भाषाकोविद होते, ते स्वतःच्या बलावर हायकोर्टाचे जज्ज झाले एवढ्याच गोष्टी त्यांच्या चरित्रांत प्रमुखत्वानें होत्या असें नाहीं. त्यांच्या आयुष्यांतील नियत कार्य निराळेंच होतें. आपल्या खंडःप्राय देशांत कोणतीहि देशोन्नतीची चळवळ असो त्यामध्यें न्यायमूर्तींचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नव्हता असें कधींहि झालें नाहीं. आपल्या देशाची सामाजिक, औद्योगिक आणि राजकीय उन्नति करण्यामध्यें त्यांनीं आपलें सर्व आयुष्य वेंचिलें आहे. कै. गोखले यांचे मतें न्या. रानडे " प्रथम महाराष्ट्रांतील व पुढें सर्व हिंदुस्थानांतील राष्ट्रोन्नतीच्या नानाविध चळवळींचे केवळ आधारस्तंभच नव्हेत तर आद्यप्रवर्तक होते, " हें त्यांच्या आयुष्यांतील सार होय. आणि या स्थितीचा बोध त्यांच्या कुंडलीमध्यें अत्यंत स्पष्टपणें दिसून येत आहे. त्यांच्या पंचमांत असलेली गुरुशनीची युति व त्या युतिबरोबर न्या. रानडे यांच्या आत्मकारक बुधाचा द्विराश्यंतर दृष्टियोग झाला आहे. हा अपूर्व योग त्यांच्या आयुष्यांतील सर्व

घडामोडींचा निदर्शक आहे. गुरुशनीच्या युतीचा महिमा फार मोठा आहे. ही युति सुमारें दर २० वर्षांनीं एका युतीच्या स्थानापासून साधारण त्रिकोणाच्या अंतरानें होत असते. आणि सुमारें २ शतकेंपर्यंत ही युति एकाच धर्माचे राशींत घडत असते. १९ व्या शतकांत ही युति वृषभ, कन्या आणि मकर ह्या पृथ्वीतत्वाच्या राशीं होत होती; व एकदां या युतीनें पृथ्वीराशीचा त्रिकोण सोडला कीं कांहीं शतकेंपर्यंत ही युति पुन्हां या राशींत दिसणार नाहीं. असली ही अपूर्व युति न्यायमूर्तींच्या पंचमांत असल्यामुळें त्यांची बुद्धि विशाल, व्यापक व तेजस्वी होती. नुसता गुरुशनीचा पंचमांतील युतियोग अत्यंत दुर्मिळ आहे. अनेक बुद्धिमान् पुरुषांच्या कुंडल्या पाहतां त्यांत फक्त ऐझाक न्यूटनच्या कुंडलींत आम्हांस ही युति पंचमांत पहाण्यास मिळाली. असल्या ह्या दुर्लभ युतीचें महत्व प्रत्येक राशींत भिन्न भिन्न प्रकारचें आहे. प्रस्तुत कुंडलींत ही शनिगुरूची युति—**मकर** राशीमध्यें झाली आहे. मकर राशि दशम राशि असल्यामुळें राजकारणाची द्योतक आहे. व हा योग पंचमांत होत असल्याकारणानें न्यायमूर्तींच्या बुद्धीचा ओघ राजकारणाकडे वळला. **मकर** राशि हिंदुस्थानाचें तनुस्थान आहे. व धनु राशीचा अधिपति सुरगुरु हा महाराष्ट्राचा तनुस्वामी आहे म्हणून **न्यायमूर्तींच्या पंचमांतील या योगाचा महाराष्ट्राच्याच नव्हे तर अखिल भरतखंडाच्या राजकारणाशीं निकट संबंध आहे.** हिंदुस्थानची उन्नति हा एकच प्रश्न त्यांच्यापुढें अहर्निश होता. हें कार्य करण्याकरितां त्यांच्या अंगीं बुद्धिमत्ता होती यांत शंका नाहीं परंतु त्यांचा लग्नेश किंवा आत्मकारक ग्रह बुध निर्बल असून अस्त पावत आहे त्यामुळें त्यांच्या हातून जें व्हावयास पाहिजे होतें, अशी सर्व हिंदुस्थानची इच्छा—नव्हे आशा होती, तें घडलें नाहीं. अशा बुद्धिमान पुरुषास सेवाधर्म रुचला यापरते दैवाचे दुर्विलास ते कोणते ?

राम नारायण.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचिताद्राचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽवृत्ति वर्ष १ लें. आगष्ट १९१५. अंक ५ वा.

## स्फुट विचार.

मालेच्या बऱ्याच वाचकांकडून आम्हीं मालेचीं पानें वाढवावीं किंवा माला कुंडलीविज्ञानाप्रमाणें दाशाहिक किंवा पाक्षिक करावी वगैरे बऱ्याच सूचना आल्या आहेत. शास्त्रीय विषयावरील वृत्तपत्रें साप्ताहिक, दाशाहिक किंवा पाक्षिक केल्यानें शास्त्रीय विषयावर उत्तम लेख येण्याऐवजीं टाकाऊ व नीरस लेख जास्त येतात असा आमचा अनुभव आहे. आणि त्यामुळें तें पाक्षिक किंवा दाशाहिक लवकरच नामशेष होण्याचा विशेष संभव असतो. आम्हीं पुढें ठेविलेल्या ध्येयांकरतां तरी आम्हांस ही माला पाक्षिक किंवा दाशाहिक करतां येत नाहीं. मालेचा खर्च मालेच्या वर्गणींतून जाऊन ज्याप्रमाणें जास्त वर्गणीदार मिळतील त्या मानानें मालेचीं पानें वाढविण्याचा आमचा विचार आहे. सध्याच्या कागद, छपाई वगैरे संबंधानें महागाईच्या काळांत मालेचीं पानें वाढवि-

त्याचें धाडस करणें म्हणजे मालेचें आयुष्य कमी करून तीस लवकरच जगास रामराम ठोकण्यास लाविण्यासारखें आहे.

* * *

**मालेचा** पहिला अंक कुंडलीविज्ञानाचे वाचक व इतर जोतिषविद्यार्थी यांजकडे आश्रयाकरितां पाठविला होता. त्यांपैकीं कांहीं लोकांनीं प्रथमच पुढें अंक न पाठविण्याबद्दल आम्हांस कळविलें परंतु '**विज्ञाना**'च्या बऱ्याच वाचकांनीं मालेच्या २ ऱ्या अंकाची व्ही. पी. परत करून वड्याचा राग वांग्यावर काढला आहे. विज्ञानाच्या वर्गणीदारांच्या मतें ज्योतिषशास्त्राच्या मासिकांचे संपादक म्हणजे वर्गणी गिळंकृत करणारे भामटे आहेत असा विपरीत समज पुष्कळ ठिकाणीं आमच्या निदर्शनास आला आहे. त्यास आमचा निरुपाय आहे. ही हकीकत आमचे मतें द्यावयाची नव्हती परंतु ओघाला आली म्हणून द्यावी लागत आहे त्याबद्दल मालेचे वर्गणीदार आमचेवर रागावणार नाहींत अशी आशा आहे.

* * *

अवध्या तीन महिन्यांच्या अवधींत **मालेस** रसिक वाचक वर्गाकडून जो उदार आश्रय मिळाला आहे त्यावरून पहातां असाच आश्रय पुढें मिळा गेल्यास **मालेस** लवकरच पृष्ठें वाढविण्याचा सुयोग येऊन वाचकांची जिज्ञासा तृप्त करितां येईल अशी आम्हांस आशा आहे. मालेचा प्रत्येक अंक नियमित वेळीं प्रसिद्ध करण्याची शक्य तेवढी खबरदारी घेतली जात असून मालेचे अंक वर्गणीदारांकडे १।२ तारखेच्या आंतच रवाना केले जातात. मालेचा अंक पहिल्या आठवड्यांत वर्गणीदारांस न मिळाल्यास त्यांनीं मेहरबानी करून पोस्टाकडे तपास करावा.



# राशिधर्म निरूपण.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

राशिचक्रांतील **सिंह व कर्क** ह्या राशी फार महत्वाच्या आहेत. जगांत अजरामर कीर्ति ठेऊन जाणाऱ्या लोकांच्या कुंडल्यांत ह्या दोन राशी फारच प्रबल असतात.

**सिंह** राशि **रवीचें** स्वगृह मानितात. लग्नीं किंवा दशमांत **सिंह** राशीमध्यें **रवि, चंद्र,** गुरु, बुध, हर्शल किंवा शुक्र एक एकटे किंवा यांपैकीं कांहीं असतील व इतर ग्रहस्थिति चांगली असेल तर हा योग महत्पद आणि सुकीर्ति खात्रीनें देईल. ह्या राशींत शनि अनिष्ट फळें उत्पन्न करतो. सिंह राशि १।१०।९।५।३ ह्या स्थानांत विशेष बलवान् असते. **सिंह** राशीचे मनुष्यांस आहारविहारांत नेमस्तपणा पाळण्याची विशेष आवश्यकता आहे. ह्या लोकांनीं उष्ण पदार्थ, मद्य, चहा, कॉफी यांपासून सावध रहावें व आहार रक्त वाढविणारा असावा. ह्या लोकांस नियमितपणा, सुस्वभावी मित्रमंडळ आणि शांतता ह्यांची फारच आवश्यकता आहे. ह्या लोकांस जंगलें, पर्वत, नद्या आणि जेथें मुबलक जागा व स्वच्छ हवा आहे अशीं ठिकाणें ह्यांपासून प्रकृतीस बरें वाटतें. ह्या राशीचे लोकांस हिरा किंवा माणिक ह्या रत्नाचे धारणापासून फायदा होतो. ह्या लोकांस **रविवारचा** दिवस महत्वाचा असतो.

आर्य ग्रंथांत ह्या राशीचा रंग **पांडु** किंवा **धूम्र** सांगितला आहे परंतु यूरोपीय ग्रंथकार ह्या राशीचा रंग **नारंगी** मानतात.

## कन्या.

**कन्या** ही राशिचक्रांतील सहावी राशि आहे. आर्यग्रंथांत ह्या राशीचा आकार एका हातांत धान्याची लोंबी व दुसऱ्या हातांत अग्नि घेऊन नौकेंत बसलेल्या कन्येचा मानिलेला आहे. ही राशि स्त्री, द्विस्वभाव, पृथ्वीतत्त्वाची वंध्या व मानुष राशि आहे. ह्या राशीचा अंमल पोट व पोटांतील आंतड्यांवर आहे.

जन्मकाळीं ही राशि पूर्वकेंद्रावर उदय पावत असतां किंवा ह्या राशीमध्यें रवि किंवा चंद्र असतां स्वभाव आपमतलबी, क्षणोक्षणीं बदलणारा, लाजाळु, भित्रा, आळशी, चिकित्सक, शोधक व चौकस आढळतो, कन्या लग्नावर जन्मणारीं मनुष्यें शरीरानें फार उंच किंवा बळकट नसतात. ह्या राशीचे मनुष्यांमध्यें इतिहास किंवा चरित्रें वाचण्याची विशेष गोडी असते. कन्याराशि बुधाचें स्वगृह आणि उच्च गृह मानितात. ह्या राशीमध्यें गुरु निर्बली असतो. ह्या राशीमध्यें मंगळ बुद्धीमध्यें तीव्रता उत्पन्न करतो व गणित विषयाची आवड दर्शवितो. साधारणपणें शनि पृथ्वीराशींत बरा असतो ह्यामुळें ह्या राशींत चांगला मानण्यास हरकत नाहीं.

कन्या राशि बौद्धिक राशि असल्यामुळें मनाचे स्वास्थ्यावर शरीरप्रकृतीचें मान विशेष अवलंबून असतें. ह्या राशीचा अंमल पोट किंवा आंतडीं ह्यांवर असल्यामुळें बहुशः संग्रहणी, अमांश, बद्धकोष्ट, पोटशूळ वगैरे सारखे विकार ह्या राशीचे मनुष्यांस होतात. ह्या लोकांनीं औषधाचा फारच जपून उपयोग करावा व शांतपणानें वागावें कारण ह्यांच्या इतर व्यवसायांमुळें जितकें मन क्षुब्ध होतें तितका शरीरावर परिणाम झालेला आढळतो. ह्या लोकांनीं आहारासंबंधानें दक्षता राखावी व तो नित्य नियमित वेळीं घ्यावा. अन्न चांगलें शिजलेलें असून पुष्कळ चर्वण करून घ्यावें. दूध, मनुका वगैरे सारक पदार्थ खाल्यानें शरीरास फायदा होतो. ह्या लोकांनीं मोठ्या शहरांत रहाण्यापेक्षां खेडेगांवांत किंवा शहरांपासून दूर असलेल्या मोकळ्या प्रदेशांत रहावें.

**आर्यग्रंथांत** ह्या राशीचा रंग **चित्रित** सांगितलेला आहे. आंग्ल ज्योतिर्विद् ह्या राशीचा रंग **नारंगी** रंगामध्यें पिवळ्या रंगाची बरीच झांक असल्यासारखा किंवा जांभळा मानितात. ह्या लोकांस **इंद्रनील** किंवा **याशेफ** Jasper नांवाचे रत्नाचे धारणापासून फायदा होतो आणि **बुधवार** विशेष अनुकूल असतो.

## तूळ.

**तूळ** ही राशिचक्रांतील सातवी राशि आहे. ह्या राशीचा आकार हातांत तराजु घेतलेल्या पुरुषाचा आहे. ही राशि पुरुष, चर, वायु, प्रसव व मानुष–राशि मानतात. जन्मकाळीं तुला राशि पूर्वकेंद्रावर उदय पावत



असतां स्वभाव चंचल, थोडाबहुत गर्विष्ठ, अभिमानी, आनंदी मित्रांची आवड बाळगणारा, बुद्धिमत्ता उत्तम, विद्याव्यासंगापेक्षां कलांचा शोकी, गायन, वादन, पेन्टींग वगैरे ललित विषयांची आवड असते. ह्या लोकांच्या भावी आयुष्यक्रमांत मित्र किंवा भागीदार वगैरे लोकांमुळें पुष्कळ घडामोडी होतात. ह्या लग्नावर जन्मणारीं मनुष्यें मध्यम बांध्याचीं आणि सुंदर असतात. ह्या लग्नावर जन्म पावणाऱ्या स्त्रिया फारच देखण्या व मोहक असतात. पुरुषांमध्यें कधीं कधीं तोंडवळा लांबट असणारी मनुष्यें आढळतात.

तूळराशि **शुक्राचें** स्वगृह मानितात. **शनि** ह्या राशींत उच्च असतो. **रवि** ह्या राशीमध्यें आपल्या नीचांत असतो म्हणून तुळा राशींत **रवि** असतां जन्म पावणारीं मनुष्यें गर्विष्ठ आत्मस्तुतिप्रिय आणि बाहेरून चांगलेपणा दर्शविणारीं असतात. तूळ राशींतील ग्रह विशेषतः सप्तमस्थानसंबंधाच्या अनेक गोष्टी दर्शवितात.

ह्या राशीचा अंमल मूत्राशय व बस्ति ह्यांवर आहे. ह्यामुळें ह्या राशींत पापग्रह असतां मूत्राशयाचे विकार, मधुमेह, सर्व प्रकारचे मेहविकार, ब्राईटस डिसीझ वगैरे होतात. ह्या लोकांनीं आहारविहारांत अतिक्रमण केलें असतां विशेष हानीकारक आहे. ह्या राशीचे अंगीं त्वचेसंबंधी रोग उत्पन्न करण्याचे धर्म असल्यामुळें सर्व प्रकारचीं उटणीं, सुवासिक तेलें व अत्तरें ह्यांचा फार उपयोग केल्यामुळें त्वचारोग ह्या लोकांस लवकर होतात. तूळ राशीचे लोकांनीं पिण्याच्या पाण्यासंबंधानें शक्य तेवढी खबरदारी घ्यावी. ह्या लोकांनीं पचनास हलका असा आहार घ्यावा. ज्यांत विशेष साखर व पिष्टमय पदार्थ आहेत अशा पदार्थांचें सेवन टाळावें. ह्या लोकांनीं मोठ्या उद्योगधंद्याचे शहरांत रहावें. **माणिक** किंवा **हिरा** ह्या रत्नाचें धारण करावें. ह्या लोकांस **शुक्रवार** विशेष चांगला जातो. ह्या राशीचा रंग **आर्यग्रंथांत कृष्ण** सांगितलेला आहे परंतु **पाश्चिमात्य** ज्योतिर्विद् ह्या राशीचा रंग **हिरवा**, **गहिरा**, **जांभळा** किंवा **किरमिजी** मानितात.

## वृश्चिक.

वृश्चिक ही राशिचक्रांतील आठवी राशि आहे. ह्या राशीचा आकार विंचवासारखा असल्याचें आर्यग्रंथांत सांगितलें आहे. कांहीं पाश्चिमात्य ग्रंथांत ह्या राशीचा आकार सर्पासारखा किंवा गरुड पक्षासारखा आहे असें आढळतें परंतु सर्वसाधारणपणें हल्लीं ह्या राशीचा आकार विंचवासारखा मानतात. वृश्चिक ही कीटक, आर्द्र, स्थिर, जल, बहुप्रसव व स्त्री राशि आहे. शरीरांतील गुह्येंद्रियें, बस्ति व मूत्राशय ह्यांवर या राशीचा अंमल आहे.

वृश्चिक लग्नावर जन्म पावणारीं मनुष्यें किंवा ज्यांच्या जन्मकाळीं रवि किंवा चंद्र वृश्चिक राशींत आहेत तीं मनुष्यें स्वभावानें रागीट, खुनशी, कपटी, धाडसी, आत्मविश्वासी, काटक, निश्चयी व हेकट असतात. ह्या लग्नावर जन्मणाऱ्या कांहीं लोकांत गूढ विद्येची गोडी आढळते. वृश्चिक लग्नावर जन्म पावणाऱ्या लोकांस वैद्यकी, डॉक्टरकी, औषधाचा क्रयविक्रय व रसायनशास्त्र वगैरे विषयांची आवड असते.

वृश्चिक राशि मंगळाचें स्वगृह मानितात. ह्या राशीमध्यें हर्शल बलवान् असतो असें कित्येकांचें मत आहे. चंद्र ह्या राशीमध्यें आपल्या नीच क्षेत्रांत असतो. ह्या राशींत बुध शुभग्रहाबरोबर शुभ दृष्टियोग करीत असून कुंडलीमध्यें शुभस्थानामध्यें असतां रसायन शास्त्र chemistry किंवा शस्त्रक्रिया किंवा डाक्टरीमध्यें चांगलें प्राविण्य दर्शवितो. गुरु ह्या राशीमध्यें साधारण चांगलीं फलें देतो. शनि व शुक्र ह्या राशींत निर्बली असतात.

वृश्चिक राशीचा अंमल विशेषतः शरिरांतील मलोत्सर्गक इंद्रियांवर असल्यामुळें त्याविषयीं व हृदयसंबंधी व कंठसंबंधी विकार उत्पन्न होतात. ह्या राशीचे मनुष्यांचा मुख्य दुर्गुण म्हटला म्हणजे प्रत्येक गोष्टींत अतिरेक हा होय व त्याचकरतां वृश्चिक लग्नावर जन्मणाऱ्या मनुष्यांनीं आहारविहार व स्त्रीसेवन ह्यांमध्यें अति नियमित रहावें. राशिचक्रांतील सर्व राशीपेक्षां वृश्चिक राशीचे लोकांस सांधीचे रोगापासून फार लवकर त्रास किंवा आजार होतो. ह्या



लोकांनीं अंमली पदार्थांपासून दूर रहावें. व ज्या पदार्थांत वसा जास्त उत्पन्न करण्याचे धर्म आहेत असे पदार्थांचे सेवन करूं नये. ज्या योगानें रक्त पुष्कळ वाढेल असे पदार्थ नित्य आहारांत वापरावे. खुली व शुद्ध हवा, पुष्कळ झोंप, विश्रांति व पिण्याकरितां शुद्ध पाणी यांच्या योगानें या लोकांची प्रकृति उत्तम राहते. ह्या लोकांनीं जलाशयाजवळ व शहराचे मध्य वस्तींत रहावें. ह्या लोकांस पुष्कराग नांवाचे रत्नाच्या धारणापासून फायदा वाटतो. व ह्या लोकांस मंगळवार शुभ फलदायक असतो. आर्य ग्रंथांत ह्या राशीचा रंग **सोनेरी** सांगितला आहे परंतु युरोपीय ज्योतिर्विद् ह्या राशीचा रंग **तांबडा** मानतात. मेष राशीचा सुद्धां रंग तांबडा सांगितलेला आहे परंतु वृश्चिक राशीचे तांबडे रंगांत रक्तता विशेष असून रंग जरा काळसरपणावर जातो.

## धनु.

धनु ही राशीचक्रांतील नववी राशि असून ह्या राशीचा आकार हातांत धनुष्य व खालीं घोड्याचें शरीर असलेल्या पुरुषाचा मानलेला आहे. ही पुरुष, द्विस्वभाव, अग्नि व साधारण प्रसव राशि आहे. ह्या राशीचा पूर्वार्ध मानुष्यराशीचा मानतात व उत्तरार्ध पशुराशीचा मानतात. ही राशि शरिरातील नाडीचक्र ( Arterial System ) किंवा धमनिचक्र, जंघा व मांड्या दर्शविते. जन्मकाळीं ही राशि पूर्व केंद्रावर उदित असतां किंवा ह्या राशींत रवि चंद्र असतां स्वभाव उदार, सुस्वभावी, आनंदी, उतावळा, धाडसी, शूर, निर्भीड, स्पष्ट बोलणारा असतो. ह्या लग्नावर जन्मपावणारीं मनुष्यें हाडापेरानें चांगलीं मजबूत व उंच बांध्याचीं, दुसऱ्यांवर सहज छाप बसवणारीं असतात. ह्या राशीचे लोकांस खेळांची त्यांत विशेषतः मर्दानी खेळ—घोड्यावर बसणें, क्रिकेट खेळणें, कसरत, कुस्त्या ह्यांची विशेष आवड दृष्टोत्पत्तीस येते. ह्या लोकांत वेदांत, धार्मिक विषय कायदे, ज्योतिष, सामुद्रिक, वगैरे विषयांची आवड आढळते. ह्या राशीचे कांहीं लोकांत भांडखोरपणा, उद्धटपणा, फाजील स्वतंत्रता, वगैरे दुर्गुण आढळतात.

ही राशि गुरूचें स्वगृह मानतात. ह्या राशींत **रवि** बलवान असतो. **चंद्र** साधारणपणें ह्या राशींत मित्रगृहीं असल्यामुळें बलवान मानण्यास हरकत नाहीं. शनि ह्या राशीमध्यें इतका बलवान नसतो. **मंगळ** हा अग्निधर्माचा ग्रह असून ह्या अग्निराशींत असतां अपघात वगैरेसंबंधीं विशेष अनिष्ट असतो.

ह्या राशीचा संबंध नाडीचक्र किंवा धमनीचक्र, मांड्या, जानु ह्यांबरोबर असल्याकारणानें ह्या लोकांस व्यायामापासून, घोड्यावर बसल्यानें, किंवा सर्व प्रकारचे खेळापासून फायदा होतो. ह्या राशीचे लोकांचे अंगीं एकदम व अविश्रांत श्रम करण्याची मानसिक प्रवृत्ति असल्याकारणानें ह्या लोकांनीं सर्व कृत्यें शांत व धिमेपणानें करावी. फाजील श्रम किंवा मेहनत करूं नये. ह्या लोकांचे प्रकृतीवर औषधापेक्षां चालण्याचे व्यायामापासून पुष्कळ फायदा होतो. त्याचप्रमाणें धार्मिक विषयांसंबंधानें किंवा अध्यात्मविद्येच्या वाङ्मयाचे वाचनापासून मनास शांतता व आनंद होतो. ह्या लोकांनीं आपले शरीरांतील रक्त जितकें शुद्ध राखतां येईल तेवढें राखण्याचा प्रयत्न करावा. अपघात, कापणें जखमा होणें, लागणें, जनावरानें विशेषत: घोड्यानें लाथ मारणें ह्यांपासून शक्य तेवढी खबरदारी घ्यावी. ह्या लोकांचा आहार रक्तास व धमन्यास पोषक असा असावा. ह्या लोकांनीं मद्य वगैरे अमली पदार्थांचें सेवन करूं नये. संध्याकाळचे जेवणानंतर थोडी शतपावली किंवा चालण्याचा व्यायाम करावा व हें जेवण निजण्यापूर्वी बरेंच अगोदर घ्यावें. ह्या लोकांस डोंगराळ मुलूख व खुल्या जागेंत राहिल्यानें आराम वाटतो. ह्या लोकांसही श्वसनक्रियेच्या व्यायामापासून पुष्कळ फायदा होतो. ह्या लोकांस **माणिक** नांवाचे रत्नाचे धारणापासून फायदा होतो. ह्या लोकांस **गुरुवार** विशेष चांगला जातो. ह्या राशीचा रंग आर्य ग्रंथांत **पिंगट** मानला आहे. व यूरोपीय ज्योतिर्विद ह्या राशीचा रंग **फिकट पिंवळा** किंवा **साधारण निळा** रंग मानतात.



# जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभाववर्णन.

## सिंहसंक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्री पुरुषांचें स्वभाववर्णन.

सिंह राशि ही राशिचक्रांतील पांचवी, अग्नितत्वाची, स्थिर स्वभावाची, वंध्या आणि पशुराशि आहे. प्रत्येक वर्षी सुमारें जुलैच्या २२ व्या तारखेस रवि या राशीमध्यें प्रवेश करतो आणि २१ आगष्ट पर्यंत या राशीमध्यें असतो. रवीचें भ्रमण या बादशाही राशीमध्यें होत असतां ज्यांचा जन्म होतो ते लोक उदार स्वभावाचे, महत्वाकांक्षी, स्थिर बुद्धीचे, स्वातंत्र्यप्रिय, निष्कपटी, दिलदार व आत्मविश्वासी असतात. आपल्या आचरणानें अगर भाषणानें लोकांवर छाप कशी बसवावी हें या लोकांस उत्तम अवगत असतें. हे लोक कोणत्याहि परिस्थितींत न डगमगणारे, नीतिदृष्ट्या शुद्ध आचरणाचे आणि सरळ मार्गाचें अवलंबन करणारे असतात. दुसऱ्यांच्या हाताखालीं काम करणें या लोकांस अतिशय दुःसह होतें. लोकांचें आपणाकडे पुढारीपण असावें असें सिंहस्थ रवीच्या मनुष्यांस फार वाटतें व लोकांचे पुढारी होण्यास हे निसर्गत:च लायक असतात. ह्या लोकांची महत्वाकांक्षा फारच उच्च दर्जाची असते. हे लोक स्वत: जसे विश्वासु असतात तसेच ते दुसऱ्यावर फार विश्वास टाकतात. ह्यांचा स्वभाव फारच आशावादी असतो. कितीहि प्रतिकूळ परिस्थिति आली तरी ते हताश होत नाहींत. सिंहस्थ रवीचे लोक आडमार्गाचें कधींहि अवलंबन करीत नाहींत. आपल्या शत्रूबरोबर सुद्धां त्यांचें आचरण सरळ असतें. सिंहराशीमध्यें रवि असतां जो धीरोदात्तपणा असतो तसा दुसऱ्या कोणत्याहि राशींत नसतो. सिंहेमध्यें रवि असणारीं दोन मनुष्यें क्वचितच एकत्र काम करताना आढळतात. सिंहस्थ रवीचे लोक स्वतःच्या परिश्रमानें चांगल्या पदास पोंचतात. **सरळ व शुद्ध मार्गाचें अवलंबन करून गंभीरपणानें आपलें ध्येय प्राप्त करून घेणें हा सिंहस्थ रवीच्या मनुष्यांचा नैसर्गिक स्वभाव आहे.**

सिंहस्थ रवीच्या मनुष्यांची शरीरप्रकृति अतिशय बळकट असते. शरीरामध्यें जीवनशक्ती फारच उत्तम असते त्यामुळें रोगाचा प्रादुर्भाव विशेष

होत नाहीं. ते फार काळपर्यंत रोगानें खितपत रहात नाहींत. हृदयविकार व क्वचित् प्रसंगीं संधिवात होण्याचा ह्यांस फार संभव असतो. ह्या लोकांमध्यें व्यवस्थापक, सैन्यांतील अधिकारी, डाक्टर, संस्थांचे उत्पादक व सर्वसाधारण अधिकारावर असलेले लोक आढळतात. व्यापारामध्यें या लोकांचा फारसा उदय होत नाहीं.

## रविचंद्राच्या राशिपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाववर्णन.

**सिंहेंत रवि व मेषेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेल्या लोकांमध्यें मानसिक व बौद्धिक प्रगल्भता विशेष आढळून येते. ह्या लोकांस व्यवहार व तत्वज्ञान याची पुरी ओळख असते व प्रेरणाशक्ति विशेष जागृत असते. हा योग सांपत्तिक बाबतींत सुद्धां महत्वाचा आहे. **ह्या लोकांची विद्यादानापासून उन्नति होते.**

**सिंहेंत रवि व वृषभेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारीं मनुष्यें हट्टी, दुराग्रही व गर्विष्ठ असतात. आपलें कार्य मोठया चिकाटीनें व श्रमसातत्यानें पुरें करण्यांत यांचा हातखंडा असतो. ह्या लोकांची इच्छाशक्ति फारच प्रबल असते. कधीं कधीं या लोकांमध्यें सटयाच्या धंद्याची आवड असलेली आढळते. **ह्या लोकांचा सरकारी नोकरींत उदय होण्याचा संभव आहे.**

**सिंहेंत रवि व मिथुनेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक तरतरीत बुद्धीचे असतात. हा योग लेखनव्यवसायास उत्तम आहे. हे लोक **राजकारणांत पडल्यास त्यांना यश येण्याचा पुष्कळ संभव आहे.**

**सिंहेंत रवि व कर्केंत चंद्रः**—या योगावर जन्मणारीं मनुष्यें फिरण्याचीं शोकी असतात. हा योग चांगल्या स्थानांत होत असल्यास सांपत्तिक स्थिति उत्तम असते. आळसानें व चैनीनें आयुष्य घालविण्याची ह्या लोकांची इच्छा असते. **वैद्यक किंवा पाण्याशीं संबंध असलेल्या धंद्यांत यश येण्याचा संभव आहे.**



# प्रसिद्ध पुरुषांच्या कुंडल्यांचा संग्रह.

## नंबर ९ न्यायमूर्ति काशिनाथ त्रिंबक तेलंग.




महाराष्ट्रामध्यें सरस्वतीदेवीच्या निस्सीम भक्तमालिकेंतील **कै. न्यायमूर्ति काशिनाथपंत तेलंग** हें एक अद्वितीय रत्न होतें. **न्या. तेलंग** आपल्या समकालीन विद्वानांमध्यें अग्रेसर असून आपल्या अंगच्या सौजन्यादि गुणांमुळें सर्वांस अत्यंत प्रिय झाले होते. **कै. तेलंग** यांचा सरळ व साधा स्वभाव, त्यांची लोकहिताबद्दल कळकळ आणि त्यांच्या अंगीं असलेली कार्यक्षमता इत्यादि गुणांमुळें त्यांचें चरित्र चिरस्मरणीय झालें आहे. ज्योतिष विद्यार्थ्यांस त्यांच्या जन्मकुंडलीवरून अनेक गोष्टींचा बोध होण्यासारखा आहे हें जाणून त्यांच्या कुंडलीचा आज विचार करण्याचें ठरविलें आहे.

**कै. न्यायमूर्ति तेलंग** यांचा जन्मकालीं पूर्वक्षितिजावर **मकर** राशीचा २१ वा अंश उदय पावत असून लग्नाधिपति **शनि** मेषराशीमध्यें तूळ नवांशांत तृतीय स्थानीं आहे. लग्नावर नवमस्थ गुरूची शुभदृष्टि आहे परंतु लग्नेश हीनबली असून उदित अंशाबरोबर केंद्रयोग करीत आहे. रवि नेपच्यून बरोबर प्रतियोग करीत असून अष्टमस्थानामध्यें आहे. आणि लग्न बळकट राशीचें नाहीं त्यामुळें शरीरप्रकृति बळकट नव्हती. कुंडलीमध्यें चंद्र बलवान् असून लग्नेश शनि आणि शुक्र या दोन ग्रहांबरोबर शुभदृष्टि योग करीत आहे आणि भाग्यभुवनांतील गुरु लग्नावर पंचम दृष्टीनें पहात आहे. एवढाच योग आयुष्यवर्धक आहे.

**मकर** या चर राशीचें लग्न उदित असून रवि व चंद्र अनुक्रमें कन्या व मिथुन राशींत आहेत. **मकर** राशीप्रमाणें **न्या. तेलंग** नेहमीं आपल्या कार्यांत

निमग्न असत. श्रमसातत्य व उच्च महत्वाकांक्षा हे गुण त्यांच्यामध्यें प्रमुखत्वानें होते. कन्या राशीमध्यें रवि असल्यामुळें सारासारविचार, रीतसरपणा आणि दूरदर्शित्व हे गुण त्यांच्या प्रत्येक कार्यांत दिसून येत होते. कल्पनातरंगांत न गुरफटतां—विवेक व विचार यांसच ते विशेष प्राधान्य देत असत. रवि व चंद्र हे दोन्ही ग्रह बुधाच्या राशींत असल्यामुळें बुद्धितत्व विशेष जागृत होतें. या योगास कुंडलीमध्यें झालेल्या दुसऱ्या बुद्धियोगामुळें फारच महत्व

सा. ल.




आलें आहे. दुसरे योग पहाः—

( १ ) लग्नेश शनि उच्च नवमांशांत असून तृतीय या बौद्धिक स्थानांत आहे.

( २ ) पंचम स्थानांत शास्त्रीय राशीमध्यें चंद्र असून नवमेश शुक्राबरोबर त्रिकोण करीत आहे.

( ३ ) पंचमेश बुध शास्त्रीय राशींत असून भाग्यभुवनांत तृतीयेश मंगळाबरोबर युक्त आहे.



( ४ ) नवम या बौद्धिक स्थानांत बुधगुरुची युति आहे आहे आणि

( ५ ) चार ग्रह शास्त्रीय राशींत असून सहा ग्रह बौद्धिक स्थानांत आहेत.

हे योग कै. तेलंगांच्या अप्रतिम बुद्धिमत्तेचे द्योतक आहेत. त्यांच्या तृतीय स्थानांत शनि असल्यामुळें त्यांचे विचार खोल असून त्यांमध्यें तात्विकपणा फार असे. त्यांचा पंचमेश बुध तुळा राशीमध्यें गुरु व मंगळाच्या युतींमध्यें आहे. हा योग विषय ग्रहण करण्याची शक्ति उत्तम दर्शवीत आहे. कै. तेलंग यांची धारणाशक्ति अत्यंत तीव्र होती हें त्यांच्या अगदीं लहानपणीच्या सुद्धां अभ्यासक्रमावरून दिसून आलें. ९ व्या वर्षीं ज्या वेळीं दिनवर्ष पद्धतीनें चलित लग्न आणि मूळ गुरु यांचा त्रिकोणयोग चालला होता आणि पंचमांतून गुरूचें भ्रमण सुरू होतें त्या वेळेस त्यांच्या इंग्रजी शिक्षणास आरंभ झाला. १४व्या वर्षीं चलित लग्न व मूळ बुध यांचा त्रिकोणयोग चालू होता आणि चलित बुध मूळ चंद्राबरोबर त्रिकोणयोग करीत होता त्या वेळेस मॅट्रिक्युलेशन पास होऊन कॉलेजमध्यें प्रवेश केला. सतराव्या वर्षापासून चलित रवि मूळ गुरुबरोबर समक्रांतियोग करीत होता. हे दोन्ही योग २३व्या वर्षापर्यंत चालू होते. दिनवर्ष पद्धतीप्रमाणें हे योग चालले असतां कै. तेलंग १७व्या वर्षीं बी. ए. १९व्या वर्षीं एम. ए. व २०व्या वर्षीं एल्. एल्. बी. या परीक्षांमध्यें बहुमानानें उत्तीर्ण झाले. बावीसाव्या वर्षीं चलित रवि मूळ गुरुबरोबर युतियोग करीत होता. ह्या बलवत्तर योगावर कै. तेलंग ॲडव्होकेटची परीक्षा उत्तीर्ण झाले. मूळ कुंडलीमध्यें झालेले बलवत्तर बुद्धियोग व विद्यार्जन काळीं चाललेले शुभ व बलवान् चलित योग यांच्या जोरावर कै. तेलंग हे महत्वाच्या परीक्षेंत यशस्वी झाले. कै. तेलंगांसारखे लहान वयांत पुष्कळ विद्या संपादन करणारे लोक अत्यंत विरळा सांपडतात आणि ज्योतिषशास्त्रदृष्ट्या याचें कारण काय असावें हें प्रस्तुत कुंडलीचा विचार करतां वाचकांस सहज कळून येईल.

विद्याभ्यास पुरा झाल्यानंतर कै. तेलंग बॅरिस्टरीचा धंदा करूं लागले. तृतीय स्थानांतील उच्च नवमांशांत असणारा शनि व नवमांतील शास्त्रीय

राशीचा पंचमेश बुध हा योग कायद्यामध्यें प्राविण्य दर्शवीत आहे. वाक् ( धन ) स्थानावर कुंभ ही शास्त्रीय राशि, शास्त्रीय राशीमध्यें चार ग्रह आणि विशेषतः तूळ राशीमध्यें गुरूनें युक्त असा नवमांत बुध असल्यामुळें वकिलीच्या धंद्यास अवश्य लागणारें वक्तृत्व त्यांच्या ठिकाणीं उत्तम प्रकारचें होतें. त्यांचें कायद्यामध्यें असलेलें प्राविण्य व उत्तम वक्तृत्व यांमुळें ते फारच थोड्या काळांत उत्तम बॅरिस्टर म्हणून प्रसिद्धीस आले. पंधरा सोळा वर्षें बॅरिस्टरीचा धंदा करून त्यांनीं हजारों रुपये मिळविले. त्यांच्या कुंडलीमध्यें झालेला धनयोग तर अपूर्व आहे.

( १ ) भाग्यस्थानामध्यें पंचमेश बुध आणि धनेश—लाभेश गुरु यांची युति आहे. "सौम्यः सुरगुरुसहितः शास्त्रज्ञं पंडितं धनसमृद्धम् । प्रियवादिनं कलाज्ञं प्रभविष्णुमहत्तरं भाग्ये" ॥ (सारावलि).

( २ ) दशमेश मंगळ पूर्वोक्त बुध—गुरु बरोबर युक्त आहे "तेजस्विनं विशोकं विद्वांसं वाक्स्थिरं विशिष्टं वा । ज्ञबुधजीवा नवमे कुर्वंतिच मंडलाधिपतिम् ॥ ( सारावलि ).

( ३ ) धन, तृतीय, चतुर्थ, पंचम, दशम, लाभ आणि भाग्य या अति महत्वाच्या ७ स्थानांचे अधिपति भाग्यभुवनामध्यें आहेत. सामान्यतः भाग्यस्थानामध्यें बुध, गुरु व शुक्र असणें हा उत्तम प्रतीचा धनयोग आहे. असो.

विद्येच्या जोरावर **कै. तेलंगांनीं** द्रव्यार्जन केलें परंतु ते येथेंच थांबले नाहींत. त्यांचें विद्यार्जनाचें कार्य अव्याहत आमरण चालुं होतें. बुध ग्रह लेखनकलेचा कारक आहे. तृतीय व नवम या दोन्हीहि स्थानांचा संबंध लेखनकलेशीं आहे. कै. तेलंगांच्या शास्त्रीय राशीचा पंचमेश बुध नवमांत गुरूनें व तृतीयेश मंगळानें युक्त आहे म्हणून ते लेखनव्यवसायाकडे वळले. लेखन व्यवसायाचा द्योतक योग तूळ राशींत झाला असल्याकारणानें त्यांच्या लेखांत समतोलपणा विशेष होता. प्रतिपक्षाचें खंडन करतांना वादविवादाच्या भरांत सुद्धां चुकूनहि वावगा शब्द त्यांच्या लेखणींतून आला नाहीं व त्यांनीं केव्हांहि खोटें विधान केलें नाहीं. गुरु—बुधाच्या नवमांतील युतिमुळें



त्यांच्या लेखांत विद्वत्ता, भाषाप्रभुत्व व भारदस्तपणा आणि मंगळामुळें तेजस्विता व तीक्ष्णता हे गुण मूर्तिमंत होते. मिथुन व कन्या राशींत चंद्र व रवि असल्यामुळें ते स्वभावतःच टीकाकार होते. वेबर व लॉरिंसर या विद्वानांची चुकीची मतें खोडून काढतांना वर सांगितलेले गुण पूर्णपणें दिसून आले आहेत. तुळेंतील बुधामुळें ते आपलें म्हणणें इतकें मुद्देसूद व योग्य शब्दांत मांडीत कीं प्रतिपक्षास त्यांचें म्हणणें तेव्हांच कबूल करावें लागे. **न्या. तेलंगांचे** 'रामायण होमरपासून घेतलें आहे काय?' आणि भगवद्गीतेच्या भाषांतरास जोडलेली प्रस्तावना एवढेच ग्रंथ त्यांचें नांव अजरामर करण्यास समर्थ आहेत. **हें फळ नवमांतील बुध—गुरूचें आहे.** ग्रंथ लहान आहेत खरे परंतु ग्रंथांचा चांगलेपणा व चिरकालित्व त्यांच्या लांबीरुंदीच्या मोठेपणावर नसतो हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. बुध मंगळाच्या युतींत आहे त्यामुळें त्यांच्या लेखांत किंवा वक्तृत्वांत स्पष्टपणा व तीक्ष्णपणा फार असे. कायद्याच्या मर्यादेंत त्यांना किती कडक लिहितां येत होतें हें पहाणें असल्यास लिट्टनच्या कारकीर्दींतील प्रेस अक्टसंबंधाचे त्यांचे निबंध वाचावे.

**न्यायमूर्ति तेलंग** यांची अगाध विद्वत्ता, त्यांचें मनोहर लेखनचातुर्य व वक्तृत्व, त्यांची लोकहितावद्दल कळकळ आणि त्यांचें सौजन्य या अनेक गुणांमुळें ते सर्वांस अत्यंत प्रिय झाले होते. लोकांकडून व राजकर्त्यांकडून त्यांस सारखाच मान मिळत होता. मुंबईच्या विश्वविद्यालयानें त्यांस व्हाइस चॅन्सलर नेमिलें आणि सरकारानें त्यांस कायदे कौन्सिलचे मेंबर आणि हायकोर्टाचे जज्ज नेमिलें ह्या वरून **कै. तेलंगासंबंधानें** सर्वांनांहि किती आदर वाटत होता हें व्यक्त होतें.

आरंभींच म्हटल्याप्रमाणें **कै. तेलंगांच्या** कुंडलीमध्यें आयुष्यवर्धक योग फारच कमी होते. ४३ व्या वर्षीं दिनवर्ष पद्धतीप्रमाणें तुळेंतील रवि व मेषेंतील शनि यांचा प्रतियोग सुरू होता. रवि व शनि मूळ कुंडलीमध्यें अष्टमेश व लग्नेश आहेत. लग्नकुंडलीमध्यें हर्षल चतुर्थ स्थानामध्यें सायन कृत्तिका

या क्रूर नक्षत्रांत आहे. चलित मंगळ वृश्चिक राशीमध्यें आला होता व गोचरीचा हर्शल चलित मंगळावर भ्रमण करीत होता. अशा वेळीं कृत्तिका नक्षत्रांतील हर्शलनें व वृश्चिक राशींतील चलित मंगळानें द्योतक असा मूळव्याधीचा रोग त्यांस जडला. ह्या वेळीं वृश्चिक राशींत नुकताच हर्शल शिरून आपल्या मूळच्या स्थानाशीं प्रतियोग करीत होता. ह्या वेळेस चलित योग अत्यंत वाईट असतां गोचरीच्या शनि व हर्शलचीं भ्रमणें तर अत्यंत अनिष्ट होतीं. गोचरीचा शनि तूळ राशींतील मूळ मंगळावरून जाऊन चलित रवीच्या बरोबर युतियोग करण्यास जात होता. अशी ग्रहांची स्थिति असतां ४३वें वर्ष संपून ४४वें वर्ष अष्टमस्थानचें लागलें. ता. १ सप्टेंबर १८९३ रोजीं गोचरीचा मंगळ मूळ अष्टमस्थ रवीबरोबर युति करीत असून त्याच दिवशीं गोचरीचा रवि मूळच्या अष्टमस्थ रवीबरोबर व गोचरीच्या मंगळाबरोबर युक्त होता आणि गोचरीचा चंद्र चलित मंगळ व गोचरीचा हर्शल ह्या क्रूर ग्रहांबरोबर चतुर्थ या लय दर्शकस्थानांतून प्रतियोग करीत होता. येणेंप्रमाणें अष्टमस्थानचें वर्ष सुरू होतें, रविशनीचा प्रतियोग हा भयंकर योग चालला असतांना गोचरीच्या ग्रहानें त्याच्या अनिष्टपणांत आणखी भर टाकिली होती व ता. १ सपटेंबर रोजीं तर ग्रहस्थितीच्या अनिष्टपणाचा कळस झाला होता. ह्या दिवशीं कर्क लग्न उदय पावत असतां कै. तेलंग परलोकवासी झाले.

अवघ्या त्रेचाळीस वर्षांच्या अल्प आयुष्यामध्यें कै. तेलंगांनीं जी कामगिरी केली ती तर अपूर्व आहे. त्यांच्या नवमांत असलेल्या बलवान् ग्रहांमुळें त्यांच्या कामगिरीचा चांगलाच बोध होत आहे. त्यांच्या सारखा बुद्धिमान् व कर्तृत्ववान् पुरुषांच्या कुंडल्यांमध्यें आयुष्ययोग कमी असलेले पाहून फारच वाईट वाटतें. त्यांचें सोज्वल आचरण अनेक कारणांमुळें अनुकरणीय असून सुद्धां त्यांचें मराठी भाषेमध्यें एकही चरित्र नाहीं हें महाराष्ट्रीयांस लाजिरवाणें आहे. लोकांपुढें उत्तम चरित्रें ठेविण्याकरितां कांहीं लेखक यूरोपांतील कोनेकोपरे धुंडाळीत आहेत. त्यांचें लक्ष आपल्या जवळच्या देशबांधवांच्या चरित्राकडे जात नाहीं हे आश्चर्य नव्हे काय ? राम नारायण.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्दाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽवृत्ति वर्ष १ लें. | सप्टेंबर १९१५. | अंक ६ वा.

## ज्योतिःशास्त्राचे प्रगतीबद्दल ईशप्रार्थना.

( लेखक—प्रेषित. )

अन्यानि शास्त्राणि विनोदमात्रं
प्राप्तेषु वा तेषु न तैश्च किंचित् ॥
चिकित्सितं ज्योतिषमंत्रवादाः
पदे पदे प्रत्ययमावहन्ति ॥ १ ॥

वरील श्लोकाचा भावार्थ वाचकांच्या सहज लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. ज्योतिःशास्त्र व त्याचे साह्यानें वर्तविलेलें भविष्य हें मनुष्यास जितकें महत्वाचें आहे तितकें इतर कोणतेंही नाहीं असा या सूत्राचा मथितार्थ आहे.

या भारतवर्षांतील पूर्वींची स्थिति पाहतां वाचकांस असें आढळून येईल कीं येथील प्रत्येक कार्य व आचार या शास्त्राच्या सल्ल्याशिवाय होत नसे व याचीच साक्ष मुहूर्त ग्रंथ दर्शवितात. काष्ठसंग्रहापासून तो राजदर्शनापर्यंतचीं सर्व लहान मोठीं कृत्यें करण्यासही या शास्त्रांत नियम सांगितलेले

आहेत. व हेच नियम जास्त स्पष्ट व विचारपूर्वक मनन केल्यास त्यांतील तत्वेंही समजण्यास कठीण जात नाहींत व अशाच शास्त्रीय सल्यानें कार्यें जोंपर्यंत होत होतीं तोंपर्यंत भारतवर्ष म्हणजे एक आनंदपुरी म्हणन जगांत होतें. त्यांतील ग्रंथांचें अवलोकन करून भारतेतर वर्षांत वास्तव्य करणाऱ्या विद्वानांनीं भारतवर्षांतील शास्त्रें व कला यांत प्रावीण्य संपादिलें आहे हें कोणासही आज नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं.

अशा या उपयुक्त शास्त्राची अशी हीन दशा कां रहावी असा एक प्रश्न आपल्यापुढें वारंवार येऊन पडतो. व त्यास उत्तर येवढेंच कीं सूक्ष्माला फाटा देऊन सर्वच स्थूलांत चालले ! व स्थूल स्थूल करीत जातां हें निव्वळ स्थूलरूपच बनून राहिलें. गणित स्थूल, जन्मकाल स्थूल, जन्मस्थलीय अक्षांश व रेखांश यांची बहुतेक फारकत ! ! इतक्या सर्व साधनांनीं काढलेलें फल काकतालीय न्यायानें स्थूलत्वानेंच बरोबर येणार ! ! ! अशा स्थूलत्वानें शास्त्र मागें पडलें आहे.

नवमांशादि कुंडल्या कशा मांडाव्या हें सर्व ठिकाणीं आढळतें, पण नवमांशादि कुंडल्यांतील स्थानांवरून फलें कशीं पहावीं हें मात्र केवळ तारतम्यानें जाणण्याची जबाबदारी ज्योतिष्यावर येऊन पडते. इत्यादि सर्व कारणांनीं फलें बरोबर व सूक्ष्म वर्तविण्याचें ज्ञान लुप्त झालें व ग्रंथही भारतवर्षांतून नाहींसे झाले !

दहाव्या शतकापासून हिंदुस्थानावर परचक्रें येऊन तीं अठराव्या शतकापर्यंत लोकांस त्रास देत होतीं. जीवित, धन व इष्टेट यांचेंच रक्षण करणें जड जात होतें तरीही कांहींसे प्रयत्न जयसिंहासारख्या भूपतींकडून व विद्वानांकडून झालेले दीक्षितकृत भारतीय ज्योतिःशास्त्राच्या इतिहासांत पहावयास सांपडतील. वेधयंत्रें घेऊन त्यांचे साहाय्यानें गणितानें स्पष्ट केलेला ग्रह बरोबर आहे कीं नाहीं हें पाहण्याचाही जयसिंहानें आटोकाट प्रयत्न केला व त्याची साक्ष आज मित्तीस उज्जनीसारख्या स्थळीं असलेल्या वेधशाला देत आहेत.

दृग्गणितशुद्ध ग्रहांचीच जरूर असून सांप्रत दृग्गणितशुद्ध ग्रहांची अवहेलना करण्यांत येत आहे. दृग्गणितशुद्ध ग्रहस्थितीच फलें वर्तविण्यास उपयुक्त आहे हेंही सर्वांस माहित आहे.



**' यात्रा विवाहोत्सव जातकादौ ।**
**खेटैःस्फुटैरेव फलं स्फुटत्वम् ॥**
**स्यात्प्रोच्यते तेन नभश्चराणां**
**स्फुटक्रिया दृग्गणितैक्य कृधे ॥ १ ॥**

यात्रा, विवाहादि मंगल प्रसंग, जन्मफल इत्यादिकांस स्पष्ट ग्रहस्थितीची अवश्यकता असते व ग्रहांची स्पष्टस्थिति दृग्गणितावरच असते असें असून सांप्रत दृग्गणितानें स्पष्ट होणारी स्थिति विचारांत न घेतां अयनांशरहित स्थिति विचारांत घेण्याची रीति प्रचारांत आहे. वसिष्ठ म्हणतात **' अयनांश संस्कृतो भानुर्गोलेचरति सर्वदा '**। सूर्य ( त्याचप्रमाणें इतर ग्रह ) जर खगोलांत अयनांश संस्कृतच असतो तर कुंडलींत तो अयनांशरहित कां मांडावयाचा ? व अशा चुकीच्या स्थितीवरून फलें कां पाहावयाचीं ? हा प्रश्न राहतोच. आज अयनांशसहित ग्रह फलितास विचारांत घेणारा व अयनांशरहित ग्रह फलितास विचारांत घेणारा असे दोन पक्ष प्रचारांत आहेत. अयनांशसहित ग्रह फलितास विचारांत घेणाऱ्या पक्षास **सायनपक्ष** व अयनांशरहित ग्रह फलितास विचारांत घेणाऱ्या पक्षास **निरयनपक्ष** असें म्हणतात. या सायन निरयन वादास आरंभ कै. रा. ब. केरोपंत छत्रे यांनीं नवीन सुरु केलेल्या पंचांगामुळें झाला व त्यांत छत्रे यांनीं सायनपक्ष खरा आहे येवढी कबुली दिली. त्या वेळीं बहुतेक वाद धर्मशास्त्राच्या मुखानें झाला. पुढें कांहीं दिवस दीक्षितांनीं सायन पंचांगही काढलें होतें. नंतर पूर्वीचे **ज्योतिर्मालाकर्ते** कै. **जीवनराव चिटणीस** व **कुंडलीविज्ञानकार श्री. विष्णु गोपाळ नवाथे** यांनीं अयनांशसहित ग्रहांवरून फलें कशीं जमतात हें दाखविलें आहे. धर्मशास्त्र व फल यांच्या कसोटीस याप्रमाणें सायनपक्ष उतरत चालल्याकारणानें १९०९ सालीं पंचांगशोधन कमेटीनें ' सायन संक्रांति पंचांगकर्त्यांनीं आपापल्या पंचांगांत देत जाव्या ' असा ठराव केला. पण पुढें ती कमेटीही धूमकेतुवत् फिरून प्रकाशांत आली नाहीं ! ज्या वेळीं प्रकाशांत येईल तो सुदिनच समजला पाहिजे ! याप्रमाणें सायनपक्षास आजमितीस बराच जोर मिळत चालला आहे.

निरयन पक्षकारांनींही मासिकें चालवून जागृति करण्याचा प्रयत्न केला व स्थूलांतून सूक्ष्मांत जाणें बरें असें प्रत्ययास आल्यामुळें नक्षत्रचरणांवर कुंडली मांडण्याची सुधारणा करणें फलज्योतिषादर्शकर्ते ज्योतिर्विद घोलप यांस जरूर झालें. तीच सुधारणा अंशावर जाईल व अयनांशसहित ग्रहस्थिति विचारांत घेणेंही अवश्यक वाटेल असें मजला वाटलें होतें, पण त्यांस निर्घृण कालानें येथें ठेविलें नाहीं असो. कालाची ही इच्छा कोण बदलूं शकेल ?

दृग्गणित शुद्ध ग्रहस्थितीसाठीं सायनपक्षास परदेशस्थ विद्वानांवर फार अवलंबून रहावें लागतें. इतरांवर हवाला देण्याची जरूर काढून टाकणें हें सायनपक्षास कार्य करणें आहे व तें कार्य **हिंदुस्थानांत ग्रहांची स्थितिगति जाणण्यास अत्युपयोगी अशी वेधशाला** स्थापून तद्वारा अयनांशसहित ग्रह घेण्याची अवश्यकता कां आहे हें चक्षुर्वै सत्यं करून दाखविल्याशिवाय पुरें होणार नाहीं.

या प्रमाणें सुधारणा घडवून सायन पंचांगप्रवृत्ति सर्वत्र चालू करून ' श्रुतिस्मृतिपुराणोक्त फल मिळविण्यासाठीं शुद्ध व इष्ट कालीं लोकांकडून कर्में घडलीं पाहिजेत, तरच पुण्य कर्में फलद्रुप होऊन सुस्थिति प्राप्त होईल ' अशी जी सायनमानप्रवर्तक कै. **विसाजी रघुनाथ लेले** यांची आशा ती पूर्ण होणें जरूर आहे व हें कार्य करण्यास सायनपक्षानें आटोकाट प्रयत्न चालू ठेविला पाहिजे.

सांप्रत महाराष्ट्रांत ज्योतिषविषयक ज्ञानांची सर्वत्र चर्चा चालविणारें असें मासिक बरेंच दिवस नव्हतें, त्यामुळें ज्योतिर्वाचकांस जास्त शोध करण्यास कठीण जाई. तसें होऊं नये व शास्त्रीय प्रगति व्हावी या सद्धेतूनें **ज्योतिर्विद मंडळांतील** कांहीं मंडळीनें हें नूतन **' ज्योतिर्माला '** नामक मासिक काढण्यास सुरवात केली आहे. त्यांचा हा हेतु कृतीनें भारत वर्षास सौख्यकारक व फलप्रद होवो हीच कालासही अस्तित्व देणाऱ्या परमेश्वरापाशीं माझी प्रार्थना आहे.



# राशि-धर्म-निरूपण.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

## मकर.

मकर ही राशिचक्रांतील दहावी राशि आहे. ह्या राशीचा आकार आर्य ग्रंथांत मृगाचें तोंड असलेल्या मकराचा सांगितला आहे. यूरोपीय ग्रंथकार ह्या राशीचा आकार उंच कड्यावर चढत असलेल्या बोकडाचा मानितात. ही राशि स्त्री, चर, पृथ्वीतत्वाची व पशु किंवा जलचर राशि आहे. ही राशि साधारणपणें कमीच संतति देते. ह्या राशीचा अंमल शरीरांतील गुढघ्यावर, हाडें, व सांधे यांवर आहे. ह्या लग्नावर जन्मणारीं मनुष्यें मध्यम बांध्याचीं, सडसडित, मोठ्या नाकाचीं, पूर्ववयांत दुर्बल व अशक्त, हनुवटी लांब व बकऱ्यासारखी पुढें आलेली, मान उंटासारखी लांब, अरुंद छाती असलेलीं व दाढीला थोडे परंतु रांठ केस असणारीं अशीं असतात. मकर राशि लग्न केंद्रीं उदय पावत असतां किंवा ह्या राशीमध्यें **रवि** किंवा **चंद्र** असतां स्वभाव आत्मविश्वासी, महत्वाकांक्षी, दीर्घोद्योगी, काटकसरी, आपमतलबी, लोभी व लहरी असतो. मकर राशि ही राशिचक्रांतील दहावी राशि असल्यामुळें ह्या राशीमध्यें बलवान् ग्रहस्थिति असतां किंवा मकर लग्न उदय पावत असून इतर ग्रहस्थिति चांगली असतां पुष्कळ लोक साधारणपणें आपल्या उत्तरवयांत किंवा पस्तीशीनंतर विशेष पुढें किंवा नांवारूपास आलेले आढळतात. दशम स्थानानें द्योतक असणाऱ्या गोष्टी—मान, सन्मान, कीर्ति, अधिकार, राजदरबार ह्या संबंधानें हे लोक नित्य धडपड किंवा दीर्घ उद्योग करतात. ह्या लोकांचे अंगांत महत्वाकांक्षा व व्यवहारीपणा हे गुण फारच ठळकपणानें दिसून येतात.

मकर राशि **शनीचें** स्वगृह आहे व भूमिपुत्र **मंगळ** अधिकार, मान, सन्मान व महत्वाकांक्षा यांच्या द्योतक अशा मकर राशीमध्यें उच्च असतो. ह्या राशीमध्यें **गुरु** आपल्या नीचक्षेत्रीं असतो. **रवि** व **चंद्र** ह्या राशी-

मध्यें दुर्बळ असतात. किंवा ते आपल्या शत्रुक्षेत्रीं असतात. रवि किंवा चंद्र ह्या राशीमध्यें असून इतर ग्रहांबरोबर शुभ संबंधित असलेली बरीच मंडळी आपल्या देशांत नांवालौकिकास आलेली आढळतात. ही चर किंवा केंद्रराशि असल्यामुळें मनुष्यांमध्यें चर राशीचे धर्माप्रमाणें सदोदित कार्य करण्याची तत्परता किंवा धडपड दर्शविते. चर राशीचे मनुष्यांस नेहमीं एकाच स्थितींत राहण्यानें कधींच समाधान वाटत नाहीं.

मकर ही राशिचक्रांतील बरीच दुर्बळ राशि असून तिचा अंमल गुडघे, हाडें, सांधे व त्वचा ह्यांवर आहे. ह्या राशीच्या अंगीं औदासिन्य आणण्याचा नैसर्गिक धर्म असल्याकारणानें अस्वस्थता, निराशा, विषाद व असंतोष ह्यांपासून जितकें दूर राहतां येईल तितकें राहावें. ह्या राशीच्या अंगीं सरदीचे विकार व रक्ताभिरणासंबंधीं दोष उत्पन्न करण्याचे धर्म आहेत. ही राशि संधिवात, पादांगुष्ठवात, बद्धकोष्ठ व त्वचा रोग उत्पन्न करणारी आहे. ह्या लोकांनीं रक्ताभिसरण वाढविणारा किंवा अंगांत विशेष उष्णता उत्पन्न करणारा आहार घ्यावा. मकर राशीचे लोकांस शरीरप्रकृति उत्तम राहण्यास आनंदी व सुस्वभावी मित्रमंडळ, समाधानकारक गृहसौख्य व थोडा बहुत व्यायाम ह्यांची विशेष आवश्यकता आहे. ह्या लोकांनीं आपल्या त्वचेसंबंधानें विशेष दक्ष रहावें व उटणीं व अंगास लावण्याचे मसाले वगैरे वस्तूंचा जपून उपयोग करावा. ह्या लोकांस स्पर्शजन्य असणाऱ्या त्वचा रोगांपासून सहज पीडा होण्याचा विशेष संभव असतो. ह्या लोकांस शांत ठिकाणीं किंवा शहरापासून दूर राहिल्यानें आराम वाटतो. ह्या लोकांस काळसर रंगाच्या **लसण्या** नांवाच्या रत्नाच्या धारणापासून फायदा होतो. ह्या लोकांस **शनिवार** शुभ किंवा महत्वाचा असतो. ह्या राशीचा रंग आर्य ग्रंथांत **करडा** सांगितलेला आहे. परंतु यूरोपीय ज्योतिषी **हिरवा** किंवा **काळसर निळा** मानतात.



# पांच खुनी मनुष्यांच्या कुंडल्या.

रा. रा. ज्योतिर्मालाकर्ते यांस कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. 'मॉडर्न ॲस्ट्रॉलॉजी'च्या आगष्टच्या अंकांत मि. डब्ल्यू. बेकर या गृहस्थांनीं पांच महत्वाच्या जर्मन गुन्हेगारांच्या कुंडल्या प्रसिद्ध केल्या आहेत. त्यावरून मालेच्या वाचकांस फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या खुनी मनुष्यांच्या कुंडल्यांमध्यें काय ग्रहस्थिति असते व त्यांस शिक्षा होण्याच्या वेळीं कशी ग्रहस्थिति असते वगैरे बऱ्याच गोष्टी पहाण्यास मिळतील असें वाटल्यावरून आजरोजीं आपणाकडे प्रसिद्धीकरतां पाठवीत आहें त्यांस येत्या अंकीं स्थल मिळेल अशी आशा आहे.

## कुंडली पहिली.

स्पष्ट षड् भाव.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| वृषभ | मिथुन | कर्क | कर्क | सिंह | कन्या |
| १६-१८ | १४ | ३ | २०-२५ | १३ | १७ |

स्पष्ट ग्रह.

| रवि | चंद्र | बुध | शुक्र | मंगळ | गुरु | शनि. |
|---|---|---|---|---|---|---|
| वृषभ | तुळ | वृषभ | मीन | मेष | मिथुन | वृषभ |
| १-४० | २८-३३ | ८-१७ | २३-१५ | १-३ | २७-११ | १९४१ |

हर्शल कन्या १९-४१; नेप्च्यून वृषभ १७-५४.

खुनी मनुष्य. अरनेस्ट ट्रेन्क्लेअर, जन्म दुपारीं ५-३० वाजतां २२।४।१८८३. जन्मस्थल रेखांश १५ अंश पूर्व. अक्षांश ५१ अंश उत्तर.

दोन तीन वर्षांपूर्वीं ह्या मनुष्यानें भर दिवसा बर्लिन येथील एका गजबलेल्या पेठेंत एका जवाहिऱ्यास त्याच्या दुकानांत ठार केलें आणि मौल्यवान् वस्तु लांबविण्याच्या प्रयत्नांत असतां जवाहिऱ्याची मुलगी व बायको खुनाच्या जागेजवळ आली. खुनी मनुष्यानें त्या दोघांसही जवाहिऱ्याच्या पाठोपाठ यमसदनास पोंचविलें. त्यानंतर दुकानांत लुटालूट करून स्वारी

फरारी झाली. परंतु लवकरच त्यास पकडण्यांत आलें. तुरुंगांत असतां ही स्वारी शीघ्र नाश करणाऱ्या क्षयाची भावना होऊन चौकशी होण्यापूर्वींच मृत्यु पावली. सदरहु मनुष्याची अत्याचाराकडे प्रवृत्ति असण्याचें कारण व्ययस्थानांत मंगळ असून लग्नांतील उदित नेपच्यून बरोबर ४५ अंशाचा अशुभ दृष्टियोग करीत आहे. लग्नेश शुक्र व्ययस्थानांत असून मंगळाबरोबर युति करण्यास जात आहे. लग्नीं असलेले शनि, नेपच्यून व केतु व षष्ठस्थानांतील हर्शल व बुध यांचा १३५ अंशाचा अशुभ दृष्टियोग, हे त्यास झालेला रोग पूर्ण दर्शवित आहेत.

**कुंडली दुसरी.** ॲना कोकेरट्झ् ता. १७–४–१८७७ सकाळीं ६ वाजतां जन्मस्थल रे. १३–२५ पूर्व. अक्षांश ५२–१८ दक्षिण.

स्पष्ट षड् भाव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| वृषभ. | मिथुन | कर्क | कर्क | सिंह | कन्या |
| २४–१ | १८ | ६ | २३ | १६ | २२ |

स्पष्ट ग्रह.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रवि | चंद्र | बुध | शुक्र | मंगळ | गुरु |
| मेष | मिथुन | वृषभ | मेष | कुंभ | मकर |
| २७–१७ | १०–२३ | ८–५८ | २२–६ | ०–१ | ३–३७ |

शनि, मीन १६–६. हर्शल सिंह २०–२८ व नेपच्यून वृषभ ४–१२

ह्या बाईनें आपला नवरा झोंपेंत असतां त्याचा खून केला व खुनाचा मुद्दा नाहींसा करण्याकरितां शरीराच्या अवयवांचे तुकडे करून जाळून टाकिले. नवऱ्याच्या काळजाचा भाग या लावेनें तळून खाल्ला! कुंडलीमध्यें खालीं झालेले योग खुनी स्वभाव होण्यास कारणीभूत झालेले आहेत. मंगळ दशमांत असल्यामुळें सर्व ग्रहांत विशेष प्रबळ असून ( स्त्रियांचे कुंडलीमध्यें दशमांतील मंगळ अनिष्ट फलें दर्शवितो ) रवि, बुध, नेपच्यून या ग्रहांबरोबर केंद्रयोग करीत आहे. मंगळ व शनि ह्या दोघांमध्यें अर्ध केंद्रयोग किंवा ४५ अंशांचा दृष्टियोग होत आहे. ( अपूर्ण )



# जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभाववर्णन.

## सिंहसंक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**सिंहेंत रवि व सिंहेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक निश्चयी, धीराचे, थोडेसे गर्विष्ठ आणि स्वकार्यापासून कधींहि न ढळणारे असतात. पुष्कळ वेळां त्यांची प्रवृत्ति स्वार्थाकडे असते. हे लोक फारसे लोकांत मिसळत नाहींत. **स्वतंत्र उद्योग करण्यानें उदय होईल.**

**सिंहेंत रवि व कन्येंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक विवेकी, आत्मविश्वासी, प्रसंग पाहून वागणारे आणि चिकित्सक स्वभावाचे असतात. **या लोकांचा उदय व्यापार धंद्यापासून होण्याचा संभव आहे.**

**सिंहेंत रवि व तूळेंत चंद्रः**—ह्या योगावर जन्मणारे लोक सुस्वभावी, मनमिळाऊ, उद्योगी, बुद्धिमान व लोकांची कळकळ बाळगणारे असतात. यांचे विचार उच्च दर्जाचे असतात. **यांचा कला किंवा वाङ्मय यांच्या अध्ययनानें उदय होईल.**

**सिंहेंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक कठोर मनाचे, दुष्ट, हेकेखोर, गर्विष्ठ व उद्धट असतात. या योगामुळें सिंहेंतील रवीचे चांगले गुण प्रमुखत्वानें पहावयास मिळत नाहींत. **दूर देशांत सफरी केल्यानें अगर खनिज धातूंच्या व्यापारापासून उदय होण्याचा संभव आहे.**

**सिंहेंत रवि व धनेंत चंद्रः**—ह्या योगावर जन्मलेले लोक उदार, तात्विक विचार करणारे, विनोदी व आनंदी स्वभावाचें असतात. हा योग शुभ असून ह्या योगामुळें लोकोपयोगी सत्कर्में करण्याची प्रवृत्ति असते.

**सिंहेंत रवि व मकरेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक दृढोद्योगी,

सोशिक, लोकसेवा करणारे, संसारिक बाबतींत अतिशय लक्ष घालणारे व मनोवृत्ति ताब्यांत ठेवणारे असतात. **सेवावृत्तीपासून उदय होईल.**

**सिंहेंत रवि व कुंभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक उदार, परोपकारी, दृढ निश्चयाचे, विश्वासु व मोकळ्या अंतःकरणाचे असतात. ह्या लोकांस कधींकधीं गायनवादनाची गोडी असते. **सार्वजनिक कंपन्यांपासून उदय होण्याचा संभव आहे.**

**सिंहेंत रवि व मीनेंत चंद्रः**—ह्या योगावर जन्मलेल्या लोकांची ग्राहक शक्ति उत्तम असते. हे लोक उदार व दुसऱ्याकरितां झीज सोसणारे असतात.

## जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभाववर्णन.

### कन्यासंक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

**कन्या** ही राशिचक्रांतील षष्ठ, द्विस्वभाव, पृथ्वीतत्वाची व स्त्री राशि आहे. ह्या राशींत सूर्य दरवर्षीं २२ आगस्टच्या सुमारास प्रवेश करून २१ सप्टेंबर पर्यंत ह्या राशींत भ्रमण करीत असतो. हें कन्या राशींतलें रवीचें भ्रमण चालूं असतां ज्यांचा जन्म होतो ते लोक सारासार विचार करणारे, विवेकी, रीतसर काम करणारे, उद्योगी, चौकस, बुद्धिमान्, काळजीपूर्वक काम करणारे, दूरदर्शी व शांत स्वभावाचे असतात. ह्यांची बुद्धि विशेष चौकस असून टीका करण्यांत हे लोक प्रवीण असतात. कल्पनातरंगांत वेळ न घालवतां वस्तुस्थिति काय आहे हें समजून घेऊन शक्य तितकें काम करून दाखवितात. ह्या लोकांची दृष्टि नेहमीं व्यापारी असते. ह्यांचा स्वभाव भित्रा व लाजाळू असतो. कन्या ही द्विस्वभाव राशि असल्यामुळें ह्या लोकांच्या स्वभावांत स्थैर्याचा अभाव असतो. कन्याराशीमध्यें असलेल्या रवीच्या मनुष्यांची लेखनवाचनाकडे प्रवृत्ति असते. हे लोक संसार कुशलतेनें करतात.



कन्याराशीमध्यें रवि असलेल्या लोकांची शरीरप्रकृति मध्यम बळकट असते. मनस्वास्थ्याच्या अभावामुळें यांची शरीरप्रकृति ठीक रहात नाहीं. या लोकांनीं आहारविहारांत विशेष नियमितपणा ठेविला पाहिजे. ह्या लोकांस संग्रहणी, अमांश किंवा पोटशूळ वगैरे विकार होतात. कन्याराशीमध्यें रवि असलेल्या लोकांमध्यें दलाल, खरेदी विक्री करणारे, औषधांचा व्यापार करणारे, फोटोग्राफर्स, लेखक, टीकाकार व प्रवासी लोक आढळतात. विशेषेंकरून व्यापारामध्यें हे लोक चांगले पुढें येतात.

## रविचंद्रांच्या राशीपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाववर्णन.

**कन्येंत रवि व मेषेंत चंद्रः**—ह्या योगावर जन्मणारे लोक महत्वाकांक्षी, टीकाकार, दुसऱ्याचे दोष काढण्यांत प्रवीण व चंचल स्वभावाचे असतात. **व्यापारामध्यें यश येण्याचा संभव आहे.**

**कन्येंत रवि व वृषभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक आनंदी, सुस्वभावी, चारचौघांत मिसळणारे असतात. सांपत्तिक स्थितीसंबंधानें हा योग चांगला आहे. **परदेशाशीं संबंध आल्यानें उदय होण्याचा संभव आहे.**

**कन्येंत रवि व मिथुनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक बुद्धिमान्, चौकस, खोल विचार करणारे, विवेकी व शोधक असतात. ह्या लोकांची मानसिक प्रगल्भतेपेक्षां बौद्धिक प्रगल्भता विशेष असते. हा योग वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्यांस फार उत्तम आहे. हे लोक एकच विषय आपल्यापुढें ठेवीत नाहींत. **लेखनव्यवसायापासून उदय होण्याचा अधिक संभव आहे.**

**कन्येंत रवि व कर्केंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक महत्वाकांक्षी, स्वार्थपरायण, अस्थिर स्वभावाचे व नेहमीं विचार बदलणारे असतात. ज्या

धंद्यांत अगर नोकरींत जनसमुदायाशीं संबंध येतो अशा धंद्यांत यश येईल.

**कन्येंत रवि व सिंहेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक अधिक आत्मविश्वासी, आपलीं मतें दुसऱ्यांवर लादणारे व खंबीर मनाचे असतात.

**कन्येंत रवि व कन्येंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक आत्मकार्यतत्पर, स्वार्थी, स्वातंत्र्यप्रिय, आणि उद्योगी असतात. ह्या लोकांमध्यें श्रमसातत्याचा अभाव दृष्टीस पडतो. **व्यापारधंद्यांत यश येण्याचा संभव आहे.**

**कन्येंत रवि व तूळेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक हुशार, बुद्धिमान्, सुस्वभावी, व लेखनवाचनाची आवड असणारे असतात. **कलेच्या व्यासंगामुळें अगर भागीदारामुळें फायदा होईल.**

**कन्येंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक हुशार, गुप्तगोष्टी करणारे, व्यापारी धोरणाचे, गर्विष्ठ व कठोर असतात. **वैद्यकीच्या अभ्यासामुळें उदय होण्याचा संभव आहे.**

**कन्येंत रवि व धनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक तात्विक विचार करणारे, उदार व सरळ स्वभावाचे असतात. **प्रवासापासून यांचा उदय होण्याचा संभव आहे.**

**कन्येंत रवि व मकरेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक धाडसी, सांसारिक बाबतींत दक्ष, काटकसरी, हिशेबी व धोरणी असतात. या लोकांत स्वार्थ व व्यापारी धोरण हीं प्रमुखपणानें दिसून येतात. **शेतकी अगर घरांच्या देवघेवी करण्यापासून फायदा होईल.**



## प्रसिद्ध पुरुषांच्या कुंडल्यांचा संग्रह.


### नंबर ६. परमपूज्य देशभक्त दादाभाई नौरोजी.



कर्तव्यनिष्ठेनें प्रेरित होऊन आपलें सर्वस्व देशसेवेंत अर्पण करणारे निस्सीम देशभक्त **दादाभाई नौरोजी** यांना त्यांच्या ९० व्या वर्षी मुंबई विश्वविद्यालयानें डाक्टरची बहुमानाची पदवी देण्याचें ठरविलें. हें पदवीदान लौकरच होणार असल्याकारणानें ह्या सन्माननीय देशभक्ताच्या चिरस्मरणीय देशसेवेची सर्वांस आठवण होईलच होईल. अशा प्रसंगीं त्यांची जन्मकुंडली जिज्ञासु ज्योतिष विद्यार्थ्यांकरतां प्रसिद्ध करीत आहों.

सन १८२५ सालीं ४ सपटेंबर रोजीं पूर्व क्षितिजावर **मेष** या आद्य व चर राशीचा पंचविसावा अंश उदय पावत असतां परमपूज्य **दादाभाईंचा** जन्म झाला. उदित अंशाबरोबर शनि द्विराश्यंतर दृष्टियोग व नवपंचम दृष्टियोग करीत आहेत. लग्न अग्नि राशीचें व शुभसंबंधित असून लग्नेश मंगळ सिंह या अग्नि राशींत असल्यामुळें बलवत्तर आहे. राशिचक्रांतील अग्नि राशीमध्यें जीवनशक्ति उत्तम प्रकारची असते हें अनुभवसिद्ध आहे. प्रस्तुत कुंडलीमध्यें लग्न अग्नि राशीचें असून शनीच्या व विशेषतः सिंह राशीच्या गुरूच्या शुभदृष्टीमध्यें आहे आणि लग्नेश बलवान् आहे. चंद्र हा ग्रह शुक्र आणि बुध यांबरोबर शुभदृष्टियोग करीत असून रवि पापग्रहांच्या दृष्टींत नसून बलवान् आहे. हे योग दीर्घायुष्यदर्शक आहेत.

सा. ल.




मेष या चर राशीचें लग्न उदय पावत असून लग्नाधिपति मंगळ पंचम स्थानामध्यें सिंह या बादशाही राशीमध्यें असून चर राशीमध्यें ग्रहाधिक्य आहे. हा योग निरंतर कार्य करण्याची हौस, कोणत्याहि परिस्थितींत न डगमगतां असामान्य धैर्य आणि मेष राशीला अनुसरून थोडासा उतावळेपणा दर्शवितो. सतत व दीर्घ काळ उद्योग करणाऱ्यांमध्यें दे. भ. दादाभाईंचा नंबर पहिला आहे. चर राशि, चरराशींत ग्रहाधिक्य आणि त्यांचा केंद्रस्थानांशीं निकट संबंध हा योग उद्यमी व मार्गदर्शक पुरुषांच्या कुंडल्यांमध्यें अवश्य सांपडतो. पुरुषाच्या उद्यमशीलत्वाला बुद्धीची जोड असल्याखेरीज फारसें महत्व नाहीं. प्रस्तुत कुंडलीमध्यें बुद्धियोग हा उद्यमशीलत्व दर्शविणाऱ्या योगापेक्षां कांकणभर सरस आहे. ( १ ) रवि व चंद्र बुधाच्या राशींत असून शास्त्रीय राशींत असलेल्या बुधाबरोबर चंद्र नवपंचम योग करीत आहे. ( २ ) शुक्र हा ग्रह बुध व चंद्र या दोन्हीहि योगकारक ग्रहांबरोबर द्विरास्यंतर शुभ दृष्टियोग करीत आहे. चंद्र, बुध व शुक्र यांचे परस्परांशीं झालेले योग जवळ जवळ तंतोतंत असल्यामुळें फारच महत्वाचे आहेत. ( ३ ) लग्नेश पंचमांत व पंचमेश सुद्धां पंचमांत आहे ( ४ ) नवमाधिपति गुरु पंचमस्थानामध्यें सिंह या बादशाही राशींत



असून तृतीयस्थ शनीबरोबर शुभदृष्टिसंबंधित आहे. पंचम या बौद्धिक स्थानामध्यें असणारा गुरु, रेग्युलस नांवाचे ताऱ्याजवळ ( मघा नक्षत्रपुंजांत ) आहे हें लक्ष्यांत ठेविण्यासारखें आहे. हे सर्व योग उत्तम बुद्धिमत्ता व विद्वत्ता स्पष्ट दर्शवीत आहेत. पंचमस्थ नवमेश गुरूमुळें प्रथमतः शिक्षक या नात्यानें दे. दादाभाईंनीं आपल्या चरित्रक्रमास प्रारंभ केला. हिंदुस्थानामध्यें पहिले हिंदी प्रोफेसर तेच होते. गणित, अर्थशास्त्र व पदार्थविज्ञानशास्त्र हे विषय त्यांचे फार आवडते होते. मकर राशींतील दशमस्थ हर्षलमुळें शिक्षणविषयक बाबतींमध्येंच ते स्थिर रहाणें अशक्य होतें. धनस्थानांतील बुध–शुक्रांच्या शुभदृष्टीमध्यें असलेल्या चंद्रामुळें दे. दादाभाई व्यापार करण्याकरतां एका कंपनीचे भागीदार म्हणून इंग्लंडास गेले. परंतु त्या वेळेस चलित रवि प्रथम नेपच्यून व नंतर हर्षल बरोबर केंद्रयोग करीत असून चलित मंगळ धनभावस्थ मूळ चंद्राबरोबर केंद्रयोग करीत होता त्यामुळें त्यांचें व्यापारामध्यें फारसें जुळलें नाहीं. दे. दादाभाईंना व्यापारामध्यें व्यक्तिविषयक फायदा करून घेतां आला नाहीं परंतु याच वेळेस अर्थशास्त्राच्या अध्ययनानें हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति किती अनर्थकारक होती हें त्यांस कळून आलें. व या पुढें देशाची स्थिति सुधारण्याकरतां त्यांच्या आत्मकारक मंगळाच्या उत्साहाप्रमाणें त्यांनीं आपल्या सर्व आयुष्यभर परिश्रम केले. अर्थशास्त्राचे पहिले धडे दे. दादाभाईंनींच हिंदुस्थानास शिकविले आहेत. मकरेंतील दशमस्थ हर्षलमुळें व बादशाही राशींतील गुरु–मंगळांमुळें राजकारणाच्या विस्तृत क्षेत्राकडे ते वळले व या क्षेत्रांत त्यांनीं केलेल्या अनेक कामांचा येथें नामनिर्देशसुद्धां जागेच्या अभावामुळें करतां येत नाहीं. त्यांच्या अंगीं असलेली कार्यक्षमता, फडनिसी कामांत प्राविण्य व देशोन्नतीसाठीं त्यांच्या ठिकाणीं असलेली कळकळ लक्ष्यांत घेऊन १८७४ सालीं बडोदें संस्थानच्या अधिपतींनीं मोठ्या आग्रहानें त्यांस मुख्य दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं. दे. दादाभाईंची सुद्धां उमेद संस्थानामध्यें पुष्कळ सुधारणा करण्याची होती. ह्या वेळेस चलित रवि मूळ गुरूबरोबर द्विरास्यंतर दृष्टियोग करीत असून चलित चंद्राचें भ्रमण चलित दशमांतून आणि गोचरीच्या गुरूचें भ्रमण मूळ रवीवरून सुरू होतें. या शुभ योगांमुळें महत्वकारक पद प्राप्त झालें. हे योग चालू

असतां चलित मंगळ रवीशीं युति करण्यास जात असून चलित रवि मूळ शुक्राशीं केंद्रयोग करण्यास जात होता. हे योग १८७९ सालीं तंतोतंत होत असून त्याच वर्षी गोचरीचा हर्शल व शनीचा प्रतियोग होऊन हर्शल मूळ मंगळावर आला होता. या योगांनीं आमच्या **दे. दादाभाईंस** रुपेरी बेडींतून सोडविलें. **दे. दादाभाईंनीं** दिवाणगिरीचा राजीनामा देऊन पुन्हां ते देशहिताचीं कामें करूं लागले. सन १८८१ पासून १८८९ पर्यंत ते मुंबई कायदे कौंसिलाचे मेंबर होते. १८८९ च्या डिसेंबर महिन्यांत राष्ट्रीयसभेची प्राणप्रतिष्ठा झाली. ह्या राष्ट्रकार्यामध्यें **दे. दादाभाई** अध्वर्यू होते. दिनवर्ष पद्धतीप्रमाणें १८८६ पासून **दादाभाईंच्या** कुंडलीमध्यें अत्यंत बलवान् शुभयोग सुरूं झाले होते. चलित रवि हा मूळ रवि व नेपच्यून बरोबर द्विराश्यंतर दृष्टियोग व चलित बुधाबरोबर युतियोग करीत असून चलित गुरु मूळ रवीबरोबर युतियोग करीत होता. शेवटचा योग कोणत्याहि बाबतींत यशस्वी करणारा असून बराच काळ टिकणारा होता. हे योग चालले असतां **दे. दादाभाई** राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष झाले. रवि–गुरु–युति योग चालूं असतां चलित रवीनें ६७ व्या वर्षी मूळ हर्शलबरोबर द्विराश्यंतर दृष्टियोग केला. त्यावेळीं **दे. दादाभाई** इंग्लिश पार्लमेंटचे सभासद झाले. हिंदी मनुष्याला हा मान पहिलाच होता. १८९३ सालीं त्यांच्या अपूर्व देशसेवेबद्दल त्यांच्या देशबांधवांकडून त्यांचें जंगी स्वागत झालें. व ह्या वर्षाच्या अखेरीस ते पुन्हां राष्ट्राय सभेचे अध्यक्ष झाले. १९०६ सालच्या कलकत्ता येथील राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष या नात्यानें ह्या ८२ वर्षाच्या वृद्ध देशभक्तानें मार्गदर्शकाचें जें काम केलें त्याचा विसर हिंदी लोकांस पडणें शक्य नाहीं. एवंच चलित गुरु व मूळ रवि यांचा युति–योग चालूं असतां **दे. दादाभाईंच्या** हातून चिरस्मरणीय अशी कामगिरी झाली व लोकांनींहि त्यांचा विशेष गौरव केला. त्यांच्या ९२ व ९३ या वर्षी चलित रवि व चलित गुरु यांचा अनिष्टकारक केंद्रयोग होणार आहे परंतु त्याच वेळेस चलित गुरु व मूळ रवि यांचा सम क्रांतियोग हा तारक आहे. ९७ व्या वर्षी रवि–शनीचा प्रतियोग सुरूं होणार आहे. हा शेवटचा प्रतियोग अत्यंत अनिष्ट आहे.

राम नारायण.

---

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रांद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽवृत्ति वर्ष १ लें. } ऑक्टोबर १९१५. { अंक ७ वा.

## पांच खुनी मनुष्यांच्या कुंडल्या.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

हा योग खुनशी स्वभाव करतो. बुध व नेपच्यून यांची व्यय स्थानांतील युति सुद्धां असल्या तऱ्हेची वासना दर्शवीत आहे. ह्या बाईस कायदेशीर रीतीनें चौकशी होऊन देहांत शासनाची शिक्षा झाली. ज्या काळीं ह्या स्त्रीनें वर सांगितलेलें अघोर कृत्य केलें त्या वेळीं दिनवर्ष पद्धतीप्रमाणें चलित मंगळ हा हर्शल बरोबर प्रतियोग करीत असून चलित चंद्र शनि बरोबर प्रतियोग करीत होता. आणि ज्या काळीं ह्या अघोर कृत्याची चौकशी होऊन त्याबद्दल शिक्षा झाली त्या काळीं दिनवर्ष पद्धतीप्रमाणें चलित चंद्र हा शुक्र व जन्मकालीन शनि यांजबरोबर समक्रांतियोग करीत असून चलित चंद्र हा शुक्र व जन्मकालीन रवि यांजबरोबर प्रतियोग करीत होता.

**कुंडली तिसरी. आग० स्टरनिकल्.** जन्म ता. ११ मे १८६६ पहांटेस १–३० वाजतां. स्थल–रेखांश १८–३० पूर्व. अक्षांश ५० उत्तर.

स्पष्ट षड् भाव.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| कुंभ | मेष | वृषभ | मिथुन | कर्क | कर्क |
| २०–१० | १८ | २१ | १२–१६ | १ | २० |

स्पष्ट ग्रह.

| रवि | चंद्र | बुध | शुक्र | मंगळ |
|---|---|---|---|---|
| वृषभ | मीन | मेष | मिथुन | मेष |
| २०–३ | २९–३९ | २४–१२ | ८–४८ | ५–२१ |

| गुरु | शनि | हर्शल | नेपच्यून |
|---|---|---|---|
| कुंभ | वृश्चिक | कर्क | मेष |
| २–८ | ८–१० | १–१३ | ११–४४ |

ह्या भयंकर खुनी मनुष्यानें गेल्या २०–२५ वर्षांत जर्मनीच्या निरनिराळ्या भागांत कित्येक डझनानें मोजतां येतील इतके अनेक खून केले होते. इतकें करून सुद्धां ही स्वारी मोठ्या धूर्तपणानें राजरोसपणानें वागत असे. हा मनुष्य ज्या ठिकाणीं नोकरीस राही तेथील मनुष्यांचा विश्वास सहज संपादन करीत असे. त्यामुळें निरनिराळ्या कारखानदारांपासून उत्तम तऱ्हेचें काम केल्याबद्दल आणि सुस्वभावासंबंधाचीं अनेक सर्टिफिकिटें ह्या खुनी मनुष्याजवळ होतीं. तो साधारणपणें सभ्य व उमदा कारागीर असल्याबद्दल लोकांत प्रसिद्धि होती. कुंडलीमध्यें असलेला बलवान् शुक्र आणि गुरु–चंद्रांचा द्विरास्यंतर दृष्टियोग ह्यामुळें वर सांगितलेली स्थिति होती. हा मनुष्य कधींच एके ठिकाणीं फार काळ राहिला नाहीं परंतु सर्व जर्मनीभर भटकत राहिला. कुंडलींत चंद्र लग्नांत असून बरेच ग्रह चरराशींत आहेत. हें पहाण्यासारखें आहे. हा मनुष्य जेथें पुष्कळ मनुष्यांचा संबंध नाहीं अशा गिरणीमध्यें किंवा शेतामध्यें काम करीत असे. आपल्या दुष्ट कृत्याचे मुद्देमाल नाहींसे करण्याकरतां तो नेहमीं घरांस किंवा



धान्याच्या कोठारास आगी लावीत असे. ह्यानें बरेचसे खून सूड घेण्याकरतां आणि चोरी करण्याच्या उद्देशानें केले. लग्नाधिपति शनि हा वृश्चिक ह्या खुनशी राशींत असून मेष ह्या तीव्र राशीमध्यें मंगळ व नेपच्यून या ग्रहांबरोबर चंद्र युक्त असून लग्नांत आहे; चंद्र व मंगळ हे हर्शल बरोबर केंद्रयोग करीत आहेत. हे सर्व योग या मनुष्याचा खुनशी स्वभाव पूर्णपणें दर्शवीत आहेत. आपल्या धूर्ततेमुळें हा अनेक खून करून सुद्धां निर्धास्तपणें सुटा राहिला. अखेरीस एका खुनाच्या खटल्यांत हा दुसऱ्या जोडीदाराबरोबर सांपडून त्यास देहांत शिक्षा झाली. त्या वेळीं दिनवर्षपद्धतीप्रमाणें चलित रवि हा जन्मकालीन मंगळाबरोबर केंद्रयोग करीत असून चलित रवि चलित हर्शल बरोबर युतियोग करीत होता. ह्या मनुष्यामध्यें एक विशेष पाहण्यासारखा गुण म्हटला म्हणजे जनावरांसंबंधानें विशेष आवड व प्रेम हें होय आणि हा गुण मीन राशींत असलेला चंद्र लग्नीं उदित असल्यामुळें आला असावा.

**कुंडली ४ थी. इ. ए. वॅग्नर.** जन्मः—२२ सपटेंबर १८७४ दुपारीं २ वाजतां, स्थलः—रेखांश ९ पूर्व व अक्षांश ४९ उत्तर.

षड् भाव.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| मकर १–१४ | कुंभ १६ | मेष २ | वृषभ ३ | वृषभ २६ | मिथुन १४ |

स्पष्ट ग्रह.

| रवि | चंद्र | बुध | शुक्र | मंगळ | गुरु | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| कन्या | कुंभ | तूळ | वृश्चिक | कन्या | तूळ | कुंभ |
| २९-२१ | १३-२१ | १०-५७ | १५-४७ | ३-५९ | ९-२० | ७-५९ व |

हर्शल सिंह १३–४८. नेप. वृषभ ०–११ व.

हा मनुष्य शाळा मास्तर होता. ह्यानें सहा वर्षांपूर्वीं ठरविल्याप्रमाणें ता. ४–५ सपटेंबर १९१३ च्या रात्रीं भयंकर रीतीनें अनेक खून केले. एन नदीच्या कांठीं मुलहासेन नांवाच्या खेडे गांवीं हा मनुष्य शाळा मास्तर होता. तेथें असलेल्या एका कलालाच्या मुलीबरोबर ह्याचा वाईट संबंध

होता. ह्या गोष्टीचा बराच बभ्रा झाल्यामुळें ह्या मनुष्यास त्या मुली-बरोबर लग्न करावें लागलें. पुढें त्याला ह्या बाईपासून ४ मुलेंही झालीं. परंतु सासऱ्यानें ज्या तऱ्हेनें त्याला लग्न करण्यास भाग पाडलें व पुढें त्याच्या-बरोबर जी सासऱ्याच्या आप्तेष्टांनीं ज्या तऱ्हेची वागणूक ठेविली होती त्यामुळें ह्या मनुष्याच्या मनांत त्या सर्वांबद्दल कांहीं विलक्षण भावना उत्पन्न झाली. आणि अखेरीस त्याच्या सासऱ्याच्या आप्तेष्टांसंबंधानें व त्या गांवांतील इतर लोकांसंबंधानें त्याच्या पोटांत दीर्घद्वेष उत्पन्न झाला. पुढें तो डेजर लॉच नांवाच्या दुसऱ्या दूर असलेल्या खेडेगावीं राहण्यास गेला. येथें पूर्वी सांगितल्याप्रमाणें ता. ४ सप्टेंबर रोजीं पूर्व रात्रीं त्यानें झोपेंत असलेल्या बायकोचा व चारही मुलांचे गळे कापून खून केले व आपलें सर्व कृत्य पोलिस खात्यास पत्रद्वारें कळविलें. नंतर तो रेल्वेनें आणि कांहीं वेळ सायकलवर बसून मुलहासेन गांवीं मध्य रात्रीच्या सुमारास येऊन पोंचला. गांवांत जातांना गांवांतील घरांस, कोठारांस आणि गवताच्या गंज्यांस आगी लाविल्या. आगीचा डोंब सर्व गांवभर झाल्यामुळें गांवांतील लोक धांवून बाहेर आल्यावर ह्या खुनशी मनुष्यानें आपल्या हातांतील दोन मोठ्या पिस्तुलानें गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. अग्निप्रळयानें आधींच लोक घाबरून गेले होते त्यांत गोळ्यांचा वर्षाव होऊं लागल्यमुळें तर त्यांची स्थिति फारच शोचनीय झाली ! अशा स्थितींत ह्या दुष्ट मनुष्यानें ३६ इसमांस जखमी व ठार केलें. त्या नंतर एका पोलिसानें तरवारीच्या सहायानें ह्या मनुष्यास निःशस्त्र केलें. ह्या निर्दय कृत्याबद्दल गांवांतील लोकांनीं खवळून जाऊन त्या मनुष्यास बेदम मार दिला आणि तो मनुष्य मेला आहे असें समजून एका खाड्यांत लोटून दिलें. तेथें तो बरेच तास पर्यंत होता. नंतर त्यास दवाखान्यांत पोंचविण्यांत आलें. दवाखान्यांत नेल्यावर कांहीं वेळानें तो शुद्धीवर आला परंतु लोकांकडून त्याला जो मार मिळाला त्यांत त्याचा डावा हात मोडून गेल्यामुळें कापून काढावा लागला. याचा ज्यावेळीं झाडा घेतला त्या वेळीं त्याच्याजवळ ६ वर्षांपूर्वी लिहिलेला एक कागद सांपडला. त्यांत त्यानें सदरहु गांवांतील लोकांचा कोणत्या रीतीनें



सूड घ्यावयाचा ह्याचें सविस्तर वर्णन केलेलें होतें. ह्या कागदांत लिहिल्या-प्रमाणें त्याचे मनांतून आणखी कितीतरी अघोर कृत्यें करावयाचीं होतीं. पुढें चौकशीकरितां नेमलेल्या कमिशननें त्यास वेडा ठरवून त्याची पुढें चौकशी न करतां वेड्याचे इस्पितळांत पाठवून दिलें तेथें ही स्वारी अद्याप हयात आहे.

सूक्ष्म दृष्टीनें ह्या मनुष्याच्या वर्तणुकीचें निरीक्षण केलें असतां व्यभिचारी वर्तन हेंच त्याच्या वरील दुष्ट कृत्यास कारणीभूत झालें असल्याचें आपणास आढळेल आणि कुंडलींत हें पूर्णपणें दृग्गोचर होत आहे. शुक्र दशमांत वृश्चिक राशीमध्यें व अनुराधा या व्यभिचारप्रिय नक्षत्रांत असून लग्नेश शनि, व चंद्र व हर्शल यांचेबरोबर अशुभ दृष्टियोग करीत आहे. शुक्र हा पंचमेश असून त्यानें हा योग उत्पन्न होत असल्यामुळें ह्या मनुष्याची व्यभिचारप्रियता स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येत आहे. शनि व चंद्र स्थिर राशींत युक्त असून सिंह या स्थिर राशींत असलेल्या हर्शलबरोबर पूर्णपणें प्रतियोग करीत असल्यामुळें ह्या मनुष्याची मानसिक प्रवृत्ति इतकी भयंकर घातक झाली होती. ही व्यक्ति पक्की देहात्मवादी असून जें सर्व आहे तें वाईट आहे असें मानणारी होती. ज्या काळीं ह्या मनुष्यानें मागें सांगितलेलें भयंकर कृत्य केलें त्या काळीं खालीं लिहिल्याप्रमाणें योग दिनवर्षपद्धतीप्रमाणें होते. चलित रवि केंद्र-योग शनि; चलित मंगळ युतियोग जन्म रवि; चलित चंद्र हा चलित रवीबरोबर केंद्रयोग करण्यास जात होता.

**कुंडली ५ बी. ए. हाफ.** जन्मः—तारीख २६ मार्च १८६३ दुपारीं ५-२० वाजतां. स्थळः—मेन नदीवरील फ्रँकफुर शहर.

षड् भाव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| कन्या १७-१४. | तुळ २१. | वृश्चिक २१. | धनु २६. | कुंभ २. | मी २. |

स्पष्ट ग्रह.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रवि | चंद्र | बुध | शुक्र | मंगळ | गुरु |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मेष | मिथुन | मीन | वृषभ | मिथुन | तूळ |
| ५–३३ | २८–२१ | १३–४९ | ०–४५ | १०–२० | २४–३७ |

शनि, तूळ १–५६. हर्शल, मिथुन १७–८. नेप. मेष, ३–३७.

ह्या मनुष्यास आपल्या दोन बायका, आई व दुसरे कित्येक नातेवाईक यांचा, त्रिम्याच्या मोठाल्या रकमा मिळण्याकरतां व यांच्या इस्टेटी मिळण्याकरतां विषप्रयोगानें खून करण्याच्या आरोपावरून पकडण्यांत आलें होतें. ह्यानें आपल्या तिसऱ्या बायकोचा खून पूर्वींप्रमाणें करण्याचा प्रयत्न केला परंतु लोकांस संशय आल्यामुळें ह्या तिसऱ्या बायकोस त्याला विषप्रयोग करतां आला नाहीं. पूर्वींच्या मृतांचीं शरीरें रसायन शास्त्ररीत्या तपासतां विषप्रयोग झाल्याचें आढळून आलें. ह्या मनुष्याची चौकशी होऊन त्यास देहांत शिक्षा मिळाली. इतर विषप्रयोग करणारांच्या कुंडल्यांमध्यें ज्याप्रमाणें **कन्या** व **मीन** व त्यांचे अधिपति **बुध** व **ने**पच्यून यांचा विशेष संबंध आढळून येतो त्याचप्रमाणें ह्या कुंडलीमध्येंही दिसून येत आहे. येथें बुध व नेपच्यून फारच पीडित असून आत्मकारक रवि हा कोणत्याच ग्रहाकडून शुभसंबंधित नाहीं यामुळें ह्याला नीतिमत्ता कशी असते याची बिलकूल जाणीव नसल्याचें दिसून येत आहे. चंद्र हा शुक्राबरोबर तृतीय एकादश योग करीत असून धन स्थानांतील गुरुबरोबर त्रिकोण योग करीत आहे या योगांमुळेंच याच्या जाळ्यांत अनेक स्त्रिया सांपडल्या. ह्या मनुष्य पटयाचे हात करण्यांत निष्णात होता व ह्याचे खेळ लोकप्रिय होत असत. मंगळ व हर्शल यांची युति बुधाचे राशींत झाली असून बुध त्या दोन ग्रहांबरोबर दृष्टियोग करीत आहे म्हणून त्यास ही कला प्राप्त झाली होती. याच्या शिक्षेच्या वेळीं **दिन**वर्षपद्धतीप्रमाणें खालील योग चालू होते:—चलित बुध युतियोग हर्शल; चलित शुक्र युतियोग जन्मशनि; चलित चंद्र युतियोग जन्मकालीन मंगळ व हर्शल. **' फिरस्ता. '**



# राशिधर्म निरूपण.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**कुंभ** ही राशिचक्रांतील अकरावी राशि आहे. ह्या राशीचा आकार खांद्यावर रिक्त घट घेतलेल्या पुरुषाचा आहे असें यवनाचार्यांचें मत आहे. यूरोपीय ग्रंथांत ह्या राशीचा आकार हातांत कुंभ घेऊन त्यांतील पाणी जमिनीवर ओतीत असलेल्या पुरुषाचा मानला आहे. ही राशि पुरुष, स्थिर, वायुतत्वाची व मानुष राशि आहे. ही राशि साधारणपणें अल्प संतति देते. ह्या राशीचा अंमल शरिरांतील रक्ताभिरसण, पोटऱ्या व पायांच्या नळ्या ह्यांवर आहे.

जन्मकाळीं ही राशि पूर्व केंद्रावर उदय पावत असतां किंवा ह्या राशींत रवि अगर चंद्र असतां स्वभाव आत्मविश्वासी, सोशीक, कंटक, धैर्यशील, सहनशील, शांत, सुस्वभावी, कल्पक, स्थिर, वाचन व विद्या यांचा अभिलाषी, बुद्धिमान् व मानवी स्वभावाची उत्तम पारख करणारा असतो. ह्या मनुष्यांस गूढविद्या, ज्योतिष, सामुद्रिक वगैरेंची गोडी असते. कुंभ लग्नावर जन्म पावणाऱ्या लोकांस सार्वजनिक कृत्यें, म्युनिसिपालिटया किंवा लोकांनीं चालविलेल्या संस्था, मित्र, ओळखीचे लोक आणि लग्न यामुळें फायदे होतात.

कुंभ राशि **शनीचें** स्वगृह मानतात. ह्या राशींत **बुध** व **हर्शल** फार बलवान असतात. **रवि** किंवा **चंद्र** ह्या राशींत शत्रुक्षेत्रीं असल्यामुळें निर्बली असतात. ह्या राशींत **शुक्र** आपल्या मित्रक्षेत्रीं असल्यामुळें बलवान् असतो.

साधारणपणें कुंभ राशि शरीर प्रकृति चांगली व सशक्त दर्शविते. रवि किंवा चंद्र ह्या राशींत पापग्रहानें पीडित असतां पोटऱ्या, गुढघे, पाय मुरगाळणें, मज्जातंतूंचे विकार, रक्तदोषामुळें होणारे विकार, अशक्तता, नेत्रविकार वगैरेंपासून त्रास होण्याचा विशेष संभव आहे. ह्या राशीच्या मनुष्यांना मानसिक श्रम फार करावे लागतात म्हणून त्यांनीं आपलें मन शक्य तितकें शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. रक्ताभिसरणाची क्रिया उत्तम चालेल अशा

तऱ्हेचा व्यायाम करावा. ह्या लोकांस मोकळी हवा, आनंदी व उत्साही मित्रमंडळ व बुद्धितत्वास परिपोषक असा आहारविहार यांची जरूरी आहे. ह्या लोकांनीं आपल्या नेत्रांसंबंधानें विशेष खबरदारी घ्यावी. कुंभ राशींत अनिष्ट ग्रह असतां नेत्रविकारानें त्रस्त झालेली मंडळी बरीच पहाण्यास मिळते. ह्या राशीच्या लोकांनीं शहरांपासून दूर व उंच जागेवर रहावें. ह्या लोकांस मित्रमंडळाची विशेष आवश्यकता असल्यामुळें एकांतस्थलें साधारणपणें निरुपयोगीच होत. ह्या राशीचे लोकांस **इंद्रनील** नांवाच्या रत्नाच्या धारणापासून फायदा होतो आणि **शनिवार** शुभ किंवा महत्वाचा असतो. **आर्य** ग्रंथांत या राशीचा रंग मुंगुसाच्या वर्णासारखा **बभ्रु** असा सांगितला आहे व **यूरोपीय** ज्योतिर्विद् ह्या राशीचा वर्ण साधारण **हिरवट** किंवा **निळा** मानतात.

### मीन.

**मीन** ही राशिचक्रांतील बारावी व शेवटची राशि आहे. ह्या राशीचा आकार **आर्य** व **यूरोपीय** ग्रंथांत उलट सुलट असलेल्या दोन मत्स्यांचा सांगितलेला आहे. ही स्त्री, द्विस्वभाव, जल, आर्द्र व बहुप्रसव राशि आहे.

जन्मकालीं ही राशि पूर्व केन्द्रावर उदय पावत असतां किंवा ह्या राशींत **रवि** किंवा **चंद्र** असतां स्वभाव अस्थिर, शीघ्रसंस्कार ग्रहण करणारा, बहुधा दुसऱ्याच्या गुणावगुणांचें अनुकरण करणारा, सुस्वभावी, आळशी, दिर्घ श्रमाचा पूर्ण अभाव, सहज विकारवश होणारा, ममताळु, आत्मविश्वास नसणारा असतो. ह्या लोकांत मुक्या जनावरासंबंधानें विशेष आवड पाहण्यांत येते. ह्या लोकांच्या स्वभावांत, वर्तनांत व वागणुकींत द्विस्वभावपणा व अस्थिरता फार प्राधान्येंकरून दृष्टोत्पत्तीस येतात. ह्या राशीचा संबंध हॉसपिटल्स, धर्मार्थ दवाखाने, तुरुंग किंवा कैदखाने, धार्मिक संस्था—पांजरपोळ अनाथगृहें, भिक्षागृहें, दानगृहें,—ह्यांबरोबर असल्यानें वरील संस्थांपासून लाभ वगैरे गोष्टी घडतात. ह्या लग्नावर जन्मणाऱ्या लोकांत गायनवादनविषयक आवड आढळते. त्याच प्रमाणें ह्या राशीच्या लोकांस विलक्षण किंवा अद्भुतरसप्राधान्यता असल्याकारणानें काल्पनिक कथानकें रचणें, कादंबऱ्या लिहिणें वगैरे गोष्टी आवडतात. **( अपूर्ण )**



# जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभाववर्णन.

## कन्यासंक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**कन्येंत रवि व कुंभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेल्या लोकांमध्यें विचारशक्ति व कल्पना शक्ति बऱ्याच जागृत झालेल्या असतात. या योगामुळें सारासार विचार व टीका करण्याकडे मनाची प्रवृत्ति फार असते परंतु कन्या राशीचा व्यवहारीपणा पुष्कळच कमी झालेला आढळतो. ह्या लोकांमध्यें उच्च विचार, काव्याची अभिरुचि आणि लोकांवर उपकार करण्याची बुद्धि हीं आढळून येतात. प्रयत्नांच्या अभावी ह्या लोकांचे बरेचसे गुण लुप्तप्राय होतात. ह्या लोकांचा **लोकोपयोगी संस्थांशीं संबंध आल्यास कल्याणकारक होईल.**

**कन्येंत रवि व मीनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक शांतस्वभावाचे, निरुपद्रवी, एकांतप्रिय, चौकस, खोल बुद्धीचे आणि गूढ शास्त्राकडे प्रवृत्ति असणारे असतात निष्कारण काळजी करण्याकडे ह्या लोकांची विशेष प्रवृत्ति असते. **प्रतिस्पर्ध्यांच्या कृत्यापासून अप्रत्यक्ष रीत्या फायदा होण्याचा संभव आहे.**

## तूळ संक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

**राशिचक्रा**मध्यें **तूळ** राशि ही सातवी, वायु तत्वाची, चर आणि पुरुष राशि आहे. ह्या राशींत सूर्य प्रतिवर्षी सामान्यतः सप्टेंबर महिन्याच्या २२ व्या तारखेस प्रवेश करतो आणि अक्टोबर महिन्याच्या २२ तारखेपर्यंत या राशींत भ्रमण करीत असतो. ह्या तूळ संक्रमणांत जन्म पावणारे लोक कोमळ अंतःकरणाचे, महत्वाकांक्षी, उदार, सुखाभिलाषी, लोकांशीं मिळून मिसळून वागणारे, गर्विष्ठ, लोकांपासून स्तुतीची अपेक्षा करणारे, न्यायप्रिय, उत्तम गोष्टींची आवड बाळगणारे आणि कलाकौशल्याचे शोकी असतात. समतोल आचरण, न्यायी वर्तन, आजूबाजूच्या परिस्थितीचें योग्य ज्ञान, आनंदी व प्रेमळ स्वभाव हे तूळ राशीचे गुणधर्म आहेत आणि या राशींत रवि असतांना हे गुण-

धर्म पहावयास सांपडतात परंतु ह्या राशींत रवि नीचक्षेत्रीं बल्हीन असतो त्यामुळें इतर ग्रहांच्या दृष्टियोगांमुळें वरील गुणामध्यें कधीं कधीं फारच फरक झालेला आढळून येतो. ज्या लोकांच्या जन्मकाळीं तूळ राशीमध्यें पीडित रवि असतो त्यांचा स्वभाव गर्विष्ठ, महत्वाकांक्षी, चंचल, लोकांवर कोणत्या तरी उपायानें आपली हुकमत चालविणारा, स्तुतिप्रिय आणि दांभिक असतो. हे लोक आंत एक व बाहेर दुसरें असें दाखविणारे असतात. तूळ राशींतील रवीच्या मनुष्यांचे असे दोन प्रकारचे भेद स्पष्ट पहावयास सांपडतात. हे दुसरे म्हणजे उन्नत नसणारे, धार्मिक बाह्य विधींचे स्तोम माजविणारे आणि आत्मप्रौढी मिरविणारे असतात. तूळेंतील रवि असणाऱ्या उन्नत मनुष्यांमध्यें प्रेरणाशक्ति, सूक्ष्मदृष्टि आणि व्यवस्थित आचरण हीं स्पष्ट दिसून येतात.

तूळराशिमध्यें रवि असणाऱ्या मनुष्यांची शरीर प्रकृति साधारणपणें निकोप असते. ह्या मनुष्यांस मूत्राशयाचे रोग, मधुमेह आणि स्पर्शजन्य रोग होण्याचा संभव असतो. आहार विहारांच्या अतिरेकामुळें ह्या लोकांची शरीरप्रकृति ताबडतोब नादुरुस्त होत.

तूळराशिमध्यें रवि असणाऱ्या मनुष्यांमध्यें कलाकौशल्याचीं कामें करणारे, गवई, बजवय्ये सुगंधि द्रव्यांचा व्यापार करणारे आणि वस्तुसंग्रहालयें यांमध्यें काम करणारे लोक आढळतात.

## रविचंद्रांच्या राशिपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाववर्णन.

**तूळेंत रवि व मेषेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक बुद्धिमान, अति महत्वाकांक्षी व अस्थिर स्वभावाचे असतात. या लोकांची ग्राहक शक्ति फारच तीक्ष्ण असून हे लोक गुणांची पारख ताबडतोब करतात. यांना नेत्रविकार होण्याचा संभव आहे. **वकीलीच्या धंद्यांत यश मिळणें शक्य आहे.**

**तूळेंत रवि व वृषभेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक सुस्वभावी, धोरणी आणि सुखाभिलाषी असतात. या लोकांचा कल गायन, वादन व नाटकें यांजकडे फार असतो. हा योग सुखोपभोगास बरा आहे. **नाटकें व नाटकगृहें यांच्याशीं संबंध आल्यास यश मिळण्याचा संभव आहे.**



**तूळेंत रवि व मिथुनेंत चंद्रः**—ह्या योगावर जन्मलेले लोक बुद्धिमान, परोपकारी, धार्मिक आणि तात्विक विचार करणारे असतात. ह्या लोकांची कोणत्याहि कामांत मनाची वृत्ति फार समतोल असते. **या लोकांचा उदय प्रवास व वक्तृत्व यांमुळें होण्याचा संभव आहे.**

**तूळेंत रवि व कर्केंत चंद्रः**—ह्या योगावर जन्मलेले लोक अत्यंत महत्वाकांक्षी, कीर्तीचे अभिलाषी आणि अस्थिर मनोवृत्तीचे असतात. त्यांच्या स्वभावांत मनोवृत्तींचेंच प्राबल्य अधिक दिसून येतें. त्यांच्या आचरणांत पुष्कळ वेळां विचारापेक्षां विकारांचेंच प्राबल्य असतें. हा योग मनुष्यांस कोणत्या ना कोणत्या प्रकारानें प्रसिद्धीस आणतो. **सामाजिक बाबतींत काम केल्यानें यशप्राप्ति होईल.**

**तूळेंत रवि व सिंहेंत चंद्रः**—ह्या योगावर जन्मलेल्या लोकांच्या स्वभावामध्यें स्थैर्य, आत्मविश्वास, विश्वासूपणा, गंभीरता आणि समतोलपणा हीं असतात. आयुष्य सुखानें जाण्यास हा योग फारच उत्तम आहे. **मित्रांमुळें आणि स्वसामर्थ्यानें या लोकांचा उदय होतो.**

**तूळेंत रवि व कन्येंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक व्यवहारनिपुण स्वार्थतत्पर व फाजील धोरणी असतात. हे लोक क्षुल्लक गोष्टीसाठीं सुद्धां आपलें शहाणपण खर्च करतात. **या लोकांस संस्थांपासून फायदा होण्याचा संभव आहे.**

**तूळेंत रवि व तूळेंत चंद्रः**—ह्या योगावर जन्मलेले लोक उतावळे, अस्थिर, निष्काळजी आणि स्वार्थपरायण असतात. या योगामुळें निरीक्षण करण्याची शक्ति तीव्र असते परंतु एकंदरींत हा योग फारसा महत्वाचा नाहीं. **या लोकांस वडिलोपार्जित संपत्ति मिळण्याचा संभव आहे.**

**तूळेंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक स्वार्थी, केवळ आपलेंच हित पहाणारे, आंतल्या गांठीचे आणि संग्रहशील असतात. हे लोक दुसऱ्याच्या अंतःकरणास लागेल अशी टीका करतात आणि यांची दृष्टि नेहमीं दुसऱ्यांच्या दोषांकडेच असते. यांच्या स्वभावाचा अंत लागणें कठीण

असतें आणि त्यांना संतोषित करणें हें त्याहीपेक्षां कठीण असतें. **केवळ स्वतःच्या परिश्रमानें हे लोक उदयास येतात.**

**तूळेंत रवि व धनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक बुद्धिमान, उदार, प्रेमळ, निरलस आणि परोपकारी असतात. हे लोक नेहमीं कोणत्याहि गोष्टीसंबंधानें चांगलाच अर्थ ग्रहण करतात आणि पुढें आलेल्या संधीचा उत्तम उपयोग करून घेतात. सामान्यतः हा योग शुभफलदायी आहे. **प्रवास आणि धार्मिक बाबती यांमुळें फायदा होईल.**

**तूळेंत रवि व मकरेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक अत्यंत महत्वाकांक्षी, अस्थिर, फाजील हिशोबी आणि मेहनती असतात. कोणत्या ना कोणत्या प्रकारानें लोकांपुढें यावें अशी या लोकांमध्यें प्रबल इच्छा असते. **या लोकांस वडिलार्जित संपत्तीचा लाभ होण्याचा संभव आहे.**

**तूळेंत रवि व कुंभेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक सुस्वभावी, परोपकारी, विद्याभिलाषी, उदार, विश्वासु आणि सरळ मार्गाचें अवलंबन करणारे असतात. लोकोपयोगी कामें करण्यास हे लोक निसर्गतः लायक असतात आणि त्यांच्या हातून तशीं कृत्यें पुष्कळच होतात. ह्या लोकांस मनोरंजक कला विशेष आवडतात. **कलाकौशल्यापासून यशप्राप्ति होईल.**

**तूळेंत रवि व मीनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक निरुपद्रवी, गरीब, परोपकारी आणि सुखाभिलाषी असतात. ह्या लोकांस निराश्रित व दुबळे यांसंबंधानें अधिक कळकळ वाटते. **परोपकार करण्यामुळें या लोकांचें कल्याण होईल.**



# प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्यांचा संग्रह.

## नंबर ७. मिसेस् ॲनि बेझंट.




अनेक कारणामुळें **मिसेस ॲनि बेझंट** सर्व जगाच्या आणि विशेषतः भारतवासीयांच्या पूर्ण परिचयाच्या झाल्या आहेत. कर्तृत्व आणि प्रसिद्धि या दृष्टीनें तर त्यांनीं अनेक पुरुषांस मागें टाकिलें आहे. अगदीं अलिकडे बेझंटबाई निराळ्या क्षेत्रांत कार्य करूं लागल्या आहेत आणि त्यामुळें त्यांच्याकडे हिंदी लोकांचें साहजिकच लक्ष वेधत आहे. अशा वेळीं आम्ही ज्योतिर्मालेच्या वाचकवर्गासाठीं बेझंट बाईंची कुंडली अल्प वर्णनासह प्रसिद्ध करीत आहों. हें कुंडलीचें वर्णन ज्योतिषशास्त्राच्या सर्वमान्य नियमाधारें करणार आहों. येथें कोणत्याहि प्रकारच्या अभिनिवेशास जागा मिळणार नाहीं. हें सांगण्याचें कारण बहुश्रुत वाचकांच्या लक्ष्यांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

बेझंट बाईंच्या जन्मकालीं पूर्वक्षितिजावर **मेष** या आद्य आणि चर राशीचा ६वा अंश उदय पावत होता. लग्न केंद्रीं हर्शल ग्रह उदय पावत असून लग्नेश **मंगळ** वृषभ राशींत धन स्थानामध्यें आहे. लग्नकेंद्रीं जीवन शक्तिवर्धक अशी अग्निराशि असून मंगळ उच्च गुरु बरोबर द्विराश्यंतर शुभ दृष्टियोग करीत आहे आणि स्त्रियांच्या कुंडलींत शारीरस्वास्थ्याचा कारक ग्रह चंद्र बलवान् असून गुरु बरोबर युतियोग आणि मंगळा बरोबर द्विराश्यंतर दृष्टियोग करीत आहे. हे सर्व योग उत्तम शारीरस्वास्थ्य दर्शवीत आहेत. मेषराशिप्रमाणें बाईंच्या अंगीं कर्तव्यक्षमता, धैर्य, उत्साह आणि कार्य करण्याची धमक हीं पूर्णपणें दिसून येत आहेत. चर राशीचें लग्न, चर राशींत रवि, चर राशींत चंद्र आणि चर राशींत ग्रहाधिक्य असल्यामुळें मानसिक व बौद्धिक अस्थिरता दिसून येत आहे. ह्या चर राशींतील योगामुळें एकाच स्थितींत किंवा एकाच व्यवसायांत दीर्घ काळ रहाणें हें अशक्यांतील अशक्य होय. बेझंट बाईंच्या आयुष्यामध्यें जीं अनेक स्थित्यंतरें झालीं त्याचें कारण हा

चर राशींतील योग होय. हा चर राशींतील योग लग्नीं उदित असलेल्या चर राशींतील हर्शलामुळें अधिकच तीव्र झाला आहे. हर्शल ग्रह गूढ शास्त्रांचा कारक आहे म्हणून बेझंट बाईंचीं स्थित्यंतरें होतां होतां कांहीं काळानें बेझंट बाई गूढ शास्त्राकडे वळल्या. आपल्या सूर्यमालेंत हर्शला-प्रमाणें अनिश्चित आणि आश्चर्यकारक स्थित्यंतरें करणारा दुसरा ग्रह नाहीं असा अनुभव आला आहे आणि त्याचें प्रत्यंतर प्रस्तुत कुंडलींत येत आहे.

सा. ल.




बेझंट बाईच्या अंगीं असलेल्या लोकोत्तर गुणांच्या द्योतक योगांचें दिग्दर्शन करण्यापूर्वी विहंगम दृष्ट्या ज्योतिषशास्त्राच्या बाजूनें त्यांच्या पूर्व चरित्राचा विचार करणें जरूर आहे. ही पूर्व चरित्राची माहिती त्यांच्या 'आत्मचरित्रांतून' घेतली आहे. बाईंच्या कुंडलींत दशम स्थानाचा अधिपति शनि वक्री असून व्ययस्थानांत आहे आणि पितृकारक ग्रह रवि निर्बली असून हर्शल बरोबर प्रतियोग, गुरु बरोबर केंद्रयोग आणि शनि बरोबर षडाष्टक योग करीत आहे. त्यामुळें त्यांच्या ६ व्या वर्षी दि. व. पद्धतीनें चलित दशम मूळ रवि बरोबर केंद्रयोग करीत असतां पितृनिधन झालें. मातृकारक ग्रह चंद्र मातृस्थानांत असून लग्नेश मंगला बरोबर शुभ दृष्टियोग करीत आहे यामुळें मातृसौख्य फारच उत्तम मिळालें. गरीब



स्थिति असूनही केवळ आईच्या करारीपणामुळें त्यांस सुशिक्षण मिळालें. चंद्राबरोबर होत असलेल्या मंगळाचा शुभ दृष्टियोग त्यांच्या आईचा करारीपणा दर्शवीत आहे. पंचमांतील उच्च गुरूमुळें त्यांस सुशिक्षण लाभलें. वैवाहिक सुखाचा कारक ग्रह शुक्र सप्तम स्थानामध्यें स्वराशीचा आहे त्याचें फळ विसाव्या वर्षी मिळालें. पंचम स्थानारंभीं कर्क ही बहुप्रसव राशि असून उच्च गुरु पंचमांत आहे. त्यामुळें त्यांस २२ व्या वर्षी पुत्र प्राप्ति झाली आणि २३ व्या वर्षी कन्याप्राप्ति झाली. येथ पर्यंत त्यांचें आयुष्य सुरळीत गेलें असें म्हणावयास हरकत नाहीं. मूळ कुंडलींतील शुक्राच्या बरोबर सप्तमांत हर्शल आहे आणि हर्शल वैवाहिक सुखाचा नाशकारक आहे. २४ व्या वर्षी जेव्हां मूळ स्थानाच्या केंद्रांतून आणि मूळ गुरु-वरून हर्शल भ्रमण करूं लागला त्या वेळीं हर्शलच्या कटुतर फलांचा पहिला हप्ता मिळाला. हर्शलच्या पंचमांतील भ्रमणानें पुत्रनाश झाला आणि त्याच वेळेस बौद्धिक स्थित्यंतर सुरूं झालें. कुंडलीमध्यें बुधहर्शलचा केंद्रयोग केंद्रांतून झालेला आहे. हा योग बौद्धिक प्रगतीस सर्वथैव प्रतिकूळ आहे. या मूळ योगाचें फल हर्शल पंचमांत आल्याबरोबर मिळालें. या वेळीं बाई नास्तिक बनल्या. पुढें २९ व्या वर्षी चलित रवि बरोबर गोचरीचे हर्शल व शनि केंद्रयोग करूं लागले, रवि—नेपच्यून यांचा समक्रांतियोग आणि हर्शल व सप्तमांतील बुध—शुक्रांचे अशुभ योग चालले असतां बाईंचें वैवाहिक बंधन तुटून गेलें. आणि त्यांचा नास्तिक वाद कांहीं काळ पर्यंत कायम राहिला. सन १८८४ च्या अखेरीला हर्शलनें तूळ राशींत प्रवेश करून सप्तम स्थानांत शिरण्याच्या आरंभींच बाईंचा कल नास्तिक वादापसून **सोश्यालिझम** कडे वळूं लागला. या वेळेस दिनवर्ष पद्धतीनें बुधशनींचा केंद्रयोग सुरूं होता. बेझंट बाई हर्शलच्या तूळ राशींतील अर्ध्या भ्रमणापर्यंत सुद्धां सोशियालिस्ट राहिल्या नाहींत. हर्शल मूळ स्थानाशीं प्रतियोग करूं लागला त्या वेळीं त्यांचा सोशियालिझम डळमळूं लागला. हर्शल मूळ बुधावरोबर युतियोग करीत असतां बेझंट बाई **थिऑसफिस्ट झाल्या.** कोठें नास्तिकवाद आणि कोठें थिऑसफी ! त्यांस न पटणारी धार्मिक बंधनें तोडण्यांत बेझंट बाईंनीं दाखविलेलें धारिष्ट स्त्रियांमध्यें काय परंतु पुरुषांमध्येंही पहावयास न मिळणारें आहे. हें धारिष्ट चंद्र—मंगळांच्या द्विराश्यंतर योगानें आलें आहे. त्यांचीं मतांतरें

कितीहि आश्चर्यकारक असोत तरीपण त्यांची कर्तृत्व शक्ति जबरदस्त दिसत आहे. ज्या योगांमुळें त्यांची कुंडली बलवत्तर झाली आहे ते योग पहाण्यासारखे आहेत. ( १ ) केंद्रांमध्यें चर राशींत ६ ग्रह ( २ ) उच्च गुरु कोणामध्यें आणि स्वगृहीचा शुक्र केंद्रामध्यें ( ३ ) सर्व शुभग्रह केंद्र कोणांत आणि ( ४ ) पंचमेश—चतुर्थेश चंद्र व भाग्येश गुरु यांची युति. शेवटचा **गुरु–चंद्रांचा युतियोग** अत्यंत महत्वाचा आहे. पुष्कळ अंशीं याच योगामुळें बेझंट बांईचें महत्व वाढलें आहे. प्रस्तुत कुंडलींत महत्वाच्या ग्रहांमध्यें अनिष्ट असे केंद्रयोग व प्रतियोग झाले असुन **सर्व पापग्रह वक्री** आहेत. हे योग संकटपरंपरेचे द्योतक आहेत. प्रस्तुत कुंडलींतील धर्म ( नवम ) स्थानाचा अधिपति गुरु पंचम स्थानामध्यें आहे म्हणून बेझंट बाई धार्मिक बाबतींत पडल्या आहेत. पंचम स्थानांत उच्च गुरूमुळें त्यांचा शिष्यवृंद बराच मोठा आहे.

बेझंट बाईनीं आजपर्यंत जीं अनेक कामें केलीं त्या कामांत यश मिळण्यास त्यांचें **असामान्य वक्तृत्व** कारणीभूत झालें आहे. हें वक्तृत्व सप्तम स्थानांतील वायु राशीच्या बुध–शुक्रांमुळें प्राप्त झालें आहे. रजोगुण प्रधान अशा मंगळाची राशि पूर्व केंद्रीं उदय पावत असून मंगळ उदित होऊं पहात आहे आणि चर राशि व केंद्रस्थानें यांमध्यें ६ ग्रह आहेत त्यामुळें त्यांचा काम करण्याचा हव्यास जबरदस्त आहे. त्यांच्या कुंडलींतील रविचंद्रांची स्थिति लक्ष्यांत घेतली असतां असें आढळून येईल कीं त्यांची मानसिक वृत्ति फारच प्रबळ आहे. त्यांच्या मनास जी गोष्ट करावयाची येते तिच्यासाठीं त्या अविश्रांत श्रम करतील. परंतु गोष्ट बरोबर आहे किंवा नाहीं याचें प्रामाण्य केवळ त्यांची मनःप्रवृत्ति ही होय. येथें तात्विक विचारास फारसें प्रामाण्य आहे असें दिसत नाहीं कारण बुद्धीचा कारक ग्रह बुध गुरूबरोबर केंद्रयोग आणि हर्शल बरोबर प्रतियोग करीत आहे. त्याच प्रमाणें तत्वज्ञानाचा कारक ग्रह शनि व्यय स्थानांत पडला आहे. या योगांमुळें तात्विक विचारांची वाढ या कुंडलींत फारशी दिसून येत नाहीं. बेझंट बाई धर्मगुरु या नात्यानें हल्लीं काम करीत आहेत म्हणून त्यांच्या धार्मिक अधिकारासंबंधानें त्यांच्या कुंडलीचा पुढें एखादे वेळीं अवश्य विचार करणार आहों.

**‘ राम नारायण.’**

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्यामतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रीद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष १ लें. | नोव्हेंबर १९१५. | अंक ८ वा.

## प्रासंगिक विचार

ज्योतिर्मालेचा पहिला अंक प्रसिद्ध केल्यानंतर फलज्योतिषाचें **मासविज्ञान** नांवाचें दुसरें मासिक निघत असल्याची जाहिरात ‘केसरी’ मध्यें पहावयास मिळाली. जाहिरात वाचून अत्यंत आनंद झाला. कारण गेल्या २।३ वर्षांत ज्योतिषशास्त्रासंबंधानें निघत असलेलीं मासिकें एकदम संकटपरंपरेनें बंद पडून ज्योतिषवाङ्मय प्रकाशहीन होण्याचा समय आला होता. अशा वेळीं एक दोन मासिकें सुरूं होत असल्याचें पाहून ज्योतिषशास्त्राभिलाषी लोकांस आनंद होणें साहजिक आहे. कोणतेंही शास्त्र असो त्याची चर्चा करणारीं जितकीं मासिकें असतील तेवढीं हवीच असतात आणि म्हणूनच आम्ही आमच्या ह्या भावंडाची फारच उत्सुकतेनें वाट पहात होतों. अखेरीस एक दोन महिन्यांनीं मालेच्या भेटीस एक छापील पोस्ट कार्ड आलेलें पाहून आमचा तो पूर्वीचा आनंद पार मावळून जाऊन हें आहे तरी काय अशा बुचकळ्यांत पडलों. त्यानंतर दुसरें एक छापील पोस्ट कार्ड मिळालें त्याची अस्सल बरहुकुम नक्कल आमच्या वाचकांसाठीं प्रसिद्ध करीत आहों.

मासविज्ञान ऑफीस, पुणे.

**नं. ४. मासफल.**

[ १५ आगष्ट ते १५ सप्टेंबर ]

हा मास जनतेस म्हणण्यासारखा सौख्यकारक नाहीं. रोगराईपासून त्रास होईल. वृष्टियोगाला पूर्ण अनुकूल असे ग्रहांचें मान नसून कांहीं ठिकाणीं नुकसान होईल. पर्जन्याचें मान कमीच. एका श्रेष्ठ पुरुषाच्या हातून लोककल्याणकारक गोष्टीस मदत होईल. गुळ, डाळ, तांबड्या वस्तु, रंग वगैरेस तेजी. पांढऱ्या वस्तूस मंदी. पिंवळ्या रंगाच्या वस्तूस ता. २९ नंतर तेजी होईल. धान्यांचे भाव वाढतील.

मेष, सिंह, तुळ, कुंभ, मीन लग्नांश राशीच्या लोकांस हा मास द्रव्य लाभालाभ व धंद्याला अनुकूल आहे. अकस्मात् फायदा देणारे ग्रह आहेत. वृषभ, कर्क, वृश्चिक, मकर या राशींच्या लोकांस मास चांगला नाहीं. अनेक तऱ्हेच्या अनेक अडचणी येऊन द्रव्य हानी व कष्ट फार होतील इतर राशीच्या माणसास हा मास मध्यम आहे.

---

वर्गणीदारांनीं आजपर्यंतचा अनुभव काय आला हें स्पष्ट कळविण्याची मेहरबानी करावी. न्यु. प्रि. प्रेस, पुणे. संपादक.

\+ +
\+

**मासविज्ञान**कारांनीं जाहिरातींत ज्याचें त्यास मास फल करतां येऊन व्यापारासंबंधानें तेजी मंदी कळून व्यापारी लोकांस फायदा करून घेतां येईल वगैरे जाहिरातीद्वारें जनतेस दिलेलें वचन सदरहू-**मास फळानें** पूर्ण होत आहे काय? फल ज्योतिषशास्त्र इतकें सोपें आहे किंवा काय? नुसत्या लग्नराशीवरून किंवा चंद्रराशीवरून अचुक मासफल तयार करतां येतें काय? असें आहे तर दशा, ताजिक व ताजिकच्या दशा कां व कशाकरतां प्रचारांत आल्या? कापसाचे किंवा इतर व्यापारांत एक पेनी तेजी किंवा मंदी आली असतां हजारों किंवा लाखों रुपयांच्या घडामोडी मुंबईस



होतात याची कल्पना मासविज्ञानकारांस आहे काय? अशाच तऱ्हेचें साधारण तांबड्या काळ्या वस्तूंचे महागाई किंवा स्वस्ताई संबंधाचें वर्णन **इंदूच्या** शीतल किरणद्वारें प्रकाशित होत असलेल्या पंचांगांत गेल्या ९१६ वर्षे दिलें जात आहे. ह्या व्यतिरिक्त मासविज्ञानकारांनीं विशेष जास्त असें जनतेपुढें काय मांडलें आहे? वर्गणीद्वारा घेतलेल्या पैशाचा योग्य मोबदला आहे काय? वगैरे अनेक प्रश्न आम्हांपुढें आमच्या कांहीं मित्रमंडळीनें मांडले आहेत व याचें सोपपत्तिक उत्तर देणें आमच्या शक्तीबाहेर आहे.

\+ +
\+

१२ ऑगस्टच्या केसरींत तर चार आण्यांत चार महिन्यांचें मासफल व एक फलज्योतिषासंबंधानें पुस्तक देण्याचें मासविज्ञानकारांनीं प्रसिद्ध केलें आहे. हल्लीं विसाव्या शतकांत प्रत्येकास व्यक्ति स्वातंत्र्य पूर्ण आहे व जाहिरातीसारखी पंधरावी विद्या अवगत झाली असल्याकारणानें लागेल तशी जाहिरात देणें योग्य असलें तरी अशा कृतीनें शास्त्राची हेटाळणी किंवा थट्टा करणें योग्य आहे काय? आमच्या ह्या कृतीनें जर एखाद्यानें इंग्लंडांतील फलज्योतिषाविरुद्ध Vagrant's Act सारखा कायदा कायदेकौंसिलांत पास करून घेतला आणि त्या कायद्याखालीं ज्योतिषी लोकांवर फौजदारी खटले करण्यास सुरुवात झाली तर त्याबद्दल जबाबदार कोण? कायदा पास करणारे किंवा अशा तऱ्हेनें शास्त्राचा दुरुपयोग करणारे लोक?

\+ +
\+

उज्जनी येथील **जयसिंहानें** बांधलेल्या वेधशाळेचा जीर्णोद्धार करण्याकरतां स्थापन झालेल्या **पंडिताश्रम** सभेचे प्रधान मंत्री पंडित रघुनाथशास्त्री वेलणकर, उज्जनी, यांचेकडून वरील सभेमार्फत कार्तिक शुक्ल १३ स ज्योतिर्विदांचें **महासंमेलन** भरण्याविषयींचें विनंती पत्र आलें आहे. सदरहु संस्थेस ग्वालेर दरबारांतून राजाश्रय असल्याचें दिसतें. पंचांग गणिताची सत्यता पहाण्याकरतां वेधशाळेची किती आवश्यकता आहे याची जाणीव **मालेच्या**

वाचकास नव्यानें करून दिली पाहिजे असें वाटत नाहीं. यंत्रशाळेच्या जीर्णोद्धाराच्या कामासंबंधीं जें खर्चाचें अंदाजपत्रक तयार केलें आहे त्यावरून ह्या महत् कार्यास रु. २४९२७९ ८१३ ८३ खर्च लागेल असें दिसतें.

\+ \+
\+

सन १९०९ सालीं पंचांग शोधन कमिटी मार्फत ज्योतिर्विदांचें पहिलें सम्मेलन मुंबई येथें झालें होतें. त्याचप्रमाणें दुसरें सम्मेलन उज्जनी येथें भरविण्याचें महत्कार्य ह्या सभेनें अंगावर घेतलें आहे. संमेलनाचें काम कार्तिक शुद्ध १३ पासून कार्तिक कृष्ण २ पर्यंत चालणार आहे. पंडिताश्रम सभेनें संमेलनास सर्व धर्मांचे व सर्व मतांचे ज्योतिर्विदांस निमंत्रण केलें आहे. १०० ज्योतिर्विदांची एक कमिटी नेमून तिच्या मार्फत पांच दिवस व्याख्यानें, निबंधवाचन व ज्योतिष व यंत्रशालेसंबंधानें विचार होणार आहे. ह्या पांच दिवसांत रहाण्याची, भोजनाची व शक्य तितक्या वाटखर्चाची व्यवस्था करण्याचें सभेच्या मनांत आहे. पंडिताश्रम सभेचें कार्य किती पवित्र, उदात्त व महत्वाचें आहे यासंबंधानें आम्ही विशेष लिहिलें पाहिजे असें नाहीं. असल्या महत्कार्यास राजाश्रय व लोकाश्रय जितका मिळेल तितका थोडाच होणार आहे, ज्या कोणा मालेच्या वाचकांस किंवा इतर ज्योतिर्विदांस महासंमेलनास जावयाचें असेल किंवा शक्य तेवढी मदत हस्तें परहस्तें करावयाची असेल त्यांनीं वरील प्रधान मंत्री यांजबरोबर पत्रव्यवहार करावा.








# राशिधर्मनिरूपण.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**मीन** राशि **गुरूची** स्वगृहराशि मानतात. **शुक्र** ह्या राशीमध्यें आपल्या उच्चक्षेत्रीं असतो. नेपच्यून हा ग्रह जलतत्वाचा कारक असल्यामुळें ह्या राशींत बराच बलवान आढळतो. **रवि** व **चंद्र** साधारण बलवान् असतात. **बुध मंगळ**, व **शनि** हे ग्रह ह्या राशीमध्यें निर्बली असतात.

**मीन** लग्नावर जन्म पावणारे लोक अशक्त असतात, व त्यांस बहुधा आंतड्याचे रोग, संधिवात, थंडीचे विकार व उदरव्यथा यांमुळें त्रास होतो. या राशीच्या मनुष्यांनीं आहारासंबंधीं विशेष सावध राहावें. सर्व प्रकारचे उत्तेजक पदार्थांपासून शक्य तेवढें दूर राहावें. सदरहु मनुष्यांस स्पर्शजन्य व सांथीचे रोग, थंडीवाऱ्यासंबंधी विकार ह्यांपासून विशेष भीति असते. मीन राशीच्या मनुष्यांमध्यें विसराळुपणा व स्वतःचे सुखदुखांसंबंधानें निष्काळजीपणा विशेष पाहण्यास मिळतो.

ह्या राशीच्या लोकांनीं मोठाले जलाशय किंवा समुद्र किनाऱ्याजवळचे प्रदेशांत किंवा डोंगराळ मुलखांत हवा बदलण्यास किंवा रहाण्यास जावें. या लोकांस जेथें सृष्टिसौंदर्य विपुल आढळतें अशा प्रदेशांत राहिल्यानें प्रकृतीस पुष्कळ आराम मिळतो. **पुष्पराग** नांवाचें रत्न या लोकांनीं धारण करावें व त्यास **गुरुवार** हा शुभ दिवस असतो. मीन राशीचा रंग **आर्य** म्हणजे **मत्स्यासारखा पांढरा** मानलेला आहे. यूरोपीय ज्योतिर्विद् ह्या राशीचा रंग **निळा** मानतात.



# नक्षत्रविचार.

लेख १ ला.

ज्योतिर्मालेच्या ७ अंकांत ग्रह व राशि यांचे गुणधर्माचें सविस्तर विवेचन केलेलें वाचकांस माहित आहे. आतां नक्षत्रांच्या गुणधर्माचा विचार करावयाचा आहे. क्रांतिवृत्ताचे किंवा राशिचक्राचे समान २७ विभाग करतात त्यांस **नक्षत्रें** असें म्हणतात. म्हणून प्रत्येक नक्षत्राची व्याप्ति १३ अंश व २० कला असते. क्रांतिवृत्ताच्या १६ अंशांच्या पट्टयांत कांहीं स्थिर तारकापुंज आहेत. त्यांचीं नांवें व ह्या विभागात्मक नक्षत्रांचीं नांवें सारखींच आहेत. स्थिरतारकापुंजात्मक नक्षत्रें समान अंतराचीं नाहींत. परंतु विभागात्मक नक्षत्रें समान अंतराचीं म्हणजे १३ अंश व २० कलेचीं आहेत. निरयण व सायन हीं दोन्हीं नक्षत्रें विभागात्मक आहेत. नक्षत्रांचीं नांवें त्यांच्या स्थिर तारकापुंजांवरून पडलीं आहेत किंवा फळदेशांवरून पडलीं आहेत या संबंधानें आज एकमत नाहीं. त्याचप्रमाणें पूर्वी अठ्ठावीस नक्षत्रें मानीत असतां त्यांपैकीं अभिजित नक्षत्र कधींपासून गाळण्यास सुरवात झाली व हल्लींचें सत्तावीस समविभागात्मक राशिचक्र कधींपासून मानण्यांत येऊं लागलें यासंबंधानें माहिती उपलब्ध नाहीं. खाल्डियन, अरेबिक व हल्लींचे यूरोपीय ज्योतिर्विद अठ्ठावीस समविभागात्मक नक्षत्रें मानतात. आणि त्यांचे मतें प्रत्येक नक्षत्र १२$\frac{6}{7}$ अंशाचें असतें. त्यांस ते Lunar mansions **चंद्राची वस्तीगृहें** म्हणतात. ह्या दोन नक्षत्रांपैकीं कोणता विभाग जास्त उपपत्तीस धरून आहे किंवा कोणती पद्धति विशेष चांगली आहे हें ठरविण्याचें काम फारच बिकट आहे. दोन्हीहि विभागात्मक नक्षत्रपद्धति शास्त्रीय पद्धतीस धरून आहेत. प्रस्तुत लेखांत आपण प्रचारांत असलेल्या सत्तावीस नक्षत्रांचा विचार करण्याचें योजिलें आहे. व दुसऱ्या एखादे वेळीं यूरोपीय ज्योतिर्विद अठ्ठावीस नक्षत्रांचा कसा काय उपयोग करतात वगैरे गोष्टींचा खुलासा करण्यांत येईल.

भारतीय आर्यांची पूर्वीची जातकपद्धति नक्षत्रात्मकच आहे. **वेदांगज्योतिष** ह्याची पूर्ण खातरी पटली आहे. **अथर्व ज्योतिषांत** जातकपद्धति नक्षत्रांवर सांगितलेली आढळते. कालान्तरानें ती मेषादि राशींवर आली. म्हणजे सूक्ष्म होती तीं पुढें स्थूल झाली! मेषादि राशींची कल्पना आपली नसून ती आपण



इतर राष्ट्रांकडून घेतली आहे असें पुष्कळांचें मत आहे. त्याच वेळीं जातकपद्धति नक्षत्रावरून नक्षत्रचरणावर किंवा नक्षत्रचरणावरून अंशावर जाण्याऐवजीं नक्षत्रावरून राशींवर आली असली पाहिजे. **भारत कालीं** नक्षत्रपद्धतीचाच उल्लेख आढळतो. आणि ह्या काळानंतर हल्लींची राश्यात्मक जातकपद्धति प्रचारांत आली असली पाहिजे. आपणांस जर जातकपद्धतीची सुधारणा करणें असेल तर पुन्हां आपणास नक्षत्रांचे गुणधर्माकडे लक्ष्य अवश्य दिलें पाहिजे व जातकपद्धति नक्षत्रचरणावर नेली पाहिजे.

ग्रहांचीं राशिपरत्वें फलें सर्व ग्रंथांत वर्णन केलेलीं आढळतात; पण नक्षत्रपरत्वें फलवर्णन केलेलें कोठेंच जातकविभागांत आढळत नाहीं. मुहूर्त ग्रंथांत नक्षत्रपरत्वें विचार केलेला आढळतो. नक्षत्रांचे फलासंबंधानें सोपपत्तिक विवेचन करण्याची प्रथमतः रा. रा. विष्णु गोपाळ नवाथे यांनीं ३।४ वर्षांपूर्वी सुरवात करून पुष्कळच पल्ला गांठला आहे व त्यांचें मासिक चालू असतें तर आज खात्रीनें कितीतरी नवीन गोष्टींची भर ज्योतिषवाङ्मयांत पडली असती. असाच थोडाबहुत प्रयत्न रा. रा. घोलप संपादक "फल ज्योतिषादर्श" यांनीं चालविला होता. त्यांच्या प्रयत्नांत जरी नवीन असे फारच थोडें बाहेर आलें तरी निव्वळ आंकडे कुंडलीचें स्तोम माजविणें व्यर्थ असून नक्षत्रचरणावर कुंडली फलादेशाच्या सूक्ष्मतेकरतां वेणें चांगलें असें प्रतिपादन केलें आहे हें विशेष महत्वाचें आहे. प्रस्तुत लेखांत आजपर्यंत नक्षत्रांसंबंधीं जे विचार इतस्ततः प्रसिद्ध झाले आहेत त्यांपैकीं आमच्या अनुभवास पटणारीं नक्षत्र-फलें येथें दिलीं आहेत. या व्यतिरिक्त वाचकांस जो अनुभव आला असेल किंवा येईल तो त्यांनीं आम्हांस अवश्य पत्रद्वारें कळविला असतां **मालेंत** छापण्याची व्यवस्था केली जाईल.

असो, **क्रांतिवृत्ताचे** १३ अंश २० कलांचे जे सत्तावीस समविभाग त्यांस नक्षत्रें असे म्हणतात असें मागें सांगितलें आहे त्यांचीं नांवें व फलादेश खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत. हें खालीं दिलेले नक्षत्रांचे गुणधर्म जेव्हां जन्मकालीं **चंद्र, रवि** किंवा **लग्न** हे त्या त्या नक्षत्रांत असतात तेव्हां विशेष दृष्टोत्पत्तीस येतात.

**अश्विनी.**—मन अति चंचल, सदा फिरण्याची आवड, लांबचे किंवा दूर देशांत प्रवास करणारा, तीव्र, बुद्धिमान, अति महत्वाकांक्षी, परोपकारी, प्रकृति

उष्ण, सात्विक व धनाढ्य. हें नक्षत्र ज्याप्रमाणें पहिलें आहे त्याचप्रमाणें मनुष्यास महत्व पद देतें. या नक्षत्रांत रवि, चंद्र अगर गुरु असणें शुभदायक आहे. जगांतील महत्वाकांक्षी, उलाढाली करणारे किंवा प्रमुखत्व पावलेल्या मनुष्यांचे कुंडल्यांत या नक्षत्रीं रवि, चंद्र, गुरु किंवा मंगळ आढळतो. हें नक्षत्र उग्र व सत्वगुणी आहे.

**भरणी.**—कामी, परदारासक्त, खुनशी, साधारण कुशल व बुद्धिवान, महत्वाकांक्षी, एककल्ली किंवा ताली, हट्टी व लवकर रागावणारा. हें नक्षत्र रजोगुणी असून क्रूर नक्षत्र आहे.

**कृत्तिका.**—हें अग्नि नक्षत्र आहे. ह्या नक्षत्राच्या प्रथम चरणाची विशेष कडक फलें पाहण्यास मिळतात. प्रकृति अति उष्ण, बहुधा दंतविकार, शरीराच्या कोणत्या तरी भागांतून रक्तस्राव होण्याचा विकार, चेहरा उग्र, शिपाईबाणा, साहस कर्मांत निपुण असून पूर्ण तमोगुणी आहे. या नक्षत्रांत शनि, राहू, हर्शल, किंवा मंगळ असून रवि, चंद्र किंवा लग्नाबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां शरीरास नाना तऱ्हेच्या दुखापती, अपघात वगैरे होतात.

**रोहिणी.**—वर्ण गौर, शांत, सत्वगुणी, सालस, बुद्धिमान, विद्वान, विलासी स्त्रीप्रिय, गायनवादनाची गोडी, धनवान व शरीरसौंदर्य उत्तम हे या नक्षत्राचे सहजधर्म आहेत. चंद्र, शुक्र, किंवा गुरु ह्या नक्षत्रांत असतां शुभ फलें विशेष पाहण्यास मिळतात.

**मृग.**—कुटिल, कामातुर, बागबगीच्याची आवड बाळगणारा, साधारण बुद्धिमान्.

**आर्द्रा.**—हें तीक्ष्ण नक्षत्र आहे. तथापि तें कृत्तिका सारखें घातक नाहीं. विद्वत्ता व बुद्धिमत्ता चांगली. स्वभाव व प्रकृति कडक.

**पुनर्वसु.**—कवि, ग्रंथकार, विद्वान, बौद्धिक कामें करणारा, नीतिमान व सत्वगुणी. या नक्षत्रांत **बुध** अतिशय बलवान् असेल.

**पुष्य.**—ईश्वरभक्त, शांतात्मा, नीतिमान्, परोपकारी, सुखी, श्रीमान, मोठी किंवा जगप्रसिद्ध कामें करणारा. या नक्षत्रांत **गुरु** फार बलवान असतो. हें सत्वगुणी नक्षत्र आहे. पुष्य नक्षत्रांत गुरु-चंद्र-युति महत्भाग्य व ऐश्वर्य देतें.

**आश्लेषा.**—हें दुष्ट नक्षत्र आहे. आंतल्या गांठीचा, धूर्त, सर्वभक्षक, कृतघ्न, मंदबुद्धीचा अशीं याचीं फलें आहेत.



**मघा.**—हें तीव्र नक्षत्र आहे. महत्वाकांक्षी, अधिकारप्रिय बलवान, प्रसिद्ध, साहसी, वर्ण काळा, संततिसुख कमी; या नक्षत्रांत **रवि, गुरु** व **मंगळ** बलवान असतात. या नक्षत्रांत पापग्रहाचा योग हृदयाचे विकार दर्शवितो.

**पूर्वा.**—सत्वगुणी, बुद्धिमान, शरीर चांगलें, धनाढ्य, श्रीमंतीची इच्छा करणारा, प्रियवक्ता व तेजस्वी.

**उत्तरा.**—मानी, कृतज्ञ, बुद्धिमान, भाग्यवान व सुखी.

**हस्त.**—हें देवनक्षत्र आहे. शारीरसौंदर्य चांगलें, कलाकुशल, विद्वान व उत्साही.

**चित्रा.**—हें किंचित् उग्र नक्षत्र आहे. स्वभाव तामसी, दुर्गुणी, परस्त्रीरत, आळशी, बुद्धि व विद्या साधारण.

**स्वाती.**—सत्वगुणी, नीतिमान, प्रियवक्ता, विद्वान, व बुद्धिमान, गुणी, आनंदी, शरीराचे अवयव लांबट. ह्या नक्षत्रांत **शुक्र** व **शनि** बलवान असतात.

**विशाखा.**—हें तीक्ष्ण, घातक व विषारी नक्षत्र आहे. विद्या व बुद्धि कमी. या नक्षत्रांत **रवि** किंवा **चंद्र** पीडित असतां फारच अनिष्ट फलें पाहावयास मिळतात. या नक्षत्रांत पापग्रह नसावा.

**अनुराधा.**—हें विषयासक्त आहे. कामेच्छा जबर असते. **चंद्र, शुक्र** अगर **मंगळ** या नक्षत्रांत असतां मनुष्याला कामविचार जबर असतो.

**जेष्ठा.**—हें तीव्र व घातक नक्षत्र आहे. स्वभाव हट्टी व खुनशी असतो. गुह्य रोग होतात.

**मूळ.**—तेजस्वी, अति रागीट, साहसी, महत्वाकांक्षी, राजकीय उलाढाली करणारा व कुलदीपक. या नक्षत्रांत **रवि, गुरु, चंद्र, मंगळ** बलवान असतात.

**पूर्वाषाढा.**—बलवान्, धनवान्, सुखी, ऐश्वर्यवान् व मित्रसंपन्न.

**उत्तराषाढाः**—रजोगुणी, विद्या व बुद्धि साधारण, शरीर मजबूत, धाडसी, वर्ण निमगोरा. ह्या नक्षत्रांत रवि, व मंगळ साधारण बलवान असतात.

**श्रवणः**—सत्वगुण प्रधान व देव नक्षत्र आहे. सदाचारसंपन्न, कर्मठ, सच्छील, बहुश्रुत आपल्या बायकांपोरांबद्दल विशेष काळजी वाहणारा, पितृभक्त, विद्वान, वर्ण गौर, शरीरसौंदर्य चांगलें. या नक्षत्रावर जन्मणारा प्राणी महत्वाकांक्षी, मोठीं कृत्यें करणारा, व कर्ता होतो.

**धनिष्ठा.**—हें दुष्ट स्वभावाचें व उग्र नक्षत्र आहे. या नक्षत्रावर खादाड, दुष्ट, निर्दय, साहसी, हिंसक, अविचारी, धष्टपुष्ट, शरीर बोजड, अंगावर पुष्कळ केश व मोठ्या उलाढाली करणारा असतो. ह्या नक्षत्रांत मंगळ बलवान आडळतो.

**शततारका.**—रजोगुणी, शरीरसौंदर्य मध्यम, वर्ण काळसर, बुद्धिमान, स्पष्टवक्ता, व विद्वान. या नक्षत्रांत बुध, शनि व हर्शल ( प्रजापति ) बलवान असतात.

**पूर्वाभाद्रपदा.**—हें देवनक्षत्र आहे. सत्वगुणी, कल्पक, विद्याव्यासंगी, बौद्धिक कामें करणारा, शरीरसौंदर्य साधारण, कीर्तिमान व धनवान असा मनुष्य निपजतो. या नक्षत्रांत चंद्र, बुध, शनि, हर्शल बलवान असतात.

**उत्तराभाद्रपदा.**—अधीर बुद्धीचा, वर्ण साधारण गौर, केश अल्प, साधारण बुद्धिमान व विद्वान.

**रेवती.**—सत्वगुणप्रधान, सुखी, धनवान व ऐश्वर्यवान, शरीर ठेंगणें, बुद्धिमान, पवित्र; या नक्षत्रांत **चंद्र, गुरु** व **शुक्र** उत्तरोत्तर बलवान असतात.

याप्रमाणें नक्षत्रांचे साधारण गुणधर्म आहेत. स्थानपरत्वें व ग्रहपरत्वें यांचीं फलें भिन्न भिन्न होतात.

* * *

**मघा, जेष्ठा,** मूळ व धनिष्ठा हीं चार **राक्षसी** अथवा क्रूर नक्षत्रें असून फार महत्वाचीं **आहेत.** जीं माणसें मोठाल्या उलाढाली करितात, कसल्याही संकटास डगमगत नाहींत, आपल्या अंगांतील कर्तृत्वशक्तीनें अचाट व लोकोत्तर कामें करितात त्यांच्या कुंडलींत वरील नक्षत्रांत ग्रहांचें प्राबल्य आढळतें.

* * *

वरील चार क्रूर नक्षत्रांत खालीलप्रमाणें ग्रह बलवान आढळतातः—

**मघाः**—रवि, मंगळ, हर्शल, चंद्र व गुरु. ( अपूर्ण )



# प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्यांचा संग्रह.


## नंबर ८. नामदार गोपाळ कृष्ण गोखले.



**नामदार गोपाळराव गोखले** यांच्या जन्मकाळीं **तूळ** राशीचा २९ वा अंश उदय पावत असून लग्नाधिपति शुक्र अष्टम स्थानांत मिथुन या राशींत आहे आणि लग्न केंद्रीं गूढ राशीमध्यें पंचमेश शनि उदित होऊं पहात आहे. राशिचक्रांतील सर्व राशीमध्यें **तूळ** राशि समतोल वृत्ति, न्यायी आचरण, सुस्वभावीपणा आणि सत्वशीलता या **गुणांची** निदर्शक आहे. ज्या परिस्थितींत पुढें पाऊल टाकणें अशक्य होतें त्या वेळीं तडजोड करून आपलें ध्येय साधण्यासाठीं पुढील मार्ग तयार करून ठेवणें हें तूळ राशीला जितकें साध्य होतें तितकें दुसऱ्या कोणत्याच राशीस होत नाहीं. हे तूळ राशीचे गुण **नामदारांच्या** अंगीं **स्वभावसिद्ध** होते. प्रस्तुत कुंडलीमध्यें मनोभावनादर्शक जो योग झाला आहे तो असवडीनुसारणीय आहे. **मेष** या अग्नि व चर राशीमध्यें **बुध** असल्यामुळें प्रवृत्ति सहज क्षुब्ध

होऊन जाणारी आहे असें दिसतें परंतु **वृषभ** या स्थिर राशीमध्यें **रवि** व **मीन** राशीमध्यें **चंद्र** असल्यामुळें त्यांच्या स्वभावांत प्रक्षुब्धता कमीच दिसते आणि लग्नकेंद्रीं तूळ राशि आणि गूढ राशीचा शनि उदय पावत आहे त्यामुळें आत्मसंयमन करण्याची शक्ति फारच जबरदस्त होती असें स्पष्ट दिसत आहे. लग्नांतील **शनि** व पंचमांतील **चंद्र** यांचा तंतोतंत होत असलेला नवपंचम योग त्यांच्या मनाची पवित्रता दर्शवीत आहे.

**सा. ल.**




**नामदार गोखले** अविश्रांत श्रमानें, सत्संगानें, सुप्रसंगांच्या सहायानें आणि निर्लोभ आचरणानें लोकनायकाच्या पदवीला पोंचले. हातीं घेतलेलें एक काम पुरें करून प्रसंगानें जीं कामें पुढें आलीं तीं करीत असतां त्यांच्या अंगच्या गुणांचा विकास झाला. त्यांच्या आयुष्याचा आरंभ शिक्षणदानाच्या द्वारें झाला. दशमस्थान हें कर्तृत्वाचें स्थान आहे. ह्या स्थानाचा अधिपति चंद्र मीन राशीमध्यें पंचमांत आहे व मीन राशीचा संबंध लोकोपयोगी संस्थांशीं [illegible] क्षत्रांत [illegible]चा अधिपति **बुध** हा नामदार गोखल्यांचा आत्मक[illegible] मंगळ, हर्शल, [illegible]वरून सुद्धां विद्यादानाचा विचार होतो.



त्यांच्या आयुष्यांत घडलेल्या महत्वाच्या गोष्टींमध्यें बुधाच्या योगांचेंच प्राबल्य फार आहे. हे योग **दि. व. पद्धति** व ***परिभ्रमण पद्धति** या दोन्ही पद्धतींनीं पहावयास सांपडतात. १८८४ सालीं परिभ्रमण काळचा बुध पंचमस्थानीं असतां गोखले बी. ए. झाले. हाच बुध सप्तमांत आल्यावर दक्षिण विद्याप्रसारक मंडळास येऊन मिळाले. या वेळीं दि. व. पद्धतीनें चलित बुध मूळ रवीबरोबर युति करीत होता. हा शेवटचा योग ज्या वेळीं तंतोतंत झाला आणि परिभ्रमण काळचा बुध गुरूच्या पंचमांत असतां नामदारांचा न्यायमूर्ति रानड्यांशीं शिष्यत्वाचा संबंध जुळून आला. या वेळीं पुढील कार्यासाठीं उपयोगी पडणाऱ्या शिक्षणाचे धडे आपल्या गुरूजवळ शिकत होते. नामदार गोखल्यांनीं सार्वजनिक कामें करण्यास याच वेळीं आरंभ केला व पुढील कार्यरूपी इमारतीचा पाया गुरूच्या सान्निध्यांत भक्कम करण्यांत आला. शिक्षणदानाचें काम करीत असतां उत्तरोत्तर नामदार गोखले सार्वजनिक कामांत निरपेक्षतेनें अधिक मन घालूं लागले. लग्नीं उदय पावत असलेल्या शनीच्या धर्माप्रमाणें कष्टाळुपणानें काम करण्याचा गुण त्यांच्या फारच उपयोगी पडला. नामदार गोखले हे राजकारणांत उमेदवारी करीत असतां वेल्बी कमिशनचें ९७ साल आलें. या वेळीं नामदार गोखले यांचें ३१ वें वर्ष सुरू असून चलित दशम मूळ बुधाबरोबर त्रिकोण योग करीत होतें. हा योग चालला असतां त्यांची इंग्लंडांत वेल्बी कमिशनपुढें

---

* ह्या पद्धतीसंबंधानें उल्लेख कै. **चिटणीस** यांनीं आपल्या ज्योतिर्माला वर्ष १ लें यांत केला आहे. ग्रहांचीं परिभ्रमणांची वर्षें खालीलप्रमाणें आहेतः—**रवि** १९ वर्षें, **चंद्र** ४ वर्षें, **मंगळ** १९ वर्षें, **बुध** १० वर्षें, **गुरु** १२ वर्षें, **शनि** ३० वर्षें, **राहु** १८ वर्षें, हर्शल ८४ वर्षें, नेपच्युन सरासरी १६४ वर्षें. ह्याप्रमाणें ग्रहांचीं परिभ्रमणाचीं वर्षें आहेत म्हणजे तो तो ग्रह त्या त्या वर्षांत आपली द्वादश राशींतील तील प्रदक्षिणा पूर्ण करितो. ह्या पद्धतीसंबंधानें सवडीनुसार विवेचन करण्याचा आमचा विचार आहे.

**संपादक.**

साक्ष झाली. ह्या कमिशनपुढें हिंदी राजकारणांत कसलेले दादाभाई व वाच्छा यांच्याहि साक्षी झाल्या. गोखल्यांच्या या वेळच्या अपूर्व कामगिरीमुळें भारतीयांचें लक्ष्य त्यांच्याकडे वेधलें व हिंदी राजकारणाच्या क्षेत्रांत अपूर्व दीप्तीचा तारा उगवत आहे असें सर्वांस वाटलें. चलित दशम व बुध यांच्या शुभ योगाचें कार्य झालें. नंतर चलित मंगळाचा मूळ दशम स्थानाशीं होत असलेल्या केंद्रयोगाची व गोचरीच्या हर्शल शनीच्या मूळ रवीशीं होत असलेल्या प्रतियोगांचीं अनिष्ट फलें मिळावयाचीं होतीं. नामदारांनीं इंग्लंडांत असतां पुण्याच्या १८९७ च्या दंगलीसंबंधानें कांहीं विधानें केलीं होतीं त्यासंबंधानें त्यांस सरकारची सपशेल माफी मागावी लागली. अशी माफी मागणें जरी सरळपणाचें होतें तरी बऱ्याच लोकांनीं वस्तुस्थितीचा विपर्यास करून त्यांच्या कामगिरीकडे लक्ष्य न देतां त्यांच्यासंबंधानें अप्रीति उत्पन्न होईल असे प्रयत्न केले. कांहीं कालपर्यंत या दीप्तिमान् ताऱ्याचा प्रकाश काळ्याकुट्ट ढगांनीं झांकला गेला ! नामदारांनीं आपलें लोकसेवेचें काम अव्याहत पुढें चालू ठेविलेंच होतें. १९०० सालीं मुंबई कायदे कौंसिलाचे ते सभासद झाले व १९०२ सालीं हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौंसिलांत त्यांचा प्रवेश झाला. या वेळीं चलित रवि मूळ बुधाबरोबर तृतीय एकादश हा योग करीत होता. १९०९ सालीं ज्या वेळीं चलित शुक्र मूळ दशमाशीं युति करूं लागला त्या वेळीं ते राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष झाले. ते१८८५ सालापासून १९०२ पर्यंत शिक्षणदानाचें पवित्र काम करीत होते. १९०२ पासून तर त्यांनीं आपणास राजकारणासच वाहून घेतलें. देशसेवेचा धर्म स्वतः आचरून दाखविला आणि संघशक्तीनें देशहिताचीं कामें करतां यावीं म्हणून **'भारतसेवकसमाज'** १२ जून १९०९ रोजीं स्थापन केला. या वेळीं चलित शुक्र मूळ दशमाशीं युति करीत होता. त्या-नंतर ४९ व्या वर्षाच्या सुमारास चलित बुध मूळ चंद्राबरोबर त्रिकोणयोग



करूं लागला. हा काळ त्यांच्या आयुष्यांत फारच महत्त्वाचा होता. त्यांच्या हातून अनेक देशहिताचीं कामें झालीं व त्यांचीं द्वीपांतरीं सुद्धां कीर्ति पसरली. नामदार गोखले यांचा आत्मकारक ग्रह, रानडयांप्रमाणेंच बुध आहे. परंतु रानडे यांचा आत्मकारक ग्रह निर्बली आहे व गोखले यांचा आत्मकारक बलवत्तर आहे त्यामुळें कर्तृत्वाचें पुरें माप गोखले यांच्या पदरांत पडलें. आत्मकारक ग्रहाच्या जोरावर शिष्यानें गुरूवरही ताण केली.

प्रस्तुत कुंडलींत केवळ सौख्याचा विचार करतां अनिष्ट योगच आढळून येतात. लग्नांत वृश्चिक राशींतील शनि चतुर्थांतील गुरूबरोबर केंद्रयोग करीत आहे व शनि व रवि यांचा दहा अंशांच्या अंतरानें प्रतियोग होत आहे. या योगांमुळें त्यांना विरोध करणारेच फार होते. धनेश मंगळ हर्शलनें पीडित असा षष्ठांत आहे व लग्नेश—दशमेश यांचा केंद्रयोग होत आहे. फक्त धनेश, लग्नेश व गुरु यांचे शुभ योग होत आहेत त्यामुळें सांपत्तिक स्थिति वाईट नव्हती इतकेंच. मंगळ सप्तमेश व कुटुंबेश पीडित आहे व कौटुंबिक सौख्याचा कारक ग्रह शुक्र अष्टमांत आहे त्यामुळें कौटुंबिक सौख्य यथातथाच मिळालें. संततीच्या बाबतींत पंचमांतील चंद्रामुळें फक्त २ मुली हयात आहेत. येणेंप्रमाणें बाह्य परिस्थिति मुळींच संतोषजनक नसतां केवळ देशहितासाठीं त्यांनीं आपलें आयुष्य वेचिलें. लग्नांत असलेल्या शनीप्रमाणें ते अखेरपर्यंत **सेवक**—देश—सेवक होते. उत्कट देशभक्ति व स्वार्थत्याग, तूळ लग्नाचें समतोल वर्तन, गुरुशुक्रांच्या नवपंचम योगांमुळें येणारा सुस्वभाव, पंचमांतील मीनेच्या चंद्राचें कोमल अंतःकरण आणि आत्मकारक बुधाचें वक्तृत्व यांचा मिलाफ अपूर्व आहे. लग्नकेंद्रीं वायु राशि व सप्तमांतील तूळ नवांशांतील बुध हा वक्तृत्वाचा निदर्शक योग आहे. नामदार गोखल्यांनीं आपल्या देहाकडे न पहातां फारच कष्ट केल्यामुळें त्यांच्या शरीरप्रकृतीवर फारच अनिष्ट परिणाम झाला. लग्नाधिपति मृत्युस्थानांत आहे व जीवनशक्ति वर्धक असे योग

कुंडलींत नाहींत असें म्हटलें तरी चालेल. मूळचा रवि व हर्शल यांचा अशुभ योग होता व ४९ व्या वर्षी चलित रवि व चलित हर्शल यांची युति तंतोतंत मूळच्या मंगळाच्या केंद्रांत होत होती, व चलित मंगळ मूळच्या शनिबरोबर प्रतियोग करीत होता व परिभ्रमण काळच्या लग्नाच्या अष्टमांत शनि व चतुर्थांत हर्शल व मंगळ हे गोचरीचे ग्रह होते. हे योग अंतकाळाचे द्योतक आहेत. शेवटीं ता. १९ फेब्रुवारी १९१५ रोजीं वृश्चिक लग्नावर नामदार गोखले इहलोक सोडून गेले.

'राम नारायण.'




॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष १ लें. } डिसेंबर १९१५. { अंक ९ वा.

## चालू वर्षांतील हिंदी पुढाऱ्यांचे मृत्यु.

( लेखक.—राम नारायण. )

चालू वर्षी लोकसंहारक काल रौद्र स्वरूपानें यूरोपखंडांत मूर्तिमंत दृग्गोचर होत आहे. हल्लीं पृथ्वीवर जितकी मनुष्यहानि होत आहे तितकी कोणत्याच वर्षी झाली असेल असें वाटत नाहीं. प्रत्यहीं हजारों मनुष्यें मृत्युमुखीं पडत आहेत परंतु जणुं काय मृत्यूची तेवढ्यानें तृप्ति न झाल्यामुळें त्यानें हिंदुस्थानचे कर्तृत्ववान पुरुष व हितचिंतक यांच्याकडे आपली दृष्टि वळविली असावी. हिंदुस्थानांतील लोकाग्रणी **नामदार गोखले** व **सर फेरोजशाहा मेथा** आणि हितचिंतक **सर हेनरी कॉटन** यांच्या मृत्यूमुळें हिंदुस्थानानें अपरिमित नुकसान झालेलें आहे. एखाद्या कुटुंबांतील कर्तृत्ववान पुरुष व हितचिंतक गेल्यामुळें जशी स्थिति होते तशीच हल्लीं हिंदुस्थानाची स्थिति झाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. कुटुंबावर मृत्युमुळें येणारी आपत्ति जशी आपणांस ज्योतिषशास्त्राच्या जातक-

स्कंधाधारें सांगतां येते त्याचप्रमाणें राष्ट्ररूपी कुटुंबाची आपत्ति संहितास्कंधाधारें सांगतां येते. मागें घडलेल्या गोष्टी व तत्कालीन ग्रहस्थिति यांचा सशास्त्र मेळ आपणास घालतां आला तर पुढील भविष्यें करतां येतील हें जाणून चालू वर्षी मृत्यमुळें आपल्या देशावर आलेल्या आपत्तींचा विचार करावयाचा आहे.

**मेदिनीय ज्योतिषांत** प्रत्येक वर्षातील **मेष**, **कर्क**, **तूळ**, व **मकर** या चार संक्रमण काळच्या कुंडल्या विशेष महत्वाच्या असतात आणि त्यांवरून त्या वर्षांत होणाऱ्या राष्ट्रांतील सुखदुःखांचें व इतर घडामोडीचें भविष्य करितां येते. या महत्वाच्या चार कुंडल्यांच्या मदतीला **रवि-चंद्रसंयोग** काल व **ग्रहणें** यांच्या कुंडल्या घेतल्या जातात. ज्योतिषात्मक वर्षारंभ **मेष संक्रमण**-कालीं म्हणजे २१ मार्चच्या सुमारास होतो व कोणत्याहि वर्षाच्या जानेवारी फेब्रुवारी व मार्च महिन्याचा पूर्वार्ध यांची स्थिति समजण्याकरतां मागच्या वर्षाचें मकरसंक्रमण आणि त्या महिन्यांतील रवि-चंद्रसंयोग काळाच्या कुंडल्या लक्षांत घेतल्या पाहिजेत हें उघड आहे. १९१९ सालीं ग्रहस्थिति कशी काय होती हें लक्ष्यांत येण्याकरतां ४ कुंडल्या खालीं दिल्या आहेत.

**षड् भाव.**

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | सिंह २२ | कन्या १९ | तूळ १९ | वृश्चिक २१ | धनु २२ | मकर २२ |
| (२) | मेष १८ | वृषभ २० | मिथुन १८ | कर्क १३ | सिंह १० | कन्या १२ |
| (३) | वृश्चिक ३ | धनु २ | मकर २ | कुंभ ३ | मीन ५ | मेष ५ |
| (४) | सिंह २७ | कन्या २५ | तूळ २५ | वृश्चिक २७ | धनु २८ | मकर २७ |

**सायन स्पष्ट ग्रह.**

| | रवि | चंद्र | बुध | शुक्र | मंगळ | गुरु | शनि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ( १ ) | मकर | मीन | धनु | वृश्चिक | मकर | कुंभ | मिथुन |
| | ०-० | ११-९ | २२-६ | २७-२३ | ०-२४ | २०-३० | २८-४५ व |

हर्शल कुंभ ९-२३; नेपच्यून कर्क २९-५० व; राहु कुंभ २९-३४



| | रविचंद्र | बुध | शुक्र | मंगळ | गुरु | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ( २ ) | कुंभ | मीन | मकर | कुंभ | मीन | मिथुन |
| | २४-३३-११ | ७-५९ व | ७-४४ | १०-३९ | २-२५ | २५-३० |

हर्शल कुंभ १२-२२; नेप्. कर्क २८-२२ व; राहु कुंभ २६-४४

| | रवि | चंद्र | बुध | शुक्र | मंगळ | गुरु | शनि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ( ३ ) | तूळ | मेष | तूळ | तूळ | कर्क | मीन | कर्क |
| | ०-० | ८-४५-२६ | २५-३८ | ३-८ | २२-११ | २२-३७ | १५-२१ |

हर्शल कुंभ १२-४ व; नेप. सिंह २-११; राहु कुंभ २४-५९

| | रविचंद्र | बुध | शुक्र | मंगळ | गुरु | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | तूळ | वृश्चिक | तूळ | सिंह | मीन | कर्क |
| | १४-२९-१९ | ६-४७ | २१-३१ | ०-३५ | २४-४८ व | १६-६ |

हर्शल कुंभ ११-४९ व; नेप. सिंह २-२८; राहु कुंभ

पहिली कुंडली २४ डिसेंबर १९१४ रोजीं रात्रीं ९-१५ वाजतां झालेल्या **मकर संक्रमणाची** आहे; दुसरी कुंडली १४ फेब्रुवारी १९१५ रोजीं सकाळीं ९-२२ वाजतांची **रवि-चंद्र** संयोगकालाची आहे; तिसरी कुंडली २४ सप्टेंबर १९१५ रोजीं सकाळीं ८-१५ वाजतांची **तूळ-संक्रमणाची** आहे आणि चवथी कुंडली ९ आक्टोबर १९१५ रोजीं पहाटेस २-३२ वाजतांच्या **रविचंद्रसंयोगकालाची** आहे. **ज्योतिर्मा**-लेल्या जुनच्या अंकांत **मेष संक्रमणाची** कुंडली दिलेली आहे म्हणून ती येथें दिलेली नाहीं. ती कुंडली प्रस्तुत प्रसंगीं विशेष महत्वाची आहे. वर दिलेल्या सर्व कुंडल्या मुंबई रेखांशाच्या आहे. व कुंडलीच्या स्थानांत असलेले ग्रह हिंदुस्थानाच्या अगदीं पूर्वेकडील प्रांताशिवाय फारसे बदलत नाहींत.

**मकर** संक्रमणाच्या वेळीं रवि व मंगळ यांची युति असून शनि फक्त १॥ अंशाच्या अंतरानें या दोन्ही ग्रहांबरोबर प्रतियोग करीत आहे. आणि हे योग **पंचम** व **लाभ** या दोन स्थानांतून होत आहेत. **लाभस्थान** हें मेदिनीय ज्योतिषांत प्रजेचे हितकर्ते, कायदे कौंसिलांतील लोकनियुक्त सभासद व सामान्यत: कायदे कौंसिलें यांचें द्योतक आहे. प्रस्तुत प्रसंगीं

आपणास इतर गोष्टींचा विचार करावयाचा नसून फक्त लाभस्थान म्हणजे प्रजापक्षाचे हितकर्ते, मित्र किंवा लोकाग्रणी यांचा विचार ज्या स्थानावरून होतो त्या स्थानाचा विचार कर्तव्य आहे. प्रस्तुत संक्रमणाच्या वेळीं लाभस्थानांतून रवि-शनि व शनि-मंगल यांचे प्रतियोग अनिष्ट तर आहेत परंतु या योगांत आणखी अनिष्टपणाची भर पडली आहे. लाभ स्थानाचा अधिपति बुध स्वक्षेत्राच्या विन्मुख राशींत असून लाभस्थानाचे जें मृत्युस्थान ( म्हणजे कुंडलीचें षष्ठ स्थान ) याचा अधिपति शनि याजबरोबर प्रतियोग करीत आहे. लाभस्थानाचा अष्टमेश शनि हा रविबुधांबरोबर अनिष्ट योग करून उदित गोलार्धांत आहे व पीडित ग्रह अनुदित गोलार्धांत आहेत. त्यामुळें शनीची कटुतर फलें विशेष अनुभवास येतील हें स्पष्ट दृग्गोचर होत आहे. मकर संक्रमणाचा अंमल सामान्यतः पुढील वर्षाच्या मेष संक्रमणापर्यंत असतो असें म्हणण्यास हरकत नाहीं म्हणजे १९१५ चा आरंभ लाभ स्थानासंबंधानें अत्यंत अनिष्ट योगानें झालेला होता. लाभस्थान इतकें पीडित झाल्यावर लोकहितकर्त्यांमध्यें मृत्यु होतील हें उघड दिसत होतें. या संक्रमणानंतर पहिल्याच रवि–चंद्रसंयोगकालीं ( १५ जानेवारी १९१५ ) सुद्धां शनि लाभांत असून लाभेश बुध षष्ठांतून नेपच्युन बरोबर प्रतियोग करीत आहे. या रवि–चंद्रसंयोगकालानें मकर संक्रमणाच्या वेळचा अनिष्टपणा आणखी बळकट केला. त्यानंतरचा रवि–चंद्रसंयोग काल ( कुंडली नं. २ ) या पेक्षांहि भयंकर आहे. हा रवि–चंद्रांचा संयोग लाभस्थानीं होत असून हर्शल मंगळांची युति सुद्धां लाभ स्थानामध्येंच झाली आहे. हा रवि–चंद्र संयोग पृथ्वीच्या कांहीं भागांत ग्रहण होतें. आपल्या देशांत हें ग्रहण दृश्य नव्हतें म्हणून त्यास फक्त रवि–चंद्र संयोग असें म्हटलें आहे. मकर संक्रमणाच्या वेळीं दर्शित असणारा मृत्युकारक योग पाठोपाठ होणाऱ्या दोन्ही रवि–चंद्र संयोगांनीं प्रदीप्त केला आणि शेवटच्या कुंडलींतील हर्शल–मंगळांच्या युतीनें तर कळसच केला असें म्हणावयास हरकत नाहीं. दुसरा रवि–चंद्रांचा युतियोग कुंभेच्या २५ व्या अंशांत झाला होता आणि या युति योगाबरोबर रवि–चंद्र संयोग कालापासून जो



पहिलाच अशुभ योग झाला त्या दिवशीं नामदार गोखले इहलोक सोडून गेले! हा पहिला अशुभ योग चंद्रानें वृषभेच्या २१ व्या अंशांत असतांना केला. १९१४च्या डिसेंबर महिन्यांतील मकर संक्रमण व चालू वर्षाच्या जानेवारी व फेब्रुआरी महिन्यांतील रवि–चंद्र संयोग काल यांच्या कुंडल्यामध्यें प्रजेचे हितकर्ते किंवा लोकपक्षाचे पुढारी यांमध्यें मृत्यु घडेल असे दर्शविणारे योग झालेले होते हें स्पष्ट दिसून येत आहे.

१९१५च्या मेष संक्रमण काळीं ( ज्योतिर्माला अं. ३ रा पहा ) वृश्चिक लग्न उदय पावत असून लाभस्थानावर कन्या राशि येते. लाभेश बुध नीच असून मंगळानें म्हणजे लाभस्थानाच्या अष्टमेशानें युक्त असा चतुर्थांत आहे. मागें वर्णन केलेल्या मकरसंक्रमणाच्या वेळीं बुधच लाभेश असून लाभ स्थानाच्या अष्टमेशाबरोबर प्रतियोग करीत होता व मेषसंक्रमण काळीं तो लाभ स्थानाच्या अष्टमेशाबरोबर युति करीत आहे आणि दोन्ही वेळीं बुध निर्बली आहे. हें दोन योगांतील साम्य लक्ष्यांत ठेविण्यासारखें आहे.

वर्षारंभीं झालेला हा लाभ स्थानासंबंधाचा मृत्युदर्शक योग पुढील संक्रमणें व रवि–चंद्र संयोग यांमुळें कसा काय अंमलांत येतो हें पाहूं. कर्क संक्रमणाच्या वेळीं लाभ स्थानांत चंद्र असून तो अष्टमांतील नेपचून बरोबर केंद्रयोग करीत आहे. परंतु या अनिष्ट योगाच्या वेळीं नेपच्यून बरोबर गुरु व मंगळ हे अनुक्रमें नवपंचम व तृतीय एकादश योग करीत आहेत आणि रवि हा चंद्राबरोबर नवपंचम योग करीत असून लाभेश शुक्र सप्तम स्थानांत बलवान् आहे. या वेळीं शुभ योगांचें प्राबल्य झाल्यामुळें वर्षारंभीं झालेला मृत्युदर्शक योग कर्क संक्रमणाचा अंमल असे पर्यंत घडून येणें शक्य नव्हतें व चंद्र–नेपच्यूनांच्या केंद्रयोगामुळें त्याचीं फलें अजीबात नष्टही झालीं नाहींत. त्या नंतर तूळ संक्रमणाच्या वेळीं ( कुंडली ३री पहा ) लग्नकेंद्रीं वृश्चिक राशि असून लाभस्थानावर कन्या राशि आहे. लाभेश बुध व्यय स्थानांत आहे व लाभस्थानाच्या अष्टमाचा स्वामी मंगळ नीच असून त्या बरोबर तो ( बुध ) केंद्रयोग करीत आहे. मेष संक्रमण काळीं बुधमंगळांची ( लाभेश–षष्ठेश ) युति असून तळसंक्रमण काळीं तेच ग्रह लाभेश व षष्ठेश

असून केंद्रयोग करीत आहेत. कुंडलीच्या षष्ठांत म्हणजे लाभस्थानाच्या अष्टमांत चंद्र असून शनीबरोबर केंद्रयोग करीत आहे. अर्थात् तूळ संक्रमणाचा अंमल असे पर्यंत लाभस्थानासंबंधानें मृत्यु घडणें शक्य आहे हें निर्विवाद आहे. आतां तूळ संक्रमणाच्या पाठीमागून होणारा पहिलाच रवि–चंद्र संयोग कालाची कुंडली लक्ष्यांत घेऊं. ( कुंडली नंबर ४ पहा ). हा रवि–चंद्राचा योग तूळेच्या १९ व्या अंकांत म्हणजे तूळ संक्रमणकालीन **शनि–मंगळांच्या** केंद्रांत होत आहे. या वेळीं सुद्धां शनि **लाभांत** आहे आणि तो रवि, चंद्र, गुरु व शुक्र यांच्या बरोबर केंद्रयोग करीत आहे. मेष संक्रमण काळीं बुध–मंगळांची युति, तूळ संक्रमण काळीं बुध मंगळांचा केंद्र योग ( तूळेंतून व कर्केंतून ) आणि प्रस्तुतच्या रवि चंद्र संयोग काळीं बुध मंगळांचा केंद्र योग ( वृश्चिकेंतून व सिंहेंतून ) झालेले आहेत. म्हणजे मेष संक्रमण काळीं झालेला योग तूळ संक्रमण काळीं प्रदीप्त होत आहे आणि या रवि चंद्र संयोग कालाचा अंमल असे पर्यंत तो योग फलें देण्यास समर्थ होत आहे हे स्पष्ट होत नाहीं काय? ह्या रवि चंद्रांच्या संयोग काळीं बुध–मंगळांचा केंद्र योग झालेला आहे आणि ज्या **दिवशीं** गोचरीच्या चंद्रानें त्या दोन्ही ग्रहांबरोबर केंद्र योग केला त्याच दिवशीं हिंदुस्थानचे हितकर्ते **सर हेनरी कॉटन** हे परलोकवासी झाले आणि रवि–चंद्रांच्या संयोगाशीं ज्या **दिवशीं** गोचरीचा चंद्र युति योग करीत होता म्हणजे तूळ संक्रमण कालीन शनि मंगळांशीं केंद्र योग करीत होता त्या दिवशीं **सर फेरोझशहा मेथा** हे परलोकवासी झाले! मागील मकर संक्रमण काळीं **बुध** बिघडलेला होता त्याचप्रमाणें चालू वर्षाच्या मेष व तूळ संक्रमण काळीं **बुध** ग्रहच बिघडलेला होता आणि मृत्यु पावलेले दोन्ही पुढारी नामांकित वक्ते होते हा योग आश्चर्यकारक नाहीं काय?



# जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभाववर्णन.

## वृश्चिक संक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**वृश्चिक** ही राशिचक्रांतील अष्टम, स्थिर, गूढ आणि जल तत्वाची राशि आहे. ह्या राशींत रवि दर वर्षी आक्टोबर महिन्याच्या २२ व्या तारखेच्या सुमारास प्रवेश करतो आणि नोव्हेंबर महिन्याच्या २१ व्या तारखेपर्यंत या राशींत भ्रमण करीत असतो. हें वृश्चिक राशींतील रवीचें भ्रमण होत असतां ज्यांचा जन्म होतो ते लोक स्थिर स्वभावाचे, आत्मविश्वासी, गूढ, आंतल्या गांठीचे, धूर्त, कावेबाज व गर्विष्ठ असतात. हे लोक बहुतकरून मोकळ्या मनानें दुसऱ्याबरोबर व्यवहार करीत नाहींत. आपलीं कामें हे लोक संथपणानें, काळजीपूर्वक आणि मुळींच गाजावाजा न करतां गुप्तपणानें करतात. यांच्या मनोवृत्तींत संशय, स्वतःविषयीं पूर्ण खातरी आणि स्वार्थ वगैरे गुण दिसून येतात. रवि या राशींत पीडित असल्यास हीं मनुष्यें खुनशी, रुधिरप्रिय, भांडखोर, कपटी, अविश्वासु, गळेकापु आणि दुष्ट असतात. गुप्त कारस्थानें करण्यांत हे लोक प्रवीण असतात. उन्नत झालेलीं मनुष्यें गूढशास्त्राचे शोकी व आत्मविश्वासी असतात. ह्यांच्या अंगीं गूढ शक्तींचा विकास झालेला आढळतो. वृश्चिक राशींत रवि असतां बहुतकरून दोषैकदृष्टि, असूया, ईर्षा, द्वेष व सूड घेण्याची प्रबल इच्छा वगैरे दुर्गुण पहावयास सांपडतात.

वृश्चिक राशींत रवि असलेल्या मनुष्यांची शरीरप्रकृति भक्कम व कणखर असते. ह्या लोकांस गुप्तरोग, संसर्गजन्य रोग आणि आहारविहारांत अनियमितपणा ठेविल्यापासून होणारे रोग जडतात.

ह्या लोकांमध्यें डाक्टर्स, वैद्य, औषधांचा व्यापार करणारे दंतवैद्य, गुप्त पोलीस, गुप्तहेर, विद्युत् शास्त्र शिकणारे वगैरे प्रकारचे लोक आढळतात.

## रवि चंद्रांच्या राशिपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाववर्णन.

**वृश्चिकेंत रवि व मेषेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक तामसी वृत्तीचे, संशयी, स्पर्धा करणारे आणि रागीट असतात. हे लोक मोठे व्यवहार-कुशल असतात. **मेकॅनिक्स शिकल्यानें या लोकांचा फायदा होईल.**

**वृश्चिकेंत रवि व वृषभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक सुखा-भिलाषी, विषयी, गर्विष्ठ, स्वार्थी आणि हेकेखोर असतात. **ह्या लोकांचा उदय मध्यम आयुष्यानंतर होतो.**

**वृश्चिकेंत रवि व मिथुनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक हुशार व कारस्थानी असतात. कसल्याहि परिस्थितीपासून ते आपला फायदा करून घेतात. ह्यांच्या आयुष्यांत फार घडामोडी होतात. हे लोक धूर्त व फार कावेबाज असतात. **गुप्त हेराची किंवा कारस्थानाचीं कृत्यें केल्यामुळें उदय होतो.**

**वृश्चिकेंत रवि व कर्केंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक धारिष्ट-वान परंतु अस्थिर स्वभावाचे असतात. या लोकांचीं कृत्यें कधीं कधीं बालिश असतात. हा योग सामान्यतः शुभ आहे. **या लोकांचा वैद्यकीय धंद्यापासून उदय होण्याचा संभव आहे.**

**वृश्चिकेंत रवि व सिंहेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक धैर्यवान्, अत्यंत आत्मविश्वासी, गर्विष्ठ आणि मिजासी असतात. कोणतेंही काम करण्यांत श्रमसातत्य, चिकाटी आणि निश्चय हे गुण त्यांच्या ठिकाणीं दिसून येतात. पुष्कळ वेळां हे लोक नीतिमान् किंवा शुद्ध अंतःकरणाचे नसतात. **ह्या लोकांचा उदय पोलीसखात्यांत होण्याचा विशेष संभव आहे.**

**वृश्चिकेंत रवि व कन्येंत चंद्रः**—या योगावर जन्मलेल्या लोकांस दुसऱ्यांचे दोष काढण्यांत फार आनंद वाटतो. या लोकांस आपल्या स्वार्था करतां दुसऱ्यांस फसविण्याची इच्छा अनावर होते. शास्त्रीय शोधांत मग्न झालेल्या लोकांस हा योग फारच उपयोगी आहे. वृश्चिक राशीप्रमाणें शास्त्रीय गढांचीं त्यांस ओळख होऊन त्यांची उत्तम छाननी करतां येते.




## प्रसिद्ध संस्थांच्या कुंडल्यांचा संग्रह.

### नंबर ( १ ). राष्ट्रीय सभा.

सन १८८५च्या मार्च महिन्यांत मद्रास येथें कांहीं मंडळींनीं जमून पुढें येणाऱ्या नाताळाचे सुमारास हिंदुस्थानाच्या सर्व भागांतून पुढारी मंडळी राष्ट्रहिताचे अनेक प्रश्नांसंबंधानें विचार करण्याकरतां पुण्यास जमविण्याचें ठरविलें. परंतु नाताळाचे पूर्वींच पुण्यास कालऱ्याचा उपद्रव सुरु झाल्यामुळें पुण्याची बैठक **मुंबईस** आणावी लागली. तारीख २८ डिसेंबर १८८५ रोजीं राष्ट्रीय सभेची **प्रथम** बैठक दुपारीं मुंबई १२ वाजण्याचे सुमारास शेट **गोकुळदास ते**जपाळ यांच्या संस्कृत पाठशाळेंत भरली होती. राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचा प्रथम मान **मि. डब्ल्यु. सी. बा**नर्जी यांस देण्यांत आला होता. अध्यक्षांची निवड झाली त्या वेळीं मुंबई १२ वाजले होते व त्यामुळें हाच काल राष्ट्रीय सभेच्या जन्माचा मानला पाहिजे. ह्या वेळीं खालील प्रमाणें आकाशस्थ ज्योतींचीं स्थिति होती.

सा. ल.



पूर्व केंद्रावर **मेष** या आद्य, अग्नि व चर राशीचा नववा अंश उदित असून अस्त केंद्रांत चंद्र, गुरु व हर्शल आहेत. दशमांत रवि असून चतुर्थांत शनि आहे. केंद्रांवर चर राशि असून पांच गोल चर राशींत आहेत. म्हणजे राजकीय विषयांसंबंधानें चर्चा करणाऱ्या संस्थेस हवी होती त्याच प्रमाणें ग्रहस्थिति होती. राजकीय वातावरणांत उलाढाली करणाऱ्या लोकांच्या कुंडल्यांचे निरीक्षण केलें असतां त्यांमध्यें चर राशींतच असलेल्या ग्रहांचे ज्याप्रमाणें प्राधान्य पहावयास मिळतें. त्याप्रमाणेंच अनुकूल ग्रहस्थिति राष्ट्रीय सभेच्या कुंडलींत आहे.

राष्ट्रीय सभेच्या तनूचा अधिपति मंगळ हा षष्ठ स्थानांत असून बुधाबरोबर केंद्र योग करीत आहे. बुध हा षष्ठेश असून तो लग्नेशाबरोबर पूर्ण अंशानें केंद्रयोग करीत असल्याकारणानेंच आपसांतील दुहीचीं किंवा भांडणांचीं विघातकारक चिन्हें राष्ट्रीय सभेच्या जन्मकालींच पूर्ण दृग्गोचर होत आहेत.

राष्ट्रीय सभेच्या जन्मकाळीं मेष राशि उदय पावत असून लग्नाधिपति मंगळ हा षष्ठांत बुधाच्या घरीं असून धनु या अग्नि राशींतील बुधाबरोबर केंद्रयोग करीत आहे. मेष लग्नावर जन्म पावणारीं मनुष्यें स्वभावानें रागीट, तामसी, उतावळीं, महत्वाकांक्षी, चंचल, धाडसी, भांडखोर, गर्विष्ठ, अधिकारप्रिय, स्वातंत्र्यप्रिय आणि आत्मविश्वासी असतात. हीं मनुष्यें धाडसी, प्रयत्नवादी व आपल्या स्वतःच्या पायावर उभीं राहणारीं असल्यानें स्वतःच्या श्रमानें पुढें येतात. राष्ट्रीय सभेच्या जन्मकाळीं मेष लग्न उदित असल्यामुळें राष्ट्रीय सभेंत वरील गुणधर्मांच्या स्वभावाची मंडळी जास्त आढळण्यांत येईल. बुध मंगळांचा केंद्रयोग होत असल्यामुळें वरील मंडळीचे स्वभावांत लहरी व तामसी वृत्ति व वर दर्शविलेले मेष राशीचे गुण फार स्पष्टपणानें भासतील. बुध हा ग्रह देशांतील वक्ते व विद्वान लोक यांचा कारक असून



राष्ट्रीय सभेच्या शत्रुस्थानाचा अधिपति असल्याकारणानें विद्वान लोकांकडूनच राष्ट्रीय सभेच्या ध्येयांत बऱ्याच अडचणी किंवा संकटें आणलीं जातील. त्याचप्रमाणें बुध हा ग्रह मुद्रणकलेचा कारक असून लग्नेश मंगळानें पीडित असल्याकारणानें राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळांतील आपसांतील मतभेद वर्तमानपत्रद्वारा त्यांच्या इच्छेविरुद्ध प्रसिद्धीस आल्यामुळें अधिक तीव्र होतील.

राष्ट्रीय सभेच्या जन्मकाळीं चर लग्न उदित आहे व चंद्र चर राशींत असून चर राशींत ग्रहाधिक्य असल्यामुळें राष्ट्रीय सभेच्या बैठकी एकाच ठिकाणीं होणें अशक्य आहे. चतुर्थेश चंद्र व शनि यांचा केंद्रयोग होत असल्यामुळें राष्ट्रीय सभेच्या कामाकरतां कांहीं स्थावर मिळकत किंवा इमारती वगैरे तीस वर्षांच्या अवधीमध्यें सुद्धां झाल्या नाहींत. राष्ट्रीय सभेच्या लग्नकेंद्रीं मेष ही चर राशि उदित आहे, चंद्र तूळ ह्या चर राशींत आहे व लग्नाधिपति मंगळ हा द्विस्वभाव राशींत असल्यामुळें राष्ट्रीय सभा प्रागतिक असून तिच्या मूळच्या उद्देशांत अनेक घडामोडी व फेरफार कालानुरावें करावे लागतील.

राष्ट्रीय सभेच्या धनभावांत नेपच्यून हा पापग्रह आहे. धनाधिपति शुक्र लाभांत निर्बली असून पूर्वोक्त नेपच्यून या पापग्रहाबरोबर केंद्रयोग करीत असल्यामुळें राष्ट्रीय सभेची सांपत्तिक स्थिति चांगली राहणार नाहीं इतकेंच नव्हे तर राष्ट्रीय सभेचे दांभिक हितकर्ते किंवा मित्र यांपासून सांपत्तिक हानि होणें शक्य वाटतें. सन १९१८ मध्यें हर्शल हा नेपच्यून बरोबर केंद्रयोग करणार असून मूळ कुंडलीचे धनाधिपति वरून भ्रमण करणार आहे व ह्याच काळीं शनीचें भ्रमण नेपच्यूनचे केंद्रांतून व हर्शलचे सप्तमांतून होणार असल्याकारणानें हें वर्ष राष्ट्रीय सभेस व हिंदुस्थानास सांपत्तिक दृष्ट्या बरेंच अनिष्ट भासेल. सांपत्तिक दृष्ट्या विचार करतां

राष्ट्रीय सभेचा खर्च सरासरीच भागेल किंवा तिची गंगाजळी इतर राष्ट्रीय कामास उपयोगी पडेल असें वाटत नाहीं. आणि वरील योगामुळें हिंदुस्थानांतील नाण्याच्या संबंधानें किंवा देशांतील सुवर्णनिधि किंवा ह्यासारख्या इतर गोष्टींकडे राष्ट्रीय सभेचें लक्ष्य सन १९१८ पर्यंत जाईल असें वाटत नाहीं.

राष्ट्रीय सभेच्या राजकारणाचा संबंध अखिल भरतखंडाशीं आहे. फलज्योतिषी लोक हिंदुस्थानावर मकर राशीचा अंमल आहे असें मानतात व तीच राशि राष्ट्रीय सभेच्या माध्यान्हीं किंवा दशम केंद्रावर आहे! हा अपूर्व चमत्कार राष्ट्रीय सभेच्या जन्मकाळीं पहाण्यासारखा घडला आहे. मकर राशीचा किंवा हिंदुस्थानाचा अधिपति शनि हा आपल्या शत्रुक्षेत्रीं आहे. राजसत्तेचा कारक ग्रह रवि, जनसमूहाचा कारक ग्रह चंद्र—हाच चंद्र राष्ट्रीय सभेच्या कुंडलींत चतुर्थ स्थानाचा म्हणजे हिंदुस्थानांतील शेतकरी लोक व स्थावर माल मिळकतीचा अधिपति आहे, राष्ट्रांतील कायदे कौंसिलें व संपत्ति यांचा कारक ग्रह गुरू व मोठे अधिकारी वर्ग वगैरे यांचे कारक ग्रह रवि व हर्शल या सर्वांबरोबर शनि केंद्रयोग करीत असल्यामुळें राष्ट्रीय सभेच्या जन्मकाळीं वरील सर्व गोष्टींत हिंदुस्थान पूर्ण निकृष्टावस्थेंत असल्याचें स्पष्ट भासवीत आहे. ही हिंदी राष्ट्राची खालावलेली स्थिति शनि निर्बली असल्याकारणानें आपल्या एक भ्रमणापर्यंत म्हणजे सरासरी ३० वर्षेपर्यंत तशीच राहील असें पूर्णपणें दर्शवीत आहे. राष्ट्रीय सभेच्या कुंडलीवरून विचार करतां हिंदुस्थानाची अशीच शोचनीय स्थिति चिरकाल राहील असें वाटत नाहीं. शनि केंद्रांत असल्यामुळें शनीच्या एका भ्रमणानंतर म्हणजे ३० वर्षांनंतर हिंदुस्थानाच्या भावी अरुणोदयास सुरुवात होऊन ३६वर्षांनंतर बऱ्याच चांगल्या व फायदेशीर सुधारणा झालेल्या दृष्टोत्पत्तीस येतील.

राष्ट्रीय सभेच्या दशम भावारंभीं मकर राशीचा ६वा अंश उदित आहे व चतुर्थांत कर्क राशीचा ६वा अंश आहे व तेथेंच ९व्या अंशांत शनि आहे.



ह्या शनीवरून व चतुर्थ भावाच्या उदित अंशावरून नेपच्यूनचें भ्रमण सन १९०४ मध्यें सुरू झालें व ह्याच काळांत बंगालच्या फाळणीसंबंधानें विचार सुरू झाले. सन १९०५ सालीं हर्शल किंवा प्रजापति ह्या ग्रहानें दशमस्थानावरील उदित अंशावरून व रवीवरून भ्रमण करण्यास सुरुवात केली त्याच वेळीं बंगालची फाळणी होऊन लोकमतामध्यें खळबळ उडाली!! व ही गडबड हर्शल ह्या स्थानांत ७ वर्षें म्हणजे सन १९११ पर्यंत होता तेथपर्यंत चालू होती. ह्या ग्रहानें सन १९१२मध्यें कुंभ राशीमध्यें प्रवेश करतांच पुन्हां ती फाळणी रद्द झाली हें विशेष पहाण्यासारखें आहे. ह्या सात वर्षांमध्यें राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांमध्यें दुही व मतभेद तीव्रतर झाले. सन १९१२ पासून हर्शलनें राष्ट्रीय सभेचें दशम स्थान सोडलें असून त्याचें भ्रमण सध्यां एकादश स्थानांतून चाललें आहे व तो ह्या स्थानांत १९१९पर्यंत रहाणार आहे. हर्शलच्या या स्थानांतील भ्रमणास सुरुवात होण्याबरोबरच राष्ट्रीय सभेचे जुने व खरे हितचिंतक मृत्युमुखीं पडले आहेत. मागील अनुभवावरून पहातां सन १९१८ पर्यंत राष्ट्रीय सभेचे आणखी किती हितचिंतक कालवश होतात हें पहाणें आहे. ह्या स्थानांतून हर्शलचें भ्रमण चालू असेपर्यंत राष्ट्रीय सभेस अनेक नवीन होतकरू हितचिंतक मिळून कायदे कौंसिलांमध्यें विशेष सुधारणा घडून याव्यात.

राष्ट्रीय सभेच्या जन्मकाळीं केंद्रांमध्यें ९ ग्रह आहेत व ते ग्रह ज्या ज्या गोष्टींचे कारक आहेत त्या गोष्टींकडे राष्ट्रीय सभेचें विशेष लक्ष वेधलें आहे. राष्ट्रीय सभेच्या पंचम स्थानाचा म्हणजे शिक्षण संस्थांचा किंवा उच्च शिक्षण मिळवून पास झालेल्या हिंदी लोकांचा कारक ग्रह रवि माध्यान्हीं असल्यामुळें त्यांचें पुढें काय करावें, त्यांस देशांतील कोणत्या अधिकाराच्या जागा द्याव्या, शिक्षण संस्थामध्यें कशी सुधारणा घडवून आणावी वगैरे गोष्टी फारच प्रमुखत्वानें राष्ट्रीय सभेपुढें आल्या आहेत. परंतु राष्ट्रीय सभेच्या

जन्मकाळीं रवि निर्बली व पीडित असल्याकारणानें ह्या गोष्टींत कष्टसाध्यता प्राप्त झाली आहे. सन १९१३ पासून दिनवर्ष पद्धतीनें चलित रवि हा मूळ चंद्र गुरु यांचे बरोबर त्रिकोण योग करीत असून १९१५ सालीं मूळ हर्शल बरोबर त्रिकोण योग करीत आहे. कांहीं काळानें चलित रवि बुधाबरोबर द्विराश्यंतर योग करील व चलित बुध सन १९१७ चे सुमारास मूळ मंगळाबरोबर त्रिकोणयोग करणार आहे. हे योग लवकरच अधिकारी व मित्रमंडळी यांचें पाठबळ मिळाल्यामुळें राष्ट्रीय शिक्षण संस्थेसंबंधानें राष्ट्रीय दृष्ट्या बराच समाधानकारक निकाल पुढील दहा वर्षांच्या कारकीर्दींत लागून मुद्रणस्वातंत्र्यासंबंधानें इष्ट फेरफार घडवून आणतील.

राष्ट्रीय सभेच्या जन्मकाळीं चंद्र, शुक्र व शनि हे एकमेकांच्या राशींत असल्यामुळें कांहीं अंशीं शुभ संबंधित आहेत. केंद्रांमध्यें नवमेश कायदे कौंसिलांचा द्योतक ग्रह गुरु व सामान्य लोकसमुदायाचा कारक ग्रह चंद्र यानें युक्त असल्या ुळें गुरूच्या दोन भ्रमणानंतर म्हणजे २४ वर्षांनंतर हिंदी राष्ट्रास कायदे कौंसिलांमध्यें लोकनियुक्त सभासद पाठविण्याचा हक्क मिळाला आहे व त्यावरून पहातां गुरु आपल्या तिसऱ्या भ्रमणाच्या सुमारास म्हणजे ३६ वे वर्षी पुष्कळच हक्क देईल असें वाटतें.

राष्ट्रीय सभेच्या षष्ठस्थानीं कन्या राशि असून तीमध्यें लग्नाधिपति मंगळ हा षष्ठेश जो बुध त्याबरोबर केंद्रयोग करीत आहे. कन्या राशीचा अंमल पुणें व नागपूर या दोन शहरांवर आहे आणि ज्या ज्या वेळीं ह्या दोन स्थळीं राष्ट्रीय सभेच्या बैठकी झाल्या त्या त्या वेळीं सभेमध्यें कांहीं तरी बखेडे माजले होते.

१९०५ सालीं हर्शल ग्रहानें मकर राशींत म्हणजे राष्ट्रीय सभेच्या दशमांत प्रवेश करतांच हिंदुस्थानाच्या राजकीय वातावरणांत घडामोडी होण्यास सुरुवात झाली. सन १९०७ सालीं शनि व मंगळ या दोन ग्रहांची युति



राष्ट्रीय सभेच्या व्ययस्थानांत मूळ मंगळासमोर झाली. हर्शल व नेपच्यून या दोन ग्रहांचीं भ्रमणें दशम व चतुर्थ स्थानांतून चाललीं होतीं. ह्याच काळीं दिनवर्ष पद्धतीनें चलित चंद्राचें भ्रमण कर्क राशींतून चाललें असून ह्या चंद्रावरून नेपच्यून व त्याचे समोरून हर्शल ह्यांचें भ्रमण होत असतां राष्ट्रीय सभेच्या कारकीर्दींत न झालेले असे अनिष्ट प्रकार घडले व हिंदी पुढाऱ्यांत दोन तट झाले. आणि अशाच तऱ्हेची अनिष्ट ग्रहस्थिति सन १९०८, ०९, १० व ११ सालापर्यंत चालू होती त्यामुळें उत्पन्न झालेली दुही मोडण्याची मुळींच चिन्हें दिसलीं नाहींत. सन १९१२ पासून हर्शलनें राष्ट्रीय सभेचें दशमस्थान व मकर राशि सोडली असून त्याचें भ्रमण एकादश स्थानांतून होण्यास सुरुवात झाली आहे. व तो ह्या स्थानांत १९१९ पर्यंत रहाणार आहे म्हणून मागील अनुभवावरून पहातां हर्शल ग्रहाचें या स्थानांतून भ्रमण होत आहे तोंपर्यंत राष्ट्रीय सभेच्या हितचिंतकांत क्रांतिकारक घडामोडी होऊन राष्ट्रीय सभेची बिघडलेली घडी पुन्हां पूर्ववत् बसून लोकमतास बराच मान मिळेल. चालू वर्षी म्हणजे डिसेंबर १९१५ मध्यें राष्ट्रीय सभेचा प्राण मंगळ हा सिंह या बादशाही राशींत आहे व हा मंगळ आपल्या स्वतःच्या गुणधर्माप्रमाणें असलेल्या रेग्युलस नांवाच्या ताऱ्याजवळ स्तंभी होणार असून २८ मे १९१६ पर्यंत तो सिंह राशींत बलिष्ठ आहे. परिभ्रमण पद्धतीप्रमाणे पहातां मंगळ व पंचमेश रवि हे अनुक्रमें मेष व सिंह राशींचे होत आहेत. दिनवर्ष पद्धतीप्रमाणें रवि हा हर्शल बरोबर त्रिकोण योग करीत असून चंद्राचें भ्रमण वृश्चिक राशींतून चाललें आहे. त्यामुळें राष्ट्रीय सभेचे मुख्य पुढारी कालवश झाले आहेत तरी सभेचा जोम कमी झालेला दिसून येणार नाहीं. ह्या वर्षी राष्ट्रीय सभेच्या मंडपांत होणारीं भाषणें व त्यांत विशेषतः अध्यक्षांचें भाषण फारच महत्त्वाचें होईल. राष्ट्रीय सभेसंबंधीं १९०७ सालीं

झालेल्या दोन पक्षांचा विचार करतां चालू वर्षी समेटास ग्रहस्थिति बरीच अनुकूल आहे. सन १९१६ मध्यें राष्ट्रीय सभेच्या पूर्व केंद्रांतून गुरूचें भ्रमण होणार आहे त्या सुमारास हे प्रस्तुतचे दोन पक्ष मोडण्याचा विशेष संभव आहे. परिभ्रमण पद्धतीप्रमाणें एकतिसाव्या सभेच्या वेळीं तूळ लग्न येत आहे म्हणून या वर्षी वर्षलग्नाचे दशमांतून शनि व सप्तमांतून मंगळ येत आहेत. बुध, धनु या अग्नि राशींत असून जन्मकालीन मंगळा-बरोबर केंद्रयोग करीत आहे. ही ग्रहस्थिति ह्या वर्षाच्या राष्ट्रीय सभेस प्रतिकूल आहे. अध्यक्षांनीं व इतर लोकांनीं आपलीं भाषणें जपून करावीं. वरील योगांमुळें राष्ट्रीय सभेस अनेक उघड शत्रु होण्याचा विशेष संभव असून राष्ट्रीय सभेचा दुर्लौकिक वर्तमानपत्रद्वारा करण्याचा प्रयत्न विशेषतः महाराष्ट्रांत केला जाईल. धनु राशींतील बुध महाराष्ट्रांतील विद्वान लोक व वर्तमानपत्रकार यांचा द्योतक आहे. मागें सन १८९६ म्हणजे अकराव्या अधिवेशनाच्या वेळीं परिभ्रमण पद्धतीनें असेच बुध व मंगळ आले होते त्या वेळीं सामाजिक परिषदेसंबंधानें तीव्र मतभेद झाला होता. तशाच प्रकारचा कडाक्याचा वाद होमरूल लीग संबंधानें चालू राष्ट्रीय सभेमध्यें होतो किंवा काय हें पहाणें आहे. चालू वर्षी राष्ट्रीय सभेची प्रथम बैठक तारीख २७ डिसेंबरला होणार आहे. ह्या दिवशीं चंद्र कन्या राशींत असून रवि, बुध व शनि बरोबर शुभ दृष्टियोग करीत आहे. नंतर ता. २८ रोजीं मूळ मंगळावरून व मूळ बुधाच्या केंद्रांतून जाणार आहे. ता. २९ रोजीं तो तूळेंत येऊन मूळ शनि व रवीबरोबर केंद्रयोग करणार आहे. ह्या सर्व योगांचा विचार करितां ता. २८ व २९ हे दोन दिवस राष्ट्रीय सभेच्या कामास साधारण अनिष्टच आहेत. सर्व साधारणपणें विचार करतां यंदाची राष्ट्रीय सभा पुष्कळ प्रकारानें समाधानकारक होईल असें मानण्यास बरींच कारणें आहेत. राष्ट्रीय सभेच्या कुंडलीवरून दुसऱ्या पुष्कळ गोष्टी लिहिण्यासारख्या आहेत परंतु जागेच्या अभावामुळें जास्त विचार करतां येत नाहीं.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष १ लें. | जान्युआरी १९१५. | अंक १० वा.

## नक्षत्र विचार.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

ज्येष्ठाः—मंगळ व गुरु.
मूळः—गुरु, रवि, मंगळ व चंद्र.
धनिष्ठाः—मंगळ, शनि व हर्शल.
कृत्तिकाः—रवि व मंगळ.
आश्लेषाः—चंद्र, गुरु व नेपच्यून.

ज्यांच्या कुंडल्यांमध्यें याप्रमाणें ग्रह आढळतात तीं मनुष्यें कर्तृत्ववान् व कुलदीपक असतात.

* * *

ज्यांच्या कुंडल्यामध्यें रवि, शनि, मंगळ व हर्शल यांचे युतियोग केंद्रयोग किंवा प्रतियोग होत असतात तीं मनुष्यें अनेक प्रकारच्या आपत्ति व शरीर क्लेश भोगणारीं आढळतात. परंतु या ग्रहांचे अशुभ योग राक्षसी

नक्षत्रांतून होत असतील तर त्यांस फारच तीव्र व अनिष्ट फलें अनुभवास येतात.

*  *  *

**जेष्ठा, कृत्तिका** व **आश्लेषा** या नक्षत्रांत केंद्रामध्यें किंवा षष्ठाष्टमामध्यें **शनि** असणें चांगलें नाहीं. वरील नक्षत्रांत असून त्याजबरोबर रवि, चंद्र मंगळ किंवा हर्शल अशुभ योग करील तर त्या मनुष्यास नाना प्रकारचे रोग व शरीर कष्ट भोगावे लागतात. दशमांत या नक्षत्रामध्यें शनि या ग्रहांच्या अशुभ दृष्टींत असेल तर राजकीय संकटें, मानहानि, धंद्यांत अपयश, बूड किंवा ठोकर लागते. हा योग धन स्थानांत किंवा चतुर्थांत होत असल्यास दारिद्य येतें. शेवटचे दिवस हालांत जातात. या नक्षत्रांत जर शनि वक्री असेल तर फारच वाईट अनुभव येईल.

*  *  *

**कृत्तिका, मघा** व **मूळ** ह्या नक्षत्रांत मंगळ असून शनि किंवा हर्शल बरोबर केंद्र, प्रतियोग किंवा युतियोग करीत असेल तर त्यास अपघात व भयंकर जखमा होतील.

*  *  *

स्त्रियांच्या कुंडल्यांमध्यें सप्तमस्थानांत **कृत्तिका** नक्षत्रांत पापग्रह असतां प्रदरविकार, गर्भाशयाचे विकार आणि जननेंद्रियाचे विकार दर्शवितात. सामान्यतः स्त्रियांच्या कुंडल्यांमध्यें सप्तमस्थानांत क्रूरनक्षत्रांत क्रूर ग्रह नसावे.

दशमांत मघा नक्षत्रीं शनि किंवा हर्शल असून तो रवि बरोबर केंद्र-योग किंवा प्रतियोग करीत असेल तर त्या मनुष्यांच्या पितृसुखांत न्यूनता आढळून येईल.

चतुर्थ स्थानीं **आश्लेषा** नक्षत्रीं जर क्रूर ग्रह असून ते चंद्राबरोबर केंद्र-योग किंवा प्रतियोग करीत असतील तर त्या मनुष्यांच्या मातृसुखांत न्यूनता असते.

*  *  *

पंचमांत क्रूर नक्षत्रांत क्रूर ग्रह असून ते चंद्र किंवा गुरु बरोबर अशुभ-



योग—केंद्र किंवा प्रतियोग—करीत असतील तर मुलें जगत नाहींत. तीं उपजतांच किंवा थोडक्या दिवसांत राम म्हणतात. लाटरींत किंवा सट्याचे व्यवहारांत थप्पड बसते. स्त्रियांचे कुंडल्यांमध्यें असा योग पंचम स्थानांत होत असल्यास त्यांचो मुलें गर्भाशयांतच मृत्यु पावतात.

ज्या ज्या स्थानांत क्रूर नक्षत्रीं पापग्रह असतात त्या त्या स्थानासंबंधीं अनिष्टपणा दिसून आल्याखेरीज रहाणार नाहीं. आणि ते पापग्रह आपल्या शत्रूंनीं बिघडले असतील तर विशेष अनिष्ट परिणाम पहावयास सांपडतो.

**कृत्तिका, मघा** व **मूळ** हीं तीन अग्नि राशींतील नक्षत्रें तीव्र गुणाची आहेत म्हणून या तीन नक्षत्रांतील ग्रह आपापल्या कारकत्वाप्रमाणें त्या त्या व्यक्तीच्या स्वभावांत तीव्रपणा दर्शवितात. उदाहरणार्थ.—वरील नक्षत्रांत रवि असतां पिता, चंद्र असतां माता, मंगळ असतां बंधु, व शुक्र असतां स्त्री यांचे स्वभाव तीव्र असतात.

**आश्लेषा** हें नक्षत्र ठक व धूर्त असून घातकी स्वभावाचें आहे म्हणून या नक्षत्रांत असणारे ग्रह आपल्या कारकत्वाप्रमाणें त्या त्या व्यक्तींच्या स्वभावावर वर लिहिल्याप्रमाणें परिणाम दृग्गोचर होतात. ह्या नक्षत्रांत अस-णारा ग्रह आपल्या शत्रुकडून किंवा इतर पापग्रहानें पीडित असतां अनुभव खात्रीपूर्वक पहाण्यास मिळतो. आश्लेषा नक्षत्रांत चंद्र पीडित असतां माता, मंगळ असतां बंधु किंवा शुक्र असतां स्त्री घातकी स्वभावाची असते.

**विशाखा** हें नक्षत्र गुप्त कारस्थानी, गुप्तपणानें दुसऱ्याचा नाश कर-णारें व विषारी पदार्थापासून प्रकृतीस अपाय करणारें असें नक्षत्र आहे. **जेष्ठा** नक्षत्रांत हे सर्व गुण चांगलेच अनुभवास येतात. जेष्ठा नक्षत्रांतील पापग्रह किंवा रवि किंवा चंद्र पापग्रहानें पीडित असतां हृदयजन्य विकार व गुह्येंद्रियांचे विकार होतात. पूर्वी सांगितल्याप्रमाणें या दोन नक्षत्रांतील पीडित ग्रह त्या त्या—व्यक्तींच्या ठिकाणीं आपले गुण दोष व्यक्त करतात.

**धनिष्ठा** हें नक्षत्र हिंसक, प्राणघातक, निर्दय, स्वार्थी, क्रोधी, कठोर भाषण करणारें आणि शठ असें आहे यामुळें या नक्षत्रांतील ग्रह आपल्या कारकत्वाप्रमाणें व्यक्तींच्या ठिकाणीं हे गुण दर्शवितात.

**मूळ** नक्षत्रांत रवि किंवा चंद्र गुरुबरोबर शुभसंबंधित असतां मनुष्यें कर्तृत्ववान असतात. हीं मनुष्यें मोठाल्या घडामोडी करतात. हें नक्षत्र

लग्न, चतुर्थ, दशम किंवा भाग्य स्थानांत असून वर सांगितलेला योग होईल तर मनुष्य खात्रीनें कुलदीपक होईल. ह्या नक्षत्रांत चंद्र शुभसंबंधित असतां व्यापारी, रवि असतां राजकार्यनिपुण, अधिकारी, बड्या लोकांशीं किंवा राजे लोकांबरोबर निकट संबंध ठेवणारा असतो. **मंगळ** असतां धाडसाची कामें करणारा, शिपाई, पोलीस किंवा लष्करी अंमलदार, पहिलवान, मामलेदार किंवा रेव्हेन्यु अंमलदार होतो. **बुध** असतां पेढीवाला, प्रिंटर, बुकसेलर, पब्लीशर व स्टेशनरीचा व्यापार करणारा असतो. **गुरु** असतां विद्वान, वकिल, कायदेपंडित, ज्युडीशियल खात्यांतील अंमलदार किंवा कायदेकौंसिलर होतो. **शुक्र** असतां जवाहिऱ्या, कापूस, कापड, फॅन्सी माल, सोनेचांदी यांचा व्यापारी किंवा आर्टिस्ट असतो. **शनि** असतां असतां कोळसे, लोखंड, तेलें व जड वस्तूंचा व्यापार करणारा किंवा छापखानेवाला होतो.

दशम भावारंभीं **मघा** नक्षत्र उदित असून त्यांत रवि किंवा चंद्र, गुरु, हर्शल किंवा मंगळ यांबरोबर नवपंचम किंवा ततीय-एकादश योग करीत असल्यास मनुष्यांस मोठेपणा प्राप्त होतो; रावसाहेब, रावबहादूर यांसारख्या मानाच्या पदव्या मिळतात. सरकारी नोकरींत चांगला अधिकार प्राप्त होतो. हें नक्षत्र लग्न, दशम, किंवा नवम या स्थानांत विशेष प्रबल असतें आणि तेथें जर रवि किंवा चंद्र वर सांगितलेल्या ग्रहांबरोबर शुभसंबंधित असेल तर मनुष्याचा भाग्योदय राजधानीच्या किंवा मोठ्या शहरांत लवकर होतो.

स्थानपरत्वें निरनिराळीं नक्षत्रें निरनिराळीं फलें दर्शवितात. त्या सर्वांचा आपणास फार बारकाईनें शोध केला पाहिजे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या नक्षत्रांत असलेले पापग्रह इतर ग्रहांबरोबर केंद्र, प्रतियोग किंवा त्रिकोण योग करितात त्या वेळीं कोणत्या प्रकारचीं फलें दृष्टीस पडतात याची कल्पना करून नंतर कोणत्या प्रकारचा अनुभव येतो याचें टांचण केल्याखेरीज सर्व नक्षत्रांचे गुणधर्म कळणार नाहींत.

---



# स्फुट विचार.

बालबोधाच्या विद्वान् संपादकांनीं डिसेंबरच्या अंकांत 'क्रूस्तजयंती' या लेखांत क्रूस्ताच्या जन्मासंबंधानें ज्योतिषशास्त्रदृष्ट्या उपलब्ध असलेल्या दंतकथेची जी विचित्र माहिती दिली आहे ती पाहून ज्योतिषशास्त्राचे विद्यार्थी आश्चर्यचकितच होतील. संपादक लिहितात "सन ३३७त ज्युलियस नामक पोपाचार्यानें क्रूस्तजयन्तीची 'डिसेंबर तारीख २५' ही तीथ कायम केली ती त्यानें सभोंवतालच्या अक्रूस्तीय अशा सूर्योपासकांची तीथ घेतली. त्या दिवशीं सूर्योपासकांचा धर्ममहोत्सव असे, व त्यांतच त्यानें क्रूस्तमहोत्सव करण्याचा उपक्रम केला ....दक्षिणायन संपण्याचा क्षण डिसेंबर २४ची मध्यरात्र. तेथें उत्तरायणांतील पहिला सूर्य जन्म घेतो तेव्हां कन्या रास उगवते, व दुसऱ्या दिवशीं मध्याकाशीं तो सूर्य येतांच उत्तरायणाच्या एका कालमापनाला आरंभ होतो. हा कन्येचा मुलगा सूर्य येथून पुढें तिळतिळ दिनमानानें वाढत जाऊन दक्षिणायनाच्या तेजोहीनतेवर विजय मिळवितो." तिथि व तारिख हे दोन समानार्थी शब्द नाहींत. रविचंद्रांमध्यें १२ अंश अंतर पडण्याचा जो काळ त्यास 'तिथि' असें म्हणतात. तसें तारखेचें नाहीं. व याचमुळें एकाच तारखेस दोन तिथि येऊं शकतात. हा फरक लक्षांत न घेतां संपादकांनीं "तीथ" शब्द वापरला असावा. मेची ८वी तारिख ही जशी पद्माष्टमी तिथि त्याप्रमाणेंच ह्या 'तीथ' शब्दाचा अर्थ असावा. दक्षिणायन संपण्याचा क्षण डिसेंबर—२४ची तारिख **कधींच असूं शकणार नाहीं.** नेहमीं डिसेंबर २१।२२ सुमारास दक्षिणायन संपून उत्तरायण लागतें. त्याचप्रमाणें हें संक्रमण नेहमींच मध्यरात्रीं होत नाहीं व संक्रमणाच्या वेळीं नेहमींच 'कन्या रास' उगवत नाहीं. Virgin Mary आणि Virgo (कन्याराशि) यांचा अशा रीतीनें बादरायणसंबंध जोडणें हास्यास्पद आहे. 'मुलांचा आणि मुलींचा

बहुश्रुतपणा वाढवावा' म्हणून अशा प्रकारची काल्पनिक माहिती देणें श्रेयस्कर नाहीं.

*   *   *

लोकमित्र मासिकाच्या सपटंबरच्या अंकांत 'धर्मऱ्हासाचीं कारणें आणि तीं दूर करण्याचे उपाय' या हेडिंगाखालीं एक लेख आला आहे. त्यांत लेखकानें धर्मसंरक्षणार्थ पुराणोक्त तांत्रिक कर्माचा ठसा समाजाचे अंतःकरणांत चांगला ठसेल असा सुबोध ग्रंथ भाषांतरासह व प्रत्येक कर्माचें स्वरूप समजण्यासाठीं निरनिराळीं लहान लहान पुस्तकें तयार व्हावींत व हें काम पंचांगशोधनकमीटी सारखी कमीटी स्थापन होऊन तिच्याकडून हें काम करवावें. लेखकाचा हेतु स्तुत्य आहे पण कित्ता हा चांगलें वळण लागण्यासाठीं पुढें ठेवावयाचा असतो तेव्हां पंचांगकमीटीनें केलेला कार्यभाग अनुकरणीय आहे किंवा काय हें पाहिलें पाहिजे. वैदिक धर्मकृत्यें यथार्थ कालीं घडून येण्यास श्रुतिस्मृतिपुराणोक्त लक्षणान्वित कालदर्शक दृक्प्रत्ययार्ह असें पंचांग वैदिक धर्मीयांस पाहिजे होतें त्याचा लाभ करून देण्यासाठीं ही कमीटी जन्मास आली व तिनें आपल्या समजुतीप्रमाणें तसल्या पंचांगाचा लाभ होण्याची योजना करून ती लयास गेली. त्यास जवळ जवळ एक तप होत आलें. अद्याप तिच्या अवतारकृत्याचें मधुर फळ तिच्या प्रेमळ भक्तांस चाखावयास मिळालें नाहीं. कमीटीनें श्रुतिस्मृति पुराणविहित मासत्र्ययनाची ऐक्यता अबाधित कायम राहिली पाहिजे ह्या मुख्य मुद्याकडे मुद्दाम डोळे झांक करून ही ऐक्यता क्रमशः नष्ट होत असण्याचें जें कारण अयनांश प्रकरण तें तसेंच कायम ठेविलें आहे. इतकेंच नव्हे तर 'ऋतुष्वेव संवत्सरे प्रतितिष्ठति' 'मधुश्च माधवश्च वासंतिकावृतु' अर्थात् एक ऋतुपर्याय एक वर्षाचें मान आणि चैत्र वैशाख वसंत ऋतु, जेष्ठ आषाढ ग्रीष्म ऋतु ह्या सरणीस झुगारून देऊन यवनांच्या पद्धतीप्रमाणें "सर्वे मासाः सर्वे ऋतवः" ह्या वैदिकबाह्य धर्मतत्वाचा अवलंब केला आहे. आणि म्हणून पंचांग कमीटीचा कित्ता सर्वथैव अयोग्य आहे.



# जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभाववर्णन.

## वृश्चिक संक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**वृश्चिकेंत रवि व तूळेंत चंद्रः**—या योगावर जन्मणारे लोक सुखलोलुप व प्रणयाचे शोकी असतात. सामान्यतः हा योग अशुभ असून आयुष्यांत पुष्कळ घडामोडी करणारा आहे. **मध्यम आयुष्यानंतर या लोकांचा उदय होतो.**

**वृश्चिकेंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः**—ह्या योगावर जन्मलेले लोक स्वार्थपरायण, खोल स्वभावाचे, गर्विष्ठ, परोत्कर्ष सहन न करणारे, कठोर आणि दुसऱ्यांचा द्वेष करणारे असतात. ह्या लोकांवर संकटें फार येतात. हे लोक अविचारी व धाडसी असतात.

**वृश्चिकेंत रवि व धनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक बोलण्यामध्यें उतावळे असतात; यांच्या हातून श्रमाचीं किंवा दगदगीचीं कर्में होत नाहींत यांच्या स्वभावामध्यें हलगर्जीपणा फार असतो. **या लोकांच्या आयुष्याचा उत्तरार्ध चांगला जातो.**

**वृश्चिकेंत रवि व मकरेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक आत्मकार्यांत अत्यंत कुशल व धोरणी असतात. टापटीप विशेष दिसून येते. यांच्या आयुष्यांत पुष्कळ संकटें येतात व घडामोडी घडतात. या लोकांचा स्वभाव धाडसी असतो. या लोकांस पाण्यापासून भय प्राप्त होतें. **अधिकारसंपन्न लोकांपासून फायदा होण्याचा संभव असतो.**

**वृश्चिकेंत रवि व कुंभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक धाडसी, कारस्थानी व स्थिर स्वभावाचे असतात. हे लोक हातीं घेतलेलें काम धिम्मेपणानें व जरूर पडल्यास कशाचीहि पर्वा न करतां तडीस नेतात. **धाडसामुळें या लोकांचा उदय होतो.**

**वृश्चिकेंत रवि व मीनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेल्या लोकांच्या अंगीं वृश्चिक राशीचा ताठा—गर्व कमी दिसून येतो. स्वभाव निरुपद्रवी व लाजाळु असतो. **उदार लोकांच्या सहवासामुळें यांचा फायदा होतो.**

## धनुसंक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्री–पुरुषांचें स्वभाववर्णन.

धनु ही राशिचक्रांतील नववी, द्विस्वभाव, अग्नितत्वाची आणि पुरुष राशि आहे. ह्या राशींत रवि दर वर्षी नोव्हेंबरच्या २०–२१ तारखेच्या सुमारास प्रवेश करतो आणि डिसेंबर महिन्याच्या २० तारखेपर्यंत या राशींत असतो. हें धनु राशींतील रवीचें भ्रमण चाललें असतां ज्यांचा जन्म होतो ते लोक उत्साही, आशावादी, उद्योगी, व्यवसायप्रिय, धाडसी, दुसऱ्यावर छाप बसविणारे आणि स्वातंत्र्यप्रिय असतात. हे लोक दुसऱ्याचे दोष नक्की कोठें आहेत हें काढण्यांत कुशल असतात. निर्भीड भाषण करणें, वादविवाद करणें, मानापमानाच्या गोष्टींकडे विशेष मन घालणें आणि एका वेळीं अनेक कामें करूं पहाणें वगैरे प्रकार त्यांच्या स्वभावांत दिसून येतात. परिस्थिति अनुकूल असो वा प्रतिकूल असो **सर्व कांहीं आपल्या कल्याणासाठीं होत आहे अशी या लोकांची दृढ भावना असते.** कचित् प्रसंगीं या लोकांच्या अंगीं हुजतखोर पणा, बेपर्वाई व वितंड वादाकडे प्रवृत्ति हे दोष दिसून येतात.

धनेच्या रवीच्या मनुष्यांचा ओढा मानसिक व बौद्धिक प्रगति करणाऱ्या गोष्टींकडे विशेष असतो. भविष्यकालीन गोष्टींसंबधानें सूचक ज्ञान या लोकांस नैसर्गिक असतें.

धनेच्या रवीच्या मनुष्यांची शरीर प्रकृति विशेष बळकट असते. रवि अतिशय पीडित असल्यास क्षय होण्याची भीति असते. अतिशय काम केल्यामुळें अगर मानसिक त्रासांमुळें शरीर प्रकृति नादुरुस्त होते. उघड्या हवेंत फिरणें किंवा व्यायाम घेणें या लोकांस चांगलें मानवतें.

या लोकांमध्यें शिक्षकाचा धंदा करणारे, अध्यापक, न्यायाधीश, वकील, सल्ला मसलत देणारे वगैरे लोक आढळतात.



# एकोणीसशें सोळातील मुख्य ग्रहांचीं भ्रमणें आणि त्यांचे परिणाम.

( लेखकः—राम नारायण. )

सन १९१६ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस **नेपच्यून** सिंह राशीच्या १ अंश व ५१ कलेमध्यें वक्री आहे. वक्रगतीनें तो मार्च महिन्याच्या २० व्या तारखेस कर्केच्या ३० व्या अंशांत शिरून १० एप्रिलपर्यंत वक्रीच आहे. त्यानंतर तो मार्गी होऊन २ मे रोजीं पुन्हा सिंह राशींत शिरतो व पुढें जवळ जवळ १४ वर्षे तो सिंह या साम्राज्यदर्शक राशींत भ्रमण करणार आहे. मे महिन्यांत सिंह राशींत शिरल्यापासून ७ नोव्हेंबरपर्यंत सिंहेचे ४ अं. ५४ कला आक्रमण करून पुन्हा वक्री होतो व वर्ष अखेरपर्यंत वक्रीच रहातो. ता. ३१ डिसेंबर रोजीं तो सिंहेच्या ४ अं. ८ कलेमध्यें वक्री आहे. चालू वर्षी २० मार्चपासून २ मेच्या काळाखेरीज नेपच्यून सिंह राशींत आहे आणि ह्या काळांतसुद्धां तो कर्केच्या ३० व्या अंशात आहे. त्यामुळें सबंध वर्षभर नेपच्यूनचीं फलें सिंह राशीचीं मिळतील. नेपच्यूनच्या भ्रमणामुळें विलक्षण घडामोडी होऊन लोकपक्ष बराच पुढें येतो. अनियंत्रित सत्तेस आळा बसतो आणि ज्या वेळेस नेपच्यून पीडित होतो त्या वेळीं भ्रमण राशींच्या अंमलाखालचे लोक संकटपरंपरेच्या भोवऱ्यांत सांपडतात. प्रस्तुत वर्षी सिंह राशीच्या अंमलाखालीं असणाऱ्या देशांमध्यें नेपच्यूनच्या भ्रमणाची फलें पहावयास सांपडतील. सिंहेच्या अंमलाखाली बोहेमिया, फ्रांस, इताली, रुमानियाचा उत्तर भाग आणि सिसली या देशांवर आहे.

नेपच्यूनच्या भ्रमणाचा व्यक्तींच्या कुंडलींत विचार केला तर ज्यांचे जन्म २२ जुलै पासून २८ जुलै पर्यंत आणि २० जानेवारी ते २६ जानेवारी पर्यंत झाले असतील त्यांस ह्या वर्षी मानसिक त्रास, अस्वस्थता, अस्थैर्य आणि वियोग यांचा अनुभव येईल; या लोकांमध्यें जे 'योग-जिज्ञासु' असतील त्यांस कांहीं विलक्षण प्रकारचे अनुभव येतील.

सन १९१६ च्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस **हर्शल** कुंभ या शास्त्रीय राशीच्या १३ अंश ४३ कला आहे. मे २९ ला १९ अंश ४२ कलेमध्यें येऊन

वक्री होत आहे व अक्टोबर २६ पर्यंत तो वक्रीच आहे. या तारखेस तो १९ अंश ४७ कलेमध्यें पुन्हां मार्गी होत असून डिसेंबर ३१ व्या तारखेस १७ अंश ३२ कलेपर्यंत येत आहे. कुंभ या शास्त्रीय राशींतील हर्शलचें भ्रमण १९१२ च्या जानेवारी ३१ तारखेपासून सुरु झालें तें १९१८ पर्यंत चालणार आहे. या सात वर्षांत जगाच्या इतिहासामध्यें शास्त्रीय शोधांची विलक्षण वाढ झालेली आढळून येईल असें मार्गे शास्त्रीय राशींतून झालेल्या हर्शलच्या भ्रमणावरून वाटतें. हर्शलच्या कुंभ राशींतील भ्रमणाची मागील वर्षें पहातां एका म्हणजे १३३० सालच्या भ्रमणावर बंदूकीच्या दारूची कल्पना निघाली व हल्लींच्या भ्रमणामध्यें बंदुकीच्या दारूपेक्षांहि अधिक प्राणहानि करणाऱ्या अजब चिजा पैदा करण्याकरतां शास्त्रज्ञांची डोकीं गर्क झालीं आहेत. या शास्त्रीय राशींतील भ्रमणामध्यें डॉ० बोस सारख्यांचे शास्त्रीय शोध जगांत येतात व निरपराधी प्राण्यांचा संहार करण्यासाठीं विमानासारख्या कलाही साध्य होतात! हर्शलच्या शास्त्रीय राशींतील भ्रमणामुळें शास्त्रांची प्रगति होणें हा सार्वत्रिक परिणाम आहे पण हर्शलचें भ्रमण ज्या राशींतून चाललें आहे त्या राशीच्या अंमलाखालीं असलेल्या देशांत कांहीं विवक्षित फलें पहावयास सांपडतात. "हर्शलच्या भ्रमणामुळें राज्यव्यवस्थेसंबंधानें चळवळी सुरू होतात; प्रजापक्ष जोरानें काम करूं लागतो, आणि ज्या वेळीं हर्शल पीडित होतो त्या वेळीं देशावर आकस्मिक संकटें येतात; तंटे, मारामाऱ्या, संप व असंतोष दिसूं लागतात. सामान्यतः हा काळ मोठ्या घडामोडीचा असतो. इतिहासांत नमुद करण्यासारखे फरक या वेळीं घडतात. हर्शल ज्या वेळीं शुभसंबंधित असतो त्या वेळीं देशाची सुधारणा होते." हर्शल ज्या राशींतून हल्लीं भ्रमण करीत आहे त्या कुंभ राशीचा अंमल अबिझीनिया, आरबस्थान, पीडमांट, पोलंड, प्रशिया, रशिया, स्वीडन, तार्तरी, वालाचिया व वेस्टफालिया यांवर आहे.

हर्शलबरोबर वक्री मंगळ ता. १९ फेब्रुवारी रोजीं प्रतियोग करीत आहे. 'अकल्पित रीतीनें त्रासदायक व भानगडीचे प्रश्न उपस्थित होणें, असंतोष वाढणें, धरणीकंप, संप, मारामाऱ्या, दरवडे, खून वगैरे प्रकार होणें,' हीं या प्रतियोगाचीं सामान्य फलें आहेत. विशिष्ट फलें ३ फेब्रुवारी



रोजीं होणाऱ्या रवि चंद्र संयोग कालाच्या कुंडलींतील स्थानांप्रमाणें निरनिराळ्या देशांत निरनिराळीं मिळतील. आपल्या देशांत हा रवि-चंद्रांचा संयोग पंचमस्थानांत होत आहे व मंगळ लाभ स्थानांत आहे त्यामुळें या दोन स्थानांसंबंधानें अनिष्ट फलें मिळतील. हर्शल-मंगळांचा प्रतियोग १९ तारखेस होणार आहे तेव्हां त्या सुमारास हीं अनिष्ट फलें पहावयास सांपडतील असें अनुमान करण्यास जागा आहे. त्याचप्रमाणें मकर-संक्रमण-कालीन अधिकार दर्शक दशमस्थान व देशांतील मालमत्ता दर्शक चतुर्थस्थान हीं दोन्ही स्थानें या प्रतियोगामुळें बिघडत आहेत. या प्रतियोगाच्या वेळीं मंगळ वक्री आहे तो मार्गी होऊन पुन्हां मे महिन्याच्या ४ थ्या तारखेस हर्शलबरोबर प्रतियोग करीत आहे परंतु यावेळीं गोचरीचा गुरु हर्शलबरोबर द्विरास्यंतर शुभयोग व मंगळाबरोबर त्रिकोण योग करीत आहे यामुळें या प्रतियोगाच्या अनिष्ट फलाची—तीव्रता बरीच कमी होईल असें वाटतें.

या वर्षांतील हर्शलच्या भ्रमणाचा परिणाम ज्यांचे जन्म २ फेब्रुवारी पासून ९ फेब्रुवारी पर्यंत आणि ५ आगष्ट ते १२ आगष्ट पर्यंत झाले असतील त्यांच्या कुंडल्यांमध्यें विशेषेंकरून दिसून येतील. हर्शलच्या भ्रमणामुळें आकस्मिक हानि, संकटें, वियोग व बदल होणें वगैरे गोष्टी होतात. कुंडलीमध्यें हर्शल कोणत्या स्थानांतून भ्रमण करीत आहे त्यावरून संकटांची दिशा कळेल.

जानेवारीच्या १ ल्या तारखेस **शनि** कर्केच्या १३ अंश १७ कलेंत वक्री आहे व तो वक्रगतीनें कर्केच्या ९ अंश ३३ कलेमध्यें १२ मार्च रोजीं येऊन मार्गी होत आहे. शनि अक्टोबरच्या १७ व्या तारखेस सबंध कर्क राशि भ्रमण करून सिंह राशींत शिरत आहे. नोव्हेंबर १२ रोजीं सिंह राशीच्या ०—३६ कलेमध्यें पुन्हां वक्री होत असून वक्रगतीनें ८ डिसेंबरला कर्क राशीच्या ३० व्या अंशांत येत आहे. त्या पुढें ३१ डिसेंबर रोजीं तो २८ अंश व ३१ कलेमध्यें वक्री आहे.

शनीचें भ्रमण ज्या राशींतून होत असतें त्या राशीच्या अंमलाखालच्या देशांतील किंवा शहरांतील लोकांच्या प्रगतीस अडथळा होतो; रोगराई व सार्वजनिक स्वरूपाची संकटें येऊन असंतोष व खिन्नता हीं दिसूं लागतात.

कर्क राशीचा अंमल आफ्रिकेचे उत्तर व पश्चिम भाग, हालंड, मारिशस, पॅरेग्वे, स्काटलंड, व न्यूझीलंड या देशांवर आणि मांचेस्टर, यार्क, न्यूयॉर्क, ॲमस्टरडॅम, बर्न, कांस्टॅन्टिनोपल, मॅग्डेबर्ग, मिलन, स्टाकहोम, ट्यूनिस व वेनिस या शहरांवर आहे.

शनि कर्क राशींतून भ्रमण करीत असतां २९ मार्च रोजीं गुरु बरोबर केंद्रयोग होत आहे. "अनेक गोष्टींमुळें देशाच्या संपत्तीवर अनिष्ट परिणाम घडतो; अप्रिय असा एखादा कर लादला जातो; बँका व शेअर बझार यांचे व्यवहार चांगले चालत नाहींत; अस्वस्थता व उदासीनता पसरविणारा हा योग आहे". आपल्या देशांत मेष संक्रमणाच्या वेळीं हा योग धनस्थान व पंचमस्थान या दोन स्थानांतून होत आहे त्यामुळें देशांतील संपत्ति, शिक्षण, नाटकगृहें व नाटकमंडळ्या यांची स्थिति समाधानकारक रहाणार नाहीं.

आक्टोबर महिन्यांत शनि सिंहेच्या १ ल्या अंशांत असून नेपच्यून सिंहेच्या ९ व्या अंशांत आहे. शनि व नेपच्यून यांची तंतोतंत अंशात्मक युति या वर्षी होत नाहीं हें खरें परंतु आक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर या तीन महिन्यांत हे दोन्हीहि अशुभ ग्रह ९ व्या अंशाच्या अंतरानें युति मध्यें आहेत. शनि व नेपच्यून यांच्या युति योगामुळें "प्रजा व लोकपक्ष यांची हानि होते. देशामध्यें गुप्त गुन्हे फार होतात व त्यासंबंधानें गाजावाजा फार होतो." या युतीची अनिष्ट फलें विशेषेंकरून सिंह राशीच्या अंमलाखालच्या देशांत दृष्टोत्पत्तीस येतील. तूळ संक्रमणकाळीं ही युति सप्तमस्थानांत होत आहे. घटस्फोटाचे प्रकार आणि स्त्रियांच्या अनीतिसंबंधाच्या गोष्टी बाहेर येऊन गवगवा होईल.

चालू वर्षातील शनीचें भ्रमण १ जुलै ते २३ जुलैपर्यंत आणि १ जानेवारी ते २२ जानेवारीपर्यंत ज्यांचे जन्म झालेले आहेत त्यांस शरीरप्रकृति व नोकरी धंद्याचे दृष्टीनें त्रासदायक जाईल.

जानेवारीच्या १ ल्या तारखेस गुरु मीन राशीच्या २२ अंश व १७ कला आहे. तो १२ फेब्रुवारी रोजीं मेष राशींत शिरत आहे. या तारखेपासून जून अखेरपर्यंत गुरु मेष राशीमध्यें भ्रमण करीत आहे. जून महि-



न्याच्या २६ व्या तारखेस तो वृषभ राशींत जात असून त्या राशीच्या ९ अंश व २४ कलेमध्यें येऊन २९ आगष्ट रोजीं वक्री होत आहे आणि वक्रगतीनें आक्टोबरच्या २७ व्या तारखेस मेषराशीच्या ३० व्या अंशांत जात आहे. तसाच तो पुढें वक्रगतीनें २१ डिसेंबर रोजीं मेष राशीच्या २९ अंश २९ कलेमध्यें येऊन मार्गी होत आहे. ३१ डिसेंबर रोजीं तो मेष राशीच्या २९ अंश ३७ कलेंत येत आहे.

गुरु या वर्षामध्यें पहिले ४२ दिवस मीन राशीमध्यें, त्या नंतरचे १३९ दिवस मेष राशीमध्यें, त्या नंतरचे १२३ दिवस वृषभ राशीमध्यें व वर्षाखेरचे ६६ दिवस पुन्हां मेषमध्यें आहे. गुरूचें भ्रमण ज्या राशींतून होतें त्या राशीच्या अंमलाखालच्या देशांमध्यें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें सुधारणेच्या रूपानें फायदा होतो. गुरु पीडित नसतां शांतता व आरोग्य हीं रहातात. देशांतील मतभेद जाऊन राष्ट्रहिताकरतां ऐक्य होतें. या वर्षी ज्या देशांच्या राशींतून गुरूचें भ्रमण होत आहे त्यांपैकीं कांहीं देश पुढें दिले आहेत:—नार्मंडी, पोर्तुगाल, इंग्लंड, डेनमार्क, पालेस्टाईन, पोलंड, सीरिया व आयर्लंड. फेब्रुआरी महिन्यामध्यें गुरु हा नेपच्यून बरोबर त्रिकोण योग करीत आहे. या योगामुळें प्रजाहिताचीं कामें, धार्मिक संस्था व शिक्षण यांच्यासंबंधानें विचार केला जाईल. सपटेंबर महिन्यामध्यें गुरु व नेपच्यून यांचा केंद्रयोग होत आहे. हा योग या वर्षाच्या तूळ संक्रमणाच्या कुंडलीमध्यें चतुर्थ व सप्तम स्थानांतून होत आहे. या योगाबरोबर नेपच्यून मंगळांचा केंद्रयोग, नेपच्यून शनींचा युतियोग, गुरु मंगळांचा प्रतियोग आणि मंगळ हर्शलचा ६ अंशांच्या अंतरानें होणारा केंद्रयोग होत आहेत. हें योग स्थिर राशींतून आणि आपल्या देशांत केंद्रांतून होत आहेत. हें तूळ संक्रमण अत्यंत महत्वाचें असल्याकारणानें त्याचा विचार स्वतंत्र रीतीनें पुढें एखाद्या वेळेस करणार आहों. हें तूळ संक्रमण अनेक संकटांचें द्योतक दिसतें. धरणीकंप होऊन मनुष्यहानि होईल. ज्यांचे जन्म १३ मार्च पासून २२ एप्रिलपर्यंत झाले असतील त्या लोकांस एकोणीसशें सोळा सालांतील गुरूचें भ्रमण महत्वाचें जाईल.

**मंगळ** जानेवारीच्या १ ल्या तारखेस सिंह राशीच्या २९ अंश ४९ कलेमध्यें वक्री आहे व तो वक्री असतां १९ फेब्रुवारी रोजीं हर्शल बरोबर प्रतियोग करीत आहे. त्यानंतर २२ एप्रिल रोजीं सिंहेच्या १० अंश २० कला होऊन मार्गी होत आहे. २९ मे रोजीं कन्या राशींत, २३ जुलै रोजीं, तूळ राशींत, ९ सप्टेंबर रोजीं वृश्चिक राशींत, २२ आक्टोबर रोजीं धनु राशींत आणि २ डिसेंबर रोजीं मकर राशींत शिरत आहे. मंगळाच्या **केवळ** भ्रमणामुळें देशांत विशेष फलें अनुभवास येतात असें आढळून येत नाहीं. ज्या राशींत गुरु, शनि, हर्शल व नेपच्यून यांच्या बरोबर मंगळाचे महत्वाचे योग होतात मग ते शुभ असोत वा अशुभ असोत त्या राशींच्या अंमलाखालच्या देशांत मंगळाच्या भ्रमणाची फलें पहावयास मिळतात.

सिंह राशींत मंगळ असतांना हर्शल बरोबर प्रतियोग करीत आहे. या योगामुळें अपघात, असंतोष, गुन्हे आणि हवामान बिघडणें या गोष्टी होतात. ३ सप्टेंबर रोजीं मंगळ व शनि यांचा केंद्रयोग होत आहे. १५ सप्टें बर रोजीं मंगळाचा गुरूबरोबर प्रतियोग होत आहे. हे दोन्ही योग अत्यंत अशुभ आहेत. पहिल्या योगामुळें असंतोष, अस्वस्थता, चोऱ्या, मारामाऱ्या व दरवडे होतील. गुरु मंगळांच्या अशुभ योगानें धार्मिक स्वरूपाची भांडणें उपस्थित होतील. रोगांची संख्या वाढेल आणि अस्वस्थता उत्पन्न होईल. मंगळाचे अशुभ योग वातावरणावर अनिष्ट परिणाम फार जलदीनें करतात.

वर वर्णन केलेल्या पांच मुख्य ग्रहांच्या भ्रमणांखेरीज बाकी राहिलेल्या ग्रहांची भ्रमणें विशेष महत्वाचीं नाहींत म्हणून त्यांचा विचार केला नाहीं. ग्रहांच्या केवळ भ्रमणांवरून वर्षामध्यें होणाऱ्या सर्व घडामोडी कळतील असें नाहीं; फक्त सामान्यत्वानें त्यांचा बोध होईल इतकेंच. यावेळीं सामान्य वर्णनही पुरेसें होईल हें जाणून हा लहानसा प्रयत्न केला आहे. सूर्यसंक्रमणावरून सर्व वर्षाचा विचार करण्याचा पुढें आमचा विचार आहे.



# विचारमाला.

( लेखक–प्रेषित )

**ग्रहांचें** सामर्थ्य ग्रह आपल्या दशांतर्दशाकालीं मनुष्यास अनुभवास येतें असें आर्यग्रंथांत वर्णिलें आहे. पाश्चात्यपद्धतींत ते आपला परिणाम आपल्या डायरेक्शन ( दिनवर्ष पद्धतींत ज्या वेळीं ते योग करितील त्या वेळीं ) मध्यें करितात असें म्हटलें आहे. जो तो आपापल्या मताप्रमाणें काल ठरवितो. आंगिरसपद्धतींत ग्रह आपल्या वर्षकालीं फल देतात असें समजतात. पण त्यांचें फल वरील कोणत्याही पद्धतीनें पाहिलें तरी जर ते गोचरीनें ज्या कालीं आपल्या दशाकालांत, डायरेक्शनमध्यें अथवा वर्षकालांत कांहीं परिणामकारक योग इतर ग्रहांशीं करितील तर त्या वेळीं अनुभव येतो असें सर्वैक्यमत आहे.

पण ग्रह आपलें फल कसकसें देईल व किती किती प्रमाणांत देतील तर आपणास असें दिसून येईल कीं ते ग्रह जसे बलवान् असतील तसे ते फल देतील असें प्रत्येक जण उत्तर देईल. बहुतेक ज्योतिषी लोकांत ग्रह वृद्ध, तरुण, बाल इ. आहे कीं काय हें प्रथम पाहतात. तो प्रकार असा:—

**बालोरसांशैरसमेप्रदिष्टस्ततः कुमारोहि युवाथवृद्धः ॥**
**मृतःक्रमादुत्क्रमतःसमर्क्षे बालाद्यवस्था कथिता ग्रहाणाम् ॥ १८ ॥**
**फलं तु किंचिद्वितनोतिबालश्चार्द्धं कुमारो यतनेन पूंसाम् ॥**
**युवा समग्रं खचरोऽथवृद्धः फलं च दुष्टं मरणं मृताख्यः ॥ १९ ॥**

**“ जातकपाराशरी ”**

**अर्थः**—सम राशीच्या पहिल्या ६ अंशांतील कोणताही ग्रह **बाल,** ६ ते १२ **कुमार,** १२ अंश ते १८ अंशापर्यंत **युवा,** १८ अंशांपासून २४ अंशांपर्यंत **वृद्ध** व २४ अंशांपासून ३० अंशांपर्यंत **मृत** असतो. विषम राशींत पहिल्या ६ अंशांतील कोणताही ग्रह **मृत,** ६ अंशांपासून १२ अंशांपर्यंत **वृद्ध,** १२ अंशांपासून १८ अंशांपर्यंत **युवा,** १८ अंशांपासून २४ अंशांपर्यंत **कुमार** व २४ अंशांपासून ३० अंशांपर्यंत **बाल** असतो.

बालग्रह थोडेंसें, कुमारग्रह अर्ध, युवाग्रह संपूर्ण, वृद्धग्रह दुष्ट (अनिष्ट) फल व मृतग्रह नाश (मरण) देतो. याप्रमाणें ग्रह आपल्या स्थितीप्रमाणें फल देतील, असें समजतात.

याच अर्थाचा पण जास्त स्पष्ट बोध करणारा श्लोक पुढील प्रमाणें:—

**बालैः सुखी सुशीलश्च यौवनैरवनीश्वरः ॥**
**वृद्धैर्व्याधिर्ऋणे वृद्धिर्मरणे मरणं व्ययम् ॥**

यावरून बालग्रह मनुष्यास सुखी करितात, कुमार ग्रह त्यास सुशील करितात, युवाग्रह राजा (पूर्ण ऐश्वर्य देतात) करितात, वृद्धग्रह रोगी व कर्जबाजारी करितात व मृतग्रह धनाचा व्यय व मृत्युकारक होतात.

या प्रकारें ग्रह फल देण्यास समर्थ असतात व ते त्यांच्या कुंडलींतील इतर शुभाशुभस्थितीप्रमाणें न्यूनाधिक्यानें फल देतील, अशी कल्पना आर्यज्योतिषी करितो; व त्याचप्रमाणें तें फल त्याचे दशाकालीं मिळेल असेंही सांगतो पण— सारावलींत बालाद्यवस्था फारच निराळ्या सांगितल्या आहेत. त्या—

**स्वमित्रक्षेत्रसंस्थानां ग्रहाणां बालसंज्ञिका ।**
**स्वत्रिकोणगतानांच कुमारो नामसंज्ञितः ॥**
**ग्रहाणां स्वोच्चसंस्थानां युवराज………… ।**
**शत्रुक्षेत्रगतानांच वृद्धो नामतथेरितः ॥**
**नीचगानां ग्रहाणांच दशा मरणसंज्ञिता ।**
**तत्फलसमायुक्ता ग्रहाणां तु दशा भवेत् ॥**

**अर्थ**—जे ग्रह मित्रक्षेत्रीं असतात ते **बाल**, जे मूलत्रिकोणीं असतात ते कुमार, जे उच्च असतात ते **युव**, जे शत्रुगृहीं असतात ते वृद्ध व जे नीच असतात ते मरणसंज्ञक समजावे. व त्यांच्या त्यांच्या दशेंत आपल्या अवस्थेप्रमाणें फल देतात. यांत ग्रह स्वक्षेत्रीं असतां कोणती अवस्था त्यास असते हें सांगितलेलें नाहीं. अशा स्थितींत ज्योतिषी आपापल्या मताप्रमाणें स्वगृहस्थ व समगृहस्थ ग्रहाला कोणत्या तरी वर्गांत ढकलणार हें उघड आहे. स्वगृहाची योग्यता मित्रगृहापेक्षां अधिक व मूलत्रिकोणापेक्षां कमी आहे हें उघड आहे. म्हणून स्वगृहस्थ ग्रहास बाळ अगर कुमार या अवस्था देणें कोतेपणाचें आहे. अर्थात् बाल व कुमार यांच्या मधली अवस्था स्वगृहीं असलेल्या ग्रहास प्राप्त होते, म्हणून या अवस्थेला कांहींतरी निराळी संज्ञा असणें अगत्याचें आहे.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राच: कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्‌प्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष १ लें. | फेब्रुआरी १९१६. | अंक ११ वा.

## भाव विचार.

ज्योतिर्मालेच्या मागील १० अंकांत **ग्रह, राशि** व **नक्षत्रें** यांच्या संबंधानें सविस्तर विवेचन केलें आहे. आतां चालू अंकामध्यें "भावासंबंधानें" विचार करावयाचा आहे. कुंडलींतील द्वादश भाव साधनाचें गणित कसें करितात त्याचप्रमाणें आर्य व युरोपीय भावसाधनप्रकार यांमध्यें महत्त्वाचा फरक कोणता आहे या संबंधानें सविस्तर विवेचन कै० रामकृष्णपंत आठवले यानीं आपल्या एका निबंधांत* फारच मार्मिक रीतीनें केलें आहे. हा निबंध वाचकांनीं एक वेळ अवश्य वाचावा. चालू लेखांत भावसाधनपद्धती-संबंधानें विचार करावयाचा नसून कुंडलीच्या द्वादश भावांवरून काय काय गोष्टी कळतात याचें थोडक्यांत विवेचन करण्याचें योजिलें आहे.

* कुंडलीविज्ञान पुस्तक ८ मध्यें हा निबंध छापला असून तोच निबंध श्रीयुत नवाथे यांच्या सुलभजातक भाग ३रा यामध्यें छापला आहे.

ज्योतिष शास्त्राचे ( १ ) जातक ( २ ) प्रश्न व ( ३ ) मेदिनीय ह्या प्रमाणें तीन मुख्य विभाग होतात व प्रत्येक विभागांत प्रत्येक भावावरून निरनिराळा विचार होतो. आर्य ग्रंथांत कोण कोणत्या भावावरून कोण कोणत्या गोष्टींचा विचार होतो या संबंधानें सांगतांना ह्या तिन्ही शाखांची भावफलें एकत्र ग्रथित केलेलीं आहेत. त्यामुळें जातकांत सदरहू भावावरून कोण कोणत्या गोष्टींचा बोध होतो यांची कल्पना ज्याची त्यास आपल्या बुद्धिमत्तेनें करावी लागते व याचमुळें जातक विभागांत कित्येक चमत्कारिक मतांतरें व कल्पना रूढ झाल्या आहेत. उदाहरणार्थः— पुरुषाच्या कुंडलींत सप्तमस्थानावरून स्त्रीचा विचार होतो. म्हणून सप्तमस्थानाचें चतुर्थस्थान हें स्त्रीच्या मातेचें दर्शक, दशमस्थान हें तिच्या पित्याचें दर्शक ह्याप्रमाणें एकाच कुंडलीवरून अनेक नातेवाईकांचा विचार करण्याचा प्रकार गौण वाटतो. अशा रीतीनें पाहूं गेलें असतां आपल्या सासूचें व बापाचें स्वभाव रंगरूप वगैरेचें वर्णन सारखें असलें पाहिजे असें होतें परंतु त्याप्रमाणें सर्वत्र ठिकाणीं आढळेल असें वाटत नाहीं. अशा रीतीनें सर्व नातेवाईकांचा विचार करण्याची पद्धति यवन ज्योतिषी लोकांत प्रश्न विभागांत फार रूढ आहे त्यावरून तिनें आर्य व यूरोपीय शास्त्रांत प्रवेश केला असें कित्येकांचे मत आहे.

प्राचीन आर्य ऋषींनीं द्वादशभाव कां मानले व त्यावरून अमुकच गोष्टी कां पाहाव्या हें कां ठरविलें या संबंधानें आज कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. फक्त त्यांनीं सांगितलेल्या गोष्टींचा त्या भावाशीं निकट संबंध असल्याचें दिसून येतें. प्रस्तुत निबंधांत प्रथमतः प्रत्येक भावावरून मुख्यतः कोणकोणत्या गोष्टींचा बोध होतो या संबंधानें संस्कृत श्लोक देऊन नंतर त्यांतील कोणत्या गोष्टी कोणत्या विभागासंबंधीं आहेत या बद्दल आम्हीं आमचा अनुभव नमूद करूं. त्या नंतर आर्य व युरोपीय मतें ह्यांमध्यें असलेल्या मतभेदाचा विचार करून त्यांपैकीं ग्राह्याग्राह्यते संबंधानें विचार करण्याचें योजिलें आहे. व संकलित रीतीनें जातक, प्रश्न व मेदिनीय या तिन्ही शाखांमध्यें त्या त्या भावावरून कोणत्या गोष्टींचा बोध होतो याचा



तुलनात्मक विचार करण्याकरितां पुन्हां स्पष्ट रीतीनें खुलासा करण्याचें योजिलें आहे. आम्हीं सर्वज्ञ नाहीं त्यामुळें आमचे हातून चुका होणें मानवी धर्माप्रमाणें साहजिक आहे करितां कोठें कमी जास्त झाल्यास तें वाचक वर्ग आमच्या नजरेस आणून देतील अशी आशा आहे.

कुंडलीच्या द्वादश स्थानांचीं पुढें लिहिल्याप्रमाणें नांवें आहेतः—१ तनु २ धन ३ सहज ४ सुहृत् ५ सुत ६ रिपु ७ जाया ८ मृत्यु ९ धर्म १० कर्म ११ आय व १२ व्यय.

कुंडलीच्या प्रथम स्थानावरून खालील गोष्टींचा बोध होतो.

**शरीरवर्णचिन्हायुर्वयोमानं सुखाऽसुखं ॥**
**जातिः शीलं च मतिमान् लग्नात् सर्वं विचिंतयेत् ॥**

ता. नि.

अर्थः—शरीर कृश किंवा पुष्ट, वर्ण गोरा किंवा काळा, शरीरावरील चिन्हें, अल्पायुषी किंवा मध्यमायुषी, दीर्घायुषी, सुख, दुःख, जाति, स्वभाव वगैरे गोष्टींचा विचार प्रथम भावावरून करतात.

वरील श्लोकांत ग्रंथकारानें प्रथम भावावरून सहा गोष्टींचा विचार करण्यास सांगितलें आहे. त्याचा आतां आपण क्रमानें विचार करूं. **शरीराचा बांधा** ह्याची साधारणपणें लग्नीं उदित असणाऱ्या राशीवरून बरीच कल्पना करतां येते. **वर्णासंबंधानें** किंवा शरिराचे कांतीसंबंधानें विचार करतां नुसत्या लग्नीं उदय पावत असलेल्या राशीवरून तीं सांगतां येतील असें वाटत नाहीं. **चिन्हें**—शरीरावर असणारीं तीळ मसादि चिन्हें किंवा शरीरास असलेलीं व्यंगें यांची कल्पना लग्नावरून किंवा लग्नीं उदित असलेल्या द्रेष्काणावरून करतां येईल असें वाटत नाहीं. यासंबंधानें सविस्तर विवेचन पुढें एखाद्या अंकांत करण्याचा विचार आहे. **आयुर्वयोमान**—नुसत्या लग्नावरून जन्मलेला प्राणी अल्पायु किंवा दीर्घायु आहे असें म्हणतां येणार नाहीं. रवि, चंद्र व जन्म काळीं पूर्व क्षितिजावर उदित असलेली राशि यांवरून आयुर्मर्यादेबद्दल बरीच अटकळ करतां येते. 'सुखासुखं' हें पद फारच घोटाळ्याचें आहे. यावरून आमच्या मतें फक्त शरीर सुखाचाच

बोध होतो. **जाति**—जन्मलेला प्राणी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र अथवा पुरुष, स्त्री किंवा नपुंसक यांचा बोध होतो किंवा काय हा प्रश्न बराच वादग्रस्त आहे. जन्म लग्नावरून स्त्रीपुरुष ज्ञान होतें किंवा नाहीं या संबंधानें आज कांहीं निश्चित असें लिहितां येत नाहीं परंतु **आधान काळ** किंवा गर्भ संभव काळ यावरून स्त्रीपुरुषज्ञान शक्य वाटतें. **शील**—लग्नीं उदित राशि व उदित ग्रह यांवरून स्वभावाबद्दल बरीच अटकळ करतां येते. सर्वसाधारणपणें विचार करतां जातकस्कंधांत प्रथम भावावरून पुढें लिहिलेल्या गोष्टींचा विचार करतात.—शरीर सुख, शरीराचा बांधा व स्वभाव. ह्या स्थानाचा अंमल तोंड व डोकें यांवर आहे.

**प्रश्न ज्योतिषांत** ह्या स्थानावरून प्रश्न विचारणाराचें शरीर, शरीराचा आकार, आयुरारोग्य, त्यांस होणारे अपघात, प्रश्न विचारणाराच्या मित्रांचे बंधु, प्रश्नकर्त्यांच्या भागीदारांच्या बायका, नोकरचाकर यांचे मृत्यु, मुलांचे लांबचे प्रवास, भावांचे मित्र, समुद्रांत असलेली नौका व प्रश्न विचारणारांचे विचार यांचा बोध होतो.

**मेदिनीय** ज्योतिषांत ह्या भावावरून देशाची व देशांत राहणाऱ्या लोकांची शारीरिक व मानसिक स्थिति व त्यांचें आयुरारोग्य दर्शविलें जातें.

या भावास केन्द्र अशी संज्ञा आहे व या स्थानांत उदित असलेल्या ग्रहांचे संस्कार मनावर फारच जोराचे झालेले आढळतात. लग्नीं **गुरु, बुध, रवि, शुक्र,** हर्शल किंवा **ने**पच्यून उदित असतां बलवान असतात. हर्शल किंवा **ने**पच्यून लग्नीं एकटे उदित असण्यापेक्षां त्यांचे बरोबर **बुध, चंद्र** किंवा **रवि** यांचा त्रिकोण दृष्टियोग किंवा सार्ध त्रिकोणदृष्टियोग घडत असतां उत्तम प्रकारचे कल्पक व हुशार लोक जन्म पावलेले आढळतात.

कुंडलींतील दुसऱ्या भावास **धन** स्थान म्हणतात. या भावावरून खालील गोष्टींचा विचार होतो असें आर्य ग्रंथकाराचें मत आहे.

**कौटुंबाद्धर्त्तव्या-मुखं च वाग्दक्षिणाक्षि पूर्वार्थान् ॥**
**विद्याभुक्ति विशेषान् दासान्मित्राणि च प्रवदेत् ॥**

स. चिं.



# नैसर्गिक मित्रत्व आणि शत्रुत्व.

( ले. सरस्वती नंदन )

मानवी स्वभावाचें निरीक्षण करणारा प्रत्येक मनुष्य कांहीं मनुष्यांचा परस्परांविषयीं अगर दुसऱ्यांविषयीं आकस्मिक उद्भवणारा अनुकूल अगर प्रतिकूल ग्रह पाहून थोडाबहुत आश्चर्यचकित होतो. कित्येक प्रसंगीं परस्पर स्नेह असलेल्या दोन इसमांचा एखाद्या तिसऱ्या इसमाबद्दल प्रथम-दर्शनींच पूर्ण मतभेद झालेला आढळण्यांत येतो. असें होण्याचें आधिभौतिक शास्त्रदृष्ट्या कांहीं तरी कारण हें असलेंच पाहिजे. जर कार्य दृश्य आहे तर तेथें सृष्टिनियमाप्रमाणें दृश्य किंवा अदृश्य कारण हें असलेंच पाहिजे व ह्या गोष्टीचा माझ्या मतें ज्योतिषशास्त्रदृष्ट्या बराच समाधानकारक उलगडा होण्यासारखा आहे.

कल्पना करा कीं एखाद्या इसमाचा तूळ लग्न उदित असतां जन्म झालेला आहे आणि दुसऱ्या एखाद्याचा धनु लग्न उदित असतां जन्म झालेला आहे आणि दोघेही ते स्नेही आहेत. त्यांच्या स्नेहाचें कारण ज्योतिषशास्त्रदृष्ट्या पाहूं गेलें असतां दोघांच्या जन्मकालच्या उदित लग्नामध्यें अर्ध त्रिकोण दृष्टियोग किंवा ६० अंशांचा शुभ दृष्टियोग होत असल्याचें आढळतें. तिसरा एखादा मनुष्य मेष लग्न उदित असतां जन्म पावला असून त्याचा ह्या तूळ व धनु लग्नांवर जन्म पावलेल्या मनुष्यांबरोबर कांहीं कारणानें संबंध घडून आला तर त्यांपैकीं एकाचा तो दोस्त होतो व दुसऱ्याचें व त्याचें विशेष पटत नाहीं. कारण मेष व धनु ह्या एकमेकांच्या त्रिकोण राशि आहेत. त्या दोघांच्या लग्नांमध्यें नवपंचम योग होतो. परंतु तूळ व मेष ह्या एकमेकांच्या समोरील राशि असून त्यांमध्यें शुभ संबंध घडत नाहीं. परंतु मेषलग्न उदित असतां जन्म होणारी स्त्री असेल व तूळ लग्नावरचा पुरुष असेल तर सदर दोघांमध्यें एकमेकांबद्दल तिटकारा असण्याऐवजीं आवड असलेली पाहण्यास मिळेल. सजातीय स्त्री अगर पुरुष यांचा एकमेकांच्या सप्तमांतील राशीवर जन्म झाला असेल तर या दोघांमध्यें

मैत्री कचितच टिकेल. इतकेंच नव्हे तर उभयतांचा हितसंबंध विरोधी असल्यामुळें त्यांचा एकमेकांना अपाय करण्याकडे कल आढळेल. उभय जातीच्या कुंडलींत लग्नांचा चतुर्थाष्टम योग वाईट होय. विजातीय (पुरुष व स्त्री) मनुष्यांच्या कुंडल्यांपैकीं एकाच्या कुंडलीमध्यें ज्या स्थानीं **मंगळ** असेल त्याच स्थानीं अथवा त्याच्या समोरच्या स्थानीं अथवा ज्या राशींत **मंगळ** असेल त्याच राशींत दुसऱ्याच्या कुंडलींत शुक्र असेल तर या योगामुळें एकमेकांबद्दल विलक्षण आवड किंवा ओढा उत्पन्न होतो. अशा इसमांचें जर आपसांत लग्न झालेलें नसेल तर त्यांचा सहवास खात्रीनें शुद्ध रहाणार नाहीं. सदरहू योगांस जर इतर मारकयोग असतील तर वरील योगाचा परिणाम थोडया कमी प्रमाणानें पहाण्यास मिळेल.

एकाच्या कुंडलींत ज्या राशींत रवि असेल त्याच राशींत दुसऱ्याच्या कुंडलींत चंद्र असेल तर हा योग परस्परांमध्यें उत्तम तऱ्हेची मैत्री दर्शवितो. हा योग नवराबायकोच्या कुंडलींत होत असतां उत्तमप्रकारें प्रीति दर्शवितो. त्याचप्रमाणें एकाच्या कुंडलींत ज्या राशींत रवि अगर चंद्र असेल त्याच राशींत दुसऱ्याच्या कुंडलीमध्यें शुक्र असतां परस्परांत दृढ मैत्री दर्शवितो. नवराबायकोच्या कुंडलींत हा योग उत्तम प्रकारचें प्रेम दर्शवितो.

सर्वांत दृढ मैत्रीयोग म्हणजे दोन मनुष्यांच्या कुंडल्यांमध्यें **रवि** व **चंद्र** यांचा परस्परांच्या कुंडलींत नवपंचम योग होणें हा आहे. उदाहरणार्थ—जर एखाद्याच्या कुंडलींत रवि मीन राशीचा २० अंश व चंद्र धनुराशीचा १० अंश असेल तर अशा मनुष्याबरोबर ज्याचा रवि मेष किंवा सिंह राशीचा १० अंश, किंवा चंद्र कर्क किंवा वृश्चिक राशीचा २० अंश असेल त्या मनुष्याबरोबर दृढ मैत्री होईल. ते उत्तम स्नेही होतील; कारण त्यांच्या कुंडल्यांमध्यें रवि व चंद्र शुभसंबंधित झालेले आहेत.

दोन स्नेह्यांपैकीं एकाच्या ज्या राशींत रवि किंवा चंद्र असेल त्याच राशींत दुसऱ्याच्या कुंडलींत पापग्रह असतील किंवा चंद्राबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतील तर त्या दोघांमध्यें मैत्री फार काळ टिकणार नाहीं.



याप्रमाणें जर दोन इसमांच्या कुंडलींत योग घडून येतील तर त्या इसमांमध्यें स्वाभाविक प्रेम अगर तिरस्कार उत्पन्न होईल. व हे प्रथम दर्शनीं उद्भवणारे विकार जरी कांहीं दुसऱ्या कारणानें कमी झाले तरी कायमचे नष्ट होणें शक्य नाहीं.

एखाद्या विवक्षित वर्षी कांहीं व्यक्तींबरोबर संबंध घडतात. त्याबद्दल विचार करतां असें पहाण्यांत येतें कीं जन्मानंतर उभयतांच्या कुंडलींत ग्रहांचे वार्षिक भ्रमणाचे योग ( Progressed positions of Planets ) घडत असल्यामुळें कांहीं नवीन हित संबंध घडून निरनिराळया व्यक्तींबरोबर व्यवहार घडतात. उदाहरणार्थ—एकाच्या कुंडलींतील मंगळ दुसऱ्याच्या कुंडलींतील शुक्रावरून वार्षिक ( दिनवर्ष पद्धतीप्रमाणें ) जात असतां ह्या दोन इसमांमध्यें एकमेकांबद्दल आवड किंवा प्रीति उत्पन्न झालेली पहाण्यास मिळते. सदरहू योग स्त्री व पुरुष अशा दोन व्यक्तींच्या कुंडल्यांत होत असून त्यांचा अति निकट संबंध असला तर त्या संबंधास विषय वासनेचें रूप येतें. हाच प्रकार एखाद्याचा शुक्र दुसऱ्याच्या मंगळावरून जात असतां अनुभवास येईल.

एखाद्याचा वार्षिक रवि दुसऱ्याच्या जन्मस्थ चंद्रावरून जात असेल त्या वेळीं त्या दोघांमध्यें दृढ मैत्री घडेल. परंतु उभयतांच्या कुंडल्यांमध्यें जन्मस्थ ग्रहांचा कांहीं चांगला दृढ मैत्रीदर्शक योग नसल्यास सदरहू मैत्री टिकणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें एकमेकांचे वार्षिक रवि परस्परांशीं चतुर्थ, दशम, केंद्र किंवा प्रतियोग करितात तेव्हां त्या इसमांच्या मैत्रीमध्यें खंड किंवा भांडणें घडतात. परंतु जन्मकुंडलींत जन्मस्थ ग्रहांचे अशुभ योग नसल्यास वरील प्रकारानें येणारीं भांडणें किंवा तंटे फार वेळ टिकणार नाहींत.

जेव्हां जेव्हां एकाचा रवि दुसऱ्याच्या गुरूशीं युक्त किंवा शुभ दृष्टियोग करतो तो काळ परस्परांच्या मैत्रीस किंवा लाभास चांगला अनुकूळ असतो. असो, येथपर्यंत **माले**च्या वाचकांसाठीं जन्म कुंडल्यांवरून नैसर्गिक मित्रत्व व शत्रुत्व यांची ज्योतिषशास्त्रदृष्ट्या कशी कल्पना करतां येते याचें विवेचन केलें आहे.

## मित्र किंवा उपकारकर्ते.

### लेख २ रा.

कुंडलींतील एकादशस्थान, एकादशस्थानाचा स्वामी, **बुध**, **रवि** व **चंद्र** ह्यांवरून मित्र किंवा उपकारकर्ते यांचा विचार करितात.

**रवि**, **चंद्र**, शुभग्रह अथवा **बुध** एकादशस्थानीं बली व इतर ग्रहांबरोबर शुभसंबंधित असतां सदरहू कुंडलीच्या मनुष्यास पुष्कळ मित्र असून त्यांस त्यापासून बराच फायदा होईल. परंतु एकादश स्थानांत शुभग्रह वक्री व पापग्रहानें पीडित असतां फायदा होणें शक्य असेल तरी सदरहू इसमास फायदा होत नाहीं. एकादश स्थानीं रवि अगर चंद्र पीडित असतां वर सांगितल्याप्रमाणेंच फळें अनुभवास मिळतील. जर एकादशस्थानीं पाप ग्रह असतील तर त्या मनुष्यांस मित्रांपासून फार त्रास होईल व मित्रत्व संपादन करतेवेळीं अशा मनुष्यानें बरीच काळजी घ्यावी.

जर एकादश स्थानीं एखादा पापग्रह स्वगृहीं अगर आपल्या उच्च क्षेत्रीं बलवान असेल तर त्या मनुष्यांस पापग्रहाचे धर्माप्रमाणें आपल्या मित्रांकडून अज्ञानपणानें नुकसान होईल. परंतु एखादा पापग्रह एकादश स्थानीं असून तो **रवि**, **चंद्र**, किंवा **बुध** यांबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असेल तर त्या मनुष्याचे स्नेही ढोंगी व बेईमान असतात व ते त्याचे सर्व बाजूनें नुकसानास कारणीभूत होतात.

**शनि** एकादश स्थानीं लबाड स्नेही दर्शवितो. **हर्शल** असतां मित्राबरोबर भांडण तंटे होतात व मित्रांचा स्वभाव विक्षिप्त आढळतो. **मंगळ** या स्थानीं नाना तऱ्हेचे कर्जे व खर्च दर्शवितो. **नेपच्यून** ( वरूणा )च्या योगानें गुप्त बेत अगर मसलती, लबाडया, गुप्त तऱ्हेचे स्नेह वगैरे गोष्टी घडतात. सदरहू फळें एकादश स्थानांतील निर्बळी व पीडित ग्रहांची विशेष पाहण्यास मिळतात.

जर एकादश स्थानांत असलेला पापग्रह **रवि** किंवा चंद्राबरोबर अशुभ दृष्टियोग करून बलवान असेल तर त्या मनुष्याच्या नाशास त्याचे मित्रच पुष्कळ अंशानें झालेले आढळण्यांत येतात. चंद्र कुंडलींत कोठेंही शनीनें पिडीत नसावा कारण चंद्र विश्वासघातकी किंवा ढोंगी स्नेही दर्शवितो.



## जन्मकालीन सूर्यराशीवरून स्वभाववर्णन.

### धनु संक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

### रवि-चंद्रांच्या राशिपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाववर्णन.

**धनेंत रवि व मेषेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक धाडसी, कर्तव्यक्षम, व्यवसायमग्न, महत्वाकांक्षी, स्वातंत्र्यप्रिय आणि हुशार असतात. तीक्ष्ण बुद्धि, विचारबाहुल्य, परिस्थिति त्वरित व बिनचूक लक्षांत घेणें वगैरे गुण या लोकांमध्यें दृष्टीस पडतात. **व्यापारी धाडसामुळें यांचा उदय होण्याचा संभव फार असतो.**

**धनेंत रवि व वृषभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक दयाळु, सदाचरणी, दुसऱ्यावर प्रीति करणारे, न्यायी आणि सामाजिक व सांसारिक बाबतींत यशस्वी होण्याची इच्छा करणारे असतात. **इतरांशीं सहकारित्वानें वागल्यास यांचा फायदा होतो.**

**धनेंत रवि व मिथुनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेल्या लोकांची बुद्धि तरतरीत व शोधक असून मनाचा ओढा व्यापाराकडे असतो. या योगामुळें मध्य आयुष्याच्या सुमारास फार घडामोडी होतात.

**धनेंत रवि व कर्केंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक अस्थिर आणि फार महत्वाकांक्षी असतात. हे लोक मोठ्या पदवीस किंवा अधिकारास पोंचतात परंतु आपला दर्जा राखण्याकरतां त्यांस फार त्रास होतो. यांचे मित्र चिरकालिक नसतात व यांच्या आयुष्यांत लांबचे प्रवास घडतात. **पूर्वार्जित मिळकतीचा लाभ किंवा स्थावर मिळकतीपासून या लोकांचा फायदा होतो.**

**धनेंत रवि व सिंहेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक स्वभावानें उमदे, धीरोदात्त, सारासार विचार करणारे आणि परोपकारी असतात. या लोकांमध्यें प्रेरणा शक्ति बरीच जागृत असते. या योगामुळें अधिकाराची,

मानाची व जबाबदारीचीं कामें करण्याचे प्रसंग येतात. **या लोकांस सरकारी नोकरीमध्यें यश येतें.**

**धनेंत रवि व कन्येंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक प्रेमळ, प्रामाणिक व पवित्र आचरणाचे असतात. अनीति व अपवित्र वर्तन हीं या लोकांस मुळींच सहन होत नाहींत. वाङ्मय व धर्म यांकडे त्यांच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति असते. **लेखनव्यवसाय किंवा धर्म यांमुळें या लोकांचा उदय होण्याचा संभव आहे.**

**धनेंत रवि व तुळेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक सुस्वभावी, सभ्य, मनमिळाऊ, सत्यनिष्ठ व न्यायप्रिय असतात. इतर लोकांशीं यांचें वर्तन फारच आदबीचें असतें. **यांचा उदय उत्तर वयांत होतो.**

**धनेंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक अप्रामाणिक, मत्सरी आणि आपमतलबी असतात. या लोकांमध्यें सारासार विचार व दूरदृष्टि यांचा अभाव असतो. **पाताळ यंत्री धोरणानें या लोकांचा उदय होण्याचा संभव आहे.**

**धनेंत रवि व धनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक स्वातंत्र्यप्रिय, व्यवसायमग्न, अस्थिर परंतु नशीबवान असतात. **वशिल्यामुळें यांचा उदय होतो.**

**धनेंत रवि व मकरेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक काटकसरी, महत्वाकांक्षी व स्वतः पुरतेच पहाणारे असतात. हे लोक आपल्या अधिकाराबाहेरच्या गोष्टी करतात किंवा आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करतात. **नोकरीमध्यें यांचा उदय होण्याचा संभव असतो.**

**धनेंत रवि व कुंभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक शांतताप्रिय, धार्मिक, जुन्याचे अभिमानी, प्रामाणिक, धीरोदात्त आणि दूरदर्शी असतात. **मित्रांमुळें या लोकांचा उदय होण्याचा संभव आहे.**

**धनेंत रवि व मीनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक निरुपद्रवी,



शांत व परोपकारी असतात. या लोकांच्या आयुष्याचा पूर्वार्ध संकटांत जातो परंतु उत्तरार्ध सुखाचा जातो. **परोपकारामुळें यांचा फायदा होतो.**

## मकर संक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

मकर ही राशिचक्रांतील दहावी, चर आणि पृथ्वीतत्वाची राशि आहे. या राशीमध्यें सूर्य दर वर्षी डिसेंबर महिन्याच्या २०।२१ तारखेच्या सुमारास प्रवेश करतो आणि जानेवारीच्या १९।२० तारखेपर्यंत या राशींत असतो. सूर्याचें भ्रमण मकर राशींतून चाललें असतां ज्यांचा जन्म होतो ते लोक महत्वाकांक्षी, दृढोद्योगी, स्वकार्यदक्ष, काटकसरी आणि कोणत्याहि रीतीनें आपले हेतु सिद्धीस नेणारे असतात. त्यांच्यामध्यें हिशोबीपणा व आत्मविश्वास फार असतो परंतु पुष्कळ वेळां आपमतलबीपणा पहावयास सांपडतो. हे लोक न्यायी, उत्साही, स्पष्टवक्ते आणि आपलें काम धिम्मेपणानें, काळजीपूर्वक व वेळेनुसार कष्ट घेऊन करणारे असतात. काटकसरीपणा किंबहुना चिक्कूपणा आणि वस्तूंचा संग्रह करण्याची आवड हे गुण दिसून येतात. ते नेहमीं विचारांत मग्न असतात आणि कधीं कधीं विषादग्रस्त होतात.

मकर राशीमध्यें रवि असलेल्या लोकांची शरीर प्रकृति साधारण मजबूत असते. लहानपणीं मात्र यांची शरीर प्रकृति नीट नसते परंतु उत्तरोत्तर हीं मनुष्यें वयांत येऊं लागलीं ह्मणजे त्यांची शरीर प्रकृति सुधारत जाते. अति विचार करण्यानें, काळजीनें किंवा औदासिन्यानें यांची प्रकृति बिघडते.

ज्या धंद्यांत दीर्घकाळ काळजीपूर्वक परिश्रम करण्याची विशेष जरूरी असते त्या धंद्यांत मकरेमध्यें रवि असलेले लोक यशस्वी होतात. या लोकांमध्यें जमीनदार, घरें बांधणारे, बागायती व शेती करणारे आणि राजकारणांत पडणारे लोक आढळून येतात.

## रवि-चंद्रांच्या राशीपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाववर्णन.

**मकरेंत रवि व मेषेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक कीर्तीसाठीं फार हपापलेले, महत्वाकांक्षी, कोणत्याही गोष्टींत फाजील कदर राखणारे व सर्वांवर आपली हुकमत चालण्याची इच्छा करणारे असतात. यांचा नोकरी-

मध्यें मुलींच निभाव लागत नाहीं; यांच्यावर स्वतःच्या गुणामुळें पुष्कळ खडतर प्रसंग येतात. **अठ्ठाविसाव्या वर्षानंतर यांचा उदय होतो.**

**मकरेंत रवि व वृषभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक दीर्घोद्योगी, व्यवहारदक्ष किंचित् हट्टी व सोशिक असतात. हे लोक आहारविहारांत नियमित नसतात. **या लोकांचा उदय वयाच्या उत्तरार्धांत होतो.**

**मकरेंत रवि व मिथुनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक उत्साही, हुशार, विद्याभिलाषी, शास्त्रीय विषयांचे शोकी व बुद्धिमान असतात. **कल्पकता व नवीन शोध यांमुळें यांचा उदय होईल.**

**मकरेंत रवि व कर्केंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक महत्वाकांक्षी, काटकसरी, स्वार्थी व किरकिरे स्वभावाचे असतात. या लोकांचा आत्मविश्वास जबरदस्त असतो व बुद्धिमताही चांगली असते परंतु आयुष्यक्रम विशेष समाधानकारक जात नाहीं; आईबापांच्या मृत्यूमुळें किंवा गृहकलहामुळें आयुष्यक्रमावर फार परिणाम होतो. **धैर्यानें वागल्यामुळें उदय होतो.**

**मकरेंत रवि व सिंहेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक स्वातंत्र्यप्रिय, धैर्यवान्, बडेजाव दाखविणारे, सत्ता मिळविण्याची अनिवार इच्छा करणारे असे असतात.

**मकरेंत रवि व सिंहेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक महत्वाकांक्षी, संकटांस न जुमानणारे, श्रद्धाळु व उद्योगी असतात. त्यांचा स्वभाव उत्सवप्रिय असून त्यांना चांगले मित्र मिळतात. **वडिलार्जित इस्टेटीपासून फायदा होतो.**

**मकरेंत रवि व कन्येंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक आपल्या पावित्र्यासंबंधानें फार दक्ष रहाणारे, विवेकी, तात्विक विचार करणारे व चतुर असतात. **या लोकांचा समाजसेवेमुळें फायदा होईल.**




# प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्याचा संग्रह.

## सर फेरोजशहा मे. मेथा.



सर फेरोजशहा यांची कुंडली ज्योतिर्मालेंत प्रसिद्ध करावी अशी बरेच दिवसांपासून आमची इच्छा होती. व त्यांच्या निधानानंतर या मासिकाच्या बऱ्याचशा वाचकांनीं त्यांची कुंडली प्रसिद्ध करण्याबद्दल लिहिलें होतें. परंतु आमच्या संग्रहीं त्यांची कुंडली नसल्यामुळें हा वेळपर्यंत आमची व मालेच्या वाचकांची इच्छा आम्हांस पुरी करतां आली नाहीं. बरेच ठिकाणीं चौकशी केल्यानंतर ज्योतिर्विद आत्माराम शि. दिवाडकर यांच्या संग्रहीं असलेली सर फेरोजशहांची निरयण कुंडली आम्हांस मिळाली. या निरयण कुंडलीचा वेळ नक्की नसल्यामुळें सर फेरोजशहा यांच्या आयुष्यांतील घडलेल्या गोष्टींवरून दिनवर्षपद्धतीच्या आधारानें त्यांच्या जन्मवेळ सूक्ष्म करून घेतला आहे. या सूक्ष्म जन्मवेळाप्रमाणें सायनकुंडली पुढें दिली आहे. ही कुंडली विश्वसनीय व खरी आहे अशी आमची पूर्ण खातरी आहे. ही कुंडली प्रसिद्ध करण्याचा योग रा. दिवाडकर यांनीं आणला म्हणून त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

सा. ल.




सर फेरोजशहा यांच्या जन्मकाळीं पूर्व क्षितिजावर धनु राशीचा २० वा अंश उदय पावत असून लग्नेश गुरु पंचमस्थानामध्यें वृषभ राशींत आहे. पंचमस्थ गुरु नवम स्थानांतील बुध-शुक्रांबरोबर नवपंचमयोग करीत आहे. जीवन शक्तीचा कारक ग्रह रवि स्वगृहीं आहे आणि तनु स्थानीं अग्नितत्वाची व बलवत्तर अशी धनु राशि असून उदित अंश शुभदृष्ट व शुभसंबंधित आहे यामुळें सर फेरोजशहा यांची शरीरप्रकृति बळकट व कणखर अशी होती. सिंह या बादशाही राशीमध्यें रवि व चंद्र असल्यामुळें आणि विशेषतः या दोन्हीही ग्रहांचा उदित अंशाबरोबर त्रिकोण योग होत असल्यामुळें सर फेरोजशहा हे भव्य व उग्र, निर्भीड, सिंहासारखे निर्भय, करारी, धीरोदात्त आणि स्वातंत्र्यप्रिय होते. सिंह-राशीमध्यें रवि–चंद्र असल्यामुळें कसल्याही प्रतिकूळ परिस्थितींत न डगमगतां अव्याहत कार्य करण्याची धमक, आत्मविश्वास आणि विलक्षण चिकाटी हे गुण स्पष्ट दिसत होते. सिंहेंत रवि असणारे लोक पुढारी होण्यास स्वभावतःच योग्य असतात. परंतु ज्याप्रमाणें वनराज केसरींची जोडी एकत्र रहावयाची नाहीं त्याप्रमाणेंच सिंहेंत रवि असणारे दोन पुढारी एकत्र व्हावयाचे



नाहींत. त्यामध्यें विरोध हा यावयाचाच. सर फेरोजशहा मेथांस सुरतेच्या कांग्रेसमध्यें विरोध करणाऱ्यांच्या अग्रणींचा रवि सिंह राशींतच आहे ! या दोघांमधील विरोध आमरणांत कायम होता व अखेरीस त्यांच्या समेटाचा प्रश्न मृत्यूनेंच सोडविला !

प्रस्तुतच्या कुंडलीमध्यें सहज लक्ष्यांत येणारा योग म्हटला म्हणजे बुद्धि-योग हा होय. ( १ ) लग्नेश गुरु पंचम या बौद्धिक स्थानांत ( २ ) पंच-मेश शुक्र नवमांत ( ३ ) लग्नेश गुरु व पंचमेश शुक्र यांचा त्रिकोणयोग, कन्याराशीचे २६ अंश नवमांत असल्यामुळें बुध नवमेश होतो. आणि म्हणून ( ४ ) नवमेश बुध व पंचमेश शुक्र यांचा नवम स्थानांतील युति-योग आणि ( ५ ) लग्नेश गुरु व नवमेश बुध यांचा नव पंचम स्थानांतून होत असलेला त्रिकोणयोग हे सर्व योग अप्रतिम बुद्धिमत्ता असण्याला कार-णीभूत झाला असता मग येथें इतके योग झाले असतां बुद्धिमत्ता अप्रतिम होती यांत आश्चर्य तें कोणतें ? या योगांच्या जोरावर मेथांनीं उत्तम विद्या संपादन केली. वयाच्या सोळाव्या वर्षी ज्या वेळीं चलित दशम मूळ रविबरोबर द्विराश्यंतर योग व चलित लग्न मूळ शुक्राबरोबर त्रिकोण योग करीत होते त्या वेळीं मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास होऊन कॉलेजमध्यें प्रवेश केला. पुढें तीन वर्षांनीं म्हणजे चलित लग्न मूळ बुधाबरोबर त्रिकोण योग करीत असतां बी. ए. ची परीक्षा पास झाले. पुढें सहा महिन्यांनीं ते एम्. ए. झाले. त्या वेळीं चलित बुध व चलित शुक्र यांची युति होत असून मूळ दशमावरील अंशाबरोबर हे दोन्हीहि ग्रह नुकतेच युतियोग करीत होते. सर फेरोजशहा यांच्या कुंडलींत रवि व हर्शल यांचा त्रिकोण योग झालेला आहे त्यामुळें योग्यवेळीं मदत मिळण्याचा योग चांगलाच आहे. सर फेरोजशहा मेथांनीं विद्यार्थी असतांच आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेनें सर अलेक्झांडर ग्रॅन्ट-सारख्या प्रसिद्ध विद्वान प्रिंसिपलचा लोभ संपादन करून घेतला होता. सर ग्रॅन्ट यांनीं फेरोजशहांनीं इंग्लंडांत जाऊन आपला अभ्यास पुरा करून घ्यावा अशी तजवीज केली होती व त्यामुळें सर फेरोजशहा हे तीन वर्षांच्या अवधींत बॅरिस्टर होऊन आले. त्या वेळीं मूळ दशम आणि चलित बुध व शुक्र यांचे युतियोग अमलांत होते. बॅरिस्टरीच्या धंद्यामध्यें सर फेरोजशहांनीं

विपुल संपत्ति मिळविली. पंचम व भाग्य भुवनामध्यें गुरु, चंद्र, बुध व शुक्र असल्यामुळें संपत्तियोग उच्च दर्जाचा झालेला आहे. नवम स्थानांतील चंद्र, बुध व शुक्र यांची फलें पुढें दिल्याप्रमाणें सारावलींत दिलीं आहेतः–" मातृ सपत्नी जनकं प्रमुदित मानान्वितं प्रचुरमित्रम् । कुर्वन्ति सामशीलं भृगु-बुध चंद्रा नरं भाग्ये ॥ " नवम स्थानांतील शुक्र पंचमस्थ गुरुबरोबर त्रिकोण योग करीत आहे. हा योग संपत्ति, पुत्र, मित्र इत्यादिकांचा लाभ दर्शवितो. " भृत्यैर्धनैश्च पुत्रैर्वाहनभोगैश्च बांधवैर्मित्रैः । कुरुतें नरमिह युक्तं नरपति दयितंच गुरुदृष्टः ॥ " सारावली.

सर फेरोजशहा हे केवळ संपत्ति मिळविण्याच्या लोभांत न गुरफटतां आपल्या वयाच्या २५ व्या वर्षापासूनच सार्वजनिक कामांत मन घालूं लागले. हें लोकहिताचें कार्य २५ व्या वर्षापासून आमरण चाललें होतें. त्यामध्यें मुळींच खंड पडला नाहीं. नवम स्थानांतील उच्च बुध शुक्राबरोबर युतियोग व पंचमस्थ गुरुबरोबर त्रिकोण योग करीत आहे त्यामुळें अलौकिक वक्तृत्व सर फेरोजशहा यांच्या ठिकाणीं होतें. अनेक प्रसंगीं त्यांच्या वक्तृत्वपूर्ण, निर्भीड व प्रतिपक्षास निरुत्तर करणाऱ्या भाषणामुळें त्यांनीं सर्वांवर छाप बसविली होती. सतत पंचेचाळीस वर्षें सर फेरोजशहा हे लोकहिताचीं कामें करीत होते. मुंबई कार्पोरेशन, मुंबई कायदे कौंसिल, हिंदुस्थान सरकारचें कायदे कौन्सिल, युनिव्हर्सिटी, राष्ट्रीय सभा वगैरे ठिकाणीं त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचा, निर्भीड वक्तृत्वाची आणि स्वातंत्र्यप्रियतेची ओळख जनतेस व राजकर्त्यास सारखीच पटली होती. यांच्या अंगची अखेरीस खरी योग्यता कळल्यावर सरकारानें त्यांस ' सर ' ही पदवी १९०४ या वर्षी दिली. राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचाही मान त्यांस मिळाला होता. प्रस्तुत कुंडलींतील शुभ योग मागें सांगितलेच आहेत. त्याप्रमाणें रवि--शनींचा प्रतियोग व चंद्राच्या सप्तमांत नेपच्यून व मंगळ हे अशुभ योग सुद्धां विचार करण्यासारखे आहेत. सर फेरोजशहा यांच्या निधनसमयीं चलित लग्न व मूळ मंगळ यांची युति आणि चलित शनि व मूळ रवि यांचा प्रतियोग हे दोन अत्यंत अशुभ योग चालले होते.

राम नारायण.

---

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रींद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष १ लें. | मार्च १९१६. | अंक १२ वा.

## वार्षिक समारोप.

ज्या दिव्य शक्तीच्या प्रेरणेनें ज्योतिर्माला मासिक पुस्तक सुरू करण्याची आम्हांस स्फूर्ती झाली तिच्याच कृपाप्रसादानें चालू वर्षाचा शेवटचा अंक आम्हीं आमच्या वाचकांस सादर करीत आहोंत. जोतिषशास्त्राच्या सर्व शाखांचा उहापोह करण्याकरतां ज्योतिर्माला अस्तित्वांत आली आहे. आतांपर्यंत मालेच्या **नियमित** वेळीं प्रसिद्ध झालेल्या १२ अंकांमध्यें ज्योतिषशास्त्रासंबंधानें केलेला उहापोह तज्ज्ञ वाचकांपुढें आहेच. मालेच्या अल्प विस्ताराच्या मानानें तिच्या हातून झालेली ज्योतिषशास्त्राची सेवा कोणाही वाचकास पसंत पडेल अशी आमची पूर्ण खात्री आहे. चालू वर्षात मालेमध्यें नऊ प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्यांचे ज्योतिषशास्त्रदृष्ट्या विवेचन केलेलें आहे व हें विवेचन करीत असतां भविष्य कालनिर्णय दिनवर्ष पद्धतीनें कसा करतां येतो याचें प्रसंगोपात्त वर्णन केलेलें आहे.

आर्य व युरोपीय ज्योतिषशास्त्राचा तुलनात्मक विचार ' राशि--धर्म--निरूपण ' ' ग्रह--धर्म--निरूपण ' आणि ' भाव विचार ' यांमध्यें थोड्या बहुत प्रमाणानें केलेला आढळून येईल. ' जन्मकालीन सूर्य--राशीवरून स्वभाव-वर्णन ' हा आर्य ग्रंथांत न सांगितलेला विषय इंग्रजी ग्रंथाधारें पूर्ण केला आहे. रवि व चंद्र यांच्या योगानें होणाऱ्या १४४ प्रकारच्या भिन्न भिन्न स्वभावांचें वर्णन सदरहू लेखांत पूर्ण झालेलें आहे. "जातक मार्गोपदेशिका" हें पुस्तक स्वतंत्र छापावें अशी सूचना पुष्कळ वर्गणीदारांकडून आल्यामुळें त्यासंबंधीं अधिक पृष्टें पुढें न देतां त्याच धर्तीवर नवीन व होतकरू विद्यार्थ्यांकरितां "बालबोध ज्योतिष" नांवाचें पुस्तक प्रसिद्ध करून मालेच्या वर्गणीदारांस अल्प किंमतीस दिलें आहे. तिसऱ्या अंकांतील ' प्रासंगिक विचार ' ' चालू वर्षांतील हिंदी पुढाऱ्यांचे मृत्यु ' " एकोणीसशें सोळांतील ग्रहांचीं भ्रमणें व त्यांचे परिणाम " या लेखांमध्यें मेदिनीय ज्योतिषाचा विचार केला आहे. याप्रमाणें ज्योतिर्मालेची पहिल्या वर्षाची कामगिरी आहे. दुसऱ्या वर्षाचा कार्यक्रम पहिल्या वर्षासारखाच ठेवण्यांत येऊन " निरनिराळ्या योगांच्या कुंडल्या " " ज्योतिषशास्त्रदृष्ट्या रोगविचार " " प्रश्न--ज्योतिष " व विशेषतः " काल--निर्णय " यांचा वेळोवेळीं विचार करणार आहों.

मालेच्या प्रेमळ वाचकांकडून ज्या ज्या सूचना आम्हांस वेळोवेळीं आल्या त्या त्या अंमलांत आणण्याचा शक्य तेवढा प्रयत्न आम्हीं चालू ठेविला आहे. मालेचीं पानें वाढवावीं अशी पुष्कळांची इच्छा आहे. परंतु सांप्रतच्या महायुद्धामुळें छपाईस लागणाऱ्या वस्तूंचे भाव वाढत असल्यामुळें मालेचीं पानें वाढविण्याची आमची इच्छा असून सुद्धां तसें परिस्थितीमुळें करतां येत नाहीं याबद्दल आम्हांस दिलगिरी वाटते. महायुद्ध थांबल्यानंतर पूर्ववत् स्थिति प्राप्त झाली आणि हल्लीं प्रमाणेंच उदार वाचकांनीं आश्रय दिला तर मालेचीं पानें वाढविण्याचें आश्वासन आम्हीं देऊन ठेवतों.



## जन्मकालीन सूर्य राशीवरून स्वभाववर्णन.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**मकरेंत रवि व तुळेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक कलहप्रिय, अतिशय वादविवाद करणारे आणि क्षुल्लक कारणावरून सुद्धां संतप्त होणारे असतात. यांची प्रवृत्ति दुसऱ्यावर टीका करण्याकडे फार असते. **या लोकांस वकीलीच्या धंद्यामध्यें यश येण्याचा संभव आहे.**

**मकरेंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक रागीट, द्वेषी व मत्सरी असतात. या योगामुळें गुप्त शत्रूंपासून किंवा लबाड मित्रांपासून नुकसान होण्याचा संभव आहे. **वैद्यकीमध्यें** आणि **विशेषतः शस्त्रक्रियेमध्यें यश येईल.**

**मकरेंत रवि व धनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेल्या लोकांची प्रवृत्ति शास्त्रीय विषयाकडे असते परंतु त्या विषयामध्यें त्यांस सतत परिश्रम करतां येत नाहीं. दूरदृष्टि व स्वतःची जबाबदारी न ओळखल्यामुळें या लोकांवर संकटें येतात. **मध्य आयुष्यानंतर यांचा उदय होण्याचा संभव आहे.**

**मकरेंत रवि व मकरेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक फार महत्वाकांक्षी, फार दूरदर्शी आणि काटकसरी असतात. हे लोक नेहमीं विषादग्रस्त असतात. **यांचा उदय पूर्वार्धांत होतो.**

**मकरेंत रवि व कुंभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक सुस्वभावी मनमिळाऊ, विचारी, विश्वासु आणि मोकळ्या मनाचे असतात. या लोकांच्या प्रत्येक कामांत गंभीरपणा दिसून येतो. **अधिकाऱ्यांच्या मदतीमुळें यांचा उदय होण्याचा संभव आहे.**

**मकरेंत रवि व मीनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक सुस्वभावी, निरुपद्रवी व परोपकारी असतात. ह्या लोकांमध्यें निरुत्साहीपणा फार असतो व त्यामुळें त्यांच्या आयुष्यांतील प्राप्त झालेल्या सुसंधि फुकट जातात. सार्वजनिक संस्थांपासून या लोकांस फायदा होण्याचा संभव आहे.

**कुंभ संक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.**

**कुंभ** ही राशिचक्रांतील एकादश, स्थिर, वायुतत्वाची व शास्त्रीय राशि आहे. प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्याच्या २० व्या तारखेच्या सुमारास सूर्य या राशींत प्रवेश करतो आणि, १८ फेब्रुवारीपर्यंत याच राशींत भ्रमण करीत असतो. या राशींत रवीचें भ्रमण चाललें असतां ज्या लोकांचा जन्म होतो ते लोक सुस्वभावी, शांत, निरुपद्रवी, विचारी, विश्वासु, प्रेमळ, सहनशील, परोपकारी आणि गंभीर स्वभावाचे असतात. या लोकांचा कल ललितकला, वाङ्मय आणि बौद्धिक व्यवसाय यांजकडे असतो. या लोकांमध्यें सरळपणा, प्रामाणिकपणा आणि प्रेरणा शक्ति हीं दिसून येतात. मानवी प्राण्यांमध्यें असलेल्या गूढशक्तींचा विकास करण्याकडे किंवा शास्त्रीय शोधाकडे या लोकांचा नैसर्गिक कल असतो.

कुंभ राशींत रवि असलेल्या लोकांची शरीरप्रकृति साधारण चांगली बळकट असते. रक्ताभिसरणाची क्रिया बरोबर न झाल्यामुळें यांची प्रकृति नादुरुस्त होण्याचा संभव असतो. कुंभस्थ रवीच्या लोकांमध्यें नेत्ररोग व हृदयाचे विकार झालेले दृष्टीस पडतात.

या लोकांमध्यें चित्रकार, फोटोग्राफर्स, वादनकलेचे शोकी, सामान्य वाङ्मय विषयासंबंधानें कामें करणारे, सार्वजनिक संस्था व कंपन्या यांमध्यें कामें करणारे वगैरे लोक आढळतात.

## रविचंद्रांच्या राशिपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाववर्णन.

**कुंभेंत रवि व मेषेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक हुशार, प्रामाणिक, स्वातंत्र्यप्रिय, आपलाच हेका चालविणारे व नित्य नव्या गोष्टींची आवड बाळगणारे असतात. हा योग उत्तम विचारशक्ति व शोधक बुद्धि यांचा द्योतक आहे. **या योगामुळें फिरत्या एजंटाच्या धंद्यांत फायदा होण्याचा संभव आहे.**



**कुंभेंत रवि व वृषभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक निश्चयी, स्थिर व आत्मविश्वासी असतात. या योगामुळें गूढ शास्त्राकडे प्रवृत्ति होते. ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करण्यास हा योग चांगला आहे.

**कुंभेंत रवि व मिथुनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक हुशार, बुद्धिमान्, कल्पक आणि विद्याव्यासंगी असतात. या योगामुळें शोधक बुद्धि प्राप्त होते. या लोकांस नव्या सुधारणा व भौतिक प्रगति मनापासून आवडतात. **या लोकांचा उदय भौतिक शास्त्रांच्या अध्ययनानें होईल.**

**कुंभेंत रवि व कर्केंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक अधीर मनोवृत्तीचे, महत्वाकांक्षी आणि विलक्षण स्वभावाचे असतात. या लोकांचा आयुष्यक्रम समाजदृष्ट्या तऱ्हेवाईक असण्याचा संभव आहे.

**कुंभेंत रवि व सिंहेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक अत्यंत निश्चयी, बेपर्वा, स्वैर, उतावळे आणि स्वातंत्र्यप्रिय असतात या लोकांच्या आयुष्यक्रमावर लग्नामुळें किंवा भागिदारांच्या व्यवहारामुळें फार परिणाम घडतो. **सरकारी नोकरींत यश येण्याचा संभव आहे.**

**कुंभेंत रवि व कन्येंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक शांत परंतु दृढोद्योगी, जिज्ञासु व शास्त्रीय विषयांची आवड बाळगणारे असतात. या लोकांस निसर्गांतील गूढ तत्वाचें किंवा रसायन शास्त्राचें ज्ञान लवकर प्राप्त होतें. **शिक्षकाच्या धंद्यामुळें किंवा वक्तृत्वामुळें उदय होण्याचा संभव आहे.**

**कुंभेंत रवि व तूळेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक महत्वाकांक्षी, अस्वस्थ, वादविवाद करणारे, सुस्वभावी आणि क्षमाशील असतात. या लोकांमध्यें विचार शक्ति व तुलनात्मक दृष्टि यांची वाढ झालेली पहावयास मिळते. **प्रवासामुळें यांचा फायदा होईल.**

**कुंभेंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक निर्भय,

धाडसी, कारस्थानी, स्वार्थी, संशयी आणि अविश्वासु असतात. **मेकॅनिक्स शिकल्यानें फायदा होईल.**

**कुंभेंत रवि व धनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक उदार, स्वातंत्र्यप्रिय, उत्साही आणि प्रत्येक गोष्टींत पुढाकार घेण्याची इच्छा करणारे असतात. या लोकांमध्यें उत्तम प्रेरणा शक्ति असते. **या लोकांस देखरेखीचें काम चांगलें साधतें.**

**कुंभेंत रवि व मकरेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक गर्विष्ठ, अस्वस्थ, बेपर्वा आणि तऱ्हेवाईक असतात. या लोकांस एकाच व्यवसायांत फार वेळ रहातां येत नाहीं. गूढ शास्त्रें व तात्विक विचार यांची आवड या लोकांस चांगली असते.

**कुंभेंत रवि व कुंभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक हुशार, कल्पक, जिज्ञासु आणि शास्त्राभिलाषी असतात. या लोकांची कल्पना शक्ति फार उच्च दर्जाची असते परंतु इच्छा शक्ति मात्र असावी तितकी बलवत्तर नसते. **या लोकांचा उदय शास्त्रीय विषयांच्या अध्ययनानें होईल.**

**कुंभेंत रवि व मीनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक शांत, निरुपद्रवी, परोपकारी व सुखाभिलाषी असतात. हे लोक नेहमीं विषादग्रस्त होतात. **परोपकारामुळें यांचा फायदा होईल.**

## मीन संक्रमणांत जन्म पावणाऱ्या स्त्रीपुरुषांचें स्वभाववर्णन.

**मीन** ही राशिचक्रांतली द्वादश, द्विस्वभाव, जलतत्वाची व स्त्री राशि आहे. या राशीमध्यें सूर्य दर वर्षी फेब्रुवारी महिन्याच्या १९ व्या तारखेच्या सुमारास प्रवेश करून मार्च महिन्याच्या २० व्या तारखेपर्यंत भ्रमण करीत असतो. हें मीन राशींतील रवीचें भ्रमण चाललें असतां ज्यांचा जन्म होतो ते लोक शांत, उदार, परोपकारी, प्रेमळ, दयाळु, शीघ्र संस्कार ग्रहण करणारे, अनुकरणप्रिय, अस्थिर व सुखाभिलाषी असतात. या लोकांस



भानगडी व उपद्व्याप करणें यांचा फार कंटाळा असतो. मानसिक चिंता नसल्यास हे लोक आपल्या आनंदी स्वभावानें, प्रेमळ आचरणानें आणि सहानुभूतीनें दुसऱ्यांच्या उपयोगी पडतात. सामान्यतः मीनस्थ रवीचे लोक निरुपद्रवी व परोपकारी असतात. आळसानें किंवा मनाच्या दुबळेपणानें हे लोक दुसऱ्याच्या नुकसानास कारणीभूत होतात. मीनस्थ रवीच्या लोकांची शरीरप्रकृति धडधाकड नसते असेंच आढळून येतें. या लोकांस क्षयरोग, रक्तदोष आणि अपचनापासून होणारे रोग होतात. परिमित आहारविहार, मादक पदार्थांपासून अलिप्त रहाणें आणि कोणत्याहि अतिरेकापासून दूर असणें यांमुळें यांची प्रकृति उत्तम रहाते.

या लोकांमध्यें जमाखर्च लिहिणारे, स्टोअरकीपर्स, फडनिशी काम करणारे ( Accountants ), कादंबरीकार वगैरे लोक आढळतात.

## रवि-चंद्रांच्या राशिपरत्वें होणाऱ्या संयोगानें आढळणारें स्वभाववर्णन.

**मीनेंत रवि व मेषेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक वर्चस्व राखण्याची इच्छा करणारे, गर्विष्ठ व जिज्ञासु असतात. **या लोकांचा फायदा यंत्रकलाज्ञानानें होईल.**

**मीनेंत रवि व वृषभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक प्रेमळ, शांत व सुस्वभावी असतात. प्रेरणाशक्ति व गूढ शास्त्रांची आवड हीं या लोकांमध्यें पहावयास मिळतात.

**मीनेंत रवि व मिथुनेंतः**—या योगावर जन्मलेले लोक हुशार, विद्याव्यासंगी, जिज्ञासु, गुणग्राही आणि चंचल परंतु तैलबुद्धीचे असतात.

**मीनेंत रवि व कर्केंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक अत्यंत अस्वस्थ, असंतुष्ट, चंचल आणि चिडखोर असतात. यांचें अंतःकरण मृदु असतें. **विदग्ध वाङ्मयामध्यें या लोकांस यश येण्याचा संभव आहे.**

**मीनेंत रवि व सिंहेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक महत्वाकांक्षी, उदार, परोपकारी आणि धर्मभोळे असतात. **यांचा फायदा नोकरीमध्यें होईल.**

**मीनेंत रवि व कन्येंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक हुशार, तऱ्हेवाईक, क्षुल्लक गोष्टींत सुद्धां मन घालणारे आणि अनुदार असतात. हे लोक पुष्कळ वेळां फसवाफसवी करतात असें आढळून येतें. **या लोकांचा उदय व्यापारामध्यें होण्याचा संभव आहे.**

**मीनेंत रवि आणि तूळेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक धर्मकर्माचें स्तोम माजविणारे व बडेजाव दाखविणारे असतात. यांचा स्वभाव प्रेमळ असतो. या लोकांमध्यें धैर्य व स्थिरता दिसून येत नाहींत.

**मीनेंत रवि व वृश्चिकेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक सतत काम करणारे, गुप्त कारस्थानी व खुनशी असतात. या योगामुळें मंत्रतंत्रासारख्या गोष्टींचा नाद लागतो. **रसायनशास्त्राच्या अध्ययनानें या लोकांचा फायदा होईल.**

**मीनेंत रवि व धनेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेल्या लोकांस प्रवासाची व भटकण्याची फार आवड असते. हे लोक महत्वाकांक्षी व दूरदर्शी असतात. धर्माकडे स्वाभाविक प्रवृत्ति या लोकांमध्यें दिसून येते. **यांचा उदय प्रवासामुळें होणें शक्य आहे.**

**मीनेंत रवि व मकरेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक विलक्षण स्वभावाचे, धैर्यवान्, धर्मश्रद्धाळु, विचारी, महत्वाकांक्षी व दूरदर्शी असतात. हे लोक आपल्या प्रत्येक कृत्यांत फार काळजी घेणारे असतात. यांच्या धार्मिक समजुतींमध्यें अनुदारपणा असतो. या लोकांमध्यें धर्मश्रद्धा विशेष असते परंतु तात्विक विचारांचाही अभाव नसतो.

**मीनेंत रवि व कुंभेंत चंद्रः**—या योगावर जन्मलेले लोक निसर्गातील साध्या गोष्टींची आवड बाळगणारे, अदृश्य सृष्टींतील गूढ गोष्टींचा अनुभव



# भाव-विचार.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

'सुवर्णरूप्यरत्नानि धातुद्रव्यं सखाधने' ॥ ता. नि.

**अर्थः**—सुवर्ण, रौप्य, रत्नें, धातु, द्रव्य, मैत्री, कुटुंब, पुरुषाच्या कुंडलींत स्त्रीसौख्य व स्त्रीच्या कुंडलींत भर्त्याचें सौख्य, मुख, वाणी, उजवा नेत्र, पूर्वार्जित द्रव्य, विद्या, भोजन, दास इत्यादि गोष्टींचा विचार द्वितीय स्थानावरून करतात.

या स्थानावरून सुवर्ण, रौप्य, रत्नें इत्यादिकांचा स्वतंत्र विचार कसा होतो हें कळत नाहीं. या स्थानावरून जन्मणाराच्या सांपत्तिक स्थितीचा बोध पुष्कळ अंशानें होतो. या स्थानास **कोष** ही दुसरी संज्ञा आहे. त्याप्रमाणें ह्या स्थानावरून जन्मणाराजवळ पैसा शिल्लक राहील किंवा नाहीं, त्याजवर नाना तऱ्हेच्या सांपत्तिक अडचणी येतील किंवा काय याचा बराच बोध होतो. या स्थानावरून जातक विभागांत जन्मणाराचें कुटुंब,—आईबाप, भाऊ, मुलें व बायको यांचा विचार होतो. स्वतंत्र रीतीनें मित्रांचा किंवा दासदासींचा विचार या स्थानावरून होतो असें वाटत नाहीं. **विद्येचा** विचार या स्थानावरून किती होतो यासंबंधानें बरीच शंका वाटते. या स्थानाचा अंमल कंठ, मुख, वाणी, व उजवा नेत्र यांवर आहे असें मानतात.

**प्रश्न ज्योतिषांत** या स्थानावरून सर्व प्रकारचे सांपत्तिक लाभ किंवा हानि यासंबंधाच्या प्रश्नांचा विचार होतो. उसनवार दिलेले पैसे, सर्व प्रकारची जंगम मिळकत व चोरीस गेलेल्या द्रव्याचा विचार या स्थानावरून करतात.

**मेदिनीय ज्योतिष विभागांत** ह्या स्थानावरून देशाची सांपत्तिक स्थिति, कर, रेव्हिन्यु, देशांतील पैशाच्या घडामोडी होणारीं ठिकाणें, बँका, व्यापारी पेठ्या, शेअर खरेदी, विक्रीचीं ठिकाणें व देशांतील सर्वसाधारण व्यापार यांचा विचार होतो.

जन्मकाळीं ह्या स्थानांत गुरु किंवा शुक्र असतां सांपत्तिक स्थिस्ति समाधानकारक असते. या स्थानांत रवि, मंगळ, हर्शल किंवा नेपच्यून असणें चांगलें नाहीं. धन स्थानांत तूळ, मकर किंवा कुंभ राशीचा शनि असून तो गुरुबरोबर शुभसंबंधित असतां वडिलार्जित इस्टेट किंवा माल मिळकत चांगली असते. हीं मनुष्यें नेहमीं बेताबातानें खर्च करून वागणारीं असतात व ह्यांच्या अंगीं काटकसरीपणा नैसर्गिकच असतो. या स्थानाचा नेत्र व वाणी यांच्याशीं संबंध असल्याचें ग्रंथांत सांगितलें आहे परंतु नुसता एखादा पापग्रह ह्या स्थानांत असल्यानें नेत्ररोग किंवा वाणींत व्यंग असेल असें म्हणतां येत नाहीं. केंद्रामध्यें रवि किंवा चंद्र मेष, वृषभ, सिंह, धनु किंवा कुंभ राशीच्या शनि, हर्शल किंवा मंगळ यांनीं पीडित असतां नेत्रदोष पुष्कळ कुंडल्यांत पहाण्यास मिळतो. जलराशींत धनस्थानामध्यें बुध पीडित असतां वाणींत व्यंग असलेले लोक बरेच पहाण्यास मिळतात.

कुंडलीच्या तृतीय स्थानावरून खालील गोष्टींचा विचार करण्यास सांगितलें आहे.

**" सहजेन सहजविक्रमौषध सहायान् गलोरसस्थानम् ॥ "**
**विंद्यात् दक्षिणकर्णं भक्ष्यविशेषांश्च मूलादीन् ॥ स. चिं.**
**" विक्रमे भ्रातृभृत्याध्वापित्र्यस्खल साहसम् ॥ ता. नि.**

**अर्थः**—भाऊ, वहिणी, पराक्रम, औषधि, साह्य करणारे लोक, सेवक, कंठ, हृदय, उजवा कान, कंदमूलादि खाण्याचे पदार्थ, इत्यादि गोष्टींचा विचार तृतीय स्थानावरून करतात.

या स्थानावरून औषधी, कंदमूलादि खाण्याचे पदार्थ यांसंबंधानें कसा विचार होतो तें कळत नाहीं. या स्थानावरून सर्वसाधारणपणें भाऊ, वहिणी, नातेवाईक, शेजारी व पराक्रम यांचा विचार होतो. ह्या स्थानाचा अंमल स्कंध, हात व फुप्फुसें यांवर आहे असें आढळण्यांत येतें. या स्थानाचा अंमल हृदयावर कसा काय असेल तें ग्रंथकारास ठाऊक !

या स्थानावरून पाश्चिमात्य ज्योतिषी रेल्वेनें होणारे जवळचे प्रवास यांचा



विचार करतात. त्याचप्रमाणें या स्थानांत असलेले ग्रह बुद्धीवर पुष्कळ परिणाम करतात. या दोन गोष्टी आर्य ग्रंथांत सांगितलेल्या नाहींत. परंतु अनुभवानें त्यांचा या स्थानाशीं निकट संबंध असल्याचें आढळतें. या स्थानांत ग्रह असतां पुढें दिल्याप्रमाणें बुद्धीवर परिणाम झाल्याचें दिसून येतें.

**रवि** तृतीय स्थानांत असतां स्वभाव दिलदार, महत्वाकांक्षी, निश्चयी, स्वावलंबी व बुद्धीच्या जोरावर कीर्ति, मानसन्मान मिळविण्याची इच्छा करणारा असतो. रवि, मंगळाबरोबर शुभसंबंधित असतां मनुष्य लष्करी किंवा शिपाई बाण्याचा, भांडखोर किंवा कुरापत वाढणारा असतो. **गुरू**बरोबर शुभसंबंधित असतां स्वभाव धार्मिक, विचारी व ममताळु असतो. शनीबरोबर शुभसंबंधित असतां गंभीर, विचारी, अधिकारी व दुसऱ्यापासून मान व वाहवा मिळविणारा असतो. हर्शलबरोबर शुभसंबंधित असतां कल्पक, चतुर, कारागीर व सुधारक असतो.

या स्थानांत रवि असतां प्रवास व नातलगांपासून लाभ दर्शवितो. रवि पीडित असल्यास स्वभाव गर्विष्ठ, अहंकारी, उर्मट, शेखी मिरविणारा, प्रभुत्व गाजविणारा, भलत्याच गोष्टींची महत्वाकांक्षा बाळगणारा व दुसऱ्यास त्रास देणारा असतो.

तृतीय स्थानांत **चंद्र** असतां चंचल वृत्तीचा, लहरी, अस्थिर, जिज्ञासु शोधक, सर्व प्रकारच्या विषयांची गोडी असणारा व प्रसिद्धीची हांव बाळगणारा असतो. या गोष्टी चंद्र या स्थानांत असून ज्या इतर ग्रहाबरोबर दृष्टियोगानें संबंधित असेल त्यावर पुष्कळ अंशानें अवलंबून आहेत. या स्थानांतील चंद्र नातलगांसंबंधी बऱ्याच भानगडी दर्शवितो. या स्थानांत चंद्र, शनि व मंगळ या दोन ग्रहानें पीडित असतां मानसिक दौर्बल्य आढळतें.

तृतीय स्थानांत **बुध** असतां विद्याव्यासंगी, अभ्यासी, आनंदी, बुद्धिमान् व तीव्रबुद्धीचे लोक आढळतात. हीं मनुष्यें वाङ्‌मयाचे भोक्ते, लेखक, वक्ते, वाचनाचे शोकी, व जेणेंकरून मानसिक उन्नति होईल त्या सर्व प्रकारच्या व्यवसायाची आवड बाळगणारे असतात. तृतीय स्थानांत बुध असून मंगळा-

बरोबर शुभसंबंधित असतां गणिताची व यंत्रशास्त्राची आवड दर्शवितो. गुरूबरोबर शुभसंबंधित असतां उत्तम विचारवान् व उत्तम मसलतगार असतो आणि विचार करण्याची शक्ति अप्रतिम असते. शनिबरोबर शुभसंबंधित असतां खोल विचारी, दूरदर्शी व गहन विचारांत रमणारा असतो. हर्शल-बरोबर शुभसंबंधित असतां अतिकल्पक, हुशार, अध्यात्म विषय, ज्योतिष वगैरे विषयांची गोडी असणारा असतो. या स्थानांत बुध मंगळानें पीडित मनुष्य लबाड, खोटें बोलणारा व बढाईखोर असतो.

तृतीय स्थानांत **शुक्र** असतां मनुष्य काव्यशास्त्रांची आवड बाळगणारा, कवि, गायनवादनकलेचा शोकी, चित्रकलेची आवड बाळगणारा, आनंदी व ममताळु असतो. तृतीय स्थानांत बुधशुक्रांची युति असतां उत्तम फलें पहाण्यास मिळतात. त्याचप्रमाणें चंद्र—शुक्रांची युति असतां मानसिक स्थिति चांगली असते. ही ग्रहस्थिति वाईट कुंडलींतसुद्धां बुद्धीचा कल चांगल्या मार्गाकडे वळविते. या स्थानांतील शुक्र नातेवाईक व प्रवास यांपासून लाभ दर्शवितो.

तृतीय स्थानांत **मंगळ** असतां स्वभाव कगरी, रागीट, क्रूर अविचारी भांडखोर, अति मेहनती, व स्वतःचें मन ताब्यांत न ठेवणारा असतो. तृतीय स्थानांत मंगळ असून त्याबरोबर हर्शल किंवा शनि अशुभ दृष्टियोग करीत असतां अति वाईट फलें पहाण्यास मिळतात. या योगाचा मनुष्य अति रागीट, खुनशी व हत्या करणारा असतो. तृतीय स्थानांतील पीडित मंगळ वेड, ब्रेन फीव्हर, नातलगांपासून त्रास व प्रवासांत संकटें दर्शवितो.

तृतीय स्थानांत **गुरु** असतां स्वभाव धार्मिक, वेदांत विषयाची आवड असणारा, ममताळु, सभ्य व विचारी असतो. ह्या स्थानांत गुरु हा रवि, चंद्र किंवा बुध यांबरोबर शुभसंबंधित नसतां पहाण्यासारखीं विशेष फलें मिळत नाहींत. तृतीय स्थानांत गुरु अग्नि राशीचा असतां सामाजिक बाब-तींत चांगलें यश देतो. पृथ्वी राशीचा असतां व्यापार, धंदा व सट्याचे व्यवहार यांमध्यें फायदा दर्शवितो. वायु राशीचा किंवा शास्त्रीय राशीचा असतां बौद्धिक उन्नतीस चांगला असतो. जलराशीचा असतां जलप्रवासापासून



फायदे दर्शवितो. परंतु ह्या स्थानांत जर मंगळानें पीडित असेल तर वर दर्शविलेल्या गोष्टींपासून फायदे न होतां तोटेच झालेले विशेष पाहण्यास मिळतील.

तृतीय स्थानांत बलवान् **शनि** असतां साधारणपणें चांगलीं फलें दीर्घोद्योगीपणा, सावधपणा, गुप्तपणा वगैरे फलें पाहण्यास मिळतात. शनि निर्बल असेल तर चांगलीं फलें मिळत नाहींत. शनि तृतीय स्थानीं असून रवि अगर चंद्र यांजबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां स्मरणशक्ति, अस-माधानी व चिरचिऱ्या स्वभाव आढळतो. बुधाबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां अप्रामाणिकपणाची चोरी करण्याची व खोटें बोलण्याची प्रवृत्ति दर्शवितो. शुक्राबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां मनोवृत्ति नीच असून मन सुसंस्कृत नसतें, मंगळाबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां रागीट भयंकर कृत्यें करणारा खुनी व अप्रामाणिक असतो.

तृतीय स्थानांत **हर्शल** असतां बुद्धि शोधक व चौकस असते. यायोगानें मनुष्य विद्याव्यासंगी, गूढ विषयांचा नादी, वाचनाचा शोकी व लहरी असतो. तृतीय स्थानांतील हर्शलमुळें जोतिषशास्त्राची गोडी लागते. परंतु निर्बल कुंडलींत या ग्रहाची विचित्र फलें पहावयास सांपडतात. या स्थाना-तील हर्शल नातेवाईक व भाऊबंद यांसंबंधानें विचित्र अनुभव दर्शवितो.

तृतीय स्थानीं **नेपच्यून** असतां स्वभाव लहरी व कल्पक असून अध्यात्म विषयाची गोडी दर्शवितो. निर्बळ कुंडलींत हा ग्रह चमत्कारिक आवडनावड, नीच मनोवृत्ति व बुद्धिमांद्य दर्शवितो.

प्रश्नज्योतिषांत ह्या स्थानावरून भाऊबहिणी, नातलग, शेजारी, लहान प्रवास--रल्वेचे अगर खुष्कीचे,--पत्रें, बातम्या, पंथ, स्वप्नें व एखाद्या संस्थेच्या कुंडलींत या स्थानावरून दुय्यम चिटणीस यांचा विचार करतात.

मेदिनीय ज्योतिषांत देशांतील सर्व प्रकारच्या प्रवासाची साधनें रेल्वे, रस्ते, मोटारगाड्या यांसंबंधानें या स्थानावरून विचार करतात. त्याचप्रमाणें पोस्ट-ऑफीसें, तारऑफीसें, टेलीफोन, वर्तमानपत्रें, मासिकें, पुस्तकें वगैरे ज्ञान व बुद्धि वाढविणाऱ्या गोष्टी आणि आपल्या शेजारचीं राष्ट्रें यांचा विचार याच स्थाना-

वरून होतो. वाङ्मय व शिक्षण यांचाही विचार याच स्थानावरून करतात. सर्वसाधारणपणें राष्ट्रांतील बौद्धिक प्रगतीच्या गोष्टी ह्या स्थानानें दर्शविल्या जातात. परंतु देशांतील मुलामुलींच्या शाळेंतील शिक्षणाचा विचार पंचम स्थानावरून करतात.

चतुर्थ—भाव.

" बंधु--भवने बंधून् गृहमातृजलात्मवृद्धिम्योज्यादीन् ॥
वाहन हृदय स्कंधासनशयनसुखान्यधो जलं ब्रूयात् ॥ "

स. चिं.

" पितृवित्तं निधिक्षेत्रं गृहं भूमिश्च तुर्यतः ता. नी.

अर्थ.—चतुर्थ भावावरून बंधु, ज्ञाति, बांधव, घर, आई, आत्मोन्नति, खाण्याचे पदार्थ, वाहन, हृदय, स्कंध, खांदा, आसन, शयन, सुख, पाताल, पाणी, बापाचें द्रव्य, नेवा इत्यादिकांचा विचार करतात.

या स्थानावरून पश्चिमात्य ज्योतिषी बापाचा विचार करतात. परंतु या स्थानानें मातृसुखाचा बोध होतो असें पुष्कळांचे मत आहे. प्रसिद्ध ज्योतिषी सर्फेरिअल ह्या स्थानावरून स्त्रियांच्या कुंडलींत पितृसुख व पुरुषांच्या कुंडलींत मातृसुख यांचा विचार करावा असें म्हणतो. तसेंच युरोपीय फलज्योतिषांत या स्थानावरून अनुवंशिक संस्कार, आयुष्याचे शेवटचे दिवस, अंतकाल, मरण, रहाण्याचें ठिकाण, जमिनींतील पदार्थ, खाणी शेतीभाती, जमीनजुमला व गृहसौख्य यांचा विचार करण्यास सांगितलें आहे. कुंडलींत हें स्थान फार महत्वाचें आहे व या स्थानांतील ग्रहाप्रमाणें मनुष्यांच्या आयुष्याच्या उत्तर विभागांत घडामोडी झालेल्या दिसतात. त्याच प्रमाणें या स्थानांतील ग्रह अष्टमस्थानाप्रमाणें मृत्यूस कारणीभूत होतात.

आर्य ग्रंथांत या स्थानाचा अमंल हृदय व स्कंध यांवर असल्याचें सांगितलें आहे परंतु वस्तुस्थिति निराळी दिसते. या स्थानांत असलेले ग्रह कर्क राशीप्रमाणें स्तनयुग्म, पोट, व पचनेंद्रियें यां संबंधीं होणारे रोग दर्शवितात.

**प्रश्न ज्योतिषांत** या स्थानावरून माता, जमीनजुमला, वारसा



हक्कानें मिळणारें धन, शेतकी, भूमीगत धन, खाणी, अंतकाल, विचारलेल्या प्रश्नाचा शेवट, शहरें, किल्ले, जुनीं घरें, बाग, शेतें, वगैरे गोष्टींचा विचार होतो.

**मेदिनीय ज्योतिषांत** या स्थानावरून जमिनीचे मालक, शेतें, शेतकरी, पिकपाणी, खाणींतील पदार्थ, इमारती, सार्वजनिक लोक किंवा प्रजाजन यांचा विचार होतो.

**पंचमभावः—**

" सुतभवनात्सुतबुद्धिमंत्रिणामपि मंत्रभोजनपितृभावान्
हृदयोदरप्रवेशं विवेकशक्ति च निर्दिशेन्मतिमान् ॥ "

स. चिं.

" पुत्रे मंत्र—धनोपायगर्भविद्यात्मजेक्षणम् " ता. नि.

अर्थः—पंचम स्थानावरून पुत्र, बुद्धि, मंत्रित्व, मंत्र, भोजन, पितृभाव, हृदय, उदरप्रवेश, विवेक शक्ति, संपत्ति प्राप्त होण्याचा उपाय, गर्भ, विद्या इत्यादि गोष्टींचा विचार करतात.

या स्थानावरून मुख्यत्वें विद्या व संततीचा विचार होतो. नुसती बलवान ग्रहस्थिति या स्थानांत असतां त्या आपणांस विद्या व संततिसुख पुष्कळ असेल असें म्हणतां येत नाहीं. विद्येचा विचार करते वेळीं **पंचमस्थान, बुध, तृतीयस्थान व नवमस्थान** या सर्व गोष्टी अवश्य विचारांत घेतल्या पाहिजेत. संतानसुखासंबंधानें विचार करितां **पंचम, एकादश, गुरु व चंद्र** यांचा योग्य विचार केल्याखेरीज नुसत्या पंचमांतील ग्रहस्थितीवरून इतकीं मुलें किंवा मुलगे होतील असें सांगणें योग्य होणार नाहीं. पंचमस्थानातील राशीवरून किंवा इतर योगावरून इतकेच मुलगे किंवा मुली होतील हें सांगणें शक्य वाटत नाहीं. पंचमस्थानांतील ग्रहस्थितीवरून साधारण संतानसुखाबद्दल अटकळ बांधतां येईल. पाश्चात्य ज्योतिषी **सफेरेल** ह्याचे मतानें पुरुषाचे कुंडलींत पंचमस्थान प्रथम संतति, सप्तमस्थान द्वितीय, नवमस्थान तृतीय, ह्या क्रमानें संततीसुख दर्शवितें. व स्त्रीचे कुंड-

लींत चतुर्थस्थान प्रथम अपत्य, षष्ठस्थान द्वितीय, अष्टमस्थान तृतीय या क्रमानें अपत्यें दर्शविलीं जातात. त्याचप्रमाणें पुरुषाचे कुंडलींत पंचम, सप्तम, नवम, एकादश ह्या स्थानावरून मुलाचे मुलगे वगैरे मुलें वाढणारा वंश दर्शविला जातो. व चतुर्थ, षष्ठ, अष्टम, दशम व व्यय या स्थानांवरून मुलीच्या वंशविस्ताराचा विचार होतो. व स्त्रीचे कुंडलींत चतुर्थ षष्ठ व अष्टम या स्थानावरून मुलामुलें होणारा वंशविस्तार व पंचम, सप्तम, नवम ह्या स्थानावरून मुलीच्या वंशविस्ताराचा विचार होतो. म्हणजे संततीचा विचार करते वेळीं चतुर्थ व दशम हीं स्थानें आणखी विचारांत घेतलीं पाहिजेत. वरील विधानाबद्दल वाचकवर्ग विचार करतील.

त्याचप्रमाणें पाश्चात्य ज्योतिर्विद् पंचमस्थानावरून सट्टे, लाटरी, विषयवासना, विषयसुख, चैन, लग्नसंबंधाखेरीज होणारें स्त्रियांबरोबर किंवा पुरुषाबरोबरील संबंध दर्शवितात.

**प्रश्नज्योतिषांत** ह्या स्थानावरून गर्भ, मुलें, लाटरी, सट्टे, मेजवान्या, चैनीचे प्रकार वगैरे संबंधाचे प्रश्नाचा विचार करितात.

**मेदिनीय ज्योतिषांत** ह्या स्थानावरून नाटकगृहें, सर्व प्रकारचे चैनीचीं स्थळें, देशांतील जन्ममरणाची संख्या, मुलें, शाळा, खेळ, खेळाचीं ठीकाणें, सट्टे, सट्टेबाजार वगैरे संबंधानें विचार होतो.

जन्मकुंडलीचे सहाव्या भावावरून खालील गोष्टींचा विचार करण्यास सांगितलें आहे.

अरिभवनादरिचोरक्षतविघ्नक्लेशनाभ्युदर देशान् ॥
मधुरादिषडुपदंशान् ग्रहराश्युदितान् वदेत्प्राज्ञः ॥ ( स. चि. )
" रिपौ मातुलमांद्यारि चतुष्पाद्धंघभीर्व्रणान् " ( ता. नि. )

अर्थः—षष्ठस्थानावरून शत्रु, चोर, क्षत, विघ्न, क्लेश; नाभि, उदरादि रोग, मधरादि सहा प्रकारचे उपदंशादि विकार, मातुलपक्षाचें सुख इत्यादि गोष्टींचा विचार विद्वानानें षष्ठस्थानावर उदित असलेल्या राशि व षष्ठांत असलेल्या ग्रहावरून करावा.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्ति विद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. | एप्रिल १९१६. | अंक १ ला.

## ईश प्रार्थना.

दिनकर देई जगताला
सुंदर सुविमल कांतीला ।
विधुची रमणीया लीला
नितांत देई मोदाला ।
नवग्रहाची ही माला
शोभविते आकाशाला ।
ग्रहपंक्ती–दूर अती
करिती जरि निज वसतीला
देती पीडा मनुजाला ॥ १ ॥

हंसू नका ग्रहमालेला
पीडा देई इंद्राला ।
शंकर कैलासीं लपला
गुरुलाही अनुभव आला ।
सकलांची लीला अतुला
वर्णी जी ज्योतिर्माला ।
ज्योतिर्विद्या सकलांला
प्रज्ञ नरा अज्ञानाला ।
होई प्रिय पाश्चात्याला
तशीच ही पौर्वात्याला ।
ज्योतिर्विद्या महिम्याला
गाई जी ज्योतिर्माला ।
चिरायुत्व त्या मालेला
देई विभो विनवी तुजला ।
बुध–वृंदा–आनंदा
देवो ही ज्योतिर्माला ।
विनती अंबा–पदकमला ॥ २ ॥

" राधाकान्त "



# होरा विचार.

" The lucky have whole days
And those they choose;
The unlucky have but *hours*
And those they lose "

ड्रायडन.

दिवसाचे होरा संज्ञक २४ विभाग करण्याची पद्धति ज्योतिष ग्रंथांत वारोत्पत्ति संबंधानें व फलज्योतिषा संबंधानें आहे. प्रसिद्ध वराहमिहिर यानें बृहज्जातक ग्रंथांत ' होरा ' या शब्दा संबंधानें खालीं लिहिल्याप्रमाणें व्युत्पत्ति सांगितली आहे.

**' होरेत्यहोरात्र विकल्पमेके वांच्छंति पूर्वापरवर्णलोपात् ॥**
**कर्मार्जितं पूर्वभवे सदादि यत्तस्य पक्तिं समभिव्यनक्ति ' ॥**

' होरा हा शब्द " अहोरात्र " या शब्दांतील पहिल्या व शेवटच्या अक्षरांचा लोप होऊन झालेला आहे असें कित्येकांचें मत आहे; पूर्व जन्माचें पाप-पुण्य या जन्मीं आपणास कसें काय फलद्रूप होणार हें जेणें करून कळतें त्या शास्त्रास " होरा " असें म्हणतात. ' ज्योतिष सिद्धांत ग्रंथांत जीं कालमानें दिलीं आहेत त्यामध्यें होरा हें कालमान नाहीं. वैदिक काळच्या किंवा वेदांग काळच्या कोणत्याही ग्रंथांत तें नाहीं. **होरा** हा शब्द मूळचा संस्कृत नाहीं व त्या संबंधानें वराहमिहिरानें सांगितलेली व्युत्पत्ति समाधानकारक नाहीं. कित्येकांचे मतें **होरा** हा शब्द ग्रीक भाषेंतील आहे. हा शब्द हिब्रू भाषेंतील ' होरस् ' या धातुपासून उत्पन्न झाला आहे. ' होरस् ' अथवा होरा या शब्दानें कालमापन कोष्टकांतील १ तास असा अर्थ खाल्डियन लोकांत फार प्राचीन काळापासून प्रचारांत होता. हिरोडोटस याच्या मतें होरस् अथवा ओरस् हें नांव ईजिप्तमध्यें सूर्याचें द्योतक होतें.

अहोरात्राचे किंवा दिवसाचे होरा संज्ञक २४ विभाग करण्याची पद्धति फार प्राचीन काळापासन रूढ झालेली आहे. आणि हे विभाग

सात ग्रहांमध्यें वाटून दिले आहेत. म्हणजे दिवसाच्या २४ होऱ्यांचे शनि, गुरु, मंगळ, रवि, शुक्र, बुध व चंद्र हे सप्तग्रह अनुक्रमानें अधिपति होतात. अर्थात् अहोरात्रांत सर्व ग्रह तीन वेळां अधिपति होऊन आणखी तीन ग्रहांकडे अधिपत्य असतें व चवथा ग्रह दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या होऱ्याचा अधिपति होतो. या होऱ्यांच्या विभागावरून वारांच्या नांवांची कल्पना प्रचारांत आल्याचें सांगितलें आहे. उदाहरणार्थ पहिल्या दिवशीं पहिल्या होऱ्याचा स्वामी शनि घेतला असतां दुसऱ्या दिवशीं पहिल्या होऱ्याचा स्वामी रवि होतो. तिसऱ्या दिवशीं पहिला होरा चंद्राचा येतो. याप्रमाणें दिवसाच्या प्रथम होऱ्याचा जो अधिपति तोच दिनाधिप किंवा वाराधिप असतो व त्यावरूनच त्या वारास त्या ग्रहाचें नांव मिळालें आहे. ज्यानें होऱ्यांचा क्रम ठरविला त्यांस ग्रह गतीची फार चांगली अटकळ झाली होती ही गोष्ट यामध्यें दिसून येते. होरा हा शब्द आपल्या आर्यज्योतिषांत जातकशास्त्र व कालमापन विभाग या अर्थानें फार प्राचीन काळापासून म्हणजे इ. स. पूर्वी किंवा वराहमिहिराच्या पूर्वींच प्रचारांत आला असला पाहिजे. होरा म्हणजे जातक शास्त्र या दृष्टीनें आजपर्यंत पुष्कळच विचार झालेला आढळतो. परंतु होरा म्हणजे दिवसाच्या कालमापन विभागापैकीं विशिष्ट विभाग या दृष्टीनें फलज्योतिष वाङ्मयांत विशेष चर्चा झाल्याचें प्रचलित ग्रंथांमध्यें दिसून येत नाहीं. होऱ्या संबंधानें थोडा बहुत उल्लेख मुहूर्त ग्रंथांत असल्याचें आढळतें. कालमापनाचा हा विभाग फारच महत्वाचा असून त्याकडे आमच्यांतील बऱ्याच ज्योतिर्विदांचें लक्ष नसल्याचें आढळण्यांत आल्यावरून मालेच्या प्रस्तुत अंकांत आर्य व यूरोपीय ग्रंथाधारें होऱ्याचें सविस्तर विवेचन करण्याचें योजिलें आहे.

**" वारात् षष्ठस्य षष्ठस्य होरा सार्धा द्विनाडिका ॥**
**अर्कः शुक्रोबुधश्चंद्रो मंदो जीवो धरासुतः " ॥**

जो वार असेल त्या वारीं प्रथम अडीच घटिका त्या वाराचा होरा असतो, त्यापासून सहावे वाराचा दुसरा होरा या क्रमानें दिवसाचे व रात्रीचे मिळून चोवीस होरे होतात. होरा जाणण्याकरतां ग्रहांचा क्रम—रवि, शुक्र, बुध, चंद्र, शनि, गुरु व मंगळ या प्रमाणें आहे.



दिवसाचे २४ तास किंवा ६० घटिका होतात म्हणून प्रत्येक होरा अडीच घटिका किंवा एक एक तास असतो. जो वार असेल त्या वाराचा होरा पहिल्या तासास, नंतर त्यापासून सहावे वाराचा होरा दुसऱ्या तासास याप्रमाणें होऱ्यांचा क्रम आर्य ग्रंथांत मानला आहे. यूरोपीय ग्रंथांतही ह्याचप्रमाणें होऱ्याचा विचार करतात. परंतु त्यांच्यांत प्रत्येक होरा सदोदित एक तासाचा किंवा अडीच घटिकेचा नसतो. हें पुढें दिलेल्या विवेचनावरून सहज कळून येईल.

सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच्या काळाचे समान १२ भाग करून त्या प्रत्येक भागास **'होरा'** असें म्हणतात. सूर्योदयीं प्रथम होरा ज्या ग्रहाचा वार असतो त्याचाच असतो व त्यानंतरच्या पुढील होऱ्यांचा क्रम सूर्य मालेंतील ग्रहांच्या गतिप्रमाणें किंवा सूर्यापासूनचे अंतराप्रमाणें आहे. सूर्यमालेंत शनि, गुरु, मंगळ, सूर्य, बुध व चंद्र असा ग्रहांचा क्रम आहे. उदाहरणार्थः—शनिवारीं प्रथम होरा शनीचा, दुसरा होरा गुरूचा, तिसरा होरा मंगळाचा ह्याप्रमाणें क्रमानें सात होरे होतात व पुन्हां आठवा होरा शनीचा, नववा होरा गुरूचा ह्याप्रमाणें होऱ्याचें चक्र अहोरात्रींत फिरतें. सूर्यास्तापासून सूर्योदयाच्या काळाचे समान १२ भाग करितात आणि वर लिहिल्याप्रमाणें होऱ्याचा क्रम मानितात. शनिवारीं सूर्यास्तानंतर प्रथम होरा बुधाचा येतो हें पुढें दिलेल्या कोष्टकावरून वाचकांच्या लक्षांत येईल. याप्रमाणें २४ तासांचे अहोरात्रींत दुसऱ्या दिवसाचे सूर्योदयाचे पूर्वीचा होरा मंगळाचा येतो व त्यानंतर रवीचा होरा असतो व तोच होरा रविवारीं सूर्योदयीं असतो. ह्याप्रमाणें सोमवारीं प्रथम होरा चंद्राचा, मंगळवारीं प्रथम होरा मंगळाचा, बुधवारीं प्रथम होरा बुधाचा, गुरुवारीं प्रथम होरा गुरूचा, शुक्रवारीं प्रथम होरा शुक्राचा आणि शनिवारीं प्रथम होरा शनीचा येतो.

कांहीं यूरोपीय ज्योतिर्विदांच्या मतें सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच्या काळाचे किंवा सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतच्या काळाचे सारखे १२ भाग करून येणाऱ्या भागाइतकी होऱ्याची मर्यादा घेणें हा गौण पक्ष आहे

करतां सूर्योदयापासून मध्यान्ह, मध्यान्हापासून सूर्यास्त ह्याप्रमाणें दिवसाच्या मुख्य चार विभागांचे सारखे सहा भाग करून येणाऱ्या काळा इतकी प्रत्येक होऱ्याची मर्यादा मानणें श्रेष्ठ आहे. ह्या सर्व गोष्टी सूक्ष्मतेकरतां पाहिजे असल्यास घ्याव्या परंतु विषुववृत्ताजवळ रहाणाऱ्या भारतवासीयांनीं स्थूलरीत्या प्रत्येय होरा एक एक तासाचा मानला असतां विशेष फरक होईल असें वाटत नाहीं.

प्रत्येक होऱ्याचे समान सात भाग करण्याचाही प्रघात पाश्चिमात्य ज्योतिर्विदांमध्यें आहे व ह्या सात समान भागाचे अधिपति पूर्वी सांगितलेल्या क्रमानें मानतात. म्हणजे जो होरा चालू असेल त्याच्या पहिल्या विभागाचा अधिपति तोच ग्रह असतो नंतर त्या ग्रहापासून असणाऱ्या ६ व्या वाराचा अधिपति दुसऱ्या विभागाचा स्वामी होतो. हा प्रकार सूक्ष्म काल निर्णय करण्याकरतां सांगितलेला आहे परंतु साधारण व्यवहारास इतकें सूक्ष्म जाण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

होऱ्यांचा व्यवहारांत मुख्य उपयोग म्हटला म्हणजे दिवसाचे शुभाशुभ कालज्ञानाकडे होतो. आपणास भेटण्यास येणारा मनुष्य कसा असेल, साधारणपणें तो कोणत्या विषयासंबंधानें भाषण करील, आपणास एखाद्या विशिष्ट वेळीं मिळालेलें पत्र किंवा धंद्यासंबंधाचे व्यवहार, बोलणें वगैरे कोणत्या स्वरूपाचीं असतील इत्यादि बऱ्याच गोष्टींची कल्पना चालू असलेल्या होऱ्यावरून करतां येते. त्याचप्रमाणें होराज्ञान झालें असतां कोणतेंही कार्य करण्यास शुभ वेळ ठरवितां येतो. उदाहरणार्थ **रवीचा होरा** चालू असतां पत्र मिळालें असतां किंवा एखादी गोष्ट घडत असतां ती बहुशः मान सन्मान, व नोकरी धंद्याबद्दल असते. **चंद्राचा होरा** चालू असतां प्रवास स्थलांतरें वगैरे सामान्य गोष्टी, **मंगळा**चा होरा चालू असतां भांडणतंटे, **बुधा**चा होरा चालू असतां धंदा, विद्या लेखन, **गुरूचा** होरा चालू असतां लाभ, **शुक्रा**चा होरा चालू असतां सौख्य **शनि**चा होरा, चालू असतां संकटें, तोटे, मृत्यु वगैरे गोष्टी घडत असलेल्या पहाण्यास मिळतात. प्रत्येक होरा चालू असतां काय काय गोष्टी घडतात किंवा विशिष्ट होरा चालू असतां कोणकोणतीं कृत्यें करावीं यासंबंधानें विचार करूं.



## रवीचा होरा चालू असतां मिळणारीं फलें.

रवि हा स्वभावानें उष्ण, रुक्ष, व पुरुष प्रकृति ग्रह असून तो अधिकार, राजदरबार, मानसन्मान, कीर्ति, जीवनशक्ति, व प्राण ह्यांचा कारकग्रह आहे. त्यामुळें **रवि** होऱ्यांत मोठ्या लोकांबरोबर व्यवहार, नोकरीकरितां खटपट, बढती, धार्मिक किंवा अध्यात्मिक गोष्टी, मोठ्या लोकांच्या भेटी, सार्वजनिक उपयुक्ततेचीं कृत्यें मोठ्या लोकांबरोबर मैत्री वगैरे गोष्टी कराव्यात. परंतु या होऱ्यांत नवीन धंद्यास सुरुवात, नवीन घर बांधणें नवीन कपडे घालणें, बिऱ्हाड बदलणें, किंवा नूतन घरांत प्रवेश करणें, पैसे कर्जाऊ देणें किंवा घेणें वगैरे गोष्टी करूं नयेत.

रविच्या होऱ्यानें हृदयविकार, दाहजन्यविकार, पाल्पिटेशन, पुरुषांस उजव्या डोळयास विकार व स्त्रियांस डाव्या डोळयाचे विकार दर्शविले जातात.

रवीच्या होऱ्यावर सांडलेली वस्तु बहुधा पूर्वेकडील बाजूस मिळते, व ह्या होऱ्यावर विचारलेल्या गोष्टी किंवा प्रश्न पौर्णिमेच्या सुमारास फलद्रूप होतात.

रवीच्या होऱ्यांत भेटणारीं माणसें मोठ्या नाकाचीं, मध्यम बांध्याचीं, सुस्वरूप, मोठ्या घराण्यांतील, तांबूस वर्णाचीं, साधारण गर्विष्ठ, उदार, स्वतंत्र बाण्याचीं, धीट, धाडसी, अधिकार गाजवणारीं आढळतात. परंतु ह्या वेळीं रवि इतर ग्रहानें पीडित असतां गर्विष्ठ, घमेंडीखोर, रागीट, बढाईखोर इत्यादि दुर्गुण पाहण्यास मिळतात व ह्या काळीं हरवलेली वस्तु क्वचितच सांपडते व त्या वेळीं हा होरा अशुभच मानावा.

रवीच्या होऱ्यांत मिळणारीं पत्रें, प्रश्न किंवा भाषण बहुशः धंदा, मानसन्मान, बढती, मोठे लोक, राजदरबार ह्यासंबंधानें असतात.

## चंद्रहोरा चालू असतां मिळणारीं फलें.

ज्योतिष वाङ्मयांत **चंद्रा** इतकें महत्व दुसऱ्या कोणत्या ग्रहास दिलेलें नाहीं हें नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. कुंडलींत **चंद्र** ज्या मानानें इतर ग्रहाबरोबर शुभदृष्ट किंवा पापदृष्ट असतो त्याप्रमाणें त्या प्राण्यास सुख, यश, शरीरसंपत्ति किंवा त्याची नैतिक व आधिभौतिक स्थिति असते.

चंद्रहोऱ्यांत प्रश्न विचारण्यास येणारीं माणसें शरीरानें ओबडधोबड, मासाळ, फिकट, हातपाय लहान असलेलीं, वाटोळ्या तोंडवळ्याचीं, अस्थिर व चंचल स्वभावाचीं असतात.

चंद्रहोरा सार्वजनिक लोक, सार्वजनिक कृत्यें करणारे लोक, सार्वजनिक संस्था, सरकारी नोकर किंवा म्युनिसिपल नोकर, जठराचे विकार, अपचनाचे विकार, पुरुषांस डाव्या डोळ्यास विकार, स्त्रियांस उजव्या डोळ्याचे विकार, खोकला, स्त्रियांस स्तनविकार, किंवा स्त्रीआर्तव विकार दर्शवितो.

चंद्रहोऱ्यांत हरवलेली वस्तु बहुशः उत्तरेस किंवा वायव्य दिशेस मिळते. चंद्रहोरा चंचल असल्याकारणानें कुत्रीं, मांजरें बकऱ्या ह्यांसारख्या लहान जनावरांची खरेदी, औषध घेणें; नवीन घर बांधण्यास आरंभ करणें, पैसे उसनें देणें, नवीन कपडे धारण करणें, नवीन घरांत प्रवेश करणें, वगैरे गोष्टी करूं नयेत. हा होरा चंचल असल्या कारणानें ह्या होऱ्यांत जी कांहीं सवलत, वचन मिळेल त्याचा उपयोग तावडतोब करून घ्यावा. ह्या होऱ्यांत स्त्रियांबरोबर व्यवहार, मुलांना शाळेंत पाठविणें, लहान सहान प्रवास करणें, सार्वजनिक लोकांबरोबर व्यवहार करणें, नोकर चाकर ठेवणें, घरगुती संसाराचीं कामें, सार्वजनिक हिताचीं कृत्यें करणें, जाहिराती देणें, म्युनिसिपालटी संबंधानें व्यवहार करण्यास हा होरा उत्तम आहे.

ह्या होऱ्यांत मिळणारीं पत्रें, निरोप किंवा संभाषण बहुधा प्रवास, स्थलांतर, स्त्रियांसंबंधी व्यवहार, अनिश्चित असलेल्या गोष्टी, पाहुणे, प्रवासी, यां संबंधानें होते.

## मंगळाचा होरा चालू असतां मिळणारी फलें.

ज्योतिष शास्त्रांत **मंगळ** हा क्रूर ग्रह असून ह्याचीं फलें फार तीव्रपणानें अनुभवास येतात. मंगळ हा पापग्रह असून रागीट, भांडखोर, कठोर, असल्या स्वभावाचा आहे. ह्या होऱ्यांत भांडणें, मारामाऱ्या, खून, अग्निलागणें वगैरे गोष्टी झालेल्या पाहण्यास मिळतात. ह्या होऱ्यांत भेटण्यास येणारी मंडळी मध्यम बांध्याची, मजबूत शरीराची, तांबूस वर्णाची, चेहऱ्यावर करारीपणा अधिकारीपणा दिसणारीं अशीं असतात. ह्यांचे केंस काळे



असून डोळ्यांच्या भिवया लठ्ठ व जाड आढळतात. स्वभावानें रागीट, खुनशी, तोंडावर वण किंवा खुण असलेले, निर्भीड, स्पष्टवक्ते, स्वतंत्र बाण्याचे, अधिकारप्रिय, महत्वाकांक्षी, आपले स्वतःचे विचारानें चालणारे व चपळतेनें चालणारे आढळतात.

मंगळ हा गुणधर्मानें उष्ण, रुक्ष, व पुरुष प्रकृति ग्रह आहे. ह्याचा अंमल गुह्येंद्रियें, मूत्राशय, मस्तक, चेहरा, डावा कान, अंडकोष, स्नायु, यांवर असल्यामुळें त्यांसंबंधीं विकार, जखमा, कापणें, भाजणें, देवी, अपघात, त्वग्रोग, खरूज, सुजणें वगैरे विकार दर्शवितो.

या होऱ्यांत हरवलेली किंवा चोरीस गेलेली वस्तु क्वचितच मिळते, व त्यासंबंधी पश्चिमेकडील दिशेस तपास करावा. **मंगळहोऱ्यांत** मिळणारीं पत्रें, संभाषणें बहुधा भांडण, तंटे, लढाया, फसवेगिरी, लबाड्या, चोऱ्या, अपघात, आगी, शस्त्रक्रिया, ताप वगैरेसंबंधीं असतात. ह्या होऱ्यांत मिळणाऱ्या बातम्या किंवा सुचणाऱ्या विचारावर फारसा विश्वास ठेवण्यांत अर्थ नाहीं. ह्या होऱ्यांत कोणतेंच कृत्य घाईनें व पूर्ण विचार केल्याखेरीज करूं नये. ह्या होऱ्यांत भेटणाऱ्या माणसावर फार जपून विश्वास ठेवावा कारण ते सांगत असलेल्या सर्वच गोष्टी खऱ्या नसतात. हीं माणसें लबाड व भांडखोर आढळतात. ह्या होऱ्यावर कोणतेंच महत्वाचें काम करूं नये. ह्या होऱ्यांत जलप्रवास किंवा इतर रेल्वे प्रवास करणें इष्ट नाहीं. सर्वसाधारणपणें हा होरा कोणत्याच कृत्यास शुभ नाहीं.

## बुध होरा चालू असतां मिळणारीं फलें.

फलज्योतिष शास्त्रांत **बुध** हा ग्रह जरी आकारमानानें लहान आहे तरी फार महत्वाचा असून तो मानसिक शक्तींचा किंवा बौद्धिक शक्तींचा कारक मानला आहे. हा ग्रह वाचनाची आवड, प्रवासाची आवड, विनोद, कल्पकता, शोधकता, शास्त्रीय विषयांची गोडी दर्शवितो. बुध होऱ्यांत भेटण्यास येणारी मंडळी उंच, सडसडीत बांध्याची व वाटोळ्या तोंडवळ्याची असतात. परंतु क्वचित प्रसंगीं बुटकीं, अति चपळ, चंचल वृत्तीचीं असतात. त्यांचे डोळे लहान असून फार तीक्ष्ण असतात व हाताचीं बोटें

सडसडीत असून चालण्याची तऱ्हा फार चपळतेची असते. बुधाचा अंमल नाभि, जठर, फुफ्फुसें, जिव्हा, हात व मज्जातंतु यांवर असल्यामुळें मज्जातंतूंचे विकार, मस्तक विकार आणि वाग्दोष दर्शवितो.

बुधाचे होऱ्यांत हरवलेली वस्तु बहुधा उत्तर दिशेस सांपडते. ह्या होऱ्यांमध्यें वस्तु हरवण्यापेक्षां चोरीस जातात असें आढळून येतें. या होऱ्यांत पत्रव्यवहार करणें, हिशोब तपासणें, अभ्यास करणें, वाचन, सर्व प्रकारचे विद्याविषयक व्यवहार करणें, निरोप पाठविणें, औषध घेणें, जमीनजुमला विकत घेणें, पैसे उसनें देणें किंवा घेणें, पुस्तकें विकत घेणें, सल्ला मसलत विचारणें, अर्ज करणें, मोठ्या लोकांच्या भेटी घेणें वगैरे गोष्टी कराव्यात. ह्या होऱ्यामध्यें विचारशक्ति, कल्पना व व्यवहारदक्षता उत्तम राहून बुद्धि तरतरीत असते त्यामुळें सर्व प्रकारच्या बौद्धिक व्यवहारास, संभाषणास, नवीन विचार करण्यास दुसऱ्याचें मनोगत जाणण्यास, जाहिराती लिहिण्यास, लहान सहान कामें करण्यास, जवळचे प्रवास करण्यास किंबहुना जेथें जेथें तावडतोब विचार करून गोष्टी करावयाच्या असतील अशा सर्व कृत्यांस बुधाचा होरा फार महत्त्वाचा आहे. ह्या होऱ्यांत नूतन गृहामध्यें प्रवेश करणें, लग्न करणें, चाकर ठेवणें किंवा ज्या गोष्टींस स्थैर्याची आवश्यकता असते अशा गोष्टी करूं नयेत. ज्या दिवशीं ह्या होऱ्यांत मन उल्हसित असेल त्याच वेळीं वर सांगितलेली कृत्यें करावीं परंतु ज्या वेळीं मन उदासीन, अस्थिर व चंचल असेल त्या वेळीं वरील कृत्यें गुरु किंवा शुक्र होऱ्यावर करावीं. बुधाचें होऱ्यांत होणारें भाषण, मिळणारें पत्र किंवा निरोप बहुधा लेख, अभ्यास, व्यापार, शिक्षण, पुस्तकें, लहान प्रवास व लहान मुलें यांसंबंधीं आढळतो.

## गुरूचा होरा चालू असतां मिळणारीं फलें.

सूर्यमालेंत गुरूप्रमाणें आकारमानानें दुसरा मोठा ग्रह नसून त्यासारखा अत्यंत शुभ असा दुसरा ग्रह नाहीं, गुरूच्या होऱ्यांत भेटण्यास किंवा प्रश्न करण्यास येणारीं मनुष्यें दिलदार, उदार स्वभावाचीं, उधळीं, दुसऱ्यास मदत करण्याच्या कामांत सदा तत्पर, भव्य किंवा मोठ्या कपाळाचीं,



उत्तम बांध्याचीं, गौरवर्णी, उतार वयांत टक्कल पडलेलीं आणि मोठ्या डोळ्यांचीं असतात. गुरु हा उष्ण, आर्द्र, पुरुष ग्रह, बहुप्रसव व शुभ असून त्याचा अंमल रक्त, यकृत, शिरा व जंघा यांवर असल्यामुळें ह्या होऱ्यांत यकृत विकार, प्लीहेसंबंधी विकार, वातरोग, रक्तदोष वगैरे विकारांनीं पीडलेली मंडळी आढळते.

गुरूच्या होऱ्यांत हरवलेली वस्तु बहुशः ईशान्य दिशेस मिळते. गुरूच्या होऱ्यामध्यें सर्व प्रकारचीं धार्मिक कृत्यें, कायद्यासंबंधानें सल्ला मसलत घेणें, मोठ्या लोकांस भेटणें, व त्यांकडे मदत मागावयास जाणें, नवीन प्रवासास निघणें, पैसे उसने देणें किंवा घेणें, लग्नसमारंभ, व्यवहारधंदे, सर्व प्रकारचे पैशासंबंधीं व्यवहार, नवीन दुकान उघडणें, मुलांना शाळेंत घालणें, दानधर्म करणें, शरीरप्रकृति सुधारण्यासाठीं मेहनत करणें, वेदांत विषय शिकणें वगैरे प्रकारचीं कृत्यें करावीत. ह्या होऱ्यामध्यें गुरांचा क्रयविक्रय करूं नये. ह्या होऱ्यांत मिळणारीं पत्रें किंवा होणारीं भाषणें बहुधा संपत्ति, व्यापार, धंदा, न्याय, लाभ वगैरे संबंधानें असतात.

ह्या होऱ्यांत मिळणारी बातमी, वचन, किंवा नवीन सुचलेले विचार बहुशः खरे किंवा शुभ असतात व त्यांवर विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं.

## शुक्र होऱ्याचीं मिळणारीं फलें.

**शुक्र** होऱ्यांत मन आनंदी, उत्साही, शांत, उदार, ममताळू वगैरे शुक्राच्या धर्माप्रमाणें झालेलें आढळतें. सर्व ग्रहांत दिसण्यांत सुंदर व तेजस्वी असा शुक्राइतका सूर्यमालेंत ग्रह नाहीं. शुक्र हा ललितकला, गायन, वादन, नाटक, सुंदर वस्तु, चित्रकला वगैरे गोष्टींचा कारक असल्यामुळें हा होरा वरील विषयांस चांगला असतो.

शुक्र होऱ्यांत प्रश्न करण्यास येणारी मंडळी ममताळु, आनंदी, व शांत स्वभावाची, कलाकौशल्याची आवड बाळगणारी, चैनी, सुस्वरूप, गौर वर्णाची, शरीरानें गोंडस, सुंदर नेत्र असलेली व या होऱ्यावर येणाऱ्या स्त्रिया फार देखण्या व मोहक, आपल्या कपडयालत्त्याची विशेष काळजी घेणाऱ्या आढळतात. शुक्र हा मूत्रपिंडाचे रोग, शुक्राच्या दुरुपयोगामुळें होणारे रोग,

कंठविकार व गर्भाषयाचे विकार दर्शवितो. शुक्र होऱ्यांत हरवलेल्या वस्तु बहुधा पश्चिमेकडे मिळतात. हा होरा सर्व प्रकारचे खेळ, स्त्रीसौख्य, प्रवास, सर्व प्रकारचे स्त्रियांसंबंधीं व्यवहार, औषध घेणें, नवीन घरांत प्रवेश करणें, घरगुती कामें करणें, माल खरेदी करणें, मित्रांस भेटण्यास जाणें, नवीन कपडे खरेदी करणें, दागिने विकत घेणें, वगैरे गोष्टी या होऱ्यावर कराव्यात.

ह्या होऱ्यांत मिळणारीं पत्रें किंवा संभाषण बहुशः चैन, स्त्रिया, लग्न, नाटकगृहें, संगीत, गाणें, स्त्रियांचे कपडेलत्ते किंवा डागिणें यांसबंधीं असतें.

## शनीच्या होऱ्याचीं फलें.

शनीसारखा खल ग्रह ज्योतिष वाङ्मयांत दुसरा नसल्यामुळें हा होरा सर्व प्रकारचे कृत्यास अशुभ मानतात. शनीचे होऱ्यांत भेटण्यास येणारी मंडळी कृष्णवर्णाची, रोड, दिसण्यांत खल, पोंक आलेली, चालतांना स्वतः बरोबर बोलणारी व स्वार्थी आढळतात. शनीचा अंमल प्लीहा, उजवा कान, दांत, हाडें यांवर असल्यामुळें दंतविकार, क्षय, संधिवात, जलोदर, हाडें मोडणें वगैरे गोष्टी दर्शवितो. शनि हा ज्या गोष्टी संथ व सावकाश घडतात, म्हातारीं माणसें, जमीनजुमला, शेतीभाती, रोग, मृत्यु व दुःख यांचा कारक ग्रह आहे. यामुळें या होऱ्यांत म्हातारे किंवा वृद्ध लोकांबरोबर व्यवहार करणें, जमिनीसंबंधीं, पिकपाण्यासंबंधीं, ज्या व्यवहारास दीर्घ काल पाहिजे आहेत असे व्यवहार, ज्या विषयांस दीर्घकाल पाहिजेत असे वेदांत आध्यात्मिक तत्वज्ञानाचे विषय, ध्यान करणें वगैरे गोष्टींस हा होरा चांगला आहे.

ह्या होऱ्यांत प्रवास, सार्वजनिक कामें, औषध घेणें, चाकरनोकर ठेवणें, नवीन वस्त्र धारण करणें, हजामत करविणें, नवीन कृत्यास आरंभ करणें, किंवा ज्या कामाचा शेवट लवकर पाहिजे आहे अशी कामें करूं नयेत. ह्या होऱ्यावर सुचणारे विचार किंवा कल्पना नेहमीच खऱ्या असतील असें मानता येत नाहीं. ह्या होऱ्यावर मिळणारीं पत्रें किंवा संभाषण बहुशः जमीन, मिळकत, शेती, अशुभ गोष्टी, आजार, रोग, दुःख, मृत्यु वगैरे गोष्टींसंबंधानें असतें. त्या होऱ्यामध्यें नष्ट झालेली वस्तु क्वचितच मिळते.




# मेष–संक्रमण.

( लेखक–राम नारायण. )

देशामध्यें होणाऱ्या घडामोडींसंबंधानें ज्योतिष शास्त्र दृष्ट्या विचार कर्तव्य असतां महत्वाचीं सूर्यसंक्रमणें, सूर्य–चंद्रांची ग्रहणें, रवि–चंद्र संयोगकाल वगैरे महत्वाच्या योगांचा विचार करावा लागतो. संक्रमणादिकांच्या कुंडल्यांवरून भावी गोष्टींचा कसा बोध होतो या संबंधानें म्हणण्यासारखा प्रयत्न अद्याप पावेतों झालेला नाहीं. फल ज्योतिषाच्या मेदिनीय शाखेकडे महाराष्ट्रीय ज्योतिर्विदांचें लक्ष्य गेलेलें आहे असें दिसत नाहीं. व या महत्वाच्या विभागाकडे त्यांचे लक्ष्य लागावें व त्या संबंधानें ऊहापोह सुरु व्हावा म्हणून संक्रमणादिकांच्या कुंडल्यांचा विचार चालू वर्षापासून ज्योतिर्मालेंत सुरू करीत आहों.

सा. ल.




चालू वर्षीं रवि मेष राशीमध्यें २१ मार्च रोजीं पहाटेस ३ वाजून ३८ मिनिटांनीं ( मुं. वेळ ) प्रवेश करीत आहे. या वेळीं मुंबई रेखांशाच्या

कुंडलीमध्यें कुंभ या शास्त्रीय राशीचा १९ वा अंश पूर्व क्षितिजावर उदित असून शास्त्रीय राशीमध्यें असलेला हर्शल उदय पावत आहे. या कुंडलीच्या तनुस्थानांतच मीन राशीमध्यें बुध ग्रह आहे. कुंडलीच्या धन स्थानामध्यें हर्शल व शुक्र यांच्या अर्ध केंद्र दृष्टींत रवि आहे, मेष संक्रमण हें थोड्या-बहुत प्रमाणानें सर्व वर्षाचें द्योतक असतें आणि म्हणूनच या संक्रमण-कालीन झालेल्या योगांकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. प्रस्तुत वर्षी तनुस्थानांत हर्शल ग्रह उदित आहे. हर्शल बरोबर चंद्र त्रिकोणयोग करीत आहे परंतु रवि, शुक्र व मंगळ हे तीन ग्रह अशुभ योग करीत आहेत. वर्ष कुंडलींतील लग्न व सप्तमस्थान यांमधून हर्शल-मंगळांचा प्रतियोग म्हणजे अनारोग्य, अस्वस्थता व भानगडी यांचाच द्योतक योग आहे. तनुस्थानामध्यें बुध ग्रह असून याबरोबर शुक्राचा द्विराश्यंतर शुभ योग व शनीचा नव पंचम योग होत आहेत. या योगांमुळें वाङ्मयामध्यें कांहीं चांगल्या ग्रंथांची भर पडेल असें दिसतें. चांगल्या ग्रंथाचा लाभ होण्याचा योग यंदा येईल हें खरें परंतु तृतीय स्थानांतील नवमेश शुक्र, मंगळाबरोबर केंद्र योग करीत आहे त्यामुळें मासिकें, वृत्तपत्रें वगैरे वाङ्मयाभिवृद्धीचीं साधनें यांची स्थिति मुळींच समाधानकारक राहणार नाहीं.

प्रस्तुत कुंडलीमध्यें अतिशय महत्वाचे योग म्हटले म्हणजे कुंडलीच्या धनस्थानासंबंधानें झाले आहेत. धनस्थानामध्यें हर्शल व शुक्र यांच्या अशुभ दृष्टींत रवि असून संपत्तीचा कारक ग्रह गुरु शनीच्या बरोबर केंद्र-योग व अष्टमस्थ चंद्राबरोबर प्रतियोग करीत आहे. संपत्तीचा कारक ग्रह वर्ष कुंडलीमध्यें बिघडणें हें वाईटच परंतु तो धनेश होऊन बिघडणें हें अत्यंत वाईट आहे. ज्योतिर्मालेच्या पहिल्या वर्षाच्या १० व्या अंकांत गुरुशनींच्या केंद्रयोगाचीं फलें देतांना आम्हीं पुढें दिल्याप्रमाणें लिहिलें होतें. ' अनेक गोष्टींमुळें देशाच्या संपत्तीवर अनिष्ट परिणाम घडतो; अप्रिय



असा एखादा कर लादला जातो; बॅन्का व शेअर बझार यांची स्थिति चांगली रहात नाहीं; अस्वस्थता व उदासीनता पसरविणारा हा योग आहे ' वगैरे. चालू सालच्या बजेटामध्यें वाढलेल्या करांची माहिती सर्वांस आहेच. पुढें देशाच्या सांपत्तिक स्थितीचा अनिष्टपणा कोणत्या स्वरूपावर जातो हें पाहणें आहे. गुरु व मंगळ दशमाधिपति म्हणजे राजकर्त्यांचा कारक आहे. गुरु व मंगळ यांचा नवपंचम योग होत असल्यामुळें राजकर्त्यांकडून देशाच्या सांपत्तिक अनिष्टतेची तीव्रता कमी करण्यासाठीं मंगळाच्या स्वभावाप्रमाणें प्रयत्न होतील. देशाची सांपत्तिक निकृष्टावस्था चांगलीच निदर्शनास येईल असा योग वर्ष कुंडलीमध्येंच झाला आहे. त्याची तीव्रता कोणत्या महिन्यामध्यें अधिक होईल हें समजण्याकरतां दुसऱ्याही संक्रमणांचा विचार करणें जरूर आहे. ह्या दुसऱ्या म्हणजे कर्क, तूळ व मकर या संक्रमणांचा यथाकालीं आम्हीं विचार करणार आहों त्या वेळीं या तीन संक्रमणांचा अंमल असे तोंपर्यंत सांपत्तिक स्थिति कशी काय राहील याचा विचार करूं, तूर्त कर्क संक्रमणापर्यंत सांपत्तिक स्थितीचा विचार करूं म्हणजे पुरे होईल.

मेष संक्रमणाच्या नंतर रवि-चंद्र संयोग २ एप्रिल रोजीं होत आहे. त्या वेळीं गुरु धनेश असून रवि-चंद्रांच्या युतीमध्यें आणि अष्टमस्थ शनीच्या केंद्रांमध्यें आहे. हा योग सांपत्तिक स्थितीस प्रतिकूळ असून देशांतील उद्योगधंद्यास प्रतिकूळ आहे. ता. २ मे रोजीं रवि-चंद्र संयोग काळच्या कुंडलीमध्यें धनस्थानीं मंगळ असून अष्टमस्थ हर्शल मंगळाबरोबर प्रतियोग करीत आहे आणि हे दोन्ही ग्रह रवि-चंद्रांबरोबर केंद्रयोग करीत आहेत. या योगांमुळें बँका, पेढ्या, शेअर बझार, व्यापार व धंदे यांची स्थिति वाईट होऊन कांहींचीं दिवाळीं निघणें शक्य आहे. ता ३१ मे रोजीं होणाऱ्या रवि-चंद्र संयोग कालीं धनस्थानांतील गुरूबरोबर नेपच्यूनचा केंद्रयोग होत

आहे. सारांश मेष संक्रमण काळीं देशाचें धनस्थान पीडित झालेलें असून त्याच्या मागून होणाऱ्या रवि-चंद्र संयोगकाळीं सुद्धां धनस्थानाची स्थिति मुळींच समाधानकारक दिसत नाहीं.

वर्षकुंडलीच्या सप्तम स्थानांत सिंह राशीमध्यें मंगळ असून त्याबरोबर हर्शलचा प्रतियोग व शुक्राचा केंद्रयोग होत आहे. सप्तम स्थानावरून परदेशाशीं असलेलें दळणवळण, परराष्ट्रीय व्यापार, व देशांत होणारे लग्न-समारंभ यांचा विचार होतो. दशमाधिपति मंगळ या स्थानांत पीडित असल्यामुळें परराष्ट्रीय धोरणासंबंधानें नवीन प्रश्न उद्भवतील व त्यासंबंधानें वृत्तपत्रांतून बराच वादविवाद होईल, सप्तम स्थानांतील हर्शलनें पीडित असलेल्या मंगळामुळें घटस्फोटाचे प्रकार व अनीतिसंबंधानें बऱ्याच गोष्टी चव्हाट्यावर येतील. हे प्रकार विशेषतः तूळ संक्रमणानंतर होतील असें वाटतें. एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांमध्यें त्यासंबंधानें कांहीं विशेष घडून येईल असें वाटत नाहीं.

प्रस्तुत वर्षी प्रजाकारक ग्रह चंद्र अष्टमस्थानामध्यें शनीच्या केंद्रांत आहे. हा योग जनतेस अनिष्ट आहे. या योगामुळें देशांतील मुलें, स्त्रिया व सामान्य लोक यांची मृत्युसंख्या वाढेल. खून दरवडे वगैरे होतील. आणि रोगराई व दुष्काळ यामुळें जनतेस फार त्रास होईल. मेष संक्रमण काळीं शनि चंद्रांचा केंद्रयोग आहे व जून महिन्यापर्यंत शनीचें भ्रमण संक्रमण-कालीन चंद्राच्या केंद्रांतून होत आहे. हा काल मजूरवर्ग, कामकरी व नोकरीवर अवलंबून असणारे लोक यांना जाचक होईल. कौंसिलांतील लोक-नियुक्त सभासदांपैकीं एखाद्याचा मृत्यु होणें संभवनीय आहे. प्रस्तुत वर्षी प्रजाकारक ग्रह चंद्र व प्रजेच्या हितकर्त्यांचा कारक ग्रह गुरु ( लाभेश आहे म्हणून ) व दशमाधिपति म्हणजे राजकर्त्यांचा कारक ग्रह मंगळ यांचे शुभ योग होत आहेत, यामुळें कायदे कौंसिलच्या कामामध्यें विशेष विरोध होणार नाहीं असें दिसतें.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. } मे १९१६. { अंक २ रा.

## हिंदुविश्वविद्यालय.

( लेखक.—प्रेषित. )

विद्यादेवीचें केवळ माहेरघर असें सर्व जगावर प्रसिद्ध असलेलें जें श्रीकाशीक्षेत्र त्यांत नामदार लॉर्ड हार्डिंज हिंदुस्थानचे व्हाईसराय या महान् राजप्रतिनिधींनीं या विद्यालयाची स्थापना केली. हिंदु-स्थानांत हिंदूंचें असें ' विश्वविद्यालय ' हा काळपर्यंत हिंदवासीयांस दाख-वितां येत नसे. पण तो महादिवस ता. ४ फेब्रुवारी १९१६ हिंदवासि-यांच्या सुदैवानें आपणास लाभला आहे.


याच दिवशीं नामदार हार्डिंज साहेबांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थानांत देण्यांत येणाऱ्या शिक्षणाबद्दलचा अभिप्राय व्यक्त केल्यानंतर ' ही कोणशिला हिंदुस्थानच्या इतिहासाला निराळें वळण लावील ' असें भविष्य वर्तविलें आहे. सन १९०४ सालीं गर्भावस्थेंत आलेल्या या संस्थेच्या जन्मकाळीं

आपणास काय बरें दिसत आहे ? राजे, महाराजे, हिंदुस्थानसरकार, श्रीमान् लोक, विद्वान मंडळी ही एकजुटीनें व एकाच उत्साहानें भारतेतिहासास निराळें वळण लागावें व हिंदुस्थानांत सर्वत्र शिक्षणप्रसार व्हावा असें दर्शवीत आहेत.

संस्थेचे चालक तर " ( १ ) हिंदुसमाजाची आर्थिक, सामाजिक व आत्मिक उन्नति होण्यास व देशावर कितीही संकटें आलीं तरी हिंदुसमाजानें राखलेली संस्कृति कायम टिकविण्यास विद्यार्थ्यास शिकविणें, ( २ ) अर्वाचीन शास्त्रांच्या ज्ञानास प्राचीन आर्यसंस्कृतीची जोड देणारें शिक्षण देणें " हे मुख्य हेतु प्रदर्शित करून कामासाठीं परमेश्वराचा प्रसाद, सार्वभौम सरकार व राजेमहाराजे यांचा उदार आश्रय मिळत जावा अशी इच्छा प्रगट करीत आहेत.

विश्वविद्यालयाच्या कोणशिलेचा दगड केव्हां बसविला यासंबंधानें कोणशिला बसविण्याचे समारंभ सेक्रेटरी जवळ पत्रव्यवहार करितां खालीलप्रमाणें कोणशिला बसविण्याचा काल देण्यांत आला आहे.

सा. ल.






हा हिंदुविश्वविद्यालयाचा कोणशिला बसविण्याचा दिवस हिंदुस्थानच्या इतिहासांत फार महत्त्वाचा आहे. या वेळीं वरीलप्रमाणें ग्रहस्थिति होती. वरील कुंडलींत कुंभ या शास्त्रीय राशींत रवि, बुध, हर्शल व चंद्र सर्व **युतस्थितींत** आहेत. यांतील हर्शल हा ग्रह वगळला तरी इतर ग्रहांचें युतिफल **'जातश्चंद्ररवींदुजैर्नृपसमोविद्यायशस्वी भवेत्'** असें वर्णिलेलें आहे. ज्या संस्थेच्या जन्मकालीं स्वतः हिंदुस्थान सरकारचे मुख्य प्रतिनिधी हजर ती संस्था 'नृपसम' नाहीं असें कोण म्हणेल ? या सूत्रांतील 'विद्यायशस्वी' हा शब्द तर फार महत्वाचा आहे. पूर्वकेन्द्रीं मिथून ही शास्त्रीय राशि उदित असून लग्नाधिपति बुध—वाङ्मय, ज्ञान, विद्वत्ता, देशांतील साधारणपणें विद्यालयांतून मिळणाऱ्या शिक्षणाचा कारक ग्रह हा ग्रहमालेचा अधिपति रवि, सुधारणा व क्रांति घडवून आणणाऱ्या हर्शल बरोबर असून सामान्य जनतेचा कारक ग्रह जो चंद्र ह्यासुद्धां कुंभ ह्या शास्त्रीय राशींत दशमांत आहे. त्यामुळें ह्या संस्थेचें ब्रीदच विद्यादान करण्याचें आहे. व तें कर्तव्य करण्यांत संस्था खात्रीपूर्वक यशस्वी होईल असें मानण्यास सबळ ग्रहस्थिति आहे.

दशमांत चंद्र असून तो नुकताच मंगळाबरोबर प्रतियोग करून सुटत आहे. दशमभावाचा उदित अंश मंगळाबरोबर प्रतियोग करीत आहे. लग्नाधिपति बुध व रवि हे दोन्हीही ग्रह हर्शल या ग्रहाबरोबर युति करीत आहेत. ही अनिष्ट ग्रहस्थिति स्थापन कालीं झाली असल्यामुळें उत्सवसमयीं देशभक्त बॅ. गांधी यांचे व्याख्यानाच्या वेळीं हर्शलग्रहाचे धर्माप्रमाणें अनपेक्षित प्रसंग उत्पन्न होऊन एकंदर उत्सवसमारंभास अपकीर्तीचें गालबोट लागलें. दिनवर्षपद्धतीनें पाहतां रवि हा दुसऱ्या वर्षीं हर्शल बरोबर युति करील व नवव्या वर्षाचे सुमारास तो जन्मकालचे मूळ मंगळाबरोबर प्रतियोग करील. म्हणून हा मध्यंतरीचा ८ ते १० वर्षाचा काल संस्थेस बराच जाचक होईल असें अनुमान करण्यास हरकत दिसत नाहीं. या काळांत संस्थेच्या स्थापनकर्त्यावर संकटें येण्याचा

(६) संतति झाली होती परंतु सध्यां कांहीं शिल्लक नाहीं. सदरहु गृहस्थास ज्या ज्या वेळीं शनि व गुरु गोचरीनें युति करितात किंवा समोरासमोर येतात त्या त्या वेळीं अनिष्ट गोष्टी घडतात. १८९२, १९०१ व १९१० ते १९१२ ह्या वर्षीं गुरुशनीचा वरप्रमाणें योग आला होता. त्या योगानें हीं वर्षें फारच वाईट गेलीं. १८९२ मध्यें पित्याचा मृत्यु, १९०१ मध्यें स्त्रीचा मृत्यु. १९१० ते १९१२ चे दरम्यान स्त्रियांचा व कुटुंबांत मृत्यु व इतर त्रास झाला.

वरील गृहस्थास तारीख २३ फेब्रुआरी १९१६ रोजीं प्रवास करीत असतां गाडी उलटून अपघात झाला व ह्यामुळें त्याचे डाव्या खांद्यास दुःखापत झाली, त्याच दिवशीं डाव्या हाताचे करांगुळीस फोड होऊन बरें होण्यास ८।१० दिवस लागले. आतां अपघाताचा विचार करितां तारिख २३।२।१६ रोजीं गोचरीचा मंगळ वक्री असून सायन सिंह राशींत १९ व्या अंशांत आहे. म्हणजे गोचरीच्या मंगळाचें दैनंदिन भ्रमण मूळ कुंडलीच्या तृतीय स्थानांत असलेल्या हर्शलवरून होत आहे. प्रसिद्ध युरोपीय ज्योतिर्विद् राफेलचे मताप्रमाणें युतींचा परिणाम त्यांचे आरंभकाळापेक्षां वियोगकाळांत अधिक तीव्र दिसून येतो त्याप्रमाणें सांप्रतचा वक्री मंगळ मूळ हर्शलबरोबर युति करून पलिकडे १ अंश जात असतां वरीलप्रमाणें अपघात घडून आला. हर्शलचा धर्म अपघात व आकस्मिक संकटें घडवून आणणें हा आहे. हर्शल व मंगळ दोन्ही पापग्रह, शिवाय दोन्ही वक्री म्हणजे एक जन्मकालीं व दुसरा गोचरींत असल्यामुळें व दोहोंचा तिसऱ्या स्थानामध्यें—लहानसहान प्रवास, स्थलांतरें दर्शविणाऱ्या स्थानांत-सिंह या अग्नि व अपघातप्रचुर राशींत योग झाल्यामुळें अपघात व दुखापत घडून येणें हें अगदीं स्पष्ट दिसत आहे. परंतु डाव्याच हातास दुखापत कां व्हावी ? कुंडलीचे तिसरे स्थानाचा अंमल खांदा व हात यांवर



आहे व त्याप्रमाणें दोन्ही दुखापती त्या ठिकाणीं झाल्या. डाव्या हातास दुखापती होण्याचें कारण असें दिसून येतें कीं राशीचा पहिल्या पंधरा अंशांपर्यंतचा अंमल शरीराचे उजव्या भागावर व १६ ते ३० अंशांपर्यंतचा डाव्या भागावर असल्याचें आर्यज्योतिषी मानितात. त्याप्रमाणें पहातां जन्मकालचा हर्शल डाव्या भागासच इजा सुचवीत आहे. व गोचरीचा मंगळही पंधरा अंशावर असल्यामुळें त्याच विभागास अपघात दर्शवित आहे.

कोणतेंही कार्य घडून येण्यास दोन कारणांची जरूर असते. त्यांपैकीं मूळ कारण ( Root cause ) व दुसऱ्यास उत्तेजक कारण ( Exciting cause ) असें म्हणतात. सदर गृहस्थाचे कुंडलींत तृतीय स्थानस्थित वक्री हर्शल हा अपघात किंवा दुखापतीचा मूळ कारण आहे व त्याजवरून जेव्हां मंगळासारखा पापग्रह जाऊं लागला म्हणजे तो त्या मूळ कारणास उत्तेजक होऊन कार्य घडवून आणण्यास कारण झाला. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं नेहमी गोचरीचा मंगळ मागें जेव्हां जेव्हां सिंह राशीचे हर्षलवरून गेला तेव्हां या गृहस्थास कांहीं इजा झाल्याचें स्मरत नाहीं. किंबहुना कांहीं इजा घडली नाहीं. कारण त्या वेळचा मंगळ वक्री नव्हता. याजवरून स्पष्ट दिसून येतें कीं मंगळाचीं फळें तो जेव्हां जन्मस्थ ग्रहांशीं योगकारक होतो तेव्हां ज्यास्त अनुभव मिळतो, एरव्हीं अनुभव विशेष स्पष्ट मिळत नाहीं.

सांप्रत मंगळ वक्री आहे व तो २१-३-१९ पर्यंत तसाच राहणार आहे ज्यांचे कुंडलींत ज्या स्थानीं हा जन्मस्थ क्रूर ग्रहांशीं योग करीत असेल त्यांना त्यांचे स्थानबलाप्रमाणें कांहीं तरी अपघात, दुखापत वगैरे घडल्याशिवाय राहणार नाहीं. याचा अनुभव ज्यांना येईल त्यांनीं तो ज्योतिर्मालेंत प्रकाशित केल्यास शास्त्राची सत्यता उत्तम प्रकारें निदर्शनास येईल.

आपला,

ता. ९।३।१६. मुन्नालाल दुबे—नागपूर,

( १ ). दशमाधिपति गुरु व शनि यांचा अंशात्मक केंद्रयोग असल्यामुळें बालपण गरिबींत व शनीच्या अर्ध्या भ्रमणांत पित्याचा मृत्यु.

( २ ). बरेच ग्रह उदित गोलार्धांत असून दोन ग्रह स्वगृहीं व एक उच्च आहे. चंद्र राशीचा व चतुर्थ केन्द्राचा स्वामी बुध दशम केन्द्रांत माध्यान्ही आहे. रवि हर्शल यांचेमध्यें नवपंचम योग होत आहे. ही ग्रहस्थिति, स्वकर्तबगारीनें उदय दर्शविणारी असून उत्तरार्धांत भाग्योदय दर्शविते.

( ३ ते ४ ). बुध नीच क्षेत्रीं असून दशमांत आहे. पंचमेश व्ययांत मंगळानें युक्त यामुळें विद्यायोग साधारण. मीन राशींतला बुध तृतीयस्थानांतील हर्शल, **मिथून** राशींतील चंद्र हे अनेक विद्यांची आवड व ज्योतिषशास्त्राभिरुचि दर्शवितात.

( ५ ते ६ ). सप्तमाधिपति गुरु वक्री असून शनीबरोबर केन्द्रयोग करीत आहे. शुक्र मंगळानें युक्त असून हर्शलबरोबर केन्द्रयोग करीत आहे. हे योग स्त्रीसुखास त्याचप्रमाणें संततिसुखास विघातक झाले आहेत.

( ७ ). शनि आणि गुरु मूळचे केन्द्रयोग करीत असल्यामुळें ज्या ज्या वेळीं ते युति करितात किंवा समोरासमोर येतात त्या वेळीं अनिष्ट गोष्टी घडतात. ह्या कुंडलींतील हा अनुभव लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. यावरून असें अनुमान करितां येईल कीं जन्मकालीं जे ग्रह शुभ किंवा अशुभ संबंध करीत असतील ते गोचरीनें किंवा परिभ्रमणपद्धतीनें ज्या ज्या वेळीं तसे येतील त्या त्या वेळीं लाभ किंवा हानिकारक होतील.

संपादक.



# सन १९१६ चें पावसाचें संक्षिप्त अनुमान.

लेखक—एक ज्योतिर्विद् मित्र.

विद्वान् लोक ऋतु दोन मानितात. एक उन्हाळा व एक हिंवाळा. पावसाळा हा वरील ऋतूंचा पोटभेद मानितात. आम्ही विषयाचे सोईकरितां पावसाळा आणि उन्हाळा असे दोन ऋतु मानिले आहेत. या दोहोंच्या संयोगकाळास ढगांचा काल असें नांव दिलें आहे. पाऊस हा या लेखाचा प्रमुख विषय असल्यामुळें, पावसाळा असा स्वतंत्र ऋतु मानणें, भाग पडलें आहे.

उन्हाळा व हिंवाळा असे ऋतु होण्याची कारणें ज्योतिषशास्त्रांत पुढील प्रमाणें दिलेलीं आहेत.

१ सूर्य स्वयंप्रकाश आहे व सूर्यापासून पृथ्वीस प्रकाश व उष्णता मिळते.

२ सूर्याचे किरण लंब किरणापासून ९० अंश पर्यंत पसरतात.

३ पृथ्वी परप्रकाश आहे व ती सूर्याभोंवतीं फिरते.

४ कक्षेच्या पातळीशीं पृथ्वीच्या आंसाचा कोन ६६॥ अंशांचा आहे.

५ पृथ्वीच्या आंसाचा रोख कधींही बदलत नाहीं.

वरील पांच कारणांनीं घडलेले ऋतु भूरचनेमुळें कांहीं फरक होऊन अनुभवास येतात. भूरचनेमुळेंच पावसाळा हा ऋतु घडून येतो. भूरचनाविषयक गोष्टी पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत.

१ विषुववृत्तापासून प्रदेशाचें अंतर.

२ समुद्रापासून प्रदेशाचें अंतर. यांतच जलाशयाच्या सानिध्याचा समावेश होतो.

३ पर्वताचें सान्निध्य. यांतच जमिनीचा उंचवटपणा अगर सखलपणा येतो.

४ वाळूच्या मैदानाचें सान्निध्य.

५ समुद्रांतील प्रवाह.

६ पूर्व किनारा किंवा पश्चिम किनारा.

वरील गोष्टी ऋतूंचें नियमन करितात परंतु वरील गोष्टींनींही ऋतूंचें नियमन पूर्ण झालेलें अनुभवास येत नसल्यामुळें, ( पावसाळा नियमितपणें होत नसल्यामुळें ) ऋतूंचें नियमन आणखी कशानें तरी होत असावें असें अनुमान करण्यास जागा आहे.

आम्हीं पुष्कळ काळ म्हणजे सुमारें १८।१९ वर्षें शोध घेऊन असें ठरविलें आहे कीं, ऋतूंमध्यें अनुभवास येणारा अनियमितपणा ग्रहांमुळें उत्पन्न होतो. हा फरक हिंदुस्थानापुरता नसून सर्व जगावर त्याचा अम्मल आहे. ग्रहांचें अंतर, त्यांचें परप्रकाशत्व, व त्यांचे महत्त्व या गोष्टींचा विचार केला म्हणजे, ग्रहांमुळें हवेंत फेरफार घडेल अशी कल्पना होत नाहीं. व प्रत्यक्ष अनुभवही कोणास येत नाहीं. परंतु आम्हीं एका विशेष पद्धतीनें अनुभव घेण्याचें शोधून काढिल्यामुळें, प्रत्येक ग्रहापासून हवेवर कसा व केव्हां परिणाम घडतो याचा अनुभव घेतां आला आहे. ( हा अनुभव थोड्या वर्षांत येणारा नाहीं हें सांगावयास नको. ) ऋतूंचीं कारणें, भूरचनाविषयक गोष्टी यांवरून आणि ग्रहांच्या घेतलेल्या अनुभवांवरून पावसाचें व वायुप्रवाहाचें अनुमान करण्याची पद्धति तयार केली आहे. या पद्धतीनें तयार केलेलीं अनुमानें १९१३ सालापासून प्रसिद्ध केलीं आहेत. जीं अनुमानें चुकलीं त्यांचा उपयोग पद्धति सुधारण्याकडे केला आहे. अशा सुधारलेल्या पद्धतीनें सन १९१६ सालचें अनुमान केलें आहे.

चालू सालीं समुद्रकिनाऱ्याच्या वायुप्रवाहाचें अनुमान नवीन जोडलें आहे. पावसाचें अनुमान करितांना हे वारे पहावेच लागतात यामुळें पावसाचें अनुमान आणि वायुप्रवाह यांची एकवाक्यता आयतीच आहे. तरी समुद्रांत वापर करणारांनीं वायुप्रवाहाचें अनुमान कसें काय जमतें हें पाहून कळविल्यास त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी होऊं.



नियमित प्रदेशांत सुद्धां एकसारखा पाऊस पडत नाहीं तथापि थोड्याशा फरकानें पडणारा पाऊस एकसारखा मानिला तर पावसाळ्यासंबंधानें पश्चिम हिंदुस्थानचे ७ विभाग करितां येतात.

१ **कारवार पट्टा:**—कालिकतपासून कारवारपर्यंत समुद्र आणि सह्याद्रि यांच्या मधील प्रदेश. ह्यांत पाऊस बहुतेक सारखाच असतो व पावसाळा बरेच दिवस राहतो.

२ **रत्नागिरी पट्टा:**—गोव्यापासून वसईपर्यंत समुद्र आणि सह्याद्रि यांच्या मधील प्रदेश. यांत किनाऱ्यापेक्षां सह्याद्रीकडे पाऊस अधिक पडतो. तसाच वसईपेक्षां गोव्याकडे अधिक पडतो.

३ **बेळगांव पट्टा:**—ह्यांत धारवाड, बेळगांव, कोल्हापूर, सातारा, पुणें, नाशिक, मालेगांव असा सह्याद्रीचा पूर्व भाग येतो. यांत उत्तर बाजूकडे पाऊस कमी पडत जातो पण पूर्व बाजूकडे तो फारच कमी पडत जातो यांत पूर्व किनाऱ्याचाही थोडा पाऊस येतो.

४ **अहमदाबाद पट्टा:**—यांत सुरतेपासून कराचीपर्यंत प्रदेश येतो. यांत उत्तरेकडे सिंधप्रांतांत पाऊस फार कमी पडतो. पण प्रत्येक महिन्यांत थोडा थोडा पडतो. इतर भागांत उशीरा पावसाळा सुरू होऊन लवकर नाहींसा होतो.

५ **नागपूर पट्टा:**—अकोला, उमरावती, नागपूर, इंदूर, जबलपूर वगैरे प्रदेश यांत येतो. यांत ठिकठिकाणीं पाऊस कमी अधिक पडतो. इकडे पूर्व बाजूचाही पाऊस येतो.

६ **सोलापूर पट्टा:**—यांत सोलापूर, विजापूर, नगर हा प्रदेश येतो. यांत पाऊस कमी आहे. यांत पूर्वेकडील बरसातीच्या वेळींही पाऊस येतो.

७ **खुद्द सह्याद्रि:**—हा पुष्कळच लांब व कमी रुंद असा सह्याद्रीच्या माथ्यावरचा पट्टा आहे. यांत पाऊस फार व अनियमित पडतो. वास्तव या भागाचें अनुमान करण्याचें कारण नाहीं.

वरील खेरीज विशेष माहिती जून १९१३ च्या मराठी शिक्षकांत दिली आहे ती पहावी.

ल. अ.=लहान ढग. ढ. प.=ढग, पाऊस, चमक हीं सर्व किंवा कांहीं.

| तारीख पासून | तारीख पर्यंत | कारवार पट्टा | रत्नागिरी पट्टा | बेळगांव पट्टा | अहमदाबाद पट्टा | नागपूर पट्टा | सोलापूर पट्टा | अधिक जोराचा दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल १ | मे २८ | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ल. अ. | ल. अ. | ढ. प. | २२ मेपासून जोर. |
| मे २९ | जून ७ | १० | ८ | ३ | ढ. प. | १ | ढ. प. | ३।४ जून. |
| जून ८ | जून १३ | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | |
| जून १४ | जुलै २१ | ४० | ३५ | २० | १० | २० | १० | १४जून ते ४ जुलै. |
| जुलै २२ | आगस्ट ९ | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | पाऊस कमी. |
| आगस्ट १० | सप्टें. ३ | १५ | २० | १० | ८ | १२ | ५ | २१ ते २४ आगस्ट. |
| सप्टें. ४ | सप्टें. १० | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | सर्वत्र कमी. |
| सप्टें. ११ | सप्टें. १६ | ५ | ५ | २ | ० | ० | २ | सर्वत्र थोडा. |
| सप्टें. १७ | सप्टें. २९ | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | कमी. |
| सप्टें. ३० | आक्टो. ६ | ४ | ४ | २ | ढ. प. | ढ. प. | २ | सर्वत्र थोडा. |
| आक्टो. १२ | आक्टो. २२ | ढ. प. | ढ. प. | ढ. प. | ० | ० | ० | सह्याद्रीवर थोडा. |
| नवंबर | डिसें. | ० | ० | ० | ल. अ. | ० | ० | कराचीस मात्र. |

१. अपरील महिना ढगांनीं व्याप्त असेल. अपरील अखेर व मे तारीख ७ पर्यंत कांहीं थोडा पाऊस पडेल. समुद्र कांठीं केव्हां उत्तरणवारा तर कधीं दक्षिण वारा हलका असा वाहील. **तारीख २२ मे पासून वादळी हवा होईल.** मुंबई किनारा सुमारें १०।१२ जूनपर्यंत गलबतें जाण्या-



येण्यास दरसाल बहुधा सोईचा असतो. पण चालू सालीं **तारीख २६ मे पासून गैरसोईचा होईल,** समुद्र साधारण खवळेल.

२. तारीख २९ मे पासून पावसाळ्याला आरंभ होईल. तारीख ३।४ जून रोजीं पाऊस लागेल तो ७ जून पर्यंत असेल. हा काळ रोहिणीचे शेवटचे १० दिवस आहेत. वरील पाऊस सुरतेपर्यंत आहे. कारवार १० इंच, रत्नागिरी ८ इंच, बेळगांव ३ इंच, याप्रमाणें पाऊस पडेल.

३. तारीख ८ जून पासून १४ जून पर्यंत उन्हाळा आहे.

४. जून तारीख १४ पासून जुलई तारीख २१ पर्यंत खऱ्या पावसा-साळ्याचा काळ आहे. हा काळ मृग नक्षत्राच्या सातव्या दिवसापासून पुष्याच्या दुसऱ्या दिवसापर्यंत आहे. पावसास आरंभ फार बेतानें होईल. जून अखेरीस व जुलईच्या आरंभीं चांगला पडेल. जून ३० म्हणजे आर्द्रा नक्षत्राचा नववा दिवस होय. कारवार ४० इंच, रत्नागिरी ३५ इंच, बेळगांव २० इंच, अहमदाबाद १० इंच, नागपूर २० इंच, सोलापूर १० इंच या प्रमाणानें पडेल. विशेषत: जोर गुजराथ व नागपूर या प्रांतांत आहे. सोलापूर प्रांतांत कमी आहे, यांत जून अखेरीस कांहीं अधिक पडेल.

५. जुलई तारीख २२ पासून ९ आगष्ट पर्यंत पाऊस फारच कमी आहे, हा काल पुष्याचे तिसऱ्या दिवसापासन आश्लेषाचे पहिले ७ दिवसांचा आहे.

६. आगष्ट तारीख १० पासून सपटंबर तारीख ३ पर्यंत खरा पावसाळा आहे. यांत पाऊस चांगला पडेल. हा आश्लेषाच्या ८ व्या दिवसापासून पूर्वाचे पहिले ४ दिवसांचा आहे. कारवार २५ इंच, रत्नागिरी २० इंच, बेळगांव ७ इंच, अहमदाबाद ५ इंच, नागपूर १० इंच, सोलापूर ६ इंच या मानानें पाऊस पडेल. याचा जोर विशेषत: रत्नागिरी पट्टा, बेळगांव पट्टा व नागपूर पट्टा यांत आहे, बाकीच्या पट्टयांत बेताचा आहे.

७. सपटंबर ४ तारखेपासून सपटंबर १० तारखेपर्यंत पाऊस थोडा आहे. हा काळ पूर्वाचे नक्षत्राचा आहे.

८. सपटंबर ११ पासून १६ सपटंबर पर्यंत थोडा पावसाळा आहे. हा काळ पूर्वाचे शेवटचे ३ व उत्तराचे पहिले ३ दिवस यांचा आहे. कारवार ५ इंच, रत्नागिरी ५ इंच, बेळगांव पट्टा, दक्षिण भाग कोल्हापुरापर्यंत २ इंच या मानानें पडेल. इतरत्र अभ्रें. यांत समुद्र थोडा खवळेल.

९. सपटंबर १७ पासून २९ सपटंबरपर्यंत फार कमी पाऊस आहे. हा काळ उत्तराचे शेवटचे ११ दिवस व हस्ताचे पहिले दोन यांचा आहे.

१०. सपटंबर तारीख ३० पासून अक्टोबर तारीख ६ पर्यंत थोडासा पावसाळा आहे यांत समुद्र खवळणार नाहीं. हा काळ हस्त नक्षत्राचा आहे. कारवार ४ इंच, रत्नागिरी २ इंच, बेळगांव १ इंच असा पाऊस पडेल. इतरत्र ढग, वारा पाऊस बेताचा. या मानानें पाऊस पडेल.

११. अकटोबर तारीख १२ पासून १० दिवसांत खुद्द सह्याद्रि, बेळगांव, सोलापूर या पट्टयांत किरकोळ वृष्टि होईल.

१२. नवंबर, दिजंबर या महिन्यांत विशेष पावसाच्या गोष्टी नाहींत. थंडीचा जोर होईल. पूर्व किनाऱ्याची सोलापुराकडे कांहीं तुरळक वृष्टि होईल.

**टीपः**—अनुमान १ च्या खुलाशांत तारीख २२ मेपासून वादळी हवा होईल ही गोष्ट विशेष महत्वाची आहे ती अशी:—

( अ ) तारीख २२ मे पासून नुसता हलका दक्षिण वारा सुटला ( उदाहरणार्थ सन १८९६ तारीख २६ मे ) तर पुस्तकांत एकंदर अनुमान केल्याप्रमाणें स्थिति घडून येईल.



( आ ) तारीख २२ मेपासून हलका दक्षिण वारा सुटत राहिला ( उदाहरणार्थ सन १८८३ मे तारीख २० ते २९ ) तर अनुमान तीनचाही पाऊस पडेल व अनुमान चारचा जून अखेरचा पाऊस थोडा कमी होऊन १२ जुलई पासून वाढेल. हें होण्याचा कदाचित् संभव आहे.

( इ ) तारीख २२ मेपासून २६ मेपर्यंत समुद्र खवळून पावसाळा बनला ( उदाहरणार्थ सन १९०२ मे १९ ते २६ ) तर अनुमान २।३ चा पाऊस न पडतां अनुमान ४ पासूनचा पाऊस पडेल. एकंदर पावसाळा बरा आहे. तो चांगला होईल. जुलई तारीख १२ पासून पाऊस अधिक पडेल. जुलई अखेरपर्यंत पाऊस असेल. ढगांच्या मार्गाच्या आजूबाजूच्या दूरवरच्या प्रदेशांत पाऊस कमी पडेल असें अनुमानांत आहे, तसें होतां तो पाऊस बरा पडेल. इतका फरक होईल पण हें होणें जवळ जवळ अशक्य आहे. याबद्दलचें जास्त विवेचन पुढील अंकीं देऊं.

## सन १९१६ च्या पावसाळ्यांतील विशेष गोष्टी.

१. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च महांत ढग, वारा, पाऊस ह्यांपैकीं गोष्टी होणार नाहींत.

२. अपरील महिना ढगांनीं व्याप्त असेल. तारीख २२ मेपासून वादळाचीं चिन्हें होऊं लागतील. तारीख २८ मे रोजीं वादळ होईल. पण समुद्र फार खवळणार नाहीं.

३. तारीख २९ मेपासून खऱ्या पावसाळ्यास सुरवात होईल. तारीख ३।४ जून रोजीं पाऊस चांगला पडेल व तो तारीख ७ जून पर्यंत असेल

४. जुलई अखेर व आगष्ट आरंभीं पाऊस फारच कमी आहे.

५. सपटंबर तारीख ११ पासून १६ पर्यंत पाऊस थोडासा अधिक आहे. सपटंबरच्या इतर दिवशीं पाऊस कमी आहे.

६. सपटंबर ३० पासून अक्टोबर ६ पर्यंत थोडासा पाऊस आहे. इतर वेळीं सह्याद्रि पट्ट्यास मात्र आहे.

७. नवंबर व दिजंबर महांत बहुतेक पाऊस नाहींच म्हटलें तरी चालेल. तथापि दिजंबर महांत पूर्वेचा कांहीं थोडा पाऊस लागेल.

## ढगांचा प्रवाह.

१. तारीख १ मे पासून तारीख १४ जून पर्यंत ढगांचा प्रवाह कोची, निजाम हैद्राबाद यांवरून उत्तरेकडे जातो. हा मार्ग १५ मे रोजीं पुरा होतो व जून आरंभीं हा प्रवाह कमजोर होऊन त्याचा रोंख मुंबईकडे वळतो.

२. जून १५ पासून आगस्ट ९ पर्यंत ढगांचा प्रवाह कोची, रत्नागिरी, मुंबई, खंबायत यांवरून जबलपुराकडे जातो. जून अखेर हा प्रवाह कमजोर होतो.

३. आगस्ट १० पासून अक्टोबर ६ पर्यंत ढगांचा प्रवाह कोची, रत्नागिरी, मुंबई यांवरून जबलपुराकडे जातो हा प्रवाह आगस्ट २० रोजीं पुरा होतो व सपटंबर अखेर कमजोर होतो.

**टीपः**—वरील मार्गाच्या प्रदेशांत त्या त्या कालांत पाऊस बरा आहे. पण आजबाजूच्या दूरवरच्या प्रदेशांत कमी आहे. त्यांत उजव्या अंगापेक्षां डाव्या अंगास कमी आहे. या धोरणानें एकंदर पावसाचें अनुमान आहे.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. | जून १९१६. | अंक ३ रा.

## जन्मकुंडलीचे बलाबलासंबंधीं विचार.

( लेखक.—श्रीयुत दाजी नागेश आपटे, बी. ए. एल एल. बी.—बडोदें )

सर्व शास्त्रांत निश्चितपणा गणितशास्त्रांत अधिक आहे. गणितांतील कोणत्याहि संख्येच्या निश्चिततेची नक्की कल्पना जशी आपणास येते तशी इतर कोणत्याहि शास्त्रांतील प्रमेयांची येत नाहीं. फलज्योतिषांत कोणत्याहि मनुष्याच्या जन्मकालच्या कुंडलीवरून त्याला द्वादश भाव संबंधीं सुखदुःख कसें मिळेल हें पाहतां येतें हें खरें आहे. परंतु एकंदर कुंडलीचा समग्र विचार करितां ती कुंडली देश काल इत्यादींच्या धोरणानें काय दर्जाची आहे हें नक्की सांगतां येणें कठिण जातें. चांगली आहे, वाईट आहे, मध्यम आहे, अशा मोघम शब्दांनीं चित्ताचें व्हावें तसें समाधान होत नाहीं याचें कारण या मोघम शब्दांत निश्चितता अथवा नक्कीपणा नसतो. तसेंच कोणत्याहि दोन कुंडल्या घेतल्या तर त्यांत चांगली व वाईट ओळ-

खतां आली तरी ती किती पटीनें चांगली अथवा वाईट आहे हें सांगतां येत नाहीं. त्यामुळें त्याविषयींची कल्पना अपूर्ण व असमाधानकारक राहते. ही अनिश्चितता काढून जर दरेक कुंडलींतील ग्रहस्थितीवरून तिला कांहीं ठराविक गुण अथवा मार्क देतां येतील तर फलज्योतिष जास्त निश्चयाच्या कोटीवर नेतां येईल. आर्य पद्धतींत ग्रहांचें बलाबल ठरविण्यासाठीं काढिलेली दशवर्ग पद्धति ही ग्रहांना गणिती निश्चितता आणण्याचाच एक प्रयत्न होय. परंतु त्यावरून सबंध कुंडलीची समग्र योग्यता गणित संख्येनें निश्चित होऊं शकत नाहीं. तसें करण्याचें एक उत्तम साधन कांहीं दिवसांपूर्वी फलज्योतिषावरील एका इंग्रजी मासिकांत आढळून आलें. त्यांत दरेक ग्रहास तो असलेल्या राशीच्या मानानें प्रथम कांहीं मार्क दिलेले असतात व नंतर त्यांच्या कुंडलींतील स्थानावरून कांहीं मार्क दिलेले असतात, त्या दोहोंची बेरीज करून दरेक ग्रहाचें संख्यात्मक बलाबल नक्की करितां येतें. अशा रीतीनें साती ग्रहांचें बलाबल एकत्र करून जी बेरीज येईल ती कुंडलीची संख्यात्मक योग्यता होते, अर्थात् एकंदर मार्कांच्या प्रमाणानें दरेक कुंडलीस जसजसे कमी अधिक मार्क मिळतील तसतशी त्या प्रमाणांत तिची योग्यता कमी अधिक ठरते.

यासाठीं प्रथम मार्कांचें कोष्टक दिलें पाहिजे. तें खालीलप्रमाणें आहे.

**प्रथमार्ध**

| | र. | चं. | मं. | बु. | गु. | शु. | श. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मेष | ६६ | २८ | २४ | ९ | २१ | १५ | ३ |
| वृषभ | ३० | ४४ | ४ | २१ | २८ | ५५ | ५ |
| मिथुन | ५४ | २४ | १२ | ३३ | ४२ | ४० | ७ |
| कर्क | २४ | ४८ | २ | १२ | ७७ | २५ | २ |
| सिंह | ७२ | २० | १८ | १८ | ६३ | ३५ | ४ |
| कन्या | ४२ | ३२ | १० | ३६ | ७ | २० | ६ |
| तूळ | १८ | ४० | ८ | २४ | ५६ | ६० | ११ |
| वृश्चिक | ४८ | ८ | २० | ६ | ३५ | १० | १ |
| धनु | ६० | ३६ | १६ | २७ | ८४ | ४५ | ८ |
| मकर | ६ | ४ | ३२ | ३ | १४ | ५ | १० |
| कुंभ | १२ | १६ | ६ | ३० | ४९ | ३० | १२ |
| मीन | ३६ | १२ | १४ | १५ | ७० | ५० | ९ |



**द्वितीयार्ध**

| स्थान | र. | चं. | मं. | बु. | गु. | शु. | श. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १,१०,११ | ७२ | ४८ | २४ | ३६ | ८४ | ६० | १२ | चर राशी |
| ४,७,९ | ५४ | ३६ | १८ | २७ | ६३ | ४५ | ९ | |
| २,५–१२ | ३६ | २४ | १२ | १८ | ४२ | ३० | ६ | |
| ३–६–८ | १८ | १२ | ६ | ९ | २१ | १५ | ३ | |
| १, १०–११ | ६६ | ४४ | २२ | ३३ | ७७ | ५५ | ११ | स्थिर राशी |
| ४–७–९ | ४८ | ३२ | १६ | २४ | ५६ | ४० | ८ | |
| २–५–१२ | ३० | २० | १० | १५ | ३५ | २५ | ५ | |
| ३–६–८ | १२ | ८ | ४ | ६ | १४ | १० | २ | |
| १,१०–११ | ६० | ४० | २० | ३० | ७० | ५० | १० | द्विस्वभाव राशी |
| ४–७–९ | ४२ | २८ | १४ | २१ | ४९ | ३५ | ७ | |
| २–५–१२ | २४ | १६ | ८ | १२ | २८ | २० | ४ | |
| ३–६–८ | ६ | ४ | २ | ३ | ७ | ५ | १ | |

कोष्टकाच्या प्रथमार्धात दरेक ग्रहाच्या राशिमानाप्रमाणें त्याला मार्क दिलेले आहेत ते अर्थातच ग्रहांच्या उच्चनीच, स्वगृह, शत्रुगृह, इत्यादि स्थितींवर दिलेले आहेत. सर्वांत कमी मार्कांच्या बारापट सर्वांत जास्त असतात व मध्यंतरीचे मार्क कमी अधिक पटीनें असतात, पण आडनीड नसतात. कोणत्याहि कुंडलींतील दरेक ग्रहाला या कोष्टकाप्रमाणें मार्क द्यावे. उदाहरणार्थ कुंडलींत धनेचा गुरु असेल तर त्यास ८४ मार्क द्यावे, वृश्चिकेचा बुध असेल तर ६ मार्क द्यावे. इत्यादि.

यानंतर कोष्टकाच्या द्वितीयार्धाचा विचार करूं. याची मांडणी दोन निराळ्या तत्त्वांच्या संयुक्त मिश्रणानें केली आहे. कुंडलींतील बारा स्थानांचे मिळून तीन वर्ग केलेले आहेत. कोणताहि ग्रह प्रथम, एकादश व दशम या स्थानांत असतां अत्यंत बली असतो म्हणून या तीन स्थानांचा मिळून एक वर्ग केला आहे. या वर्गाच्या खालोखालचा वर्ग चतुर्थस्थान, सप्तमस्थान (हीं दोन्हीं केंद्रस्थानें असल्यानें ) व नवम (भाग्यस्थान असल्यामुळें ) या

स्थानांचा मिळून बनतो. तिसऱ्या वर्गात, द्वितीय, पंचम व द्वादश ( हें उदयसंनिध स्थान असल्यामुळें ) या स्थानांचा होतो व शेवटचा वर्ग तृतीय, षष्ठ व द्वादश या स्थानांचा मिळून होतो. महत्त्वाच्या मानानेंहि हे वर्ग खरोखर एका पेक्षां एक कमी महत्त्वाचे असेच आहेत. कदाचित् एके ठिकाणींच फरक करावासा वाटेल. आपल्या आर्य पद्धतीप्रमाणें 'रिपुरंध्ररि:फ' अथवा षष्ठाष्टमव्यय हीं स्थानें सर्वांत वाईट समजलीं जातात. तेव्हां या तीहींचा मिळून शेवटचा वर्ग करावा व तृतीय स्थानास तिसऱ्या वर्गांत घालावें. आमच्या मतानें ही योजनाच अधिक सयुक्तिक आहे. आम्ही वर दिलेलें कोष्टक मूळ इंग्रजीच्या आधारें दिलें आहे.

वरील एका तत्त्वाप्रमाणेंच दुसरें तत्त्व असें आहे कीं बाराहि राशींचे चर, स्थिर व द्विस्वभाव असे तीन वर्ग केलेले आहेत. हें वर्गीकरण प्राचीन आहे. कुंडलींतील ग्रह या तीन वर्गांच्या अनुक्रमानेंच बली असतात. म्हणजे चर अवस्थेंत सर्वांत अधिक बली, त्यापेक्षां कमी स्थिर अवस्थेंत व सर्वांत कमी द्विस्वभाव स्थितींत. मेष, कर्क, तुला व मकर या चर राशी आहेत, वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ या स्थिर व मिथुन, कन्या, धनु व मीन या द्विस्वभाव राशी होत.

या दोन तत्त्वांचें एकीकरण करून वरील कोष्टकाचा द्वितीयार्ध बनविलेला आहे. अशी कल्पना करूं कीं एखाद्याच्या कुंडलींत दशमांत मेषेचा रवि आहे. तर या द्वितीयार्धांत प्रथम मेष ही चर राशि असल्यामुळें द्वितीयार्धाचा जो प्रथम भाग चर राशीचा आहे त्यांत पाहिलें पाहिजे. त्यांत दशमांतील रवीला ७२ मार्क दिले आहेत. ते घ्यावे व कोष्टकाच्या प्रथमार्धांतील मेषेच्या रवीला जे ६६ मार्क मिळतात त्यांत मिळवावे. दोहोंची बेरीज मिळून १३८ आली हें कुंडलींतील रवीचें बळ झालें.

दुसरें उदाहरण असें घेऊं कीं एखाद्याच्या कुंडलींत षष्ठ स्थानांत वृश्चि-



केचा शनि आहे. प्रथमार्धांत वृश्चिकेच्या शनीस १ मार्क दिला आहे. नंतर द्वितीयार्धांत पाहतां वृश्चिक ही स्थिर राशी असल्यामुळें स्थिर राशींच्या भागांत षष्ठांतील शनीस २ मार्क दिलेले आहेत. या दोन आंकड्यांची बेरीज मिळून ३ मार्क झाले. हे शनीचे बलदर्शक गुण झाले.

अशा रीतीनें रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र व शनि यांचें बल काढून त्या सर्वांची बेरीज करावी. ती सबंध कुंडलीची बलसंख्या झाली.

एकंदर कोष्टकांतील जास्तींत जास्त मार्कांची बेरीज ६५० होते. अर्थात त्याच्या प्रमाणानें कुंडलीच्या एकंदर मार्कांचें प्रमाण काय बसतें तें पाहावें म्हणजे निश्चित कल्पना येते. एकंदर ६५० मार्कांत जर कुंडलीला इतके मार्क मिळाले तर शंभरास किती अशी शेंकडा टक्केवारी काढावी म्हणजे सूक्ष्म प्रमाण मिळेल.

या कोष्टकांतील प्रथमार्धांत ग्रहांच्या मार्कांची योजना कशी केली आहे तें सुद्धां पाहण्यासारखें आहे. सर्वांत वाईट पापग्रह घेतला तरी त्यांत सुद्धां थोडें तरी शुभ घडवून आणण्याची शक्ति असतेच म्हणून सर्वांत अधिक पापग्रह जो शनि त्यास जर एक मार्क दिला तर त्याच्या खालोखाल पापग्रह मंगळ यास दोन मार्क दिले. पुढें बुध हा मध्यम ग्रह म्हणून त्यास तीन, नंतर चंद्रास ४, पुढें शुभग्रहांत न्यूनबल शुक्र त्यास ५, नंतर आत्मदर्शक रवीस ६ व अखेर शुभतम ग्रह जो गुरु त्यास ७ मार्क या प्रमाणांत मार्कांची जुळणी केली आहे. उदाहरणार्थ सर्वांत अधिक बली स्थितींत शनीस कुंभ राशींत १२ मार्क मिळतात तर सर्वांत अधिक बली स्थितींत गुरूस धनु राशींत ८४ मार्क म्हणजे वरील प्रमाणांत दाखविल्याप्रमाणें शनीच्या सातपट मार्क मिळतात. अशा रीतीनें दरेक ग्रहाच्या शुभकारी शक्तीची बेरीज संख्यारूपानें या पद्धतींत मिळते.

अर्थातच या पद्धतींत ग्रहाला उणे मार्क नसतातच. म्हणून शेंकडा ५०

टक्के मार्क ज्या कुंडलीस मिळतात ती कुंडली मध्यम स्थितींतील सुखी मनुष्याची होय. या पेक्षां ज्या प्रमाणानें कुंडलीस अधिक मार्क मिळतील तितकी ती अधिक बलवान् व कमी मार्क मिळाल्यास कमी बलवान् समजावी.

या सर्वांत मुख्य गोष्ट ही ध्यानांत ठेवावयाची आहे कीं या मार्कांवरून कुंडलीची ठरणारी योग्यता साधारणतः मनुष्याची समाजांतील योग्यता, द्रव्यप्राप्ति, मानकीर्ति व आयुर्मर्यादा एवढ्याच्याच धोरणानें केलेली असते, कोणताही विशेष योग त्यांत दिसणार नाहीं. एखाद्या पुरुषास पंचमहाराज योगांपैकीं एखादा योग असेल तर त्यामुळें तो हीन स्थितींतूनहि राजपद पावेल पण त्यास आधार वरील कोष्टकांत मिळणार नाहीं. तो साधारणतः वरच्या दरज्याचे मार्क मिळवील इतकेंच, याच प्रमाणें अलौकिक कीर्ती, अपूर्व योगसाधन, एखादें विशिष्ट विद्यासाधन वगैरे योगांचा बोध या पद्धतीवरून होणार नाहीं. व्यवहारांत ज्या स्थूल भौतिक दृष्टीनें मनुष्याची कमी अधिक योग्यता आपण ठरवितों तेवढीच दृष्टि या पद्धतीनें उपलब्ध होते.

समग्र कुंडलीची संख्यात्मक योग्यता ज्याप्रमाणें या पद्धतीनें उत्तम समजते त्याचप्रमाणें दरेक ग्रहाचें बलाबलहि समजतें. कोणत्याही दोन कुंडल्या तपासून पाहिल्या तर त्यांमध्यें जो ग्रह वरील पद्धतीनें एकींत अधिक बली ठरेल, त्या ग्रहाच्या गुणाचा उत्कर्ष, अथवा त्या ग्रहानें दर्शित वस्तूंचा लाभ त्या कुंडलीवाल्या गृहस्थास अधिक होईल असेंहि नक्की समजतें. या कामीं पूर्वाचार्यांनीं ग्रहांचे जे गुण नक्की केले आहेत तेच घ्यावयाचे आहेत. रवि हा आयुष्य, अधिकार, राजवैभव, औदार्य वगैरे दर्शवितो. चंद्र, हा निरोगीपणा, चित्ताची स्थिति, मातृसुख, लोकप्रीती, वगैरे दर्शवितो. बुध, हा बुद्धि, विद्या, व्यापार, वक्तृत्व, मातुलगृह वगैरेंचा बोधक आहे. मंगळ हा शौर्य, पराक्रम, क्रूरता, अधिकार, शारीरिक शक्ति, आघात वगैरे




सुचवितो. गुरु हा सत्त्वगुण, धार्मिक उन्नति, चित्तस्थैर्य व ऐश्वर्याचा उत्कर्ष दाखवितो. शुक्रावरून सौंदर्य, स्त्रीसौख्य, ललितकलाध्ययन, रत्नसंग्रह वगैरे पाहतात व शनि हा सेवाधर्म, दुःख, कष्ट, व्याधि, संकटें वगैरेंचा द्योतक होतो. या गुणधर्मांप्रमाणें दरेक ग्रहाच्या बलावरून विचार करावा.

या पद्धतींत हर्शेल व नेपच्यून यांनां मार्क दिलेले नाहींत, अनुभवानें यांचा संग्रह करून वरील कोष्टकांत सुधारणा करितां येईल.

अखेर एका कुंडलीचें बल या पद्धतीनें ठरविण्याचें एक उदाहरण दाखवून हा लेख पूर्ण करूं.

सा. ल.




यांतील मार्क खालील प्रमाणें येतात.

मार्क

| ग्रह | प्रथमार्ध | | द्वितीयार्ध | बेरीज |
|---|---|---|---|---|
| रवि | ६६ | + | ५४ = | १२० |
| चंद्र | ४ | + | ४८ = | ५२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मंगळ | १६ | + | ८ | = | २४ |
| बुद्ध | १५ | + | ३ | = | १८ |
| गुरु | ५६ | + | ८४ | = | १४० |
| शुक्र | ३० | + | २५ | = | ५५ |
| शनि | १२ | + | ५ | = | १७ |
| | | | | | ४२६ |

६५० : १०० :: ४२६ = ६५ $\frac{७}{१३}$

म्हणजे या गृहस्थांना शेंकडा ६५ $\frac{७}{१३}$ टक्के मार्क मिळाले शेंकडा ५० टक्के मिळविणाऱ्या मनुष्याची स्थिति मध्यम सुखी म्हणजे हल्लींच्या काळांत शें दीडशें रुपये दरमहा मिळणाऱ्या इतकी असें मानिलें म्हणजे त्यावरून ६५ $\frac{७}{१३}$ टक्के मिळविणारी कुंडली काय योग्यतेची असावी हें प्रमाण ज्याचें त्यानें बसवावें.

वस्तुस्थिती अशी आहे कीं वरील गृहस्थ सरकारी वकील असून यांची दरमहा प्राप्ति जवळ जवळ नऊशें, हजार रुपये आहे. मानसन्मानहि चांगला आहे.

या नवीन पद्धतीचा दरेकानें अनुभव घ्यावा अशी शिफारस आहे. वरील कुंडलींत सर्वत्र सायन राशीच ग्रहण केल्या आहेत.



# नाक्षत्र गोचरी.

भविष्यकाळनिर्णय करण्याच्या ज्या अनेक पद्धति उपलब्ध झालेल्या आहेत त्या सर्वांत गोचर ग्रहानें भावी सुखदुःखांचा काळ जाणण्याची पद्धति फारच सोपी असून फार प्राचीन काळापासून आपल्यामध्यें रूढ आहे. जन्मलग्न अगर जन्मकाळचा चंद्र यांपासून चालू ग्रह कितव्या राशीवर आपल्या दैनंदिन भ्रमणानें आले आहेत हें पाहून त्याप्रमाणें शुभाशुभ फळाची कल्पना गोचरीमध्यें करितात. काळ निर्णय करण्याची कोणतीही पद्धति घेतली असतां ती अपुरी भासते. व तिच्या जोडीला गोचर ग्रहांच्या भ्रमणांची जोड अवश्य घ्यावी लागते. असें आहे तरी ही पद्धति इतर कांहीं पद्धतींप्रमाणें भविष्यकाळनिर्णय स्वतंत्र रीतीनें करण्याचे कामीं अपुरी आहे. हल्लीं प्रचारांत असलेली गोचर ग्रह पाहण्याची पद्धति व पूर्व ग्रंथांत वर्णन केलेली गोचर पद्धति यांत बराच भेद आहे. गोचर ग्रहांसंबंधानें सविस्तर विवेचन आम्हीं आमच्या '**बालबोध ज्योतिष**' नांवाच्या लहानशा पुस्तकांत केलें आहे तें पहावें.

भारतीय आर्यांची ज्योतिषपद्धति नक्षत्रात्मक होती. हल्लींप्रमाणें ती राश्यात्मक नव्हती असें महाभारतावरून दिसतें. कालांतरानें इतर राष्ट्रांबरोबर संबंध आल्याकारणानें नाक्षत्रात्मक गणना सुटून राश्यात्मक झाली असें अथर्ववेदांतील ज्योतिषभागावरून दिसतें. यांत नाक्षत्र पद्धतीचें वर्णन आलें आहे त्याचेंच रूपांतर हल्लींची राश्यात्मक गोचरी होय. अथर्वज्योतिषांत वर्णन केलेला नाक्षत्र पद्धतीचा विभाग फारच महत्त्वाचा असून त्याकडे अद्याप पावेतों महाराष्ट्रांतील ज्योतिर्विदांचे लक्ष्य गेलेलें दिसत नाहीं. करितां चालू लेखांत ह्या **नाक्षत्र गोचरीचें** सविस्तर विवेचन करण्याचें योजिलें आहे.

अथर्वज्योतिषांत एकंदर १६२ श्लोक आहेत व यांत १४ प्रकरणें आहेत. हें पितामहानें काश्यपास सांगितलें आहे. यांतील शेवटच्या ६२ श्लोकांत ज्योतिषशास्त्राच्या जातक विभागाबद्दल माहिती दिली आहे.

हा विभाग फार प्राचीन असून फार महत्त्वाचा आहे. एकंदर सत्तावीस नक्षत्रांचे नऊ नऊ नक्षत्रांचा एक असे तीन वर्ग करून जन्मनक्षत्रापासून दरएक नक्षत्रास निरनिराळें नामाभिधान खालीलप्रमाणें केलें आहे.

जन्म संपद्विपत्क्षेम्यः प्रत्वरः साधकस्तथा ॥
नैधनो मित्रवर्गश्च परमो मैत्र एव च ।
दशमं जन्मनक्षत्रात्कर्मनक्षत्रमुच्यते ।
एकोनविंशतिं चैव गर्भाधानकमुच्यते ॥
द्वितीयमेकादशं विंशमेष संपत्करो गणः ।
तृतीयमेकविंशं तु द्वादशं तु विपत्करम् ॥
क्षेम्यं चतुर्थं द्वाविंशं तथायच त्रयोदशम् ।
साधकं तु चतुर्विंशं षष्ठं पंचदशं च यत् ।
नैधनं पंचविंशं तु षोडशं सप्तमं तथा ॥
मैत्रे सप्तदशं विद्यात्षड्विंशमितिचाष्टमं ।
सप्तविंशं परं मैत्रं नवषष्ठादशंच यत् ॥

वर्गक्रम

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) | १ जन्मनक्षत्र. | १० कर्मनक्षत्र. | १९ आधाननक्षत्र. |
| ( २ ) | २ | ११ | २० संपत्कर नक्षत्रें |
| ( ३ ) | ३ | १२ | २१ विपत्कर |
| ( ४ ) | ४ | १३ | २२ क्षेम्य |
| ( ५ ) | ५ | १४ | २३ प्रत्वर |
| ( ६ ) | ६ | १५ | २४ साधक |
| ( ७ ) | ७ | १६ | २५ नैधन |
| ( ८ ) | ८ | १७ | २६ मैत्र |
| ( ९ ) | ९ | १८ | २७ परममैत्र |

ह्याप्रमाणें वर्गीकरण करितां २७ नक्षत्रांमध्यें तीन तीन नक्षत्रें समानधर्माचीं आढळतात. जन्मकालीन चंद्र ज्या नक्षत्रांत असतो त्यांस



**जन्मनक्षत्र** म्हणतात. ह्या नक्षत्रापासूनच्या दुसऱ्या नक्षत्रास **संपत्** इत्यादिप्रमाणें नांवें आहेत. व हे नक्षत्रात्मविभाग आपल्या नांवांप्रमाणें शुभाशुभ मानिले आहेत. ही नक्षत्रांची मोजणी जन्मकाळीं चंद्र ज्या नक्षत्रामध्यें आहे त्यापासून करावी किंवा जन्मलग्न ज्या नक्षत्रांत आहे तेथपासून करावी ह्याबद्दल स्पष्ट उल्लेख कोठें केलेला आढळत नाहीं. फक्त जन्मचंद्र ज्या नक्षत्रांत असतो तेथून गणना करण्याचा प्रघात आहे. आमच्या मतें जन्मलग्न व जन्मचंद्र हे दोन्ही ज्या ज्या नक्षत्रांत असतील त्या त्या अनुरोधानें प्रथमतः कुंडलींतील कोणकोणते विभाग शुभाशुभ आहेत हें ठरवावें नंतर जे विभाग जन्म व चंद्र ह्या दोहोंवरून शुभ ठरतील ते खात्रीपूर्वक शुभ फलें देणारे मानावे व अशुभ फल देणारे असतील त्यांचीं अशुभ फलें विशेष स्पष्टपणें पाहण्यास मिळतील. बाकीच्यांचीं फलें तारतम्य भावानें घ्यावीं.

याच पद्धतीवर हल्लींची प्रचारांतील राश्यात्मक गोचरी आलेली आहे असें जरा सूक्ष्मतेनें पाहिलें असतां आपणांस सहज कळेल. ग्रह जेव्हां ६ वा, ८ वा किंवा १२ वा येतो त्या वेळीं अशुभ मानतात. जन्मलग्नापासून किंवा जन्मचंद्रापासून ६ व्या राशीच्या आरंभीं **विपत्** नक्षत्र येतें. आठव्या राशीच्या आरंभीं **नैधन** नक्षत्र येतें व बाराव्या राशीच्या आरंभीं २५ वें म्हणजे **नैधन** नक्षत्र येतें हीं सर्व नक्षत्रें अशुभ फलें दर्शविणारीं आहेत. ह्याचे उलट जन्मलग्नापासून ५ वे किंवा ९ वे ग्रह शुभ मानितात. यांचे आरंभीं **जन्म** अगर **कर्म** नक्षत्रें येतात. वरील सर्व विवेचनावरून पाहतां ही **अथर्वज्योतिषांत** वर्णन केलेली नाक्षत्र पद्धति राशिपद्धतीपेक्षां अधिक सूक्ष्म व महत्त्वाची आहे. राशि हा ३० अंशांचा क्रांतिवृत्ताचा भाग आहे व नक्षत्र हा १३ अं. २० क. चा भाग आहे. म्हणजे एका राशींत सव्वादोन नक्षत्रें येतात. अर्थात् क्रांतिवृत्ताचा नक्षत्रविभाग हा राशिविभागापेक्षां जास्त सूक्ष्मतर भाग असल्यामुळें फलादेशांतही त्या मानानें अधिक सूक्ष्मता येते. आज आपणास फलांत जितकी सूक्ष्मता अधिक येईल तेवढी पाहिजे आहे करितां या पद्धतीचा जास्त प्रसार होणें अधिक श्रेयस्कर आहे.

ह्या वर्णन केलेल्या नाक्षत्रात्मक पद्धतीच्या योगानें जन्मकुंडलींतील जन्मकालीन ग्रह कसे आहेत याबद्दल चांगली अटकळ बांधतां येते व ते ते ग्रह आपल्या परिभ्रमणकाळानें किंवा आपल्या दैनंदिनभ्रमणानें कोणत्या प्रकारचीं शुभाशुभ फळें प्राप्त होतील याबद्दल अचुक निदान करितां येतें. उदाहरणार्थ जन्मकुंडलींत चंद्र व गुरु हे संपत नक्षत्रांत असतां गुरु ज्या ज्या वेळीं संपत् किंवा दुसऱ्या शुभ नक्षत्रांत गोचरीनें येतो त्या वेळीं सांपत्तिक स्थिति सुधारतो, धंदा रोजगार उत्तम चालतो. ह्याचे उलट ज्या ज्या वेळीं विपत् किंवा नैधन नक्षत्रांत शनि, मंगळ व हर्शल यांचीं भ्रमणें होत असून जन्मकालीन रवि किंवा चंद्र पीडित होतात त्या त्या वेळीं आजार, संकटें, अपघात किंवा मृत्यु प्राप्त होतो. **संपत्** नक्षत्रांतील शुभ ग्रहाचे योग सांपत्तिक लाभ दर्शवितात. **विपत्** नक्षत्रांत होणारे अशुभ किंवा क्रूर ग्रहांचे योग अनेक संकटें व आपदा दर्शवितात. **क्षेम** नक्षत्रांत शुभ ग्रहांच्या भ्रमणांचीं शुभ फळें पाहण्यास मिळतील. **प्रत्वर** किंवा ह्यासच कित्येक ग्रंथकार **अरि** नक्षत्रें म्हणतात ह्यांत होत असलेले पापग्रहांचे योग शत्रुत्व व भांडणतंटे दर्शवितात. **सिद्धक** किंवा साधक नक्षत्रांत शुभ ग्रहांचे योग सर्व कार्यांत यश दर्शवितात. **नैधन** किंवा **बद्ध** नक्षत्रांत होत असलेलीं **क्रूर** ग्रहांचीं भ्रमणें शारीरिक व मानसिक दौर्बल्य दर्शवितात. **मैत्र** व **परममैत्र** हे नक्षत्रविभाग शुभ असून ह्यांमधून होत असलेलीं शुभ ग्रहांचीं भ्रमणें, नवीन मित्रत्व होणें, मित्रापासून लाभ, मदत व यश दर्शवितात. असो, येथपर्यंत मालेच्या वाचकांस ह्या नाक्षत्रात्मविभागासंबंधीं इतर संस्कृत ज्योतिष वाङ्मयांत आमच्या आढळण्यांत जी इतर माहिती आली आहे ती देऊन हा बराच लांबलेला विषय पुरा करण्याचा विचार आहे.

## जन्मकर्मादि नक्षत्रप्रकरणम्

**जन्मभं कर्म आधानं विनाशं सामुदायकम् ।**
**संघातिकमिदं धिष्ण्यं षट्कं सर्वजनीनकम् ॥ १ ॥**



**ज्ञातिदेशाभिषेकैश्च नवधिष्णानि भूपतेः ।**
***वेधं ज्ञात्वा फलं ब्रूहि क्रूरे हानिं शुभे शुभम् ॥ २ ॥**

जन्म, कर्म, आधान, विनाश, सामुदायिक व संघातिक ह्या सहा नक्षत्रांचा उपयोग साधारण माणसाबद्दल शुभाशुभ विचार करतेवेळीं करितात परंतु राजेलोकांबद्दल विचार करतेवेळीं पूर्वीं सांगितलेलीं सहा नक्षत्रें व ज्ञाति, देश व अभिषेक मिळून नऊ नक्षत्रें विचारांत घ्यावी लागतात. व ह्या नक्षत्रांस ज्याप्रमाणें वेध होतात त्याप्रमाणें फलादेश जाणावा. क्रूर ग्रहांचा वेध होत असतां अशुभ फळें व शुभ ग्रहांचा वेध असतां शुभ फळें सांगावीं.

**जन्मभं जन्मनक्षत्रं दशमं कर्मसंज्ञकम् ।**
**एकोनविंशमाधानं त्रयोविंशं विनाशभम् ॥ ३ ॥**
**अष्टादशं च नक्षत्रं सामुदायिक संज्ञकम् ।**
**संघातिकं च विज्ञेयमृक्षं षोडशमत्रहि ॥ ४ ॥**

ज्या नक्षत्रांत जन्म होतो तें जन्मनक्षत्र, जन्मनक्षत्रापासूनचें १० वें **कर्म** नक्षत्र, १९ वें आधान, २३ वें विनाश नक्षत्र, १८ वें **सामुदायिक** व १६ वें संघातिक नक्षत्र ह्याप्रमाणें नक्षत्रांच्या संज्ञा आहेत.

**षड्विंशं राज्यजात्यं च जातिनाम स्वजातिभम् ।**
**देशभं देशनामर्क्षं राज्यर्क्षमभिषेकभम् ॥ ५ ॥**

जन्म नक्षत्रापासून २६ वें नक्षत्र राज्यजाति नक्षत्र मानितात. आपल्या जातीच्या नांवाचें जें नक्षत्र तें जातिनक्षत्र असतें. देशाच्या नांवावरून येणारें तें देशनक्षत्र व ज्या नक्षत्रावर राज्यास राज्याभिषेक झाला असेल तें राज्यनक्षत्र जाणावें.

**पञ्चविंशतिजातिश्च सप्तविंशाऽभिषेकभम् ।**
**षड्विंशतिमं देशं जन्म ऋक्षादि शोधयेत् ॥ ६ ॥**

---

* टीपः— वेधविचार सर्वतोभद्रचक्रावरून करितात.

कांहीं ग्रंथकारांच्या मतें जन्मनक्षत्रापासून २५ वें नक्षत्र तें जातिनक्षत्र, २७ वें अभिषेक व २६ वें देशनक्षत्र मानणें युक्त वाटतें.

**इत्येवं नव धिष्ण्यानां वेधं दृष्टिं विचिन्तयेत् ।**

ह्या वर सांगितलेल्या ९ नक्षत्रांस ज्याप्रमाणें शुभाशुभ ग्रहांचा वेध किंवा दृष्टियोग होईल त्या मानानें फलादेश कल्पावा.

**मृत्युः स्याज्जनभे विद्धे कर्मभे क्लेश एव च ॥ ७ ॥**
**आधानर्क्षे प्रवासः स्याद्विनाशे बन्धुविग्रहः ।**
**सामुदायिकभेऽनिष्टं हानिः संघातिके तथा ॥ ८ ॥**
**जातिभे कुलनाशश्च बन्धनं चाभिषकभे ।**
**देशर्क्षे देशभङ्गश्च क्रूरैरेवं शुभैःशुभम् ॥ ९ ॥**

जन्मनक्षत्र विद्ध झालें असतां मृत्यु, कर्मनक्षत्र विद्ध झालें असतां क्लेश, आधान नक्षत्र विद्ध झालें असतां प्रवास, विनाश नक्षत्र विद्ध झालें असतां भावांबरोबर भांडण, वेगळेपणा, सामुदायिक नक्ष विद्ध झालें असतां अशुभ फल, संघातिक नक्षत्र विद्ध झालें असतां हानि, जातिनक्षत्र विद्ध झालें असतां कुळाचा नाश, अभिषेक नक्षत्र विद्ध झालें असतां बंधन व देशनक्षत्र विद्ध झालें असतां देशाचा भङ्ग होतो. क्रूर ग्रहाचा वेध झाला असतां अशुभ फळें व शुभ ग्रहाचा वेध झाला असतां शुभ फळें कल्पावीं.

**उपग्रह समायुक्ते मृत्युर्भवति नान्यथा ।**
**शुभग्रहेण युक्तं चेद्विपरीत फलं भवेत् ॥ १० ॥**

जन्मकर्मादि नक्षत्रांपैकीं ज्या नक्षत्रांस क्रूर ग्रहाचा वेध झाला असेल व त्यावर उपग्रह असेल तर निश्चयानें मृत्यु होतो. परंतु जन्मकर्मादि नक्षत्र शुभ ग्रहानें युक्त असतां पूर्वी सांगितलेलें अशुभ फळ मिळणार नाहीं.

**सौम्यपापग्रहो हन्याज्जन्मो व्याधिधनक्षयः ।**
**वेधे वैनाशिकाद्यर्क्षात्त्रिवेधे चायुषो भयम् ॥ ११ ॥**

जन्मनक्षत्रास शुभ ग्रहाचा वेध झाला असतां व्याधीचा नाश होतो. परंतु क्रूर ग्रहाचा वेध झाला असतां धननाश होतो. विनाश, सामुदायिक,



व संघातिक या तीन नक्षत्रांस एकाच वेळीं क्रूर ग्रहांचा वेध झाला असतां आयुष्यभय ( अपमृत्युभय ) दर्शवितो.

खालीलप्रमाणें उपग्रह पाहतात.—

**सूर्यभात्पञ्चमं धिष्ण्यं ज्ञेयं विद्युन्मुखाभिधम् ।**
**शूलं चाष्टमभं प्रोक्तं सन्निपातं चतुर्दशम् ।**
**केतुरष्टादशे प्रोक्तं उल्का स्यादेकविंशतौ ॥**
**द्वाविंशतितमे कंपस्त्रयोविंशे च वज्रकम् ।**
**निर्घातश्च चतुर्विंशे उक्ताश्चाष्टातूपग्रहाः ॥**

ज्या नक्षत्रावर सूर्य असतो त्या नक्षत्रापासून ५ व्या नक्षत्रावर विद्युन्मुख, ८ व्यावर शूल, १४ व्यावर सन्निपात, १८ व्यावर केतु, २१ व्यावर उल्का, २२ व्यावर कंप, २३ व्यावर वज्र, २४ व्यावर निर्घात ह्याप्रमाणें आठ उपग्रह असतात.

**जन्मर्क्षगो यस्य खगो ग्रहेण**
**विहन्यते पञ्चविधोक्तया वा ।**
**मासेन मृत्युं प्रवदन्ति तस्य**
**गर्गादि मुख्या मुनयो नरस्य ॥ १२ ॥**

ज्याच्या जन्मनक्षत्रावर ग्रह असून तो ग्रह पांच प्रकारांनीं हनन झालला असेल ( अर्थात् क्रूरविद्ध, क्रूरयुक्त, उपग्रहयुक्त, ग्रहलत्तायुक्त किंवा क्रूरग्रहदृष्ट असेल ) तर तो मनुष्य १ महिन्यामध्यें मृत्यु पावतो असें गर्गादि श्रेष्ठ मुनि सांगतात.

**कर्मर्क्षगे वा प्रवदन्ति मृत्युं मासद्वयेन त्रिदशाधिकेन ।**
**चतुष्पदाद्वाथ सरीसृपाद्वा मार्गप्रपन्नस्य नरस्य तस्य ॥ १३ ॥**

कर्मनक्षत्रावर जर पूर्वोक्त योग होईल तर चतुष्पाद जनावर, जळामधील सर्प, किंवा रस्त्यामध्यें पडून २ महिने १३ दिवसांनीं मृत्यु होतो.

**संघातिकस्थस्त्रिभिरेव मासैर्दिनैर्यथा पञ्चभिरेव दृष्टे ।**
**मृत्युं गतेन स्वगृहस्थितस्य नरस्य मासं मुनिवाक्यमेतत् ॥ १४ ॥**

संघातिक नक्षत्रावर पूर्वोक्त सांगितल्याप्रमाणें योग घडला असतां आपले घरांत ३ महिने पांच दिवस किंवा एक महिन्यांत मृत्यु होतो.

मासैश्चतुर्भिश्च तथोदयर्क्षे शस्त्रेण मृत्युं प्रददाति पुंसाम् ।
विषेण वा बन्धनकेनवापि स्वयं विनश्येदपि देवराजः ॥ १५ ॥

उदय नक्षत्रावर ( पूर्वी सांगितलेल्या सामुदायिक नक्षत्राला उदय असें दुसरें नांव आहे ) पूर्वोक्त योग झाला असतां देवराजा इन्द्र जरी असला तरी चार महिन्यांमध्यें शस्त्रघातानें, विषानें, बन्धनानें किंवा आत्मघातानें मृत्यु येतो.

वैनाशिकस्थः प्रददाति मृत्युः क्षतेन रोगेण बुभुक्षया वा ।
दिनैस्त्रिभिः पञ्चभिरेव दत्ते विदेशसंस्थस्य नरस्य मासम् ॥ १६ ॥

विनाश नक्षत्रावर पूर्वोक्त योग झाला असतां पांच दिवसांत परदेशांत क्षतानें, रोगानें, किंवा अन्न न मिळाल्यानें मृत्यु येतो.

मृत्युं तदा मानसगो नराणां मासैश्चतुर्थैर्विदधाति खेटः ।
नानाविधै रोगगणैर्नितान्तं विनाशयत्येव न संशयोऽत्र ॥ १७ ॥

मानस नक्षत्रावर ( जन्म नक्षत्रापासून २५ वे नक्षत्रास मानस संज्ञा आहे ) पूर्वोक्त योग झाला असतां निश्चयपूर्वक चार महिन्यांमध्यें नानाप्रकारचे रोग होऊन मृत्यु होतो.

जन्मर्क्षगो वा दिवसाधिनाथः कर्मर्क्षगो भूमिजरात्रिनाथौ ॥
मृत्युस्तदा शत्रुकृतान्निरोधात् संपद्यते द्वादशरात्रिमध्ये ॥ १८ ॥

जन्मनक्षत्रावर सूर्य व कर्मनक्षत्रामध्यें मंगळ व चंद्र आले असतां शत्रूच्या बन्धनानें मृत्यु होतो.

कर्मर्क्षगो वा दिवसाधिनाथः संघातिकस्थौ शशिभूमिपुत्रौ ॥
मृत्युस्तदा तस्य भवेन्नरस्य मासस्य मध्ये कथितो मुनीन्द्रैः ॥ १९ ॥

कर्म नक्षत्रावर सूर्य व संघातिक नक्षत्रामध्यें चंद्र मंगळ असतां मुनीलोक एक महिन्यामध्यें मृत्यु होईल असें सांगतात.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्आप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. | जुलै १९१६. | अंक ४ था.

## ग्रहांचें बल कसें पहातात ?

( लेखकः—राम नारायण. )

बलावबोधेन विना दशादि क्रमावबोधो न भवत्यतोतः ।
तत्स्थान-दिक्-काल-निसर्ग चेष्टा-दृग्भेदभिन्नं कथयाम्यशेषम् ॥
श्रीपतिः

आर्य व यूरोपीय ज्योतिषशाखेंतील ग्रहांचें बलाबल पहाण्याचे नवे जुने प्रकार विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. या दोन पद्धतीमध्यें फरक काय आहेत, ऐक्य कोठें आहे आणि कोणती बाजू विचारास किंवा अनुभवास पटते याची चिकित्सा ज्योतिषशास्त्राध्ययनाच्या कामीं फारच उपयोगी पडेल यांत शंका नाहीं. हल्लीं आम्हीं ग्रहांचें बल कसें पहातों व पूर्वीच्या ग्रंथावरून ग्रहबल पहाण्याचा प्रकार कसा होता याचा विचार करून अनुभ-

वास कोणता प्रकार पटतो याचा निर्णय करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखांत करावयाचा आहे.

ग्रहांचें बल चार प्रकारचें आहे तें असें:—(१) स्थानबल (२) राशिबल (३) दृष्टिबल व (४) योगबल. ह्या चार प्रकारांनीं ग्रहबल पहाण्याचा प्रघात हल्लीं पडला आहे. ह्या चार प्रकारच्या बलांपैकीं स्थानबल हें विशेष महत्त्वाचें आहे. त्यानंतर वर दिलेल्या अनुक्रमानें बलांचें महत्त्व समजावें. वराहमिहिराचार्यानें (१) स्थानबल (२) दिशाबल (३) चेष्टाबल (४) कालबल व (५) नैसर्गिक बल अशीं ५ प्रकारचीं बलें दिलीं आहेत. या लेखाच्या शिरोभागीं लिहिलेल्या श्लोकांत दृष्टिबल अधिक धरलें आहे. सारावलीकाराच्या मतें दिक्, स्थान, काल, व चेष्टा हीं चार प्रकारचीं बलें महत्त्वाचीं आहेत व त्यांचा उपयोग सर्व गोष्टींचा निर्णय करण्याकरतां करावा व ह्या चार बलांपैकीं एकही बल ज्या ग्रहास नाहीं तो ग्रह निर्बली समजावा.

**दिक्स्थानकालचेष्टाकृतं बलं सर्वनिर्णयविधाने ॥**
**वक्ष्ये चतुप्रकारं ग्रहस्तु रिक्तो भवेद्बलः ॥** अ. ४-३४

सारावलीकारानें वराहमिहिराचार्यास अनुसरून नैसर्गिक बलाचाही उल्लेख शेवटीं केला आहे. परंतु त्याचें महत्व पूर्वोक्त चार प्रकारच्या बलाइतकें महत्वाचें नसल्यामुळें त्याचा उल्लेख दिक्स्थानादिबलांबरोबर केला नसेल. पूर्वाचार्यांच्या मताप्रमाणें बलांचे प्रकार पांच किंवा सहा होतात. या प्रकारांपैकीं कोणता प्रकार अधिक महत्वाचा व कोणता प्रकार गौण याचा मात्र निर्णय कोणीं केला नाहीं. प्रसिद्ध टीकाकार भटोत्पल यानेंही या प्रकरणांत मूकवृत्तीच धारण केलेली आहे !

ग्रहांचीं सर्व प्रकारचीं बलें लक्ष्यांत घेऊन आम्हीं त्यांचे ४ प्रकार मानले आहेत. व या चार प्रकारांमध्यें पूर्वाचार्यांच्या ५ किंवा ६ बलांचा समावेश कसा होतो, त्यामध्यें विरोध कोठें येतो, प्रत्येक प्रकारचें बल कसें पहावें वगैरेचा विचार आतां करूं.



Smt. HANSA MEHTA LIBRARY
MAHARAJA SAYAJIRAO UNIVERSITY OF BARODA

## (१) स्थानबल.

कुंडलीच्या द्वादश स्थानांपैकीं कांहीं विशिष्ट स्थानांमध्यें ग्रह बलवान असतो. हें जें स्थानामुळें येणारें बल त्यास ‘ स्थानबल ’ अशी संज्ञा आहे. पूर्वाचार्यांच्या ‘ स्थानबलाचा ’ अर्थ निराळा आहे. वराहमिहिराच्या मताप्रमाणें ‘ जो ग्रह आपल्या उच्च राशींत, मित्रक्षेत्रीं, मूल त्रिकोणक्षेत्रीं, स्वनवांशीं किंवा स्वक्षेत्रीं असतो तो ग्रह ‘ स्थानबली ’ समजावा. ( स्वोच्चसुहृन्निजकोणनवांशैः **स्थानबलं** स्वगृहोपगतेच ).


सारावलीकारानें वराहमिहिराप्रमाणेंच स्थानबल दिलें असून ( स्त्रीक्षेत्रे शशिभार्गवौ नरगृहे शेषाबले स्थानजे ) स्त्रीराशीमध्यें चंद्र व शुक्र आणि पुरुषराशीमध्यें चंद्र–शुक्रांव्यतिरिक्त ग्रह असतील तर त्यांस ‘ स्थानबली ’ समजावे असें अधिक सांगितलें आहे. पूर्वाचार्यांच्या ‘ स्थानबल ’ या सामाजिक शब्दांतील ‘ स्थान ’ याचा अर्थ राशि असा आहे व हल्लीं प्रचलित असलेल्या ‘ स्थानबल ’ यांतील ‘ स्थान ’ याचा अर्थ कुंडलीच्या द्वादश विभागांपैकीं एक विभाग असा आहे. हा फरक वाचकांनीं प्रथमच लक्ष्यांत ठेवावा.

पूर्वाचार्यांनीं जें दिग्बल म्हणून सांगितलें आहे तें व प्रस्तुत काळीं समजलें जाणारें स्थानबल यांमध्यें किंचित् थोडेंसें साम्य आहे. सारावलीमध्यें दिग्बल सांगितलें आहे तें असें:—

**लग्ने जीवबुधौ दिवाकर कुजौ व्योम्नि स्मरे भास्करि– ।**
**बंधाविंदुसितौ दिशाकृतमिदं..........................॥**

‘ लग्नकेंद्रीं बुध–गुरु, दशमांत रवि–मंगळ, सप्तमांत शनि आणि चतुर्थांत चंद्र–शुक्र येणेंप्रमाणें ग्रह असतां ते दिग्बळी जाणावे ’ हें दिग्बल हल्लीं समजलें जाणाऱ्या स्थानबलाच्या मानानें फारच अपुरें आहे. याचा प्रत्यय थोड्याशा कुंडल्या पाहिल्या म्हणजे कळून येईल. उदाहरणार्थ एक कुंडली देतों.—

ला. ल.




ह्या कुंडलीमध्यें बुधगुरूंपैकीं एकही ग्रह लग्नांत नाहीं, रवि किंवा मंगळ दशमांत नाहीं, सप्तमांत शनि किंवा चतुर्थांत चंद्र किंवा शुक्र नाहीं. म्हणजे दिग्बल कोणत्याच ग्रहास नाहीं असें होतें. अशी कुंडली आली असतां कोणत्या ग्रहास किती दिग्बल आहे हें समजण्याची व्यवस्था पूर्वाचार्यांनीं केलेली नाहीं. असला प्रकार प्रचलित स्थानबलाचा होत नाहीं हें पुढील विवेचनावरून वाचकांच्या लक्ष्यांत येईल. या दिग्बलाव्यतिरिक्त कुंडलीच्या द्वादश स्थानांत ग्रह कसे बलवान असतात यासंबंधानें पूर्व ग्रंथकारांनीं विशेष विचार केल्याचें दिसत नाहीं. ग्रहांचें राशिबल पहाण्याकरतां सहा नव्हे तर सोळा वर्ग ज्यांनीं निर्माण केले त्यांनीं या स्थानबलाकडे इतकें दुर्लक्ष्य कसें केलें याचें आश्चर्य वाटतें !

कुंडलींतील द्वादश स्थानांचा बलासंबंधीं विचार करतां १–१०–११–७ २–९–३–५–४–१२–६–८ हीं स्थानें यथानुक्रम बलवान आहेत. प्रथम व दशम या दोन स्थानांत असणारे ग्रह अतिशय बलवान असतात. त्यानंतर लाभस्थानांतील ग्रह बलवान असतात. सर्वांमध्यें द्वादश, षष्ठ व अष्टम हीं स्थानें मात्र अगदीं बलहीन आहेत. कर्तृत्ववान पुरुषांच्या कुंडल्यांमध्यें ह्या स्थानांमध्यें ग्रहाधिक्य कधींच आढळून येणार नाहीं. स्वतःच्या जोरावर महत्त्वास चढलेल्या व्यक्तींच्या कुंडल्यांमध्यें ग्रह स्थानबली असतात यांत मुळींच शंका नाहीं. वर दिलेल्या कुंडलीमध्यें रवि, शुक्र, हर्शल, गुरु, चंद्र व मंगळ हे ग्रह स्थानबली आहेत. मागील वर्षाच्या अंकांत ९ प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्या दिल्या आहेत त्यां प्रत्येक कुंडलींत ग्रह विशेषेंकरून स्थानबली आहेत असें दिसून येईल.



कुंडलीच्या द्वादश स्थानाच्या बलाप्रमाणें वर्गीकरण करून वर दिलें आहे. ग्रहांचे शुभाशुभत्व व गुणधर्म लक्ष्यांत घेऊन त्यांचीं फलें कुंडलीच्या कोणत्या स्थानांत विशेष वृद्धिंगत होतात याचाही विचार स्थानबलामध्येंच केला पाहिजे. कोणत्याही ग्रहाचीं शुभाशुभ फलें प्रथम व दशम या दोन स्थानांत स्पष्टपणें दिसून येतात व या दोन स्थानांव्यतिरिक्त इतर स्थानांत सर्वच ग्रह सारखेच बलवान नसतात. कोणते ग्रह कोणत्या स्थानांत बलवान असतात हें आमच्या अनुभवाप्रमाणें पुढें देत आहों.

**रवि**—दशम, लग्न, लाभ, तृतीय, नवम, पंचम, धन, सप्तम, चतुर्थ, व्यय, षष्ठ व अष्टम या स्थानांच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**चंद्र**—दशम, लग्न, लाभ, सप्तम, नवम, धन, चतुर्थ, पंचम, तृतीय व्यय, षष्ठ आणि अष्टम या स्थानांच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**बुध**—लग्न, दशम, लाभ, तृतीय, नवम, पंचम, सप्तम, धन, चतुर्थ, अष्टम आणि व्यय या स्थानांच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**शुक्र**—लग्न, दशम, लाभ, सप्तम, धन, नवम, पंचम, चतुर्थ, तृतीय, व्यय, षष्ठ व अष्टम या स्थानांच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**मंगळ**—दशम, लग्न, लाभ, तृतीय, सप्तम, नवम, पंचम, धन, षष्ठ, चतुर्थ, अष्टम आणि व्यय या स्थानांच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**गुरु**—लग्न, दशम, नवम, लाभ, पंचम, धन, तृतीय, सप्तम, चतुर्थ, व्यय, अष्टम व षष्ठ या स्थानांच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**शनि**—दशम, लग्न, लाभ, नवम, तृतीय, सप्तम, पंचम, धन, षष्ठ, चतुर्थ, अष्टम आणि व्यय या अनुक्रमानें बलवान असतो.

**हर्शल**—लग्न, दशम, नवम, तृतीय, लाभ, पंचम, सप्तम, धन, चतुर्थ, व्यय, अष्टम व षष्ठ या स्थानांच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**नेपच्युन**—लग्न, दशम, तृतीय, नवम, लाभ, सप्तम, पंचम, धन, चतुर्थ, व्यय, अष्टम व षष्ठ या स्थानांच्या अनुक्रमानें बलवान असतो.

+ **राहु व केतु**—लाभ, दशम, लग्न, तृतीय, षष्ठ, भाग्य, धन, पंचम, सप्तम, चतुर्थ, व्यय व अष्टम या स्थानांच्या अनुक्रमानें बलवान असतात.

वर दिल्याप्रमाणें स्थानांच्या अनुक्रमानें ग्रह बलवान असतात असें आमचें मत आहे.

## २ राशिबल.

स्थान बलानंतर ग्रहांचें राशिबल महत्त्वाचें आहे. पूर्वाचार्यांनीं या राशिबलासंबंधानें इतकें पुष्कळ लिहून ठेविलें आहे कीं त्यांस इतर कोणत्याही बलापेक्षां राशिबलच अधिक महत्त्वाचें वाटलें असेल असें अनुमान करणें चुकीचें होणार नाहीं. पूर्वाचार्यांच्या मताप्रमाणें कोणताही ग्रह ( १ ) उच्च ( २ ) मूळ त्रिकोणस्थ ( ३ ) स्वगृहीं ( ४ ) मित्रगृहीं किंवा ( ५ ) स्वनवांशीं असल्यास बलवान असतो. त्यांच्या मताप्रमाणें उच्च राशीचें बल सर्वांत महत्वाचें आहे, त्याचे खालोखाल त्रिकोण राशीचें बल व त्यानंतर स्वराशीचें बल आहे. मित्रराशीचें बल स्वराशीच्या बलाहून कमी आहे यांत शंका नाहीं परंतु स्वनवांशीं बलापेक्षां कमी किंवा अधिक याचा निर्णय झालेला नाहीं. पूर्वाचार्यांस अनुसरून उच्चादि ५ बलें सांगितलीं आहेत त्याचा यथानुक्रम विचार करूं.

( १ ) उच्चबल.—" उच्चबलेनसमेतः
परां विभूतिं ग्रहः प्रसाधयति " ॥
( सारावली )

राशिबलामध्यें उच्च राशीचें बल अधिक महत्त्वाचें आहे असें जुन्या व नव्या आर्य ज्योतिषांचें मत दिसतें. अर्वाचीन यूरोपीय ज्योतिषांच्या मतें

---

+ राहु व केतु हे ग्रह नसून त्यांचा ग्रहांमध्यें समावेश केला आहे. यांची स्वतंत्र स्थानफलें म्हणजे कोणत्याही ग्रहाच्या युतींत नसतां नमूद करण्यासारखीं आमच्या अनुभवास आलीं नाहींत. आपल्या देशांत राहु-केतूंची फलें पहाण्याचा प्रघात आहे म्हणून त्यांचा स्थानानुक्रम जुन्या ज्योतिर्मालेच्या दुसऱ्या पुस्तकाच्या १६९ पानावरून थोड्याशा फरकानें येथें दिला आहे.



स्वराशीचें बल सर्वांत अधिक महत्त्वाचें असतें. हा मतविरोध घालविणें कठीण आहे यांत शंका नाहीं. यासंबंधानें विचार करतां आम्हांस असें वाटतें कीं उच्च बलच अधिक महत्त्वाचें असावें कारण दोन कुंडल्यांपैकीं एका कुंडलीच्या धन स्थानांत कर्केचा गुरु आहे व दुसऱ्या कुंडलीच्या धन स्थानांत धनेचा किंवा मीनेचा गुरु आहे आणि दोन्ही कुंडल्यांमध्यें इतर ग्रहस्थिति मुळींच लक्ष्यांत घेण्यासारखी नाहीं. तर आम्हांस असें वाटतें कीं धन स्थानांतील उच्च गुरु असणाऱ्या कुंडलीमध्यें धनयोग बलवत्तर झाला आहे असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

आर्य व यूरोपीय ज्योतिषांमध्यें कांहीं राशींच्या परमोच्चांशांसंबंधानें थोडासा मतविरोध आहे.

| | आर्य पद्धतीप्रमाणें | यूरोपीय पद्धतीप्रमाणें |
|---|---|---|
| रवि | मेष १० + | मेष १९ + |
| चंद्र | वृषभ ३ | वृषभ ३ |
| बुध | कन्या १५ | कन्या १५ |
| शुक्र | मीन २७ | मीन २७ |
| मंगळ | मकर २८ | मकर २८ |
| गुरु | कर्क ५ + | कर्क १५ + |
| शनि | तूळ २० + | तूळ २१ + |

रवि, गुरु व शनि यांचे परमोच्चांश दोन पद्धतीमध्यें निरनिराळे आहेत. अलीकडे बऱ्याच ज्योतिर्विदांचें असें मत झालें आहे कीं फलनिर्णयाच्या कामीं या परमोच्चांशांचा कांहीं एक उपयोग होत नाहीं. वर दिलेल्या तंतोतंत अंशांत एखादा ग्रह उच्च असल्यास त्याचीं कांहीं विशेष फलें पहावयास सांपडतात असेंही नाहीं. आणि म्हणून आर्य व यूरोपीय ज्योतिर्विदांच्या या क्षुल्लक मतविरोधाकडे लक्ष्य देण्याचें कारण नाहीं.

( २ ) **मूळत्रिकोणबल.**—"पुंसामथ साचिव्यं त्रिकोण बलवान् बलपतित्वम्" ॥ (सा. वली)

ग्रहांच्या मूळत्रिकोण राशी पुढें दिल्याप्रमाणें आहेत:

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| रवि | चंद्र | बुध | शुक्र | मंगळ | गुरु | शनि |
| सिंह. | वृषभ. | कन्या. | तूळ. | मेष. | धनु. | कुंभ. |

रवि, चंद्र व बुध या तीन ग्रहांशिवाय बाकीच्या ग्रहांना ज्या त्रिकोणराशी दिल्या आहेत त्या राशींमध्यें ग्रह विशेषत्वानें बलवान असतात. पूर्वाचार्यांनीं या त्रिकोणराशींचे अंशही दिले आहेत परंतु त्यांचा फलनिर्णयाच्या कामीं कांहींच उपयोग होण्यासारखा नाहीं. उदाहरणार्थ मंगळ हा मेष राशींत १२ अंशांपर्यंत मूळत्रिकोणक्षेत्रीं असतो व पुढें स्वगृहीं असतो असें म्हटलें आहे. मेषेच्या १२ व्या अंशांत असणारा मंगळ पंधराव्या अंशांत असणाऱ्या मंगळापेक्षां अधिक बलवान असतो असें आम्हांस वाटत नाहीं, एवढें मात्र खरें कीं शुक्र, मंगळ, गुरु व शनि हे त्रिकोणराशीमध्यें म्हणजे आपल्या विषम स्वगृहीं सम स्वगृहांपेक्षां अधिक बलवान असतात.

( ३ ) **स्वगृहबल.**—"स्वर्क्षबलेनच सहितः प्रमुदितधनधान्यंसपदाक्रान्तम्" ॥ (सा. वली)

मूळत्रिकोणबलाच्या खालोखाल स्वगृहराशीचें बल आहे. ज्योतिर्मालेच्या वाचकांपैकीं ग्रहांचीं स्वगृहें माहिती नसणारा वाचक कोणीच नसेल हें जाणून तीं येथें देत नाहीं. कोणताही ग्रह स्वगृहीं असला म्हणजे तो बलवान असतो या संबंधानें मतभेद कोठेंच होणार नाहीं. रवि व चंद्र यांखेरीज प्रत्येक ग्रहाला दोन दोन स्वगृहें दिलीं आहेत. परंतु या दोन राशींमध्यें ग्रह सारखाच बलवान नसतो. शुक्राचीं स्वगृहें तूळ व वृषभ ह्या दोन राशी आहेत परंतु त्यांपैकीं त्याची तूळ राशींतील फलें विशेष महत्वाचीं असतात. ज्या ग्रहांना दोन स्वगृहें आहेत ते ग्रह आपल्या विषम स्वगृहीं अधिक बलवान असतात. हा जो फरक दिसून येतो त्यावरून त्यांच्या विषम स्वग्रहांना मूळत्रिकोण हें नांव मिळालें असावें.



( ४ ) **मित्रक्षेत्रबल.** 'मित्रबलेन च युक्तो जनयति कीर्त्यन्वितं पुरुषम्" ( सा. वली )

जो ग्रह उच्च किंवा स्वगृहीं नसून जर मित्रक्षेत्रीं असेल तर तो बलवान समजावा असें पूर्वाचार्य म्हणतात. त्यांच्या मताप्रमाणें हें मित्रक्षेत्रबल स्वक्षेत्रबलाच्या खालोखाल महत्त्वाचें आहे. या मित्रक्षेत्रासंबंधानें पूर्वाचार्यांमध्येंच मतभेद आहे. हे मतभेद आचार्य वराहमिहिरानें बृहज्जातक अध्याय २ श्लोक १९ यामध्यें दिले आहेत ते येणेंप्रमाणें:—

"जीवो जीवबुधौ सितेंदुतनयौ व्यर्का विभौमाः क्रमात् ।
विंद्वर्का विकुजेंद्विनाश्च सुहृदः केषांचिदेवं मतम् ॥
सत्योक्ते सुहृदस्त्रिकोण भवनात्स्वात्स्वांत्यधी धर्मपाः ।
स्वोच्चायुः सुखपाः स्वलक्षणविधेर्नाऽन्यैर्विरोधादिति ॥ १ ॥"

या श्लोकामध्यें यवनाचार्य सत्याचार्य यांच्या मताप्रमाणें ग्रहांचें मित्रत्व येणेंप्रमाणें आहे:—

| यवनाचार्य. | सत्याचार्य. |
|---|---|
| रवि—गुरु. | रवि—चंद्र, मंगळ व गुरु. |
| चंद्र—बुध, गुरु. | चंद्र—रवि व बुध. |
| मंगळ—शुक्र, बुध. | मंगळ—गुरु, चंद्र व बुध. |
| बुध—सूर्यावांचून सर्व ग्रह. | बुध—रवि व शुक्र. |
| गुरु—मंगळ सोडून सर्व ग्रह. | गुरु—रवि, चंद्र व मंगळ |
| शुक्र—चंद्र व सूर्य सोडून सर्व ग्रह. | शुक्र—बुध व शनि |
| शनि—बुध, गुरु आणि शुक्र. | शनि—शुक्र व बुध. |

वराहमिहिरानंतर झालेल्या ग्रंथकारांनीं सत्याचार्यांच्याच मताचें ग्रहण केलें आहे. परंतु यवनाचार्यांचें मत चूक कां या प्रश्नाचें उत्तर कोणीही दिलेलें नाहीं. ग्रह स्वगृह व स्वोच्च राशींशिवाय इतर कांहीं राशींमध्यें बलवान असतो यासंबंधानें मतभेद होणें शक्य नाहीं. फक्त त्या राशी कोणत्या यासंबंधानें मात्र मतभेद होतील. ग्रहांच्या स्वोच्च–स्वगृहेतर

बलवान राशी कोणत्या याचा नियम जुन्या ग्रंथकारांनीं दिला आहे तो असा. कोणत्याही ग्रहाच्या त्रिकोणराशीपासून द्वितीय, चतुर्थ, पंचम, अष्टम, नवम व द्वादश या राशींचे अधिपती आणि त्याच्या उच्च राशीचा अधिपति ग्रह हे त्या ग्रहाचे मित्र होतात. " ( **त्रिकोण भवनात्स्वांत्यधी धर्मपाः । स्वोच्चायुः सुखपाः** ) " आणि बाकी राहिलेल्या राशींचे अधिपती शत्रु समजावे. सात ग्रहांमध्यें रवि व चंद्र यांखेरीज बाकीच्या ग्रहांस दोन स्वगृहें आहेत, अर्थात दोन स्वगृहें असणाऱ्या पांच ग्रहांपैकीं एखादा ग्रह एकाच वेळीं शत्रु व मित्र होऊं शकतो. अशा वेळीं त्यास ' सम ' ही संज्ञा आहे. ग्रहांचें शत्रुमित्रत्व वर दिलेल्या नियमाप्रमाणें कसें पहातात याचें एक उदाहरण घेऊन दाखवितों. मंगळाचें मूळ त्रिकोण मेष आहे. मेषेपासून दुसऱ्या ( वृषभ ) राशीचा स्वामी शुक्र आहे. वृषभ राशीमुळें शुक्र, मंगळाचा मित्र होतो परंतु तूळ राशीमुळें शत्रु होतो म्हणून त्यास मंगळाचा 'सम' मानला आहे. मेषेपासून तिसऱ्या ( मिथुन ) राशीचा स्वामी बुध हा सहाव्या ( कन्या ) राशीचाही स्वामी आहे म्हणून दोन्ही राशींमुळें मंगळाचा शत्रु होतो. मेषेपासून चतुर्थ व पंचम राशीचे स्वामी चंद्र व रवि हे मंगळाचे मित्र होतात. मेषेपासून नवव्या व बाराव्या राशींचा स्वामी गुरु वर दिलेल्या नियमाप्रमाणें मंगळाचा मित्र होतो. मेषेपासून १० व्या व ११ व्या राशींचा स्वामी शनि आहे व मंगळाच्या उच्च गृहाचा अधिपति आहे म्हणून शनि हा मंगळाचा ' सम ' मानला आहे.

वर सांगितल्याप्रमाणें ग्रहांचें नैसर्गिक मित्रामित्रत्व पहाण्याचा प्रघात आर्य ज्योतिषांमध्यें पडला असून यवनाचार्यांचें मत मागें पडलें आहे. परंतु प्रस्तुत प्रसंगीं आपण दोन्हीही प्रकारांचा उपयोग फलनिर्णयाच्या कामीं कसा होतो हें पाहूं. उच्च राशींतील शुभ फल संपूर्ण धरून ग्रह मित्रराशींत असला म्हणजे त्याचें शुभ फल एक चतुर्थांश ( ' पादं शुभस्य हितभे ) असतें असें समजतात. यावर अशी शंका येते कीं दोन मित्रगृहें असलीं तर त्या दोन्हीं राशींत सारखींच फलें अनुभवास येतात किंवा काय ? यवनाचार्य व सत्याचार्य ह्या दोघांच्याही मतानें गुरु हा रवीचा मित्र



आहे. म्हणजे रवि गुरूच्या क्षेत्रीं असल्यास त्याचें शुभफल एक चतुर्थांश मिळेल. रवि ग्रह अग्नितत्त्वाचा आहे त्यामुळें तो अग्नितत्त्वाच्या राशींत बलवान असतो यांत मुळींच शंका नाहीं. धनेंतील रवि आपल्याच तत्त्वाच्या राशींत आहे म्हणून बलवान असतो असें कांहीं ज्योतिषी म्हणतील तर कांहीं ज्योतिषी तो मित्रगृहीं आहे म्हणून बलवान आहे असें म्हणतील आणि तोच जर मीन राशींत असेल तर तत्त्वानुरूप बलहीन समजला जाईल परंतु आर्यज्योतिषी मित्रगृहीं आहे म्हणून बलवान समजतील. धनु व मीन या दोन्ही राशींतील रवि सारखाच बलवान असतो असें म्हणण्याचें धाडस अनुभवी ज्योतिषी करील असें वाटत नाहीं. प्रस्तुतच्या उदाहरणावरून वाचकांच्या लक्ष्यांत येईल कीं ज्या वेळीं दोन मित्रक्षेत्रें असतील त्या वेळीं तीं दोन्हीं सारखींच महत्त्वाची असतात असें पूर्वाचार्यांचें मत दिसतें. परंतु अनुभवावरून पहातां त्यामध्यें तरतम भाव असलाच पाहिजे असें वाटतें.

पूर्व ग्रंथकारांना एकाच ग्रहाच्या अमलाखालच्या दोन मित्रक्षेत्रांपैकीं कोणतें क्षेत्र अधिक बलवान असतें याचा निर्णय करण्याचें आवश्यक वाटलें नाहीं असें दिसतें परंतु एखाद्या ग्रहाचे दोन किंवा तीन ग्रह मित्र असतात तेव्हां त्या दोन्ही किंवा तीनही ग्रहांच्या राशीमध्यें तो ग्रह सारखाच बलवान असतो असें समजावयाचें कीं काय ? रवीचे चंद्र, मंगळ व गुरु हे तीन मित्र आहेत म्हणजे कर्क, वृश्चिक, धनु व मीन हीं रवीचीं मित्रक्षेत्रें झालीं. या चारही राशींमध्यें तो सारखाच बलवान असतो असें मानणें म्हणजे एक मोठें आश्चर्यच आहे. एकाच ग्रहाच्या अंमलाखालच्या मित्रक्षेत्रांपैकीं कोणतें क्षेत्र अधिक महत्त्वाचें आहे याचा निर्णय केला नाहीं हें एक वेळ चालेल परंतु तीन ग्रहांच्या अंमलाखालच्या राशींसंबंधानें कांहीं तरी निर्णय करावयास पाहिजे होता. हा पहिला **आक्षेप** मित्रबलासंबंधानें येतो. मित्रक्षेत्रबल हें स्वक्षेत्रबलाच्या खालोखाल महत्त्वाचें आहे असें जुन्या ग्रंथकारांचें म्हणणें आहे. परंतु अनुभवावरून पहातां हें म्हणणें सर्व ग्रहांविषयीं खरें नाहीं. बुधाचे रवि व शुक्र हे मित्र आहेत म्हणून तो सिंह व वृषभ या राशींमध्यें स्वक्षेत्राच्या खालोखाल बलवान होईल. परंतु तो कुंभ

राशीमध्यें सिंह व वृषभ राशींपेक्षां पुष्कळ पटीनें बलवान आढळतो. दुसरें उदाहरण पहा. मंगळ ग्रह चंद्राचा मित्र आहे म्हणजे कर्क राशींत त्याला मित्रक्षेत्रबल असतें म्हणून कर्केंतील मंगळ मेष–वृश्चिकेंतील मंगळाच्या खालोखाल बलवान होईल ! आणखी एक उदाहरण पहा. शुक्र बुधाच्या राशींत मित्रक्षेत्रबली असतो म्हणजे कन्या राशींत बलवान असतो ! ! सारांश नैसर्गिक मित्रत्व जाणण्याचा जो नियम दिला आहे त्याप्रमाणें सप्त-ग्रहांपैकीं दोन ( शुक्र व मंगळ ) ग्रहांच्या नीचक्षेत्रांत त्यांस मित्रक्षेत्रबल असतें, कांहीं ग्रह ज्या राशींत निर्बली असतात अशा वेळींसुद्धां त्यांस मित्र-क्षेत्रबल असतें, उदाहरणार्थ रवि व मंगळ मीन राशींत बलवान असतात असें म्हणावें लागतें आणि ग्रह निरनिराळ्या राशींत कमी अधिक प्रमाणानें बलवान असून सुद्धां त्यांच्या बलाचा कमीअधिकपणा मित्रक्षेत्रानें दाखवितां येत नाहीं म्हणून मित्रक्षेत्रबल अपुरें आहे व त्याचा फलनिर्णयाच्या कामीं फारसा उपयोग होण्यासारखा नाहीं.

ग्रहांचें मित्रत्व दोन प्रकारचें आहे. एक नैसर्गिक व दुसरें तात्कालिक. नैसर्गिक मित्रत्वाचा विचार वर केला आहे, आतां तात्कालिक मित्रत्वाचा विचार करूं.

कुंडलीमध्यें एखादा ग्रह ज्या स्थानामध्यें असेल त्या स्थानाच्या द्वितीय, तृतीय, चतुर्थ, दशम, एकादश व द्वादश स्थानांत असणारे ग्रह त्याचे तात्कालिक मित्र होतात आणि यांव्यतिरिक्त स्थानांतील ग्रह त्याचे शत्रु होतात. नैसर्गिक व तात्कालिक मित्रामित्र पहाण्याकरतां दोन भिन्न प्रकार कां केले आहेत हें समजण्यास मार्ग नाहीं. ग्रहाच्या मूलत्रिकोण राशीपासून ज्या राशिक्रमानें त्याचे नैसर्गिक मित्र पहातात तसाच तात्कालिक मित्र ठर-वितांना स्थानांचा असणें योग्य होतें. कुंडलीमध्यें जे ग्रह एकमेकांच्या चतुर्थ–दशमस्थानीं व द्विर्द्वादशस्थानीं असतात ते तात्कालिक मित्र होतात असें मानणें म्हणजे मोठें आश्चर्यच आहे. ( अपूर्ण. )



# स्फुट विचार.

( १ ) दशम स्थानांतील शनि आपत्ति, संकटें किंवा अ नुकसानीचे प्रसंग दर्शवितो असें पुष्कळ ज्योतिर्विदांचें म्हणणें आहे परंतु कुंडल्यांचें निरीक्षण करितां सर्वस्वीं असें मानतां येत नाहीं. जर शनि बलवान–राशिबली–मकर, कुंभ, तुला, मिथुन किंवा वृषभ राशींचा–असून इतर ग्रहाबरोबर त्यांत विशेषतः रविचंद्रांबरोबर शुभसंबंधित–त्रिकोण दृष्टियोग किंवा तृतीय एकादश योग–असतां खात्रीनें नाश होणार नाहीं. वरील-प्रमाणें दशमांत बलवान शनीबरोबर ज्या वेळीं दुसरे ग्रह आपल्या परिभ्रमण-काळानें किंवा दिनवर्षपद्धतीनें अशुभ दृष्टियोग करतील त्या काळीं शनीचे नैसर्गिक धर्माप्रमाणें थोडा काळ त्रास झाला तरी पुन्हा शुभग्रहस्थिति प्राप्त होतांच पूर्ववत् स्थिति सुधारते.

( २ ) जन्मकाळीं कुंडलींत गुरु हा शनि किंवा हर्शलबरोबर शुभसंबं-धित असतां–नवमपंचम किंवा तृतीय एकादश दृष्टियोग–वारसामुळें, मृत्यु-पत्रामुळें पैसे, जमीनजुमला मिळालेला पाहण्यास मिळतो. त्याचप्रमाणें धनेश किंवा अष्टमेश एकमेकाबरोबर शुभसंबंध करीत असून इतर ग्रहांबरोबर–रवि, चंद्र, हर्शल, किंवा गुरु–शुभ दृष्टियोग करीत असतां वरीलप्रमाणेंच फळें अनुभवास आलेलीं सांपडतात.

( ३ ) ज्यांचे जन्मकाळीं गुरु चतुर्थेश असून रवि किंवा चंद्र यांचे-बरोबर शुभ दृष्टियोग करीत असून अष्टमांत असतो त्या व्यक्तीस वडिलार्जित मालमिळकतीपासून चांगला लाभ झालेला पहाण्यांत येतो.

( ४ ) ज्या पुरुषाचे कुंडलींत शुक्र हा हर्शलबरोबर तृतीय, एकादश किंवा नवम पंचम योग करीत असलेला आढळतो त्या माणसास तरुण स्त्रियांबद्दल विशेष आवड दृष्टोत्पत्तीस येते. व ज्याचे कुंडलींत मंगळ शुक्राचा दृष्टियोग झालेला असतो तीं माणसें विशेष कामी असतात.

( ५ ) जन्मकाळीं चंद्र धनस्थानांत किंवा पंचमांत असून गुरूबरोबर शुभदृष्टियोग करीत असतां लॉटरी किंवा सट्याचे व्यवहारांत चांगली प्राप्ती

होते. वरील योगांत गुरु किंवा चंद्र इतर ग्रहांकडून—मंगळ, शनि, हर्शल —पीडित नसावेत.

( ६ ) कुंडलींत चंद्र हर्शलचा शुभ दृष्टियोग होत असतां विचित्र विषयांची आवड दर्शवितो. ह्या योगावर जन्मणाऱ्या माणसास ज्योतिष, सामुद्रिक वगैरे विषयांची आवड आढळते.

( ७ ) ज्योतिष वाङ्मयांत सर्वसाधारणरीत्या पातळ पदार्थांचा कारक ग्रह चंद्र मानिलेला आढळतो. त्याचप्रमाणें मानवी पशु किंवा वनस्पती कोटींमधील वस्तूंमध्यें दृष्टोत्पत्तीस येणारी आर्द्रता चंद्रानें दर्शविली जाते. परंतु ह्याखेरीज आपल्या नित्य प्रचारांत अनेक द्रव पदार्थ येतात त्यांपैकीं कांहीं द्रव पदार्थ खालीलप्रमाणें विशिष्ट ग्रहांनीं दर्शविले जातात.

नेपच्युन ( वरुण )—तेलें, चहा, कॉफी, ज्या पातळ पदार्थांमुळें गुंगी किंवा सुस्ती येते असे विषारी द्रव पदार्थ.

हर्शल ( प्रजापति ).—वाफ, द्रवरूपांत असलेली हवा, बेनझाईन सोडावाटर.

शनि—रंग, जाड द्रवपदार्थ, बर्फ, चिकट पातळ पदार्थ.

गुरु—चाकोलेट, शँपेन, सर्व प्रकारचे गोड पातळ पदार्थ.

शुक्र—अंगाला लावण्याचे सुवासिक पातळ पदार्थ, गुलाबपाणी, अंतरें.

बुध—अलकोहल, टरपेन तेल, साधीं सरबतें.


चंद्र—सर्व साधारण पातळ पदार्थ, बीअर, दूध इत्यादि.

( ८ ) स्त्रियांचे कुंडलींत रवि, वृश्चिक, वृषभ, सिंह किंवा कुंभ राशींमध्यें असून नेपच्युन, शनि, हर्शल किंवा मंगळाबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां त्यांस आर्तवविकार, रक्तप्रदर, आर्तवाभाव, वेळेवर रजस्राव चांगला न होणें, अनियमितपणानें विटाळ प्राप्त होणें, पुष्कळ रक्तस्राव होणें, हृदयविकार, हार्ट डीझीझ, प्यालपिटेशन—हृदयशूळ वगैरे विकार झालेले पाहण्यास मिळतात. सदरहूप्रमाणेंच चंद्र स्थिर राशींतून वरील ग्रहानें पीडित असतां अनुभव मिळतो.



## कर्कसंक्रमण.

सायन लग्न कुंडली.




या वर्षीं रवि कर्कराशीमध्यें तारीख २१ जून रोजीं रात्रौ ११ वाजून १६ मिनिटांनीं प्रवेश करीत आहे. या वेळीं मुंबई रेखांशाच्या कुंडलीमध्यें पूर्वक्षितिजावर मीन राशीचा १६ वा अंश उदित असून लोकपक्षकारक चंद्र उदयोन्मुख आहे. चंद्र व मंगळ यांचा प्रतियोग होऊन गेलेला आहे म्हणून त्याची अनिष्टता कांहीं अंशानें कमी झाली असून शनि व शुक्र हे दोन्ही ग्रह चंद्राबरोबर नवपंचमयोग करीत आहेत. या योगांमुळें सार्वजनिक हिताकरतां लोकांकडून विशेष प्रयत्न होतील. चंद्र पंचमाचा अधिपति असल्यामुळें शिक्षणविषयक गोष्टींची विशेष चर्चा होईल. पंचमेश चंद्र मंगळानें बिघडला असून शनि, शुक्र व नेपच्युन हे ग्रह पंचमांत असल्यामुळें शिक्षणसंस्थांची स्थिति समाधानकारक रहाणार नाहीं; विशेषतः स्त्रीशिक्षणाच्या संस्थांसंबंधानें असमाधानकारक गोष्टी घडतील; देशांतील लहान मुलांच्या मृत्युसंख्येची वाढ होईल. पंचम स्थानांतील नेपच्युन व धन स्थानांतील गुरु यांचा केंद्रयोग होत आहे म्हणून सट्टयाचा व्यवहार करणाऱ्या लोकांची स्थिति अनिष्ट होईल.

प्रस्तुत संक्रमणकाळीं धनस्थानांतील गुरूबरोबर नेपच्युनचा जरी अशुभ योग होत आहे तरी रवीचा शुभयोग होत असल्यामुळें सांपत्तिक स्थिति निदान जुलै महिन्यामध्यें तरी समाधानकारक राहील. ३० जुलै रोजीं होणाऱ्या रवि-चंद्र संयोगकाळीं धन स्थानांत तूळ राशीमध्यें मंगळ असून शुक्राबरोबर केंद्रयोग करीत आहे व तो मेषसंक्रमणकालीन रवि व गुरूबरोबर प्रतियोग करीत आहे. आगष्टच्या १८ व्या तारखेस मंगळ मेषसंक्रमणकालीन अष्टमस्थ चंद्राबरोबर युतियोग करीत आहे त्यामुळें या महिन्यामध्यें पेढ्या, बँका, कंपन्या व शेअर बझार यांची तारांबळ उडेल.

मेषसंक्रमणकाळीं बुध थोडाबहुत पीडित असून कर्कसंक्रमणाच्या वेळीं तर बुध–मंगळांचा केंद्रयोग होत आहे. कर्कसंक्रमणानंतर होणाऱ्या पहिल्याच रवि–चंद्र–संयोगकाळीं बुध–मंगळांचा केंद्रयोग कुंडलीच्या केंद्रांतून होत आहे. ह्या योगांमुळें लेखक, वृत्तपत्रकार, वक्ते वगैरे लोकांस या काळामध्यें फार त्रास होईल. बुध–मंगळाच्या केंद्रयोगानें वादविवाद, टीका, कडक लेख, कडक भाषणें, बेअब्रूच्या फिर्यादी, वृत्तपत्रकारांजवळून जामीन घेणें, वृत्तपत्रें बंद पडणें वगैरे गोष्टी घडतात. ३० जून रोजीं होणाऱ्या रवि–चंद्र–संयोगकाळीं मंगळ कन्येंत असून दशमांतून बुधाबरोबर केंद्रयोग करीत आहे. कन्या राशीचा अंमल पुणे शहरावर असल्यामुळें वरील प्रकार तेथें होण्याचा संभव अधिक आहे. हा काळ साधारणपणें सार्वजनिक असंतोषाचा जाईल, असंतोषप्रदर्शक भाषणें, लेख वगैरे देशभर होतील.

मेषसंक्रमणकाळीं बुध नीच राशींत असून मंगळाबरोबर षडाष्टक योग करीत होता व ज्यावेळीं गोचरीचा मंगळ कन्येंत येऊन या बुधाबरोबर प्रतियोग करूं लागला त्या वेळीं प्रेस ॲक्टाखालीं कांहीं वृत्तपत्रकारांकडून जामीन घेण्यांत आले हें विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे व त्यानंतर प्रस्तुतच्या संक्रमणकाळीं बुध-मंगळांचा केंद्रयोग होत आहे त्यामुळें ॲक्टाखालीं जामीन घेण्याचें काम अधिक चालेल असें वाटतें. मेषसंक्रमणकालीन अष्टमस्थ चंद्राबरोबर प्रस्तुत संक्रमणाचा अंमल असेपर्यंत शनि-मंगळ हे केंद्रयोग व युतियोग करीत आहेत. त्यामुळें मृत्युसंख्येचें प्रमाण अतिशय वाढेल. आगष्ट महिन्याच्या उत्तरार्धांत एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचा मृत्यु होणें संभवनीय आहे. सपटेंबर महिन्यामध्यें रेल्वेवर अपघात होण्याचा संभव आहे.

राम नारायण.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्दाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाच सेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्ति विद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. | आगष्ट १९१६. | अंक ५ वा.


## विविध कुंडलीसंग्रह.

पुढें दिलेली कुंडली एका विवाहित स्त्रीची असून तिची खालीलप्रमाणें हकीकत आहे. सदरहू कुंडली आमचेकडे सिरोसि–राजपुताना येथील एक मालेचे हितचिंतक व वर्गणीदार ह्यांनीं बऱ्याच दिवसांपूर्वी पाठविली होती परंतु जागेच्या अभावामुळें आजपावेतों ह्या कुंडलीस स्थल देतां आलें नाहीं. अशाच निरनिराळ्या विचित्र कुंडल्या मालेचे इतर वाचक प्रसिद्धीकरितां पाठवितील अशी आशा आहे.

" ह्या स्त्रीचें लग्न ११ व्या वर्षी झालें असून अद्याप पावेतों पतिसुखाचा अनुभव नाहीं. नवरा जिवंत असून पतिसुख मिळालें नाहीं. त्याचप्रमाणें तिनें पतीचे घराचा उंबरठा देखील पाहिला नाहीं. सोळाव्या वर्षाचे सुमारास तिला मस्तक दुःखण्याचा भयंकर आजार झाला व तो बळावत जाऊन आज ३०।३५ वर्षे अर्धांग वायूसारख्या विकारानें आजारी आहे. हात, पाय व डोळे हे सर्व त्या वेळेपासून अधु झाले असून त्यांचा कांहींच उपयोग

( १ )

सा. ल.




करितां येत नाहीं. क्षुधा लागत नसून शौच्यास मुळींच होत नाहीं. हल्लीं साधा फळाहार करून नंतर तो ओकून टाकावा लागत असून मल उत्सर्जक इंद्रियांचा मुळींच उपयोग होत नाहीं. दिव्यदृष्टि देवीचा वास शरीरांत असल्याचें म्हणतात. डोळ्यानें दिसत नाहीं तरी श्रीमद्गीता वगैरे पुस्तकें वाचतां येतात. ह्या स्त्रीचे आईबाप व एक भाऊ मरण पावले असून हल्लीं एका भावाजवळ आहे. हल्लीं जिव्हा देखील जड झाली असून स्पष्ट बोलतां येत नाहीं. इत्यादि. ”


कुंडलींत जन्मकालीं अनिष्ट योग फार झाले आहेत. रवि हर्शल हे युतीमध्यें असून दोघांची क्रांति सारखी आहे व कर्कराशीमधील असलेले रवि, चंद्र, हर्शल हे नेपच्युन बरोबर केन्द्रयोग करीत आहेत. बुध, शुक्र, चंद्र व शनि ह्या ग्रहांची क्रांति सारखी असल्यामुळें हे सर्व ग्रह क्रांतिदृष्टीमध्यें आहेत. हस्तपादादि अवयवांच्या द्योतक राशी-मिथून, कन्या, धनु व मीन



ह्यांपैकीं मीनखेरीज बाकी सर्व राशींमध्यें पापग्रह आहेत. लग्नीं बुध असून मंगळाबरोबर केन्द्रयोग करीत आहे. कर्कराशीमधील रवि, हर्शल व चंद्र पीडित आहेत. हा योग विशेष महत्वाचा आहे. कर्क राशीचा अंमल जठरावर असून ह्या राशीमधील ग्रह जठरक्रियेमध्यें विकृती दर्शवितात. स्त्रियांचे कुंडलींत रवि पीडित असतां भर्तृसुख चांगलें मिळत नाहीं. त्यांत विशेषतः रवि स्त्रियांचे कुंडलींत हर्शल बरोबर योग करीत असतां विचित्र अनुभव पाहण्यास मिळतो. रवि हा शनीबरोबर १३५ अंशांचा अशुभ दृष्टियोग करण्यास जात आहे. शुक्र शनीबरोबर समक्रांतियोग करीत आहे. हे सर्व योग भर्तृसुखास विघातक झाले आहेत. सर्व ग्रहांत नेपच्यून उदित भागांत असून कर्क ह्या जलराशीमध्यें रवि-हर्शल-चंद्रांचा योग झाला असल्याकारणानें दिव्यदृष्टि असणें व देवीचा वास होणें संभवतें. वरील योग सायकीक बॉडी व ॲस्ट्रल साईट देतात. ‘ सं. ’

( २ )

सा. ल.




ही एका स्त्रीची कुंडली आहे. तारीख ४ जानेवारी १९०७ रोजीं

नवऱ्याचा प्लेगनें मृत्यु झाला. व हातावर ट्यूबरक्युलासीस झाल्यामुळें हातावर ऑपरेशन करावें लागलें. नंतर तारीख १० ऑक्टोबर १९१६ रोजीं हात कापून काढावा लागला.

सप्तमाधिपति गुरु हर्शलनें युक्त असून लग्नेश बुध व शनि यांबरोबर केंद्रयोग करीत आहे. स्त्रियांचे कुंडलींत भर्तृसुखाचा विचार करते वेळीं रवीचा विशेष विचार करावा लागतो, त्याप्रमाणें पाहतां रवीनें मंगळाबरोबर होत असलेला केंद्रयोग सोडून तो गुरु, हर्शल व शनि यांबरोबर केंद्रयोग व प्रतियोग करण्यास जात आहे. कुंडलींत रवि हा बुधशनींबरोबर जन्मकाळीं समक्रांतिदृष्टियोग करीत आहे. सप्तमांत केतू असून सप्तमस्थान मंगळानें दृष्ट आहे. याप्रमाणें भर्तृसुखास विघातक योग झाल्यामुळें वैधव्य प्राप्त झालें. भर्तृनाशाचे वेळीं खालीलप्रमाणें गोचर ग्रहांचीं भ्रमणें व दिनवर्ष पद्धतीचे योग आढळतात. **रवि** समक्रांतियोग, **शनि** चलित व जन्मकालचा. **मंगळ** चलित केंद्रयोग जन्मकालचा रवि. **गुरु** चलित केंद्रयोग शनि जन्मकालचा. बुध चलित युति जन्मरवि. **रवि** व चंद्र वार्षिक मकर राशीमध्यें होते व ह्यांचेवरून गोचरीच्या हर्शलचें भ्रमण चाललें होतें. शनि गोचरीनें चंद्रावरून भ्रमण करीत होता. दैनिक नेपच्यूनचें भ्रमण चलित रविचंद्रांसमोरून कर्क राशींमधून होत असून त्याची व हर्शलची क्रांति चलित रवि एवढीच होती. ह्या वर्षी गुरूचें भ्रमण कर्कराशींतून होत असून तो मूळच्या चंद्राला पांचवा असतां भर्तृनाश झाला !!

द्विस्वभाव राशींचा—मिथून, कन्या, धनु, व मीन—अंमल हस्त व पाद यांवर असल्याचें मागल्या कुंडलींत सांगितलें. त्याप्रमाणें येथें मंगळ, रवि व चंद्र द्विस्वभाव राशीमध्यें असून पीडित आहेत; त्याच प्रमाणें बुध पीडित आहे म्हणून हातावर ऑपरेशन व कापण्याचा प्रसंग आला.



## स्फुट विचार.

(९) लग्नीं **मंगळ शनीनें** पीडित असतां-म्हणजे लग्नांतील मंगळ शनीबरोबर केन्द्र, पूर्णदृष्टियोग किंवा युतिदृष्टियोग करीत असतां फारच वाईट फळें पाहण्यास मिळतात. हीं माणसें फार रागीट व खुनशी असून संकटकाळीं आत्महत्या देखील करितात.

(१०) ज्यांचे जन्मकाळीं **शनि** लग्नकेन्द्रीं उदय पावत असून तो शुक्राबरोबर केन्द्र, पूर्ण दृष्टियोग किंवा युतिदृष्टियोग करीत असेल तर तीं माणसें कुकर्मी व अनीतिपथ सेवणारीं असून आपल्या निंद्य वर्तनामुळें छीथू पावतात.

(११) ज्यांच्या जन्मकालीं **मिथुन, कन्या** किंवा **कुंभ** ह्यांपैकीं एखादी राशि लग्नीं उदय पावत असते तीं माणसें विद्याव्यासंगी व बौद्धिक कामाची आवड बाळगणारीं आढळतात. व ह्या राशींतच लग्नीं बुध उदय पावत असून पीडित नसेल तर तीं माणसें फार विद्वान, बुद्धिमत्तेनें श्रेष्ठ दर्ज्याचीं, हुशार व चतुर आढळतात.

(१२) ज्यांचे जन्मकाळीं बुधशुक्रयुति किंवा तृतीय एकादश योग करीत असलेले आढळतात त्या माणसांस कलाकौशल्याची किंवा गाण्याची नैसर्गिक आवड असलेली पाहण्यास मिळते. व त्याच वेळीं **शुक्र** हा **नेपच्यून** (वरुण) व **मंगळाबरोबर** शुभसंबंधित असतां—तृतीय एकादश किंवा नवपंचम दृष्टियोग करीत असतां वरील दर्शविलेली कलाकौशल्य व गायनाची आवड उच्च दर्जाची आढळते. हीं माणसें स्वतः कवनें करणारीं आढळतात.

(१३) जन्मकाळीं बुध **मंगळामध्यें** होत असलेला शुभ दृष्टियोग बुद्धीची तीक्ष्णता, किंवा तीव्रता वाढवितो व ह्या योगावर जन्म पावलेली मंडळी कुशाग्र बुद्धीची, किंवा तीव्र बुद्धीची असून कोणताही विषय सहज आकलन करणारी असते. बुधमंगळांमध्यें होत असलेला अशुभ दृष्टियोग—केन्द्र किंवा पूर्ण दृष्टियोग—हे बुद्धीमध्यें तीव्रता दर्शवितात परंतु असल्या लोकांचा स्वभाव फारच रागीट असून ह्यांच्या तीव्र बुद्धीचा उपयोग वाईट कामाकडे झालेला बराच पाहण्यास मिळतो.

(१४) बुधगुरूंमध्यें जन्मकालीं शुभ दृष्टियोग होत असतां बुद्धिमत्ता उत्तम दर्शवितो व ह्या माणसामध्यें सदसद्विवेक बुद्धि, गुणदोषविवेचक शक्ति व मनशक्ति उत्तम तऱ्हेची आढळते. वरील प्रमाणें जन्मकालीं बुधगुरूंमधील झालेला शुभयोग श्रेष्ठ बुद्धिमत्ता व ज्ञानीपणा दर्शवितो.

(१५) बुधहर्शलमध्यें जन्मकालीं शुभ दृष्टियोग होत असलेलीं माणसें उत्तम कल्पक, हुशार, स्वतः नवीन शोध लावण्याची आवड बाळगणारीं, वाचनाभिरुची असणारीं, अध्यात्म किंवा गूढ शास्त्राची आवड बाळगणारीं आढळतात. ग्रंथकार किंवा लेखक ह्यांचे कुंडलींत बुध हर्शलमध्यें शुभ दृष्टियोग असतां स्वतंत्र विचार, नाविन्य, कल्पकता व बाणेदारपणा हा चांगल्या प्रकारानें पाहण्यास मिळतो. व ह्या माणसांस लेखन व्यवसायापासून उत्तम नांवलौकिक मिळतो.

(१६) जन्मकालीं रवि किंवा गुरु धनस्थानांत किंवा दशमांत असून एकमेकांबरोबर शुभ दृष्टियोग करीत असतां किंवा वरीलप्रमाणें असून चंद्राबरोबर शुभ दृष्टियोग करीत असतां सांपत्तिक स्थिति चांगल्या प्रकारची असलेली पाहण्यास मिळते.

(१७) रविचंद्रामध्यें तृतीय एकादश किंवा नवम पंचमयोग असतां धंद्यांत चांगल्या प्रकारची प्राप्ती होते व ह्यांपैकीं एक दशमांत किंवा धनस्थानांत असून वर सांगितल्याप्रमाणें शुभसंबंधित असतां सांपत्तिक सुख चांगल्या प्रकारचें मिळतें.

(१८) धनस्थानांत शुभसंबंधित असलेला शुक्र सांपत्तिक स्थितीस चांगला पोषक असतो. परंतु धनस्थानांत शुक्र किंवा गुरु पीडित असून रवि किंवा चंद्राबरोबर केन्द्रयोग असतां दारिद्र्ययोग दर्शविला जातो.

(१९) ज्यांचे जन्मकालीं चंद्र हा रवीबरोबर अशुभ संबंध करीत असेल अशा माणसांनीं सहसा मोठाले व्यापारधंदे स्वतःच्या जबाबदारीवर करूं नयेत. आणि जर कां चंद्र शनीनें पीडित असून गुरूबरोबर तृतीय एकादश किंवा नवम पंचम वगैरे कोणताच योग करीत नसेल तर असल्या लोकांस धंद्यांत बूड व अपयश ही खात्रीनें अनुभवास येतात.



# ग्रहांचें बल कसें पहातात ?

( मागील अंकावरून पुढें चालू )

**लेखकः—राम नारायण.**

ज्या ग्रहांमध्यें केंन्द्रयोग होतो ते ग्रह एकमेकांचे तात्कालिक मित्र होतात आणि ज्या ग्रहांमध्यें नवपंचम योग होतो ते ग्रह तात्कालिक शत्रु होतात हा शोध आमच्या अनुभवाच्या अगदीं विरुद्ध आहे. जे ग्रह एकमेकांच्या तृतीय लाभस्थानीं असतात ते ग्रह तात्कालिक मित्र होतील यांत शंका येण्याचें कारण नाहीं. नैसर्गिक व तात्कालिक मित्रामित्रत्वाच्या संमेलनानें अधिमित्र, मित्र, सम, शत्रु व अधिशत्रु अशा संज्ञा देऊन पूर्व ग्रंथकार या मित्रबलाचा अगदीं कीस काढतात परंतु हा मित्रत्व पहाण्याचा प्रकार शास्त्रशुद्ध नसल्यामुळें त्यापासून कांहीं फलनिष्पत्ति होईल अशी अपेक्षा करणें चुकीचें होईल.

मित्रबलाचा फलनिर्णयाच्या कामीं कांहीं प्रसंगीं अगदीं विपरीत अनुभव येतो. यासंबंधानें एक उदाहरण येथें देतो.—एका कुंडलीमध्यें दशम स्थानांत कर्केचा मंगळ असून दशमेश चंद्र सप्तम स्थानामध्यें आहे. दशमांतील मित्रराशीच्या मंगळाच्या दशमांत चंद्र आहे. म्हणजे मंगळ अधिमित्र क्षेत्रीं आहे. अर्थात अधिमित्र क्षेत्रीं असणाऱ्या ग्रहाची तो ज्या स्थानांत आहे त्या स्थानासंबंधी कांहीं तरी शुभ फलें अनुभवास यावयास पाहिजे होतीं. या अधिमित्र क्षेत्रबलाच्या जोडीला चंद्र—मंगळांच्या अन्योन्य योगाचेंही बल असून सुद्धां दशम स्थानासंबंधीं शक्य तितकीं अशुभ फलेंच अनुभवास आलीं आहेत !

आणखी एक उदाहरण पहा. एका कुंडलीमध्यें तूळ राशीचा गुरु असून मिथुनेंतील शुक्राच्या पंचमांत आहे. म्हणजे गुरु अधिशत्रुक्षेत्रांत आहे. या कुंडलीमध्यें गुरूचीं शुभ फलें बऱ्याच अंशानें कमी व्हावींत असें म्हणण्याची पाळी येईल. परंतु अनुभव मात्र निराळाच येत आहे !

**( ५ ) स्वनवांश बलः**—" स्वनवांशकबलयुक्तो करोति पुरुषं

प्रसिद्धं च " स्वनवांशबल हें पूर्वाचार्यांच्या मताप्रमाणें पांचवें बळ आहे. एखाद्या ग्रहास उच्च, त्रिकोण, स्वगृह किंवा मित्रक्षेत्र यांपैकीं कोणतेंच बल नसून स्वनवांशबल असेल तर तो ग्रह बलवान समजतात. दश वर्गांतील नवमांशास विशेष महत्व दिलें आहे. कांहीं ज्योतिषी तर लग्नकुंडलीमध्यें ( उच्च, स्वगृहादि ) राशिबल असणाऱ्या ग्रहास सुद्धां नवमांश बल नसेल तर त्या ग्रहाचें बल विशेष महत्वाचें नाहीं असें समजतात. लग्नकुंडलीमध्यें ग्रह जर स्थानबली व राशिबली ( उच्च, स्वगृहीं किंवा स्वतत्वाच्या राशींत ) असेल आणि नवमांशांत सुद्धां स्वराशीमध्यें किंवा उच्च राशीमध्यें असल्यास उत्तम परंतु तसा नसल्यास लग्नकुंडलींतील ग्रहाच्या बलवत्तरपणास कमीपणा येतो असें नाहीं आणि कुंडलींतील **बलहीन** ग्रहास नवमांशबल किंवा दशवर्गांतील इतर बलें मिळालीं तर त्याचें महत्व वैशिष्यानें वाढतें असेंही आम्हांस वाटत नाहीं. मूळ कुंडलींतील ग्रहांच्या बलास नवमांशाचें अगर दुसऱ्या कोणत्याही वर्गाचें बल सहायक होतें असें दशवर्गाचा विचार केला असतां वाटतें. ग्रहांच्या राशिबलांमध्यें आर्य ज्योतिषामध्यें **दशवर्गाचा विचार** विशेष केला आहे म्हणून त्याचा विचार आतां करूं. ह्या दशवर्ग विचारामध्यें पूर्वाचार्यांच्या मतानें पांचवें जें नवमांश बल त्या संबंधानें टीकेदाखल आम्हांस जें लिहावयाचें आहे तें लिहूं.

प्रस्तुत काळीं आर्य ज्योतिषशास्त्रामध्यें ' वर्गांची संख्या ' दहा आहे हें प्रसिद्धच आहे परंतु वराहमिहिराच्या बृहज्जातकामध्यें ' वर्ग ' दहा नसून सहा आहेत. वराहमिहिराच्या पूर्वीं झालेल्या आचार्यांनीं वर्ग दहा मानिले असून सुद्धां वराहमिहिर वर्ग सहाच देईल हें संभवनीय नाहीं आणि भटोत्पलानें बृहज्जातकाच्या पहिल्या अध्यायांतील नवव्या श्लोकावर टीका करतांना गर्गऋषींचा एक श्लोक* उद्धृत केला आहे त्यावरून वर्ग संख्या सहाच होती आणि हल्लीं प्रमाणें दहा नव्हती असें दिसतें. हे सहा वर्ग म्हणजे ( १ ) लग्न ( २ ) होरा ( ३ ) द्रेष्काण ( ४ ) नवांश ( ५ )

* क्षेत्रं होराथ द्रेष्काणो नवांशो द्वादशांशकः ॥
त्रिंशांशकश्च वर्गोयं सर्वस्य स्व उदाहृतः ॥



द्वादशांश व ( ६ ) त्रिंशांश हे होत. वराहमिहिरानंतर आणि भटोत्पलाच्या पूर्वीं झालेल्या कल्याणवर्म्याच्या सारावलीमध्यें वर्गसंख्या दहा नसून सात आहे. सारावलीमध्यें ( अध्याय ३–१६ ) वराहमिहिर व त्याच्या पूर्वीं झालेले आचार्य यांच्या षड्वर्गांत ( ७ ) सप्तमांशाची भर पडली आहे. सारावलीनंतर झालेल्या ग्रंथांमध्यें सप्त वर्गाचे दशवर्ग झाल्याचें दिसून येतें. ह्या अधिक वाढलेल्या वर्गांचीं नांवें ( ८ ) दशांश ( ९ ) षोडशांश आणि ( १० ) षष्ट्यंश अशीं आहेत. वराहमिहिरानीं व त्याच्या पूर्वीं झालेल्या आचार्यांनीं सांगितलेले षड्वर्ग व हल्लीं प्रसिद्ध असलेले दशवर्ग कसे तयार करावे यासंबंधानें मराठी भाषेंत पांच पंचवीस ठिकाणीं माहिती आलेली आहे त्यामुळें ती येथें देण्याचें कारण नाहीं. फक्त दशवर्गाचें प्रयोजन काय व त्यासंबंधानें आमचा अल्प अनुभव काय आहे हें येथें नमूद करतों.

प्रथम ग्रहांचें बल अगदीं सूक्ष्म रीतीनें कळण्याकरितां आर्य ज्योतिषांनीं दशवर्ग तयार केले आणि त्यानंतर दशवर्गांच्या कुंडल्या मांडून त्यावरून फल निर्णय करण्याचा मार्ग निघाला. बृहज्जातक व सारावली यांमध्यें षड्वर्ग किंवा सप्तवर्ग यांच्या कुंडल्यांचा विचार करण्यास सांगितलें नाहीं. एखादा ग्रह दशवर्गांपैकीं दोन किंवा दोहोंपेक्षां अधिक वर्गांमध्यें बलवान असल्यास ज्या पारिजातादि संज्ञा दिल्या आहेत त्या संज्ञाही वरील दोन ग्रंथांमध्यें कोठेंच आढळून येत नाहींत. सारांश दशवर्गासंबंधाच्या पारिजातादि संज्ञा आणि त्यांच्या कुंडल्यांचा फलनिर्णयक विचार हे वराहमिहिर व सारावलीकार यांच्या नंतर प्रचारांत आले आहेत. त्यांच्या पूर्वीं हे प्रचारांत असतील असें वाटत नाहीं. वरील दोन मान्य आचार्यांनीं जे राजयोग सांगितले आहेत त्यांमध्यें सुद्धां एखादा ग्रह षड्वर्ग बली असेल तर राजयोग घडेल असें लिहिलेलें आढळत नाहीं. सारावलीकारानें राजयोगाध्याय अति विस्तृत लिहिला आहे परंतु त्यामध्यें ग्रह नवमांश बली किंवा वर्गोत्तमी असतील तर राजयोग घडतो यापेक्षां षड्वर्ग किंवा सप्त वर्ग यांपैकीं दुसऱ्या वर्गासंबंधानें सांगितलें नाहीं. आर्य ज्योतिषवाङ्मयामध्यें

वराहमिहिर व सारावलीकार हे अत्यंत विश्वसनीय ग्रंथकार आहेत आणि त्यांच्या ग्रंथांमध्यें हल्लीं प्रचलित असलेला दशवर्गविचार आढळून येत नाहीं एवढ्याच कारणावरून दशवर्गविचार ग्राह्य नाहीं असें कोणी विचारी ज्योतिषी म्हणणार नाहीं. त्यासंबंधानें अनुभव काय येतो हें अवश्य पाहिलें पाहिजे.

दशवर्गाची योजना ग्रहांचीं बलें सूक्ष्मतेनें कळावीं येवढ्याकरितां झाली आहे हें वर सांगितलेंच आहे. ग्रहांचें बल सूक्ष्मतेनें कळणें कसें शक्य आहे याचें एक उदाहरण घेतों. आपल्या पुढें दोन कुंडल्या अशा आहेत कीं दोहींमध्येंही मेषराशीचे मंगळ आहेत परंतु त्यांचे अंश भिन्न आहेत. आतां दुसरें कोणतेंही बल ( स्थान, दृष्टि किंवा योग ) लक्ष्यांत न घेतां केवळ राशींचाच विचार करून या दोन मंगळांमध्यें अधिक बलवान कोण आहे हें दशवर्गावरून ठरवितां येतें. दशवर्गापैकीं जितक्या वर्गामध्यें ग्रह उच्च किंवा स्वगृहीं असेल त्याप्रमाणें त्यास संज्ञा दिलेल्या आहेत. त्या संज्ञा पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—

ग्रह दोन वर्गामध्यें बलवान असल्यास पारिजातांश योग असतो.

| | | | |
|---|---|---|---|
| ” तीन | ” | उत्तमांश | ” |
| ” चार | ” | गोपुरांश | ” |
| ” पांच | ” | सिंहासनांश | ” |
| ” सहा | ” | पारावतांश | ” |
| ” सात किंवा आठ | ” | देवलोकांश | ” |
| ” नऊ | ” | ऐरावतांश | ” |
| ” दहा | ” | वैशेषिकांश | ” |

‘ सर्वार्थचिंतामणी ’ मध्यें पारिजातांशादि योगांचीं फलें पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—

ऐरावतांशः—सार्वभौम राज्य करणारा व सर्वैश्वर्यसंपन्न.

देवलोकांशः—महादान देणारा व पृथ्वीपती.

पारावतांशः—मांडलिक राजा व सर्वशास्त्रसंपन्न.



सिंहासनांशः—सर्व लोकांत मान्य व सामान्य भूपति.

गोपुरांशः—सर्वशास्त्रनिपुण व नित्य धनवान.

उत्तमांशः—संपत्तिमान.

पारिजातांशः—धनाढ्य.

वर दिलेल्या ऐरावतांशादि योगांचीं फलें पुष्कळ अंशीं विशेषत्वानें लिहिलेलीं आहेत. कोणत्याही ग्रहाला दशवर्गातील मिळणाऱ्या वर्गाची प्रतवारी लावण्याकरितां ह्या संज्ञा उपयोगांत आणल्या आहेत. सामान्य मनुष्यांच्या कुंडल्यांमध्यें उत्तमांशापर्यंत ग्रह बलवान आढळतात. गोपुरांशापासून पुढच्या अंशांत असणारे ग्रह फारच थोड्या कुंडल्यांमध्यें पहावयास सांपडतात. **दशवर्ग बल पहातांना ग्रह लग्न कुंडलींत बलवान आहे किंवा नाहीं आणि तो कोणत्या स्थानाचा अधिपति आहे हें अवश्य पाहिलें पाहिजे.** लग्नकुंडलींतील केंद्र किंवा कोण यांचा अधिपति बलवान असून गोपुरादि अंशांत असेल तरच कांहीं विशिष्ट फलें पहावयास सांपडतील. षष्ठ, अष्टम व व्यय या स्थानांचे अधिपति किंवा निर्बल ग्रह गोपुरांशादि योगीं असल्यास त्यांचीं फलें अनुभवास येणार नाहींत. सारांश लग्न कुंडलींतील ग्रहबलास दशवर्ग बल सहायक होतें आणि ग्रहांच्या इतर बलावरोवर दशवर्ग बल विचारांत घेतलें तर फलांमध्यें थोडाबहुत तरी सूक्ष्मपणा येईल असें आम्हांस वाटतें.

सप्तग्रहांपैकीं जो ग्रह स्थानबली व राशिबली असून गोपुरांशादि योगीं असेल तर तो ग्रह ज्या गोष्टींचा कारक आहे त्या गोष्टींची समृद्धि विशेषत्वानें दिसून येईल. मेष किंवा सिंह राशीचा **रवि** स्थानबली असून गोपुरादि अंशांत असेल तर महत्पद प्राप्ति होईल; कर्क किंवा वृषभ राशींतील स्थानबली **चंद्र** गोपुरादि अंशांत असेल तर वैभवशाली व लोकनायक होईल; स्वराशीचा किंवा तूळ–कुंभ राशींतील स्थानबली **बुध** गोपुरांशादि योगीं असेल तर उत्तम ग्रंथकार व वक्ता होईल, स्वराशीचा किंवा उच्च **शुक्र** स्थानबली असून गोपुराद्यंशांत असेल तर राजवैभव व अनेक प्रकारचे भोग प्राप्त होतील; स्वराशीचा किंवा उच्च असा स्थानबली **मंगळ** गोपुरांशादि योगीं

असेल तर सेनापती, उच्च अधिकारी किंवा अप्रतीम सर्जन किंवा डाक्टर होईल; स्वराशीचा किंवा उच्च **गुरु** स्थानबली असून गोपुरादि अंशांत असेल तर महापंडित, संपत्तिमान किंवा राजमंत्री होईल आणि स्वराशीचा किंवा उच्च **शनि** स्थानबली असून गोपुरायंशांत असेल तर श्रेष्ठ दर्जाचा राजसेवक, किंवा तत्वज्ञ किंवा योगी होईल.

कर्तृत्ववान व्यक्तींच्या कुंडल्यांमध्यें ग्रह स्थानबली व राशिबली असतात त्याचप्रमाणें ते दशवर्ग बलीही असतात असें आढळून येतें. ज्योतिर्मालेच्या पहिल्या वर्षामध्यें प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्या दिल्या आहेत त्यांमध्यें ग्रह स्थानबली व राशिबली असून दशवर्गबलीही आहेत हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. **स्वामी विवेकानंद** यांच्या कुंडलीमध्यें लग्नेश शनि धर्म ( नवम ) स्थानांत उच्च असून उत्तमांशांत, पंचमेश बुध लग्नीं असून गोपुरांशांत आणि वाक्‌स्थानाधिपति गुरु नवमांत असून गोपुरांशांत आहे. वाणीचा कारक ग्रह बुध आणि वाक्‌स्थानाधिपति गुरु हे इतर बलानें युक्त असून गोपुरांशांत असल्यामुळें स्वामींचें वक्तृत्व असामान्य होतें. बुध ग्रहाचें दशवर्ग बल पहातांना तूळ व कुंभ या राशींत असल्यास वर्गबल द्यावें असें आम्हांस वाटतें. व बाकीच्या ग्रहांचीं उच्च व स्वगृह यांचेंच बल लक्ष्यांत घ्यावें व मागें ज्या नऊ प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्या प्रसिद्ध केल्या आहेत त्यांपैकीं ज्यांची वक्तृत्वाबद्दल ख्याति आहे अशा व्यक्तींच्या कुंडल्यांतील वक्तृत्वाचा कारक ग्रह बुध व वाक्‌स्थानाचा अधिपति यांचे दशवर्ग पुढें लिहिल्याप्रमाणें आहेतः

| | बुध | वाक्‌स्थानाधिपति |
|---|---|---|
| विवेकानंद | गोपुरांश. | गोपुरांश. |
| ग्लॅडस्टन | पारिजातांश | गोपुरांश |
| गोखले | उत्तमांश | गोपुरांश |
| वेंझटबाई | उत्तमांश | पारिजातांश |
| तेलंग | सिंहासनांश | उत्तमांश |
| फेरोजशहा | सिंहासनांश | पारिजातांश |
| दादाभाई | पारावतांश | पारिजातांश |



वर दिलेल्या सातही व्यक्तींच्या कुंडल्यांमध्यें वक्तृत्वाचे योग स्पष्ट असून वक्तृत्वकारक ग्रहास दशवर्गबलही आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मागील अंकांत ९२ पानावर जी कुंडली दिली आहे ती महाराष्ट्रांतील एका प्रसिद्ध व लोकमान्य व्यक्तीची आहे. त्या कुंडलींतील रवि वैशेषिकांशांत आहे !

वर दिलेल्या उदाहरणावरून दशवर्ग हे ग्रहबल ठरविण्याच्या कामी उपयोगी पडतात असें आम्हांस वाटतें. वाचकांना त्यासंबंधानें आजपर्यंत जो अनुभव आला असेल किंवा पुढें येईल तो प्रसिद्ध केल्यास ज्योतिषविद्यार्थ्यांवर उपकार होतील.

दशवर्गापैकीं लग्नाशिवाय बाकी राहिलेल्या वर्गांमध्यें महत्वाचे वर्ग कोणते व गौणवर्ग कोणते हा एक प्रश्न येतो. पूर्व ग्रंथकारांच्या मताप्रमाणे नवमांश वर्ग अतिशय महत्वाचा आहे त्यानंतर द्वादशांश वर्ग महत्वाचा आहे असें आम्हांस वाटतें; इतर वर्गासंबंधानें नक्की कांहींच सांगतां येत नाहीं. सुलभ जातक भाग ३ रा ( पान ९७ ) यामध्यें षष्ट्यंशास महत्व दिलें आहे. महत्वाचे वर्ग कोणते हें अनुभवानें ठरवितां आलें तर ग्रहांच्या बलासंबंधानें सूक्ष्मता येईल म्हणून वाचकांनीं या प्रश्नाकडे लक्ष्य द्यावें.

दशवर्गाच्या कुंडल्यांवरून फलादेश सांगणें हाही एक प्रकार प्रचारांत आहे. ह्या प्रकारास 'अंश पद्धति' असें म्हणतात. दशवर्गाच्या निरनिराळ्या कुंडल्यांवरून कोणकोणत्या गोष्टींचा विचार करावा म्हणून सांगितलें आहे तें येणें प्रमाणेंः—

| | |
|---|---|
| (१) लग्नकुंडली—शरीरज्ञान. | (६) दशांश—महत्फल. |
| (२) होरा—संपत्ति. | (७) द्वादशांश—पितर. |
| (३) द्रेष्काण—भावंडांचें सौख्य. | (८) षोडषांश—वाहनसौख्य. |
| (४) सप्तमांश—पुत्र व पौत्र. | (९) त्रिंशांश—अरिष्ट. |
| (५) नवमांश—पत्नी किंवा पति. | (१०) षष्ठ्यंश—बाकी सर्व. |

लग्नकुंडलीचा ज्याप्रमाणें विचार करतात त्याप्रमाणेंच या सर्व कुंडल्यांचा विचार करतात आणि त्याप्रमाणें त्यांचीं फळें वर्तवितात. होरा कुंड-

ळीमध्यें फक्त दोनच स्थानांमध्यें ग्रह येतात. त्यावरून सांपत्तिक योगाची कल्पना करतात. होराकुंडलीवरून सात प्रकारचे धनयोग होतात. (१) सर्वच ग्रह धनस्थानीं असतां पहिल्या दर्जाचा धनयोग होतो (२) धनस्थानीं पुष्कळ ग्रह व प्रथम स्थानीं थोडे ग्रह असतां दुसऱ्या दर्जाचा धन योग होतो. (३) धनस्थानीं थोडे ग्रह व प्रथम स्थानीं पुष्कळ ग्रह असल्यास तिसऱ्या दर्जाचा धनयोग होतो. (४) सर्व ग्रह प्रथम स्थानीं असल्यास चवथ्या दर्जाचा धनयोग होतो. (५) प्रथम स्थानीं पुष्कळ ग्रह व व्ययस्थानीं थोडे ग्रह असल्यास पांचव्या दर्जाचा धनयोग होतो. (६) व्यय स्थानीं पुष्कळ ग्रह व प्रथम स्थानीं थोडे ग्रह असल्यास सहाव्या दर्जाचा धनयोग होतो. (७) सर्वच ग्रह व्ययस्थानीं असल्यास सातव्या दर्जाचा धनयोग होतो. सहाव्या व सातव्या दर्जाचे धनयोग म्हणजे दरिद्रयोगच समजावे. होराकुंडलीवरून मनुष्यांच्या संपत्तीचा विचार कसा करावा याची कल्पना बाह्यतः तरी मोठी गोड दिसते. या कल्पने-प्रमाणें जर अनुभव येता तर या कल्पनेच्या उत्पादकास जगांतील सर्व ज्योतिषांनीं मोठा धन्यवाद दिला असता! परंतु कल्पकाच्या दुर्दैवानें म्हणा किंवा ज्योतिषांच्या दुर्दैवानें म्हणा होराकुंडलीचा अनुभव मात्र पुष्कळ ठिकाणीं अगदीं बिनचूक विरुद्ध येतो. सांपत्तिक स्थिति उत्तम असली म्हणजे व्ययस्थानांत अधिक ग्रह सांपडावयाचे आणि तीच जर वाईट किंवा साधारण असली तर धनस्थानांत अधिक ग्रह सांपडावयाचे असा विचित्र अनुभव आम्हांस आला आहे. गोखले यांच्या होराकुंडलींत धनस्थानांत पुष्कळ ग्रह आहेत तर तेलंगांच्या होराकुंडलींत व्ययस्थानांत अधिक ग्रह आहेत. रानडे, मेथा यांच्या होराकुंडल्यांमध्यें पांचव्या दर्जाचा धनयोग दिसून येतो तर दादाभाई नौरोजी यांच्या कुंडलींत दुसऱ्या दर्जाचा धनयोग झालेला आढळतो! ज्या मनुष्यांच्या सर्व आयुष्यांत महिना २५ रुपयांपेक्षां अधिक प्राप्ति कधींच झाली नाहीं त्यांच्या होराकुंडलीमध्यें धनस्थानीं सर्व ग्रह विराजमान झालेले आहेत असेंही एक उदाहरण आमच्या पहाण्यांत आलें आहे. ही स्थिति झाली होराकुंडलीची. बाकी राहिलेल्या आठ कुंडल्यां-



संबंधानेंही अशा कांहीं कुंडल्या आमच्या समोर आहेत कीं त्यांवरून वस्तुस्थितीच्या अगदीं विरुद्ध स्थिति दर्शविली जाते. म्हणून दशवर्गाच्या कुंडल्यांवर विश्वास ठेवितां येत नाहीं. आणि आमची अशी कल्पना आहे कीं जेव्हां निरयण गणनेवरून केलेल्या कुंडलीचा पुरेसा अनुभव येईना, वस्तुस्थिति किंवा घडलेल्या गोष्टी यांचा मेळ जन्मकुंडलीशीं जुळेना, त्या वेळीं दशवर्गाच्या कुंडल्यांवरून फलनिर्णय करण्याचा पंथ निघाला असावा. निरयण जन्मकुंडलीवरून दरिद्रयोग दिसत असतां जर वस्तुस्थिति तशी नसेल तर दशवर्गाच्या कोणत्या ना कोणत्या तरी कुंडलीचा आश्रय केलाच पाहिजे. आज होरा कुंडलीवरून सांपत्तिक स्थिति जुळवितां आली तर उद्यां नवमांश कुंडलीवरून जुळविण्याची खटपट करावी लागेल.

नवमांशांत जुळलें नाहीं तर द्वादशांत जुळेल. सारांश जुळवाजुळवी करण्याला दशवर्ग कुंडल्यांचा उपयोग कुडबुड्या ज्योतिषाला चांगलाच होतो. निरयण कुंडली घेतली कीं तिच्याबरोबर दशवर्ग कुंडल्यांचें जाळें आलेंच म्हणून समजावें. परंतु तसा प्रकार सायन कुंडलीसंबंधानें कधींही होणार नाहीं. मनुष्यमात्रांच्या स्थितीचा बोध सायन कुंडलीवरून इतका स्पष्ट होतो कीं दशवर्ग कुंडल्यांच्या कृत्रिम आधाराची जरूरीच रहात नाहीं. आणि हा कृत्रिम आधार इतका संशयास्पद व संदिग्ध आहे कीं तो नसले-लाच पुरवला.

सारावलीकारानें दशवर्गापैकीं होरा, द्रेष्काण व नवांश यांचा उपयोग नष्ट जातकासंबंधानें केलेला आहे आणि प्रश्न ज्योतिषामध्यें ('अंशकात् ज्ञायते द्रव्यं द्रेष्काणैस्तस्कराः स्मृताः') नवांशावरून द्रव्यज्ञान व द्रेष्काणावरून तस्करज्ञान होतें असें लिहिलें आहे. यांचा संबंध ग्रहबलाशीं नसल्यामुळें त्यांचें येथें विवेचन करीत नाहीं. दशवर्गाशीं यांचा संबंध अस-ल्यामुळें त्यांचा निर्देश करणें जरूर आहे.

(६) पुंस्त्रीभवनबलः—

पुंस्त्रीभवनबलेनच ।
करोति जनपूजितं कलाकुशलम् ॥
पुरुषं प्रसन्नचित्तं ।
कल्यं परलोकभीरुं च ॥

सारावली.

स्त्रीराशीमध्यें शुक्र व चंद्र आणि पुरुष राशीमध्यें बाकी राहिलेले ग्रह असतां त्यांस 'पुंस्त्रीभवनबल' आहे असें समजतात. हें बल विशेष महत्वाचें नसलें तरी टाकाऊ नाहीं. राशिबलाचा विचार करतांना उच्च स्वगृहादि सहा बलांसंबंधानें पूर्व ग्रंथकार काय म्हणतात आणि त्याचा अनुभव आपणास हल्लीं कसा येतो याचें विवेचन जरूरीपुरत्या विस्तारानें केलेलें आहे व हें विवेचन करतांना आमचें मत काय आहे हेंही ठिकठिकाणीं नमूद केलें आहे. राशिबलासंबंधानें आर्य ग्रंथकारांचें मत ज्या प्रमाणें वाचकांच्या पुढें ठेविलें आहे त्या प्रमाणेंच यूरोपीय ज्योतिषांच्या मताचें दिग्दर्शन करणें जरूरीचें आहे. सांप्रतच्या यूरोपीय ज्योतिषाचा आद्य आचार्य टालेमी असल्यामुळें राशिबलासंबंधानें त्याचें मत काय आहे हें पाहिलें पाहिजे. टालेमीच्या मतानें राशिबल पांच प्रकारचें आहे. या पांच प्रकारांपैकीं स्वगृहबल व उच्चबल आर्यज्योतिषांप्रमाणेंच आहे. बाकी राहिलेल्या प्रकारांस 'ट्रिप्लिसिटी' 'टर्म' व 'फेस' अशीं नांवें आहेत. यांचें कोष्टक पुढें दिल्याप्रमाणें आहे. अपूर्ण.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्वाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचिताद्वाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. | सप्टेंबर १९१६. | अंक ६ वा.

## नेपच्युन अथवा वरुण.

ज्योतिर्मालेच्या पहिल्या वर्षाच्या २ ऱ्या अंकांत नवग्रहांच्या धर्माबद्दल साधारण विवेचन केलें आहे; आजच्या निबंधांत नेपच्युन अथवा वरुण ह्या नूतन शोधानें व्यक्त झालेल्या ग्रहासंबंधानें आमचे विचार वाचकांसमोर ठेवण्याचा विचार आहे. हर्शल व नेपच्युन अथवा प्रजापति व वरुण ह्या दोन ग्रहांसंबंधीं आमच्या जुन्या ज्योतिर्विद मंडळीमध्यें नाना तऱ्हेच्या चमत्कारिक कल्पना पाहण्यास मिळतात व कित्येक वेळां त्यांच्या अज्ञानासंबंधानें कींव येते. कित्येकांचे मतें आर्यज्योतिष वाङ्मयामध्यें ज्यांना राहु व केतु म्हटलें आहे त्यांसच हर्शल व नेपच्युन अशीं पाश्चात्य नांवें आहेत. तर कित्येकांचे मतें आपल्यामध्यें धूमादि अप्रकाशक जे ग्रह सांगितले आहेत त्यांमध्यें या दोन ग्रहांचा समावेश होतो. तर कित्येक म्हणतात कीं गुलिक म्हणून जो आर्य ग्रंथांत सांगितला आहे तोच पाश्चिमात्य ज्योतिर्विदांचा हर्शल. तर कित्येक अर्धवट माहिती असलेल्या लोकांच्या

मतें नेपच्युन हा आपली सूर्याभोंवतालची एक प्रदक्षणा १२० वर्षांत करतो तर कित्येक म्हणतात कीं राष्ट्रांसंबंधीं विचार करणें असतां हर्शल व नेपच्युन विचारांत घ्यावे. ह्याप्रमाणें नाना मतांचा व कल्पनांचा सुळसुळाट झालेला दृष्टोत्पत्तीस येतो. अशा प्रसंगीं मालेच्या वाचकांस खरी शास्त्रीय माहिती व आमचा अनुभव सांगणें हें आमचें कर्तव्य असल्यामुळें तें आज बजावीत आहों. वाचकांस हें वर्णन पसंत पडल्यास ह्याचप्रमाणें सर्व ग्रहांचा क्रमाक्रमानें ऊहापोह करण्याचा आमचा मानस आहे.

दुर्बिणीचा शोध लागण्यापूर्वीं म्हणजे इ. स. १७८० पर्यंत आपल्या सूर्यमालेंत ज्ञात असलेल्या बुधादि सहा ग्रहांपेक्षां जास्त ग्रह आहेत असें कोणास वाटत नव्हतें. व त्याप्रमाणें गणित व वेध यांमध्यें येणारे फरक फारसे लक्ष्यांतें येत नव्हते. परंतु दुर्बिणीचा शोध लागल्यानंतर इ. सन १७८१ मध्यें प्रसिद्ध खगोलवेत्ता **विल्यम** हर्शल ह्यास अचानक रीतीनें प्रजापति किंवा हर्शल या ग्रहाचें दर्शन झालें परंतु नेपच्युन अथवा वरुण ग्रहासंबंधानें असा झालेला प्रकार नसून तो गणकाच्या गणिताच्या सत्यतेसंबंधाचा मूर्तिमंत कीर्तिध्वज आहे. या ग्रहाच्या शोधासंबंधानें पुढें लिहिल्याप्रमाणें हकीकत घडली.

इ. स. १८२० मध्यें फ्रांस देशांतील **बोवर्ड** नामक ज्योतिषानें गुरु, शनि आणि प्रजापति यांची गतिस्थिति काढण्याची कोष्टकें तयार केलीं, सर्व ग्रहांचीं आकर्षणें हिशोबांत घेऊन गुरु आणि शनि यांची गणितानें काढलेली स्थिति वेधास बरोबर मिळे. परंतु इ. स. १७८१ पासून हर्शलचा वेध पुष्कळ वेळां झालेला होता. तेव्हांची त्याची स्थिति आणि नंतरची स्थिति यांचा मेळ बसेना, तेव्हां प्रजापतीच्या पलीकडे असलेल्या एखाद्या ग्रहाच्या आकर्षणामुळें असें होतें कीं काय ह्याबद्दल विचार करण्याचें पुढील ज्योतिषांवर सोंपवून इ. स. १७८१ नंतरच्या वेधास मिळतील अशीं प्रजापतीचीं कोष्टकें बोवर्डनें केलीं. पुढें त्या कोष्टकावरून गणितानें काढलेली प्रजापतीची स्थिति आणि प्रत्यक्ष वेध ह्यांत इ. स. १८३० मध्यें २० विकलांचें अंतर पडूं लागलें; १८४० मध्यें ९० विकलांचें अंतर पडलें आणि १८४४ मध्यें तर २ कलांचें अंतर पडलें. नुसत्या डोळ्यांनीं



पहाणाऱ्यांस हें अंतर म्हणजे कांहींच नाहीं. दोन कलांच्या अंतरानें असलेले दोन ग्रह नुसत्या डोळ्यांनीं एकच दिसतात. परंतु दुर्बिणीनें हें अंतर सहज समजूं लागलें.

आमच्या जुन्या पंचांगांतील ग्रह आणि आकाशांतील ग्रह ह्यांत हल्लीं कधीं कधीं ह्याच्या शेंभरपट अंतर पडतें तें आमच्या गांवींही नसून उलट ग्रहलाघवासारिख्या स्थूल गणिताचीच विशेष आवश्यकता असून त्याचेच स्तुतिपाठ गाण्यांत कालाचा व्यय करीत आहों. परंतु युरोपीय ज्योतिर्विदांस सदरहू २ कलांचें अंतर सहन होईना. त्याचप्रमाणें त्यांची जिज्ञासा त्यांस स्वस्थ बसूं देईना. जिज्ञासेमुळें शोधास सुरवात झाली व इंग्लंडांतील **जॉन आडाम** नामक तरुण विद्वान गणकानें गणित करून प्रजापतीला उपाधि करणारा ग्रह सूर्यापासून अमुक अंतरावर आहे, त्याचें द्रव्य अमुक आहे, त्याची कक्षा अमुक प्रकारची आहे व तो अमुक ठिकाणीं आहे असें १८४५ च्या आक्टोबरांत ग्रिनिच येथील वेधशाळेचा मुख्य अधिकारी प्रो. एरी यांस कळविलें. परंतु त्यानें वेध घेतले नाहींत. दुसऱ्या एका इंग्लंडच्या ज्योतिषानें १८४६ च्या आगष्टांत वेध घेतले त्यांत तो ग्रह आला होता. परंतु त्यास ग्रह असा ओळखतां आला नाहीं. फ्रांसांतील ज्योतिषी लव्हरिअर यानें गणित करून ह्या अज्ञात ग्रहाचीं मानें सन १८४६ च्या जूनमध्यें प्रसिद्ध केलीं. इ. स. १८४७ च्या आरंभीं त्याचा भोग ३२५ अंश आहे असें काढिलें. व बर्लिन वेधशाळेंतील अधिकाऱ्यास त्याचा वेध घेण्यास लिहिलें. त्याप्रमाणें त्यानें तारीख २३ सप्टेंबर १८४६ रोजीं दुर्बिण लाऊन पाहतां ही स्वारी नेमक्या कुंभ राशींतील २६ व्या अंशांत सांपडली!!

निरनिराळ्या ठिकाणीं असलेले कांहीं लोहचुंबक एका लोखंडाच्या गोळीस ओढीत आहेत व त्या लोहचुंबकांची आकर्षण शक्ति, महत्त्व, स्थानें वगैरे माहित आहेत; परंतु त्यावरून गणित करून लोखंडाची गोळी अमुक ठिकाणीं असेल असें काढावें तें प्रत्यक्ष स्थितीस मिळत नाहीं; यावरून आणखी एखादा लोहचुंबक गोळीस ओढीत असेल असें अनुमान करून

त्याचें स्थान बिनचुक शोधून काढणें जितकें कठिण आहे त्याहून अनेक पटीनें कठिण सदरहू ग्रहाचा शोध करणें हें आहे. न्यूटनाच्या शोधापेक्षां-ही हा शोध एका अर्थी अधिक कठीण आहे असें म्हटलें असतां चालेल. यूरोपखंडांत ग्रहगतिस्थितीचें गणित सांप्रत कसें पूर्णावस्थेस आलें आहे याची कल्पना वरील शोधावरून वाचकांस सहज करितां येईल.

हल्लीं ज्ञात असलेल्या सूर्यमालेंत **नेपच्युन** हा सर्वांत शेवटील ग्रह आहे. ह्या ग्रहाच्या कक्षेपलीकडे आणखी दोन ग्रहांच्या कक्षा आहेत असें कित्ये-कांचें मत आहे. ह्यांपैकीं **इसिस** नांवाचा ग्रह तारीख २१ माहे मार्च सन १९०६ सालीं सायन मेष राशीच्या १ ल्या अंशांत असल्याचें प्रसिद्ध ज्योतिषी **जी. ई. सटक्लिफ** यांचें मत आहे. हा ग्रह सूर्याभोंवतालची आपली प्रदक्षणा ३६० वर्षांत करितो म्हणजे तो एका वर्षांत १ अंश चालतो; ह्या हिशेबानें या ग्रहाची लागेल त्या वर्षांतील स्पष्ट स्थिति सांगतां येईल. मालेचे वाचकवर्ग ह्या गोष्टींसंबंधानें विचार करतील अशी आशा आहे.

**नेपच्युन** अथवा **वरुण** हा सूर्यापासून २७७ कोटी मैल म्हणजे पृथ्वीच्या ३० पट अंतरावर आहे व त्याचा व्यास ३४॥ हजार मैल आहे. ह्या ग्रहाचा आकार पृथ्वीच्या ८३ पट असून सूर्याभोंवतालची आपली एक प्रदक्षणा १६९ वर्षांत पुरी करितो. म्हणजे ह्या ग्रहाला बारा राशि फिरण्यास किंवा भोगण्यास १६९ वर्षें लागतात व तो एका राशीमध्यें सरासरी १४ वर्षें असतो. हर्शल व नेपच्युन जेव्हां आढळण्यांत आले तेव्हां त्यांचे नामाभिधानासंबंधानें बराच खल झाला. ग्रीक पुराणांत सॅटर्न ( शनि ) हा ज्युपिटर ( गुरु ) चा पिता मानला आहे. म्हणून शनीच्या कक्षेपलीकडे असणाऱ्या ग्रहांस शनीचा पिता म्हणजे गुरूचा पिता-मह आणि सर्व देवांमध्यें वडील जो यूरेनस त्याचें नांव द्यावें असें ठरलें. व विल्यम हर्शल साहेबांनीं त्या ग्रहाचा शोध लावला म्हणून त्याला हर्शल असें-ही नामाभिधान प्राप्त झालें. यूरेनसच्या पलीकडे आणखी एखादा ग्रह असेल अशी त्या वेळेस कल्पनाही नव्हती. परंतु आणखी जेव्हां दुसरा ग्रह



सांपडला तेव्हां त्यास ज्युपिटरचा पितामह यूरेनस याचें नांव देऊन हर्शल यास ज्युपिटरचा कनिष्ट बंधु नेपच्युन याचें नांव द्यावें असा विचार निघाला परंतु ईश्वरी नेमानेम निराळा असल्यामुळें बरींच वर्षें चाललेलें नांव बदलणें बरोबर दिसेना म्हणून अखेरीस ह्या नवीन ग्रहास नेपच्युन हें नांव दिलें. हीं नांवें जरी सकृत्दर्शनीं ग्रहांचे मूळ धर्माचा विचार किंवा त्यांचा अनुभव आल्यापूर्वींच देण्यांत जरी आलीं होतीं तरी तीं ईश्वरी प्रेरणेनें फारच मार्मि-कतेनें दिलीं गेलीं आहेत असें हल्लीं या ग्रहांचा अनुभव सांगत आहे. ग्रीक पुराणांत **नेपच्युन** ही वरुण देवता सांगितली असून ह्या देवतेचा अंमल समुद्रावर असल्याचें वर्णन केलें आहे व नेपच्युन ह्या ग्रहाचा जल-तत्त्व व समुद्र यांशीं निकट संबंध असल्याचें हजारों कुंडल्यांत पाहण्यास मिळतें. आपल्याकडे या दोन ग्रहांस **प्रजापति** व **वरुण** हीं नांवें कै. **जनार्दनपंत मोडक** यांनीं फारच मार्मिकपणानें दिलीं आहेत. यूरेनस हा **ग्रीक**पुराणांत ज्युपिटरचा पितामह असल्याचें सांगितलें आहे. आमचा **प्रजापति** सर्वांचा पितामह असून तो बुधादिकांहून प्राचीन आहे. मागें सांगितल्याप्रमाणें नेपच्युन ही जलाची देवता **ग्रीक** पुराणांत मानिली आहे. आर्य पुराणांमध्यें **वरुण** जलदेवताच आहे. यूरेनसपेक्षां नेपच्युन प्राचीन नाहीं ही अडचण यूरोपीय नांवांत आहे पण ती आमच्या वरील संस्कृत नांवांत दिसत नाहीं. कारण प्रजापतीपेक्षां वरुण हा प्राचीन व श्रेष्ठ आहे.

आतां **नेपच्युन** व **हर्शल** हे ग्रह धूमादि अप्रकाशित ग्रहांत सांपडतात किंवा काय वगैरे गोष्टींचा ज्याचा त्यानें अनुभव घेणें चांगलें. हर्शल व नेपच्युन ह्या दोन ग्रहांचें स्पष्ट गणित कसें करावें ह्यासंबंधानें ज्योति-र्विद केतकर यांनीं आपल्या ज्योतिर्गणितामध्यें सांगितलें आहे त्याप्रमाणें गणित करून येणारी स्पष्ट ग्रहांची स्थिति धूमादि कोणत्या अप्रकाशित ग्रहाबरोबर मिळते ह्याचा विचार ज्याचा त्यास सहज करितां येईल. त्याच प्रमाणें हे ग्रह फक्त राष्ट्रीय घडामोडी करितात किंवा व्यक्तिविषयक कांहीं फळें देतात ह्यासंबंधानें आमचे अनुभव पुढें सांगितले आहेत. वाचकांनीं स्वतः अनुभव घेऊन कायतें ठरवावें.

वरुण किंवा नेपच्युन ह्या ग्रहाचा शोध लागून आतांच कोठें ७० वर्षें होत आहेत. व ह्या ग्रहासंबंधानें जुन्या ग्रंथांमध्यें मुळींच माहिती नसल्यामुळें ह्या ग्रहाचे फळासंबंधानें अद्यापपावतों विशेष खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. व म्हणूनच प्रस्तुतच्या निबंधांत निरनिराळ्या फलज्योतिषी लोकांचे अनुभव व मतें एकत्र ग्रथित करण्याचा प्रयत्न केला आहे. करिता मालेच्या वाचकांनीं सदरहू माहितीचा जपून उपयोग करावा व स्वानुभव काय येतो ह्याचें टांचण ठेवीत गेल्यानें दहावीस उत्तम फलज्योतिषी लोकांचे संघानें ह्या ग्रहाच्या संपूर्ण स्वरूपाचें ज्ञान खात्रीपूर्वक पुढील पिढीस मिळेल. हर्शल किंवा प्रजापति व नेपच्युन किंवा वरुण हे ग्रह एका एका राशीमध्यें सात व चवदा वर्षें ह्याप्रमाणें दीर्घकाल राहत असल्यामुळें ह्या ग्रहांच्या राशिफलापेक्षां कुंडलींतील स्थानफलें विशेष दृष्टोत्पत्तीस येतात व ह्या दोन ग्रहांच्या फलादेशासंबंधानें चांगली अटकळ बांधतां आल्यास जन्मसमयीं अमुक राशि पूर्व केन्द्रीं उदय पावत होती अशी कल्पना सहज बांधतां येईल असें आम्हांस वाटतें व त्या धोरणानें प्रस्तुत ग्रहाच्या स्थानफलाचा विचार चालू लेखांत केला आहे. वाचकवर्ग यासंबंधानें आपले विचार व अनुभव पत्रद्वारें आम्हांस कळवतील. त्याचप्रमाणें नेपच्युन ग्रहाची मागील स्थिति सहज कळण्याकरितां प्रस्तुतच्या लेखासोबत स. १८५० पासून १९१० पर्यंतची नेपच्यूनची स्पष्ट स्थिति प्रत्येक वर्षाचे जानेवारीच्या पहिल्या तारखेची दिली आहे. त्यावरून प्रत्येकास साधारणपणें नेपच्युन इष्ट वर्षीं कोठें कोणत्या अंशांत होता ह्यासंबंधानें चांगली अटकळ बांधतां येईल.

नेपच्युन किंवा वरुण हा ग्रह अव्यक्तावस्था, अस्ताव्यस्तता, घोंटाळा, घालमेल, गोंधळ याचा द्योतक समजला जात असून हा ग्रह कोणत्याही वस्तूची किंवा निश्चित दृश्य आकारापूर्वीची अव्यक्त स्थिति दर्शवितो. कित्येक ज्योतिर्विदांचे मतें हा अशुभ किंवा खल ग्रह आहे. परंतु इतर ग्रहाप्रमाणें ह्याही ग्रहामध्यें शुभ व अशुभ असे दोन्हीही धर्म पाहण्यास मिळतात. ह्या ग्रहाचीं फळें मानवी प्राण्याच्या आत्म्याच्या विकासाप्रमाणें निरनिराळ्या कुंड-



ल्यांत निरनिराळीं दृष्टोत्पत्तीस येतात. कित्येक कुंडल्यांत तो पवित्रता, प्रेम, विश्वबंधुत्व, अध्यात्म उन्नति, पूर्णावस्था, ज्ञानीपणा दर्शवितो तर कित्येक कुंडल्यांत विषयी, विषयाचे छंदानें पापाचरण करणारे, अमली पदार्थांचें सेवन करणारे, गांजेबाज, अफूबाज, दारुबाजपणा दाखवितो.

हा ग्रह कुंडलींत केंद्रांत असतां तो ज्या राशींत असेल त्या राशीचे धर्माप्रमाणें व तो इतर ग्रहांबरोबर ज्याप्रमाणें दृष्ट असतो त्याप्रमाणें मानवी प्राण्याच्या आयुष्यांत घडामोडी दर्शवितो. हा ग्रह केन्द्रांत असतां स्वच्छता, शुद्ध आचरण, पवित्रता यांपासून पुष्कळ फायदा होतो. त्याचप्रमाणें ज्यांचे कुंडलींत हा ग्रह केन्द्रांत बलवान असेल त्यांनीं हलकट, अनीतिमान, दुष्ट, व्यभिचारी माणसांच्या सहवासांत न राहण्याबद्दल शक्य तेवढा प्रयत्न करावा. कारण हा ग्रह जवळ जवळ पाण्यासारख्या अस्थिर स्वभावाचा असून ज्याप्रमाणें पाणी ज्या भांड्यांत किंवा ज्या रंगानें युक्त असतें त्याप्रमाणें आकार, रंग व रूप धारण करतें त्याप्रमाणेंच नेपच्यूनचीं माणसें ज्यांच्या ज्यांच्या सहवासांत राहतात त्याप्रमाणें त्यांचें अनुकरण करितात. ज्याप्रमाणें पाण्यामध्यें लागेल त्या पदार्थाचें हुबेहुब प्रतिबिंब दिसतें त्याप्रमाणें नेपच्युन- कुंडलींत बलिष्ठ असलेलीं माणसें दुसऱ्याचे विचार आपले आहेत असें भासवितात किंवा ते दुसऱ्या लोकांची हुबेहुब नक्कल करितात, दुसरा मनुष्य ज्याप्रमाणें विचार करितो त्याप्रमाणें विचार करितात, दुसऱ्याच्या आनंदानें किंवा दुःखानें दुःखी किंवा आनंदित होतात. एकंदरीनें पाहतां नेपच्यूनची मंडळी विशेष अनुकरणप्रिय आढळतात. व त्यामुळें हा ग्रह उत्तम नट, गवई, नकली लोक, दुसऱ्यांचे मनांत काय चाललें आहे तें सांगणारे ( Thought-readers ); उत्तम कादंबरीकार यांच्या कुंडल्यामध्यें विशेष बलिष्ठ असलेला आढळण्यांत येतो. परंतु निर्बळी असतां व्यसनी, अंमली पदार्थांचे सेवन करणारे ढोंगी, लबाड, विशेष औषधें घेण्याचा शोख असलेली मंडळी पाहण्यास मिळतात.

नेपच्युन हा ग्रह कित्येक गोष्टींत अशी कांहीं क्रांति घडवितो कीं त्यांचे पुढें हर्शल या ग्रहाचे दृष्टोत्पत्तीस येणारे कटु अनुभव फिके पडतात. जेव्हां

हा ग्रह कुंडलींत बलवान असून शुभ असतो त्या वेळीं तो बुद्धीची तीव्रता वाढवितो. अंतर्सृष्टींतील किंवा दैवीसृष्टींतील कल्पनांची प्रेरणा करून मन प्रगल्भ करितो. मनाचा ओढा अध्यात्ममार्गाकडे लागतो परंतु तोच पीडित व निर्बळी असतां वाईट वासना, मत्सर, लोभ, स्वतःच्या उन्नतीचे हानी करणारे प्रकार घडवून आणतो. हा ग्रह कित्येक प्रकारचा कारणविरहित क्षोभ किंवा संताप उत्पन्न करितो. त्याचप्रमाणें क्षणिक कीर्ति, क्षणिक भाग्य वगैरे विलक्षण गोष्टी घडवितो परंतु हे सर्व प्रकार कुंडलींत नेपच्युन ज्या मानानें बलवान किंवा इतर ग्रहाबरोबर अशुभ किंवा शुभसंबंधित असेल त्याप्रमाणें पाहण्यास मिळतात.

या ग्रहाचा मानवी प्राण्यांचे अंगांतील आकर्षण धर्माचे अभिसरणावर ( idyllic circulation ) अंमल असावा असें वाटतें व त्यामुळें त्या अभिसरणाचा प्रतिबंध झाला असतां मज्जातंतूचा व मेंदूकडील मोठ्या भागाचा क्षोभ होऊन भयंकर विकार उत्पन्न होतात. प्रसिद्ध कादंबरीकार चार्लस डिकिन्सन याचे जन्मकाळीं ( जन्म ता. ७ फेब्रुवारी सन १८१२ ) धनुराशीमध्यें नेपच्युनचंद्रांची युति होती व ह्या ग्रंथकाराचा अंत मेंदूच्या विकृतीमुळें झाला. त्याचप्रमाणें राबर्ट लु वास सिव्हसन ( जन्म नोव्हेंबर १३ सन १८५० ) याचे जन्मकाळीं चंद्रनेपच्युनयुति लग्नांत कुंभ राशीमध्यें होती व ह्याही गृहस्थाचा अंत मेंदूच्या विकृतीमुळें झाला.

वरुण मानसिक शक्तीचे कारक ग्रह चंद्र व बुध यांबरोबर अशुभ दृष्टियोग जन्मकाळीं करीत असेल तर मज्जातंतूचा क्षोध होऊन भयंकर हानीकारक परिणाम होण्याचा विशेष संभव असतो. म्हातारपणांत हा ग्रह मज्जातंतूंच्या शक्तीचा ऱ्हास करतो; जीवनशक्तीचा प्रवाह कमी होत जाऊन दुबळेपणा प्राप्त होतो. हा ग्रह तृतीय किंवा नवमस्थानामध्यें पीडित असतां वर प्रमाणेंच परिणाम झालेले पाहण्यास मिळतात. त्याचप्रमाणें ज्या वर्षी दिनवर्षपद्धतीप्रमाणें रवि किंवा चंद्र ह्या ग्रहाबरोबर वाईट दृष्टियोग करितात त्या वर्षी मज्जातंतूंसंबंधीं विकृति झालेली पाहण्यास मिळते. कुंडलींत जन्मकाळीं हा ग्रह ज्या मानानें बलिष्ठ किंवा पीडित असेल त्या मानानें त्याचे शुभाशुभ



परिणाम पाहण्यास मिळतात. हा ग्रह जन्मकाळीं **द्विस्वभाव** राशीमध्यें—मिथुन, कन्या, धनु व मीन—पीडित असतां मेंदू व मज्जातंतूंसंबंधीं विकार होतात. तो **स्थिर** राशीमध्यें—वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ—पीडित असतां मलोत्सर्गक इंद्रियें, शरीरांतील ग्रंथीरचना यांसंबंधानें विकार झालेले पाहण्यास मिळतात. **चर**राशींत—मेष, कर्क, तुला, व मकर—पीडित असतां रक्ताभिसरण, व पचनक्रिया यांसंबंधीं विकृती झालेली पाहण्यास मिळते. हे वर दर्शविलेले शरीरासंबंधीं विकार ज्या वेळीं जन्मलग्न किंवा जन्मचंद्र ह्या ग्रहानें पीडित असेल त्या वेळेस विशेष घातुक असतात. हा ग्रह ज्या वेळीं बुधाबरोबर अशुभ दृष्टियोग करित असतो त्या वेळीं मज्जातंतूंच्या क्षोभामुळें शरीरास विकृती होते परंतु ज्या वेळीं हा ग्रह चंद्राबरोबर अशुभ संबंधित असतो त्या वेळीं शरीराच्या अस्वस्थतेमुळें मज्जातंतूंचा क्षोभ किंवा मेंदूसंबंधी विकार होतात.

वरुण मानसिक शक्तीचे कारक ग्रह—बुध, चंद्र—यांचे बरोबर जन्मकाळीं शुभ दृष्टियोग करीत असेल तर गूढ शास्त्रें आवडतात, वेदांत व धार्मिक बाबतींत चांगली प्रगति होते. व कित्येकांना अंतर्ज्ञानही होतें. फलज्योतिष, मेस्मेरिझम, टेलीपथी वगैरे शास्त्रें अवगत होतात. मेल्यानंतर होणाऱ्या स्थितीच्या संबंधानें ह्या लोकांमध्यें विचित्र कल्पना असतात, ह्या ग्रहाचीं माणसें विशेष नादलुब्ध पाहण्यांत येतात. त्यांत विशेषतः ज्या ज्या कुंडलींत हा ग्रह बलिष्ठ असून बुधाबरोबर शुभसंबंधित असतो त्या त्या ठिकाणीं तंतुवाद्यासंबंधानें विशेष आवड पाहण्यास मिळते. ह्या माणसास स्वप्नसृष्टींत नाना प्रकारची उत्तम सुस्वर गाणीं ऐकण्यास मिळतात तर कित्येक अर्धवट गाण्याचीं कडवीं म्हणत जागृत होतात. हा ग्रह मागें सांगितल्याप्रमाणें घालमेल, गोंधळ ह्यांचा द्योतक असल्यामुळें ह्या ग्रहाच्या प्राधान्यानें दृष्टोत्पत्तीस येणारे कादंबरीकार, कवि, लेखक ह्यांचीं कथानकें इतकीं मनोरंजक व असंभाव्य असतात कीं त्यांसंबंधानें कल्पनाच करावी लागते. नेपच्युनची मंडळी ललित वाङ्मय, काव्य याचीच विशेष भोक्ति असतात. ज्या ज्या

कुंडलींत हा ग्रह बलिष्ठ असतो त्या त्या लोकांस इतर ग्रहांच्या प्राधान्याप्रमाणें स्वप्नसृष्टींमधून त्यांच्या कार्यास फार मदत होते, कादंबरीकारांस कथानकें स्वप्नांत सुचतात तर कवीस विषय व कविता देवी स्वप्नसृष्टीमध्यें संभाषण करीत असलेली भासते.

पुरुषाचे कुंडलींत नेपच्युन चंद्राबरोबर शुभ दृष्टियोग करीत असतां किंवा स्त्रियांचे कुंडलींत रवीबरोबर शुभसंबंधित असतां तो ज्या ज्या स्थानांत असतो व तो ज्या राशीमध्यें असतो त्या अन्वयें लाभ दर्शवितो. हा ग्रह जलराशीमध्यें त्यांत विशेषतः कर्क व मीन राशीमध्यें बलवान आढळतो. व बहुमतानें **मीन** राशि त्याची स्वगृह राशि मानतात. वरुण ग्रह जलाचा कारक असल्यामुळें पीडित असतां आपतत्वापासून हानी व संकटें दर्शवितो. परंतु बलिष्ठ असतां जलतत्वापासून फायदे दर्शवितो. ह्या ग्रहाचा समुद्रावर किंबहुना सर्व जलतत्वावर अंमल आहे त्यामुळें दर्यावर्दी लोक, समुद्रावरील सत्ता, जलपर्यटणें, वगैरे संबंधीं आवड पाहण्यांत येते. ह्या ग्रहाची स्वगृह राशि **मीन** सांगितल्याप्रमाणें मीनराशीचे स्वाभाविक धर्म ह्या ग्रहामध्यें पाहण्यास मिळतात. मीन ह्या राशीचा संबंध दवाखानें, तुरुंग, इस्पितळें, भिक्षागृहें, वेड्यांची इस्पितळें ह्यांबरोबर असल्याचें मानतात. त्याचप्रमाणें कुंडलींतील द्वादशस्थानही ह्याच गोष्टी दर्शविते त्यामुळें कुंडलींत हा ग्रह रविचंद्रांबरोबर अशुभसंबंधित असून इतर ग्रहस्थिति अनुकूल असतां तुरुंगवास, हद्दपार होणें, दवाखान्यांत अडकून पडणें, संन्यासवृत्ती प्राप्त होणें इत्यादि गोष्टी पाहाण्यास मिळतात.

प्रसिद्ध ज्योतिषी रॅफेल ह्या ग्रहासंबंधानें म्हणतो कीं हा ग्रह खल असून अनेक प्रकारचे ताप व संताप देतो. परंतु कुंडलींत केंद्रांत शुभसंबंधित असतां इतर ग्रहाप्रमाणें ह्याही ग्रहानें चांगलींच फलें दिलीं पाहिजेत. ह्या ग्रहाचा मज्जातंतूंबरोबर जास्त संबंध असल्यामुळें जन्मकुंडलींत तो ज्या ज्या



स्थानांत असतो त्या स्थानासंबंधानें भीति किंवा चिंता सर्व आयुष्यभर असलेली दर्शवितो किंबहुना जन्मभर कुंडलींतील त्या स्थानासंबंधानें जन्मणारास विशेष धास्ती असते व ह्याच प्रकारचा आमचा अनुभव असल्यामुळें जन्मलग्न सिद्ध करण्यास ह्या ग्रहाचा पुष्कळ उपयोग होईल असें आम्हीं पूर्वीच सुचविलें आहे व त्यासंबंधानें प्रस्तुतच्या लेखांत थोडीबहुत उदाहरणें दर्शविलीं आहेत.

ज्यांचे कुंडलींत हा ग्रह नवम स्थानांत असतो त्यांस विचित्र, अति चमत्कारिक व सुंदर स्वप्नें पडतात. या माणसांनीं स्वप्न सृष्टींत पाहिलेले देखावे व इतर गोष्टी त्याच त्याच पुन्हां पुन्हां पाहण्यास मिळतात. आपण मर्त्यलोक सोडून दुसऱ्या कोणत्या लोकांत वास्तव्य करीत आहोंत असें त्यांस वाटतें. स्वप्नांत सुस्वर गायन ऐकणें, कवित्व, गाण्याचीं नवीन कडवीं हे त्यांचे स्वप्नांतील नित्याचे विषय असतात. ह्या लोकांनीं स्वप्नसृष्टींतील किंवा दैवी सृष्टींतील पाहिलेल्या गोष्टी जागृत अवस्थेंत आणून लिहून काढल्यास जगास एक नवीन प्रकारचें वाङ्मय वाचावयास मिळेल. व आमच्या मतें उत्तम कादंबरीकार, कवि, लेखक, तंतुवाद्यकुशल व उत्तम गवई यांच्या कुंडलींत हा ग्रह बलवान असून रवि, बुध, चंद्र व शुक्र यांबरोबर शुभसंबंधित नाहीं असें क्वचितच पहाण्यास मिळेल. या ग्रहाचे **विषय**-लेखन, विशेषतः कादंबरी, गायन, तंतुवाद्य व काव्यरचना, ललित वाङ्मयाची आवड, अध्यात्म शास्त्राची आवड, गूढ शास्त्राची गोडी, फलज्योतिष, मेस्मेरिझम, टेलिपथि, थॉट् ट्रान्सफरन्स —आपले विचार दुसऱ्याकडे नेमके पाठविणें-थॉट् रीडिंग—दुसऱ्याच्या मनांतील विचार कळणें. आणि जलतत्वासंबंधीं व्यवहार. **रंगः**—ह्या ग्रहाचा रंग निळसर काळा किंवा फिकट जांभळा, अंजिरी. **रोगः**-मज्जातंतूंचा क्षोभ होणें, मस्तकपिंडाचे विकार, वेड लागणें, झिजणें ( wasting diseases ) व विषारापासून झिजून मरणें. **पदार्थः**—सर्व प्रकारचे अति विषारी पदार्थ, अंमली पदार्थ,

अफू, गांजा, दारू, भांग. ह्या ग्रहाचा व जलतत्वाचा विशेष संबंध असल्यामुळें ह्या ग्रहामुळें उत्पन्न होणारे रोग डॉ. कुन्हे यांच्या हायड्रोपाथीच्या उपचारानें-जलाच्या उपचारानें किंवा जलदेवतांची किंवा वरुणाची प्रार्थना केल्यामुळें, समुद्रकाठीं किंवा जलाशयाजवळ राहिल्यानें बरे व्हावेत असें वाटतें. हा ग्रह पीडा करीत असतां पिशाच्चबाधा जारणमारणादि मांत्रिक प्रयोगामुळें किंवा ते प्रयोग करीत असतां चुकल्यामुळें बराच त्रास होतो. दिनवर्ष-पद्धतीनें ज्या ज्या वेळीं रवि, चंद्र किंवा लग्न, नेपच्युन बरोबर अशुभ संबंध करीत असतात त्या वेळीं करणी, जारणमारण वगैरे मांत्रिक प्रयोगामुळें त्रास होणें शक्य वाटतें. हा ग्रह औषधाचे विशेष सेवनानें रोग उत्पन्न करितो त्यामुळें ह्या ग्रहानें दर्शविल्या जाणाऱ्या रोगावर औषधापासून विशेष फायदा होणार नाहीं. नेपच्युनचीं माणसें अमली पदार्थांचें सेवन करणारी असल्यामुळें ह्या लोकांनीं मादक द्रव्यासंबंधानें विशेष सावध राहावें.

ह्या ग्रहाचे गोचर फलासंबंधानें किंवा हा ग्रह जन्मकुंडलींतील रवि, चंद्र, लग्न, दशम ह्या बिंदूवरून जात असतां कोणत्या प्रकारचीं फलें मिळ-तील ह्यासंबंधानें आज आम्हांस निश्चित असें कांहींच लिहितां येत नाहीं. परंतु इतकें खास कीं जर हा ग्रह कुंडलींत जन्मकालीं अशुभ फलदाता असेल तर त्याचें वर सांगितलेल्या ठिकाणावरून भ्रमण होत असतां खात्रीनें अशुभ फलें पाहण्यास मिळतील. हा ग्रह सबंध वर्षामध्यें २–२॥ अंश जात असल्यामुळें जर तो रवि, चंद्र, लग्न, दशम ह्यांवर येऊन त्या कालीं त्याची क्रांतिही वरील ग्रहांचे क्रांति येवढी असेल तर अशुभ फलें विशेष पाहण्यास मिळतील. दिनवर्षपद्धतीप्रमाणें ज्या ज्या वेळीं रवि हा ह्या ग्रहाब-रोबर अशुभ दृष्टियोग ( ४५ अंश, ९० अंश, १३५ अंश किंवा १८० अंश ) करतो त्या वेळीं निश्चितपणानें हा ग्रह ज्या स्थानांत असतो त्या स्थाना-संबंधीं कटु फलें मिळालेलीं पाहण्यांत आलीं आहेत. त्याचप्रमाणें दिन-



वर्षपद्धतीनें ज्या ज्या वेळीं मंगळ ह्या ग्रहाबरोबर अशुभ संबंध करितो त्या वेळींही तुरुंगवास, क्रिमिनल प्रॉसीक्यूशन, सांपत्तिक नाश वगैरे बरींच अशुभ फलें स्थानानुरोधानें पाहण्यास मिळतात. ह्या ग्रहाबरोबर शुक्र वाईट योग करीत असतां, व्यभिचार, उपदंशादि विकार, स्त्रियांमुळें संकटें इत्यादि प्रकार घडतात. बुध अशुभ संबंध करीत असतां मान-सिक स्वस्थता नसते. हातून नाना तऱ्हेच्या चुका घडतात. ह्या काळांत लेखन, वाचन यांसंबंधानें त्रास होतो तर कित्येकांस वेड लागतें इत्यादि. ह्या ग्रहाबरोबर रवि, चंद्र किंवा बुध ज्या ज्या वेळीं दिनवर्षपद्धतीनें शुभ दृष्टियोग–६० अं. १२० अं. करितात त्या वेळीं जलप्रवास घडतात, स्थलांतरें होतात तर कित्येकांचे हातून उत्तम ग्रंथ प्रसिद्ध होतात. तर कित्येकांस तंतुवाद्याची आवड उत्पन्न झालेली पाहण्यास मिळते. चलित लग्न किंवा दशम होऊन नेपच्युन बरोबर शुभ संबंध करीत असतां वर दर्शविलेल्या गोष्टी घडतात. साक्षात्कार घडतात, चांगली सूचक स्वप्नें पडतात, आध्यात्मिक उन्नती होते, ह्याप्रमाणें जन्मकाळीं ज्या गोष्टी कुंडली दर्शविते त्या त्या गोष्टी घडतात. परंतु लग्न किंवा दशम नेपच्युनबरोबर अशुभ संबंध करीत असतां वाईट अनुभव मिळतो. दशम अशुभ संबंध करीत असतां धंद्यांत संकटें येतात. आईबापांचा नाश होतो तर कित्येक आईबापांपासून निराळे पडतात. स्थलांतर, दूरदेशीं गमन घडतें. लग्न अशुभ संबंध करीत असतां पाण्या-पासून भीति, जलघात, विषारी बाधा, हलकट स्त्रियांचा सहवास, त्यामुळें बेअब्रू, पिशाचबाधा, मारण वगैरे गोष्टी घडलेल्या आढळतात. असो येथपर्यंत नेपच्युनच्या गुणधर्मासंबंधानें आमचे विचार वाचकांपुढें ठेविले आहेत, आतां आपण नेपच्युनच्या कुंडलींतील द्वादश स्थानांतील फल-विभागाचा विचार करूं.

## नेपच्युन अथवा वरुणाचीं स्थानफलें.

वरुण **लग्नांत** असतां बांधा मध्यम असतो. वर्णानें गौर, डोळे निळसर, गुंगलेले, तोंडावर एक प्रकारची गूढपणाची छटा असलेले, कपड्यालत्याचा

शोखी, स्वताच्या पोशाखासंबंधी विशेष दक्ष असणारा, स्वतःबद्दल विशेष अभिमान बाळगणारा, मत्सरी, अस्थिर, फिरण्याचा किंवा भटकण्याचा शोखी, कल्पक, हुशार, गूढविद्याप्रिय-क्लेरव्हायन्स व क्लेरआडीअन्स असलेला—चेहऱ्यावर खिन्नपणा, विषाद असलेला, उदासवृत्तीचा, समुद्रप्रवासाची आवड बाळगणारा असतो. नेपच्युन लग्नांत पीडित असतां मानसिक अस्वस्थता, उदासवृत्ती, अस्थिरता, पाहण्यास मिळते. नेपच्युन लग्नांत असलेली मंडळी झोंपेंत फार बरळतात किंवा झोंपेंत चालणें लिहिणें वगैरे व्यवहार करितात. नेपच्युन लग्नांत पीडित असतां जलापासून भीति दर्शवितो.

स्वामी रामतीर्थ यांचे कुंडलींत नेपच्युन लग्नांत होता व त्याचेच धर्माप्रमाणें स्वामीजींचें सर्व वाङ्मय आहे. ह्या ग्रहाबरोबर रवि सप्तमांतून पूर्ण दृष्टियोग करीत असून चंद्र अष्टमांत असल्यामुळें स्वामीजींचा शेवट जलत-त्वांत झाला.

लग्नांत नेपच्युन असलेली मंडळी उत्तम कल्पक, तंतुवाद्याची, गाण्याची शोखी, उत्तम लेखक, अस्थिर, विकाराधीन असून त्यांचे लेखांत मनोविकार उत्तेजकपणा असलेला पाहण्यास मिळतो; तसेंच त्यांस शब्दश्लेष फार आवडतात.

## नेपच्युन-वरुण-धनस्थानांत असतां.

नेपच्युन धनस्थानांत असणें सांपत्तिक दृष्ट्या चांगलें नाहीं. धनस्थानांतील नेपच्युन साधारणपणें सर्व आयुष्यभर सांपत्तिक घडामोडी—अडचणी व त्रास किंवा चिंता दर्शवितो. धनस्थानांतील शुभदृष्ट असलेला नेपच्युन जलासंबंधीं व्यवहार, कंपन्यांपासून लाभ, साधारण जनसमाज जे धंदे करणार नाहीं अशा धंद्यापासून लाभ, सायकीक गोष्टींपासून लाभ-मेसमेरीझम, टेलीपथी, मानसशास्त्रासंबंधी गोष्टींपासून लाभ दर्शवितो. असें जरी आहे तरी हा ग्रह धनस्थानांत असतां सांपत्तिक स्थितीमध्यें घोंटाळे, अव्यवस्थितपणा पुष्कळ पाहण्यास मिळतो. धनस्थानांत नेपच्युनपीडित पापदृष्ट असतां त्याचीं अनिष्ट फलें फार तीव्रपणानें असतात. अशा मंडळीचें सांपत्तिक नुकसान कंपन्या बुडाल्यानें, बँका बुडाल्यानें, लुच्चेगिरीनें, ठकविण्यानें विशेष होतें.



प्रसिद्ध ज्योतिषी व कुंडलीविज्ञानकार यांचे धनस्थानांत हा ग्रह गुरूबरोबर युक्त होता परंतु ज्या वेळीं चलित रवीनें ह्या ग्रहाबरोबर दृष्टियोग करण्यास सुरुवात केली त्या वेळेपासून त्याच्या हयातींत न झालेल्या सांपत्तिक घडामोडी झाल्या आहेत.

## नेपच्युन तृतीय स्थानांत असतां.

तृतीय स्थानांत नेपच्युन असलेली मंडळी हुशार, कल्पक असतात. ह्या माणसांस स्वप्नें पुष्कळ पडतात. कादंबरीकार, उत्तम लेखक, कवि ह्यांचे कुंडलींत तृतीय स्थानांत नेपच्युन शुभदृष्ट असतां फारच उत्तम फलें देतो कारण तो बुद्धिमत्ता वाढवून नवीन कल्पना, विचार, व मानसिक प्रगल्भता ह्यांचा पोषक ग्रह आहे. तृतीयस्थानांतील नेपच्युन साधारणपणें जलप्रवास, अध्यात्मविद्येची गोडी व गूढशास्त्राची आवड दर्शवितो. ह्या स्थानांत नेपच्युन पीडित नसावा कारण त्यामुळें मानसिक त्रास अति होतो व असली मंडळी साधारणपणें कमी बुद्धिमत्तेची आढळतात. तृतीय स्थानांतील नेपच्युन नातेवाईक वगैरे मंडळीपासून फार त्रास दर्शवितो. कित्येक कुंडल्यांत नातेवाईक आप्तस्वकीय यांचेमुळें सांपत्तिक हानी त्यांचेकडून लुबाडलें जाणें, फसविलें जाणें वगैरे गोष्टी घडतात तर कित्येकांचे नातेवाईक किंवा आप्तस्वकीय लोक फारच चमत्कारिक आढळतात.

लघुलिपीचे उत्पादक सर इसाक पीटमन ह्यांचे कुंडलींत बरेच ग्रह तृतीय स्थानांत असून नेपच्युन हा लग्नाधिपति जो शुक्र त्यानें युक्त आहे.

## नेपच्युन चतुर्थ स्थानांत असतां.

नेपच्युन चतुर्थ स्थानांत असतां मातृकष्ट, मातेमुळें सांपत्तिक किंवा इष्टेटीची हानी, कित्येक वेळां सावत्र मातृयोग, आयुष्यांतील उत्तर वयांत त्रास, देहकष्ट, शेवटील दिवस एकांतवासांत किंवा बंदिखान्यांत जाणें, ह्या

स्थानांत नेपच्युन पीडित असतां जमीनजुमला, शेतवाडी वगैरे स्थावर मिळकतीचा कारस्थानामुळें, फसवेगिरीनें नाश, भांडणें, संसारसुख न मिळणें, घरांतल्या कारस्थानामुळें त्रास, संताप, जमीनजुमल्याच्या व्यवहारांत नुकसान, घरवाले लोकांबरोबर भांडणें, त्यापासून नुकसान वगैरे गोष्टी झालेल्या पाहण्यास मिळतात. परंतु हा ग्रह ह्या स्थानांत शुभदृष्ट व बलवान असतां वरील गोष्टींत लाभ दर्शवितो. व **चर** राशींत चतुर्थामध्यें असतां अनेक स्थलांतरें, राहण्याच्या जागा बदलणें, वगैरे गोष्टी घडलेल्या पाहण्यास मिळतात. चतुर्थ स्थानांत नेपच्युन असून तो रविचंद्रांबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां शरीरप्रकृती नीट रहात नाहीं, नाना तऱ्हेचे चमत्कारिक रोग होतात. हे बहुशः जारणमारणादि प्रयोगानें झालेले रोग, पिशाच संस्कार, झीजणीचे रोग, दीर्घकाल पर्यंत टिकणारे व शक्तीचा ऱ्हास करणारे असलेले आढळतात. चतुर्थांतील नेपच्युन गूढविद्येची, आध्यात्मविद्येची आवड, मंत्रशास्त्राची गोडी व त्यांत प्राविण्यता, व सायकीक अनुभव दर्शवितो. ह्या स्थानांत नेपच्युन असलेल्या मंडळींत बहुशः पिशाचसंचार असलेलीं घरें राहण्यास मिळतात असा आमचा अनुभव आहे.

### पंचमांत नेपच्युन असतां.

पचमांत नेपच्युन प्रसव राशीचा शुभ दृष्ट असतां संतति पुष्कळ झालेली पाहण्यास मिळते. त्याचप्रमाणें पंचमांतील बलवान नेपच्युन गूढविद्या, अध्यात्म-विद्येची गोडी दर्शवितो, बुद्धिमत्ता फार चांगली असून कल्पनाशक्ति उच्च तऱ्हेची असते. परंतु पंचमांत नेपच्युन पापदृष्ट असतां सट्टयाचे व्यवहारांत ठोकर लागते, किंवा बुडतात; बहुशः पंचमांत नेपच्युन असलेली मंडळी विलासी, चैनी, कामी, व व्यभिचारी आढळतात. ह्या स्थानांत नेपच्युन जलराशींत पीडित असतां दारूबाज व्यसनी मंडळी आढळतात. पंचमांतील पीडित नेपच्युन संततीस जलतत्वाचे रोगापासून पीडा, पिशाचबाधा, दर्शवितो. पंचमांत नेपच्युन असून शुक्राबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असलेला ज्याचे कुंडलींत आढळतो ती मंडळी अनीतिमान, सृष्टीविरुद्ध आचरण करणारी, बदफैली व दुर्लौकिक असलेली आढळण्यांत येतात.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आमाचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राभतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥


अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. } ऑक्टोबर १९१६. { अंक ७ वा.

## तूळ संक्रमण.

तारीख २३ सप्टेंबर १९१६ रोजीं दुपारीं २ वाजून ६ मिनिटांनीं रवि तूळ राशींत प्रवेश करीत आहे. या वेळीं पूर्व क्षितिजावर मकर राशीचा २४ वा अंश उदय पावत असून लग्नकेंद्रीं हर्शल, चतुर्थ स्थानीं गुरु, सप्तम स्थानीं शनि, नेपच्युन, शुक्र व चंद्र आणि ‘ राजभवननामध्यें ’ मंगळ याप्रमाणें सहा ग्रह कुंडलीच्या केंद्रस्थानांत आहेत. आणि हे ग्रह थोड्या फार अंशांच्या अंतरानें एकमेकांशीं केंद्रयोग व प्रतियोग करीत आहेत. हे योग मंगळ, गुरु, शनि, हर्शल व नेपच्युन या महत्वाच्या ग्रहां-मध्यें स्थिर राशींतून व केंद्रस्थानांतून होत असल्यामुळें देशामध्यें मनोवृत्ती प्रक्षुब्ध करणाऱ्या गोष्टी घडतील असें वाटतें. प्रस्तुत कुंडलीचीं चारही केंद्रें बिघडलीं आहेत आणि त्यामध्येंही सप्तम स्थान तर अत्यंत बिघडलें आहे. त्यामुळें आपसांतील यादवी व तंटे, स्त्रियांसंबंधीं अनीतीचे प्रकार, परराष्ट्रीय व्यापारी दळणवळण वगैरे सप्तम स्थानावरून दर्शित होणाऱ्या गोष्टींसंबंधानें अनिष्ट

प्रकार घडून येतील. अधिकारीवर्गाचा द्योतक ग्रह दशमेश मंगळ दशमामध्यें स्वगृहींचा परंतु गुरु, हर्शल व नेपच्युन यांच्या अशुभ दृष्टींत आहे. हा योग दडपशाहीकडे प्रवृत्ति करणारा व अधिकारी वर्गांत मृत्युसूचक आहे.

**सा. ल.**




प्रस्तुत कुंडलींतील शुभ व अशुभ योगांपैकीं अशुभ योग जितका प्रबल आहे तितकाच एक शुभ योग प्रबल आहे. हा शुभ योग म्हणजे नवम स्थानांत तूळ राशींतील बुध, चंद्रशुक्रांच्या द्विराश्यंत व हर्शलच्या त्रिकोण दृष्टींत असून रवि सुद्धां शनि—नेपच्युनांच्या शुभ दृष्टींत व नवम स्थानांत आहे. या काळांत वाङ्मयाची वृद्धि, वक्तृत्वपूर्ण भाषणें, धार्मिक विषयांची चर्चा होईल; कायदे कौंसिलांत महत्वाचीं भाषणें होतील; नवीन ग्रंथ, मासिकें किंवा वृत्तपत्रें निघतील. २७ सपटेंबर रोजीं होणाऱ्या रवि—चंद्र संयोगकाळीं बुध दशमांत शुक्राच्या शुभदृष्टींत आहे. यामुळें लेखक व वक्ते यांचा गौरव व मानसन्मान होईल. या योगाचा अमल २७ सपटेंबर ते २७ आक्टोबरपर्यंत आहे. आक्टोबरच्या अखेरीस व नोव्हेंबर प्रारंभीं भूकंप होतील. प्रस्तुतच्या संक्रमणकालीन ग्रहस्थितीमुळें देशांतील हवामान बिघडेल; कांहीं ठिकाणीं पिकांचा नाश होईल, प्लेगमुळें मृत्युसंख्या वाढेल.

**राम नारायण ( २९.९.१६ ).**



# नेपच्युन किंवा वरुण.

मागील अंकावरून पुढें चालू.

## नेपच्युन षष्ठ स्थानांत असतां.

षष्ठ स्थानांतील नेपच्युन शरीरास अस्वस्थता, विचित्र रोग व कधींही बरे न होणारे विकार, आंतड्याचे विकार, उदरविकार दर्शवितो असें कित्येकांचें मत आहे परंतु हें सर्वच ठिकाणीं अनुभवास येईल असें वाटत नाहीं. षष्ठ स्थानांत नेपच्युन असून तो रविचंद्राबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असल्यास खात्रीनें नाना तऱ्हेचे विकार दर्शवितो. असल्या लोकांनीं औषधें व पेय पदार्थासंबंधानें विशेष सावध रहावें कारण षष्ठ स्थानांतील रविचंद्रांबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असलेला नेपच्युन औषधांचे अतिसेवनानें खात्रीनें प्रकृति बिघडवील. त्याचप्रमाणें सदरहु लोकांस अशुद्ध आकर्षण शक्ति ( Impure magnetism ) मुळें नाना तऱ्हेचे विकार होतात. वरील लोकांचे अंगीं अशी कांहीं विचित्र आकर्षक शक्ति असते कीं ह्यांचे सहवासांत असलेल्या मंडळीस झालेले रोग ह्यांस होतात. षष्ठ स्थानांतील नेपच्युन लबाड नोकरचाकर, व हाताखालील लोकांपासून त्रास दर्शवितो. षष्ठ स्थानांत नेपच्युन बलवान असून तो इतर ग्रहाबरोबर शुभ दृष्ट असतां जलाशीं संबंध असलेल्या धंद्यांत, गूढविद्येचीं कामें केल्यास, कंपनीसंबंधानें कामें ह्यांत चांगलें यश दर्शवितो. षष्ठ स्थानांतील नेपच्युन असलेली मंडळी दुसऱ्याची सेवाचाकरी करण्यांत विशेष कुशल असतात त्यामुळें ही मंडळी दुसऱ्याचे मदतीस आपण होऊन जातात तर कित्येक कुंडल्यांत हीं माणसें आपल्या पाळींव जनावरांचे बंदे गुलाम आढळतात.

## नेपच्युन सप्तम स्थानांत असतां.

सप्तमस्थानांत नेपच्युन पीडित असतां मुक्यापांगळ्या अशा स्त्रीबरोबर लग्न होणें, ज्यांच्या नीतिमत्तेसंबंधानें संशय येईल अशांबरोबर लग्न होणें, लवकर स्त्रीचा नाश होणें वगैरे फार विचित्र प्रकार पाहण्यास मिळतात. कित्येकांचें लग्न उशीरा होतें तर कित्येकांचे लग्नांत हजार भानगडी उपस्थित होतात. सप्तमांत पीडित असलेल्या नेपच्युनच्या माण-

सांनीं भागीचे व्यवहार करूं नयेत, कारण बहुशः भागीदार लबाड, लफंगे, लुच्चे व विश्वासघातकी मिळतात. सप्तमांतील नेपच्युन द्विभार्यायोग दर्शवितो तर कित्येकांचे लग्नापूर्वी तिसऱ्याच ठिकाणी प्रेमसंबंध आढळतो. ही मंडळी बहुशः व्यभिचारी असतात. सप्तमांत शुक्र नेपच्युनयुति किंवा सप्तमांत नेपच्यून असून तो शुक्राबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असलेली मंडळी विषयी, त्यासंबंधानें त्यांची विचित्र आवड असलेली, सृष्टिक्रमाविरुद्ध आचरण करणारी अशा तऱ्हेची आढळते. सप्तमांतील पीडित नेपच्युन गुप्त शत्रुत्व, सप्तम स्थानानें दर्शविल्या जाणाऱ्या गोष्टींमध्यें विश्वासघात, कट, अनेक भानगडी व घोंटाळे दर्शवितो. सार्वजनिक कामांत पुढारीपणानें काम करणाऱ्या माणसांच्या कुंडलींत सदरहुप्रमाणें हा ग्रह पीडित असतां अति अडथळे, वादविवाद व शत्रुत्व झालेलें पाहण्यास मिळतें.

## नेपच्युन अष्टम स्थानांत असतां.

अष्टमांतील नेपच्युन मृत्यूसंबंधानें विचित्रपणा दर्शवितो. अष्टमांत नेपच्युन असतां दीर्घ काळ समाधी लागल्यामुळें पुरले किंवा जाळले जाणें वगैरेपासून भीति दर्शवितो. अष्टमांत नेपच्युन पीडित असतां—बुडणें दर्शवितो. त्याचप्रमाणें पीडित नेपच्युन मृत्युपत्रासंबंधानें भानगडी, भागिदारांचे पैशासंबंधीं त्रास, व पुरुषांचे कुंडलींत स्त्री उधळ्या स्वभावाची दर्शवितो. ह्या स्थानांतील नेपच्युन मृत माणसांविषयीं विशेष श्रद्धा व त्यांच्या ऐहिक इच्छा पूर्ण करण्याची आवड दर्शवितो. प्रसिद्ध सेनापति **लार्ड किचनेर** यांच्या अष्टमांत मीन राशीचा नेपच्युन होता व चालू वर्षी दिनवर्षपद्धतीनें ह्या नेपच्युनबरोबर प्रतियोग करीत असतां आकस्मिक व फसवेगिरीनें जलामध्यें अंत झाला. रिव्ह्यु ऑफ रीव्ह्यूचे प्रसिद्ध संपादक **डब्ल्यु. टी. स्टेड** यांचे कुंडलींत नेपच्युन अष्टमांत पीडित होता. त्यांसही पण टिट्यानिक आगबोटीवर जलसमाधी मिळाली. महाराष्ट्रांतील लोकमान्य पुढारी रा. रा. **बा. गं. टिळक** यांचे कुंडलींत अष्टमांत नपच्युन आहे. ज्या वेळीं चलित रवीनें ह्या ग्रहास प्रतियोग करण्यास सुरवात केली त्याच वेळीं त्यांस सहा वर्षांच्या तुरुंगवासाची व हद्दपारीची शिक्षा फर्मावण्यांत आली.



## नेपच्युन नवम स्थानांत असतां.

नेपच्युन नवमांत असतां धार्मिक मतें चमत्कारिक असतात; अध्यात्मविद्या किंवा गूढ-शास्त्रें शिकण्याची आवड असते. ह्या माणसांस स्वप्नें फार पडतात. स्वप्नसृष्टीमधून ह्या माणसांस नानाविध गोष्टी कळतात. पुढील होणाऱ्या गोष्टी कळतात तर कित्येकांस कथानकें व कविता सुचतात. नवमांत नेपच्युन असून तो चंद्रबुधांबरोबर शुभ दृष्टियोग करीत असलेली मंडळी जन्मतःच उत्तम भविष्यवादी आढळतात. ह्या स्थानांत नेपच्युन पीडित असतां मानसिक त्रास व मज्जातंतूचे विकार दर्शवितो. त्याचप्रमाणें जलप्रवासांत त्रास, अपघात, धार्मिक संस्थेबरोबर विरोध, कायद्यासंबंधी भांडणें व त्रास दर्शवितो. नवम स्थानांतील नेपच्युन कित्येक प्रसंगीं बायकोचे किंवा नवऱ्याचे नातेवाईक—ज्याप्रमाणें कुंडली पुरुषाची किंवा स्त्रीची असेल त्या अनुरोधानें—विचित्र स्वभावाचे व लहरी दर्शवितो. नवमांत नेपच्युन असून ज्यास अध्यात्मविद्या किंवा गूढविद्येची गोडी नसते त्या मंडळीस दूरचे प्रवास, जलप्रवास व नवीन देश पाहण्याची आवड विशेष दृष्टोत्पत्तीस येते.

कै. रा. रा. जीवनराव चिटणीस यांचे कुंडलींत नवमांत मीनेमध्यें नेपच्युन असून तो लग्नामध्यें कर्कराशीमधील असलेल्या चंद्राबरोबर त्रिकोणयोग करीत होता. कै. चिटणीसांचे ज्योतिषशास्त्रामधील प्राविण्यासंबंधानें लिहिण्याची आवश्यकता नाहीं. त्यांस स्वप्नसृष्टीमधून पुष्कळ गोष्टी कळत असत. त्यांचे बहुतेक सर्व ज्योतिषशास्त्र व इतर शास्त्रांमधील शोध स्वप्नसृष्टीमधून मिळालेले होत असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. कारण अशी स्थिति असलेल्या माणसाचें लिंग शरीर ( Astral body ) फारच प्रबळ असून त्यास Astral plane कामलोकावर सहज जातां येतें. त्याचप्रमाणें ज्यांस ध्यान किंवा समाधी ह्यांसंबंधानें Sub-conscious state पूर्ण माहिती आहे त्यांस वरील स्थितीमधून पुष्कळच गोष्टी कळतात.

कै. चिटणीसासंबंधीं एक अनुभव विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. ज्या ज्या दिवशीं गोचरीचा चंद्र किंवा रोजचा चंद्र कर्कराशीमधून व नेप-

च्यूनचे त्रिकोणामधून भ्रमण करीत असे त्या त्या दिवशीं त्यांस अनेक गोष्टी, नवीन कल्पना व विचार सुचत असून त्या दिवशीं वर्तवलेलीं फळें शेंकडा ९० बरोबर येत असत. व ह्या दिवसाची रात्र विशेष महत्वाची जात असे.

## नेपच्युन दशमांत असतां.

दशम स्थानांतील नेपच्युन धंद्यासंबंधानें त्रास, कंटाळा व अडचण दर्शवितो. ह्या स्थानांत नेपच्युन बलवान व शुभदृष्ट असतां कंपन्यांतील नोकरी, कंपन्यांचे व्यवहार, जलाशीं संबंध असलेले धंदे व साधारण हलके धंदे यांपासून फायदा होतो. ह्या स्थानांतील पीडित नेपच्युन अगर वरुण धंद्यामध्यें अपयश, मानभंग, अपकीर्ति, सार्वजनिक लोकांमध्यें वाईट बोलवा, गृहकलह किंवा त्रास, मातृपितृनाश किंवा त्यापासून वेगळें निघणें वगैरे गोष्टी दर्शवितो.

दशम स्थानांत बलवान व शुभदृष्ट असलेला नेपच्युन गूढविद्या—मंत्रशास्त्र, ज्योतिष, सामुद्रिक, मस्तिष्कपिंडविद्या, सायकिक कला—दुसऱ्याचे मनोविकार जाणणें—वगैरेंपासून लाभ दर्शवितो. त्याचप्रमाणें दशमांतील बलवान नेपच्युन कादंबऱ्या लिहिण्यामुळें, चित्रकलेमुळें, कवित्वामुळें, गायनवादन विशेषतः तंतुवाद्यामुळें सांपत्तिक लाभ व कीर्ति दर्शवितो. दशमांत शुक्र-नेपच्युनयुति असतां उत्तम चित्रकार, उत्तम गाणारा, किंवा तंतुवाद्यविशारद मंडळी असतात व सदरहु धंद्यांत त्यांस कीर्ति किंवा नांवलौकिक उत्तम प्रकारचा मिळतो. परंतु त्यांचे वागणूक किंवा खाजगी वर्तनासंबंधानें जनसमाजांत चांगलें मत पाहण्यास मिळत नाहीं. सदरहु दशमांतील नेपच्युन-शुक्रयुति पापदृष्ट असतां फारच अशुभ फळें पाहण्यास मिळतात. कारण ही मंडळी सर्वगुणसंपन्न असून काय करतील यासंबंधानें कल्पनाच करण्याचा प्रसंग येतो. ही मंडळी व्यसनी, लबाड, लफंगी असून त्यांस सामाजिक सदाचाराची किंवा धार्मिक बंधनाची मुळींच ओळख नसल्यामुळें अनन्वित, अघोर व निंद्य कृत्यें करणारी आढळतात व ह्याचा शेवट शोचनीय स्थितीमध्यें झालेला पाहण्यास मिळतो.



## नेपच्युन एकादश स्थानांत असतां.

नेपच्युन एकादश स्थानांत ज्याप्रमाणें पीडित किंवा बलवान असेल त्याप्रमाणें मैत्रीसंबंधानें विचित्रपणा पाहण्यास मिळतो. ज्यांच्या कुंडलींत नेपच्युन एकादश स्थानांत असतो त्यांचे मित्रासंबंधीं अनुभव विचार करण्यासारखे असतात. कित्येकांस लंगडे, पांगळे किंवा असेच व्यंग असलेले मित्र मिळतात तर कित्येकांस त्यांचे मित्र फसवितात किंवा भलत्याच मार्गास लावितात. नेपच्युन ह्या स्थानांत असतां मित्र, स्नेही, सोबती, ओळखीचे लोक ह्यांसंबंधानें आयुष्यांत बऱ्याच घडामोडी घडलेल्या पाहण्यास मिळतात. नेपच्युन एकादश स्थानांत बलवान असून बुध किंवा चंद्राबरोबर शुभसंबंधित असतां अंतर्ज्ञान किंवा दिव्य दृष्टि Clairvoyance असते.

प्रसिद्ध थियॉसफिस्ट **सी. डब्ल्यु लेडबीटर** ह्यांचे कुंडलींत रवि, बुध व नेपच्युन युति कुंभ राशींत एकादश स्थानामध्यें झालेली आहे व त्यांचे क्लेरव्हायन्स—दिव्यदृष्टीसंबंधानें अनुभव, ग्रंथ वगैरे पाहण्यासारखे आहे.

## नेपच्युन द्वादश स्थानांत असतां.

द्वादश स्थानांत नेपच्युन बलवान असतां डिटेक्टीव्ह खात्यांत, गुप्तपोलीस खात्यांत, गूढविद्येपासून, हासपीटलस, तुरुंग, गुप्तपणानें काम करणाऱ्या नोकऱ्या वगैरेंपासून लाभ दर्शवितो. हीं माणसें बहुशः जनसमाजांत मान्य नसलेलीं कामें किंवा ज्या ज्या गोष्टींसंबंधानें जनसमाजाचें विरुद्ध मत असतें असलीं मतें किंवा कृत्यांचे प्रर्वतक असतात. आपण जनसमाजाची सेवा केली पाहिजे किंवा जगांतील अन्यायाकरितां भांडलें पाहिजे असल्या विचारांची असतात. ह्या स्थानांत नेपच्युन पीडित नसावा कारण ह्या स्थानांतील पीडित नेपच्युन गुप्तशत्रुत्व, विश्वासघात, कैद, दंड, शत्रुभय व त्यामुळें नाश दर्शवितो.

प्रसिद्ध थियॉसफीच्या अध्यक्ष मिसेस **ॲनी बेझंट** यांचे कुंडलींत नेपच्युन व्ययस्थानांत आहे व एकंदर त्यांच्या आयुष्यामधील घडलेल्या घडामोडींचा विचार करितां ही स्थिति फार महत्वाची आहे. व्ययस्थानांतील नेपच्युन इच्छेविरुद्ध एकांतवास पतकरण्यास लावतो असें म्हणतात.

## नेपच्युनचा किंवा वरुणाचा इतर ग्रहाबरोबर शुभाशुभ दृष्टियोग झाला असतां अनुभवास येणारीं फळें.

**नेपच्युनहर्शलचा शुभ दृष्टियोग.**—शोधकता, कल्पकता, कलाकुशलत्व, वेदांत किंवा अध्यात्मशास्त्राची गोडी किंवा प्राविण्य दर्शवितो.

**नेपच्युनशनीचा शुभ दृष्टियोग**—साधारणपणें स्वभाव कठोर दर्शवितो. ही माणसें कोणतेंही काम मोठ्या चिकाटीनें पूर्णतेस नेतात. हा योग मनाची एकतानता किंवा एकाच गोष्टीकडे लय फार काळ दर्शवितो. ह्या माणसास गायनवादन ह्याचा शोख आढळतो. अध्यात्मिक प्रगतीस हा योग सर्व प्रकारें अनुकूळ आहे. ज्याच्या कुंडलींत नेपच्युनशनीचा अशुभयोग असेल त्यांनीं सायकिक किंवा अध्यात्मविषयासंबंधीं जपून वागावें. हा योग अनेक प्रकारचा त्रास व संकटें दर्शवितो. नेपच्युनशनियुतीच्या संबंधानें विचार करितां अमुक अमुक फळ मिळेल असें आज सांगवत नाहीं. परंतु कुंडलींत हा योग अनिष्टच मानण्यास कांहीं हरकत नाहीं. मानवी प्राण्याची ज्याप्रमाणें कमी अधिक उन्नती असेल त्याप्रमाणें निरनिराळीं फळें पाहण्यास मिळतील. ह्या योगामुळें बहुशः शत्रुत्व, शत्रुत्वामुळें अनेक प्रकारचीं स्वातंत्र्यास विघातक बंधनें प्राप्त होतात. पित्याचा मृत्यु लहानपणीं होणें, स्थावर इष्टेटीचा नाश वगैरे गोष्टी घडतात.

**नेपच्युनगुरूचा शुभयोग.**—हा अध्यात्मिक त्याचप्रमाणें ऐहिक सुखास चांगला आहे. हा योग सट्टे, सोडत वगैरे—पासून लाभ दर्शवितो. नेपच्यनगुरूचा अशुभ दृष्टियोग सांपत्तिक सुखास चांगला नाहीं. सदरहु योग वारंवार सांपत्तिक अडचणी, उधळपट्टी, विश्वासघात किंवा फसवेगिरीनें दिवाळीं निघाल्यामुळें सांपत्तिक नाश दर्शवितो. ( अपूर्ण. )



## ग्रहांचें बल कसें पाहतात.

लेखकः—राम नारायण

( ८० पानावरून पुढें चालू. )

### ट्रिप्लिसिटी वगैरेंचें कोष्टक.

| राशि | ट्रिप्लिसिटी | टर्म. | | | | | फेस. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दि. रा. | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (१) | (२) | (३) |
| मेष | र–गु. | गु ६ | शु १४ | बु २१ | मं २६ | श ३० | मं १० | र २० | शु ३० |
| वृ. | शु–चं. | शु ८ | बु १५ | गु २२ | श २० | मं ३० | बु १० | चं २० | श ३० |
| मि. | श–बु. | बु ७ | गु १४ | शु २१ | श २५ | मं ३० | गु १० | मं २० | र ३० |
| क. | मं–मं. | मं ६ | गु १३ | बु २० | शु २७ | श ३० | शु १० | बु २० | चं ३० |
| सिं. | र–गु. | श ६ | बु १३ | शु १९ | गु २५ | मं ३० | श १० | गु २० | मं ३० |
| क. | शु–चं. | बु ७ | शु १३ | गु १८ | श २४ | मं ३० | र १० | शु २० | बु ३० |
| तू. | श–बु. | श ६ | शु ११ | गु १९ | बु २४ | मं ३० | चं १० | श २० | गु ३० |
| वृ. | मं–मं. | मं ६ | गु १४ | शु २१ | बु २७ | श ३० | मं १० | र २० | शु ३० |
| ध. | र–गु. | गु ८ | शु १४ | बु १९ | श २५ | मं ३० | बु १० | चं २० | श ३० |
| म. | शु–चं. | शु ८ | बु १२ | गु १९ | मं २५ | श ३० | गु १० | मं २० | र ३० |
| कुं. | श–बु. | श ६ | बु १२ | शु २० | गु २५ | मं ३० | शु १० | बु २० | चं ३० |
| मी. | मं–मं | शु ८ | गु १४ | बु २० | मं २६ | श ३० | श १० | गु २० | मं ३० |

एखादा ग्रह उच्च, स्वगृहीं नसून स्वराशीच्या ' ट्रिप्लिसिटी ' ' टर्म ' किंवा ' फेस ' यांमध्यें असल्यास बलवान असतो असें म्हणतात. ट्रिप्लिसिटी पहातांना जन्म दिवसा आहे किंवा रात्रीं आहे हें पाहिलें पाहिजे. ट्रिप्लिसिटी वगैरे कसे पहावे हे वाचकांच्या लवकर लक्षांत येण्यासाठीं एक उदाहरण घेऊन दाखवितों. एका कुंडलीमध्यें कर्क राशीच्या १४ व्या अंशांत बुध आहे व जन्म दिवसास झाला आहे. वर दिलेल्या कोष्टकांत कर्क राशी समोर ट्रिप्लिसिटी मंगळाची आहे. म्हणजे बुध स्वतःच्या ट्रिप्लिसिटींत नाहीं; कर्केच्या १४ व्या अंशापासून २० अंशापर्यंत बुध स्वतःच्या ' टर्म ' मध्यें आहे आणि कर्केच्या ११ व्या अंशापासून २० अंशापर्यंत स्वतःच्या ' फेस ' मध्यें आहे म्हणजे बुध येथें बलवान आहे.

ग्रहांचें राशिबल पहाण्याकरतां ट्रिप्लिसिटी, टर्म व फेस यांचा उपयोग जुने यूरोपीय ज्योतिर्विद करीत असत परंतु अलीकडे हा प्रघात समूळ नाहींसा झाला आहे. सन १८२८ मध्यें पहिल्या रॅफेल चें ' मॅन्युअल् ऑफ् अॅस्ट्रॉलाजी ' प्रसिद्ध झाल्यापासून आतांपर्यंत आंग्ल फलज्योतिषामध्यें जे पुष्कळच फेरबदल झाले त्यांमध्यें ट्रिप्लिसिटीज, टर्म व फेस यांचा अनुभव येत नसल्यामुळें ते सोडून देऊन त्यांच्याबद्दल राशींच्या व ग्रहांच्या गुणधर्माप्रमाणें राशिबल पहाण्याचा प्रकार सर्वत्र रूढ झाला आहे. राशींचे व ग्रहांचे गुणधर्म लक्ष्यांत घेऊन बल ठरविण्याचा प्रकार शास्त्रशुद्ध व अनुभवास पटणारा आहे तो असाः—रवि व मंगळ हे अग्नितत्वाचे ग्रह असल्यामुळें मेष, सिंह व धनु या अग्निराशींत बलवान असतात, व कर्क आणि मीन या जलतत्वाच्या राशींत निर्बली असतात; बुध, मिथुन, कन्या, तूळ व कुंभ या बौद्धिक राशींत बलवान असतो व जल राशींत निर्बली असतो; गुरु व शुक्र हे प्रसव व आर्द्र राशींत, शनि व हर्शल हे वायु राशींत आणि नेपच्युन जलराशींत बलवान असतात. ह्याप्रमाणें तत्वानुरूप राशिबल ठरविणें हें मित्रक्षेत्रावरून राशिबल ठरविण्यापेक्षां अधिक अनुभवास पटणारें आहे असें आम्हांस वाटतें.

वर दिलेल्या पाश्चिमात्य पद्धतीमध्यें कमीपणा हा आहे कीं त्या पद्धती-



प्रमाणें सर्व राशींसंबंधानें निकाल लागत नाहीं. उदाहरणार्थ—मंगळ, मकर, मेष, वृश्चिक, सिंह व धनु या राशींत बलवान असतो व कर्क, मीन, वृषभ व तूळ या राशींत बलहीन असतो असें सामान्यत्वानें सांगतां येईल परंतु मिथुन, कन्या व कुंभ या राशींत बलवान असतो किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं. दुसऱ्या तऱ्हेनें हीच गोष्ट सांगावयाची म्हणजे असें सांगतां येईल कीं कोणताही ग्रह (१) उच्च (२) स्वगृहीं व (३) स्वतत्वाच्या राशींत बलवान असतो आणि (१) नीचक्षेत्रीं (२) स्वराशिविन्मुखक्षेत्रीं (३) व विरुद्ध तत्वाच्या राशींत निर्बली असतो. या सहा प्रकारांनीं बलाबल पहातां येतें परंतु प्रत्येक ग्रहाच्या वेळीं या सहा प्रकारांमध्यें न येणाऱ्या अशा दोन–तीन राशी रहातातच. उदाहरणार्थः—मंगळ ग्रह विचारांत घेतला असतां मिथुन, कन्या व कुंभ या तीन राशींत बलवान आहे किंवा नाहीं हें ठरत नाहीं. आणि हाच प्रकार इतर ग्रहांच्या संबंधानेंही होतो. तेव्हां उच्च, स्वगृह व स्वतत्वाच्या राशींशिवाय आणखी कोणत्या राशींत ग्रह बलवान असतो हें ठरविण्यास दुसरा कांहीं तरी मार्ग असावयास पाहिजे आणि आमच्या मतें हा मार्ग असा आहे कीं ग्रह ज्याप्रमाणें स्वतत्वाच्या राशींत बलवान असतो त्या प्रमाणेंच तो आपल्या **मूळ त्रिकोण व उच्च राशीपासून त्रिकोणांतील राशीमध्यें ( स्वक्षेत्रविन्मुख राशीखेरीजकरून ) बलवान असतो.** उदाहरणार्थः—मंगळ हा आपल्या मूळ त्रिकोण ( मेष ) राशीपासून त्रिकोणांतील सिंह व धनु या राशींमध्यें आणि मकर राशीच्या त्रिकोणांतील जी कन्या राशि त्या राशीमध्यें बलवान असतो. मकर राशीच्या त्रिकोणांत वृषभ राशिही येते परंतु ती मंगळाची स्वक्षेत्रविन्मुख राशि आहे त्यामुळें तो ह्या राशींत बलवान नसतो. याप्रमाणें सर्व ग्रहांसंबंधानें समजावें. ग्रह (१) उच्च राशींत (२) स्वराशींत (३) स्वतत्वाच्या राशींत आणि (४) मूळ त्रिकोण व उच्च राशीपासून त्रिकोणांतील राशींत बलवान असतो. यांव्यतिरिक्त असणाऱ्या राशींत बलवान असतो असें मानण्याचें कारण नाहीं.

ग्रहाचें राशिबल कसें ठरवावें याचा विचार वर केला आहे. या

विचारावरून ग्रह राशिबली आहे किंवा नाहीं हें कळेल परंतु राशिबलांतील तर तम भाव कळणार नाहीं. सिंह व धनु या अग्निराशींत मंगळ बलवान असतो हें खरें परंतु त्या दोन राशींपैकीं कोणत्या राशींत अधिक बलवान असतो हें अवश्य समजलें पाहिजे. उच्च व स्वराशीशिवाय इतर राशींत असणाऱ्या ग्रहांच्या राशिबलाचा कमीअधिकपणा ओळखणें कठीण आहे व यासंबंधानें नियमही सांगतां येत नाहीं. फक्त अनुभवावरूनच त्याचा निर्णय केला पाहिजे. व्यक्तिशः प्रत्येकाच्या अनुभवामध्यें कांहींतरी फरक असतोच व त्यामुळें राशिबलाचा कमीअधिकपणा ठरविण्यांत मतभेद होणें शक्य आहे. परंतु हा मतभेद, या विषयाची योग्य चर्चा करून घालवितां येईल अशी आमची कल्पना आहे आणि म्हणून आमच्या अनुभवाप्रमाणें ग्रह द्वादश राशींमध्यें क्रमवार कसे बलवान असतात हें पुढें देतों. राशिबलाची जी प्रतवारी पुढें दिली आहे तीमध्यें उच्च राशींत ग्रह अत्यंत बलवान असतो त्याच्या खालोखाल स्वक्षेत्रीं बलवान असतो असें आम्हीं मानलें आहे. परंतु पाश्चिमात्य ज्योतिषी ग्रह स्वक्षेत्रीं अत्यंत बलवान असतो असें समजतात.

**रविः**—मेष, सिंह, धनु, वृषभ, वृश्चिक, मिथुन, कन्या, मकर, तूळ, कुंभ, कर्क व मीन या राशींच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**चंद्रः**—वृषभ, कर्क, तूळ, कुंभ, कन्या, मिथुन, मीन, धनु, मेष, सिंह, मकर व वृश्चिक या राशींच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**बुध**—कन्या, मिथुन, कुंभ, तूळ, मकर, सिंह, वृषभ, मेष, धनु, वृश्चिक, कर्क व मीन या राशींच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**शुक्र**—मीन, तूळ, वृषभ, कर्क, सिंह, मिथुन, धनु, मकर, मेष, वृश्चिक व कन्या या राशींच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**मंगळ**—मकर, मेष, वृश्चिक, सिंह, धनु, कन्या, मिथुन, कुंभ, वृषभ, तूळ, मीन व कर्क, या राशींच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**गुरु**—कर्क, धनु, मीन, सिंह, तूळ, कुंभ, मेष, वृश्चिक, वृषभ मिथुन, मकर व कन्या या राशींच्या अनुक्रमानें बलवान असतो.



**शनिः**—तूळ, कुंभ, मकर, मिथुन, कन्या, वृषभ, वृश्चिक, कर्क, मीन, धनु, सिंह व मेष या राशींच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**हर्शलः**—कुंभ, मिथुन, तूळ, वृश्चिक, कन्या, मकर, मेष, वृषभ, धनु, सिंह, कर्क व मीन या राशींच्या अनुक्रमानें बलवान असतो.

**नेपच्युनः**—मीन, कर्क, कुंभ, तूळ, मिथुन, वृश्चिक, कन्या, मेष, मकर, वृषभ, धनु व सिंह या राशींच्या अनुक्रमानें बलवान असतो.

कोणत्याही ग्रहाच्या राशिबलाचा क्रम कसा असतो हें वर दिलेल्या वर्गवारीवरून सहज कळून येईल. बलाचें उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन वर्ग केले तर प्रत्येक ग्रहासमोर लिहिलेल्या राशींपैकीं पहिल्या तीन राशींत उत्तम प्रकारचें बल असतें, त्यानंतरच्या तीन राशींत मध्यम प्रकारचें बळ असतें, त्यानंतरच्या तीन राशींत कनिष्ठ बल असतें आणि बाकी राहिलेल्या तीन राशींत बलहीन असतो असें समजावें. उदाहरणार्थः—मंगळाला पहिल्या तीन राशींत म्हणजे मकर, मेष व वृश्चिक राशींत उत्तम प्रकारचें बल असतें; सिंह, धनु व कन्या राशींत मध्यम बल असतें; मिथुन, कुंभ व वृषभ राशींत कनिष्ठ बल असतें आणि तूळ, मीन व कर्क राशींत मुळींच बल नसतें. उत्तम, मध्यम व कनिष्ठ या प्रकारांमध्यें सुद्धां तर तम भाव असा सांगतां येईल कीं मंगळ, मकर, मेष व वृश्चिक राशींत उत्तम बली असतो हें खरें परंतु वृश्चिकेपेक्षां मेषेंत अधिक बली आणि मेषेपेक्षां मकरेंत अधिक बली असतो.

वर दिलेल्या बलाच्या वर्गवारीमध्यें पहिल्या आठ ग्रहांच्या संबंधानें जी वर्गवारी दिली आहे ती आमच्या अनुभवाप्रमाणें आहे व नेपच्युन संबंधानें आम्हीं आमच्या **कल्पने**प्रमाणें वर्गवारी दिली आहे.

### ( ३ ) दृष्टिबल.

कोणत्याही कुंडलींतील स्थानबल व राशिबल यांचें अनुमान करणें सोपें आहे व ह्या दोनच गोष्टी लक्ष्यांत घ्यावयाच्या असत्या तर ज्योतिषशास्त्र हें एक सुलभ शास्त्र झालें असतें. परंतु स्थान व राशिबलांमध्यें पुष्कळ वेळां ग्रहांच्या दृष्टयांनीं व योगांनीं कल्पनातीत फरक होतात. अर्थात हे

फरक कोणत्या तत्वावर होतात याचें योग्य ज्ञान झाल्याशिवाय कुंडली कळणार नाहीं. कुंडलीमध्यें ज्या वेळीं ग्रह एकमेकांपासून कांहीं विवक्षित अंतरावर असतात त्या वेळीं ते एकमेकांवर विशिष्ट परिणाम करितात. दोन ग्रहांमधील कांहीं विशिष्ट अंतरास दृष्टि अशी संज्ञा आहे. या दृष्ट्यांमध्यें कांहीं दृष्ट्या शुभ व कांहीं अशुभ परिणाम घडवून आणतात. शुभपरिणामी दृष्ट्या ग्रहांचें बल वृद्धिंगत करतात व अशुभपरिणामी दृष्ट्या त्यांचें बल कमी करतात. पापग्रह जर बलवान असतील तर त्यांमध्यें सुद्धां शुभ फलें देण्याचें सामर्थ्य आहे मग शुभ ग्रहांविषयीं तर सांगावयासच नको. ग्रहांचें शुभ फल देण्याचें सामर्थ्य दृष्टियोगांनीं वृद्धिंगत किंवा कमी होतें. ‘ द्विराश्यंतर दृष्टियोग ’ ( ६० अंश ) व ‘ त्रिकोण योग , ( १२० अंश ) हे शुभ परिणाम घडवून आणणारे किंवा ग्रहांचें बल वृद्धिंगत करणारे आहेत आणि ‘ अर्ध केंद्रयोग ( ४५ ), ‘ केंद्रयोग ’ ( ९० ) व ‘ प्रतियोग ’ ( १८० ) हे अशुभ परिणाम घडवून आणणारे किंवा ग्रहांचें बल कमी करणारे आहेत. हे पांच दृष्टियोग विशेष महत्वाचे आहेत आणि यांखेरीज ‘ सार्ध चतुष्टय राश्यंतर ’ योग ( १३५ अंश ) ‘ षडाष्टक ’ योग ( १५० ) असे दोन अशुभफलदायी योग आहेत असें अनुभवास येतें.

ग्रहांचे दृष्टियोग अंशात्मक होत असल्यास त्यांचीं फलें स्पष्टपणें दृष्टीस पडतात परंतु हे दृष्टियोग पूर्ण होण्याच्या पूर्वीं व नंतर कांहीं अंशांपर्यंत आपल्या गुणधर्माप्रमाणें फलें उत्पन्न करतात. साधारणपणें त्रिकोणयोग, घनयोग व केंद्रयोग हे आठ अंशांपर्यंत व बाकी राहिलेले दृष्टियोग सहा अंशांपर्यंत आपले परिणाम करतात. **दृष्टियोगांमध्यें जितकें कमी अंतर असेल तितका त्याचा परिणाम अधिक होतो.** रवि–चंद्रांबरोबर होणाऱ्या दृष्टियोगांचा इतर ग्रहांच्या दृष्टियोगांपेक्षां २।३ अंशांच्या अधिक अंतरावरून सुद्धां परिणाम दिसून येतो. दृष्टियोग कसे पहावे हें लवकर लक्ष्यांत येण्याकरितां एक उदाहरण घेतों. मेष राशीच्या १० व्या अंशांत एक ग्रह आणि सिंह राशीच्या १० व्या अंशांत दुसरा ग्रह आहे



तर या दोन ग्रहांमध्यें अंशात्मक त्रिकोणयोग किंवा नवपंचमयोग होईल; परंतु दुसरा ग्रह सिंह राशीच्या १८ व्या अंशापर्यंत असला तरी सुद्धां या त्रिकोणयोगाची फलें **थोडया फार प्रमाणानें** पहावयास मिळतील.

दृष्टियोग किती अंतरावरून आपले परिणाम करूं शकतात यासंबंधानें आपल्या इकडील कांहीं ज्योतिषांमध्यें बराच मतभेद दिसून येतो. हा मतभेद होण्याचें कारण असें दिसतें कीं अंशात्मक नसलेल्या दृष्टियोगांचे परिणाम होतात किंवा नाहीं हें ठरविण्याचें साधन त्यांच्या जवळ अपुरें किंवा मुळींच नसतें हें आहे. आणि याचें प्रत्यंतर सुलभ जातकाच्या तिसऱ्या भागाचे ६० वे पृष्ठ वाचतांना येतें. या पृष्ठावर असें लिहिलें आहे कीं ‘ यूरोपियन ज्योतिषी सुमारें ८ अंश अंतर असतांही योग अगर दृष्टि मानतात. तात्विक दृष्टीनें हें म्हणणें पटण्यासारखें नाहीं ’ ही तात्विक दृष्टि कोणती म्हणाल तर ग्रंथकार पुढें सांगतात ‘ गुरूला एक अंश चालण्यास सुमारें १२ दिवस लागतात. या हिशोबानें ८ अंश चालण्यास ३ म. ६ दि. लागतील म्हणून इतक्या दिवसांपूर्वीं केलेला अथवा करणारा योग आज फलदायक व्हावा हें पटत नाहीं ’ ‘ केलेला किंवा करणारा योग ’ फलदायक होतो किंवा नाहीं हें ठरविण्यास तो योग **किती वेळां** पूर्वीं किंवा नंतर होत आहे हें पाहिलें पाहिजे असें स्पष्ट मत उपरिनिर्दिष्ट ग्रंथांत नमूद केलेलें आहे. ६० व्या पृष्ठावरच ग्रंथकार म्हणतात ‘ ग्रहांचे पूर्ण योग नसले तरी जेव्हां एक ग्रह दुसऱ्या ग्रहाशीं जन्मानंतर **थोडयाच वेळांत** योग करणारा असेल अथवा त्यांचा योग होऊन **फारच थोडा वेळ** झाला असेल तेव्हां मात्र त्यांचा योग मानण्यास हरकत नाहीं; असें नसेल तर ते पृथक् पृथक् फलें उत्पन्न करतील. ’ बरें, हा ‘ थोडा काळ ’ किती तासांचा, दिवसांचा किंवा आठवडयांचा असतो हें ग्रंथकार सांगत नाहींत. ‘ योग अगर दृष्टि यांनीं मिळणारें फल किती कालापूर्वीं अगर नंतर मिळतें हें **अद्याप** निश्चित झालेलें नाहीं ’ आणि ज्योतिष विद्यार्थ्यांस अशी आशा असेल कीं पुढें तरी आपणास हा ‘ थोडा काळ ’ म्हणजे काय हें निश्चित कळेल पण त्यांची ही आशा व्यर्थ आहे कारण तावडतोबच ग्रंथकार

बजावून सांगतात कीं ' व पुढेंही शक्य नाहीं ' ! ग्रंथकारांनीं या ५।७ वाक्यांत काय सांगितलें आहे हें ओळखणें म्हणजे एक मोठें कोडेंच आहे. त्यांचें असें म्हणणें दिसतें कीं ८ अंश अंतर असल्यास दृष्टि व योग यांचा परिणाम असत नाहीं. कां असत नाहीं ? या प्रश्नास ते उत्तर देतात ' आठ अंश अंतरास फार काळ लागतो म्हणून. ' ' किती काळ पूर्वी अगर नंतर दृष्टीचे परिणाम होतात ? ' या प्रश्नास ते उत्तर देतात ' तें अद्याप निश्चित झालें नाहीं व पुढेंही होणार नाहीं. ' याला म्हणावी तात्विक दृष्टि ! ! योग अगर दृष्टि याचा परिणाम किती अंशावरून घडतो हें वरील तात्विक दृष्टीनें ठरविणें कधींच शक्य नाहीं. येथें काळ मर्यादेचा काय संबंध आहे हें कळत नाहीं. आठ अंशाच्या वेळेसच फार काळ लागतो आणि तीन अंशांच्या वेळेस लागत नाहीं असें कोठें आहे ? हर्शल हा नेपच्युन बरोबर फक्त ३ अंशांनीं जरी प्रतियोग करीत असला तरी हर्शलास ३ अंश चालण्यास ८ महिने १२ दिवस लागतील ! मग ३ महिने व ६ दिवसांपूर्वी किंवा नंतर होणारा योग किंवा दृष्टि मानणें ' तात्विक दृष्टीला ' खपत नाहीं तर ८ महिने व १२ दिवस हा एवढा मोठा काळ कसा खपावा ? दृष्टि अगर योग यांमध्यें ३ अंश अंतर असलें तरी चालतें असें वाटतें कारण ' जातक शिरोमणीच्या ' प्रस्तावनेमध्यें ३ पानावार जी कुंडली दिली आहे तीमध्यें चंद्र-मंगळांचा २ अं. ४१ कलांच्या अंतरानें होणारा नवपंचम दृष्टियोग फलदायी आहे असें म्हटलें आहे म्हणून आम्हीं तीन अंश अंतराचें उदाहरण घेतलें आहे. तीन अंशांच्या अंतरानें असणारे योग फलदायी होतात असें मानलें तरी सुद्धां ' कालमर्यादा निष्फळ ठरते आणि कालमर्यादा अगदीं तासावर आणून ठेविली तर तीन अंशांच्या अंतरानें होणारा दृष्टियोग तो ' दृष्टियोगच नाहीं ' असें म्हणण्याची पाळी येते. बाकी कालमर्यादा निष्फळ ठरणार हें भविष्य ' पुढेंही शक्य नाहीं ' या शब्दांत आधींच व्यक्त झालें होतें ! यूरोपीय ज्योतिषी ८ अंश अंतर असतांही योग अगर दृष्टि मानतात या त्यांच्या अज्ञानाबद्दल त्यांना मूर्खांत काढून व त्यांच्या ' री ओढणाऱ्यांची ' कींव करून सुद्धां हे ग्रंथकार ११ अंश ४७ कला अंतर असणारा रविहर्शलांचा प्रतियोग ( जा. शि. प्रस्तावना पा. ७ ) विचारांत घेतात. ! !

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद‍ाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. | नोव्हेंबर १९१६. | अंक ८ वा.

## प्रासंगिक विचार.

आर्यफलज्योतिषवाङ्मयांत राहु व केतूला बरेंच महत्व दिलें असून त्यांस उच्च, स्वक्षेत्रें वगैरे सांगितलीं आहेत. दशाविचारांत त्यांस स्थान मिळालें असून त्यांच्या दशाफलांचा अनुभव मिळतो असें पुष्कळांचें म्हणणें आहे. कित्येक राहु मिथुनराशीमध्यें उच्च क्षेत्री मानतात तर कित्येकांचे मतें तो वृषभ राशीमध्यें उच्च असतो; व केतु ह्या वर दर्शविलेल्या राशीपासून असलेल्या सातव्या राशीमध्यें उच्च असतो. राहु व केतु ह्यांचे गुणधर्म शनीप्रमाणें मानण्यांत येत असून ते खलग्रह आहेत असें मानतात, व कुंडलींतील ज्या ज्या स्थानांत हे ग्रह आढळतात त्या स्थानांसंबंधानें नाश सांगण्याची सर्वत्र ज्योतिषी लोकांची पद्धत आहे. अलीकडील आंग्ल ज्योतिर्विद राहु व केतु यांचा फारसा उपयोग करीत नाहीं. त्यांचे मतें

**राहु** हा शुभ असून शुभग्रहानें युक्त असतां विशेष चांगली फलें दर्शवितो. **केतूचा** अनुभव उलट पाहण्यास मिळतो. ह्मणजे तो ज्या ज्या स्थानांत असतो त्या त्या स्थानफलाचा व व्यक्तींचा नाश दर्शवितो.

वस्तुतः **राहु** व **केतु** हे ग्रह नसून पृथ्वीचा भ्रमणमार्ग व चंद्राची कक्षा हे एकमेकांस ज्या दोन ठिकाणीं छेदितात त्यांपैकीं एका बिंदूस राहु व दुसऱ्यास केतु असें ह्मणतात. ह्या दोन बिंदूंना स्वतंत्रपणें कांहीं फलें आहेत किंवा नाहींत ह्यासंबंधानें आज निश्चित असें कांहींच सांगतां येत नाहीं. एवढें मात्र खरें कीं ह्या दोन छेदनबिंदूमध्यें ग्रह असतां त्यांचीं फलें विशेष दृष्टोत्पत्तीस आलीं पाहिजेत. कुंडलींतील जन्मलग्न, जन्मचंद्र, रवि, व दशमस्थान ह्यांवरून जेव्हां **राहु** किंवा **केतूचें** भ्रमण होतें त्या वेळीं महत्वाच्या गोष्टी घडलेल्या पाहण्यास मिळतात, असें कित्येक ज्योतिर्विदांचें मत आहे. राहु व केतु हे ज्या राशींमधून भ्रमण करीत असतात त्या राशींमध्यें रवि व चंद्राचीं ग्रहणें होत असल्याकारणानें राष्ट्रीय घडामोडींसंबंधानें विचार करते वेळीं यांचा बराच उपयोग होतो. साधारणपणें ज्या ज्या राशीमध्यें राहु व केतु असतात त्या राशीनें दर्शविल्या जाणाऱ्या देशामध्यें पुष्कळ घडामोडी होतात. **राहु** हा सबंध राशीचक्राची प्रदक्षणा १८ वर्षें व २२९ दिवसांत पुरी करितो. व त्याची वार्षिक गति १९ अं. २० कला असून ३ कला दैनिक गति आहे. राहु हा राशिचक्रांतून आपली प्रदक्षणा विलोम गतीनें करितो.

जर चंद्राचे कक्षेचे हे छेदनबिंदु महत्वाचे आहेत तर त्याचप्रमाणें इतर ग्रहांचे कक्षेंमधील बिंदूंचा उपयोग फलज्योतिषांत कां करूं नये असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. खालीलप्रमाणें इतर ग्रहांचे सन १९०० मधील कक्षापात आहेत:—



**ग्रहांचे कक्षापात** ( Nodes of Planets ).

| | प्रथमपात | द्वितीयपात | शंभरवर्षांतील गति. |
|---|---|---|---|
| **बुध.** | वृषभ १७ अं. ९ क. | वृश्चिक १७ अं. ९ क. | १अं. १२ क. |
| **शुक्र.** | मिथुन १९ अं. ४४ क. | धनु १९ अं. ४४ क. | ०—९२ क. |
| **मंगळ.** | वृषभ १८ अं. २ क. | वृश्चिक १८ अं. २ क. | ०—४६ क. |
| **गुरु.** | कर्क ९ अं. २४ क. | मकर ९ अं. २४ क. | १ अं. ० |
| **शनि** | कर्क २२ अं. ५ क. | मकर २२ अं. ५ क. | ०—५३ क. |
| **हर्शल.**(प्रजापति) | मिथुन १३ अं. १७ क. | धनु १३ अं. ७ क. | ०—२६ क. |
| **नेपच्यून.** | सिंह ९ अं. ४३ क. | कुंभ ९ अं. ४३ क. | १अं. ६ क. |

संपादकाच्या आयुष्यांतील गेले चार महिने बरेच कष्टाचे व त्रासाचे गेले. ह्या काळांत अनेक अडचणी येऊन संपादकाच्या कुंटुबांत व मित्रमंडळीवर काळाची वक्र नजर झाल्यामुळें मालेच्या हितचिंतकांपैकीं दोघांजणास स्वर्गवास करावा लागला आहे व एक भयंकर आजारी आहेत. आमचे मित्र रा. रा. बळिभद्र यशवंत आचार्य यांस तारीख ३१ ऑगष्ट रोजीं सकाळीं ९ वाजतां स्टा. टाईम. रोजीं पुणें मुक्कामीं देवाज्ञा झाली. रा. आचार्य हे उत्तम ज्योतिषी असून कुंडलीविज्ञान मासिकामध्यें त्यांचे **ज्योतिषविद्यार्थी** ह्या नांवाखालीं बरेच लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या चालत्या काळीं त्यांनीं कुंडलीविज्ञानकारास हस्तें परहस्तें बरीच मदत केली आहे. अलीकडे २।२॥ वर्षें त्यांची प्रकृति नादुरुस्त असल्यामुळें दुसरे सर्व व्यवसाय त्यांस सोडून द्यावे लागले होते. संपादकाचा व त्यांचा सन १९०९ सालीं परिचय झाला व त्याकाळापासून त्यांनीं जें संपादकावर अप्रतिम प्रेम केलें व वेळोवेळीं सल्लामसलत दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहों. मालेच्या हितचिंतकांपैकीं एकास काळानें हिरावून नेलें याबद्दल आम्ही फार दिलगिर आहों ! ईश्वरी इच्छा ! ह्यांची ज्योतिषशास्त्रामधील प्राविण्यता बरीच होती. त्यांनीं आपला मृत्यु आल्या वर्षास अगोदर कळविला होता. त्यांचे पाठी-

मार्गे एक बंधु दोन मुली व एक मुलगा आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

रा. आचार्य हे प्रसिद्ध आर्य वैद्यराज नागेंद्रनाथसेन गुप्त यांचे येथील एजंट होते ह्या औषधांसंबंधानें आम्हीं आमचा अनुभव लवकरच प्रसिद्ध करणार आहों.

## नेपच्युन किंवा वरुण.

मागील अंकावरून पुढें चालू.

**नेपच्युनमंगळाचा शुभदृष्टियोग होत असतां**—हा योग सर्व प्रकारचे ऐहिक उन्नतीस चांगला असून ही मंडळी साधारणपणें सर्वांची आवडती असतात. हा योग महत्वाकांक्षा, कर्तृत्वशक्ति, अधिकारप्रियता, मोठमोठालीं कृत्यें कशीं करावीं वगैरेसंबंधीं विचार, रंगासंबंधीं विशेष ज्ञान व हा योग कुंडलींत असून बुध किंवा चंद्राबरोबर शुभसंबंधित असतां चित्रकला, पेन्टींगमध्यें चांगली प्रगति दर्शवितो. नेपच्युनमंगळाची युति किंवा **अशुभदृष्टियोग** अपघात, हलक्या लोकांबरोबर भांडणें, अनियमितपणा, प्रत्येक गोष्टींचा कळस करणें, मादक द्रव्यें किंवा औषधें ह्यांपासून सावध रहावें.

**नेपच्युनरवीचा शुभदृष्टियोग घडत असतां**—हा योग अध्यात्म उन्नति, सार्वजनिक प्रियता व सर्व प्रकारचीं शुभ फलें दर्शवितो. हा योग ज्यांचे ज्यांचे कुंडलींत आढळतो त्या त्या माणसांच्या आत्म्याच्या संवेदन शक्तीचा चांगला विकास झालेला पाहण्यास मिळतो. परंतु रविनेपच्यूनचा **अशुभयोग** कुंडलींत घडत असतां मित्र, ओळखीचे लोक, परकीय यांपासून विश्वासघात, त्रास, संकटें, अपयश व दुःख वांट्यास येतें. कुंडलींत **रविनेपच्युनयुति** घडतां पुष्कळ स्वप्नें पडतात व ह्या लोकासंबंधीं इतर लोकामध्यें एक प्रकारची विशेष आवड पाहण्यास मिळते. रविनेपच्युनयुतीची फलें सर्वच अशुभ मिळतात असें म्हणतां येत नाहीं. तरी पण ह्या लोकांनीं मादक द्रव्यें व औषधासंबंधीं विशेष सावध रहावें.



**नेपच्युनशुक्रशुभदृष्टियोग घडत असतां**—अनेक चांगलीं फलें दृष्टोत्पत्तीस येतात; हीं माणसें सुस्वभावी, गायनवादन, चित्रकला, नीटनेटकेपणा, सुंदर वस्तूंची विशेष आवड बाळपणापासून आढळतात. ह्या लोकांच्या सुंदरपणाची कल्पना किंवा आवडनिवड इतकी विचित्र असते कीं त्यांच्या सुंदरपणाच्या कल्पना स्वप्नसृष्टीमध्येंच पूर्ण होणें शक्य वाटतें. वरील योग गायनवादन किंवा घरें रंगविणें, सुशोभित करणें ( Decorative art ) वगैरे धंद्यांत चांगलें यश दाखवितो. **नेपच्युनशुक्राचा अशुभदृष्टियोग** अनेक वाईट फलांचा द्योतक आहे. हीं माणसें अतिकामी, विषयी, छंदी, भंगट अशीं आढळतात. विषयसेवनासंबंधीं ह्या माणसांच्या कल्पना पुष्कळ वेळा विचित्र पहाण्यास मिळतील. हा योग संसारसुखांत विघ्नें, विवाहामध्यें अडचणी, विवाहापूर्वींचे अनीतीचे संबंध किंवा प्रकार दर्शवितो. स्त्रियांचे कुंडलींत नेपच्यूनशुक्रयुति पंचमांत पीडित नसावी. कारण त्यामुळें त्याची वर्तणूक संशयास्पद आढळते. **नेपच्युनशुक्रयुति** अशुभ मानण्यास हरकत दिसत नाहीं. ह्या युतीचीं चांगलीं फलें फार थोडीं पाहण्यास मिळतात. नेपच्युनशुक्रयुति किंवा अशुभ दृष्टियोग कुंडलींत असलेल्या माणसांनीं विषय, स्त्रीसेवन, अंमली द्रव्यें किंवा मादक पदार्थ—औषधें ह्यांपासून सावध रहावें.

**नेपच्युनबुधशुभदृष्टियोग घडत असतां**—सदरहू बुद्धिमत्तेस चांगला पोषक असून कवित्वशक्ति, गाण्याची, व वादनाची आवड दर्शवितो. विचार प्रगल्भ आढळतात, अनेक विद्याव्यासंगी मित्रांचा संबंध व त्यांपासून लाभ, समुद्रप्रवासाची आवड व त्यांपासून फायदे दर्शवितो. ह्या योगावर जन्म पावणारी मंडळी उत्तम कादंबरीकार, कवि, तंतुवाद्यविशारद असतात. परंतु ह्या ग्रहांचा कुंडलींत अशुभ योग घडत असतां लहरी, अस्थिर, एकाच गोष्टीकडे लक्ष न लावणारे, भलत्याच कल्पनांचें साम्राज्य माजविणारे, महाठक, गोडबोले, ढोंगी, व विषयी लोक आढळतात. अशुभयोगामध्यें मज्जा-

तंतूंचा क्षोभ, डोकें फिरणें, वेड लागणें, मानसिक शक्ति क्षीण होणें, मस्तकविकार होतात. **नेपच्युनबुधाची युति** अशुभ मानतां येत नाहीं. कुंडलींत शुभस्थानांत व शुभदृष्टींत असतां उत्तम फळें अनुभवास येतात. ह्या लोकांची वागण्याची, विचार करण्याची तऱ्हा बहुशः जनसमाजाच्या विरुद्ध असलेली पुष्कळ कुंडल्यांत पहाण्यास मिळते. हीं माणसें कल्पक, हुशार, विद्वान, गूढशास्त्राची आवड बाळगणारीं आढळतात.

**नेपच्युनचंद्रांचा शुभदृष्टियोग घडत असतां**—हा योग बुद्धिमत्तेस चांगला असून या योगावर जन्म पावणारी मंडळी कल्पक, विद्वान, गायनवादनाची शोकी, कविता करण्याची आवड असणारी, प्रवासाची शोकी, विशेषतः जलप्रवासासंबंधीं आवड बाळगणारी आढळतात. विशेष सूचक स्वप्नें पडतात. **नेपच्युनचंद्रांचा अशुभदृष्टियोग** घडत असतां नाना प्रकारचे त्रास व संकटें, निराशा, विचित्र तऱ्हेचे घोंटाळे दर्शवितो व त्यामुळें भावी प्रगतीमध्यें नाना तऱ्हेच्या अडचणी येतात. हा योग नैतिक आचरण कमी दर्जाचें दर्शवितो त्यामुळें वरील योग कुंडलींत असलेलीं माणसें मनोविकाराधीन असलेली फार पाहण्यात मिळतात व त्यांचे मनाची एकाग्रता सहज भ्रष्ट होते. ह्या मंडळीनें मादक द्रव्यें, मादक औषधें ह्यांसंबंधीं फार सावध रहावें. नैसर्गिकच त्यांची इच्छाशक्ति प्रबळ नसल्यामुळें हे लोक दुसऱ्याचे स्वाधीन होतात करितां ह्यासंबंधानें सावधता बाळगावी. वरील अशुभ योग अनेक स्थलांतरें, विवाहांत अडचणी किंवा लग्नापासून त्रास दर्शवितो. **नेपच्युनचंद्रयुति** ही अशुभ आहे असें म्हणतां येत नाहीं. कुंडलीच्या ज्या ज्या स्थानांत ती असेल त्याप्रमाणें व ज्याप्रमाणें इतर ग्रहाकडून शुभ अगर पापदृष्ट असेल त्याप्रमाणें फळें पाहण्यास मिळतात. ह्या माणसांस फार विचित्र अनुभव पहाण्यास मिळतात. त्यांच्या वयाचीं ७, १४, २१, २८, ३५, ४२, ४९ व ५६ हीं वर्षें फार महत्वाचीं असतात. बलवान शुभदृष्ट असतां वरील वर्षें चांगलीं जातात व उन्नती होते. अशुभ



असतां अनेक संकटें व त्रास त्या त्या वर्षी घडतात. नेपच्युनचंद्रयुति असलेलीं माणसें कल्पक, व गायनवादनाची शोकी आढळतात ह्या लोकांस स्वप्नसृष्टीमध्यें फार विचित्र अनुभव पाहण्यास मिळतात.

असो, येथपर्यंत वाचकांस **नेपच्युन** अथवा **वरुण** ग्रहासंबंधानें आम्हांस उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. हा ग्रह सांपडल्यास अद्याप पुरतें एक शतकही झालें नसल्यामुळें प्रस्तुतच्या निबंधांत सर्वच गोष्टींचा साग्र विचार झाला असेल असें म्हणतां येत नाहीं. करितां वाचकवर्ग त्यांस जो जो नवीन अनुभव मिळेल तो **मालेच्याद्वारें** प्रसिद्ध करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न करतील अशी आशा आहे. आतां मागें सांगितलेल्या प्रस्तुत निबंधास नेपच्यूनची सन १८५० तें सन १९३० पर्यंतचें दरमहिना पहिल्या तारखेचें स्पष्ट स्थितीचें पत्रक देऊन हा बराच लांबलेला निबंध पुरा करण्याचा आमचा विचार आहे.

**नेपच्युन अथवा वरुण ह्या ग्रहाची सन १८५० ते १९३० पर्यंतची प्रत्येक महिन्याचे पहिल्या तारखेची स्पष्टस्थिति.**

| सन | महिना | राशि अं. क. | सन | महिना | राशि अं. क. |
|---|---|---|---|---|---|
| सन१८५० | जानेवारी १ ली | मीन २–१४ | सन १८६२ | जानेवारी १ ली | मीन२८–५९ |
| ,, १८५१ | ,, | मीन ४–५२ | ,, १८६३ | ,, | मेष १–१२ |
| ,, १८५२ | ,, | मीन ७–१ | ,, १८६४ | ,, | मष ३–२३ |
| ,, १८५३ | ,, | मीन ९–१२ | ,, १८६५ | ,, | मेष ५–३७ |
| ,, १८५४ | ,, | मीन११–२३ | ,, १८६६ | ,, | मेष ७–५१ |
| ,, १८५५ | ,, | मीन१३–३४ | ,, १८६७ | ,, | मेष१०–४ |
| ,, १८५६ | ,, | मीन१५–४६ | ,, १८६८ | ,, | मेष१२–१८ |
| ,, १८५७ | ,, | मीन१७–५८ | ,, १८६९ | ,, | मेष१४–३२ |
| ,, १८५८ | ,, | मीन२०–१० | ,, १८७० | ,, | मेष१६–४६ |
| ,, १८५९ | ,, | मीन२२–२० | ,, १८७१ | ,, | मेष १९–१ |
| ,, १८६० | ,, | मीन२४–३३ | ,, १८७२ | ,, | मेष २१–१६ |
| ,, १८६१ | ,, | मीन२६–४७ | ,, १८७३ | ,, | मेष २३–३१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ,, १८७४ | ,, | मेष २५-४६ | ,, १८८३ | ,, | वृषभ १६-१२ |
| ,, १८७५ | ,, | मेष २८-१ | ,, १८८४ | ,, | वषभ १८-२९ |
| ,, १८७६ | ,, | वृषभ ०-१७ | ,, १८८५ | ,, | वषभ २०-४६ |
| ,, १८७७ | ,, | वृषभ २-३२ | ,, १८८६ | ,, | वृषभ २३-३ |
| ,, १८७८ | ,, | वृषभ ४-४८ | ,, १८८७ | ,, | वषभ २५-२० |
| ,, १८७९ | ,, | वृषभ ७-५ | ,, १८८८ | ,, | वृषभ २७-३८ |
| ,, १८८० | ,, | वृषभ ९-२१ | ,, १८८९ | ,, | वृषभ २९-५४ |
| ,, १८८१ | ,, | वृषभ ११-३८ | ,, १८९० | ,, | भिथन २-१२ |
| ,, १८८२ | ,, | वृषभ १३-५५ | ,, १८९१ | ,, | मिथुन ४-३० |
| सन | महिना | राशि अं. क. | सन | महिना | राशि अं. क. |
| ,, १८९२ | ,, | मिथुन ६-४८ | ,, १९१५ | ,, | सिंह ० ,, |
| ,, १८९३ | ,, | मिथुन ९-५ | ,, १९१६ | ,, | सिंह २ ,, |
| ,, १८९४ | ,, | मिथुन ११-२४ | ,, १९१७ | ,, | सिंह ४ ,, |
| ,, १८९५ | ,, | मिथुन १३-४२ | ,, १९१८ | ,, | सिंह ६ ,, |
| ,, १८९६ | ,, | मिथुन १६-१ | ,, १९१९ | ,, | सिंह ९ ,, |
| ,, १८९७ | ,, | मिथुन १८-१९ | ,, १९२० | ,, | सिंह ११ ,, |
| ,, १८९८ | ,, | मिथुन २०-३६ | ,, १९२१ | ,, | सिंह १३ ,, |
| ,, १८९९ | ,, | मिथुग २२-५४ | ,, १९२२ | ,, | सिंह १५ ,, |
| ,, १९०० | ,, | मिथुन २५-१२ | ,, १९२३ | ,, | सिंह १८ ,, |
| ,, १९०१ | ,, | मिथुन २७-३० | ,, १९२४ | ,, | सिंह २० ,, |
| ,, १९०२ | ,, | मिथुन २९-४८ | ,, १९२५ | ,, | सिंह २२ ,, |
| ,, १९०३ | ,, | कर्क २-६ | ,, १९२६ | ,, | सिंह २४ ,, |
| ,, १९०४ | ,, | कर्क ४-२३ | ,, १९२७ | ,, | सिंह २७ ,, |
| ,, १९०५ | ,, | कर्क ६-४१ | ,, १९२८ | ,, | सिंह २९ ,, |
| ,, १९०६ | ,, | कर्क ८-५९ | ,, १९२९ | ,, | कन्या १ ,, |
| ,, १९०७ | ,, | कर्क ११-१७ | ,, १९३० | ,, | कन्या ३ ,, |
| ,, १९०८ | ,, | कर्क १३-३५ | | | |
| ,, १९०९ | ,, | कर्क १५-५२ | | | |
| ,, १९१० | ,, | कर्क १८ अंश | | | |
| ,, १९११ | ,, | कर्क २० ,, | | | |
| ,, १९१२ | ,, | कर्क २३ ,, | | | |
| ,, १९१३ | ,, | कर्क २५ ,, | | | |
| ,, १९१४ | ,, | कर्क २७ ,, | | | |

**सूचनाः**—वर दर्शविलेली नेपच्युनची जानेवारी १ लीची स्पष्टस्थिति **सायन** राश्यात्मक आहे. सायन स्पष्टस्थितीमधून इष्ट मताप्रमाणें केरोपंती, केतकराचे मताप्रमाणें किंवा ग्रहलाघवाप्रमाणें येणारे अयनांश वजा केले असतां **निरयण** राश्यात्मक स्पष्टस्थिति प्राप्त होईल.



# ग्रहांचें बल कसें पहातात ?

लेखकः—राम नारायण.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

योग किंवा दृष्टि यांमध्यें ७।८ अंशांचे अंतर असतां त्याचा परिणाम होतो किंवा नाहीं हें मागें सांगितलेल्या कालमर्यादेनें ठरत नाहीं असें वाचकांच्या लक्षांत येईलच आणि त्याबरोबरच हे परिणाम कसे ठरवावे यासंबंधानें त्यांना जिज्ञासाही होईल असें आम्हांस वाटतें. म्हणून आम्हीं आपले विचार येथें नमूद करतों.

एखाद्याच्या कुंडलीमध्यें रवि—शनींची अंशात्मक युति आहे असें आपण समजूं. रवि—शनींच्या युतीचीं अनुभविक फलें प्रसिद्ध ज्योतिर्विद् नवाथे यांनीं दिलीं आहेत तीं अशीं:—" धंद्याचा नाश होतो, राजकीय भय होतें. फौजदारी खटले होतात, सर्व व्यवहार भानगडीचे व अडचणीचे होतात, आयुष्याचा शेवट वाईट होतो, इच्छा अपुऱ्या राहतात, पितृसुख कमी मिळतें, व भयंकर व्याधि होतात." हीं फलें, रविशनींचा अंशात्मक योग होत असल्यामुळें, शेंकडा शंभर या प्रमाणानें पहावयास सांपडतील असें आपण समजूं. हा एकच योग लक्षांत घेतां त्याच्या फलाची तीव्रता आयुष्याच्या कोणत्या काळांत अधिक होईल याचा आपण विचार करूं लागलों तर असें आपण म्हणूं कीं दिनवर्षपद्धतीनें ज्या वेळीं पंचेचाळीस वर्षांच्या सुमारास चलित रवि मूळच्या शनीबरोबर अर्ध केंद्रयोग करील त्या वेळीं मूळच्या रवि—शनींच्या युतियोगाच्या फलांची तीव्रता अधिक होईल. परिभ्रमणपद्धतीनें किंवा गोचरीनेंही हा काळ अत्यंत वाईट आहे. मूळ रवि—शनींचा अशुभ योग झाला असल्यास पुन्हां ज्या वेळीं दिनवर्षपद्धतीनें अशुभ योग होतो किंवा परिभ्रमणपद्धतीनें तसाच योग किंवा मूळच्या योगास उद्दीपित करणारे केंद्रयोग किंवा प्रतियोग होतात त्या वेळीं शनि—रवींच्या मूळच्या

योगाची अशुभ फलें दृग्गोचर होतात हें दाखविण्याकरतां वरील उदाहरण घेतलें आहे. जर कुंडलीमध्यें रवि व शनि यांचा यत्किंचितही अशुभ योग झालेला नसेल तर पुढें होणाऱ्या अशुभ योगांची तीव्रता ही वर दिलेल्या उदाहरणांतील पंचेचाळीस वर्षांच्या सुमारास होणाऱ्या तीव्रतेच्या मानानें कांहींच नसते असें म्हटलें तरी चालेल. हा जो मोठा फरक पडतो याचें कारण एका कुंडलीमध्यें रवि-शनींच्या अशुभ योगाचीं फलें जन्मकालींच बीज स्वरूपानें असतात तीं पुढें फलद्रूप होतात आणि दुसऱ्या कुंडलीमध्यें मूळ अशुभ योग नसल्यामुळें पुढें होणारे अशुभ योग गौण स्वरूपाचे ठरतात. याचप्रमाणें जर आठ अंशांच्या अंतरानें होणाऱ्या रवि-शनि-युतीचे परिणाम पाहूं लागलों तर असें आपल्या अनुभवास येतें कीं त्या दोन ग्रहांमध्यें दिनवर्षपद्धतीनें ज्या वेळीं अर्धकेंद्रयोग होतो किंवा परिभ्रमणपद्धतीनें त्यांच्या मूळच्या योगांशीं अशुभ योग घडतात किंवा परिभ्रमणामुळें त्यांचे स्वतः-बरोबर अशुभ योग होतात त्या वेळीं जीं तीव्र अशुभ फलें पहावयास सांपडतात तीं गौण स्वरूपाचीं नसतात. रविशनींच्या आठ अंशांनीं होणाऱ्या युतींतील रवीवरून शनीचें भ्रमण होत असतांना जीं फलें अनुभवास येतात तशींच फलें रवि यत्किंचितही पीडित नसतां त्यावरून होणाऱ्या शनीच्या भ्रमणामुळें कधींच पहावयास सांपडत नाहींत. आणि याचें कारण रवि, शनीपासून आठ अंशांच्या अंतरावरून सुद्धां बिघडलेला असतो हें स्पष्ट आहे. जर तो आठ अंशांनीं बिघडत नसेल तर त्याच्या बरोबर पुढें होणारे योग ( हे योग दिनवर्षपद्धतीनें असोत किंवा परिभ्रमणपद्धतीनें असोत ) तीव्र फलदायी होणार नाहींत. परंतु आमच्या बरोबर अनेक ज्योतिर्विदांचा असा अनुभव आहे कीं हीं फलें तीव्र असतात आणि म्हणूनच आम्हीं म्हणतों कीं आठ अंशांच्या अंतरावरून सुद्धां दृष्टि किंवा योग परिणामकारक असतात.

दृष्टियोगांच्या अंतरासंबंधानें कांहीं ज्योतिर्विदांच्या मताचें दिग्दर्शन करून त्यांचें म्हणणें युक्तीस आणि अनुभवास पटत नाहीं हें आम्हीं सप्रमाण दाखविलें आहे. आतां, आपल्या इकडील जुने ज्योतिर्विद दृष्टियोगांचा विचार कसा करतात हें पाहूं.



## पूर्वाचार्यांच्या मताप्रमाणें दृष्टिविचार.

सर्व ग्रहांची तृतीय-दशमस्थानावर चतुर्थ दृष्टि, पंचम व नवम स्थानावर अर्ध दृष्टि, चतुर्थ-अष्टम स्थानावर त्रिपाददृष्टि व सप्तम स्थानावर संपूर्ण दृष्टि असते; या दृष्टि नियमांत सांगितल्यापेक्षां अधिक अधिकार शनि, गुरु व मंगळ यांस पूर्वाचार्यांनीं एकमतानें दिलेला आहे. ह्या अधिकाराप्रमाणें शनि तृतीय-दशमस्थानावर, गुरु पंचम-नवमस्थानावर व मंगळ चतुर्थ-अष्टमस्थानावर पूर्ण दृष्टीनें पहातो. ग्रह ज्या स्थानांत असेल त्या स्थानापासून तृतीयदशम, नवपंचम, चतुर्थअष्टम व सप्तम या सात स्थानांवर पाव दृष्टीपासून पूर्ण दृष्टीपर्यंत त्याची दृष्टि असते व बाकी राहिलेल्या द्वितीय, षष्ठ, एकादश व व्यय या स्थानांवर मुळींच दृष्टि नसते असें समजावयाचें. या विषयीं यवनाचार्य स्पष्ट ह्मणतातः—

द्वौ पश्चिमौ षष्ठमथ द्वितीयं ॥ संस्थानराशेः परिहृत्य राशिम् ॥
शेषान् ग्रहः पश्यति सर्वकालम्....................॥

पूर्वाचार्यांच्या मताप्रमाणें पहातां दृष्टींचें शुभाशुभत्व दृष्टि करणाऱ्या ग्रहाप्रमाणें असतें. शुभ ग्रहांची दृष्टि शुभ फलें व अशुभ ग्रहांची दृष्टि अशुभ फलें उत्पन्न करते. माग ( पान ११० पहा. ) ज्या अंशात्मक दृष्टि सांगितल्या आहेत त्यांत हा विचार नाहीं. तेथें दृष्टींचें शुभाशुभत्व प्रकारावर अवलंबून आहे, ग्रहांच्या शुभाशुभत्वावर नाहीं. आर्यपद्धतीच्या दृष्टीसंबंधानें दुसरा फरक असा पहाण्यांत येतो कीं ह्या दृष्ट्या स्थानपरत्वें किंवा राशिपरत्वें सांगितल्या आहेत. त्यांचा विचार अंशात्मकच करावा असें सांगितलेलें नाहीं. प्रख्यात टीकाकार उत्पल भट स्पष्ट लिहितो कीं ‘ यस्मिन् **स्थाने** ग्रहास्थितास्तस्मात्रिदशादीनि **स्थानानि** पादवृद्ध्याऽवलोकयंति ’ ज्याप्रमाणें कोणत्याही ग्रहाची स्थानावर दृष्टि असते

तशीच इतर ग्रहावरही दृष्टि असते. कुंडलीच्या सप्तम स्थानांत असणारा ग्रह जसा तनुस्थानाला पूर्ण दृष्टीनें पहातो त्याप्रमाणेंच तो तनुस्थानीं असलेल्या कोणत्याही ग्रहास पूर्ण दृष्टीनें पहातो असा पूर्वग्रंथकारांचा अभिप्राय दिसतो व ग्रहांची दृष्टि अंशात्मक असावी असें त्यांच्या लिहिण्यावरून स्पष्ट होत नाहीं.* अंशात्मक दृष्टि पहाण्याचा प्रकार आपल्याकडे अलीकडेच रूढ झाला आहे असें आम्हांस वाटतें आणि हा प्रकार अधिक अनुभवशीर आहे अशी खात्री आमच्याकडील ज्योतिषांस दिवसेंदिवस पटत आहे. दृष्टिसंबंधानें ज्यो. नवाथे यांचें अनुभवशीर ह्मणणें वाचकांनीं लक्ष्यांत ठेविण्यासारखें आहे तें असें:—" पाव, पाऊण व पूर्ण असे आमच्या जुन्या पद्धतीचे तीन (?) प्रकार आहेत परंतु पाव व पाऊण दृष्टि निरर्थक आहेत. कारण, त्यांनीं फल निश्चित होत नाहीं. पत्रिका पहातांनाही ज्योतिषी लोक या दृष्टि विचारांत घेतांना आढळत नाहींत. पूर्ण दृष्टि मात्र महत्वाची आहे व तिच्याच फळाचा अनुभव येतो. यांतही द्रष्टा व दृष्ट ग्रहांत अंशसाम्य (निदान फार थोडें अंतर) असलें पाहिजे. मेष राशीच्या ३ अंशांत असलेला ग्रह तुला राशीच्या ३ अंशांत असलेल्या ग्रहावरच मात्र पूर्णतेनें पाहील. तुला राशीच्या २९ व्या अंशावर असलेल्या ग्रहालाही पहातो असें ह्मणणें वेडेपणाचें नव्हे काय? मेष राशीवर कोणत्याही अंशांत असलेला ग्रह तुला राशींतील कोणत्याही अंशांतल्या ग्रहाला पहातो असें शास्त्रानभिज्ञाखेरीज कोणीही ह्मणणार नाहीं." आर्यपद्धतीच्या दृष्टि अंशात्मक घेतल्या व दृष्टियोगांचा शुभाशुभपणा त्यांच्या स्वरूपावरच आहे असें मानलें ह्मणजे त्यामध्यें बराच सूक्ष्मपणा येईल. मग मतभेद काय तो शनीच्या तृतीय दृष्टीसंबंधानें व शुभ ग्रहांच्या सप्तम दृष्टीसंबंधानेंच राहील. शनीची अंशात्मक तृतीय दृष्टि ह्मणजे द्विराश्यंतर दृष्टि होय. ही दृष्टि अशुभ फलदायी असें वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच शुभ ग्रहांच्या सप्तम दृष्टीसंबंधानें अद्यापि निर्णय झाला नाहीं. शुभ ग्रहांच्या सप्तम दृष्टि किंवा प्रतियोग शुभ फलदायी नाहींत असें आम्हांस वाटतें. कारण दिनवर्षपद्धतीनें ज्या वेळीं लग्न, दशम, चंद्र किंवा रवि यांजबरोबर शुक्र किंवा गुरु यांचे सप्तम दृष्टियोग किंवा प्रतियोग होतात त्या वेळीं अशुभ फलेंच पहाण्यास मिळतात. परिभ्रमण पद्धतीनें सुद्धां शुक्रगुरूंचा प्रतियोग किंवा सप्तम दृष्टियोग होत असल्यास शुभ फलें मिळत नाहींत. यावरून शुभ ग्रहांमध्यें सुद्धां होणारे सप्तम दृष्टियोग शुभफलदायी नसावेत अशी शंका येते.

* वराहमिहिर, कल्याणवर्मा, टीकाकार भटोत्पल व त्याच्या टीकेंतील यवनाचार्य व गर्ग यांचे श्लोक यांचा अभिप्राय लक्ष्यांत घेऊन आम्हीं आपलें मत दिलें आहे. वराहमिहिरापूर्वी झालेल्या आचार्यांचे ग्रंथ आम्हीं पाहिले नाहींत. रा. ना.



आर्यपद्धतीमध्यें ज्या वेळीं यावनीय ताजिक आलें त्या वेळीं दृष्टीचे कांहीं नवीन प्रकारही इकडे प्रचारांत येऊं लागले. हे प्रकार ताजिकासंबंधानेंच होते, त्यांचा जातकासंबंधानें उपयोग केलेला आमच्या पहाण्यांत नाहीं आणि ह्मणून आम्हीं त्याचा येथें विचार करीत नाहीं.

## ४ योग बल.

ज्योतिषशास्त्रांत योग हा शब्द युति अर्थानें वापरतात तसाच ग्रहांच्या विवक्षित स्थितीसंबंधानेंही वापरतात. ग्रहांच्या युति व त्यांच्या भिन्न भिन्न विवक्षित स्थिति यांमुळें कुंडलीमध्यें एक प्रकारचें सामर्थ्य उत्पन्न होत असतें व हें ग्रहांचें सामर्थ्य पुष्कळ वेळां ज्योतिषशास्त्राचे साधे नियम लक्ष्यांत घेऊन कळण्यासारखें नसतें. चंद्र व मंगळ या दोघांचेही गुणधर्म चांगले लक्ष्यांत घेतले तरी पण त्यांचा योग संपत्तिकारक असतो हें अनेक कुंडल्यांचे निरीक्षण केल्याखेरीज कळणार नाहीं. हें एक युतीचें उदाहरण झालें. ग्रहांच्या विवक्षित स्थितीचें उदाहरण पाहिजे असल्यास पूर्वाचार्यांनीं सांगितलेला 'अधियोग' नांवाचा योग पहावा. हा योग वराहमिहिराचार्यांनीं दिला आहे तो असा:—

सौम्यैः स्मरारिनिधनेष्वधियोग इंदो ॥
स्तस्मिंश्चमूपसचिवक्षितिपाल जन्म ॥
संपन्नसौख्यविभवा हतशत्रवश्च ॥
दीर्घायुषो विगतरोगभयाश्च जाताः ॥

सारांश:—चंद्रापासून सहाव्या, सातव्या, व आठव्या स्थानीं सर्व सौम्य ( शुभ ) ग्रह असतील तर ' अधियोग ' नांवाचा योग होतो; या योगावर जन्मणारे ऐश्वर्य, संपत्ति व सौख्यसंपन्न असे सेनापति, प्रधान किंवा भूपति होऊन शत्रूस जिंकणारे, दीर्घायुषी व रोग आणि भय यांनीं रहित होतात,* चंद्रापासून सहा, सात व आठ या स्थानीं बुध, शुक्र व गुरु असतां जो योग होतो त्याचें फळ वर दिल्याप्रमाणें असेल तर योगजन्य फलें किती बलवत्तर असतात याची नुसती कल्पनाच करावी लागेल. ग्रहांच्या युतीमुळें होणाऱ्या योगांची कल्पना करतां येईल, त्यांची फलें ठरवितां येतील परंतु ग्रहांच्या विवक्षित स्थितीमुळें उत्पन्न होणाऱ्या योगांचा अंदाज करतां येण्यासारखा नाहीं, त्यांची नुसती संख्या ठरविणें हें सुद्धां कठीण आहे आणि यामुळें ग्रहांचें योगजन्यबल कसें असतें हें फक्त दाखविण्यापेक्षां प्रस्तुत लेखांत अधिक कांहीं एक सांगतां येण्यासारखें नाहीं.

विषयाच्या सोयीसाठीं आम्ही योगांचे दोन प्रकार केले आहेत. दोन किंवा अधिक ग्रहांच्या युतीमुळें होणारे योग हा पहिला प्रकार आणि ग्रहांच्या विवक्षित स्थितीमुळें होणारे योग, हा दुसरा प्रकार. या दोन्ही प्रकारच्या योगांमध्यें पूर्वी सांगितलेलीं तीन प्रकारचीं फलें कमी अधिक प्रमाणानें पहावीं लागतातच. योगजन्य फलाची बरोबर कल्पना होण्यास ज्या ग्रहांचा योग होत असेल त्यांच्या बलाचा संपूर्णत्वानें विचार झाला पाहिजे. गुरुचंद्रांचा योग अत्यंत महत्वाचा आहे. ह्या जीवयोगाचे वर्णन

* हा योग व्यासांनीं सांगितला आहे असें श्रुतिकीर्ति नामक आचार्य म्हणतात. हे आचार्य वराहमिहिरापूर्वीचे आहेत.



ज्यो. नवाथे करतात. ' संस्था स्थापणें....दिगंत कीर्ति, पूर्णयश, विपुल संपत्ति हे या योगाचे मुख्य परिणाम आहेत. हा एकच योग ज्यांचे कुंडलींत पूर्णत्वानें झालेला आहे त्यांचे इतर ग्रहयोग पहाण्याचें कारण नाहीं. " इतका जरी हा महत्वाचा योग आहे तरी तो जर कुंडलीच्या षष्टांत मकर राशींत होत असल्यास त्याची पूर्वोक्त फलें जवळ जवळ कांहींच मिळणार नाहींत असें म्हटलें तरी चालेल म्हणून कोणत्याही ग्रहांचे युतियोग कोणत्या स्थानांत व कोणत्या राशींत होत आहेत त्याचप्रमाणें ते कोणत्या स्थानाचे अधिपति आहेत हें पाहिलें पाहिजे.

नवग्रहांच्या भिन्न गुणधर्मांमुळें प्रत्येक युतियोगांत विशिष्ट प्रकारचें भिन्नत्व पहाण्यांत येतें. एका युतियोगाचीं फलें दुसऱ्या युतियोगाबरोबर मिळणार नाहींत. ग्रहांचे गुणधर्म, पूर्वग्रंथकारांचें म्हणणें आणि स्वानुभव यांवरून प्रत्येक युतियोगाचीं फलें पुढें दिलीं आहेत. हीं फलें देतांना योगांचें समग्र वर्णन केलें नाहीं कारण हीं वर्णनें अन्य ग्रंथांतरीं मिळण्यासारखीं आहेत. फक्त दोन चार शब्दांतच योगांचें स्वरूप लक्ष्यांत येईल असें वर्णन दिलें आहे.

(१) **गुरु-चंद्रः**—दीर्घायुषी, दिगंतकीर्ति व संपत्तिमान.
(२) **रवि-गुरुः**—अधिकारसंपन्न व धनवान.
(३) **गुरु-शुक्रः**—वैभवशील व सौख्ययुक्त.
(४) **बुध-गुरुः**—भाषाशास्त्रज्ञ, विद्वान व ग्रंथकार.
(५) **बुध-शुक्रः**—कलाकौशल्यवान व आनंदी.
(६) **रवि-शुक्रः**—विलासी व चैनी.
(७) **रवि-बुधः**—बुद्धिमान.
(८) **चंद्र-शुक्रः**—सुखलोलुप, छानछोक व ललितकलांचा शोकी.
(९) **चंद्र-बुधः**—हुशार परंतु अस्थिर.
(१०) **चंद्र-रविः**—व्यवसायी परंतु वैभवहीन.
(११) **चंद्र-मंगळः**—लक्ष्मीवान व देहसौख्यरहित.

(१२) बुध–शनिः—खोल बुद्धीचा व तात्विक विचार करणारा.
(१३) चंद्र–शनिः—दरिद्री.
(१४) बुध–मंगळः—बडबडया, अनृत भाषण करणारा, धूर्त.
(१५) शुक्र–मंगळः—कामी, बाहेरख्याली.
(१६) शुक्र–शनिः—अनीतिमान व कुमार्गी.
(१७) मंगळ-गुरुः—उधळ्या,
(१८) रवि–मंगळः—धाडसी, उत्साही.
(१९) शनि–मंगळः—दरिद्री, अपयशी, दुर्दैवी, खुनशी.
(२०) रवि–शनिः—संकटग्रस्त, दुःखी व अपयशी.
(२१) गुरु–शनिः—महत्वप्राप्ति.

दोन ग्रहांच्या २१ युतियोगांची फलें दिलीं आहेत. त्याप्रमाणेंच दोहोंपेक्षां अधिक ग्रहांच्या युतियोगांचीं फलें देण्याचा विचार होता परंतु इतक्या योगांच्या कुंडल्या पहावयाला न मिळाल्यामुळें आणि त्याप्रमाणेंच पूर्व-ग्रंथकारांचा या बाबतींत बराच मतभेद असल्यामुळें षड्ग्रहापर्यंत या युति-योगांचीं फलें देतां आलीं नाहींत.

ग्रहांच्या युतियोगांच्या परिणामाप्रमाणेंच ग्रहांच्या समक्रांतियोगांचीं फलें अनुभवास येतात. मात्र हे समक्रांतियोग पहातांना विशेष लक्ष्य ठेविलें पाहिजे. कारण हे योगग्रह एका राशींत असतांना जसे होतात त्याप्र-माणेंच ग्रह एकमेकांच्या केंद्र किंवा विन्मुख राशींत असतांना सुद्धां होतात. म्हणजे गुरु-चंद्रांचा समक्रांतियोग शुभफलदायी खरा परंतु हा योग होत असतांना ते जर एकमेकांशीं केंद्रयोग किंवा प्रतियोग करीत असल्यास शुभ फलें दिसून येणार नाहींत. हा समक्रांतियोग आर्यज्योतिषांत सांगित-लेला नाहीं.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचिताद्दाच्चसेतोरवाचः ।
आकेदाराद्युदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. | डिसेंबर १९१६. | अंक ९ वा.

## प्रासंगिक विचार.

गेल्या अंकांत आम्हीं आमचे कपडवंज येथील मित्र व सहायक ज्योतिर्विद् सोमेश्वर गोपाळ जोशी यांचे आजाराचा उल्लेख केल्यानंतर लवकरच आम्हांस त्यांचे निधनवार्तेसंबंधानें लिहावें लागेल असें वाटलें नव्हतें. परंतु काळाचा महिमा अगाध आहे. त्यांचा आजाराचा उल्लेख करून पुरता एक आठवडा उलटला नाहीं तोंच त्यांच्या मृत्यूची अशुभ वार्ता येऊन थडकली. असो. ईश्वरी इच्छा दुसरें काय ? ज्योतिर्विद सोमेश्वर गोपाळ जोशी यांचा व आमचा एका कुंडलीचे भावी स्थितीचे भविष्यावरून प्रथमतः तोंडओळख होऊन नंतर स्नेहसंबंध इतका दृढतर झाला होता कीं ते आम्हांस आपल्या धाक-टया बंधूसारखे मानीत असत. ज्योतिर्विद सोमेश्वर हे पिढीजाद ज्योतिषी घराण्यांतले असून त्यांची कालनिर्णय करण्याची तऱ्हा फारच उत्तम दर्जाची होती. हे जरी पिढीजाद निरयण पंथांतून तयार झाले होत तरी सायन


पद्धतीची त्यांस माहिती मिळतांच ते तिचे कट्टे भक्त बनले. काळनिर्णय करण्याचे कामीं दिनवर्षपद्धति व गोचर ग्रह ह्यांचे साह्यानें कित्येक मी मी ह्मणविणारांस ह्यांही थक्क करून सोडलें होतें. जुनें तेवढें चांगलें असें प्रतिपादन करणारांनीं ज्योतिर्विद सोमेश्वर यांचें अनुकरण केलें असतां ज्योतिषशास्त्रांत भयंकर क्रांति होईल. यांनीं एक ज्योतिषशास्त्रावर गुजराथी-मध्यें ४००।५०० पानांचा ग्रंथ लिहिला असून तो बहुतेक सर्व छापून तयार झाला आहे. रा. सोमेश्वर यांचे इतर नातलग, मित्र व हितचिंतक हे हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याची शक्य तेवढी खटपट करतील अशी आशा आहे.

मुंबई येथील मोठमोठाल्या श्रीमंत भाट्या, वाणी वगैरे लोकांचा रा. सोमेश्वर जोशी यांस चांगला पाठिंबा होता व त्यांचे जोरावर मुंबई येथे **ज्योतिषी लोकांची कांग्रेस भरविण्याचा** त्यांचा व आमचा विचार चालू होता. परंतु ईश्वरी इच्छा बलवत्तर असें म्हणण्याचा प्रसंग आला असून आणखी १०।५ वर्षांत तरी निदान असले विचार मालेच्या वाचकांपुढें ठेवितां येतील असें वाटत नाहीं. मालेच्या अनेक हितचिंतकांपैकीं रा. सोमेश्वर यांचे मृत्यूनें मालेचें त्याचप्रमाणें ज्योतिषशास्त्राचे प्रगतीचे कामांत ईशसत्तेनें मोठा अडथळा आला आहे. असो ईश्वरी इच्छा! रा. सोमेश्वर गोपाळ जोशी यांचे पाठीमागें एक लहान मुलगी व विधवा स्त्री असून त्यांची त्यांनीं मरणापूर्वीं नीट व्यवस्था लाविली आहे. ईश्वर त्यांचे आत्म्यास शांति देवो.

ज्योतिर्विद सोमेश्वर जोशी यांची कुंडली अनेक दृष्टीनें महत्वाची असल्यामुळें ती मालेच्या वाचकांकरितां आम्ही प्रसिद्ध करीत आहों. एकतर ते उत्तम ज्योतिषी असून त्यांस अनेक श्रीमंत गृहस्थांचा चांगला आश्रय होता. (२) त्यांस अनेक विचित्र रोग झाले. (३) परिभ्रमण व दिनवर्षपद्धतीनें भविष्यकालासंबंधानें विचार किती सूक्ष्म करितां येतो, ह्याचे सत्यतेचा ती एक चांगला पुरावा आहे. ज्योतिर्विद सोमेश्वर जोशी ह्यांचा जन्म कपडवंज येथें तारीख १८ जानेवारी सन १८७५ रोजीं सकाळचे ८-३० वाजतां झाला, त्या वेळीं पुढीलप्रमाणें आकाशस्थ ज्योतींची स्थिति होती.



## सायन भावचलित जन्मकुंडली.




कुंभलग्न किंवा कुंभराशीवर जन्म पावणारीं माणसें जन्मतांच भविष्यवादी असतात त्याप्रमाणें येथें कुंभलग्न उदित असून चंद्रहर्शल, चंद्रशनि, शुक्रहर्शल, शुक्रशनि व बुधनेपच्यून यांचे आपसांमध्यें शुभयोग झाले असून शुक्र माध्यान्हीं आहे. हे सर्व योग ज्योतिषशास्त्रामध्यें उत्तम प्राविण्यता दर्शवितात. धनाधिपति भाग्यामध्यें स्वगृहींचा, लग्नेश व लाभेश शनि हा स्वगृहीं असून माध्यान्हीं शुक्र आहे व तो हर्शलबरोबर त्रिकोणदृष्टियोग करीत असल्यामुळें यांस अनेक श्रीमंतांचा आश्रय मिळाला. धनस्थानांतील नेपच्यून हाही ग्रह रवि व बुधाबरोबर शुभसंबंधित असल्यामुळें ह्यांस अनेक सांपत्तिक लाभ हर्शल व नेपच्यून ह्या दोन ग्रहांचे धर्माप्रमाणें गूढविद्येनें प्राप्त झाले. लग्नाधिपति शनि हा हर्शलबरोबर प्रतियोग व मंगळाबरोबर केन्द्रयोग करीत आहे. रवि हाही गुरूबरोबर केन्द्रयोग करीत आहे व हे सर्व अशुभयोग स्थिर राशीमध्यें झालेले असल्यामुळें तद्दोतक त्यांस विकार झाले. ह्यांची प्रकृति सदढ नव्हती, त्याचप्रमाणें ह्या अशुभयोगांचे धर्माप्रमाणें त्यांस अनेकांचें शत्रुत्व उत्पन्न होऊन कोर्टांतील अनेक खटके वगैरेंपासून त्रास झाला

असें म्हणतात. त्यांच्या वयाच्या ३८।३९ वर्षांपासून परिभ्रमणपद्धतीनें पाहतां ज्या वेळीं शनि हा वृषभ राशीमधून व मंगळवृश्चिकेमधून जात होता त्या वेळेस त्यांस पूर्वीपासून असलेला मूळव्याधीचा विकार ज्यास्त झाला व ४० व्या वर्षी जेव्हां दिनवर्षपद्धतीनें चलित रवि केन्द्रयोग चलितमंगळ व चलितचंद्राचें भ्रमण मूळ अष्टमस्थानांतून व वृश्चिक राशीमधून होत होतें त्या वेळीं हा विकार भयंकर होऊन त्याचें रूपांतर भगंदरावर (Fistula) झालें. अखेरीस सन १९१६ आगस्टमध्यें त्यावर शस्त्रप्रयोग करण्यांत आला त्या वेळीं तो विकार साधारण बरा झाला परंतु गुदद्वार व अंत्र ह्यांमध्यें व्रण असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें. अखेरीस ह्याच विकारांत फुफुसाचा दाहजन्य विकार व चित्तभ्रम होऊन अंत झाला. ४० व्या वर्षापासून खालीलप्रमाणें दिनवर्षपद्धतीप्रमाणें योग चालू होते. चलितमंगळ केन्द्रयोग चलितरवि; चलितरवि समक्रांतियोग नेपच्यून जन्मकाळचा; ४१ वे वर्षी चलितमंगळ समक्रांतियोग चलितरवि; चलितरवि सार्ध केन्द्रयोग बुध-चलित; ४३ वें वर्ष, चलितबुध केन्द्रयोग जन्मचंद्र; ४४ वें वर्ष चलितरवि केन्द्रयोग चंद्र जन्मकालचा; चालू ४२ वें वर्षीही ह्याच अशुभयोगांचें प्राबल्य असून चलितचंद्र धनुराशीमधून भ्रमण करीत होता व तो आक्टोबरचे सुमारास आपल्या मूळचे स्थानाबरोबर प्रतियोग करीत असून दैनिक शनीचें भ्रमण जन्मकाळचे रवीवरून, हर्शलचें भ्रमण शनि व मंगळाचे केन्द्रांतून व मंगळाचें भ्रमण वृश्चिकराशीमधन व कांहीं काळानंतर चलितरवीचे केन्द्रांत ह्याप्रमाणें होत असल्याचें पाहून वाळकेश्वर येथें ते आपल्या शेटजींच्या घरीं असतां त्यांस आपल्या जन्मगांवास जाऊं द्यावें कारण ह्या अनिष्ट ग्रहस्थितीमधून उठतील असें आम्हांस वाटत नाहीं असें आगस्टमध्येंच सुचविण्यांत आलें होतें. चलितचंद्राचें भ्रमण धनुराशीमधून, रविमंगळाचा केन्द्र व समक्रांतियोग द्विस्वभावराशीमधून ह्यामुळें त्यांस फुफुसाचा दाहजन्यविकार (Inflammation of the lungs) व चित्तभ्रमण (nervous trouble) ह्यासारखे कष्टसाध्य विकार झाले असले पाहिजेत असें त्यांस औषधोपचाराकरितां येत असलेल्या पदवीधर डॉक्टर यांस सांगतां त्यांस फारच आश्चर्य



वाटलें. कारण वस्तुस्थितीचीं पूर्वचिन्हें नुकतींच दृष्टोत्पत्तीस त्या वेळीं येत होतीं.

* * * * *

आमच्या इंदूर येथील एका हितचिंतकानें खालील तीन महत्वाचे प्रश्न मालेंत वादविवादाकरितां पाठविले आहेत.

(१) ज्योतिष यास शास्त्र (Science) म्हणतां येईल काय ?

(२) ज्योतिषशास्त्राचा उपयोग काय ?

(३) घडणाऱ्या गोष्टींबद्दल ज्योतिषशास्त्राच्या साह्यानें सूचना मिळाल्यावर घडणाऱ्या भावी गोष्टींत मनुष्यप्राणी फेरफार घडवून आणूं शकतो काय ?

वरील तीन प्रश्न फार महत्वाचे असून नित्य व्यवहारामध्यें हेच प्रश्न पुष्कळ वेळ विचारले जातात. सदरहू प्रश्नांवर ज्यांचा उत्तम निबंध दोन महिन्यांच्या आंत येईल त्यांस मालेच्या शक्तीप्रमाणें बक्षीस देण्याचा आमचा विचार आहे. बक्षिसें दोन ठेविलीं आहेत. उत्तम ठरलेला निबंध नंतर मालेंत प्रसिद्ध करण्यांत येईल.

* * * * *

चालू वर्षाच्या ७ व्या अंकांत एक बक्षिसाकरितां कुंडली देऊन तिचें चरित्रात्मक वर्णन मागितलें होतें. परंतु याकडे मालेच्या वाचकांपैकीं फारच थोड्यांचें लक्ष्य गेलेलें दिसतें. कारण एक महिन्याचे अवधींत फक्त तिघांकडूनच वर्णनें आलीं व त्यांपैकीं एकाचेंही आमचे मतें समाधानकारक नव्हतें, त्यांतले त्यांत इंदूर येथील **रा. रा. जी. डब्ल्यु. गद्रे** यांचें साधारण चांगलें होतें. सदरहू वर्णनें ज्या इसमानें बक्षिस लाविलें होतें त्याकडे बक्षिसाचें निकालाकरितां पाठविलीं असतां त्यांचें खालीलप्रमाणें उत्तर आलें आहे.

"सा. न. वि. आपल्केकडील आमचे प्रश्नांचीं तीन गृहस्थांकडील उत्तरें आम्हीं तीं पावलीं. त्यांपैकीं **सायनपद्धतीनें काढलेलें उत्तर कायतें ब॑च सुसंगत दिसतें**..........पंडित (तेथील ज्योतिर्विद) लोकांनीं हीच पत्रिका पसंत केली." सदरहू कुंडली विशेष महत्वाची असून त्यासंबंधीं आमचे विचार व सर्व वस्तुस्थितीचें वर्णन मालेच्या पुढील एखाद्या अंकांत प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे. कोणाचेंही वर्णन समाधानकारक नाहीं तरी रा. गद्रे यांचें बरेंच जुळतें असल्यामुळें त्यांस दुसऱ्या नंबरचें बक्षिस रुपये तीन देण्याचें ठरलें असून त्याप्रमाणें त्यांचेकडे रक्कम मनिआरडरनें पाठविण्यांत येईल.

* * * *

ज्योतिर्विदाभरण ज्योतिर्विद्प्रवर ज्योतिर्विद्याभूषण **भाऊ गोरक्ष पंडित** हे बडवानी सी. आई. येथें श्रीमान बडवानी नरेश श्रीमंत महाराणा श्री १०८ श्री रणजीतसिंहजी यांचे आश्रयानें पूर्वी प्रसिद्ध करीत असलेलें **पत्रिका** नांवाचे मासिक पुन्हा हिंदी भाषेमध्यें प्रसिद्ध करीत आहेत. सदरहु मासिकाचे अद्यापपावेतों तीन अंक प्रसिद्ध झाले असून मासिकाचा आकार करमणूक पत्रायेवढा आहे. वर्गणीदारांस प्रत्येक महिन्याचें मासफळ बक्षिस देण्यांत येत आहे. या मासिकांत ज्योतिषशास्त्रसंबंधी निबंध, प्राचीन अर्वाचीन विद्वानांचे नवीन नवीन शोध "मदमकरंद" नांवाचे ग्रंथाचें मुळासहित भाषांतर, धार्मिक, मनोरंजक लेख, ज्योतिष समाचार, प्रत्येक महिन्याचें भविष्य वगैरे अनेक उपयुक्त विषय येत आहेत, वार्षिक वर्गणी १॥ रुपया. ज्योतिषशास्त्राभिलाषी लोक ह्या मासिकास आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे. ज्योतिषशास्त्रावरील हें मासिक श्रीकृपेनें चिरायु होवून शास्त्रसेवा त्याचे हातून उत्तम घडो अशी त्या नारायणीजवळ नम्र प्रार्थना आहे.

संपादक.



# भावविचार.

(ज्यो. माला वर्ष १ लें अंक १२ वरून पुढें चालू)

आर्यज्योतिषवाङ्मयांत षष्ठस्थानावरून **शत्रु, चोर, क्षत, विघ्न, क्लेश, उदरादि** रोग, **उपदंशादि विकार,** मातुलपक्षाचें सुख इत्यादि संबंधानें विचार करण्यास सांगितलें आहे. सर्वसाधारणपणें जन्मकुंडलीचे षष्ठस्थानावरून जन्मलेल्या प्राण्यास कोणत्या कोणत्या प्रकारचे रोग होतील किंवा प्रश्नकुंडलीवरून प्रश्न विचारणारास कोणकोणते रोग झाले आहेत यासंबंधानें विचार करण्याची सर्वत्र ज्योतिर्विदांची पद्धति आहे. जन्मकुंडलीचे षष्ठमभावारंभीं उदित असलेल्या राशीचे धर्माप्रमाणें किंवा षष्ठमस्थानांत ज्याप्रमाणें ग्रहस्थिति असेल त्याप्रमाणें जन्मणाऱ्या प्राण्यास रोग व्हावेत असें वाटत नाहीं. स्थूलदृष्ट्या हें म्हणणें बरोबर आहे. जन्मकुंडलींत जन्मलग्न, जन्मचंद्र व रवि ज्या ज्या राशीमध्यें पीडित असतात तद्द्योतक रोग झालेले पाहण्यास मिळतात. व हे विकार बरे न होणारे असतात. षष्ठस्थानांत रवि किंवा चंद्र पीडित असतां शरीरप्रकृती फारच निकृष्ट असलेली पाहण्यास मिळेत.

ज्योतिषशास्त्राधारें रोगनिदान करण्यासंबंधानें विचार करितां आर्यग्रंथांत ह्यासंबंधानें शास्त्रीय दृष्ट्या खुलासा केलेला आढळत नाहीं. नुसत्या षष्ठस्थानाचे स्वामीवरून किंवा षष्ठस्थानांत असलेल्या ग्रहावरून होणाऱ्या रोगांचें ज्ञान होतें असें अनुभवास येत नाहीं. यासंबंधीं आमचे विचार पुढील एखाद्या वेळेस मालेंत प्रसिद्ध करूं. षष्ठस्थान हें दशमस्थानाचे व धनस्थानाचे त्रिकोणांतील स्थान येत असल्यामुळें हाताखालचे चाकर नोकर लोक, धंदा, व नोकरी वगैरे गोष्टींबरोबर पुष्कळ संबंध आलेला पाहण्यास मिळतो. षष्ठस्थानाचा व शरीरप्रकृतीचा निकट संबंध असल्यामुळें ह्या स्थानांत बलवान ग्रहस्थिति असलेले लोक उत्तम डाक्तर, उत्तम वैद्य, नर्सीस असलेले पाहण्यास मिळतात. ह्या स्थानांत ग्रह असतां त्या ग्रहाचे धर्माप्रमाणें धंदा किंवा रोज-

गार असलेला पुष्कळ वेळां पाहण्यास मिळाला असल्यामुळें मालेचे वाचक या गोष्टीचा पूर्ण विचार करतील.

षष्ठस्थानांत **रवि** मंगळ किंवा गुरूनें शुभसंबंधित असतां डाक्तरकीचा धंदा केला असतां उत्तम, किंवा ह्या माणसांना नोकरींत चांगला लाभ होतो. स्वतंत्र धंद्यापेक्षां ह्या लोकांस नोकरींत चांगला मान, बढती मिळालेली पाहण्यास मिळते. षष्ठस्थानांत रवि, हर्शल किंवा शनीनें पीडित असतां शरीरप्रकृति रोगी, दुर्बल असून शरीरांतील रोगमुक्त होण्याची शक्ति फारच कमी असलेली आढळते.

जन्मकाळीं षष्ठस्थानांत **चंद्र** शरीरप्रकृतीस विघातक असलेला आढळतो. षष्ठस्थानांतील चंद्र लहानपणीं विशेष आजार व कष्ट दर्शवितो व तो जर पीडित असेल तर बालवयांतच मृत्यु दर्शवितो. षष्ठस्थानांत चंद्र, रवि किंवा हर्शलनें पीडित असतां पचनेंद्रियें बिघडलेलीं आढळतात. ही मंडळी बहुशः अग्निमांद्यानें ग्रस्त असलेली आढळतात. षष्ठांत चंद्र शनीनें पापदृष्ट किंवा पीडित असतां दीर्घकाल टिकणारे योग होतात. मंगळानें पीडित असतां दाहजन्यविकार झालेले आढळतात. एकंदरीनें विचार करितां षष्ठस्थानांतील चंद्र शरीरप्रकृतीस बराच विघातकारक आढळतो. व तो शुभग्रहानें शुभसंबंधित असेल तर शरीरप्रकृति विशेष निर्बल व रोगग्रस्त आढळणार नाहीं.

षष्ठांत चंद्र असलेल्या माणसांस दुसऱ्याची नोकरी केल्यानें विशेष फायदा होतो. षष्ठांत चंद्र असतां विशेष दगदग नसलेलीं कामें, जलाबरोबर संबंध असलेलीं कामें केलीं असतां त्यांत लाभ होतो. षष्ठांत चंद्र असलेल्या मंडळींमध्यें धंद्यानिमित्य जनसमाजाच्या समोर येण्याबद्दलची विशेष आवड असलेली पाहण्यास मिळते.

षष्ठस्थानांत **मंगळ** असतां निष्काळजीनें दुर्लक्षपणामुळें आळसानें किंवा अविचारानें शरीरप्रकृती बिघडलेली पाहण्यास मिळते. षष्ठस्थानांतील मंगळ, रवि व गुरूबरोबर अशुभसंबंधित असतां दाहजन्य विकार झालेले आढळतात. षष्ठस्थानांत मंगळ हर्शलनें पीडित असतां असल्या माणसास



# ग्रहांचे बल कसें पहातात ?

लेखक—राम नारायण.

(मागील अंकावरून समाप्त.)

ग्रह एकमेकांशीं युक्त असतां जें एक प्रकारचें बल आढळतें त्या प्रमाणेंच ते एकमेकांशीं समक्रांतियोग करीत असतां बल असतें. समक्रांतियोगांचीं फलें युतियोगांप्रमाणेंच असल्यामुळें त्यांचा उल्लेख मागे केला आहे.

योगविभागांतील युतियोगांचा विचार मागें केला आहे त्यानंतर ग्रहांच्या विवक्षित स्थितीमुळें होणाऱ्या योगांचा विचार करूं. ग्रहांच्या विवक्षित स्थितीमुळें होणाऱ्या योगांत (१) ग्रहांचे अन्योन्य योग (२) व पूर्वाचार्यांनीं सांगितलेले राजयोग, नाभसयोग, मालायोग वगैरे योग येतात. महत्वानें अन्योन्य योग हे युतियोगांच्या खालोखाल आहेत. या अन्योन्य योगांनीं कुंडल्यांतील ग्रहांस कांहीं प्रसंगीं फारच महत्व येतें. महत्वाच्या मानानें मेषेंत किंवा सिंहेंत रवि व धनेंत गुरु यांचा त्रिकोणयोग हा पहिल्या प्रतीचा योग होईल तर धनु व सिंह राशींतून होणारा रवि—गुरूंचा अन्योन्य योग हा दुसऱ्या प्रतीचा होईल. अन्योन्य योगांचें महत्व ग्रहांचें स्थानाधिपत्य व राशींचा परस्पर संबंध यांवर अवलंबून असतें. केंद्र—कोणाधिपतींचे अन्योन्य योग कुंडलीच्या महत्वाच्या स्थानांतुन होत असल्यास फारच महत्वाचे असतात. षष्ठ, अष्टम व व्यय यांच्या स्वामींचे किंवा यांच्या स्वामीबरोबर होणारे अन्योन्य योग विशेष महत्वाचे असतात असें नाहीं. राशींचा परस्पर संबंध लक्ष्यांत घेतला म्हणजे असें कळून येईल कीं ज्या ग्रहांस दोन स्वगृहें आहेत त्या ग्रहांचा अन्योन्य योग त्या दोन्ही राशींतून सारखाच महत्वाचा नसतो. रवि व गुरु यांचा सिंह व धनु या राशींतून होणार अन्योन्य योग सिंह व मीन राशींतून होणाऱ्या अन्योन्य योगांपेक्षां पुष्कळ

पटीनें महत्वाचा आहे. कांहीं ज्योतिषी सर्वच अन्योन्य योग सारखेच महत्वाचे समजतात. परंतु अनुभवावरून हें समजणें निखालस चुकीचें आहे असें वाटतें. सिंह व कुंभ राशींतून होणाऱ्या शनि–रवींच्या अन्योन्य योगानें त्या दोन ग्रहांचें बळ वाढेल असें वाटत नाहीं. आणि म्हणून अन्योन्य योगांचा विचार करतांना राशींचा परस्पर संबंध काय आहे हें जरूर लक्ष्यांत घेतलें पाहिजे.

राशिपरत्वें विचार करतां पुढील अन्योन्य योग विशेष महत्वाचे आहेतः—

१ रवि ( धनु ) व गुरु ( सिंह ).
२ चंद्र ( मीन ) व गुरु ( कर्क ).
३ रवि ( मेष ) व मंगळ ( सिंह ).
४ चंद्र ( कन्या ) व बुध ( कर्क ).
५ चंद्र ( वृषभ ) व शुक्र ( कर्क ).
६ बुध ( कुंभ ) व शनि ( मिथुन ).
७ बुध ( मकर ) व शनि ( कन्या ).
८ बुध ( मेष ) व मंगळ ( मिथुन ).
९ बुध ( वृश्चिक ) व मंगळ ( कन्या ).
१० शुक्र ( मीन ) व गुरु ( वृषभ ).
११ शुक्र ( धनु ) व गुरु ( तूळ ).
१२ शुक्र ( कुंभ ) व शनि ( तूळ ).
१३ शुक्र ( मकर ) व शनि ( वृषभ ).
१४ मंगळ ( धनु ) व गुरु ( मेष ).
१५ मंगळ ( मीन ) व गुरु ( वृश्चिक ).
१६ मंगळ ( कुंभ ) व शनि ( मेष ).



१७ मंगळ ( मकर ) व शनि ( वृश्चिक ).
१८ गुरु ( कुंभ ) व शनि ( धनु ).

ग्रहांचा अन्योन्य योग होत असतां त्यांस राशिबल असून त्या दोघांमध्यें अशुभ योग होत नाहीं असे १८ योग वर नमूद केले आहेत, यांखेरीज बाकी राहिलेले योग कमी अधिक प्रमाणानें महत्वाचे असतात असें समजावें.

ग्रहांच्या विवक्षित स्थितीमुळें होणाऱ्या योगांत अन्योन्य योगांचा विचार वर केला आहे व त्यानंतर पूर्वाचार्यांनीं सांगितलेले राजयोग, नाभसयोग वगैरेंचा विचार करणें जरूरीचें आहे हें खरें परंतु हे योग इतके पुष्कळ आहेत कीं त्यांचा नुसता नामनिर्देश करावयाचा म्हटला तरी सुद्धां पुष्कळ विस्तार होईल. आणि हा विस्तार सुद्धां झालेला आम्हीं पत्करला असता परंतु नाभसादि योगांच्या सत्यासत्यतेविषयीं निर्णय करणें प्रस्तुत काळीं आम्हांस शक्य नसल्यामुळें त्यांचा विचार करण्याचें आम्हीं सोडून देतों. पुढें एखादे वेळीं त्यांचा स्वतंत्र रीतीनें विचार करूं.

## उपसंहार.

स्थान, राशि, दृष्टि व योग या चार प्रकारच्या बळांचा विचार जरूरीपुरत्या विस्तारानें करून त्यांमध्यें पूर्वाचार्य आणि अर्वाचीन आर्य व आंग्ल ज्योतिषी यांच्या मतांचें दिग्दर्शन, त्यांचे मतभेद आणि युक्तीस व अनुभवास येणाऱ्या गोष्टी यांचा समावेश केला आहे. पूर्वोक्त चार प्रकारच्या बलावरून कुंडलींतील ग्रहांचें बळ पाहिलें असतां पुरेसें होईल. या चार प्रकारांत न येणारीं अशीं ग्रहांचीं अन्य बळें जुन्या आर्य ग्रंथकारांनीं दिलीं आहेत, तीं येणेंप्रमाणें:—

( १ ) काळ बल. ( २ ) नैसर्गिक बल. ( ३ ) अयन बल. ( ४ ) व चेष्टा बल. अलीकडे या बळांचा विचार ज्योतिषी करतात असें आढळून येत

नाहीं. परंतु पूर्वाचार्यांनीं आपल्या ग्रंथांत हीं बलें दिलीं असल्यामुळें त्यांचा उल्लेख मात्र येथें करतों.

( १ ) 'चंद्र, मंगळ व शनि हे रात्रि बली, रवि, गुरु व शुक्र हे दिवसा बली व बुध सर्वकाळ बली असतो.' हें ग्रहांचें 'कालबल' होय.

( २ ) 'शनि, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, चंद्र व रवि हे उत्तरोत्तर अधिक बली असतात.' हें ग्रहांचें 'नैसर्गिक बल' होय.

( ३ ) 'उत्तरायणांत शुक्र, मंगळ, रवि व गुरु, दक्षिणायनांत चंद्र व शनि आणि बुध दोन्ही अयनांत बलवान असतो.' हें ग्रहांचें अयन बल जाणावें.

( ४ ) 'चंद्र, रवि उत्तरायणांत, बुध, शुक्र, मंगळ, गुरु व शनि हे वक्र असतां किंवा चंद्र युक्त असतां आणि ग्रह-युद्धांत ग्रह उत्तर दिशेस असतां चेष्टाबली असतात.'

वर दिलेल्या चार बलांत नैसर्गिक बल हें ग्रहांचें बल ठरविण्यास मुळींच उपयोगीं पडत नाहीं. बाकी राहिलेल्या तीन प्रकारांपैकीं कोणत्याही कुंडलींत व कोणत्याही वेळीं बुध ग्रहास काल बल व अयन बल असतेंच. त्याचप्रमाणें उत्तरायणांतील चंद्रास चेष्टाबल व दक्षिणायनांतील चंद्रास अयन बल म्हणजे तीन बलांपैकीं चंद्रास एक बल हें नेहमींच असतें. बुध-चंद्रांच्या या सर्वकालीन बलांचा अनुभव पहावयास सांपडत नाहीं. ग्रहांचें बल एकदां राशीवरून ठरविलें मग पुन्हां ते उत्तरायणांत किंवा दक्षिणायनांत बलवान असतात किंवा ग्रहांचीं स्थानबलें लक्ष्यांत घेतलीं असतां पुन्हां ते दिवसास बली असतात किंवा रात्रीस बली असतात हें सांगणें निरर्थक आहे. अशा प्रकारचीं बलें पहाण्याची जरूरी खरोखरच आहे असें आम्हांस वाटत नाहीं. या बलांचीं फलें पूर्वग्रंथकारांनीं वर्णन केलेलीं आहेत परंतु त्यांचा अनुभव मात्र मुळींच येत नाहीं. आणि म्हणूनच त्यांचा विचार करण्याचा प्रवात



अलिकडे मुळींच दिसून येत नाहीं. ज्याप्रमाणें यूरोपीय ज्योतिषांत ट्रिप्लिसिटी, टर्म वगैरेंचा अनुभव येत नाहीं म्हणून त्यांचा विचार आधुनिक यूरोपीय ज्योतिर्विद् करीत नाहींत त्याप्रमाणेंच आधुनिक आर्य ज्योतिषी, कालबल, चेष्टाबल व अयनबल यांचा विचार करीत नाहींत. कांहीं ज्योतिषी ग्रह वक्री असल्यास बलवान असतो असें समजतात आणि यासंबंधानें सारा वलींत सांगितलें आहे कीं:—

> वक्रिणस्तु महावीर्याः शुभा राज्यप्रदाः ग्रहाः ॥
>
> पापा व्यसनदाः पुंसां कुर्वंतिच वृथाटनम् ॥

शुभ ग्रह ( बुध, शुक्र व गुरु ) वक्री असल्यास राज्यप्रद व पापग्रह वक्री असल्यास दुःखकारक असतात. कांहीं आंग्ल ज्योतिषांच्या मतें शुभ ग्रह वक्री असल्यास त्यांचीं शुभ फलें कमी होतात. वक्री पापग्रहांचीं फलें अधिक तीव्र असतात असें वाटतें. मिसेस बेझंट यांच्या कुंडलींत सर्व पापग्रह वक्री आहेत आणि त्यांच्या आयुष्यांत 'पापा व्यसनदाः' याचा अनुभव चांगलाच पहावयास सांपडतो. शुभग्रह केवळ वक्री असल्यामुळें बलवत्तर होतील असें आम्हांस वाटत नाहीं.

प्रस्तुत निबंधांत ग्रहांचें बल कसें पहातात. यासंबंधानें सविस्तर विवेचन केलें आहे. या विवेचनामध्यें एका गोष्टीचा समावेश आम्हांस करावयाचा होता. व ही गोष्ट म्हणजे कोणताही ग्रह किती बलवान आहे त्याची निश्चित कल्पना आंकड्यांनीं सांगतां येईल किंवा नाहीं, ही होय. ग्रहबलास गणिती निश्चितपणा कसा आणावा याचा विचार आपल्याकडे केशवी किंवा श्रीपति यांच्या पद्धतीमध्यें केला आहे. आंग्ल ज्योतिषामध्यें कांहीं दिवसांपूर्वी 'मॉडर्न ॲस्ट्रॉलॉजी' नामक मासिकांत ग्रहांच्या स्थान व राशिबलांचा निश्चितपणा आंकड्यांनीं ठरविण्याची एक पद्धति आली होती व या पद्धतीचा अनुवाद चालू वर्षाच्या ज्योतिर्मालेच्या अंकांत केला आहे. केशवी किंवा

श्रीपतीची पद्धति व वर नमूद केलेली आंग्ल पद्धति यांवरून ग्रहांच्या बलाची निश्चित कल्पना किती होते, फलादेश सांगण्यांत त्यांचा उपयोग किती होतो, त्यांचा अनुभव काय येतो वगैरेचा विचार प्रस्तुत निबंधांतच करण्याचें आम्ही ठरविलें होतें. परंतु आतांपर्यंतच आमच्या कल्पनेच्या बाहेर निबंधाचा विस्तार झाल्यामुळें ग्रहबलास गणिती निश्चितता आणणाऱ्या या पद्धतींचा समग्र विचार पुढें केव्हांतरी करूं असें आमच्या जिज्ञासु वाचकांस आश्वासन देऊन हा लेख पुरा करतों.

**सूचना:**—'ग्रहांचें बल कसें पहातात' या लेखांत पुढें लिहिल्याप्रमाणें अशुद्धें राहिलीं आहेत तीं दुरुस्त करून घ्यावी. पान ९१ ओळ १२ 'सामाजिक' बद्दल 'सामासिक' पान ९३ ओळ १२ 'चतुर्थ' शब्दापुढें 'षष्ठ' हा शब्द व ओळ १८ मध्यें 'सप्तम' हा शब्द 'तृतीय' शब्दाच्या पुढें आहे तो 'पंचम' शब्दाच्या पुढें वाचावा. पान १०८ ओळ २२ मध्यें 'मिथुन' शब्दापुढें 'कुंभ' हा शब्द वाचावा. रा. ना.

* * * * *

मागील अंकांत ग्रहांचे कक्षापातासंबंधानें लिहितांना त्यांचे गतीचा उल्लेख करण्याचें नजरचुकीनें राहिलें आहे व त्यामुळें वाचकवर्गाचा घोंटाळा होण्याचा संभव आहे. क्रांतिवृत्तामध्यें चंद्राचे कक्षापात राहु व केतु हे उलटी प्रदक्षिणा करितात परंतु बुधादि ग्रहांचे कक्षापात चंद्राचे कक्षापाताप्रमाणें उलट वक्रगतीनें न फिरतां सदोदित मार्गीच असतात म्हणजे त्यांचें राशिचक्रांतून भ्रमण राशींच्या अनुक्रमानें होतें.



# अथ संवत्सर नाम निर्णय.

रा. रा. ज्योतिर्माला मासिककर्ते यांस:—

वि. वि. खालील मजकूर प्रसिद्ध होईल अशी आशा बाळगून आपणांकडे पाठवीत आहें.

चालूं संवत्सराला म्हणजे शके १८३८ याला कांहीं पंचांगकारांनीं आपल्या पंचांगांत "अनल नाम" संवत्सर असें नांव दिलेलें आहे. व कांहीं पंचांगकारांनीं आपले पंचांगांत "नल नाम" संवत्सर असें नांव दिलेलें आहे.

प्रचलित हिंदु धर्मशास्त्रपद्धतीप्रमाणें प्रत्येक कृत्यांत संकल्प करावा लागतो. व त्या संकल्पामध्यें संवत्सराचा स्वच्छ नामनिर्देश करावा लागतो. तरी त्या संवत्सराचें नांव धर्मशास्त्रकार व पंचांगकार ह्यांचे मतें एकच नांव असावें लागतें. आणि चालूं वर्षाला पुष्कळ पंचांगांत भिन्न भिन्न नांवें आलेलीं आहेत. संवत्सराचें नांव नल असलें पाहिजे असें माझें मत आहे. व हल्लीं जे मराठीमध्यें ज्योतिषशास्त्रावर ग्रंथ आहेत त्यांतही **नल** असेंच संवत्सराचें नांव दिलें असून 'अनल' असें कोठेंच लिहिलेलें आढळत नाहीं.

शंभर वर्षांचें पंचांग काढून पहातां त्यांत शके १७१८ आणि शके १७७८ या शकांस नल नाम संवत्सरे असें नांवें दिलेलें आहे.

यस्मिन्नलाब्देविलयं प्रयांति मृगाश्वपक्षिव्रजकालिकाश्च
अन्येच सर्वे नरगोकुलाद्याः प्रयांति वृद्धिं खलु मध्यदेशे ॥ १ ॥

वसिष्ठसंहितायाम्.

धनवृद्धिः प्रजाकार्यं सुष्ट लक्षण तत्परः
गुणी भोगी च यत्प्राप्त नलाब्दे यस्य जन्मकृत् ॥ २ ॥

यावनजातकग्रंथे.

नवाब्दे मध्यसस्यार्घ वृष्टिभिः प्रवराधरा ॥ ३ ॥

कश्यप संहितायाम्.

नक्रे वा राक्षसे चैव कुंभे मीन गते गुरौ ॥ ४ ॥

भविष्योत्तरपुराणग्रंथे.

नवाब्दे मध्य सस्यार्घेति ॥ ५ ॥

मेघविजयगणीविरचिते वर्षप्रबोधे ग्रंथे.

तेव्हां ज्योतिर्विद, पंचांगकमिटी, पंचांगकार व धर्मशास्त्रकार ह्या सदरहू नामनिर्णयासंबंधी खुलासा करतील अशी आशा आहे.

आपला,

हरि केशव तांबे, ज्योतिषी.

* * * * *

श्रीयुत तांबे ज्योतिषी यांची सूचना विचार करण्यासारखी असून ज्योतिर्विद् माईणकर, श्रीयुत टिटवाळेकर, श्रीयुत पुरंदरे, श्रीयुत मोघेशास्त्री वगैरे पंचांगकार ह्याबद्दल विचार करतील अशी आशा आहे. गोष्ट प्रथमदर्शनीं क्षुल्लक आहे असें भासण्याचा संभव आहे परंतु अशाच क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींची पुढें रूढीरूपी दृढ रज्जू होऊन तिचीं बंधनें तोडण्यास फार त्रास व कष्ट सोसावे लागतात.

संपादक.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्दाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. | जान्युआरी १९१७. | अंक १० वा.

## सन १९१७ सालांतील ग्रहस्थिति.

भारतीय आर्य लोकांमध्यें ज्याप्रमाणें प्रभवविभवादि संवत्सराचें कालगणनेचें चक्र मानलें असून त्यावरून चालू असलेल्या वर्षास जें नांव येतें त्यावरून त्या संवत्सरांत प्राप्त होणाऱ्या इष्ट अनिष्ट फलादेशाचा विचार करण्याची ज्याप्रमाणें पद्धति आहे त्याचप्रमाणें क्यालडी लोकांमध्येंही कालगणनेचें एक चक्र मानलेलें आहे. भारतवासीय आर्यलोकांचें संवत्सराचें चक्र ६० वर्षांचें आहे परंतु क्यालडी लोकांचें संवत्सराचें चक्र ३६ वर्षांचें मानिलें असून प्रत्येक ३६ वर्षांचा काल हा एक एक ग्रहास वांटून दिलेला आहे. नंतर कांहीं ठराविक क्रमानें प्रत्येक वर्षाचा अधिपति कोण आहे हें ठरविण्याबद्दल कांहीं नियम आहेत. ह्यासंबंधानें स्वतंत्र विचार आम्हीं पुढें मालेच्या एखाद्या अंकांत करणार आहों.

प्रस्तुतकालीं आपण सन १९०९ पासून मंगळाचे महत् कालचक्राखालीं असून हें चक्र सन १९४४ पर्यंत राहणार आहे. मंगळ हा ग्रह लढाई,

खून, मारामाऱ्या, दंगेधोपे, दरवडे, अशांतता, रक्तपात व अपघात यांचा कारक ज्योतिषशास्त्रांत मानलेला असल्याकारणानें क्याल्डी कालचक्राप्रमाणें सन १९०९ पासून तें १९४४ पर्यंत जगांत शांतता राहणार नाहीं, अनेक लढाया व रक्तपात होतील असें कोणीही सहज अनुमान करील. सन १९१४ सालीं आपण मंगळामध्यें शनीचे अमलाखालीं आलों त्या वेळेपासून जगामधील वातावरण किती अनिष्ट झालें आहे यासंबंधानें लिहिलें पाहिजे असें नाहीं. मंगळ व शनि हे दोन विरुद्ध धर्माचे ग्रह असून ते परस्पराचे शत्रु आहेत. सन १९१५ साल मंगळामध्यें गुरूचें होतें. सन १९१६ साल मंगळामध्यें मंगळाचें गेलें व आतां ( सन १९१७ ) आपण मंगळामध्यें सूर्याचे अंमलाखालीं येणार आहों. व सन १९१८ सालीं मंगळामध्यें शुक्राचे अंमलाखालीं येणार आहोंत. यावरून पाहतां चालू असलेलें महायुद्ध आतां १९१८ पुढें चालेल असें वाटत नाहीं. चालू साल रवीचे अमलाखालील असून रवि हा मंगळाचा मित्र असल्यामुळें चालू साल बरें जाईल असें अनुमान करण्यास बरीच आशा आहे. राजपक्ष बराच बळकट राहील. रवि व मंगळ हे दोन्हीही अग्निग्रह असल्यामुळें चालू सालांत उष्णता, अग्नि, ज्वालामुखी व भूकंप यांपासून फारच त्रास होईल. पाऊस साधारणच पडेल. देशांत मुलांची मृत्युसंख्या वाढेल, अधिकारीवर्ग व राजे लोक ह्यांमध्यें मृत्यु होतील. ताप, दाहजन्यविकार, सांथीचे रोग—गोंवर, देवी, प्लेग—विद्युत्पात यांपासून चालू सालांत बराच त्रास होईल असें वाटतें.

असो, आतां आपण चालू १९१७ सालांत ग्रहांचीं भ्रमणें कोणकोणत्या राशीमधून होत आहेत यासंबंधानें विचार करूं. **नेपच्यून** अथवा **वरूण** हा ग्रह १ ली जानेवारी १९१७ रोजीं सिंहराशीच्या ४ अंश ७ व्या कलेमध्यें वक्री आहे व ही त्याची वक्रस्थिति तारीख १३ एप्रिल पर्यंत राहणार आहे व नंतर मार्गी होऊन सिंह राशीच्या ७ अंशापर्यंत जाणार असून नंतर तो तारीख १० नवंबर १९१७ पासून पुढें वक्रीच राहील. चालू सालीं सिंह या बादशाही राशीमधून होत असलेलें नेपच्यूनचें भ्रमण फारच मह-



त्वाचें आहे. कारण चालू सालीं अनेक वर्षांनीं घडणारी अशी नेपच्यून व शनीची युति नंतर नेपच्यून मंगळाची युति, व शनि मंगळाची युति ह्याप्रमाणें तीन महत्वाचे योग सिंह या राशीमध्यें घडणार आहेत. नेपच्यूनचें भ्रमण ज्या ज्या राशीमधून होतें त्या त्या राशीच्या अमलाखालचे देश संकटपरंपरेच्या भोंवऱ्यांत सांपडतात असें म्हणतात. त्यावरून विचार करितां बोहेमिया, फ्रान्स, रोम, इताली, रुमानियाचा उत्तर भाग व सिसली या देशांत बऱ्याच घडामोडी होतील असें वाटतें. आर्यज्योतिषांत सांगितलेल्या अवकहडा चक्राप्रमाणें म व ट कारानें आरंभ होणाऱ्या देशांस त्रास पोंहचेल.

चालू सालीं नेपच्यूनचें भ्रमण सिंह राशीच्या ४ थ्या अंशापासून सातव्या अंशापर्यंत होणार असल्यामुळें ज्यांचे वर्षप्रवेश तारीख २७ जुलै सन १९१७ ते ३१ जुलै पर्यंत किंवा तारीख २४ जानेवारी १९१७ ते २८ जानेवारी सन १९१७ पर्यंत असतील त्यांस ह्या वर्षी मानसिक त्रास, अस्वस्थता, अस्थैर्य व वियोग यांचा कटु अनुभव बऱ्याच प्रमाणांत पाहण्याचा प्रसंग येईल असें वाटतें.

**हर्शल** किंवा **प्रजापतीचें** भ्रमण चालू वर्षी कुंभ राशीमधून होणार असून तो १ ली जानेवारी सन १९१७ रोजीं कुंभ राशीच्या १७ अंश ३९ कलेमध्यें आहे. हा ग्रह मे २९ रोजीं कुंभेच्या २३ अंश ४३ कलेमध्यें वक्री होईल व तो ह्या स्थितीमध्यें ता. ३० आक्टोबर पर्यंत राहणार आहे. हर्शलचें भ्रमण हल्लीं शास्त्रीय राशीमधून होत असल्यामुळें तो अनेक शास्त्रीय शोधांस अनुकूल आहे. साधारणपणें विचार करितां हर्शलचें भ्रमण ज्या ज्या राशीमधून होत असतें तद्योतक देशामध्यें प्रजापक्ष विशेष बलवान होतो. राज्यव्यवस्थेसंबंधानें चळवळी होतात. व ज्या ज्या वेळीं हर्शल मंगळानें किंवा इतर शन्यादि खल ग्रहानें पीडित होतो त्या वेळीं ज्या राशीमधून हर्शलचें भ्रमण होत असतें तद्योतक विभागामध्यें तंटे, मारामाऱ्या, संप व असंतोष उत्पन्न होऊन हा काळ घडामोडींचा जातो. परंतु हर्शल शुभसंबंधित असतां अनेक सुधारणा घडतात. राशिचक्रांतील कुंभ राशीचा

अंमल अबिसिनीया, आरबस्थान, पीडमांड, पोलंड, प्रशिया, रशिया, स्वीडन, तार्तरी यांवर असल्याचें यूरोपीय ग्रंथांत वर्णन आहे. आर्य पद्धतीनें अवकहडाचक्राप्रमाणें विचार करितां गकारानें व सकारानें आरंभ होणाऱ्या देशांमध्यें हर्शलचे अनिष्ट परिणाम पाहण्यास मिळतील.

चालू सालांत हर्शल व मंगळाची युति तारीख ३ फेब्रुवारी रोजीं कुंभ राशीच्या १९ अंश २२ व्या कलेंत होणार आहे. मंगळ हर्शलाच्या युतीमुळें देशांत अनेक अकल्पित रीतीनें त्रासदायक व भानगडीचे प्रश्न उपस्थित होतात, असंतोष वाढतो, कायदेकौंसिलांतील सभासद व अधिकाररूढपक्ष यांना हा काळ अनिष्ट असतो. खून, मारामाऱ्या व दरवडे याचा सुकाळ होतो; धरणीकंपाचे धक्के बसतात. ही युति रशियास विशेष त्रासदायक भासेल असें वाटतें. हिंदुस्थानचे धन स्थानांत ही युति होणार असल्यामुळें सांपत्तिक स्थिति बरीच कनिष्ट राहील. हर्शल हा ग्रह तारीख १ जून १९१७ रोजीं गुरूबरोबर केन्द्रयोग करणार असून तारीख ६ जून रोजीं मंगळाबरोबर केन्द्रयोग करील व गुरुमंगळाची युति तारीख ७ जून रोजीं होणार आहे. हा काळ सांपत्तिक स्थितीसंबंधानें सुखावह वाटत नाहीं.

**हर्शल** हा ग्रह ज्यांचे लग्नांतून, तृतीय स्थानांतून, नवमांतून, दशमांतून किंवा लाभांतून चालू वर्षी भ्रमण करील व जन्मकाळचे रवि, चंद्राबरोबर तृतीय, एकादश किंवा नवम पंचम योग करील त्यांची मानसिक, आध्यात्मिक व ऐहिक स्थितीमध्यें समाधान व सुधारणा खात्रीनें झालेली दृष्टोत्पत्तीस येईल. हर्शलचें भ्रमण जन्मकालीन रवीवरून म्हणजे ज्यांचे जन्म कोणत्याही वर्षाचे फेब्रुवारी महिन्याचे ६ तारखेपासून १३ तारखेपर्यंत असतील त्यांस इतर ग्रहांचे इष्टानिष्टाप्रमाणें कमी अधिकप्रमाणें आकस्मिक रीतीनें सांपत्तिक अडचणी, हानि, वियोग, स्थलांतरें व संसारिक अडचणी येतील. जन्मकालीन चंद्रावरून भ्रमण करणार असल्यास स्थलांतरें, प्रवास घडतील व त्यांत त्रास उत्पन्न होईल. हर्शलचें भ्रमण बुधाचे नवमांतून, पंचमांतून, लाभांतून किंवा एकादश स्थानांतून झाल्यास मानसिक उन्नति, लाभ, ग्रंथलेख, ग्रंथ-



प्रकाशन वगैरे गोष्टी घडतील.

तारीख ३ फेब्रुवारी रोजीं होणारी हर्शलमंगळाची युति ज्यांचे लग्नाचे उदित अंशावर, दशमाचे उदित अंशावर, जन्मकाळचे रवि किंवा चंद्रावर होईल त्यांचेवर नानातऱ्हेचीं संकटें येतील किंवा आजार प्राप्त होईल. ही युति रवि किंवा चंद्र यांवर झाली असतां ते जन्मकाळीं ज्या स्थानांत असतील त्या स्थानानुरोधानें फलें अनुभवास येतील. धनस्थानांत चंद्र किंवा रवि असून त्यावर ही युति झाली असतां अनेक सांपत्तिक अडचणी येतील, चोऱ्या होतील. तृतीयांत बंधुनाश, प्रवासांत संकटें; चतुर्थांत असतां मातृकष्ट, अपघात, इष्टेटीसंबंधानें, जमिनजुमल्यासंबंधानें भानगडी घडतील; पंचमांत असतां संततीस त्रास, आजार, त्यांचे मृत्यु; सप्तमांत असतां स्त्रीस कष्ट, स्वत:स देहकष्ट; अष्टमांत असतां मृत्युतुल्य व्याधी, आजार, अपघात; नवमांत असतां धार्मिक आचारविचारामध्यें विरोध, लांबचे प्रवासांत कष्ट, वडील माणसांचे मृत्यु; दशमांत असतां नोकरी धंदा, राजदरबार ह्यांमध्यें त्रास, अडचणी, पित्यास देहकष्ट याप्रमाणें फलें जाणावीं.

**शनीचे** भ्रमणासंबंधानें विचार करितां चालू वर्षाचे १ ली जानेवारी सन १९१७ रोजीं शनि कर्क राशीमध्यें २८ अं. २७ कलांमध्यें वक्री आहे. हा ग्रह तारीख २६ मार्च रोजीं २३ अं. ३९ कलेमध्यें मार्गी होणार असून तारीख २४ जून रोजीं सायन सिंह राशीमध्यें प्रवेश करील. शनीचें भ्रमण ज्या ज्या राशींमधून होतें तद्योतक देशामध्यें गुन्हे अति होतात, रोगराई ज्यास्त वाढते. शनीचें भ्रमण कर्कराशीमधून होत असतां बंगाल इलाख्यांतील गुन्ह्यांची संख्या वाढलेली आहे हें पाहण्यासारखें आहे. बंगाल ईलाखा व विशेषत: कलकत्ता शहर कर्कराशीचे अंमलाखालीं असल्याचें ज्योतिषशास्त्रांत मानतात. आर्य ग्रंथांत खालीलप्रमाणें कर्क व सिंह राशीला शनि असतां फलें सांगितलीं आहेत.

रोगा नित्यं ग्रसन्ति प्रचुरपरिभवो वित्तनाशस्तथैव
कार्ये हानिर्विरुद्धैः सकल भयजनैर्देशचिन्ता विषादः ।

आरावोऽम्बुप्रपातैः प्रचलित पृथिवी सर्वलोकस्य नाशः
सर्वस्मिन्राजयुद्धं पशुधनहरणं कर्कटे सूर्यपुत्रे ॥

अर्थः—कर्क राशीमध्यें शनि असतां रोग, तिरस्कार, धननाश, कार्यहानी मनुष्यामनुष्यामध्यें विरोध, देशांत चिंता व विषाद, मोठ्यानें मेघगर्जना होईल व समुद्रांत मोठाले शब्द होतील. व त्यायोगानें पृथ्वी दुःखी होईल, लोकांचा संहार होईल, राजे लोकांमध्यें युद्ध होऊन पशु व धनाचें हरण होईल.

वरीलप्रमाणें पाहतां हीं सर्व फळें आगष्ट सन १९१४ पासून आतांपर्यंत पूर्ण अनुभवास आलीं आहेत असें म्हणावें लागतें. कारण शनि सायनकर्क राशीचा २९ आगष्ट १९१४ रोजीं झाला व तो ह्या राशीमध्यें तारीख २४ जून १९१७ पर्यंत राहणार आहे व तेथपर्यंत ही अनिष्ट स्थिति राहील असें ह्या वचनावरून वाटतें. खालीलप्रमाणें सिंह राशीच्या शनीचें वर्णन दिलेलें आहे.

भूम्यां नाशश्चतुष्पाद्गजहयवृषभैर्युद्धदुर्भिक्षरोगैः
पीड्यन्ते सर्व देशा उदधि पुरपथे दुर्गदेशेषु भंगः ।
म्लेंछान्तो धान्यभावो धनसुखमवनीशेन्द्रचन्द्र
प्रतापः सर्वे ते यान्तिकाले भ्रमति युगमिदं सिंहगे सूर्यपुत्रे ॥

अर्थः—सिंह राशीचा शनि असतां चतुष्पाद जनावरें हत्ती, घोडे, इत्यादिकांचा नाश होतो. युद्ध, दुर्भिक्ष व रोग फैलावेल, सर्व देशांत पीडा, समुद्रकिनाऱ्यासमीप असलेले देश, किल्ले यांचा नाश होतो. म्लेंच्छ लोकांकडून प्रजेस त्रास होईल. धान्यभाव साधारण राहतील. राजेलोकांनां धन, सुख, प्रताप पहिल्यानें प्राप्त होतील. सर्व प्राणी भ्रमण करतील.

हीं फळें सिंह राशीचा ज्या देशावर अंमल आहे तेथें विशेषतः पाहण्यास मिळतील. इतर सर्व ठिकाणीं अनुभव येईल असें वाटत नाहीं.

कर्केच्या शेवटच्या अंशांत व सिंहेच्या पहिल्या ८।१० अंशांत ज्यांचे जन्मकाळीं रवि, चंद्र, लग्न दशम असेल त्यांस ह्या सिंहेच्या शनीचे सन १९१७ सालांतील भ्रमण आजार, देहकष्ट, नोकरीधंद्यांत अपयश व संकटें



दर्शवीत आहे.

चालू सालीं गुरु सायन मेषराशीच्या २९ व्या अंशांत असून तो तारीख १३ फेब्रुवारी रोजीं वृषभ राशीमध्यें प्रवेश करीत आहे व तारीख ३० जून रोजीं मिथुन राशीमध्यें जाणार आहे. ह्याप्रमाणें पाहतां चालू सन १९१७ सालीं गुरु, मेष, वृषभ, व मिथुन ह्या तीन राशींमधून भ्रमण करणार आहे. गुरुचें भ्रमण ज्या ज्या राशीमधून होतें तद्योतक देशांचा व्यापार, सांपत्तिक स्थिति, व सार्वजनिक आरोग्य उत्तम प्रकारचें राहतें.

चालू वर्षी गुरूचें भ्रमण ज्यांचे रवि, चंद्र किंवा दशमस्थानावरील उदित अंशावरील बिंदूवरून होईल त्यास अनेक लाभ, सांपत्तिक—सुस्थिति प्राप्त होईल.

## मकर संक्रमण.

तारीख २२ डिसेंबर १९१६ रोजीं सकाळीं ८ वाजून ५० मिनिटें मुंबई टाइम. सूर्य सायन मकर राशीमध्यें प्रवेश करीत आहे. या वेळीं पूर्वक्षितिजावर कुंभ राशीचा ४ था अंश उदय पावत असून लग्नांत हर्शल ग्रह उदित आहे. चंद्र माध्यान्हीं असून त्यानें हर्शलबरोबर केलेला केन्द्रयोग सोडला असून तो शनीबरोबर त्रिकोण दृष्टियोग करण्यास जात आहे. चंद्र शुक्राबरोबर युति करण्यास जात असून शुक्र शनीबरोबर शुभसंबंधित आहे हे सर्व योग मकर संक्रमणकाळीं चांगले झाले असून अधिकारी वर्ग प्रजेच्या हिताच्या गोष्टी करतील व ह्या काळामध्यें पुष्कळ लग्नें, सार्वजनिक उत्सव घडतील. स्त्रियांसंबंधानें एखादी महत्वाची सुधारणा होईल. गुरु हा शनीबरोबर केन्द्रयोग करण्यास जात असल्यामुळें देशामधील सांपत्तिक स्थिति चांगली राहणार नाहीं. साधारणपणें फुफुसाचे रोग व यकृतविकार फार झालेले आढळतील. त्याचप्रमाणें कांहीं भागांत तापाच्या सांथी पसरतील असें वाटतें. चालू मकरसंक्रमणाचे कुंडलींत व्ययस्थानांत बुधमंगळाची युति होत आहे ही स्थिति बरीच अनिष्ट आहे. लेखक, तुरुंग, इस्पितळें यांसंबंधानें अनिष्ट प्रकार घडतील. ह्या संक्रमणाचा अंमल असेपर्यंत ता. २२ मार्च १९१७

फसवेगिरी, चोऱ्या, लुटालुट वृत्तपत्रकर्त्यांसंबंधीं खटले, त्यांचे मृत्यु घडतील असें वाटतें.

लंडन येथें हें संक्रमण पाहाटे ३ वाजून ६।। मिनिटांनीं होतें त्या वेळीं लग्नांत वृश्चिकराशीचा १२ अंश उदय पावत असून लग्नांत शुक्र व चंद्र आहेत. लग्नांत बलहीन ग्रह असल्यामुळें देशाची स्थिति साधारणच राहील. अत्याचार व गुन्हे पुष्कळ होतील. बुधमंगळाची युति तृतीयस्थानांत होत असल्याकारणानें रेल्वेच्या अपघातानें बरीच प्राणहानी होण्याचा संभव वाटतो. पोष्टखातें रेल्वे ह्यांमध्यें संप व असंतोष वाढेल असें वाटतें. नवमस्थानांत शनि व नेपच्यून येत असल्यामुळें दूरचे प्रवास—जमिनीवरील किंवा समुद्रांतील धोक्याचें वाटतें. ह्या काळांत देशांतील सांपत्तिक स्थिति अगदी कनिष्ठ राहील. स्टॉकस व शेअरमार्केट हे जानेवारी महिन्यांत मंदींत राहून नाण्याची टंचाई भासेल. फेब्रुवारी महिना सांपत्तिक दृष्ट्या बराच अनिष्ट असून बँका, पतपेढ्या यांची बरीच धांदल उडेल.

## मेष संक्रमण.

तारीख २१ मार्च १९१७ रोजीं सकाळीं मुंबई ९ वाजून २८ मिनिटांच्या सुमारास सूर्य सायनमेष संक्रमण करणार आहे. या वेळीं पूर्व क्षितिजावर वृषभराशीचा ३० अंश उदय पावत असून दशमांत हर्शल व चंद्र आहेत. नवीन वर्षप्रवेशकाळीं चंद्र दशमांत असून गुरूबरोबर तृतीय एकादश योग करण्यास जात आहे यावरून देशांत सुस्थिति राहील, सांपत्तिक दृष्ट्या वर्ष बरें जाईल. अनेक सार्वजनिक हिताच्या गोष्टी भावी वर्षांत घडतील अशी पुष्कळ आशा करण्यास जागा आहे. वर्षप्रवेशकाळीं लाभ भुवनांत शुक्र बुध, मंगळ युक्त असून हे सर्व ग्रह शनीबरोबर नवम पंचम योग करीत असल्यामुळें तर प्रस्तुत वर्षामध्यें अनेक चांगल्या गोष्टी घडतील असें वाटतें. देशांतील व्यापार, उद्योगधंदे वाढतील. कायदेकौंसिलमध्यें शिक्षण, व्यापार ह्यांसंबंधानें कडाक्याचे वादविवाद होतील असें वाटतें. नूतन वर्ष वर्तमानपत्रें, वाङ्मय, शिक्षण ह्या बाबतींत चांगलें आहे. नाटककंपन्या, सिनेमाटोग्राफ



वगैरे चैनीच्या संस्थांसंबंधानें वाच्यता व टीका होऊन एखादा उत्तम नट, लेखक ह्याचा मृत्यु होण्याचा संभव वाटतो. बंगाल इलाख्यांत पुढील सहा महिन्यांत पुष्कळ पाऊस व जोराचा वारा सुटेल.

लंडन येथें मेषसंक्रमणकाळीं बुध, शुक्र लग्नांत येत असल्यामुळें शास्त्रीय शोध, विद्याव्यासंग, वाङ्मय, प्राथमिक शिक्षण यांची वृद्धि दर्शवीत आहे. षष्ठस्थानांत शनि येत असल्यामुळें पडश्याची किंवा छातीचे विकाराची सांथ २२ जूनपर्यंत पसरेल असें वाटतें. २६ मार्चचे सुमारास शनि कर्क २३ अं. ३९ कलेमध्यें स्तंभी होणार असल्यामुळें हालंड किंवा न्यूयॉर्क येथें कांहींतरी अरिष्ट किंवा संकट ओढवावें असें वाटतें. पोर्च्युगालमध्यें ह्याच महिन्यांत मार्चचे सुमारास त्रास व अस्वस्थता भासेल. एप्रिलमध्यें सिंहराशीमध्यें नेपच्यून स्तंभी होणार असल्यामुळें रोम येथें कांहीं धांदल उडण्याचा रंग असून इटली, सिसली व रुमानियामध्यें भूकंपापासून त्रास होईल. एप्रिल महिन्यामध्यें शनि कर्कराशीच्या शेवटच्या द्रेष्काणामधून जात असतां मँन्चेस्टर शहरास कांहीं त्रास व्हावा. तारीख २१ एप्रिल रोजीं होत असलेल्या रविचंद्रसंयोगकाळचे कुंडलीवरून विचार करितां आर्यलंडमध्यें कांहीं गडबड होईल. एखाद्या पार्लमेन्टमधील मुत्सद्याचा मृत्यु होण्याचा संभव आहे. मे तारीख ९-९ अथवा २९च्या सुमारास ग्रिसिअन आर्चिपेलेगो, सायप्रस, परशिया ह्या प्रदेशांत भूकंपापासून त्रास होईल. मे महिन्यांत कांहीं नवीन शोध लागतील. मोटार, रेल्वे यांचे कारखाने चांगले चालतील. जून महिनाही आर्यलंडसंबंधानें विचार करण्यासारखा आहे. ह्या महिन्यांत बंगालइलाख्यांत भूकंप व अनावृष्टीमुळें लोक त्रस्त होतील.

## कर्कसंक्रमण.

तारीख २२ जून १९१७ रोजीं सकाळीं ९ वाजून ६ मिनिटांच्या सुमारास मुं. टा. सूर्य कर्कसंक्रमण करीत आहे. संक्रमणकाळीं मिथुनराशीचा २९ वा अंश उदय पावत असून चंद्र शनीनें युक्त असा धनस्थानांत आहे. त्याचप्रमाणें धनस्थानांत नेपच्यून आहे. गुरु व्ययस्थानांत असून हर्शलबरोबर

करीत असलेला केन्द्रयोग सोडला असून शनि व चंद्राबरोबर द्विरास्यंतर दृष्टियोग करीत आहे. एकंदरीनें विचार करितां ह्या संक्रमणाचा अंमल असे-पर्यंत तरी देशांतील सांपत्तिक स्थिति समाधानकारक राहील असें वाटत नाहीं. व्ययस्थानांत असलेली बुधमंगळाची जोडी देशांत चोर, खून व अत्याचार जास्त वाढवितील असें वाटतें. कैदीलोक तुरुंगातून पळून जाण्याचे प्रयत्न करतील व त्यांच्यासंबंधानें कांहीं भानगड उत्पन्न होईल. धार्मिक मतांमध्यें बरीच खळबळ उडेल. देशांतील मृत्युसंख्या जास्त वाढेल. वर्तमानपत्रकार व मासिककार यांस जरी हा काळ विशेष समाधानकारक नाहीं तरी बरा आहे असें वाटतें. देशांत शास्त्रीय शोध, त्यासंबंधानें लेख वगैरे जास्त प्रसिद्ध होतील. नवीन मासिकांची किंवा वृत्तपत्रांची वाढ होईल. देशांतील मजूरवर्ग, कामकरीवर्ग व नोकरीवर अवलंबून असणारे लोक यांना हा संक्रमणाचा काळ अनिष्ट भासतो; पिकें साधारणच राहतील. कौंसिलांतील लोकनियुक्त सभासदांपैकीं कोणीतरी मृत्यु पावेल.

तारीख ८–१९ अथवा २७ जुलईचे सुमारास **इटली** किंवा सिसली येथें भूकंपामुळें त्रास होईल. तारीख ४ जुलई रोजीं चंद्रग्रहण होत असून तें मंगळाबरोबर समक्रांतियोग करीत असल्यामुळें **बालकन** राष्ट्रें, उत्तरहिंदुस्थान मध्यें अनावृष्टी व महर्गता भासेल. ह्या महिन्यांत उत्तरअमेरिकेमधील राजकीय वातावरणासंबंधानें कडाक्याचा वादविवाद होईल.

## तुलासंक्रमण.

तारीख २३ सप्टेंबर १९१७ रोजीं रात्रीं ७ वाजून ९१ मिनिटांनीं वृषभलग्नाचा ७ वा अंश उदित असतां रवि तुलासंक्रमण करीत आहे. लग्नाधिपति शुक्र वृश्चिकमध्यें असून तो शनि, मंगळ व नेपच्यून यांचेबरोबर केन्द्रयोग करीत आहे. संक्रमण काळीं चंद्र अष्टमांत असून तो शनि, मंगळ व नेपच्यून यांचे बरोबर १३९ अंशाचा अशुभ दृष्टियोग करीत आहे. बुध, शनि, नेपच्यून मंगळानें पीडित आहे व बुधचंद्राबरोबर केन्द्रयोग



करीत असून चतुर्थस्थानामध्यें शनि, मंगळ, नेपच्यून ह्याप्रमाणें ग्रहस्थिति आहे. ह्यामुळें देशांत मृत्युसंख्या विशेष वाढेल. स्त्रियांच्या संबंधानें अत्याचार किंवा अनिष्ट गोष्टी बऱ्याच पाहण्यास मिळतील. महाराष्ट्रांतील लेखक, वक्ते, पत्रकार यांस ही ग्रहस्थिति अशुभ आहे. कायदेकौंसिलांत व समाजांत जोराचे वादविवाद, वृत्तपत्रामध्यें टीका आणि वाङ्मयप्रतिबंधक पुष्कळ गोष्टी घडतील. शिक्षणसंस्थांस हा काळ अनुकूळ नाहीं. संप, मारामाऱ्या, अपघात, अग्निप्रलय, रब्बीच्या पिकांची नासाडी, वातावरणामध्यें एकदम उष्णता व एकदम थंडी ह्याप्रमाणें चमत्कारिक फेरफार होतील. भूकंपाचे धक्के बसतील, हवा रोगट होईल. एकंदरीनें २३ सप्टेंबर नंतरचा काळ बराच अशुभ जाईल.

इंग्लंडमध्यें एखादा मोठा रेल्वेचा अपघात होईल, संप होतील, आरमारासंबंधानें कडाक्याची टीका होईल. त्याचप्रमाणें धार्मिक आचारासंबंधानें कांहीं अनिष्ट प्रकार उघडकीस येतील. सप्टेंबरच्या २२ तारखेनंतरचे दिवस सट्टेवाले लोक ह्यांस विशेष अनिष्ट भासतात करितां त्यांनीं सावध रहावें. बंगालमध्यें सप्टेंबर महिन्यांत भूकंपामुळें बरीच धांदल उडणें शक्य आहे. आक्टोबरमध्यें युरोपखंडामधील दक्षिणेकडील प्रदेशांत वातावरणामध्यें मोठमोठाले फरक, भूकंप वगैरे गोष्टी घडतील. नोव्हेंबर ता. २१ अथवा २७ रोजीं भूकंपाचे धक्के बसतील प्राणहानी होईल. डिसेंबर महिन्यांत इंग्लंडमध्यें अनीतीचे प्रकार झालेले बरेच उघडकीस येतील, एखादा रेल्वेचा अपघात होईल, अधिकारीवर्ग, सरदार, दरकदार वगैरे पदवीधर लोकांस हा काळ अनिष्ट जाईल. एकंदरीनें विचार करितां वर्षाअखेरचे ३।४ महिने अनिष्ट आहेत असें म्हणावें लागतें.

## सन १९१७ सालांतील ग्रहणें.

चालू सालांत एकंदर सात ग्रहणें होत आहेत, त्यांपैकीं चार सूर्यग्रहणें आहेत व तीन चंद्रग्रहणें आहेत. ह्यांपैकीं पांच ग्रहणें आपल्या देशांत अदृश्य असून एक सूर्यग्रहण कांहीं थोड्या भागांत दिसेल. चंद्रग्रहण खग्रास

असून तें सर्वत्र दिसेल.

खालीलप्रमाणें चालू सालांत ग्रहणें आहेत.

( १ ) तारीख ८ जानेवारी १९१७ चंद्रग्रहण हिंदुस्थानांत दिसणार नाहीं.

( २ ) तारीख २३ जानेवारी १९१७ खंडसूर्यग्रहण. हें उत्तरहिंदुस्थानांत कांहीं थोड्या भागांत दिसेल; दक्षिण व मध्यभागीं, मुंबईस बंगाल व मध्यप्रांत यांत दिसणार नाहीं. ग्रहण मध्यकाळीं आपलेकडे वृषभराशीचा १८ वा अंश उदय पावत असून दशमांत हर्शल मंगळाची जोडी बसलेली असून चंद्र मंगळाबरोबर युति करण्यास जात आहे. ग्रहण कुंभराशीमध्यें होत असल्यामुळें कुंभराशीच्या अंमलाखालील प्रदेशांत अनिष्ट प्रकार व्हावेत. युरोपखंडांत हें ग्रहण फ्रांस, जर्मनी, रशिया, स्वीडन, इटली, आस्ट्रिया इत्यादि ठिकाणीं दिसणार असल्यामुळें युरोपखंडांत ह्या ग्रहणामुळें सार्वजनिक संकटें, शोक वगैरे प्राप्त होतील. कुंभराशीमधील ग्रहण तुफानी वारे, राजद्रोह, सांधीचे रोग दर्शवितें असें म्हणतात, त्याप्रमाणें काय अनुभव येतो हें पाहणें आहे.

( ३ ) तारीख १९ जून सन १९१७ सूर्यग्रहण दिसणार नाहीं.

( ४ ) तारीख ४ जुलै सन १९१७ खग्रास चंद्रग्रहण. हें हिंदुस्थानांत सर्वत्र दिसेल. ग्रहण मध्यकाळीं वृषभ राशीचा ३० वा अंश उदय पावत आहे. लग्नांत गुरु व मंगळ उदय पावत आहे. हें ग्रहण मकर राशीमध्यें होत असल्याकारणानें मकर राशीच्या अमलाखालील प्रदेशांत टोळ, सुरवंट वगैरे क्षुद्र जंतूंपासून विशेष त्रास होईल.

( ५ ) तारीख १९ जुलै १९१७ सूर्यग्रहण. हिंदीमहासागर व दक्षिण ध्रुवानजीकचे थोड्याशा भागांत दिसेल; इतर कोठेंच दिसणार नाहीं.

( ६ ) १४ डिसेंबर १९१७ सूर्यग्रहण. हिंदुस्थानांत दिसणार नाहीं.

( ७ ) २८ डिसेंबर १९१७ चंद्रग्रहण हिंदुस्थानांत दिसणार नाहीं.



# सन १९१७ सालांतील मोठाल्या मोठाल्या ग्रहांच्या युत्या.

चालू सालीं पांच महत्वाचे युतियोग घडत आहेत.

( १ ) तारीख ३ फेब्रुवारी १९१७ रोजीं सकाळीं मुं. टा. ७–१० वाजतां ही युति कुंभ राशीच्या २० व्या अंशांत हर्शल मंगळ यांची युति होणार असून ह्या युतीमुळें मोठाले भूकंप व रेलवेचे अपघात होऊन प्राणहानी व्हावी.

( २ ) तारीख ८ जून १९१७ रोजीं मंगळगुरूची युति वृषभराशीच्या २९ अंश १२ कळा ३४ विकळामध्यें मुंबईटाईम ९ वाजून ८ मि. होईल. १९ व्या शतकांत वृषभराशीमध्यें गुरु व मंगळाचे अद्यापपावेतों फक्त दोनच युतियोग झालेले असल्यामुळें चालू युति फार महत्वाची आहे. या युतीमुळें वृषभराशीच्या अमलाखालील असलेल्या देशांत विशेषतः आयर्लंडमध्यें विशेष खळबळ उडेल. सतराव्या शतकांत होऊन गेलेल्या डॉ. गोड नांवाच्या एका फलज्योतिषशास्त्राधारें वातावरणाचा विचार करणाराच्या मतें ( Astro-meteorologist ) अरेबियन ज्योतिर्विद् वृषभराशीमधील गुरुमंगळाची युति पुष्कळ हिम दर्शविते. ग्रीष्मकाळांत ही युति होत असतां तुफानी वारे, विजांचे गडगडाट व वादळी हवा दर्शविते असें सदरहू डॉ. साहेबांचें मत आहे. करितां तारीख ६ जून ते १० जन पर्यंत हवेंत काय फेरफार होतात हें पाहणें आहे. साधारणपणें विचार करितां ह्या युतीमुळें वातावरणांत भयंकर घडामोडी होतील, विजांचा कडकडाट पहावयास मिळेल. सायप्रस, ग्रिसियन आर्चिपेलेगो, बंगाल इलाखा ह्यांमध्यें भूकंपाचे धक्के बसतील.

( ३) तारीख १ ली आगष्ट १९१७ रोजीं मुं. टा. सकाळीं १०–३ वाजतां शनि व नेपच्यून ह्या दोन ग्रहांची युति सिंहराशीच्या ४ अंश ४९ कला व ४७ विकलेमध्यें होणार आहे. ही युति दीर्घकाळानें होणारी अस-

त्यामुळें विशेष महत्वाची आहे. आपलेकडे ही युति जवळ जवळ एकादशस्थानाचे भावारंभाजवळ होत आहे. त्यामुळें कायदेकौंसिलांचे सभासदांमध्यें मृत्यु होईल. ह्या युतीमुळें फ्रांस, रशिया, इटली व रोम ह्या देशांत युति झाल्यापासून लवकरच उपद्रव होईल. अमेरिका खंडांतील युनायटेड स्टेटस्मध्यें ही युति चतुर्थ भुवनामध्यें होत असल्यामुळें भूकंपादि उपद्रव होईल. दक्षिण युरोप व अमेरिका ह्यांमध्यें भूकंपादि उत्पात विशेष होतील.

( ४ ) तारीख २३ सप्टेंबर १९१७ रोजीं २२ व्या तारखेच्या पहांटेस मुंबई ३ वाजून ४४ मि. नेपच्यून व मंगळ यांची युति सिंहराशीच्या ६ व्या अंशांत होणार आहे. या युतीचा अनिष्ट परिणाम बंगालमध्यें दृष्टोत्पत्तीस येईल. चोऱ्या, दरोडे, खून, अत्याचार व भूकंपापासून भीति उत्पन्न होईल.

( ५ ) तारीख २ री आक्टोबर सन १९१७ रोजीं मुंबई टा. १ ली च्या पहांटेस १ वाजून ३९ मिनिटांनीं शनि व मंगळ यांची युति सिंहराशीच्या ११ अंश ५२ विकळेमध्यें होणार आहे. युतिकाळीं मंगळ हा वृश्चिकेमध्यें असलेल्या शुक्राबरोबर व सिंहराशीमध्यें असलेल्या नेपच्यूनबरोबर समक्रांति योग करीत आहे. शनि व मंगळ हे दोन ग्रह विरुद्ध धर्माचे असल्यामुळें यांची युति ज्या राशीमध्यें होते तद्योतक देशामध्यें अनिष्ट प्रकार घडतात. युतिकाळीं सिंहलग्नाचा ८ वा अंश उदित असून शनि, नेपच्यून व मंगळ हे ग्रह लग्नांत—मुंबईस—उदय पावत आहेत त्यामुळें मुंबई इलाख्यांत मृत्युसंख्या वाढेल, सांधीचे रोग पसरतील, बरेच अत्याचार, गुन्हे, चोऱ्या, मारामाऱ्या, दरवडे वगैरे होण्याचा संभव आहे. वातावरणांत मोठमोठाले फेरफार होतील, हवा बिघडेल. सदरहु युति बंगालमध्यें सुद्धां अनिष्ट फलें दर्शवीत आहे. ह्या युतीमुळें सिंह व वृश्चिकराशीच्या अमलाखालील प्रदेशांवर संकटें ओढवतील. आयर्लंड येथें ही युति चतुर्थस्थानांत होत असून दशमाधिपति पीडित होत असल्यामुळें अराजकांची अत्याचाराकडे विशेष प्रवृत्ति होईल. त्याचप्रमाणें भयंकर वादळ होऊन पुष्कळ नुकसान होईल.



# चालू वर्षांतील चंद्राचे ग्रहांबरोबरील पिधानयोग.

चंद्र हा पृथ्वीभोंवती क्रांतिवृत्तामधून भ्रमण करीत असतां तो रव्यादि ग्रहांबरोबर दर महिन्यास युति करितो. दोन स्वस्थ ज्योतींस सांधणारी रेषा ध्रुवांतून जाते तेव्हां त्या दोहोंची **युति** झाली असें म्हणतात. म्हणजे या वेळीं त्या दोहोंचें पूर्वपश्चिम अंतर शून्य होतें; दक्षिणोत्तर अंतर कितीही असूं शकेल. दोन ज्योतींची किंवा ग्रहांचे भोग सारखे होतात किंवा जेव्हां दोन ग्रह एकाच राशीत अंशांत येतात तेव्हां त्यांची युति झाली असें फलज्योतिषशास्त्रांत मानतात. कित्येक वेळां युतीला **योग** असेंही म्हणतात. युतिकाळीं दोन ज्योतींचें दक्षिणोत्तर अंतर एक अंशाहून कमी असेल तर त्यांचें **युद्ध** झालें असें म्हणतात. दोहोंचीं बिंबें परस्परांस लागलीं तर उल्लेख म्हणतात. चंद्र हा इतर ग्रहांबरोबर युति करीत असतां ज्या ग्रहाबरोबर युति करीत असतो त्याचे व याचे मधील दक्षिणोत्तर अंतर अधिक असल्यामुळें तो त्या ग्रहाजवळ आलेला भासतो. परंतु हें अंतर जेव्हां शून्य असतें त्या वेळीं चंद्र त्या ग्रहाचे **पिधान** करितो म्हणजे तो ग्रह चंद्रबिंबाआड लपला जातो. हीं पिधानें सबंध वर्षांत फारच थोडीं होतात व त्यांचे परिणाम साध्या युतीपेक्षां जास्त असले पाहिजेत. प्रत्येक ज्योतिषविद्यार्थी याची बारकाईनें तपासणी करील. चालू वर्षांत खालीलप्रमाणें चंद्राचे **पिधान**योग आहेत. ह्या दिवशीं जन्म पावणाऱ्या मुलांवर ह्या युतींचा विशेष परिणाम पाहण्यास मिळेल. **चंद्रशनीच्या पिधाना**वर जन्म पावणारीं बाळकें अल्पायु, रोगट, मातृसुख नसलेलीं व अशक्त आढळतील. **चंद्रनेपच्यून** पिधानावर जन्म पावणारीं बाळकें पिशाचबाधा व झिजणीचे रोगानें पीडित आढळतील. परंतु शुभस्थानांत शुभसंबंधित असतां गायन, तंतुवाद्य यांत प्रवीण, कल्पक स्वप्नसृष्टीमध्यें विचित्र अनुभव मिळविणारीं, उत्तम कादंबरीकार, आध्यात्म व इंद्रियगोचरशक्तीचा विचार

करणारीं आढळतील. **चंद्रमंगळ** पिधानावर जन्म पावणारीं बाळकें तामसी, रागीट, पित्तरोगानें पीडित, देवी, गोंवर, कांजण्या, अपघात यांपासून त्रास पावणारीं आढळतील; शुभस्थानांत असतां श्रीमान व भोगी होतील. **चंद्र-शुक्र** पिधानावर जन्म पावणारीं बाळकें विषयी, भोगी, सुखी व संपत्तिवान आढळ्तील.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ जानेवारी | १९१७ | चंद्र शनि | पिधानयोग | दिवसा | मुं. टा. | ९-३२ |
| ९ ,, | ,, | चंद्र नेपच्यून | ,, | रात्रीं | ,, | ९-४९ |
| ५ फेब्रुवारी | ,, | चंद्र शनि | ,, | दिवसा | ,, | ११-१८ |
| ६ ,, | ,, | चंद्र नेपच्यून | ,, | ५च्या पहांटेस | ,, | २-३१ |
| ४ मार्च | ,, | चंद्र शनि | ,, | दुपारीं | ,, | २-२३ |
| ५ ,, | ,, | चंद्र नेपच्यून | ,, | सकाळीं | ,, | ७-३१ |
| ३१ ,, | ,, | चंद्र शनि | ,, | संध्याकाळीं | ,, | ८-३१ |
| १४ आगष्ट | ,, | चंद्र मंगळ | ,, | सकाळीं | ,, | ८-३५ |
| २० आक्टोबर | ,, | चंद्र शुक्र | ,, | १९च्या रात्रीं | ,, | १२-४१ |

## खालील प्रमाणें चालू वर्षांत ग्रह स्तंभी आढळतील.

**बुध**—तारीख १० व ३० जानेवारी कुंभ ५-४० व मकर १९-३९
,, ५ व २९ मे वृषभ२९-३० व वृषभ २०-३५
,, ५ व २८ सप्टेंबर तुला ४-४ व कन्या १९-३१
,, २५ डिसेंबर मकर १९-४२

**शुक्र**—चालू वर्षांत स्तंभी होतच नाहीं.

**मंगळ**—चालू वर्षांत स्तंभी होतच नाहीं.

**गुरु**—३० सप्टेंबर १९१७ मिथुन ११-३१.

**शनि**—२६ मार्च व २६ नवंबर कर्क २३-२९ व सिंह १४-३२.

**हर्शल**—२९ मे व ३० आक्टोबर कुंभ २३-४३ व कुंभ १९-४८.

**नेपच्यून**—१२ एप्रिल व नवेंबर सिंह २-५ व सिंह ७-७.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. } फेब्रुवारी १९१७. { अंक ११ वा.

## प्रासंगिक विचार.

श्रीयुत दामोदर भास्कर बापट हेडमास्तर, लोकल बोर्ड मराठी शाळा खारे-पाटण, जिल्हा रत्नागिरी, यांनीं अनुभव पाहण्याकरितां सूर्य व ग्रह यांची उष्णता आणि भूरचना यांवरून केलेलें पश्चिम हिंदुस्थानच्या पावसाळ्याचें सन १९१७ सालाचें अनुमानाचें पुस्तक अभिप्रायाकरितां पाठविलें आहे. राजश्री बापट हे सदरहू प्रमाणें अनुमानें सन १९१३ सालापासून प्रसिद्ध करीत असून ज्या पद्धतीनें हीं अनुमानें केलीं आहेत ती कशी आहे, कोठें चुकतें, त्यांत काय सुधारणा केली पाहिजे वगैरे गोष्टींचा विचार करून पुढील भविष्यें करीत आहेत. यांनीं केलेलें सन १९१६ सालचें भविष्य मालेच्या फेब्रुवारी सन १९१६ च्या अंकांत प्रसिद्ध झालेलें आहे. रा. रा. बापट यांनीं सोबत जें पत्र पाठविलें आहे त्यांत ते म्हणतात "हा ग्रंथ (अनुमानाचें पुस्तक) फल-ज्योतिषाच्या आधारानें केलेला नाहीं. गणित, ज्योतिष आणि पदार्थविज्ञान

यांचे आधारानें केलेला आहे. ग्रहाच्या उष्णतेनें ऋतूमध्यें अनियमितपणा उत्पन्न होतो म्हणून सूर्य आणि भूरचना यांबरोबर ग्रहांची उष्णता विचारांत घेऊन अनुमानपद्धति तयार केली आहे. सूर्याशीं तुलना करितांना ग्रह हे फारच कमी प्रतीचे आहेत तथापि त्यांच्या उष्णतेचा पावसाळ्याच्या कामीं उपयोग होतो असें माझ्या अनुभवास आलें आहे ''

एकंदरींत वरील विधानावरून राजश्री बापट यांना ग्रहाच्या थोडयाबहुत उष्णतेखेरीज इतर कांहीं गोष्टी मान्य होत नाहींत. असें जर आहे तर ग्रहाच्या अंगीं असलेल्या थोडयाबहुत उष्णतेनें वातावरणांत अनेक घडामोडी कां व्हाव्यात? पृथ्वीवर येणारे सूर्याचे किरण किंवा सूर्याभोंवतीं पृथ्वी फिरत असतां तीस मिळणारी विशिष्ट स्थितीमध्यें विशिष्ट उष्णता नेहमीं सारखीच असावयास पाहिजे ती तशी कां असत नाहीं हा प्रश्न उद्भवतो. ग्रहांच्या फक्त थोडयाबहुत उष्णतेनें हें फेरफार घडत असतील असें ज्योतिषविद्यार्थ्यास वाटणार नाहीं. यापेक्षां कांहीं सबळ कारणें असलीं पाहिजेत. वायूच्या विशिष्ट गतीवरून किंवा वादळावरून पावसाचें भविष्य आजपर्यंत पुष्कळ लोक करीत आहेत. त्याकरितां तर सरकारचें मेट्रालाजीकल खातें रात्रंदिवस ज्यारीनें प्रयत्न करीत आहे व त्याप्रीत्यर्थ लाखो रुपयांचा चुराडा होत असून विशेष कांहीं निष्पन्न होत नाहीं. हें नव्यानें सांगितले पाहिजे असें नाहीं. वातावरणाच्या दाबांचा किंवा इतर गोष्टींचे वेध घेऊन भूकंपादि उत्पात् किंवा वादळें होण्यापूर्वी कांहीं तास कळलें म्हणजे त्यापासून विशेष फायदा होतो असें वाटत नाहीं. ह्यापेक्षां फलज्योतिषशास्त्राच्या योगानें भूकंप, वादळें, पाऊस यांसंबंधीं अचुक भविष्यें खात्रीपूर्वक पुष्कळ अगोदर करितां येतात. आर्य पूर्वजांस ह्यासंबंधानें चांगली माहिती होती असें आज त्यांचे ग्रंथ साक्ष देत आहेत. फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या वातावरणाचा विचार कसा करावा ह्यासंबंधानें यूरोपीय व आर्य ग्रंथकारांचे विचार आम्हीं लवकरच मालेच्या वाचकांस सादर करणार आहोंत. ग्रह विशिष्ट स्थितीमध्यें आले असतां किंवा ते आप आपसामध्यें विशिष्ट योग प्रतियोग करीत असतां त्यांच्या अंगीं असलेल्या उष्णतेपेक्षां ते आपल्या



विद्युत् चुंबकीय धर्मामुळें रवि इतकेच किंबहुना रवीपेक्षांही जास्त परिणाम पृथ्वीच्या वातावरणावर करितात असा आमचा समज आहे.

खालीलप्रमाणें राजश्री बापट यांचें सारांश रूपानें चालू १९१७ सालाचें पावसाबद्दल अनुमान आहे.

### नक्षत्रवार पावसाचें संक्षिप्त टिप्पण.

१ आश्विनीचा पाऊस कोठें कोठें शिंतोडेल.

२ भरणी सर्व व कृत्तिकांचे पहिले दोन चरण यांत गुजराथ प्रांताशिवाय इतर सर्वत्र अनियमित असा पाऊस पडेल. तो सर्व मिळून २ इंचांपेक्षां अधिक होणार नाहीं.

३ कृत्तिकांचे शेवटचे दोन चरण व रोहिणी व मृग सर्व यांचा पाऊस पडणार नाहीं. ढग मात्र असतील

४ आर्द्राचा पाऊस चांगला असून एकादे दिवशीं ७।८ इंच पर्यंतही पडेल.

५ पुनर्वसूचा सर्व बेतानें लागेल.

६ पुष्याचा पाऊस चांगला पडेल.

७ आश्लेषांचे पहिले दोन चरण बेतानें लागतील.

८ आश्लेषांचे शेवटचे दोन चरण व मघाचा पहिला चरण यांचा पाऊस पडणार नाहीं.

९ मघांचे शेवटचे तीन चरण, पूर्वा, उत्तरा हस्ताचा पहिला चरण यांत पाऊस बेतानें आहे.

१० हस्ताचे शेवटचे तीन चरण व चित्रा सर्व यांत पाऊस शिंतोडेल.

११ स्वातीचा पाऊस लागेल. अनुराधा सह्याद्रिपटवास लागतील.


१२ एकंदरींत पाऊस चांगला आणि सर्वत्र आहे पण उशीरां आहे.

वर दर्शविलेलीं नक्षत्रें निरयण असावींत असें वाटतें.

*  *  *  *  *

रा. रा. भवानीशंकर तुकाराम ठाकूर मुंबई यांचेकडून ग्वाल्हेराधिपति **श्रीमंत महाराजाधिराज अलिजा बाहादूर माधवराव साहेब शिंदे** यांचे प्रथम पुत्र, युवराज **जार्ज जयाजीराव** यांचे कुंडलीचें ज्योतिषशास्त्रदृष्ट्या वर्णन केलेलें पुस्तक अभिप्रायाकरितां आलें आहे. सदरहु वर्णनांतील क्षुल्लक दोषाखेरीज तें फारच मार्मिक व उत्तम झालें आहे. वर्णनाची भाषा फारच मोहक असून श्रीयुत ठाकर यांचा हा पहिलाच प्रयत्न इतका चांगला झालेला पाहून आनंद वाटतो. फलज्योतिषशास्त्राची जर सत्यता जनांस स्पष्टपणें पटवून दाखवावयाची असेल तर असलेच पुष्कळ प्रयत्न झाले पाहिजेत. सदरहू वर्णन कालनिर्णयाचे अभावीं अपुरें भासतें. जन्मस्थल ग्वाल्हेर असून कुंडली तेथील स्थानिक वेळेची मांडली पाहिजे ती मुंबई वेळाची दिली आहे हें ज्योतिषशास्त्राचे तत्त्वाविरुद्ध झालेलें आहे. युवराज जॉर्ज जयाजीराव यांचा जन्म तारीख २६ जन सन १९१६ रोजीं ग्वाल्हेर येथें स्थानिक वेळ दिवसा १० वाजन ५७ मिनिटें या वेळीं किंवा मुंबई वेळ दिवसा ११-१७ या वेळीं झाला आहे, त्या वेळीं खालीलप्रमाणे ग्रहस्थिति आहे. ग्वाल्हेर अक्षांश २० अं. २० कला, उत्तर रेखांश ७८ अंश ४ कला पूर्व.

**सायनलग्न.**






कन्या ही द्विस्वभाव व कमी जीवनशक्ति देणारी राशि पूर्वकेन्द्रावर उदय पावत असून लग्नांत अष्टमेश मंगळ उदय पावत आहे. लग्नाधिपति बुध अष्टमेशाबरोबर केन्द्रयोग करीत आहे. रवि व चंद्र हे शनीबरोबर समक्रांति दृष्टियोग करीत असून चंद्र हा हर्शल किंवा प्रजापतीबरोबर केन्द्रयोग करीत आहे. ही ग्रहस्थिति युवराजास बाल्यावस्थेमध्यें बरीच अरिष्टसूचक आहे. त्यांस सांथीचे रोग—गोंवर, देवी, कांजण्या, दंतोद्भवाच्या वेळीं विशेष त्रास, आंत्रविकार ( Intestinal troubles ) अपघात व जिवावरचीं अनेक दुखणीं किंवा संकटें दर्शवीत असून त्यांपासून सावध राहण्यासंबंधानें विशेष सावधगिरी बाळगली पाहिजे. स्थूल मानानें विचार करितां युवराजाचीं ३।९।१९ हीं वर्षें शारीरिक सुखासंबंधानें विशेष कष्टकारक वाटतात. वर दर्शविलेल्या अनिष्ट वर्षी युवराजांचे शरीरप्रकृतीसंबंधानें शक्य तेवढी काळजी घेऊन अनिष्ट ग्रहस्थितीचा प्रतिकार करण्यास ग्वाल्हेर दरबार योग्य ती काळजी घेईल. असो, शेवटीं त्यांस दीर्घायुष्य लाभो व त्यांचा सत्कीर्तिसुगंध सर्व हिंदुस्थानभर दरवळून जावो व त्या सुवासानें सर्व भरतभूमीस आनंद लाभो अशी त्या भगवतीजवळ आमची नम्र प्रार्थना आहे.

* * * *

मालेच्या डिसेंबर महिन्याच्या अंकांत आम्हीं आमचे मित्र कै. रा. सोमेश्वर गोपाळ जोशी यांचे कुंडलीचें वर्णन देतांना नजरचुकीनें रवि व बुध हे **नेपच्यून** ह्या ग्रहाबरोबर शुभसंबंधित असल्याचें म्हटलें आहे ते तसें नसून केन्द्रयोग करीत असून अशुभ फल दर्शविणारे आहेत. अशासंबंधानें आम्हांस आमच्या एका हितचिंतकाकडून पत्र आलें आहे. आमची नजरचूक योग्य वेळीं दर्शविल्याबद्दल आम्हीं आमच्या मित्राचे आभारी आहोंत परंतु ही चूक दर्शविण्याचे कामीं जें वर्तन करण्यांत येत आहे तें मात्र शिष्टाचाराविरुद्ध आहे. मानवी प्राणी चुकीस पात्र आहे त्याच न्यायानें मालाकाराच्या हातून चुका होणें संभवनीय आहे. मालाकार सर्वज्ञ आहेत असें आम्हीं कधींच प्रतिपादन केलेलें नाहीं. सदरहु लेखकास त्या कुंडलींत झालेले धनयोग दिसत नाहींत. बारा वर्षें रामायणाचें पारायण करून सीता ही रामाची कोण म्हणणाराची धन्य आहे !! आमचे मतें त्यांनीं तेवढें चुकीचें वाक्य गाळून पुन्हा कुंडलीवरील आमचे विचार वाचावे व मनन करावे म्हणजे त्यांच्या शंका सहज दूर होतील.

## ध्रुवोन्नतांश.

[ लेखक—अंबाप्रसाद ]

ध्रुवोन्नतांशांची जरूर द्वादश, द्वितीय, तृतीय, पंचम, एकादश, षष्ठ, अष्टम व नवम भाव साधतांना लागते. ज्यो. केशव त्रिंबक पेंडसे यांनीं हे ध्रुवोन्नतांश कसे काढावे याची सारणी कुंडलीविज्ञान वर्ष ६ चे अंकांत पुढीलप्रमाणें दिली आहे.

अक्षांश स्पर्शरेषा × ३० अंशांची कोटिज्या=१२, २, ६, ८, या भावांच्या ध्रुवोन्नतांशांची स्पर्शरेषा.

अक्षांश स्पर्शरेषा × ६० अंशांची कोटिज्या=११, ३, ५, ९ या भावांच्या ध्रुवोन्नतांशांची स्पर्शरेषा.

याच सारणीनें तयार केलेलें ध्रुवोन्नतांश कोष्टक हिंदुस्थानांतील अक्षांशापुरतें दिलेलें आहे. हल्लीं केतकीपंचांगांत दिलेलें ध्रुवोन्नतांश कोष्टक या पेंडसे यांनीं दिलेल्या कोष्टकाशीं बरेंच मिळतें असल्यामुळें तेंही वरील सारणीनेंच केलें असावें. पण **सुलभजातक** भाग २ मध्यें दिलेले ध्रुवोन्नतांश व हे पेंडसेकृत व केतकीपंचांगांतर्गत ध्रुवोन्नतांश यांत ३।४ अंशांचें अंतर पडतें. असें अंतर पडत असतां भावसाधनांत या भावांचे आरंभांत चूक राहणें शक्य आहे—नव्हे चूक राहीलच व अशा चुकीच्या भावामुळें भाव कोठपासून आरंभ झाला हें कळत नाहीं. तरी या त्रिवर्गांनीं दिलेल्या ध्रुवोन्नतांशांपैकीं कोणते ध्रुवोन्नतांश खरे व ते कसे ? हे आपण अगर आपला चाणाक्ष वाचकवर्ग मजला कळवील काय ? हें स्पष्ट व सुलभ रीतीनें कळविण्यांत आल्यास मजसारख्या अल्पज्ञास लवकर कळे . आपल्या मासिकांत मागील म्हणजे डिसेंबरचे अंकापासून निरनिराळ्या शंकांची चर्चा—उदाहरणार्थ 'नल व अनल' या संवत्सर नामाबद्दल होऊं लागली आहे, म्हणून ही शंका आपलेकडे पाठविली आहे.



## भावविचार.

( अंक ९ वरून चालू. )

वारंवार मोठे प्राणावर बेतणारे अपघात होतात, किंवा हीं माणसें आत्महत्या करितात. षष्ठस्थानांत **मंगळ** दर्शलनें पीडित नसावा. हा योग फारच अशुभ फळें दर्शवितो.

षष्ठस्थानांत **मंगळ** असलेलीं माणसें नेहमीं आपल्या कामांत कुशल असून आपलीं कामें फार उत्साहानें करितात. षष्ठस्थानांत **मंगळ** असलेली मंडळी दीर्घोद्योगी असल्यामुळें त्यांच्यामध्यें हातीं घेतलेल्या कामासंबंधानें विचित्र कल्पना आढळतात. ही मंडळी पुष्कळ वेळां आपल्या शरीरप्रकृतीची काळजी न करितां आपलीं किंवा दुसऱ्यांचीं कामें फारच काळजीनें व आस्थेनें करितात. ह्या मंडळीस हाताखालचे लोक, चाकर, नोकर ह्यांपासून विशेष त्रास होतो. षष्ठांत मंगळ शुभसंबंधित असतां शरीरसामर्थ्य उत्तम आढळतें. व ही मंडळी फारच हिंमत बहादर असतात.

षष्ठस्थानांत **बुध** शरीरसुखास चांगला नाहीं. षष्ठांत बुध द्विस्वभाव राशीचा असून पीडित असतां पुष्कळ वेळां क्षयरोग झालेला पाहण्यास मिळतो. विशेषतः षष्ठस्थानांत मीन राशीचा बुध असून पीडित असतां अनुभव चांगलाच पाहण्यास मिळतो. षष्ठस्थानांतील बुध बहुशः मज्जातंतूचे विकार दर्शवितो, करितां त्यांचे कुंडलींत षष्ठस्थानांत बुध पीडित असेल त्यांनीं अतिश्रम, काळजी, फार मानसिक श्रम, वाचन, लेखन वगैरे करूं नये. षष्ठांत बुध मंगळानें पीडित असतां स्वभाव लहरी, रागीट, अति तामसी आढळतो. ह्या मंडळीस अविचारामुळें किंवा अति तामसवृत्तीमुळें चित्तभ्रम होण्याचा संभव असतो. बुध षष्ठांत शनीनें पीडित असतां शरीरप्रकृति अति काळजीमुळें खराब होते. दीर्घकाळ टिकणारे असे मज्जातंतूचे रोग होतात. षष्ठांत बुध हर्शलनें पीडित असलेलीं माणसें फारच विलक्षण वृत्तीचीं असतात व ही मंडळी आत्महत्या देखील करितात. एकंदरीनें वि-

चार करितां षष्ठस्थानांत बुध पापग्रहानें अशुभसंबंधित नसावा कारण त्यायोगानें मानसिक शक्ति निर्बळ झालेली पाहण्यास मिळते. षष्ठस्थानांत बुध असलेल्या मंडळींनीं कारकुनीपेशा, लेखक, रसायनशास्त्रसंबंधीं व्यवहार, पुस्तकांचा क्रयविक्रय वगैरे धंदा करावा. त्या माणसांनीं स्वतंत्र धंद्यापेक्षां नोकरी केली असतां चांगलें. **गुरु** षष्ठस्थानांत असतां शरीरप्रकृती चांगली आढळते, आजारी पडले असतां नीट जोपासना होते तर कित्येक मंडळीस आजारामुळें लाभ होतात. षष्ठस्थानांत गुरु पीडित असतां रक्तदोष, यकृताचे विकार, अनियमितपणामुळें उद्भवणारे विकार होतात षष्ठांत गुरु असलेल्या माणसांस त्यांचे हाताखालचे लोक, चाकर नोकर यांपासून फायदा होतो.

षष्ठस्थानांत शुक्र पीडित नसतां शरीरप्रकृती चांगली आढळते. षष्ठस्थानांत शुक्र असलेल्या मंडळीनें विशेषतः तरुणपणांत किंवा लग्न झाल्यानंतर अति जपलें पाहिजे. विषयासंबंधानें बरेंच सावध राहिलें पाहिजे कारण त्याच्या अतिरेकानें शरीरप्रकृतीचा नाश झालेला पाहण्यास मिळतो. षष्ठांत शुक्र असलेल्या मंडळीची आजारामध्यें सेवासुश्रूषा उत्तम होते. ह्या मंडळीस हाताखालचे नोकर, चाकर वगैरे लोकांपासून चांगला फायदा होतो.

षष्ठस्थानांत **शनि** असतां शरीरप्रकृती अशक्त व रोगी आढळते. षष्ठांत शनि असून तो रवि किंवा चंद्राबरोबर अशुभसंबंधित असतां दीर्घकाळ टिकणारे रोग झालेले आढळतात. सदरहू मंडळीस सर्दीचे विकार, संधिवात, वगैरे रोगांपासून होणारा त्रास होतो व ह्यांचे अंगांत रोगमुक्त होण्याची शक्ति फारच कमी प्रमाणांत आढळते. षष्ठांत शनि असलेल्या मंडळीस हाताखालचे चाकर नोकर वगैरेंपासून विशेष त्रास होतो.

षष्ठस्थानांत **प्रजापति** ( हर्शल ) इतर ग्रहानें अशुभसंबंधित विशेषतः रवि किंवा चंद्र अशुभसंबंधित असतां शरीरप्रकृति चांगली राहणार नाहीं. विचित्र, दीर्घकाळ राहणारे, असाध्य व साधारण औषधोपचारानें बरे न होणारे रोग होतात. ह्या लोकांस गूढ विद्यांची आवड आढळते व त्यासंबंधानें ते व्यवसाय किंवा धंदे करितात. षष्ठांत हर्शल–प्रजापति–रवि, चंद्र, बुध



षष्ठस्थान व कन्याराशि ह्यांचा अंमल आंतड्यांवर असल्यामुळें बहुशः षष्ठस्थानांतील पापग्रह आंतड्यांसंबंधीं अपचनाचे विकार वगैरे दर्शवितात. षष्ठस्थानाचा व आंतड्यांचा ह्याप्रमाणें संबंध आल्याकारणानें शरीरपोषणास लागणाऱ्या अन्नाचा ह्या स्थानावरून विचार करावा असें वाटतें. कारण पुष्कळ कुंडल्या पाहत असतां ह्या स्थानांतील ग्रह विशिष्ट प्रकारच्या पदार्थासंबंधानें आवड नावड दर्शवीत असल्याचें आमचे अवलोकनांत आलें आहे. जगांतील कोणत्याही कृत्यांत उत्तम शरीरप्रकृतीची आवश्यकता आहे. उत्तम शरीरप्रकृतीच्या अभावीं पुष्कळ वेळां चांगल्या चांगल्या लोकांच्या हातून पुष्कळ कामें अर्धवट किंवा तशींच राहिलेलीं आहेत. ह्याबद्दल विशेष लिहिलें पाहिजे असें वाटत नाहीं. धर्म अर्थ किंबहुना मोक्ष ह्याप्रमाणें त्रिविध पुरुषार्थ साधण्यास उत्तम शरीरप्रकृतीची अत्यावश्यकता आहे. शरीरप्रकृती पुष्कळ अंशीं योग्य आहारविहारावर अवलंबून आहे. योग्य आहारविहार केला असतां निरोगित्व व दीर्घायुत्व मिळालेलें पाहण्यास मिळतें व या दृष्टीनें आम्ही या स्थानाचा अवश्य विचार केला पाहिजे कारण विशिष्ट कुंडलीच्या मालकास कोणत्या आहाराची आवश्यकता आहे यासंबंधानें चांगली कल्पना खात्रीनें ज्योतिषशास्त्राधारें करितां येईल.

षष्ठस्थानांत **बुध** असलेल्या मंडळीमध्यें भयंकर तऱ्हेची आवड नावड असलेली दृष्टोत्पत्तीस येते. ह्या स्थानांत बुध बलवान असलेली मंडळी कांहीं विचारी असतात व त्यांच्या आवडी नावडी नैसर्गिक शास्त्रीय तत्वास तरी धरून असतात परंतु षष्ठस्थानांत पीडित बुध असलेल्या लोकांच्या जेवणासंबंधीं किंवा आहारासंबंधीं कल्पना फारच विचित्र, वेडगळ, व चमत्कारिक असतात. कित्येक वेळां ही मंडळी जेवणाचे कामांत इतकी मिजासखोर, चिकित्सेखोर, चाखतमाकत जेवणारी किंवा नाकाओंठावर जेवणारी असतात कीं, अन्न हें शरीरपोषणास लागणारी आवश्यक वस्तु आहे हें सामान्य तत्व देखील ते विसरतात.

षष्ठस्थानांत **शनि** असलेल्या मंडळीचें ह्याचे उलट पाहण्यास मिळतें. ही मंडळी बैरागीवृत्तीची, खाण्यापिण्यासंबंधानें बेफिकीर, अनेक दिवसांचेदिवस उपवास करणारी, उपासमार करणारी, अन्नवस्त्रांसंबंधीं बेफिकीर राहणारी आढळतात व त्यामुळें ह्या मंडळीस विशेष पौष्टिक आहाराची अत्यंत आवश्यकता आहे. ह्या मंडळीनें ज्या जागेमध्यें विशेष आल्हाद वाटेल, उष्णता व उजेड पुष्कळ असेल अशा ठिकाणीं आपलें जेवण व अन्नपानादि व्यवहार करावेत.

षष्ठांत **मंगळ** असलेल्या लोकांचा आहार चांगला असतो व ही मंडळी तिखट पदार्थांची विशेष भोक्ती असतात, बहुश: वाजवीपेक्षां फाजील खातात.

षष्ठस्थानांत **गुरु** असलेली मंडळी चमचमित जेवणारी, पक्वान्नप्रिय, मिष्टान्नशूर असून खाण्यापिण्याचे अतिरेकामुळें आपली प्रकृति बिघडवून घेतात.

षष्ठस्थानांत **शुक्र** असतां चांगले, सुग्रास अन्नप्रिय असतात व त्याचे अतिरेकामुळें शरीरप्रकृती अस्वस्थ होण्याचा संभव असतो परंतु शुक्र इतका अशुभ फळें दर्शवीत नाहीं. विशेषत: तो पापग्रहानें दृष्ट नसून तुळाराशीमध्यें असतां त्याचे अशुभ धर्म फारच थोडे पाहण्यास मिळतात.

षष्ठस्थानांतील **चंद्र** हा पेय पदार्थाची विशेष आवड व खाण्यापिण्यांत बऱ्याच आवडीनावडी दर्शवितो.

षष्ठस्थानांत **रवि** असतां आहार चांगला असतो; विशेषत: तिखट पदार्थांची गोडी असते. मनाचा ओढा उपवास करण्याकडे किंवा दुधावर राहण्याचा पाहण्यास मिळतो.

साधारणपणें विचार करितां षष्ठस्थानांत चंद्र किंवा **बुध** असतां अन्नग्रहणकाळीं किंवा जेवणाचे वेळीं चित्ताची प्रसन्नता ठेवण्याबद्दल शक्य तेवढा प्रयत्न करावा. ह्या लोकांनीं वाचन, काळजी, त्रास ह्यांपासून जेवतांना तरी दूर राहण्याचा प्रयत्न करावा. षष्ठस्थानांत **चंद्र, बुध** किंवा **शनि** असलेल्या लोकांनीं आपण कोणाबरोबर भोजन करीत आहों, आपल्या शेजारी कोण



बसलें आहे ह्याही गोष्टीचा विचार केला पाहिजे कारण ह्या लोकांवर दुसऱ्याच्या अंगामध्यें असलेल्या आकर्षण शक्तीचा विशेष परिणाम घडतो. ज्याचे षष्ठस्थानांत शनि असतो किंवा षष्ठाधिपति शनि असतो त्यांस तर वर दर्शविल्या गोष्टीपासून विशेष त्रास झालेला पाहण्यास मिळतो. षष्ठस्थानांत गुरु असलेल्या मंडळीस सहभोजनापासून विशेष फायदा होतो.

वरील सर्व विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं कुंडलीच्या षष्ठमारंभीं उदित असलेल्या राशीवरून किंवा कुंडलीच्या षष्ठस्थानांत असलेल्या ग्रहस्थितीवरून रोगनिदान विशेष चांगलें करितां येणार नाहीं. सर्व कुंडलीचा विचार करून नंतर षष्ठस्थानांतील ग्रह व राशि यांचा विचार केला असतां रोगनिदान सहसा चुकणार नाहीं. प्रथमत: रविचंद्र पीडित आहेत किंवा काय, एकंदर कुंडली त्या प्राण्यास कोणत्या प्रकारची शरीरप्रकृती दर्शवित आहे ह्याचा पूर्ण विचार केल्यानंतर षष्ठस्थानारंभीं असलेली उदित राशि किंवा षष्ठस्थानांत असलेले ग्रह कोणते रोग दर्शवीत आहेत या गोष्टीचा विचार करावा.

षष्ठस्थानावरून आर्य ग्रंथांत शत्रूचा विचार करण्यास सांगितलेलें आहे. यूरोपीय ज्योतिर्विद शत्रूसंबंधानें विचार षष्ठस्थानावर न करितां सप्तमस्थानावरून उघड शत्रु, आपले प्रतिस्पर्धी यांचा विचार करितात व द्वादशस्थानावरून गुप्त शत्रूंचा विचार करितात. षष्ठस्थान हें द्वादशस्थानाच्या समोरील स्थान असल्यामुळें गुप्त किंवा उघड शत्रुत्व ह्यांसंबंधानें कांहीं विचार होत असेल असें मानण्यास पुष्कळ जागा वाटते. सदरहू गोष्टीचा या स्थानाबरोबर किती संबंध आहे याबद्दल अजून पुरेसा अनुभव नसल्यामुळें विशेष लिहिणें योग्य दिसत नाहीं. मालेचे वाचकवर्ग या गोष्टींसंबंधानें आपआपला अनुभव कळवितील.

**युवतिपदादुद्वाहं भार्यापतिसूपदधिगुडक्षीरम् ।**
**आगमगमनमदार्तिं ब्रूयान्मूत्राशयं च नष्ट धनम् ॥**

( सर्वार्थचिंतामणि )

लोकांस इतकीं विचित्र स्वप्नें पडतात कीं त्यासंबंधानें नुसती कल्पनाच करावी लागते.

अष्टमांत नेपच्युन किंवा वरुण पीडित असतां स्वप्नसृष्टीमध्यें विचित्र व भयाण देखावे दिसतात, कुस्वप्नें पडतात, झोंपेंत छातीवर दडपल्यासारखें वाटतें, पिशाचभ्रम होतो.

> "शुभभवनाद्गुरुभाग्यं पितृ पौत्र दया तपः प्राप्तिम् ।
> ऊरुत्थानं स्वान्तं सहभोक्तृन् दानयोगमपि विद्यात् ॥"
>
> ( सर्वार्थ चिन्तामणिः )

> "धर्मरतिस्तथापन्था धर्मोपायं च चिंतयेत्"
>
> ( ता. निळकंठी )

## नवम भाव.

कुंडलींतील नवमस्थानावरून गुरु, भाग्य, पिता, नातवंडें, दया, तप, लाभ, मांड्या, मन आपल्याबरोबर भोजन करणारी कुटुंबांतील मंडळी, दान, योगसाधनादि विद्या इत्यादि गोष्टींचा विचार करावा असें सर्वार्थ चिंतामणिकारांचें मत आहे. त्याचप्रमाणें तो आणखी **"चिन्तनीया गुरुस्वामि पितृभाग्यादि मातुलाः"** आपला उपदेश करणारा गुरु-आचार्य, पिता, ऐश्वर्यादिक सर्व भाग्य दर्शविणाऱ्या गोष्टी, व मातुल पक्ष किंवा मामा यांचा विचार करण्यास सांगत आहे. ताजिक निळकंठीकार ह्या सर्वांचे विरुद्ध आहे असें वर उद्धृत केलेल्या त्याचे श्लोकावरून वाटत नाहीं. फक्त त्याचे मतानें 'पन्था'—प्रवास—मार्ग संबंधी विचार ह्या स्थानावरून करण्यास सांगितल्याचें दिसतें.

आर्य ज्योतिर्विदांच्या मतानें कुंडलींतील हें स्थान फार महत्वाचें आहे. प्रसिद्ध आर्य ज्योतिर्विद कल्याणवर्मा आपल्या सारावली नामक ग्रंथामध्यें ह्या स्थानासंबंधानें खालीलप्रमाणें म्हणतो **'सर्वमपहाय चिन्त्यं भाग्यर्क्षं**



**प्राणिनां विशेषेण । भाग्यं विना न जन्तुर्यस्मात्तद्यत्नतो वक्ष्ये ॥ लग्नान्निशाकराद्वा यन्नवमं तद्गृहं चिन्तयेदस्मात् । अनयोर्यो बलयुक्तो भाग्यगृहं चिन्तयेदस्मात् ॥'** प्राणिमात्राची भाग्य ही कांहीं एक अपूर्व वस्तु आहे व तिचा विचार लग्नापासून किंवा चंद्रापासून जें नमवस्थान त्यावरून होतो. सारावलीकारानें यासंबंधानें जवळ जवळ ११२ श्लोक दिले आहेत ते फारच उपयुक्त आहेत परंतु जागेच्या अभावामुळें आम्हांस ते येथें सर्व देतां येत नाहींत. नवमस्थानावरून धार्मिक आचारविचार यांचा बोध होतो. जन्मकुंडलींतील नवमस्थान व गुरु यांवरून जन्मणाराची धार्मिकश्रद्धा कशी असेल यासंबंधानें विचार होतो. सर्व प्रकारच्या उच्च बुद्धिमत्तेचा किंवा तत्वज्ञानविषयक विचारांचा विचार या स्थानावरून होतो. व म्हणूनच या स्थानावरून आत्मविद्या किंवा अन्तःसृष्टिविज्ञान ज्ञानाचा विचार होतो; परंतु ह्याचे उलट कुंडलीचे तृतीयस्थानावरून इंद्रियग्राह्यविषयविज्ञान किंवा बाह्य सृष्टिविज्ञानज्ञानाचा बोध होतो. तृतीयस्थानावरून होणाऱ्या बुद्धिमत्तेची किंवा मनाच्या क्षेत्राची मर्यादा आकुंचित असते परंतु नवमस्थानानें द्योतक असलेल्या मनाची, ज्ञानाची व्याप्ती फारच व्यापक असलेली पाहण्यास मिळते. तृतीयस्थानानें द्योतक असलेली मनाची संस्कृती साधारण अभ्यास व वाचनानें झालेली असते परंतु आत्मविद्या किंवा अध्यात्मिक तत्वज्ञानास दीर्घ काळाचा व्यासंग, मनन व शुद्ध आचरणाची जोडी असावी लागते.

पूर्वकालीं पिता व धर्मगुरु हे एकच असल्याकारणानें नवमस्थानावरून पित्याचा विचार करण्यास सांगितलें असावें. हल्लीं देखील बटूस गायत्री मंत्र पिताच देत असतो; परंतु सध्यां रूढीमुळें फक्त फार्स होत आहे. जेथें पित्यासच मंत्रसिद्धि झालेली नाहीं तेथें तो ती आपल्या मुलास काय देणार !! नवमस्थानावरून गुरूचा बोध होतो; गुरु म्हणजे अध्यात्मविद्येमधील गुरु असावा. हल्लींचे शाळेतील दर वर्षी बदलणारे नित्य नवीन गुरूंचा बोध होत असेल असें वाटत नाहीं. धनुराशीचा अंमल मांड्या व मज्जातंतूंवर असल्याचें पूर्वीच सांगितलें आहे त्याप्रमाणें ह्या स्थानाचाही मांड्यांवरही अंमल

**रणांगणश्चापि वणिक् क्रिया च जाथाविचारं गमनप्रमाणम् ।**
**शास्त्रप्रवीणैर्हि विचारनीयं कलत्रभावे किल सर्वमेतत् ॥**

( बृहद्यवनजातक )

वरील श्लोकांचा विचार करितां आर्यग्रंथांत सप्तम भावावरून **विवाह,** पुरुषाचे कुंडलींत **स्त्रीचा** व स्त्रीचे कुंडलींत **पतीचा** विचार, **डाळ, दहीं, गुळ, आगमन, गमन, मूत्राशय, चोरीस गेलेलें** किंवा **हरवलेलें द्रव्य, रणांगण, युद्ध, व्यापार** इत्यादि गोष्टींचा विचार करण्यास सांगितलेलें आहे. आमचे मतें ह्या श्लोकांमध्यें जातक, प्रश्न व मेदिनीय ज्योतिष ह्या तीन निरनिराळ्या विभागांत एकाच स्थानावरून ज्या अनेक गोष्टींचा विचार होतो तें सर्व संकलित करून सांगितलें आहे. जातक किंवा प्रश्न विभागामध्यें ह्या स्थानावरून विशेषत: **विवाहसुख स्त्री** किंवा **पति** यांसंबंधानें विचार करितात. एकाद्याचें लग्न केव्हां होईल, त्यास स्त्री केव्हां मिळेल, स्त्री असल्यास वर कसा मिळेल इत्यादि गोष्टींचा विचार सप्तम भावारंभीं उदित असलेली राशि व सप्तमस्थानांत असलेले ग्रह यांवरून सर्वसाधारणपणें विचार करण्याचा प्रघात आहे. सप्तमस्थानांत असलेले ग्रह मानवी प्राण्याच्या विवाहसुखासंबंधीं बराच बोध करितात. विवाहसुखासंबंधानें विचार करते वेळीं नुसत्या सप्तमस्थानाधिपतीवरून पुरुषाचे कुंडलींत भार्येचें रूपरंग वर्णन वगैरे सर्व नीट समजेल असें सांगवत नाहीं. **शुक्र** हा विषयसुखाचा कारक असल्यामुळें तो कोणत्या राशीमध्यें आहे, कोणत्या ग्रहानें शुभसंबंधित आहे ह्याही गोष्टींचा विचार केला पाहिजे. युरोपीय ज्योतिर्विद चंद्र हा ज्या ग्रहाबरोबर दृष्टियोग करण्यास जात असतो त्याप्रमाणें स्त्रीचे स्वभाव, रूप, रंग दर्शवितो, असें प्रतिपादन करितात व ह्या त्यांच्या म्हणण्यांत तथ्यांश आहे असें स्वानुभवावरून वाटतें. पुरुषाचे कुंडलींत विवाहग्रंथीसंबंधानें विचार करते वेळीं **सप्तमस्थान, सप्तमाधिपति, शुक्र** व **चंद्र** यांचा पूर्ण विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणें पुरुषाचे कुंडलींत सप्तमस्थानावरून स्त्रीचा विचार करण्यास सांगितला आहे. तो कोणत्या स्त्रीचा



असा प्रश्न साहजीकच पुढें येतो. ज्यांचे अनेक विवाह होतात त्यांच्या सर्व स्त्रिया गुणानें, रूपानें सारख्याच असतात असें म्हणतां येत नाहीं. कित्येकांस प्रथम भार्येपासून सुख मिळत नाहीं तर ह्याचे उलट द्वितीय कुटुंबापासून चांगलें सुख मिळतें. ह्या सर्व गोष्टीचा खुलासा सप्तमस्थानावरून होतो किंवा काय असे अनेक प्रश्न सहज विचारी ज्योतिषविद्यार्थ्यांपुढें उभे राहतात. सदरहु संबंधानें आर्यग्रंथांत कोठेंच खुलासा केलेला आढळत नाहीं. यूरोपीय ज्योतिर्विद प्रथम स्त्रीचा विचार सप्तमस्थानावरून, द्वितीय स्त्रीचा विचार त्या स्थानापासूनचे तृतीय स्थानावर म्हणजे कुंडलीचे नवमस्थानावर, तृतीय पत्नीचा एकादशस्थानावर, चतुर्थ पत्नीचा विचार लग्नावर ह्याप्रमाणें करण्यास सांगतात व ह्याचे मदतीस चंद्र कोणकोणत्या ग्रहाबरोबर कसे दृष्टियोग करण्यास जात आहे वगैरे गोष्टींचा विचार करितात. चंद्राचे दृष्टियोगासंबंधें प्रथम दृष्टियोग प्रथम स्त्रीचा स्वभाव, द्वितीय दृष्टियोग द्वितीय स्त्रीचा स्वभाव ह्या क्रमानें घेतात. सदरहू वर दर्शविलेल्या विचारांचा वाचकवर्गानीं अनुभव घेऊन पाहावा. वर दर्शविल्याप्रमाणें पुरुषाचे विवाहग्रंथीसंबंधानें यूरोपीय ज्योतिर्विदांचें मत सांगितलें. आतां आपण स्त्रियांस भर्तृसुख किंवा पतिसुख कसें मिळेल यासंबंधानें सदरहू विद्वानांचें व आर्यग्रंथकारांचें काय मत आहे या गोष्टींचा विचार करूं. जातकामध्यें स्त्रीजातक व पुरुषजातक असे दोन भिन्न विभाग आहेत. पुरुषजातकासंबंधीं आर्यग्रंथांत पुष्कळच उहापोह झालेला आहे परंतु स्त्रीजातकाचा तशा तऱ्हेनें स्पष्ट उहापोह झालेला आमच्या पाहण्यांत नाहीं. प्रत्येक आर्यग्रंथांत स्त्रीजातक विभागावर स्वतंत्र असे कांहीं श्लोक दिलेले आढळतात परंतु तेवढ्यानें स्त्रियांच्या आयुष्यामधील होणाऱ्या सर्व गोष्टींचा बोध होतो असें आम्हांस वाटत नाहीं. निदान सप्तमस्थानासंबंधानें तरी स्त्रीजातकामध्यें स्वतंत्र विचार खुलासेवार केलेला आढळत नाहीं. स्त्रीकुंडलीवरून पतीचा विचार करते वेळीं सप्तमस्थग्रह, सप्तमाधिपति व चंद्र ह्यांवरून विचार करावा असें आर्यज्योतिर्विदांचें मत आहे. हें मत चुकीचें आहे असें म्हणण्याचा आमचा मानस नाहीं. परंतु

ह्याहीपेक्षां आणखी कांहीं गोष्टींचा विचार भर्तृसुखाचा विचार करतेवेळीं केला पाहिजे असें आम्हांस वाटतें. यूरोपीय ज्योतिर्विदांचे मतें स्त्रीकुंडली-संबंधीं विचार कर्तव्य असतां रविसंबंधानें विशेष लक्ष दिलें पाहिजे व हें त्यांचें म्हणणें पुष्कळ अंशानें खरें आहे. स्वानुभवावरून पाहतां स्त्रियांचे कुंडलीचा भर्तृसुखासंबंधीं विचार करते वेळीं **रवि** व **मंगळ** ह्या दोन ग्रहांस विशेष प्राधान्य द्यावें असें आमचें मत आहे. स्त्रीकुंडलींत सप्तमांत पापग्रह नसून किंवा सप्तमस्थानाधिपति बलवान असूनही फक्त कुंडलींत रवि हा हर्शलनें किंवा शनीनें पीडित म्हणजे **रवि** या दोन ग्रहांबरोबर अशुभ दृष्टि-योग करीत असतां लौकर वैधव्ययोग किंवा नवऱ्यापासून निराळें राहण्याचा प्रसंग किंवा मुळीं वैवाहिक सुख नसणें अशा गोष्टी पाहण्यास मिळतात. स्त्रीकुंडलींत **मंगळ** पीडित असतां लग्न होण्यास फार कष्ट व दीर्घ काळ लागलेला पाहण्यास मिळतो. सदरहूप्रमाणें स्त्रीकुंडलींत ह्या दोन ग्रहांचें विशेष प्राधान्य कां असावें ह्यासंबंधानें चर्चा करण्याचें कारण दिसत नाहीं. कारण स्त्रीवर्गास मिळणारीं सर्व सुखें पुरुषवर्गाकडूनच मिळावयाचीं असल्या-कारणानें असाच कांहीं तरी सृष्टिनियमाप्रमाणें ज्योतिषशास्त्रांत विचार झाला पाहिजे. पुरुष व स्त्री हीं दोघें मिळून एक विश्वांतील घटक बनतो, एकाची उत्क्रांति दुसऱ्याच्या सान्निध्यानें झालेली पाहण्यास मिळते. एकांत जें कमी असतें तें दुसरा आपल्या मधील गुणानें भरून काढून विश्वाचें रहाटगाडगें सुरळीत व सुयंत्रित चालवीत आहे. ज्याप्रमाणें पुरुषास स्त्रीची त्याचप्रमाणें स्त्रीस पुरुषाची आर्थिक व धार्मिक उन्नतीकरितां मदतीची अत्यंत जरूर आहे. म्हणूनच पुरुषाचे कुंडलींत स्त्रीसुखासंबंधानें विचार करते वेळीं **चंद्र** व **शुक्र** व स्त्रीचे कुंडलींत विचार करते वेळीं **रवि** व **मंगळ** यांचा विचार केला पाहिजे.

**यूरेनस-हर्शल** किंवा **प्रजापति** हा ग्रह विवाहसुखास विशेष अनुकूल नाहीं त्यामुळें स्त्रियांचे कुंडलींत रवि जेव्हां ह्या ग्रहानें पीडित असतो त्या वेळीं विवाहसुखामध्यें विचित्र अनुभव आलेले पाहण्यास मिळतात. योग्य



भार्या किंवा योग्य पति ह्यासंबंधानें निवड करण्यासंबंधीं आर्यग्रंथांत वर्णन केलेलें **घटित प्रकरण** किंवा **गुणमेळ विचार, इष्टानिष्ट मंगळ** वगैरे संबंधीं सविस्तर विचार आम्हीं आमच्या **विवाहप्रदीप** पुस्तकांत प्रसिद्ध केले आहेत ते पाहावेत. नुसतें गुणमेलन किंवा घटित पाहण्यानें वधुवरांची योग्य निवड होईल असें आम्हांस वाटत नाहीं व आर्यग्रंथांत वर्णन केलेलें हें प्रकरण अपुरें आहे असा आमचा समज आहे.

सप्तमस्थानाचा व डाळ, दहीं, गुळ यांचा काय संबंध आहे तो आमच्या लक्षांत येत नाहीं. सप्तमस्थानावरून खाण्याचे पदार्थांचा विचार होतो असें वाटत नाहीं. ह्या वस्तूचा द्वितीय श्लोकांत वणिक क्रिया किंवा क्रयविक्रय या अर्थानें संबंध असल्यास नकळे सप्तमस्थानावरून व्यापार–विशेषत: **भागीचे धंदे** किंवा व्यवहार यांचा चांगला बोध होतो. सप्तमांत असलेले ग्रह भागीदारांसंबंधीं किंवा पातिदारांसंबंधीं फळें दर्शवितात व ह्या दृष्टीनें हें फार महत्वाचें आहे. आपण भागीनें व्यवहार केले असतां कसें होईल या संबंधानें विचार करतेवेळीं ह्या स्थानाचा अवश्य विचार केला पाहिजे. **तुला** राशि व सप्तम स्थान यांचा निकट संबंध असल्यामुळें तुला राशीप्रमाणें या स्थानाचा **मूत्राशय** किंवा **मूत्रपिंड** यांवर अंमल असल्याचें पाहण्यास मिळतें.

कित्येक ज्योतिर्विद सप्तमस्थानावरून प्रवास यात्रा इत्यादि गोष्टींचा विचार करावा असें जोरानें प्रतिपादन करितात परंतु आमचे मतें सर्वार्थचिंतामणि-कारानें 'आगमगमनम्' ह्मणून जें पद उपयोगांत आणलें आहे त्याचा नुसता लौकिकार्थ येणेंजाणें एवढाच घेऊन न चालतां मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिषामध्यें या स्थानामध्यें शत्रूचें चालून येणें किंवा जाणें असा जो सप्तमस्थानावरून विचार करण्यास सांगितलेलें आहे या दृष्टीनें विचार करावा. कुंडलीचे सप्तमस्थानावरून मेदिनीय ज्योतिषांत परराष्ट्रावरील दळणवळण, शत्रूचें चालून येणें किंवा जाणें, युद्ध इत्यादि गोष्टींचा विचार करितात प्रश्नज्योतिषामध्यें या स्थानावरून चोरीस गेलेलें द्रव्य, आपला प्रतिस्पर्धी द्वंद्वयुद्धांत किंवा वादांत, कोर्टांतील खटले, कज्जे, भांडणें वगैरे गोष्टींसंबंधानें विचार करण्याची पद्धति आहे.

जरी जातकवियोगामध्यें सप्तमस्थानावरून स्त्री किंवा पतिसुखासंबंधानें किंवा विवाहसुखासंबंधानें विचार होतो तरी त्याचबरोबर ह्या स्थानावरून भागीचे व्यवहार, आपले भागिदार, आपले प्रतिस्पर्धी किंवा ह्या दृष्टीनें उघड शत्रु, कोर्टांतील दावे, कज्जे, भांडणें यांचा विचार करावा. प्रवासासंबंधानें ह्या स्थानावरून कितपत विचार होतो यासंबंधानें शंका वाटते. कुंडलींतील १–४–७–१० हीं केन्द्र व चर स्थानें असल्यामुळें ह्या भावारंभीं चरराशि मेष, कर्क, तुला, किंवा मकर उदित असून सप्तमांत ह्या राशींचे बुध, चंद्र, रवि किंवा हर्शल असतां पुष्कळ प्रवास होणें संभवनीय आहे. याचा जलपर्यटणें किंवा लांबचे प्रवास या दृष्टीनें विचार कर्तव्य असतां नवमस्थानाचा विशेष संबंध आहे. व रेलवेचे प्रवास, जवळपासचे प्रवास, खुषकीचे प्रवास ह्यांसंबंधानें तृतीय स्थानाबरोबर संबंध असल्याचें यूरोपीय ज्योतिर्विदांचें मत आहे व हें मत पुष्कळ अंशीं ग्राह्य आहे.

सप्तमस्थानांत रवि असतां सर्व प्रकारचे कायद्यांसंबंधीं व्यवहार, खटले, दावे यांत यश दर्शवितो व बहुशः अशा माणसांचीं पंचामार्फत निकाल लावून घेण्याची प्रवृत्ति दर्शवितो. सप्तमस्थानांतील पीडित चंद्र स्त्रियांसंबंधीं त्रास, शत्रुत्व, कोर्टांतील कज्जापासून भानगडी व त्या संबंधीं अपयश, व तोटा दर्शवितो, अशा लोकांनीं शक्य तेवढें ह्या व्यवहारापासून दूर राहावें. सप्तमस्थानांतील बुध क्षुल्लक कारणाकरितां भांडणें, कज्जे व खटले दर्शवितो. सदरहू मंडळींनीं वकील, सालीसिटर वगैरे मंडळीपासून शक्य तेवढें दूर राहावें. सप्तमस्थानांत शुक्र हा सर्व प्रकारचे भागीचे व्यवहारांत लाभ, कोर्टांतील कज्जामध्यें यश दर्शवितो. सप्तमस्थानांत मंगळ हा कोर्टांतील कज्जे भागीचे व्यवहार ह्यांमध्यें त्रास, तोटा दर्शवितो. सप्तमांतील मंगळ असलेल्या लोकांचे कोर्टांतील व्यवहार सरळ व सुरळीत रीतीनें पार न पडतां त्यामध्यें हजार भानगडी उत्पन्न होतात. सप्तमस्थानांतील गुरु भागीचे व्यवहार, कोर्टांतील खटले या सर्वांमध्यें यश दर्शवितो. सप्तमात शनि किंवा हर्शल भागीचे व्यवहारामध्यें लाभ दर्शवीत नाहीं. शनीमुळें दिर्घ काळ टिकणारें शत्रुत्व होतें. हर्शलमुळें अनोळखी लोकांबरोबर शत्रुत्व व त्यांपासून त्रास पाहण्यास मिळतो.

॥ श्रीसद्‌गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला.

आप्राचः कामरूपाद्‌द्रुहिणसुतनदप्लाविताद्‌प्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रीद्रघुवररचिताद्‌चसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष २ रें. | मार्च १९१७. | अंक १२ वा.

## समारोप.

चालू महिन्याचा अंक हा बारावा असून ह्या अंकानें आम्हीं आमच्या वाचकांच्या दुसऱ्या वर्षाचे ऋणांतून मुक्त होणार आहोंत. चालू सालीं मालेंत कोणकोणते विषय आले आहेत व आम्हीं आमचें ध्येय कशा रीतीनें शेवटास नेत आहों यासंबंधीं चार शब्द आजच्या अंकांत लिहिण्याचा आमचा मानस आहे.

फलज्योतिषशास्त्राचे ( १ ) होरा किंवा जातक ( २ ) प्रश्न ( ३ ) मुहूर्त आणि मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिष असे चार मुख्य विभाग आहेत व या सर्व शाखांचा उहापोह करण्याकरितां व सर्व ज्योतिषशास्त्राचे शाखांवर अनुभवजन्य व उत्तम ग्रंथ प्रकाशित करण्याकरितां **ज्योतिर्मालेची** संस्था अस्तित्वात आली असल्याचें आम्हीं पूर्वीच निवेदन केलें आहे. व त्याप्रमाणें झालेले पहिल्या वर्षांतील प्रयत्न आम्हीं पूर्वीच आमच्या प्रेमळ वाचकांस नमूद केले आहेतच.

चालू सालीं राष्ट्रीय ज्योतिषसंबंधानें विशेष व्यवस्थित प्रयत्न झाला असून आमचे मित्र रा. रा. **राम नारायण** यांनीं **मेदिनीय** किंवा **राष्ट्रीय-ज्योतिष** या नांवाचें पुस्तक आर्य व आंग्ल ग्रंथाधारें लिहून आजपर्यंत महाराष्ट्र भाषेंत नसलेल्या अशा एका अपूर्व ग्रंथाची भर टाकून हा विभाग बराच सुलभ केला आहे. व हल्लींच्या अशा महागाईचे काळीं देखील सदरहु ग्रंथ आम्हीं प्रकाशित करून शक्य तेवढ्या कमी किंमतीस मालेच्या आश्रयदात्यांस दिला आहे.

जातकविभागासंबंधीं दुसरा फार महत्वाचा निबंध **'ग्रहांचें बल कसें पाहतात ?'** हा **राम नारायण** यांनीं लिहिला असून तो फारच मार्मिक झाला आहे. वरील लेखांत आर्य व यूरोपीय ज्योतिर्विद ग्रहांचे बला-संबंधानें कसा विचार करितात यासंबंधानें फारच स्पष्ट विवेचन केलेलें आहे. अशा तऱ्हेचा सांगोपांग विचार केलेला निबंध ज्योतिष वाङ्मयांत प्रसिद्ध करण्याचा पहिला मान ज्योतिर्मालेस रा. **राम नारायण** यांनीं आणून दिला याबद्दल आम्हीं त्यांचे सर्व ज्योतिष विद्यार्थ्यांच्या वतीनें आभार मानतों. चालू सालांतील नवीन माहितीसंबंधानें पाहतां **होरा, नेपच्युन** अथवा **वरुण** व **नाक्षत्र गोचरी** यांवरील लेख स्वतंत्र असून त्यांत आजपर्यंत उपलब्ध नसलेली बरीच माहिती प्रसिद्ध झाली आहे. **भावविचारा**-वरील निबंध चालू वर्षांत पुरा करण्याचा आमचा विचार होता परंतु विषय वाढल्यामुळें व स्थलाभावामुळें सदरहु विषय चालू वर्षांत पुरा करितां येत नाहीं.

**मालेच्या** प्रेमळ आश्रयदात्यांकडून आम्हांस परिस्थितीस न डगमगता ज्योतिषशास्त्रसेवा नेटानें करण्याबद्दल जी प्रोत्साहनपत्रें येत आहेत त्याप्रमाणें आम्हीं शास्त्रसेवेचें व्रत आचरण्याचा निश्चय केला असून ज्योतिर्मालेंत पुढील वर्षापासून अनेक उत्तमोत्तम निबंध, विविधयोगांच्या कुंडल्या, कालनिर्णयसंबंधीं विचार वगैरे वगैरे गोष्टी प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे. परंतु या सर्व गोष्टी धनिकांचे व उदार आश्रयदात्यांचे हातून मिळणाऱ्या द्रव्यरूपी



मदतीवर अवलंबून आहेत. ह्यासंबंधानें विशेष सांगितलें पाहिजे असें वाटत नाहीं. असो, शेवटीं मालेच्या अल्प अवधीच्या कारकिर्दीमध्यें अनेक उत्तमो-त्तम निबंध ज्या आश्रयदात्यांमुळें, स्नेहीमंडळीमुळें व लेखकांमुळें प्रसिद्ध करण्याचा सुयोग आला त्या सर्वांचे आम्हीं अत्यंत आभारी आहोंत. शेवटीं ज्या **दिव्य शक्तीच्या** कृपाप्रसादानें चालू वर्षाचा शेवटचा अंक वाचकांस निर्विघ्नपणें हातांत देण्याचा मांगलिक सुयोग आला त्या **भगवतीस** अनन्य-भावें शरण जाऊन हा द्वितीय वर्षाचा समारोप आटपता घेतों.

*        *        *        *

**एप्रिल** सन १९१७ पासून मालेच्या तिसऱ्या वर्षास आरंभ होईल. पुढील वर्षी ज्यांना वर्गणीदार राहण्याचें नसेल त्यांनीं मार्च अखेर पर्यंत आम्हांस पत्रद्वारें कळवावें. पुष्कळ लोक आगाऊ न कळवितां व्ही. पी. चे अंक परत करून **मालेचें** विनाकारण नुकसान करितात, तेव्हां ज्यांना मासिक बंद करणें असेल त्यांनीं तसें **आगाऊ कळविण्याची मेहरबानी करावी.** ज्यांचेकडून पत्रद्वारें कळणार नाहीं ते पुढील सालीं वर्गणीदार होण्यास कबूल आहेत असें समजून रीतीप्रमाणें त्यांजकडे पहिला अंक रु. १-९ आण्यांच्या व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल.

आगाऊ वर्गणी पाठविल्यास व्ही. पी. करण्यानें होणारा विलंब वांचेल. तेव्हां ज्यांना ज्यांना शक्य असेल त्यांनीं त्यांनीं आगाऊ वर्गणी पाठवावी अशी त्यांस आमची नम्र विनंति आहे. वर्गणी एप्रिल १५ चे पूर्वी आम्हांस मिळेल अशा बेतानें पाठवावी म्हणजे व्ही. पी. करतांना घोटाळा होणार नाहीं.

*        *        *        *

**मालेचे** अंक नियमित वेळीं—प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत प्रसिद्ध करून वर्गणीदारांकडे वेळच्या वेळीं पाठविण्याबद्दल शक्य तेवढा प्रयत्न

करण्यांत येत आहे. परंतु चालू व मागील महिन्यांचा अंक छापखान्याच्या व आमच्या अडचणीमुळें वेळेवर प्रसिद्ध करितां आला नाहीं. करितां आमचे आश्रयदाते मालेवर न रागावतां पूर्वीप्रमाणेंच प्रेम करतील अशी आशा आहे. मालेचा प्रत्येक अंक शक्य तेवढी काळजी घेऊन वर्गणीदारांकडे रवाना करण्याचें काम आम्हीं फारच आस्थेनें करीत आहोंत परंतु दर महिन्यास बरेच अंक पोष्टांत गहाळ होतात. यासंबंधांत आम्हीं पोष्टाकडे वारंवार तक्रारी करीत आहोंत. त्या संबंधानें अद्यापी पोष्टाकडून व्हावा तसा चांगला बंदोबस्त झालेला दिसत नाहीं. वर्गणीदारांचा पूर्ण पत्ता व आमचा पूर्ण पत्ता अंकावर असतांही अंक कोठें गडप होतात याचें आश्चर्य वाटतें. एखाद्या वर्गणीदारास वेळेवर अंक न मिळाल्यास चार पांच दिवस वाट पाहून आम्हांस पत्र लिहावें म्हणजे अंक पुनः पाठविण्याची व्यवस्था केली जाईल. प्रत्येक वर्गणीदाराला मालेचा अंक अगदीं वेळेवर मिळावा अशी आमची फार इच्छा आहे व त्यासंबंधानें शक्य तेवढे आमचे प्रयत्न चालू आहेत. पुष्कळ वर्गणीदार आपले पत्ते बदललेले कळवीत नाहींत व त्यामुळेंही त्यांस अंक वेळेवर मिळत नसतील. करितां वर्गणीदारांनीं पत्ते बदलले असतां आम्हांस व पोष्टास तावडतोब कळविण्याची कृपा करावी. पत्रव्यवहार करते वेळीं वर्गणीदार लोक आपलें नांव, पत्ता किंवा रजिष्टर नंबर स्पष्ट व सुवाच्य लिहीत नाहींत करितां त्यांस निदान पत्ता सुवाच्य लिहिण्याबद्दल आमची नम्र सूचना आहे. त्याचप्रमाणें सर्व पत्रव्यवहार प्रीपेड असून उत्तराकरितां ८६ आण्याचें पोष्टाचें तिकीट असावें. तिकीटाच्या अभावीं उत्तर देण्यांत येणार नाहीं. सर्व प्रकारचा पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

**म्यानेजर–ज्योतिर्माला ऑफिस**
**दादर, मुंबई नं. १४.**



# भावविचार.

( अंक ११ वरून चालू )

**अष्टम भाव—**

**“ मरणार्ज्जीवितमरणं गुह्यस्थानं च मरणहेतुं च ॥**
**अन्नसुखं भृतिदंशं परिभवमपि चिंतयेत् प्राज्ञः ॥”**

( सर्वार्थ चिन्तामणिः )

**“ मृत्यौ चिरंतनं द्रव्यं मृतवित्तं रणो रिपुः ।**
**दुर्गस्थानं मृतिर्नष्टं परिवारो मनोव्यथा ॥”**

( ता. निळकंठी )

सर्वार्थ चिंतामणीकाराचे मतानें कुंडलीच्या अष्टमस्थानावरून आयुष्य, मरण, गुह्यस्थान-गुह्येंद्रियें, मरणाचें कारण, अन्नसुख, सर्पादिकांचे दंश, पराभव वगैरे गोष्टींचा विचार करण्यास सांगितलें आहे परंतु यवनाचार्य व इतर यवन ग्रंथांपासून मिश्रित ग्रंथामध्यें ह्या स्थानावरून प्राचीन द्रव्य, मृताचें द्रव्य मृत्युपत्रामुळें मिळणारें धन किंवा एखादा मनुष्य मेल्यानें वारसा रूपानें मिळणारें धन, युद्ध, शत्रु, किल्ले, मरण, परिवार, मनोव्यथा नदीचे पार उतरून जाणें वगैरे गोष्टींचा विचार करण्यास सांगितलें आहे.

आर्य ज्योतिर्विदांचा ह्या स्थानावरून सर्वसाधारणपणें मृत्यूविषयीं विचार करण्याचा प्रघात आहे. ह्या स्थानांत असलेले ग्रह अगदींच निरुपयोगी आहेत व ते सर्व गोष्टींस प्रतिकूल आहेत असें मानण्याचा प्रचार पुष्कळ ज्योतिर्विदांमध्यें आढळण्यांत येतो परंतु ही त्यांची भ्रामक कल्पना आहे असें आम्हांस वाटतें. ज्याप्रमाणें अष्टमस्थानावरून मृत्यूचा विचार करण्यास सांगितलें आहे त्याचप्रमाणें अष्टमस्थानावरून दुसऱ्या कित्येक चांगल्या गोष्टींचा विचार होत असतो ही गोष्ट त्यांचे लक्ष्यांत मुळींच नसते असें म्हणावें लागतें. अष्टमस्थानावरून गुप्त धन, आकस्मिक प्राप्त होणारा द्रव्यलाभ किंवा प्राचीन धन, बायकोकडून किंवा नवऱ्याकडून मिळणारा द्रव्य-

लाभ-हुंडा यांचा चांगला बोध होतो. **प्रश्नज्योतिषांत** ह्या स्थानावरून मृताचें धन किंवा इस्टेट, गुप्तधन, मृत्यु, हुंडा, द्वंद्वयुद्धामध्यें प्रतिस्पर्ध्याचा साह्यक, भागीदाराची सांपत्तिक स्थिति वगैरे गोष्टींचा विचार करण्यास सांगितलें आहे.

अष्टम भावारंभीं उदित असलेली राशि, अष्टमांत असलेले ग्रह व अष्टमेश ह्यांवरून मृत्यु कोणत्या तऱ्हेचा, कसा व केव्हां होईल यासंबंधानें बरीच कल्पना करितां येते. जन्मकुंडलीवरून दिनवर्षपद्धतीनें, दशा किंवा इतर कोणताही भविष्यकाळी निर्णय करण्याच्या प्रकारावरून मृत्यु अमुक वेळीं येईल असें सागतां येईल किंवा नाहीं किंवा मृत्यु मुळींच अज्ञेय आहे ह्यासंबंधानें पुढें एखादे प्रसंगीं आम्हीं आमचे विचार **मालेच्या** वाचकांपुढें मांडणार आहोंत. थोडक्यांत म्हणावयाचें असतां या स्थानावरून मृत्यु किंवा तत्संबंधीं सर्व गोष्टींचा स्पष्ट बोध होतो असें आम्हांस वाटतें. वृश्चिक राशि व **अष्टमस्थान** यांचा अति निकट संबंध असल्यामुळें वृश्चिकराशीनें दर्शविलेल्या **अवयवासंबंधीं** विकार झालेले पाहण्यास मिळतात. बहुशः अष्टमस्थानांतील खल ग्रह ते ज्या राशीमध्यें असतात तद्योतक अवयवासंबंधीं रोग, किंवा गुह्येंद्रियासंबंधीं विकार दर्शवितात. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें कोणत्याही गोष्टीचा विचार करण्यापूर्वी नुसत्या एकाच गोष्टीवरून आपलें मत बनविणें कधींही चांगलें नाहीं त्याकरितां कुंडलींतील इतर ग्रहस्थितीचाही अवश्य विचार केला पाहिजे. खालीलप्रमाणें षष्ठस्थानांत ग्रह असता अनुभव पाहण्यास मिळतो.

**रवि** अष्टमांत असतां साधारणपणें आयुष्याचा मधला काळ आणीबाणीचा किंवा कष्टकारक असतो; व ह्या स्थानांत रवि पापग्रहानें-मंगल, हर्शल, शनीनें-पीडित असतां-केंद्र, युति, किंवा पूर्ण दृष्टियोग करीत असतां मृत्यु अपघातानें किंवा आकस्मिक रीतीनें येतो. अष्टमस्थानांत रवि पीडित असतां हृदयजन्यविकार Heart Disease, किंवा वंशपरंपरेनें होणारे रोग दर्शवितो. जन्मकुंडलीमध्यें अष्टमांत रवि असून तो जन्मकालीन चंद्राबरोबर



अशुभ दृष्टियोग करीत असल्यास नेत्रविकार झालेले पाहण्यास मिळतात व या माणसांची प्रकृती इतकी नाजूक असते कीं साधारण रोजच्या दैनिक ग्रहांच्या अशुभ प्रमाणानें यांची प्रकृती बिघडलेली पाहण्यास मिळते. कित्येक कुंडल्यांत अष्टमांत रवि पापग्रहानें पीडित असतां पितृनाश बाल्यावस्थेंत झालेला पाहण्यास मिळतो व स्त्रियांचे कुंडलींत या स्थानांतील पीडित रवि भर्तृसुख कमी दर्शवितो. अष्टमांत रवि शुभदृष्ट किंवा शुभसंबंधित असून राशिबळी असतां वारसामुळें द्रव्यलाभ होतो. साधारणपणें विचार करितां अष्टमस्थानांत रवि बळवान आढळत नाहीं. परंतु शुभसंबंधित व राशिबळी असलेला या स्थानामधील रवि बहुशः लग्नामुळें सांपत्तिक लाभ, भागीदाराचे व्यवहारामध्यें लाभ दर्शवितो अशा माणसांनीं स्वतंत्र धंदा करण्यापेक्षां दुसऱ्या कोणाबरोबर भागीचा व्यवहार करावा.

अष्टमस्थानांत **चंद्र** असतां मृत्यु बुडण्यानें, सार्वजनिक अपघातामध्यें किंवा रस्त्यामध्यें पुष्कळ लोकांसमक्ष होतो अष्टमांत चंद्र मंगळानें पीडित असतां मृत्यु अपघातानें किंवा भयंकर रीतीनें होतो. शनीनें पीडित असतां अति क्लेशकारक रीतीनें, दीर्घकाल टिकणाऱ्या रोगानें किंवा विलम्बी रोगानें होतो. हर्शल किंवा प्रजापतीनें पीडित असतां मृत्यु चमत्कारिक रीतीनें व आकस्मिक होतो. नेपच्युन किंवा वरुणानें पीडित असतां पाण्यापासून अपघात होतात. अष्टमांत चंद्र शुभदृष्ट व बलवान असतां स्त्रियांकडून लाभ किंवा मातुलपक्षाकडून वारसा मिळतो. पुरुषाचे कुंडलींत अष्टमस्थानांत पीडित असलेला चंद्र मातृसुख बाळपणीं नष्ट झालेलें दर्शवितो किंवा स्त्रीचा मृत्यु लवकर झालेला आढळतो. स्त्रियांच्या कुंडलीमध्यें अष्टमस्थानांत चंद्र बलवान असतां संतति पुष्कळ झालेली पाहण्यास मिळते परंतु चंद्र निर्बली असतां किंवा पीडित असतां कांहीं संततीचा नाश होतो. अष्टमस्थानांत चंद्र पीडित असतां आयुष्यामधील ७-१४-२१-२८-, ३५, ५२, ४९ व ५६ हीं वर्षें देहकष्टांत व त्रासांत जातात.

अष्टमस्थानांत **मंगळ** असतां अपघातानें किंवा भयंकर तऱ्हेनें मृत्यु होतो.

अष्टमांत मंगळ पापग्रहानें पीडित असतां फारच वाईट जाणावा. नुसता अष्टमांतील मंगळ इतका आयुष्यविघातक आढळत नाहीं. अष्टमांत मंगळ असलेल्या माणसांचा मृत्यु मग तो केव्हांही येवो अकस्मिक, अपघातानें किंवा फारच थोडा काळ टिकणाऱ्या दुखण्यांत होतो. अष्टमांत मंगळ **जलराशीचा**—कर्क, वृश्चिक व मीन—असतां मृत्यु बुडण्यानें येण्याचा संभव विशेष आढळतो. **अग्निराशींत**—मेष, सिंह किंवा धनु—असतां मृत्यु अग्नीमुळें किंवा अपघातानें होण्याचा पुष्कळ संभव असतो. **वायुराशींत**—मिथुन, तुळ किंवा कुंभ—असतां मानसिक दुर्बलतेमुळें किंवा मानसिक विकारामुळें होतो. अष्टमांत मंगळ **पृथ्वीराशीचा**—वृषभ, कन्या व मकर—असतां अशुभ फळें विशेष अनुभवास येत नाहींत. अष्टमांतील मंगळ सांपत्तिक सुखाचा बराच विघातक असलेला पाहण्यास मिळतो व बहुशः असल्या माणसास लग्नानंतर बऱ्याच सांपत्तिक अडचणी येतात.

अष्टमस्थानांत **बुध** पीडित असतां मज्जातंतुसंबंधीं विकार किंवा मानसिक दुर्बलता दर्शवितो व बहुशः मृत्यु त्यामुळें येतो. या स्थानांत बुध निर्बली आढळतो. या स्थानांत बुध हर्शल, मंगळ शनीनें पीडित नसावा. या स्थानांतील बुध साधारण सांपत्तिक अडचणी किंवा चिंता दर्शवितो.

अष्टमस्थानांत **गुरु** असतां मृत्यु शांतपणानें व सुखानें आलेला पाहण्यास मिळतो. अष्टमांत गुरु पीडित असतां हृदयविकार व रक्तदोष, विषजन्य रक्तविकार, रक्तांत विषदोष ( Blood-poisoning ) होऊन मृत्यु येतो. त्याचप्रमाणें कित्येक वेळां श्वासनस, क्षय, किंवा घातुक आवाळू होऊन मृत्यु येतो. ह्या स्थानांत गुरु पीडित नसून राशिबळी व शुभसंबंधित असतां लग्नानंतर सांपत्तिक भरभराट, मृत्युपत्रामुळें वारसा, बापकोकडून चांगला हुंडा किंवा सांपत्तिक लाभ, भागिदारापासून लाभ, मृतामुळें विम्याची रक्कम मिळणें किंवा मृतमनुष्याची इस्टेट मिळणें वगैरे गोष्टी घडलेल्या पाहण्यास मिळतात.



अष्टमांत **शनि** असतां दीर्घकाळ टिकणाऱ्या व पुष्कळ वेळां बरा न होणाऱ्या जीर्ण विकारानें मृत्यु येतो. अष्टमस्थानांत शनि जलराशीचा—कर्क, वृश्चिक व मीन—असून पीडित असतां मृत्यु बुडून येण्याचा संभव असतो व ह्या माणसास अपघातांची विशेष भीती असते.

अष्टमांत शनि राशिबळी व शुभसंबंधित असतां आयुर्मर्यादा चांगली आढळते व मृत्यु म्हातारपणांत होतो. अष्टमांतील शनि मृत्युपत्रामुळें किंवा हुंडा वगैरेमुळें सांपत्तिक लाभ विशेष दर्शवीत नाहीं. उलट ह्यासंबंधानें पुष्कळांची निराशा झालेली पाहण्यास मिळते.

अष्टमांत **शुक्र** असतां मृत्युमुळें लाभ झालेले पाहण्यास मिळतात; भागिदारापासून लाभ, मृत्युपत्रापासून लाभ, स्त्रीधन, स्त्रियांकडून लाभ होतो. अष्टमांत शुक्र बलवान असलेल्या मंडळीची तिशीनंतर किंवा लग्न वगैरे होऊन संसार थाटण्यानंतर भरभराट झालेली पाहण्यास मिळते. ज्यांचे अष्टमांत बलवान शुक्र—राशिबळी व शुभदृष्ट असेल त्यांनीं आपल्या शक्य तेवढ्या वस्तूंचा—घरदार आयुष्य वगैरेंचा विमा उतरावा कारण या लोकांस विम्यापासून लाभ होतो. अष्टमांत शुक्र असतां मृत्यु शांतपणानें व सुखानें येतो. परंतु अष्टमांत शुक्र पीडित असतां मृत्यु मधुमेहानें, मूत्रपिंडांचे विकृतीमुळें, मेदविकारानें, किंवा विषयातिरेकानें किंवा चैनीमुळें झालेला पाहण्यास मिळतो.

अष्टमस्थानामध्यें **हर्शल** किंवा **प्रजापति** असतां अर्धांगवायु, अपस्मार, भयंकर रीतीनें मज्जातंतूंचा क्षोभ होऊन, विलक्षण रीतीनें किंवा आकस्मिक तऱ्हेनें मृत्यु होतो. मृत्युपत्रामुळें किंवा मृतासंबंधीं त्रास, सांपत्तिक अडचणी वगैरे प्राप्त होतात. या स्थानांत हर्शल शुभसंबंधित असतां अनेक तऱ्हेचे आकस्मिक लाभ होतात. अष्टमांत हर्शल असलेल्या माणसांनीं शस्त्रक्रियेसंबंधीं सावध रहावें. त्याचप्रमाणें जेथें विशेष गर्दी होण्याचा संभव असेल तेथें जाऊं नये.

अष्टमस्थानांत **नेपच्यून** किंवा **वरुण** असतां पाण्यापासून अपघात,

चमत्कारिक तऱ्हेनें मृत्यु होण्याचा संभव असतो. अष्टमांत नेपच्युन असतां मृत्युपत्रामुळें किंवा लग्नामुळें, स्त्रीकडून सांपत्तिक लाभ होण्याची फार थोडी आशा असते. अष्टमांत नेपच्युन असतां सांपत्तिक स्थितीमध्यें घोंटाळे किंवा मृत्युपत्रामुळें मिळणाऱ्या वारसामध्यें मिळणाऱ्या द्रव्यामध्यें बरेच घोंटाळे किंवा भानगडी झालेल्या पाहण्यास मिळतात. अष्टमांत नेपच्युन असलेल्या माणसांनीं औषध वगैरे घेण्यासंबंधीं विशेष दक्ष असावें, त्याचप्रमाणें कोणतेही प्रयोग हिपनाटिझम वगैरे संबंधीं आपल्यावर करूं देऊं नयेत.

असो येथपर्यंत अष्टमस्थानावरून मृत्यु, मरणाचें कारण, मृताचें द्रव्य किंवा मृत्युपत्रामुळें मिळणारें द्रव्य वगैरे गोष्टींचा साधारण विचार केला. परंतु अष्टमस्थानावरून अन्नसुख, पराभव वगैरे गोष्टींचा काय संबंध आहे तें कळत नाहीं. आर्यग्रंथांत अष्टमस्थानावरून प्राचीन द्रव्य—म्हणजे भूमिगत द्रव्यासंबंधीं विचार करण्यास सांगितलें आहे. अष्टमस्थानांत बलवान ग्रहस्थिति असतां आकस्मिक द्रव्यलाभ होतो असें कित्येक ज्योतिर्विदांचें मत आहे. मग हा द्रव्यलाभ भूमिगत असो किंवा सोडतींत, सट्यांत किंवा व्यापारांत असला तरी हरकत नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. यूरोपीय ज्योतिर्विद भूमिगत ठेवा किंवा द्रव्यासंबंधानें विचार करतेवेळीं प्रश्नज्योतिषामध्यें चतुर्थस्थानाचा विचार करितात, व हेंच मत ताजिक निलकंठीकारांस मान्य होतें असें त्यांच्या चतुर्थ भावावरून कळणाऱ्या गोष्टींसंबंधानें सांगितलेल्या श्लोकांतील **'निधि'** शब्दावरून वाटतें. त्याचप्रमाणें अमूक एका ठिकाणीं धातूची किंवा दुसऱ्या कसली खाण आहे किंवा काय अशा तऱ्हेचे प्रश्नासंबंधीं विचार कर्तव्य असतां हे सर्व प्रकार चतुर्थस्थानावरून पाहावे असें ज्योतिर्विदांचें मत आहे. चतुर्थस्थानासही आर्यग्रंथांत **पाताल** अशी संज्ञा असून जमीन वगैरे संबंधीं सर्व गोष्टींचा याच स्थानावरून विचार करण्यास सांगितलें आहे. त्यावरून पाहतां भूम्यंतरगत द्रव्यांचा विचार अष्टमस्थानापेक्षां चतुर्थस्थानावरून करावा हें विचारसरणीस धरून आहे असें वाटतें. अष्टमस्थानावरून **युद्ध, शत्रु,** किंवा **किल्ले** यांचा विचार कोठें व कसा करावा



हें सांगितलेलें आढळत नाहीं. प्रश्नज्योतिषांत अष्टमस्थानावरून आपल्या प्रतिस्पर्ध्याचे साथीदारांचा विचार करण्यास यूरोपीय वाङ्मयांत सांगितलें आहे. त्याचप्रमाणें एखाद्या गांवास किंवा किल्ल्यास वेढा पडला आहे तो केव्हां सुटेल अशासंबंधीं प्रश्न असतां चतुर्थस्थानावरून असल्या गोष्टींचा विचार करावा असें आंग्ल ग्रंथकार सांगतात.

अष्टमस्थानांत असलेले ग्रह गुप्त शास्त्रें, गूढविद्या ( occult arts ) यांची आवड दर्शवितात. यासंबंधानें आर्य ग्रंथांत कोठेंच उल्लेख आढळत नाहीं. यासंबंधीं खालील प्रमाणें आंग्ल ज्योतिर्विदांचा अनुभव आहे. मालेचे वाचक या गोष्टीसंबंधानें आपापला अनुभव आम्हांस कळवितील.

अष्टमांत **रवि** असतां गूढविद्यांची गोडी आढळते. अष्टमांत **चंद्र** असतां गूढविद्यांची आवड असते, या माणसांस सूचक स्वप्नें पडतात व अंगानें हलकी असल्यामुळें यांचे अंगात संचार लवकर होतो.

अष्टमांत **बुध** असतां गूढविद्येसंबंधी भौतिकेतर शास्त्राच्या अध्ययनाची आवड आढळते.

अष्टमांत **गुरु** असलेल्या माणसांमध्यें मरणानंतर प्राप्त होणाऱ्या स्थितीसंबंधानें विचार करणारे, गूढविद्यांमध्यें आवड बाळगणारे पुष्कळ आढळतात. व कित्येकांस पुष्कळ चमत्कारिक स्वप्नें पडतात व तीं त्यांस हुबेहुब जशीच्यातशीं जागृत अवस्थेमध्यें दुसऱ्यांस सांगतां येतात.

अष्टमांतील **शनि** गूढविद्येमध्यें आवड दर्शवितो परंतु ह्या लोकांस पडलेलीं स्वप्नें दुसऱ्यास सांगतां येत नाहींत किंवा जागृत अवस्थेमध्यें आठवत नाहींत असें म्हटलें असतां अधिक सयुक्तिक होईल.

अष्टमांत **हर्शल** किंवा **प्रजापति** असलेल्या माणसांना गूढ किंवा अध्यात्म विद्यांची फारच गोडी आढळते किंवा ह्या माणसांमध्यें मरणानंतर प्राण्यांचें काय होत असेल, तीं कोठें जात असतील असल्या दृष्टीनें सतत तासचे तास विचारांत घालविणारी मंडळी बरीच आढळतात. व ह्या

आहे. नवमांत अशुभ ग्रहस्थिति असतां किंवा नवमामध्यें रवि, चंद्र पीडित असतां मानसिक त्रास, चित्तक्षोभ होतो.

यूरोपीय ग्रंथांमध्यें या स्थानावरून दूर देशाचे, लांबचे, किंवा जलप्रवास संबंधीं विचार करण्यास सांगितलें आहे त्याचा विचार मागील्या वाचकांनीं करावा.

## दशमस्थान.

"दशमात्यवृत्तिमाज्ञां कीर्तिं वृष्टिं प्रवासपूर्तादीन् ।
मानं कर्माजीवं जानुस्थानं च निर्दिशेद्दासान् ॥"

(स चि.)

"ज्योतिर्मुद्रां परं पुण्यं राज्यं वृद्धिं च पैतृकं"

(ता. नी.)

दशमस्थानावरून विशिष्ट धंद्यासंबंधीं आवडनावड, आज्ञा, **कीर्ति** वृष्टि; **प्रवास**; देऊळ, धर्मशाळा, तळें, अन्नदान इत्यादि **धर्मकृत्तें मानसन्मान** उपजीविकेचें साधन, गुढघे, अधिकार, पुण्यकर्में, **दास**दासी, नोकरचाकर वडिलोपार्जित द्रव्य इत्यादि गोष्टींचा विचार होतो.

कुंडलींतील द्वादशस्थानांपैकीं दशमस्थान हें फार महत्वाचें आहे. ह्या स्थानांतील ग्रह मानवीप्राण्याचे सुखदुःखासंबंधीं बरेच द्योतक असतात. आणि ज्योतिर्विदांनीं ह्या स्थानास **कर्म** हें फारच अन्वर्थक नांव दिलेलें आहे. मानवीप्राणी आपल्या आयुष्यामध्यें जीं शुभाशुभ कर्में करितो त्यांचा या स्थानावरून चांगला बोध होतो व म्हणूनच शुभ ग्रह बलवान असतां त्या प्राण्याचे हातन गंगास्नानें यज्ञयागादि कृत्यें घडतात असें आर्य ग्रंथकारांनीं



वर्णन केलें आहे. जीं माणसें जगांत कतृत्ववान म्हणून नांवाजलेलीं आढळतात त्यांचें दशमस्थान बलवान नाहीं, दशमांत बलवान ग्रहस्थिति नाहीं, असें कचितच आढळेल, व ह्या दृष्टीनें हें स्थान फारच महत्वाचें आहे.

दशमस्थानावरून सर्वसाधारणपणें **बापासंबंधी** सुखदुःखाची कल्पना करण्याचा प्रघात आहे. ह्या बाबतींत आर्य व युरोपीय ज्योतिर्विदांचा मतभेद असल्याचें मागेंच सांगितलें आहे. हल्लींच्या कांहीं यूरोपीय ज्योतिर्विदांस आर्य ज्योतिर्विदांचें म्हणणें मान्य आहे परंतु कांहीं त्यामध्यें थोडा बहुत फरक करून घेतात. त्यांचे मतें जर जन्मकुंडली मुलीची असेल तर तिचे कुंडलींतील दशमस्थान मातेचा बोध करिते व पुरुषाची असतां पित्याचा बोध करिते. ह्या संबंधानें अद्याप शोध होण्याची बरीच आवश्यकता आहे.

दशमस्थान व उपजीविकेचा धंदा यासंबंधानें बऱ्याच भ्रामक कल्पना पाहण्यास मिळतात. हल्लींच्या सुधारणेच्या काळामध्यें धंद्यासंबंधानें निश्चितपणें दशमस्थानावरून सांगतां येईल किंवा नाहीं—यासंबंधानें बरीच शंका वाटते. यासंबंधीं आम्हीं आमचे विचार वाचकांसमोर षष्ठम भावाचें वर्णन करतेवेळीं पूर्वींच ठेविले आहेत. दशमस्थानावरून **मान, सन्मान, कीर्ति,** किंवा जनसमाजामध्यें असलेली मानमान्यता याचा चांगला बोध होतो. खालील-प्रमाणें ग्रह दशमभावामध्यें असतां त्यांचीं फळें पाहण्यास मिळतात.

**सूर्य** दशमभावामध्यें असतां चांगल्या कुलामध्यें जन्म झालेला आढळतो, बापाची स्थिति चांगली असते, जन्मणारास मान सन्मान मिळतो, साधारण-पणें तो यशस्वी असतो, मोठ्या लोकांचा आश्रय मिळतो; बहुशा ३० वर्षांचे सुमारास ही मंडळी चांगली उदयास येतात. सूर्य बलवान असून शुभसंबंधित असतां अधिकार प्राप्त होतो, स्वतंत्र धंदा रोजगार असतो, ह्या मंडळीस राजकीय नोकरी—सरकारी नोकरी यांत अधिकार प्राप्त होतो.

परंतु रवि पीडित व निर्बळी असतां बरीच अशुभ फळें पाहण्यास मिळतील. ही मंडळी फारच गर्विष्ठ असतात, नोकरीमध्यें किंवा धंद्यामध्यें वारंवार अडचणी येतात.

**चंद्र** दशमभावामध्यें पीडित असतां अपकीर्ति, बदनामी होते; एकच धंदा किंवा रोजगार पुष्कळ दिवस टिकत नाहीं. दशमांत चंद्र बलवान व शुभसंबंधित असतां चांगला उदय सरासरी २७।२८ चे सुमारास करितो व दर ७ वर्षाचे सुमारास कांहींतरी स्थित्यंतर घडतें. दशमांतील बलवान चंद्र मान सन्मान व कीर्ति दर्शवितो. ज्यांचे दशमांत बलवान चंद्र असेल त्यांनीं सार्वजनिक गोष्टी किंवा सर्व जनतेबरोबर विशेष संबंध येईल अशा तऱ्हेचा धंदा करावा. दशमांत चंद्र–मेष, कर्क, तुला किंवा मकर ह्या चर-राशीचा असतां महत्वाकांक्षा फार असते व आयुष्यांत बऱ्याच घडामोडी होतात व हीं माणसें दीर्घोद्योगी आढळतात. दशमांत स्थिरराशीचा चंद्र–वृषभ, सिंह, वृश्चिक, किंवा कुंभेचा असतां स्थिरपणा व चिकाटीनें काम करण्याची आवड विशेष पाहण्यास मिळते. दशमांत चंद्र द्विस्वभाव–मिथुन, कन्या, धनु किंवा मीन राशीचा असतां विशेष चांगला नसतो. दशमांत चंद्र मंगळानें पीडित नसावा कारण त्यामुळें अपकीर्ति होते, सार्वजनिक कृत्यांत ठपका मिळतो, व त्यामुळें पुढील जीवितक्रमांत बऱ्याच अडचणी येतात. दशमांत चंद्र शनीनें पीडित असतां धंद्यांत नाना तऱ्हेच्या अडचणी येतात. परंतु ह्याच्या उलट दशमांत चंद्र गुरूबरोबर शुभसंबंधित असतां धंद्यांत सुस्थिति प्राप्त होते, मोठेपणा मिळतो.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचिताद्राचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. | एप्रिल १९१७. | अंक १ ला

## ईशप्रार्थना.

( श्री. रामचंद्र राजाराम मोकाशी, ठाणें. )

जी वर्तवी सतत भूत भविष्य "**माला**" ।
अज्ञानरूप करि दूर अशा तमाला ।
सांगे शुभाशुभ ग्रहा बहु काळजीनें ।
अंबे ! तिला करि चिरायु तुझ्या कृपेनें ॥ १ ॥

बाला तिला समजुनी धरुनी करानें ।
( मार्गांत कीं अडुं नये निज लेंकरानें ) ।
"तूं चालवी तिजप्रती प्रतिमासिं नेमें" ।
हें मागणें तुजसि देवि, सदैव प्रेमें ॥ २ ॥

## 'ज्योतिर्माले जयोस्तु तुजला'

( श्री. वासुदेव रामकृष्ण मुळे )

पुराणपुरुषा सुरवरादिकां
व्यासशुकादिक महर्षि लोकां,
पूज्य सम असे विमला सकलां
ज्योतिर्विद्ये नमोस्तु तुजला ॥ १ ॥

पाश्चात्यानां पौर्वात्यानां,
अज्ञानानां ज्ञानी सुजनां,
मान्यचि ज्योतिर्विद्या सकलां,
तद्बोधा करि ज्योतिर्माला ॥ २ ॥

प्रतिमासीं देउनि भेटीला,
अर्पिसि मधुर ज्ञान–सुधेला,
म्हणुनी प्रिय तूं बुध–वृंदाला,
ज्योतिर्माले जयोस्तु तुजला ॥ ३ ॥

अंबरांगणीं मेघमंडला,
देते सुद्युति विद्युन्माला,
तूं तैशी दे स्व–वाङ्मयाला,
ज्योतिर्माले जयोस्तु सुजला ॥ ४ ॥

यावच्चंद्र–दिवाकर–क्रीडा,
नभीं चालली असे अखंडा,
तावत् मिरवी धवल यशाला,
ज्योतिर्माले जयोस्तु तुजला ॥ ५ ॥

———o———



## बालस्मृति.

( लेखक राम नारायण. )

आयुर्ज्ञानाभावे सर्वं विफलं प्रकीर्तितं यस्मात् ॥
तस्मात्तज्ज्ञानार्थेऽरिष्टाध्यायं प्रवक्ष्यामि ॥

सारावली.

मनुष्याच्या कुंडलीचा विचार करतां आयुर्मान कळणें अत्यंत महत्वाचें आहे. आयुर्मान लक्षांत न घेतां केलेलीं भविष्यें उपपत्तीस कितीही धरून असलीं तरी तीं निरर्थक होतात म्हणून आयुर्मानाचा अंदाज ज्योतिष्यांस करतां आला पाहिजे. आयुर्मानाचा अंदाज झाल्यावर मग पुढील भविष्यें वर्तवणें विशेष सोईचें होईल. पण आयुर्मानाचा बरोबर अंदाज करणें ही गोष्ट सोपी नाहीं. कुंडलीवरून आयुर्मानाचे बरोबर वर्ष, महिने व दिवस काढणें हल्लींच्या ज्योतिष वाङ्मयाच्या स्थितीवरून तरी शक्य आहे असें वाटत नाहीं. मात्र मनुष्य अल्पायु आहे किंवा दीर्घायु आहे हें कुंडलीवरून सांगतां येतें. मानवी आयुष्याचे जर बाल, अल्प, मध्यम, दीर्घ व पूर्ण असे विभाग केले तर त्यांचा बोध कुंडलीवरून होण्यासारखा आहे. ( १ ) जन्मल्यापासून पहिल्या आठ वर्षापर्यंत बालायु ( २ ) आठ वर्षापासून ३२ वर्षापर्यंत अल्पायु ( ३ ) बत्तीस वर्षापासून पन्नास वर्षापर्यंत मध्यमायु ( ४ ) पन्नासापासून सत्तरवर्षापर्यंत दीर्घायु व सत्तर पासून शंभर वर्षापर्यंत पूर्णायु असे विभाग केले तर आयुर्मानाचा बोध कुंडलीवरून सहज होतो. आणि आयुर्मानाचा एवढा जरी अंदाज करतां

आला तरीसुद्धां पुष्कळच काम होण्यासारखें आहे. प्रस्तुत निबंधांत आयुर्मानाच्या पहिल्या विभागाचा म्हणजे आठ वर्षापर्यंतच्या आयुर्मानाचा विचार करावयाचा आहे. बालवयामध्यें म्हणजे आठ वर्षांच्या आंत जीं मुलें मृत्यु पावतात त्यांच्या कुंडलींत कोणते ग्रहयोग झालेले असतात याचा विचार शक्य तितक्या पूर्णतेनें करावयाचा आहे. कोणतेंही मूल जन्मास आलें म्हणजे तें बाल वयांतच मृत्यु पावेल किंवा काय याचा प्रथम विचार केला पाहिजे. जर तें मूल बालारिष्टांतून ( " अष्टौ बालारिष्टमादौ नराणां " ) वाचत असल्यास मग त्याच्या विद्याभ्यासादि प्रश्नांचा विचार. बालमृत्यू-संबंधानें विचार करावयाचा म्हणजे मृत्युकारक योग व आयुष्यवर्धक योग कोणते असतात हें समजून घेऊन कुंडलींत कोणत्या योगाचें प्राबल्य आहे हें निश्चित करतां आलें पाहिजे. मृत्युकारक योग अधिक प्रबल आहेत हें कळल्यानंतर म्हणजे बालपणांत ( आठ वर्षांच्या आंत ) मृत्यु होईल असें ठरविल्यानंतर मृत्युकालाचें अनुमान कसें करावें हा विचार नंतरचा आहे.

प्रस्तुत निबंधांत मृत्युकारक व आयुष्यवर्धक योग कोणते याचा विचार करतांना सर्वमान्य पूर्वग्रंथकारांचें म्हणणें काय आहे हें प्रथम नमूद करून त्याच्या सत्यासत्यतेविषयीं निर्णय करण्याचा प्रयत्न करूं. त्यानंतर आमचा अनुभव काय आहे हें कांहीं उदाहरणांसह सांगूं. बालमृत्यूचा नक्की काळ कोणता यासंबंधानेंही सवडीप्रमाणें विचार करूं.

बालमृत्यूसंबंधानें अनेक कुंडल्या पाहून त्यांमध्यें झालेल्या मृत्युकारक योगांच्या तत्वाची मीमांसा पूर्वाचार्यांनीं केलेली नाहीं. त्यांनीं आपल्या मता-प्रमाणें फक्त कोणते योग मृत्युकारक आहेत एवढेंच सांगितलें आहे. आतां-पर्यंत हे मृत्युकारक योग अनेक ग्रंथकारांनीं पुष्कळ सांगितले आहेत. तरी-सुद्धां त्यांवरून बालमृत्यूचा निर्णय करणें कठीण जातें व कांहीं ठिकाणीं तर अशक्य होतें; आणि याचें कारण सांगितलेल्या योगांबरहुकुम निर्णय करण्याच्या वेळीं कुंडलींत योग आढळून येत नाहींत हें होय. ही अडचण योगांची संख्या वाढवून नाहींशी होणार नाहीं, तर हे योग कोणत्या तत्वानें



होतात हें समजून घेतलें पाहिजे. हीं तत्वें जर बरोबर लक्षांत आलीं तर भाराभर नियम पाठ करण्याची आवश्यकताही नाहीं असें आम्हांस वाटतें. पूर्वाचार्यांनीं नमूद केलेले योग बालमृत्यूच्या पुष्कळ कुंडल्यांतून दिसून येत नाहींत हें खरें परंतु त्या योगांचीं तत्वें समजून घेण्याच्या कामीं त्यांचा चांगलाच उपयोग होतो असा आमचा अनुभव आहे. प्रस्तुत निबंधांत पूर्वग्रंथकारांनीं नमूद केलेले सर्वच नियम देणें शक्य नाहीं परंतु ज्या नियमावरून वाचकांस कांहीं तत्वाची ओळख होईल असेच नियम येथें देऊं. बालमृत्यूच्या नियमांची अशी निवड करण्याचें कारण एवढेंच कीं पूर्वग्रंथकारांनीं दिलेल्या नियमांपैकीं पुष्कळसे नियम उपपत्तीस सोडून, घरसोडीचे व फुगवून लिहिलेले आहेत. आमचें हें म्हणणें कांहीं वाचकांस तरी अतिशयोक्तीचें वाटेल परंतु नमुन्याकरतां म्हणून कांहीं नियम येथें देतों त्यांवरून आमच्या म्हणण्याची सत्यता वाचकांस कळून येईल.

## सारावली.

( १ ) केतुर्यस्मिन्नृक्षेऽभ्युदितस्तस्मिन् प्रसूयते योहि ॥
मासद्वयेन मरणं विनिर्दिशेत् तस्य जातस्य ॥

ज्या राशींत केतु असेल ती राशि लग्नीं उदय पावत असतां जन्म झाल्यास जन्मणाराचा दोन महिन्यानें मृत्यु होतो.

( २ ) एकः पापोष्टमगः शुक्रगृहे पापवीक्षितो वर्षात् ॥
मारयति नरं जातं सुधारसो येन पीतोपि ॥

अष्टम स्थानीं वृषभ किंवा तूळ राशीमध्यें पापदृष्ट असा एखादा पापग्रह असतांना जन्मणाऱ्यानें अमृतपान केलें तरीसुद्धां तो एक वर्षाच्या आंत मृत्यु पावतो.

( ३ ) मारयति षोडशाहात् शनैश्चरः पापवीक्षितो लग्ने ॥
लग्नीं पापदृष्ट शनि असल्यास सोळा दिवसांच्या आंत मृत्यु होतो.

( ४ ) घटसिंहवृश्चिकोदयकृतस्थितिर्जीवितं हरति राहुः ॥

लग्नांत कुंभ, सिंह किंवा वृश्चिक राशीचा राहु असेल तर (मूल) मरण पावतें.

## जातक पारिजातक.

(५) नीचं गते लग्नपतौ विलग्नात् ।
नाशं गते वा रविजे तथास्ते ॥
जातो मृतप्राय कलेवरः सन् ।
कृच्छ्रेण वैवस्वतलोकमेति ॥

लग्नीं स्वामी नीच राशींत असेल किंवा अष्टमांत असेल व शनि सप्तमांत असेल तर मूल मरणप्राय स्थितींत असून अति कष्टानें मरतें.

(६) भौमक्षेत्रगते जीवे नीचराशिगतेथवा ॥
संध्या त्रयेच संजातो मासान्मृत्युमुपैति सः ॥

गुरु मेष, वृश्चिक किंवा मकर राशींत असून संध्यासमयीं जन्म होईल तर एक महिन्यानें मृत्यु होईल.

(७) रविणा युक्तः शशिजः सौम्यैर्दृष्टो विनाशयति नूनं ॥
एकादशभिर्वर्षैर्जातं नृपतुल्यभोगसंपन्नम् ॥

रवीनें युक्त असा बुध शुभदृष्ट असतां तें मूल राजासारख्या वैभवामध्यें ११ व्या वर्षीं मरण पावतें !

वर दिलेले नियम आर्य ज्योतिषांत नांवाजलेल्या ग्रंथांतील आहेत हें वाचकांनीं लक्ष्यांत घ्यावें. हे नियम अनुभवास कितपत मिळतील यासंबंधानें फारसें लिहिण्याचें कारण नाहीं. कारण लग्नीं केतु किंवा कुंभ, सिंह व वृश्चिकराशींचे राहु असलेली मंडळी आपणांस बरीच पहावयास सांपडतात. शेवटच्या नियमांत तर ग्रंथकारानें आपल्या अनुभवाची, तारतम्याची व निरीक्षणपद्धतीची कमालच केली आहे! 'सारावली' व 'जातकपारिजातक' ग्रंथांत जर असे नियम नमूद केले आहेत तर आर्य ज्योतिषवाङ्मयांत असे पुष्कळ ग्रंथ (?) आहेत कीं ज्यांमध्यें सारासारविचार न करितां दोन



[illegible] सरासरी माहिती दिलेली असते त्या ग्रंथासंबंधानें तर [illegible]. असल्या ग्रंथांतुन बालमृतीचे नियम उद्धृत करण्यांत कांहींच तथ्य नाहीं. ज्या ग्रंथांत ग्रंथकाराची तत्वशोधकता दिसून येते अशाच ग्रंथांकडे आपणांस वळलें पाहिजे. असे आर्य ज्योतिषवाङ्मयांत दोन चार ग्रंथ आहेत. त्यांपैकीं **बृहज्जातक** हा मुख्य ग्रंथ आहे. ह्या ग्रंथांत आर्य ज्योतिर्विदांचे कुलगुरु वराह मिहिराचार्य पुढें लिहिल्याप्रमाणें बालमृतीचे नियम सांगतातः—

१

पापावुदस्तगतौ क्रूरेणयुतश्च शशी ।
दृष्टश्च शुभैर्न यदा मृत्युश्च भवेदचिरात् ॥

२

क्षीणे हिमगौ व्ययगौ पापैरुदयाष्टमगैः
केंद्रेषु शुभश्च न चेत्क्षिप्रं निधनं प्रवदेत् ॥

३

क्रूरेण संयुतः शशी स्मरांत्यमृत्युलग्नगः
कंटकाद्बहिः शुभैरवीक्षितश्च मृत्युदः ॥

४

शशिन्यरिविनाशगे निधनमाशु पापेक्षिते ।
शुभैरथ समाष्टकं दलगतश्च मिश्रैः स्थितिः ॥
असद्भिरवलोकिते बलभिरत्र मासं शुभे ।
कलत्रसहिते च पापविजिते विलग्नाधिपे ॥

५

लग्ने क्षीणे शशिनि निधनं रंध्र केंद्रेषु पापैः ।
पापांतस्थे निधनहिबुकद्यून युक्तेच चंद्रे ॥
एवं लग्ने भवति मदनच्छिद्रसंस्थेश्च पापैः ।
मात्रा सार्धं यदि च न शुभैर्वीक्षितः शक्तिभद्भिः

६

(मूल)

राश्यंतगे सद्भिरवीक्षमाणे ।
चंद्रे त्रिकोणोपगतैश्च पापैः ॥
प्राणैः प्रयात्याशु शिशुर्वियोगम् ।
अस्तेच पापैस्तु हिमांशु लग्ने ॥

७

अशुभसहिते ग्रस्ते चंद्रे कुजे निधनाश्रिते ।
जननिसुतयोर्मृत्युर्लग्ने रवौ तु सशस्त्रजः ॥
उदयति रवौ शीतांशौवा त्रिकोण विनाशगैः ।
निधनमशुभैर्वीर्योपेतैः शुभैर्न युतेक्षिते ॥

८

असित रवि शशांक भूमिजैर्व्यय नवमोदय नैधनाश्रितैः ॥
भवति मरणमाशु देहिनां यदि बलिना गुरुणा न वीक्षिताः ॥

९

सुतमदनवांत्यलग्नरंध्रेष्वशुभयुतो मरणाय शीत रश्मिः ॥
भृगुसुत शशिपुत्र देवपूज्यैर्यदि बलिभिर्न युतोवलोकितोवा ॥

१०

संध्यायां हिमदीधिति होरा । पापैर्भांत गतैर्निधनाय ॥
प्रत्येकं शशि पापसमेतैः केंद्रैर्वास विनाशमुपैति ॥

( १ ) लग्न किंवा सप्तम स्थानांत पापग्रह, चंद्र क्रूरग्रहानें युक्त व चंद्रावर शुभग्रहाची दृष्टि नसेल तर तत्काळ मृत्यु होतो.

( २ ) व्ययस्थानीं क्षीण चंद्र, लग्न व अष्टम स्थानीं पापग्रह आणि केंद्रांत शुभग्रह नसतील तर तत्काळ मृत्यु होतो.

( ३ ) पाप ग्रहानें युक्त व शुभ ग्रहानें अदृष्ट असा चंद्र ७।१२।८।१ या स्थानांत असून केंद्रांत शुभ ग्रह नसतील तर बालक जगत नाहीं.

( ४ ) षष्ठ किंवा अष्टम स्थानीं चंद्र पापदृष्ट असेल तर बालक तत्काळ



मृत्यु पावतें; जर ह्या चंद्रावर फक्त शुभ ग्रहाचीच दृष्टि असेल तर बालकाचा आठ वर्षांनीं मृत्यु होतो; शुभ व पाप ग्रहांची दृष्टि असेल तर चार वर्षांनीं व फक्त पाप ग्रहांचीच दृष्टि असल्यास एक महिन्यानें मृत्यु होतो.

( ५ ) लग्नीं क्षीण चंद्र व केंद्रांत व अष्टमांत पापग्रह किंवा चतुर्थ, अष्टम किंवा सप्तम स्थानीं पापग्रहांच्या मध्यें चंद्र असेल तर बालमृत्यु होतो. पापग्रहांच्या मध्यें असलेला चंद्र लग्नांत असतां सप्तम किंवा अष्टम स्थानीं पापग्रह असतील व चंद्रावर बलवान शुभ ग्रहांची मुळींच दृष्टि नसेल तर मातेसह मूल मरण पावतें.

( ६ ) राशीच्या शेवटच्या नवांशांत असणाऱ्या चंद्रावर शुभ ग्रहांची दृष्टि नसेल आणि त्रिकोणांत पापग्रह असतील किंवा लग्नकेंद्रीं चंद्र व सप्तम स्थानीं पापग्रह असतील तर मूल तत्काळ मरण पावेल.

( ७ ) लग्नांत ग्रस्त चंद्र पापग्रहयुक्त असून अष्टमांत मंगळ असेल तर या योगावर बालक मातेसह मृत्यु पावतें; या योगांत सांगितल्याप्रमाणें चंद्राऐवजीं रवि असल्यास शस्त्रक्रियेमुळें दोघांचाही मृत्यु होतो; लग्नीं रवि किंवा चंद्र, त्रिकोण व अष्टम स्थानीं बलवान पापग्रह आणि लग्नावर शुभ ग्रहांची दृष्टि नसेल तर मातेसह बालक मृत्यु पावतें.

( ८ ) द्वादश स्थानीं शनि, नवमांत रवि, लग्नीं चंद्र व अष्टमांत मंगळ असून या ग्रहावर बलवान गुरूची दृष्टि नसेल तर बालक तत्काळ मृत्यु पावतें.

( ९ ) पापग्रहयुक्त चंद्र ५।७।९।१०।८।१ या स्थानीं असून त्यावर शुभ ग्रहांची दृष्टि असेल तर मूल मरण पावतें.

( १० ) संध्या* समयीं लग्नीं चंद्राचा होरा+ असून पापग्रह कोणत्याही राशीच्या अंत्य नवांशीं असतील किंवा कोणत्याही केंद्रांत पापग्रहांनीं

---

*अर्धास्त समयात्संध्या व्यक्तीभूता न तारका यावत् ॥
तेजः परिहारि मुखात् भानोरर्धोदयो यावत् ॥ १ ॥

+'होरेति लग्नं भवनस्य चार्धम्'

युक्त चंद्र असेल तर मूल मरण पावतें.

आचार्य वराहमिहिरांच्या वर दिलेल्या नियमांपैकीं कोणता ना कोणता तरी नियम प्रत्येक बालमृतीच्या कुंडलींत आढळून येईलच असें नाहीं. पण त्यांवरून आपणास बालमृतीचे योग कोणत्या स्वरूपाचे असतात याची पुष्कळशी कल्पना करतां येईल हें खास. हे सर्व नियम कोणत्या तत्वाधारें दिलेले आहेत हें बृहज्जातकावरून जितकें स्पष्ट होतें तितकें इतर कोणत्याही जुन्या ग्रंथावरून होत नाहीं असें वाटतें. वर दिलेले नियम कोणत्या तत्वाधारें दिलेले आहेत हें आपण पाहूं.

सामान्यतः आयुर्मान, शरीरप्रकृति, आजार वगैरेचा विचार करतांना काय काय लक्ष्यांत घ्यावें यासंबंधानें आर्य व पाश्चिमात्य ग्रंथांमध्यें अगदीं ऐक्य आहे अशा गोष्टी म्हणजे:—

**( १ ) तनुस्थान,**

**( २ ) अष्टमस्थान,**

**( ३ ) चंद्र व रवि.**

तनुस्थानाचा विचार म्हणजे ( १ ) कोणती राशि त्या स्थानीं उदय पावत आहे, ( २ ) त्या राशीचा 'अधिपति' कोणत्या स्थितींत आहे म्हणजे राशि, स्थान व दृष्टि यांपैकीं कोणत्या बलानें युक्त आहे अगर बलहीन आहे, ( ३ ) तनुस्थानीं कोणते ग्रह आहेत व ते ग्रह दृष्टीनें अगर राशीनें बलवत्तर आहेत किंवा नाहींत, ( ४ ) तनुस्थानांतील ग्रह कोणत्या स्थानांचे अधिपति आहेत व शेवटीं ( ५ ) तनुस्थानावर ( विशेषतः उदित अंशावर ) कोणत्या ग्रहांची दृष्टि ( शुभ किंवा अशुभ ) आहे हें विचारांत घ्यावयाचें असतें. अष्टम स्थानाचाही विचार तनुस्थानाप्रमाणेंच करावयाचा असतो. रवि—चंद्रांचा विचार करतांना (ते) कोणत्या स्थानांत आहेत ( २ ) राशीनें बलवान आहेत किंवा नाहींत व त्यांच्याबरोबर (३) कोणते दृष्टियोग होत आहेत हें लक्षांत घेतलें म्हणजे पुरें होतें. आयुर्मानाविषयी ग्रहामध्यें चंद्र, रवि व स्थानामध्यें लग्नाष्टमस्थानें ह्यांचा विचार प्रमुखत्वानें करावा लागतो ही गोष्ट प्रत्येक




ज्योतिष विद्यार्थ्यास माहिती आहेच. **चंद्र व तनुस्थानीं उदित असलेली राशि यांचा संबंध शरीराशीं** ( Poysical body ) **निकट आहे व शरीरांतील जीवनशक्तीचा** किंवा **प्राणशक्तीचा कारक रवि** आहे. अर्थात् कुंडलींतील लग्न, चंद्र व रवि यांची स्थिति लक्षांत घेतल्याशिवाय आयुर्मान कळणें शक्य नाहीं. लग्न, चंद्र व रवि या त्रयीचाच **विशेष** संबंध आयुर्मानाशीं आहे. हेंच तत्व **आचार्यांच्या** नियमावरून उघड होतें. त्या सर्व नियमांत चंद्राला विशेष प्राधान्य आहे आणि त्यानंतर रवि व लग्न यांचा संबंध दर्शित केला आहे. त्या प्रत्येक नियमांत चंद्राचा संबंध आहे याचें कारण चंद्राचा अंमल आयुर्मानावर किंवा बालायुष्यावर विशेष असतो हें वराहमिहिराचार्यांनीं गृहीत धरलें आहे. बालायुष्यांत चंद्राचें प्राधान्य असतें हे समजूनच आमच्याकडील जुन्या ग्रंथकारांनीं 'चंद्ररिष्टाचा' बालमृती-संबंधानें स्वतंत्र विचार केलेला आहे. कांहीं ज्योतिर्विद् मनुष्याच्या आयुर्मानाचे सात विभाग करून त्या प्रत्येक विभागावर सत ग्रहांपैकीं एकाचा अंमल असतो असें मानतात. ह्या सात विभागांत पहिला विभाग चार वर्षांचा असून चंद्राच्या अंमलाखालीं असतो. ह्या चार वर्षांत विशेषतः शरीराची वाढ होते, नंतर बुधाच्या दहा वर्षांच्या विभागांत बुद्धि तत्वाची वाढ, त्या पुढील शुक्राच्या आठ वर्षांच्या अंमलाखालीं शुक्र ग्रहाच्या द्योतक अशा मनोविकारांची वाढ होते, त्यानंतर मंगळ—रवीच्या अंमलाखालची ( १९-१९ ) वर्षें कर्तव्यांत, गुरूच्या अंमलाखालची ( १२ ) वर्षें महत्व संपादन करण्यांत व शेवटचीं शनीची तीस वर्षें निवृत्तिमार्गांत जातात. अशा प्रकारच्या आयुर्विभागांत चंद्राचा पहिला विभाग प्रस्तुत विषयासंबंधानें विचार करतां महत्वाचा आहे. चंद्राचा अंमल बालायुष्यावर विशेष असतो यासंबंधानें ज्योतिषामध्यें मतभेद होणार नाहीं. कुंडलींतील चंद्राच्या स्थितीवरून बालपणांतील आरोग्याचा, प्रकृतिस्वास्थ्याचा बोध होतो हें लक्षांत घेऊन आचार्य वराहमिहिर यांनीं चंद्राशीं होणारे योग विशेष महत्वाचे आहेत


असें मानलें आहे असें वर दिलेल्या नियमावरून स्पष्ट होत आहे. चंद्र पीडित असला म्हणजे बाळपणीं संकटें व दुखणीं येतात किंबहुना मृत्यु सुद्धां घडतो ही गोष्ट अनुभवास पटणारी आहे. आतां वराह मिहिरांनीं सांगितल्याप्रमाणें बरहुकूम चंद्र असला तरच मृत्यु संभवतो किंवा अन्य तऱ्हेनें चंद्र पीडित असला तरीही मृत्यु घडतो किंवा काय हें आपण पाहूं आणि नंतर त्यांच्या नियमांत ग्रथित केलेल्या दुसऱ्या गोष्टींच्या सत्यासत्यतेविषयीं निर्णय करण्याचा प्रयत्न करूं.

पुढें दिलेल्या कुंडल्यांमध्यें पहिल्या कुंडलींत चंद्र अष्टमेश असून तृतीयस्थानामध्यें नेपच्युनबरोबर केंद्रयोग करीत आहे व दुसऱ्या कुंडलींतील चंद्र धनस्थानीं बुध–मंगळाबरोबर केंद्रयोग करीत असून नेपच्युनबरोबर युतियोग करण्यास जात आहे. ह्या दोन्हीही कुंडल्यांमध्यें चंद्र पीडित

कुंडली नं. १. सा. ल.






आहे परंतु आचार्यांच्या नि·माप्रमाणें तो विशिष्ट स्थानीं सांपडत नाहीं. ३–९ या नियमांत दिल्याप्रमाणें १-५-६-७-८-९-१०-११-१२ ह्या नऊ स्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं चंद्र पापग्रहांच्या युतीनें अगर दृष्टीनें पीडित असून शुभ ग्रहांची दृष्टि नसेल व केंद्रांत शुभ ग्रह नसतील ( ३ ऱ्या नियमाप्रमाणें ) तर बालकाचा मृत्यु होणें संभवनीय आहे. वर दिलेल्या कुंडल्यांमध्यें चंद्र पूर्वोक्त स्थानांत नाहीं परंतु पापग्रहांनीं पीडित असल्यामुळें बाळपणीं मृत्युयोग घडला आहे. दोन्ही कुंडल्यांमध्यें केवळ चंद्राच्या बिघडण्यानें मृत्यूयोग घडून आला आहे असें आमचें मत नाहीं, त्याच्याबरोबर दुसरेही मृत्युकारक योग आहेत परंतु हीं उदाहरणें दाखविण्याचें कारण एवढेंच कीं आचार्यांनीं (३-९) नियमामध्यें नऊ स्थानांतील किंबहुना पांचव्या नियमाप्रमाणें चतुर्थ स्थान अधिक धरलें तर दहा स्थानांतील पीडित चंद्र मृत्युकारक असतो असें सांगितलें आहे, त्यामध्यें द्वितीय व तृतीय

हीं दोन स्थानें येत नव्हतीं तीं वरील उदाहरणावरून अपवाद म्हणून रहात नाहींत. म्हणजे कुंडलीच्या कोणत्याही स्थानांत चंद्र बिघडला असला तर तो एक मृत्युकारक योग होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां ह्या द्वादशस्थानांमध्यें कांहीं स्थानें हा योग अधिक तीव्र करीत असतील आणि कदाचित आचार्यांनीं दिलेलीं ९ किंवा १० स्थानें हीं त्यांपैकीं असतील पण सामान्यत: चंद्र कोणत्याही स्थानांत पीडित असला तर बालपणीं अरिष्टद्योतक असतो हें ह्यावरून स्पष्ट होईल. आचार्य वराह मिहिरांनीं बालमृतीचे योग चंद्रासंबंधानेंच सांगितलेले आहेत आणि तसें करण्याचं कारण बालमृतीशीं चंद्राचा विशेष संबंध येतो हें होय. बालायुष्याचा विचार करताना जे अनेक योग पहावयाचे असतात त्यामध्यें चंद्राशीं झालेले योग अत्यंत महत्वाचे आहेत हें आम्हीं वराहमिहिराच्या आधारानें म्हणतो असें नाहीं तर तसा आमचा अनुभव आहे. प्रस्तुत निबंध लिहित असतां बालमृतीच्या योगाच्या जवळ जवळ दीडशें कुंडल्या आमच्या जवळ आहेत व त्यांपैकीं **शेंकडा नव्वदाच्यावर** कुंडल्यांमध्यें चंद्र पीडित आहे असें आढळून येतें. ह्यावरून आचार्यांनीं चंद्राला विशेष प्राधान्य दिलें आहे तें योग्य आहे असें कोणीही म्हणेल. असो. आतां आपण आचार्यांच्या नियमांतील दुसऱ्या गोष्टींचा विचार करूं. पहिल्या तीन नियमांतील योग बालपणीं मृत्युकारक आहे असें साधारणपणें म्हणतां येईल, त्यांच्या बरोबर दुसऱ्या योगांची आवश्यकता रहाणार नाहीं. चौथ्या नियमांतील योग स्वतंत्र आहे असें वाटत नाहीं. त्याच्या जोडीला दुसऱ्या योगांची जरूरी आहे. षष्ठ किंवा अष्टम स्थानांत शनीनें किंवा मंगळानें पीडित असलेला चंद्र बालपणीं मृत्यु घडवून आणीलच असें नाहीं. आणि त्यांतून गुरु सारख्या शुभ ग्रहाची त्याच्यावर दृष्टि असल्यास बालायुष्यांत मृत्युसंभव फारच कमी पण आचार्य म्हणतात कीं आठ वर्षांनीं मृत्यु घडतो ! ह्या नियमांत जी मृत्युकालाची मर्यादा सांगितली आहे ती तर अगदींच असंभवनीय आहे. मृत्युकालाची मर्यादा ठरविण्याचा हा मार्ग खरा नव्हे असें



आम्हांस वाटतें. ह्या कालमर्यादेसंबंधानें पुढें विचार करूं. ५ व्या व ६ व्या नियमांत सांगितलेले योग स्वतंत्रपणें मृत्युकारक आहेत परंतु पांचव्या नियमांत म्हटल्याप्रमाणें बालक मातेसह मरण पावेल इतका तीव्र योग दिसत नाहीं. सहाव्या नियमाच्या प्रथमार्धासंबंधानें शंका वाटते. सातव्या नियमातील योग बालमृति नक्की घडवून आणील यांत शंका नाहीं. आठवा नियम **अशक्य** आहे कारण १२–९–१–८ या चार स्थानांतील चार ग्रहांवर कोणत्याही स्थानांतून गुरूची पूर्ण दृष्टि असणें शक्य नाहीं. अर्थात् नियम अर्धवट आहे. नवव्या नियमांतील योग स्वतंत्र नाहीं. त्यांतील एकाच योगावर मृत्यु घडणें असंभवनीय आहे. अनेक कुंडल्यांमध्यें या नियमांत सांगितलेल्या स्थानांत शुभ ग्रहानें अदृष्ट व शनि किंवा मंगळ यांनीं युक्त असा चंद्र आढळतो परंतु त्यावरून तो स्वतंत्रपणें बालमृत्यूचा योग आहे असें म्हणतां येणार नाहीं. शेवटच्या म्हणजे दहाव्या नियमासंबंधानें येवढेंच सांगतां येईल कीं तो योग स्वतंत्र नाहीं. आचार्यांनीं वरील नियमांत दोन ठिकाणीं चंद्र अंत्य नवांशांत असतांना अनिष्ट मानला आहे असें दिसतें.

वराहमिहिराचार्यांचे बालमृतीचे योग व त्या प्रत्येक योगासंबंधानें आमच्या अनुभवाप्रमाणें थोडक्यांत वर विचार केलेला आहे. त्यावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं आचार्यांच्या नियमावरून बालमृतीच्या योगांचा निर्णय फारसा समाधानकारक होत नाहीं. कारण त्या नियमाबरहुकूम योग अनेक बालमृतीच्या कुंडल्यांमधून दिसून येत नाहींत आणि स्पष्टपणें तत्वांचा विचारही केलेला नाहीं. बालमृतीच्या अनेक कुंडल्या पाहिल्या असतां असें आढळून येतें कीं त्यामध्यें ज्याप्रमाणें चंद्र-पीडित असतो त्याप्रमाणें दुसरेही कांहीं विकृत योग झालेले असतात. वराहमिहिराचार्यांनीं ह्या दुसऱ्या विकृत योगांचा विचार केलेला दिसत नाहीं. हे विकृत योग कमी महत्वाचे आहेत असें नाहीं. कांहीं प्रसंगीं तर चंद्र मुळींच पीडित नसतां किंवा राशि, स्थान व दृष्टि यांनीं बलवान असतां सुद्धां इतर योगांमुळें बालपणांत मृत्युयोग घडतात. उदाहरणार्थ पुढील दोन कुंडल्यांतील ग्रहस्थिति लक्षांत घ्या.

### कुंडली नं. ३ व नं. ४

स्पष्ट षड्भाव.

| | लग्न. | ध. | तृ. | च. | पं. | षष्ट. |
|---|---|---|---|---|---|---|
| (३) | कुंभ १९ | मी. २२ | मे. २७ | वृषभ २६ | मि. २१ | कर्क १६ |
| (४) | कन्या १८ | तूळ १६ | वृश्चिक १८ | धनु १८ | मकर १८ | कुंभ १८ |

सायन स्पष्ट ग्रह.

| | रवि | चंद्र | बुध | शुक्र | मंगळ |
|---|---|---|---|---|---|
| (३) | मकर २३-३७ | धनु ६-५२ | धनु २९-५० | धनु १२ | वृषभ २५-५५ |
| (४) | ० | धनु ५-० | तूळ १८ | वृश्चिक १८ | तूळ २६-४० |

* * * *

| | गुरु | शनि | हर्शल | नेप. | राहु |
|---|---|---|---|---|---|
| (३) | धनु ७-२१ | वृषभ १३ | मकर २९ | कर्क २२-३१ | व मेष २६ |
| (४) | कुंभ १२-४९ | कर्क १-३६ | कुंभ ७-५५ | सिंह ०-१ | |

नंबर ३ च्या कुंडलीमध्यें चंद्र धनु राशीमध्यें गुरु व शुक्र या दोन शुभ ग्रहांच्या युतीमध्यें दशमस्थानांत आहे. चंद्राबरोबर फक्त रवीचा अर्धकेंद्र योग होत आहे ह्याखेरीज कोणत्याही ग्रहाचा कोणताही अशुभ योग होत नाहीं. नंबर ४ च्या कुंडलीमध्यें चंद्र धनुराशीमध्यें रवि व हर्शल बरोबर तृतीय एकादश हा शुभ योग करीत असून नेपच्युनबरोबर नवपंचम दृष्टि-योग करीत आहे. चंद्र धनु राशीच्या ५ व्या अंशांत व गुरु कुंभेच्या १२ व्या अंशांत म्हणजे त्यांमध्यें आठ अंशांच्या अंतरानें तृतीय एकादश योग होत आहे पण हा योग अंशात्मक नसल्यामुळें विशेष महत्वाचा नाहीं म्हणून आपण सोडून देऊं. कुंडली नंबर ४ मध्यें चंद्र मुळींच पीडित नसून राशीनें, स्थानानें व दृष्टीनें बलवान आहे असेंच दिसून येईल. नंबर तीन व चारच्या कुंडल्यांमध्यें चंद्र पीडित नसून बलवत्तर आहेत असें असतां मृत्यु घडून आले याचे द्योतक योग आचार्यांच्या नियमांत सांपडत नाहींत.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धाराद् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाच सेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. | मे १९१७. | अंक २ रा.

## प्रासंगिक विचार.

गेलेच्या मागल्या वर्षाच्या ९ व्या अंकांत आम्हांस विचारलेल्या तीन प्रश्नांचा उल्लेख करून त्यावर निबंध मागविले होते परंतु त्या विषयावर उहापोह करणारा अद्यापपावेतों एकही निबंध किंवा लेख आमचेकडे आला नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. फलज्योतिष-शास्त्र—हल्लीं जें उपलब्ध आहे तें पूर्ण आहे असें म्हणतां येत नाहीं. त्यामध्यें अद्याप पुष्कळ गोष्टी कळावयाच्या आहेत असें आम्हांला वाटतें. ज्योतिषी लोकांनीं आपले विचार व अनुभव एकमेकांस मालेच्या द्वारें कळवावेत असें आम्हांला फार वाटतें. परंतु अद्यापपावेतों अशा प्रकारची जागृति वाचकवर्गामध्यें झालेली दिसत नाहीं. प्रत्येक ज्योतिषविद्यार्थ्यास सर्वच गोष्टी चांगल्या कळतात असें नाहीं. एखाद्यास मागील घडलेल्या

गोष्टी अचूक सांगतां येतात तर एखाद्यास सप्तम भावाचें वर्णन उत्तम देतां येतें तर तिसऱ्यास एखाद्याचे सांपत्तिक स्थितीसंबंधानें अचुक निदान करितां येतें असा प्रकार पुष्कळ वेळां पाहण्यास मिळतो. परंतु हे अनुभव जर एकत्र असे पाहण्यास मिळतील तर खात्रीनें एकाच विद्यार्थ्यास ह्या तीन गोष्टी फार थोडक्या काळांत व लवकर येतील असें कोणीही सांगेल. व ह्याचकरितां संघशक्तीनें काम करण्याची तऱ्हा भारतभूमीच्या सुपुत्रांनीं स्वीकारली पाहिजे.

* * * * *

विविधज्ञानविस्ताराच्या मार्च १९१७ च्या अंकामधील शास्त्रीय वाङ्मयाची वाढ करण्याच्या मार्गांतील अडचणी व त्या दूर करण्याचे उपाय ह्यांसंबंधीं प्रो. गोविंद सदाशिव आपटे एम. ए. बी. एस् सी. यांचा निबंध फार विचारणीय आहे. कोणत्याही शास्त्रावर उत्तम ग्रंथरचना होण्यापूर्वीं शास्त्रीय विषयाची परिभाषा ही चांगली निश्चित झाली पाहिजे. नाहींतर निरनिराळे शब्द एकाच परकीय शब्दाकरितां उपयोगांत आगल्यानें किती अडचणी व घोंटाळे होतात ह्यासंबंधानें अनुभवाखेरीज कळणार नाहीं. हें महत्त्वाचें काम साहित्यपरिषदेनें तडीस लावण्याकरितां दीर्घ प्रयत्न केला पाहिजे. ह्या कामाकरितां निरनिराळ्या शास्त्रामध्यें प्रविण असलेल्या गृहस्थांची एक संस्था असावी व तिचे मार्फत ग्रंथपरीक्षण परिभाषेच्या दृष्टीनें व्हावें असें आम्हांस वाटतें. जी परिभाषा तज्ज्ञांच्या मतानें निश्चित होईल त्याव्यतिरिक्त शब्द एखादा ग्रंथकार उपयोगांत आणील तर त्यासंबंधानें तीव्र निषेध साहित्यसंमेलनांतून व साहित्यपत्रिकेंतून व्हावा.

* * * *

पुष्कळ ग्रंथकार आपल्या पूर्वींच्या ग्रंथकारांनीं किंवा लेखकांनीं कोणकोणते पारिभाषिक शब्द वापरले आहेत यासंबंधानें कांहीं विचार न करितां लागेल तसें किंवा कोशांत आढळणारे असे अर्थशून्य शब्द वापरतात ह्या त्यांच्या



स्वैर वर्तनावर कांहीं बंधन असणें वाङ्मयाचे दृष्टीनें हितावह आहे. कित्येकांस आपली एककल्ली परिभाषाच जास्त प्रिय वाटते व ते ती समाजाचे डोक्यावर लादण्याचा प्रयत्न करितात हाही प्रकार गौणच आहे.

* * * * *

या दृष्टीनें आज रोजीं आम्हीं एक दोन ताजीं उदाहरणें वाचकांच्या निदर्शनास आणीत आहोंत. **हर्शल** व **नेपच्युन** ह्या दोन ग्रहांस कै० **जनार्दन बाळाजी मोडक** यांनीं **प्रजापति** व **वरूण** हीं नांवें सुचविलीं होतीं. व फलज्योतिषवाङ्मयांत सरासरी सन १८९२ पासून सदरहु ग्रहांस ह्या नांवांनीं संबोधित आहेत. ह्या ग्रहांस ज्या देवतांचीं नांवें पाश्चिमात्य ज्योतिषांनीं दिलीं आहेत त्यासंबंधानें ग्रीक पुराणें पाहतां किंवा त्यांचे गुणधर्मांचे ज्योतिषशास्त्रदृष्ट्या विचार करितां रा. **मोडक** यांचीं नांवेंच ज्यास्त अर्थसूचक आहेत. हींच नांवें कै० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** यांस मान्य होतीं व आमचे मतें कोणाही विचारी वाचकांस हीं नांवें योग्य आहेत असें वाटेल. परंतु व्यक्तिद्वेषानें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें श्रीयुत **केतकरांना** हीं नांवें पसंत नाहींत. त्यांचे मतें हर्शल यास वरूण व नेपच्युन यास इंद्र असें नामाभिधान जास्त उत्तम व सयुक्तिक आहे. व चालू वर्षाच्या आपल्या केतकी पचांगांत हीं नांवें मुद्दाम घालण्यास कळविलें होतें असें म्हणतात. वर दर्शविलेलीं नांवें प्रसिद्ध कोशकार रा. रा. **रानडे** यांनीं आपल्या कोशांत दिलीं आहेत. हाही एक पूर्वींचे ग्रंथ न पाहतां एखाद्याच्या सांगण्यावर भराभर परिभाषा ठरविण्याच्या प्रघाताचा मासला पाहण्यासारखा आहे. कै० **दीक्षितांचा** ग्रंथ ( ज्योतिर्विलास ) श्रीयुत रानडे यांनीं पाहिला असता तर या दोन ग्रहांचा इतिहास वगैरे गोष्टी फारच चांगल्या कळून आज त्यांचेवर असा आरोप करितां आला नसता. रा. रा. रानडे यांचे सल्लागारमंडळीमध्यें कै० जीवनराव चिटणीस व कुंडलीविज्ञानाचे संपादक श्रीयुत नवाथे असतां त्यांना हर्शल यास वरूण व नेपच्युन यास इंद्र म्हणण्याचें कारण कां पडलें तें कळत नाहीं. हर्शल हा ग्रह जलतत्त्वाचा द्योतक आहे

काय ? त्याची ग्रीकपुराणांत दिलेली कथा आपल्या वरुणाबरोबर मिळती आहे काय ? हर्शल यास वरूण म्हणणें म्हणजे वेदांत वरुणाचें साम्राज्य समुद्रावर नसल्यासारखें मानणें होय. पंचवीस पंचवीस किंवा तीस तीस वर्षें अनेक कुंडल्यांचें निरीक्षण करून नेपच्युनचा किंवा वरूणाचा अंमल जलतत्त्वावर विशेष आहे असें ठरविणारांच्या मतास मान देणें अधिक सयुक्तिक आहे किंवा फलज्योतिषाचा ज्यांस गंधही नाहीं अशा एखाद्यानें ठरविलेलीं नामाभिधानें श्रेष्ठ आहेत ह्या गोष्टीचा विचार करण्याचें काम आम्हीं साहित्य परिषद, ज्योतिषविद्यार्थी व तज्ज्ञवाचक यांचेवर सोंपवितों.

*     *     *     *     *

कोणत्याही गोष्टीचें नामाभिधान केल्याबरोबर साधारणपणें त्या त्या संबंधानें विशिष्ट कल्पनाचित्र समोर उभें रहातें. आर्यज्योतिष वाङ्मयांतील एखाद्या ग्रहाचा किंवा दुसऱ्या कोणत्याही एखाद्या संज्ञेचा विचार केला असतां ती संज्ञा उच्चारल्याबरोबर तिचा गुण, धर्म व शुभाशुभ फलें आपल्या नजरेसमोर उभीं राहतात किंवा नाहीं यांचाहि विचार वाचकांनींच करावा. आर्य ऋषींनीं ग्रहांचीं नांवें, राशींचीं नांवें व इतर कांहीं संज्ञा जशा त्यांच्या स्वैर वृत्तीस वाटल्या त्याप्रमाणें उपयोगांत आणल्या आहेत काय ? मंगळास मंगळ कां म्हटलें बुध कां म्हटलें नाहीं, त्यांनीं त्याचे गुणधर्म वगैरे गोष्टींचा विचार केला होता किंवा नाहीं ? जर मंगळवारास मंगळवारच म्हणण्यास विशिष्ट हेतु आहे तर मग हर्शल यास वरुण कां म्हणावें ? एखाद्या शोधकास किंवा बापास आपल्या मुलाचें दगड्या, धोंड्या, वगैरे लागेल तें नांव ठेवण्याचा सामाजिक बंधनानें हक्क आहे म्हणून लागेल त्या ग्रंथकारानें एखाद्या विशिष्ट ग्रहास आपल्या मर्जीनुरूप नांव दिलेलें चालेल काय ?

संपादक.


———o———



# होमरूल लीग.

[ ले०—नारायण सदाशिव मराठे. ]

**स्थापना**—ता. २८ एप्रिल सन १९१६ सायंकाळीं ५॥ वाजतां स्टँ. टा. बेळगांव अ. १६°




या संघास नुकतेंच दुसरें वर्ष लागलें. संघाची स्थापना देशांतील विद्वान् पुढाऱ्यांनीं बेळगांव मुक्कामीं केल्यानंतर एक वर्षांत त्याचें कार्य काय झालें हें सर्वांस माहित आहेच. होमरूलचें कार्य न्यायकोर्टांत कायदेशीर आहे असें ठरलें व संघास सर्वजण मान देत आहेत. संघामार्फत मुंबई—पुणें शहरीं व इतर कांहीं ठिकाणीं सभा झाल्या. होमरूललीगटोळीनें लखनौस जाऊन आपली मान्यता राष्ट्रीयसभेसही अनुकूल अशी दाखविली व आतां हा संघ साम्राज्यसरकारास लढाईचे वेळीं मदत करण्यास सर्वत्रांस सांगत

आहे. बऱ्याच लोकांनीं संघातर्फे नांवें नोंदविलींही आहेत ! संघाचें कार्य सनदशीर मार्गानें चालू आहे व तें तसेंच चालू राहील असें तुला लग्नच स्पष्टपणें दर्शवीत आहे. लग्नाधिप भाग्यांत असल्यामुळेंच संघास एवढी मान्यता प्राप्त झाली. इंग्लंडचा राशि जो मेष त्या राशींत गुरु असल्यामुळें साम्राज्यसरकाराशीं सख्य ठेवूनच कार्य करण्याकडे होमरूललीग सदोदित लक्ष ठेवील. हा गुरु उभयांत सख्य व प्रेम वृद्धिंगत करणारा आहे.

संघास एक सूचना द्यावीशी वाटते ती हीच कीं स्थापनाकालीं असलेला मंगळ व हर्शल यांचा प्रतियोग संघास सांपत्तिक उणीव व हानि ज्यास्त करणारा आहे म्हणून सांपत्तिक स्थिति जितकी चोख व पूर्णतेनें ठेवतां येईल तितकी ठेवावी. त्याचप्रमाणें षष्ठस्थानांतील चंद्र वारंवार अडचणी आणणारा आहे. हा चंद्र संस्थेस अस्वस्थता देणारा आहे. याचा शुक्राशीं ( लग्नेशाशीं ) केंद्रयोग असल्यामुळें संघानें आपलें कार्य ( थोडया प्रमाणांत कां होईना ) सावधगिरीनें व सर्वत्रांस मानेल अशा रीतीनें करावें व तें तसें झाल्यास गुरुमंगळाचा त्रिकोणयोग यश दिल्याशिवाय राहणार नाहीं. मंगळ हा दिनवर्षपद्धतीनें ३० व्या वर्षी दशमावर येईल व त्या कालीं संघास बरेंच यश मिळेल. ६ वें व १० वें हीं वर्षें संघास प्रतिकूल आहेत ६ व्या वर्षी ( प्रीनेटल पद्धतीनें ) शनि दशमावर येईल व १० व्या वर्षी रवि मंगळाशीं केंद्रयोग करील. सांप्रत शनि गोचर गतीनें दशमांतून जात आहे व तो आगष्ट अखेरीस जन्मरवीशीं केंद्रयोग करील. हा केंद्रयोग या १९१७ सालीं संघास अनहित करणारा आहे. गोचरपेक्षां दिनवर्षपद्धति जास्त अनुभव देत असल्यानें या गोचर योगाचा परिणाम विशेषसा होऊं नये असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण त्या वेळीं संघानें सावधगिरीनें वागणें कांहीं वावगें होणार नाहीं. असो हें नूतन वर्ष संघास सुखदायक जावो.

---



# बालमृति.

लेखक:—राम नारायण.

( मागील अंकावरून पुढें चालू )

नंबर ३ व ४ या कुंडल्यांमध्यें आचार्य वराहमिहिराच्या नियमांत सांगितल्याप्रमाणें मृत्युयोग घडलेले दिसून येत नाहींत किंवा त्यांच्या नियमांत दर्शविल्याप्रमाणें चंद्रही पीडित नाहीं. तेव्हां दुसऱ्या कोणत्या योगांमुळें बालमृत्यु घडून आले हें ठरविलें पाहिजे.

मागें ( दहाव्या पानावर ) सांगितलेंच आहे कीं सामान्यतः आयुर्मानाचा विचार कर्तव्य असतां लग्न, अष्टमस्थान व रवि-चंद्र यांची स्थिति लक्षांत घेतली पाहिजे. प्रस्तुत दोन कुंडल्यांमध्यें ही स्थिति कशी होती तें पहा:— कुंडली नंबर ३. ( १ ) उदित अंश व लग्नेश शनि यांचा केंद्रयोग होऊन गेलेला आहे ( २ ) व मंगळाबरोबर केंद्रयोग होणारा आहे ( ३ ) रवि राशीनें व स्थानानें बलहीन असून ( ४ ) नेपच्युनबरोबर प्रतियोग ( ५ ) व हर्शलबरोबर युतियोग करीत आहे.

कुंडली नंबर ४. ( १ ) लग्नेश बुध अष्टमेश मंगळाबरोबर युतियोग करीत आहे ( २ ) व्ययेश रवि लग्नांत आपल्या नीच राशींत आहे ( ३ ) व रवि-शनींचा केंद्रयोग केंद्रांतून झालेला आहे. नंबर ३ च्या कुंडलीमध्यें लग्न शनि-मंगळांमुळें दूषित झालें आहे व रवि नेपच्युन—हर्शलांनीं बिघडलेला आहे. नंबर ४ च्या कुंडलींत लग्नेश—अष्टमेश यांची युति व रवि-शनींचा केंद्रांतून झालेला केंद्रयोग यांमुळें मृत्युयोग घडून आला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सारांश चंद्राच्या बिघडण्यानें जसा मृत्युकारक योग होतो

त्याप्रमाणेंच लग्न व रवि बिघडल्यानेंही मृत्युकारक योग घडतो हें वाचकांच्या लक्षांत येईल. लग्न, चंद्र व रवि यांच्या विचारामध्यें ते कोणत्या राशींत आहेत याचा विचार महत्वाचा आहे. राशिचक्रांतील द्वादश राशींपैकीं कांहीं राशींमध्यें **जीवनशक्ति** ( Vitality ) बरीच असते व कांहींमध्यें ती बरीच कमी असते. **कर्क, मीन व मकर** या तीन राशींमध्यें जीवनशक्ति फारच कमी असते. ह्या तीन राशींपैकीं एखादी राशि लग्नकेंद्रीं उदय पावत असेल तर लहानपणांत शरीरप्रकृति निकोप किंवा सुदृढ अशी नसते. **मिथुन** व **कन्या** या राशी बलहीनच परंतु पूर्वोक्त तीन राशींपेक्षां कांहीं अधिक बलवान असतात; **तूळ, कुंभ, वृषभ** व **वृश्चिक** या साधारण बळकट राशी आहेत व सर्वांमध्यें **मेष, सिंह** व **धनु** या राशी फारच बलवान आहेत. बलहीन राशि पूर्व केंद्रावर असून इतर ग्रहस्थिति साधारण जरी बिघडली असली तरी सुद्धां मृत्युयोग घडेल पण मेष, सिंह व धनु या राशींचीं लग्नें साधारण अनिष्ट ग्रहस्थितीला दाद देणार नाहींत. लग्नराशीप्रमाणेंच रवि—चंद्रांच्या राशींचा परिणाम जीवनशक्तीवर होत असतो. हें राशींचें सामर्थ्य वाचकांनीं जरूर लक्षांत घ्यावें. पूर्वाचार्यांनीं राशींसंबंधानें इतका विचार केलेला दिसत नाहीं.

प्रस्तुत निबंधांत आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून येवढें स्पष्ट होईल कीं तत्वतः **लग्न, रवि** व **चंद्र** यांच्या बिघडण्यानें मृत्युयोग घडतात. हे बिघडलेले योग कसे असतात हें पूर्वाचार्यांच्या पद्धतीप्रमाणें नमूद कारण नाहीं. त्यांच्या पद्धतीमध्यें तत्व दृष्टिआड होतें आणि केवळ योग मात्र लक्षांत घ्यावा लागतो. नंबर ४ च्या कुंडलींत चंद्रारिष्टामुळें बालमृत्यु घडून आला नाहीं तेव्हां पूर्व पद्धतीप्रमाणें असा नियम बसविला असतां कीं 'कन्या लग्न व धन स्थानीं बुध—मंगळाची युति असून तूळेंतील रवि व कर्केंतील शनि यांचा केंद्रयोग होईल तर बालमृतीचा योग होतो' हा नियम हुबेहुब दुसऱ्या कुंडलींत सांपडेल असें नाहीं व त्यावरून तत्वही कळणार नाहीं पण तोच जर सात्विक दृष्टीनें नियम



बसविला तर असें म्हणूं कीं लग्नेश—अष्टमेश यांचा युतियोग व केंद्रांतून **प्राण शक्तिकारक रवि** शनीनें बिघडला असेल तर बालमृत्यु घडतो. ह्या तात्विक नियमाची सत्यता अनेक कुंडल्यांत पहावयास सांपडेल. नुसते झालेले योग नमूद करणें व त्यांचीं तत्वें लक्षांत घेणें यांमध्यें फार अंतर आहे, एकामुळें ग्रंथविस्तार होऊन वाचकांस कांहींच लाभ होणार नाहीं व दुसऱ्यामुळें थोड्याशा वाक्यांत विषयबोध होईल. पण पूर्वग्रंथकारांनीं केवळ झालेले योग नमूद करण्याचें काम केलें आहे आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं एक दोन ग्रंथकारांखेरीज तेंही काम विषय न समजतां केलेलें आहे. वराहमिहिराच्या नियमांत चंद्र पीडित असणें मृत्युकारक आहे हें साधें तत्व स्पष्ट दिसतें पण 'रवीनें युक्त असा बुध शुभदृष्ट असतां तें मूल राजासारख्या वैभवामध्यें ११ व्या वर्षी मृत्यु पावतें' या नियमांत कोणतें तत्व ग्रंथकाराच्या दृष्टीसमोर होतें हें त्यांसच ठाऊक !

आयुर्मान व शरीरप्रकृति यांच्या संबंधानें लग्नाष्टम स्थानें हीं अत्यंत महत्वाचीं आहेत. त्यांच्यापेक्षां कमी महत्वाचें असें षष्ठस्थान हें आहे. षष्ठ स्थानाचा संबंध रोगांशीं दिसून म्हणून येतो त्याचाही विचार केला पाहिजे. षष्ठस्थानांतील अनिष्ट ग्रहस्थितीचा परिणाम आयुर्मानावर होणें शक्य आहे म्हणून बालमृतीचा विचार करतांना षष्ठस्थान विचारांत घेतलें पाहिजे. **लग्न, अष्टम व षष्ठ हीं स्थानें आणि रवि व चंद्र यांच्या संबंधानें होणारे अनिष्ट योग मृत्युकारक असतात व हे योग जितके तीव्र व पुष्कळ तितक्या मानानें लवकर मृत्यु होतो.** आणि वर दिलेलीं स्थानें व ग्रह यांच्या संबंधानें होणारे शुभयोग आयुष्यवर्धक असतात. मृत्युकारक व आयुष्यकारक योगांच्या बलाबलावर आयुष्य अवलंबून असतें हे दोन्ही प्रकारचे योग तत्वतः कसे असतात हें पुढें देतोः—

### आयुष्यवर्धक योग.

(१) चंद्र स्थानबली, राशिबली, शुभदृष्ट व शुभयुक्त.
(२) रवि राशीनें, स्थानानें, दृष्टीनें बलवान व शुभयुक्त.
(३) लग्न बलवान राशीचें.
(४) लग्नेश स्थानबली, राशिबली, शुभयुक्त व शुभदृष्ट.
(५) उदित अंश शुभयुक्त व दृष्ट.
(६) लग्नांत शुभग्रह.
(७) लग्नांत शुभ स्थानांचे अधिपति.
(८) कुंडलीमध्यें विशेषतः केंद्रकोणामध्यें ग्रहांचे शुभ योग.

### मृत्युकारक योग.

(१) चंद्र अशुभ स्थानांत, बलहीन व पीडित.
(२) रवि राशीनें, स्थानानें, दृष्टीनें बलहीन व अशुभयुक्त.
(३) लग्न बलहीन राशीचें.
(४) लग्नेश अशुभ स्थानांत, बलहीन व पीडित.
(५) उदित अंश पीडित.
(६) लग्नांत क्रूर ग्रह.
(७) लग्नांत अशुभ स्थानांचे अधिपति.
(८) कुंडलीमध्यें विशेषतः १।४।७।८।६।१२ या स्थानांमध्यें अशुभ योग.
(९) ग्रहणकाळीं जन्म.

स्पष्टीकरणः—वर दिलेले आयुष्यवर्धक व मृत्युकारक योग केवळ तत्वांस अनुसरून दिले आहेत. यांच्या बलाबलाचा विचार लक्षांत घेऊन आयुष्यासंबंधानें निर्णय केला पाहिजे. वर दिलेल्या मृत्युकारक योगांखालीं पीडित चंद्र, पीडित रवि असें म्हटलें आहे त्यांसंबंधानें वाचकांनीं तारतम्य भाव लक्षांत घेतला पाहिजे. रवि, चंद्र किंवा लग्न यांच्याबरोबर अर्धकेंद्र, केंद्र किंवा प्रतियोग होतात त्या वेळीं ते पीडित होतात पण त्यामध्यें मंगळ, शनि, हर्शल व नेपच्युन यांच्याशीं होणाऱ्या अशुभ योगानें येणारा अनिष्टपणा हा कांहीं निराळाच असतो. चंद्र व गुरु यांचा केंद्रयोग वाईटच परंतु त्याच्यापेक्षां चंद्राचा व मंगळादि ग्रहांचा केंद्रयोग अत्यंत वाईट असतो हें लक्षांत ठेविलें पाहिजे. आर्य पद्धतीप्रमाणें चंद्र व शुभ ग्रहांचा प्रतियोग शुभ मानतात. चंद्रगुरूंचा प्रतियोग म्हणजे चंद्रा-




वर गुरूच्या पूर्ण दृष्टीचा योग आहे तेव्हां तो शुभ मानतात परंतु आमच्या अनुभवाप्रमाणें हा योग शुभ नाहीं; हा अशुभ योगच असतो पण या अशुभ योगाचीं फळें इतकीं अनिष्ट नसतात इतकेंच. चंद्र किंवा दुसरा कोणताही ग्रह प्रतियोगांनीं बिघडतो यासंबंधानें आम्हांस बिलकूल संशय वाटत नाहीं. मात्र शुभ ग्रहांचे प्रतियोग पापग्रहांच्या प्रतियोगां इतके अनिष्ट नसतात.

कुंडलीचा बालमृत्यूसंबंधानें विचार कर्तव्य असतां वर दिलेले आयुष्यकारक किंवा मृत्युकारक योग झालेले आहेत किंवा नाहींत, आयुष्यकारक योगांचें अधिक प्राबल्य आहे किंवा मृत्युकारक योगांचें प्राबल्य आहे हें ठरवून नंतर तें प्राबल्य किती अनिष्ट आहे याचा अंदाज केला पाहिजे. हा अंदाज कसा करावा हें कांहीं उदाहरणें घेऊन सांगतों.

### बालमृति, कुंडली नंबर ५
### सायन भावचलित कुंडली

लग्न.



पांच नंबरच्या कुंडलींत पुढें लिहिल्याप्रमाणें आयुष्यकारक व मृत्युकारक योग झाले आहेत:—

( १ ) धनु या बलवान राशीचें लग्न असून ( २ ) लग्नेश गुरु केंद्रांत ( चतुर्थांत ) ( ३ ) चंद्राच्या युतींत व ( ४ ) रवीबरोबर तृतीय एकादश योग करीत आहे. ( ५ ) रवि चंद्र व ( ६ ) रवि शनि यांचेही शुभ योग झाले आहेत. या आयुष्यकारक योगांच्या विरुद्ध पुढें लिहिल्याप्रमाणें मृत्युकारक योग झाले आहेत:—

**लग्न**

उदित अंशाबरोबर ( १ ) नेपच्युनचा व ( २ ) मंगळाचा प्रतियोग आणि ( ३ ) शनीचा केंद्रयोग होत आहे. नियम ५ वा.

( ५ ) लग्नेश गुरु अष्टमेश चंद्रानें युक्त असून ( ६ ) नेपच्युन-बरोबर केंद्रयोग ( ७ ) मंगळाबरोबर केंद्रयोग व ( ८ ) शनीबरोबर प्रतियोग करीत आहे. नियम ४ था.

**चंद्र**

( ९ ) चंद्र शनि यांचा प्रतियोग ( अंशात्मक ) ( १० ) चंद्र नेपच्युन यांचा केंद्रयोग ( ११ ) चंद्र मंगळ यांचा केंद्रयोग.

नियम १ ला.

**रवि** ( १२ ) प्राणशक्तिकारक रवि षष्ठस्थानांत नियम २ रा.

**इतर योग**

( १३ ) केंद्रांत नेपच्युन—मंगळांचा युतियोग ( १४ ) नेपच्युन—शनि केंद्र योग ( १५ ) व शनि मंगळांचा केंद्रयोग. नियम ८ वा.

प्रस्तुत कुंडलीमध्यें आयुष्यकारक योग बलवान आहेत हें खरें परंतु त्यांच्या विरुद्ध आयुष्यहानिकारक असे १५ योग झाले आहेत. ह्या कुंडलींत शुभाशुभ योग स्पष्टच आहेत पण त्यांमध्यें लग्नेश व अष्टमेश यांचा युतियोग लयदर्शक ( चतुर्थ ) स्थानांत झाला आहे तो विचार करण्यासारखा आहे. हा योग गुरुचंद्रांसारख्या शुभ ग्रहांमध्यें केंद्रांत झाला असूनही



आयुष्यमर्यादा एक वर्षसुद्धां नव्हती ! लग्नेश व अष्टमेश हे शुभ ग्रह असले तरी सुद्धां त्यांची युति आयुष्यहानिकारक असते हें वाचकांनीं लक्षांत घ्यावें.

**बालमृति, कुंडली नंबर ६.**

जन्म:—२४ जून १९०५, मृत्यु ४ डिसेंबर १९०५
दुपारीं ० ४४ वाजतां रात्रीं ११ वाजतां.

**स्पष्ट षड्भाव.**

| लग्न | धन | तृतीय | चतुर्थ | पंचम | षष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| तूळ १२-२२ | वृश्चिक १२ | धनु १२ | मकर १२ | कुंभ १२ | मीन १२ |

**सायन स्पष्ट ग्रह.**

**रवि**, कर्क २-७. **चंद्र**, मीन २६-४५ **बुध**, कर्क २-२ **शुक्र** वृषभ १७-८ **मंगळ** वृश्चिक ८-४४ **गुरु** वृषभ २४-४९ **शनि**, मीन २-४८ वक्री. **हर्शल** मकर २-१५ वक्री. **नेपच्युन** कर्क ७-४१ **राहु** कन्या ३-७.

ह्या कुंडलींत ( १ ) लग्न साधारण बलवान राशीचें असून ( २ ) लग्नेश शुक्र राशीनें बलवान आहे ( ३ ) चंद्र गुरूंचा शुभ योग व ( ४ ) रविशनींचा नवपंचम योग होत आहे. कुंडलीमध्यें शुभदृष्टियोग ज्या गृहांमध्यें होत आहेत त्यापैकीं गुरुचंद्र अष्टम व षष्ठ स्थानांत आहेत. व लग्नेश स्वगृहींचा परंतु अष्टमांत आहे. या योगांमुळें शुभ योगांचें बल बरेंच कमी झालें आहे. आतां आयुष्य हानिकारक योग पहा:—

**लग्न**

( १ ) उदित अंश व नेपच्युन यांचा केंद्रयोग. नियम ५ वा.

( २ ) लग्नेश अष्टमांत व ( ३ ) व्ययेश बुधाबरोबर व ( ४ ) रवी-बरोबर अर्धकेंद्रयोग; व ( ५ ) लग्नेश मंगळाचा प्रतियोग सोडून षष्ठेशाशीं युति करण्यास जात आहे.

नियम ४ था.

**चंद्र**

( ६ ) षष्ठ स्थानांत चंद्र असून ( ७ ) व्ययेश बुध ( ८ ) रवि ( ९ ) व हर्शलबरोबर केंद्र योग करण्यास जात आहे. नियम १ ला.

**रवि**

( १० ) रवि बलहीन राशीचा ( ११ ) नेपच्युनच्या युतींत व ( १२ ) हर्शलबरोबर प्रतियोग करीत असल्यामुळें पीडित आहे. नियम २ रा.

ह्या कुंडलींत आयुष्यकारक योग निर्बली असून मृत्युकारक योग प्रबल व पुष्कळ आहेत आणि तेही अष्टम व षष्ठ या स्थानांतून झालेले आहेत त्यामुळें बालमृत्तींचा योग स्पष्टच आहे.

**बालमृति कुंडली नंबर ७.**

जन्मः—८-४-१८८७ सकाळीं ११-३० मिनिटांनीं

मृत्युः—१० जून १८८७

**स्पष्ट षड्भाव.**

| लग्न | धन | तृतीय | चतुर्थ | पंचम | षष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| कर्क १७-३८ | सिंह १३ | कन्या ९ | तूळ १० | वृश्चिक १४ | धनु १६ |

**रवि**, मेष १८-७; **चंद्र**, तूळ १८-४२; **बुध**, मीन २४-३; **शुक्र** वृषभ १७ ५८; **मंगळ** मेष २१-५५; **गुरु** वृश्चिक २-३८ वक्री; **शनि** **कर्क** १६; **हर्शल** तूळ १०-९ वक्री; **नेपच्युन** वृषभ २६-५

ह्या कुंडलीमध्यें लग्नेश चंद्र केंद्रामध्यें आणि तोहि चतुर्थ केंद्रांत व तूळराशीमध्यें व उदित अंशाबरोबर शुक्र तृतीय एकादश योग करीत आहे. रवि मेषेसारख्या बलवान राशींत आहे यापेक्षां कोणताच शुभ योग दिसून येत नाहीं आणि अशुभ योग मात्र पुष्कळ अत्यंत तीव्र असे झालेले आहेत ते असेः—

**लग्न**

( १ ) लग्न बलहीन राशीचें नियम ३ रा.

( २ ) लग्नांत अष्टमेश शनि. नियम ६ वा.

( ३ ) उदित अंशाबरोबर रवि ( ४ ) चंद्र व ( ५ ) मंगळ यांचे केंद्रयोग. नियम ४ था.



**चंद्र**

( ६ ) चंद्रशनींचा केंद्रयोग ( ७ ) चंद्रहर्शल युतियोग ( ८ ) चंद्ररवींचा प्रतियोग ( ९ ) व चंद्रमंगळांचा प्रतियोग.

नियम १ ला.

**रवि**

( १० ) रवि-मंगळांची युति ( ११ ) रवि-शनींचा केंद्रयोग व ( १२ ) रविहर्शलांचा प्रतियोग. नियम २ रा.

**इतर योग**

( १३ ) केंद्रामध्यें शनि, मंगळ व हर्शल यांचे एकमेकांशीं केंद्रयोग होत असून ते लग्न, चंद्र व रवि या तिघांनाही त्रिघडवीत आहेत

नियम ८ वा.

ह्या कुंडलीमध्यें आयुष्यकारक योग फारच कमी असून मृत्युकारक योग अत्यंत प्रबल आहेत यामुळें बालमृत्यूचा योग घडून आला आहे. ह्या कुंडलींत लग्नेश चतुर्थ स्थानांत पीडित असा आहे. कुंडली नं. ५ मध्येंही लग्नेश चतुर्थस्थानांत पीडित आहे. चतुर्थ स्थान आयुष्याचा शेवट दर्शवितें. तेव्हां त्या स्थानांत लग्नेश असणें—विशेषतः तो तो पीडित असणें आयुष्यास हानिकारक असतो असें मानण्यास हरकत नाहीं.

**बालमृति कुंडली नंबर ८.**

जन्मः—९-१२-१९०९ सकाळीं ८ वाजतां

मृत्युः—१८ जानेवारी १९११.

**स्पष्ट षड्भाव.**

| लग्न | धन | तृतीय | चतुर्थ | पंचम | षष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| मकर ८-२१ | कुंभ ११ | मीन १६ | मेष १९ | वृषभ १८ | मिथुन१३ |

**सायन स्पष्ट ग्रह.**

**रवि** धनु १६-२५; **चंद्र** वृश्चिक ४-६४ **बुध** धनु १९-४२ **शुक्र** कुंभ ३-३३ **मंगळ** मेष १-५२; **गुरु** मेष १०-४३ **शनि** मेष १६-२९

व हर्शल मकर १९-१४ नेपच्युन कर्क १८-४५ व राहु मिथुन ६-१३.

प्रस्तुत कुंडलीमध्यें ( १ ) उदित अंशाबरोबर चंद्राचा शुभ योग व रवि अग्नि राशींत असून गुरु-शनींबरोबर शुभ योग करीत आहे पण रवि अष्टमेश असून व्ययस्थानांत आहे. हे शुभयोग पुढें दिलेल्या अशुभ योगांच्या मानानें फारच बलहीन ठरतात.

———o———

## ध्रुवोन्नतांशाबद्दल खुलासा.

सुलभजातक भाग ३ यामध्यें जे ध्रुवोन्नतांश दिले आहेत ते कोणत्या सारणीवरून केले अशी पृच्छा श्री० अंबाप्रसाद यांनीं केली आहे. ज्यो. पेंडसे यांची सारणी व आम्ही स्वीकारलेली सारणी यांत फरक आहे. आम्ही बरीच ग्राह्य वाटल्यावरून खालील सारणीवरून ध्रुवोन्नतांश तयार केले आहेत. ती सारणी.—

( २३°-२७′ ) परमक्रांति स्पर्शरेषा + इष्टस्थलीय स्पर्शरेषा=भुजज्या (क्ष)

$\frac{१}{३}$ क्ष भुजज्या + परमक्रांति ( २३°-२७′ ) कोटिस्पर्शज्या=ध्रुवोन्नतांश स्पर्शज्या ( ३, ९, ११, ५ या स्थानांचा )

$\frac{२}{३}$ क्ष भुजज्या + परमक्रांति ( २३°-२७′ ) कोटिस्पर्शज्या=ध्रुवोन्नतांश स्पर्शज्या ( २, ८, १२, ६ या स्थानांचा )

या सारणींत घेतलेली परमक्रांति सोडून १८°-३०′ घ्याव्या या मताचे बोस्टन येथील डाल्टन साहेब यांनीं १८°-३०′ घेऊन ध्रुवोन्नतांश तयार केलेले असून ते त्यांनीं आपल्या पुस्तकांत दिले आहेत.

याप्रमाणें ज्यो. पेंडसे यांनीं दिलेली सारणी, आम्ही ग्राह्य केलेली सारणी व डाल्टन साहेबांची सारणी या सर्व आतां वाचकांपुढें आहेत. त्यांतील कोणती ग्रहण करावी व ती कां याचें खुलासेवार स्पष्टीकरण आल्यास बरें.

**विष्णु गोपाळ नवाथे.**

सुलभजातककर्ता.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आम्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्दामतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचिताद्दाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्ति विद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. | जून १९१७. | अंक ३ रा.

## लॉटरीमध्यें पैसे कोणास मिळतात.

चालू महायुद्धाकरितां साम्राज्य सरकारानें १५० कोटी रुपयांचें कर्ज काढण्याचें ठरविलें आहे. त्या कर्जापैकीं पुष्कळसा भाग लॉटरी काढली असतां सहज थोडक्या काळामध्यें उभारता येईल असें कांहीं जणांनीं सुचविल्यावरून अनेक ठिकाणीं सरकारच्या परवानगीनें वारलोन लॉटरी उघडण्यांत आल्या आहेत. लॉटरी उघडून पैसा एकत्र करणें देशाच्या हितसंबंधास विघातक आहे किंवा काय यासंबंधानें विचार करण्याचें क्षेत्र ज्योतिर्मालेचें नसल्यामुळें त्यासंबंधानें आम्हीं कांहीं लिहूं इच्छीत नाहीं. परंतु लॉटरी उघडल्यानंतर आम्हीं लॉटरीचें तिकीट विकत घ्यावें किंवा नाहीं ? घेतल्यास बक्षिस मोठें मिळेल किंवा काय ? किंबहुना यासारखे बरेच प्रश्न आम्हांस शेंकडो लोकांकडून विचारण्यांत आले आहेत व येत आहेत. ज्योतिषशास्त्रदृष्ट्या कोणत्या स्थानावरून लॉटरीचा विचार करितात; ज्यांना ज्यांना

बक्षिसें मिळतात त्यांच्या कुंडलीमध्यें विशेष काय पाहण्यास मिळतें किंवा मिळालें पाहिजे वगैरे संबंधी आमचे विचार आम्ही मालेच्या वाचकांसमोर ठेवण्याचें चालू अंकांत योजिलें आहे. यासंबंधीं जेवढा कुंडलीसंग्रह पाहण्यास मिळाला पाहिजे तेवढा मिळालेला नाहीं. त्यामुळें आजचे आमचे विचार पूर्ण निर्दोषी असतील असें आम्हांस वाटत नाहीं. करितां वाचकवर्गही आम्हांस आपआपले विचार कळवून आमच्या ज्ञानामध्यें भर टाकतील अशी आम्हांस आशा आहे. आर्य ग्रंथामध्यें सट्टे, जुगार किंवा यासारख्या दुसऱ्या कोणत्याही साधनानें मिळणाऱ्या लाभासंबंधानें स्वतंत्र विवेचन झालेलें पाहण्यांत आलें नाहीं. परंतु लाभ, निधि, प्राचीन द्रव्य वगैरे संबंधानें उल्लेख झालेला आहे. पाश्चात्य संस्कृतीबरोबर ज्या अनेक गोष्टी आल्या आहेत त्यांतीलच मोठ्या प्रमाणावर लॉटरीमध्यें लाभ होणें, घोड्याच्या शर्यतींत लाभ होणें वगैरे गोष्टी नवीन आहेत. व त्यामुळें मूळ जातकांतील तत्वावरून नियम बसविले पाहिजेत असें वाटतें कुंडलींतील अमुक एका स्थानावरून लॉटरीचा किंवा घोड्याच्या शर्यतीचा बोध होतो असें म्हणतां येत नाहीं व यासंबंधीं विचार करतेवेळीं आणखी इतर गोष्टीचा अवश्य विचार केला पाहिजे असें आम्हांस वाटतें.

आर्य ज्योतिष वाङ्मयामध्यें सर्व प्रकारचे धनासंबंधानें द्वितीय स्थानावरून व अनेक प्रकारचे द्रव्यादि लाभासंबंधाचा विचार एकादशस्थानावरून करण्यास सांगितलेलें आहे. धनस्थानावरून अमुक एक प्रकाराचें धन मिळतें असा स्पष्ट बोध होत नाहीं. व्यवहारामध्यें निरनिराळ्या माणसांस निरनिराळ्या रीतीनें अर्थप्राप्ति झालेली पाहण्यास मिळते. कित्येकांस नोकरींत उत्तम धनप्राप्ति होते तर कित्येकांस स्त्रीधन मिळतें, कित्येकांस भागिदारीचे व्यापारानें अर्थप्राप्ति होते, कित्येकांस वारसारूपानें धन मिळतें, कित्येकांस मृत्युपत्रानें धन मिळतें व कित्येकांस गुप्त धन—जमिनीमध्यें पुरलेलें मिळतें ह्याप्रमाणें नानाविध प्रकारानें अर्थलाभ झालेले आपणांस पाहण्यास मिळतात. ह्या सर्व धनलाभांचा विचार धन किंवा एकादशस्थानावरून



करितां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. सर्वसाधारणरीत्या जन्मणाराची आयसाधनें, किंवा उत्पन्नाच्या साधनासंबंधी विचार **धनस्थान, धनाधिपति, धनस्थानांतील ग्रह रवि** व **चंद्र** यांवरून करण्याचा प्रघात आर्य व युरोपीय ज्योतिर्विदांमध्यें आहे. फक्त धनस्थानामध्यें जन्मकालीं पापग्रह असल्यामुळें एखादा मनुष्य निर्धन असेल असें अनुमान करितां येणार नाहीं. त्याचप्रमाणें निरनिराळ्या साधनानें होणारे धनलाभ किंवा अर्थप्राप्तीचा विचार धनस्थानावरून खात्रीनें होत नाहीं. निरनिराळ्या लाभासंबंधानें निरनिराळे योग कुंडलींत झाले पाहिजेत अर्थप्राप्ति अमुक एका साधनानें होईल यासंबंधी विचार कर्तव्य असतां ग्रह कोणकोणत्या गोष्टींचे कारक आहेत या गोष्टींकडे विशेष लक्ष देऊन कुंडलींतील कोणते ग्रह धन देणारे आहेत यांचा विचार फार सूक्ष्म रीतीनें करितां आला पाहिजे म्हणजे मग अमुक एका साधनानें धनलाभ होईल असें खात्रीनें सांगतां येईल.

जन्मकुंडलीतील एकादशस्थानास **लाभ** असें नांव आर्यग्रंथांत दिलेलें आहे व या स्थानावरून जन्मणारास प्राप्त होणाऱ्या अनेक लाभांचा विचार करण्यास सांगितलेलें आहे. एकादशस्थानाचा व द्रव्यप्राप्तीचा कार्यकारणसंबंध काय असावा असा प्रश्न सहज विचारी माणसापुढें उभा राहतो. व ह्या गोष्टीसंबंधानें विचार करितां एकादशस्थान हें दशमस्थानाचें—प्रत्येक प्राणिमात्राचें कर्मस्थानाचें म्हणजे केलेल्या कृत्याचें **धनस्थान** असल्यामुळें नोकरीमुळें किंवा आपल्या कोणत्याही कर्मापासून प्राप्त होणाऱ्या द्रव्यलाभासंबंधाचें द्योतक असावें असें वाटतें. ह्याप्रमाणें पाहतां कुंडलींतील निरनिराळीं स्थानें त्या गोष्टींपासून प्राप्त होणाऱ्या द्रव्यलाभासंबंधीं द्योतक झालीं पाहिजेत. उदाहरणार्थ एखाद्यास वारसा मिळण्याचा योग कुंडलींत असेल परंतु चतुर्थ स्थानाचें धनस्थान म्हणजे कुंडलींतील पंचमस्थान असेल तर त्या माणसास त्या इष्टेटीपासून विशेष द्रव्यप्राप्ति होईल असें वाटत नाहीं. लग्नामुळें एखाद्यास द्रव्यलाभ होणें असेल तर सप्तमाचें द्वितीयस्थान म्हणजे कुंडलींतील अष्टमस्थान बलवान असलें पाहिजे त्याखेरीज त्या माणसास

स्त्रीकडून अर्थप्राप्ति किंवा भागीदारांपासून लाभ होईल असें वाटत नाहीं. या विचारसरणीनें पाहतां ज्या कोणास अनेक अकल्पित लाभ होतात त्यांचे कुंडलीमध्यें लाभस्थान, अष्टमस्थान, धनस्थान व पंचमस्थान यांचे अधिपति बलवान व शुभसंबंधित असले पाहिजेत किंवा या स्थानांचे अधिपतींनीं शुभयोग केल्याखेरीज लाटरी, सट्टे, रेसिस ( घोड्याच्या शर्यती ) वगैरेमध्यें लाभ होतील असें वाटत नाहीं.

अष्टमस्थानावरून अकल्पित लाभाचा विचार करावा असें कित्येक ज्योतिर्विदांचें मत आहे परंतु प्राचीन ग्रंथांमध्यें यासंबंधानें उल्लेख आढळत नाहीं. ताजिक निळकंठीकारानें या स्थानावरून प्राचीन द्रव्याचा ( चिरंतन द्रव्य ) विचार करण्यास सांगितलेलें आहे. ही कल्पना त्यानें यवन ग्रंथकारावरून घेतली असली पाहिजे असें वाटतें. कारण क्यालडी लोकांमध्यें या स्थानावरून आकस्मिक रीतीनें प्राप्त होणाऱ्या लाभांचा (unexpected benefits) विचार करण्यास सांगितलेलें आहे. यूरोपीय ज्योतिर्विद या स्थानावरून मृत्युपत्रामुळें मिळणारें धन, भागीदाराचें धन, बायकोकडून मिळणारा हुंडा किंवा द्रव्य यांचा विचार करितात. कित्येक आर्य ज्योतिर्विद ह्या स्थानावरून भूमिगत मिळणाऱ्या द्रव्यासंबंधानें विचार करितात परंतु ही कल्पना यूरोपीय ज्योतिर्विदांमध्यें नाहीं. त्यांचे मतें भूमिगत द्रव्य, (Hidden Treasures ) किंवा खाणींतून मिळणारे खनिज पदार्थ यांचा विचार चतुर्थ स्थानावरून करण्यास सांगितलेलें आहे. ताजिक निळकंठीकारानेंही या स्थानावरून ( चतुर्थ स्थानावरून ) भूमींतील द्रव्या ( ठेवा ) संबंधानें उल्लेख केलेला आहे. चतुर्थ स्थानाचा व खनिज पदार्थांचा संबंध बरोबर आहे. व त्या दृष्टीनें एखाद्यास खाणीमुळें फायदा होईल किंवा नाहीं किंवा एखाद्या खाणींत कोणत्या प्रकारचीं द्रव्यें असतील, तीं कशीं असतील यासंबंधानें विचार कर्तव्य असतां चतुर्थ स्थानाचाच विचार केला पाहिजे असें आम्हांस वाटतें. व ही कल्पना अद्यापपावेतों आमच्यामध्यें रूढ झालेली दिसत नाहीं. चतुर्थ स्थानावरून भूमिगत द्रव्याचा विचार करण्याची कल्पना आपल्यामध्यें कांहीं प्रश्नग्रंथांमध्यें पाहण्यास मिळते.



लॉटरी, सट्टे, वगैरे संबंधीं विचार कर्तव्य असतां पंचम स्थानावरून विचार करावा असें अलिकडील रॅफेल, ॲलन लिओ, सफेरेल वगैरे ज्योतिर्विदांचें मत आहे परंतु ही कल्पना सतराव्या शतकामध्यें होऊन गेलेला प्रसिद्ध ज्योतिषी विईल्यम ल्लिली यांचे ग्रंथामध्यें आढळत नाहीं. जिओमन्सी किंवा रमल शास्त्र यामध्यें पंचम स्थानावरून घोड्याच्या रेसिस सट्टे ( speculations ) वगैरे संबंधानें विचार केलेला आहे करितां लॉटरी, रेसिस किंवा शर्यती, सट्टे संबंधानें विचार करतेवेळीं या स्थानाचा अवश्य विचार केला पाहिजे. प्रसिद्ध यूरोपीय ज्योतिर्विद ॲलन लिओ यानें आपल्या ग्रंथामध्यें या स्थानास **साहस कर्माचें स्थान** (House of Enterprise ) हें नांव दिलें आहे. व या स्थानासंबंधानें खालील प्रमाणें त्याचे थोडक्यांत म्हणणें आहे. "The Fifth House is one that indicates all Speculative things where there is scope for individual effort and initiative, it is therefore known as the house of enterprise. It is the house of the heart, and therefore signifies those things where heart enters largely–love affairs, pleasure seeking, speculations and all forms of enterprises, children and the artistic creative capacity" पंचम स्थानावरून सर्व प्रकारच्या सट्टयाच्या व्यवहाराचा बोध होतो. कारण ह्या धंद्यामध्यें मानवी प्राण्याच्या प्रयत्नास अवसर असतो व म्हणूनच हें स्थान साहस कर्माचें स्थान या नांवानें ज्ञात आहे. हें स्थान मनोविकारांचें द्योतक आहे व म्हणून ज्या ज्या गोष्टींमध्यें मनोविकारांचें जास्त प्राबल्य असतें त्या त्या गोष्टी-स्त्री पुरुष प्रेमभाव किंवा शृंगारचेष्टा, प्रणय, चैनबाजी, विलास, सट्टे, सर्व प्रकारचीं साहस कर्मे, संतति, हुन्नर किंवा कौशल्योत्पादक बुद्धि इत्यादि गोष्टींचा या स्थानावरून बोध होतो.

असे, येथपर्यंत आम्हीं आमच्या वाचकांपुढें निरनिराळ्या ग्रंथकारांचे विचार मांडिले आहेत त्यावरून पाहतां आम्हांस असें वाटतें कीं एखाद्यास लाटरीमध्यें किंवा दुसऱ्या एखाद्या सट्ट्याच्या व्यवहारानें ( Speculations ) पैसे मिळतील किंवा नाहीं या संबंधानें विचार कर्तव्य असतां खालील गोष्टी फार महत्वाच्या आहेत.

( १ ) प्रथमतः कुंडलीमध्यें धनयोग आहे किंवा नाहीं याचा चांगला विचार केला पाहिजे. जर कुंडलींत धनयोग नसेल तर त्यांस आकस्मित धनप्राप्ति होईल असें वाटत नाहीं.

( २ ) धनयोग कोणत्या वर्षी फलद्रुप होत आहे किंवा कोणत्या वर्षी धन पुष्कळ प्राप्त होण्याचा संभव आहे याचा विचार करतां आला पाहिजे.

( ३ ) लाटरीमध्यें किंवा सट्ट्याच्या व्यवहारामध्यें धनप्राप्ति होईल किंवा नाहीं या गोष्टीचा विचार कर्तव्य असतां **धनस्थान, लाभस्थान, पंचमस्थान** व **अष्टमस्थान** ह्या स्थानांचा विचार केला पाहिजे.

( ४ ) धनस्थान, पंचमस्थान किंवा त्यांचे समोरील स्थानें हीं पापग्रहानें पीडित नसावींत किंवा ह्या स्थानांमध्यें पापग्रह नसावेत.

( ५ ) धनस्थान, पंचमस्थान व लाभस्थान यांचे अधिपति केन्द्र कोणामध्यें असून शुभग्रहानें युक्त किंवा शुभसंबंधित असले पाहिजेत; किंवा या स्थानांचे अधिपतींचा अन्योन्य योग झाला पाहिजे म्हणजे धनाधिपति लाभांत व लाभाधिपति धनस्थानांत पंचमेशानें युक्त किंवा शुभसंबंधित असावेत.

( ६ ) ग्रहांमध्यें **शुक्र** हा सर्व प्रकारचे सट्ट्याचे व्यवहारामध्यें पैसे देतो म्हणून तो कुंडलीमध्यें पीडित नसावा त्याचप्रमाणें तो धनाधिपति, लाभाधिपति किंवा पंचमाधिपतिबरोबर शुभसंबंधित असावा.



( ७ ) हर्शेल हा ग्रह विचित्र तऱ्हेनें किंवा एकदम धन देतो करितां तो जन्मकाळीं कुंडलीमध्यें **शुक्र, चंद्र, रवि** व **गुरु** बरोबर शुभसंबंधित असावा.

( ८ ) **गुरु** ग्रह संपत्तीचा कारक आहे व त्यामुळें तो जन्मकाळीं कुंडलीमध्यें शनीनें पीडित नसावा म्हणजे शनीबरोबर त्याचा केन्द्र किंवा प्रतियोग नसावा. हा एक प्रकारचा दारिद्र्ययोग आहे. त्याचप्रमाणें कुंडलींत गुरु मंगळानें पीडित नसावा म्हणजे तो मंगळानें युक्त, केन्द्रयोग किंवा प्रतियोग करीत असतां अशुभ होय. या योगावर जन्म पावलेली मंडळी उधळी व फार खर्चीक असतात.

( ९ ) कुंडलीमध्यें चंद्र शुभसंबंधित असून गुरूबरोबर तृतीय एकादश म्हणजे द्विराश्यंतर दृष्टियोग व नवमपंचम किंवा त्रिकोण दृष्टियोग करीत असावा.

वर दर्शविलेले नऊ सर्वसाधारण नियम आम्हीं जातकांतील सर्वमान्य तत्वास धरून बसविले आहेत व ते आपल्या अनुभवास किती उतरतात हें पाहणें आहे. हें पुनः येथें वाचकांस सांगितलें पाहिजे असें वाटत नाहीं.

प्रस्तुतच्या निबंधांत एखाद्या तिकीटास बक्षीस मिळेल किंवा नाहीं किंवा लाटरीचें तिकीट घेऊं किंवा नको असा प्रश्न विचारला असतां त्याचा विचार प्रश्नकुंडलीवरून कसा करावा यासंबंधानें चार शब्द न लिहितां हा लेख पूर्ण केला असतां तो अपूर्ण भासेल असें वाटल्यावरून त्यासंबंधीं प्रसिद्ध यूरोपीय ज्योतिषी रॅफेल यांचे विचार वाचकांपुढें ठेवून हा बराच लांबलेला लेख पूर्ण करण्याचा आमचा विचार आहे.

**घोड्याचे किंवा इतर शर्यतीसंबंधानें.** अमुक एक घोड्याच्या नांवाची तिकीटें घेतल्यानें मला लाभ होईल काय ?—हा विषय फार कठीण असून हल्लींच्या उपलब्ध असलेल्या पुस्तकांमध्यें यासंबंधीं विशेष माहिती आढळत नाहीं. परंतु या गोष्टीचा खालीलप्रमाणें विचार केला असतां

सहसा उत्तर चुकणार नाहीं. जर तुम्हांला लग्नाधिपति, धनाधिपति किंवा पंचमाधिपति प्रश्नकुंडलीचे दशमांत असलेला आढळेल तर प्रश्नकर्ता ज्या व्यक्तीसंबंधानें किंवा घोड्यासंबंधानें प्रश्न विचारीत असेल त्या घोड्याचें तिकीट घेण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें पंचमाधिपति पंचमांत असून लग्नाधिपति किंवा धनाधिपतीबरोबर शुभसंबंधित असतां वरप्रमाणेंच जाणावें. गुरु पंचमांत किंवा धनस्थानांत बलवान असून पंचमाधिपति केन्द्रांत असून पीडित नसतां वरीलप्रमाणेंच जाणावें. परंतु वरीलप्रमाणें कांहींच योग प्रश्नकालीं नसतां सट्टे किंवा शर्यतीपासून लाभ होईल असें वाटत नाहीं. त्याचप्रमाणें जेव्हां प्रश्नकुंडलीमध्यें एकादशस्थान किंवा एकादशस्थानाचा अधिपति पंचमेश किंवा पंचमस्थानापेक्षां जास्त बलवान आढळेल तर त्या कालीं प्रश्नकर्ता ज्या घोड्यासंबंधीं किंवा दुसऱ्या एखाद्या प्राण्यासंबंधी विचारीत असेल तो खात्रीनें जिंकणार नाहीं.

**मला लॉटरीमध्यें बक्षीस मिळेल काय?** प्रश्नकालीं लग्नाधिपति, धनाधिपति, पंचमाधिपति केन्द्रांत असून बलवान व शुभदृष्ट असतां बक्षीस मिळण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें जर सदरहू स्थानाचे अधिपति बलवान असून प्रश्नकालीं चंद्र पंचमस्थानाचे अधिपतीबरोबर योग करीत असून धनाधिपतीबरोबर शुभसंबंध करण्यास जात असेल तर वरप्रमाणेंच जाणावें. पंचमाधिपति व धनाधिपति बलवान असून दशमांत असतील किंवा बरेच ग्रह केन्द्रामध्यें असतील तर वरप्रमाणेंच जाणावें, परंतु जर का लग्नाधिपति, धनाधिपति किंवा पंचमाधिपति कोणत्याही रीतीनें पीडित असतील किंवा पंचमाधिपति धनस्थानांत असेल तर बक्षीस मिळणार नाहीं. किंवा तुमच्या टिकीटास बक्षीस येणार नाहीं.

---



# अथ घातचतुष्टयं

आर्य फलज्योतिषवाङ्मय इतकें अफाट व विस्तृत आहे कीं त्यांतील अद्यापिहि एक शतांश भागाचें उपपत्तिसहित ज्ञान चालू विसाव्या शतकामध्यें झालें आहे असें आम्हांस वाटत नाहीं. अद्यापि हजारों ग्रंथ अप्रकाशित असून त्यांतील उत्तमोत्तम ज्ञानकण जगाचें निदर्शनास यावयाचे आहेत. फार लांब कशाला **घातचतुष्टय**सारख्या नित्य व्यवहारामध्यें पदोपदीं नजरेस येणाऱ्या गोष्टींवर कितीशा ज्योतिषांनीं विचार केला आहे ? घातचतुष्टयाचें चक्र प्रत्येक वर्षाचे पंचांगामध्यें दिलेलें प्रत्येकानें पाहिलेंच असेल परंतु त्यासंबंधानें फारच थोडक्यांनीं विचार केलेला आढळेल. हें घातचतुष्टयाचें बंड बड्या विद्वानापासून तों तहत खेडवळापर्यंत असलेलें पाहण्यास मिळतें. प्रत्येक ज्योतिषी आपली पत्रिकेची लांबलचक वावडी करते वेळीं त्याचा अवश्य स्वीकार करतो परंतु आपण लिहिलेल्या गोष्टी यजमानास किती मिळतात, किंवा त्या कां मिळाल्या नाहींत याबद्दल विचार फारच थोड्यांना शिवत असेल. हा दोष सर्वस्वीं जोशीबुवांच्या माथ्यावर मारतां येईल असें वाटत नाहीं तर कांहीं गुण सोन्याचा तर कांहीं सोनाराचा असा झाला आहे. पूर्वीसारखा राजाश्रय व लोकाश्रय नाहींसा झाला असून दिवसेंदिवस जीवनकलह तीव्रतम होत आहे त्यामुळें सत्यशोधन व शास्त्रीय विचार करण्याच्या दिशेचा कोन बदललेला आहे व ह्याच व अशा अनेक कारणांनीं हें शास्त्र विद्वानांचे अवकृपेस पात्र झालें आहे.

जन्मकालीं द्वादशराशींपैकीं ज्या राशीमध्यें चंद्र असेल त्यावरून विशिष्ट वार, तिथि, नक्षत्र व चंद्र हे अशुभ फलदायी असतात असें मानिलें आहे व ह्या सर्वांस **घातचतुष्टय** असें म्हणतात. व म्हणूनच सर्व विशिष्ट मह-

त्याच्या कामास हे वर्ज्य करण्यास सांगितलें आहे. खालील प्रमाण ग्रंथांत सांगितलें आहे.

प्रयाणकाले युद्धेच कृषौ वाणिज्यसंग्रहे ।
वादेचैव गृहारंभे वर्जयेत् घातचंद्रमाः ॥

यात्रेस जाण्याचे वेळीं, युद्धास जाण्याचे वेळीं, कृषिकर्मास, व्यापारास—नूतनव्यापाराचा किंवा धंद्याच्या आरंभास धान्यादिसंग्रहास, वादविवादास व घराचे आरंभास घातचंद्र वर्जावा म्हणजे वर सांगितलेल्या गोष्टी ज्या दिवशीं घातचंद्र असेल त्या दिवशीं करूं नयेत.

घातचंद्रो घातवारो घातनक्षत्रमेवच ।
यात्रायां वर्जयेत्प्राज्ञो ह्यन्य कर्मसु शोभनम् ॥

घातचंद्र, घातवार, घाततिथि, व घातनक्षत्र हीं प्रयाणाला, नवीन वस्त्रालंकार इत्यादि धारण करण्याला वर्ज करावीं.

वरील उपलब्ध असलेल्या श्लोकद्वयावरून पाहातां सर्व महत्वाच्या कामास घातचतुष्टय पाहावें असा ग्रंथकाराचा आशय दिसतो. व्यक्तिमात्रांस आपलीं सर्व कृत्यें चांगले तऱ्हेनें शेवटास जाऊन शुभफलदायी व्हावीं असें वाटणें नैसर्गिकच आहे. व त्याप्रमाणेंच प्रत्येक कार्यास शुभाशुभ दिवस वार पाहणें हें मानवी स्वभावाविरुद्ध आहे असें आम्हांस वाटत नाहीं. अनुभवाच्या दृष्टीनें पाहतां विशिष्ट व्यक्तीस विशिष्ट वार, महिना व चंद्र अशुभ जात असलेला पाहण्यास मिळतो. ह्या गोष्टी कोणत्या शास्त्रीय तत्वावर बसविलेल्या आहेत, त्याचप्रमाणें हें घातचतुष्टयाचें बंड कांहीं शास्त्रीय आधारावर आहे किंवा काय यासंबंधांत आम्ही आमचे विचार चालू लेखात वाचकांचे पुढें मांडण्याचें योजिलें आहे. यासंबंधीं वाचकांचा त्याचप्रमाणें इतर ज्योतिर्विदांचा स्वानुभव काय आहे हें ते आम्हांस पत्रद्वारें कळवितील तर यासंबंधांत पुढील एखाद्या अंकामध्यें आणखी विवेचन करण्यास बरीच मदत होईल. व या अनुपलब्ध विषयावर बराच प्रकाश पडेल असें आम्हांस वाटतें.



घातचतुष्टयाची कल्पना फार प्राचीन असावी असें आम्हांस वाटत नाहीं. कारण प्रसिद्ध आचार्य वराहमिहिर यानें आपल्या बृहत् संहितेमध्यें यासंबंधानें उल्लेख केला नाहीं. त्याच प्रमाणें शके १४९३ मध्यें झालेल्या मुहूर्तमार्तंड ग्रंथामध्यें याचा समावेश झालेला आढळत नाहीं. त्यावरून विचार करितां ही घातचतुष्टयाची कल्पना कोणी विचारी पुरुषानें इसवी सनाच्या सोळाव्या शतकानंतर बसविली असावी असें वाटतें. कारण त्या पूर्वीच्या काळीं ही कल्पना जनसमाजामध्यें रूढ असती तर शूल, योगिनी, अडविडलादि संबंधानें विवेचन करणाऱ्या मुहूर्तमार्तंडकाराच्या अवलोकनांतून हा प्रकार सुटला असता असें आम्हांस वाटत नाहीं. अलिकडील ग्रंथांत घातचतुष्टयासंबंधीं म्हणजे वार, नक्षत्र, तिथि व चंद्र ह्यासंबंधानें सांगितलें आहे परंतु त्यास कालांतरानें आणखी चार अंगें मास, करण, योग व प्रहर हीं जोडण्यांत आलीं आहेत व पूर्वींच घातचतुष्टय हल्लीं **घाताष्टक** बनून पूर्ण झालें आहे. त्याचप्रमाणें ज्या श्लोकामध्यें घातचतुष्टय वर्णन केलेलें आहे त्यामध्यें फक्त एकच तिथि सांगितलेली आढळते परंतु दर वर्षीचे पंचांगामध्यें जें घातचक्र देण्यांत येतें त्यामध्यें एकापेक्षां अनेक तिथि दिलेल्या आढळतात. व ह्या जास्त तिथि पाठीमागून मानण्यांत आल्या असतील. कोणत्या राशीचा कोणता घातवार वगैरे असतो हें खालील श्लोकावरून कळेल.

मेषे रविर्मघा प्रोक्ता षष्ठी प्रथम चंद्रमाः ।
वृषभे पंचमो हस्तश्चतुर्थी शनिरेव च ॥ १ ॥
मिथुने नवमः स्वाती अष्टमी चंद्रवासरः ।
कर्के द्विरनुराधा च बुधः षष्ठी प्रकीर्तिता ॥ २ ॥
सिंहे षष्ठश्चंद्रमाश्च दशमी शनिमूलके ।
कन्यायां दशमश्चंद्रः श्रवणः शनिरष्टमी ॥ ३ ॥
तूले गुरुर्द्वादशी स्यात् शतं तृतीयचंद्रमाः ।
वृश्चिके रेवती सप्त दशमी भार्गवस्तथा ॥ ४ ॥

धने चतुर्थो भरणी द्वितीया भार्गवस्तथा ।
मृगेष्टमो रोहिणीच द्वादशी भौमवासरः ॥ ५ ॥
कुंभे एकादशश्चार्द्रा चतुर्थी गुरुवासरः ।
मीने च द्वादशः सार्पे द्वितीया भार्गवस्तथा ॥ ६ ॥

पूर्व ग्रंथकारांनीं सांगितलेलें वरील घातचतुष्टय व हल्लीं त्यांत दुसरे जे आणखी चार प्रकार जास्त जोडण्यांत आले आहेत ते सर्व कोष्टकरूपानें आम्हीं आमच्या वाचकांकरितां येथें देत आहों.

| नांवें | मेष | वृषभ | मिथुन | कर्क | सिंह | कन्या |
|---|---|---|---|---|---|---|
| वार | रवि | शनि | सोम | बुध | शनि | शनि |
| चंद्र | १ | ५ | ९ | २ | ६ | १० |
| नक्षत्र | मघा | हस्त | स्वाति | अनुराधा | मूल | श्रवण |
| तिथि | १,६,११ | ५,१०,१५ | २,७,१२ | २,७,१२ | ३,८,१३ | ५,१०,१५ |
| | ६ | ४ | ८ | ६ | १० | ८ |
| प्रहर | १ | ४ | ३ | १ | १ | १ |
| योग | विष्क | शुक्ल | परिघ | व्या | धृति | शुक्ल |
| करण | बव | शकु | कौस्तु | नाग | बव | कौस्तुभ |
| मास | कार्तिक | मार्गशिर्ष | आषाढ | पौष | जेष्ठ | भाद्रपद |

| नांवें | तुला | वृश्चिक | धनु | मकर | कुंभ | मीन |
|---|---|---|---|---|---|---|
| वार | गुरु | शक्र | शुक्र | मंगळ | गुरु | शुक्र |
| चंद्र | ३ | ७ | ४ | ८ | ११ | १२ |
| नक्षत्र | शततारका | रेवती | भरणी | रोहिणी | आर्द्रा | आश्लेषा |
| तिथि | ४,९,१४ | १,६,११ | ३,८,१३ | ४,९,१४ | ३,८,१३ | ५,१०,१५ |
| | १२ | १० | २ | १२ | ५ | २ |
| प्रहर | ४ | १ | १ | ४ | ३ | ४ |
| योग | शुक्ल | व्यतिपात | वज्र | वैधृ | गंड | वज्र |
| करण | तैतिल | गर | तैतिल | शकु | किंस्तु | चतु |
| मास | माघ | आश्विन | श्रावण | वैशाख | चैत्र | फाल्गुन |



वर दिलेल्या कोष्टकांमध्यें दिलेल्या घाततिथि व पूर्वी उद्धृत केलेल्या श्लोकामधील तिथि यांचे मध्यें मुळींच साम्य नाहीं, घाततिथि समोर प्रथमतः पंचांगामध्यें आढळणाऱ्या तीन घाततिथि दर्शविल्या आहेत त्यानंतर त्याचेखालीं श्लोकामध्यें दर्शित होणारी घाततिथि दर्शविली आहे. त्यावरून मेषराशि खेरीज इतर सर्व राशींच्या घाततिथींमध्यें श्लोकामध्यें दर्शित होणारी घाततिथि येत नाहीं. असें कां व्हावें हें कळणें कठीण आहे. त्याचप्रमाणें ह्या दोन भिन्न मतानें निदर्शनास येणाऱ्या घाततिथींपैकीं खऱ्या कोणत्या व खोट्या कोणत्या ह्यांचा निकाल लागणें फार कठीण आहे. दुसरा एक आणखी महत्त्वाचा मतभेद श्रुतिबोध पंचांगामध्यें आढळण्यांत आला आहे. सदरहू पंचांगामध्यें स्त्रियांस निराळाच घातचंद्र व वार सांगितला आहे. असें मानण्याचें कारण काय असावें याचा खुलासा कोठेंच केला नाहीं. त्याचप्रमाणें हें मत त्यांनीं कोणत्या ग्रंथावरून घेतलें आहे याचाही खुलासा केलेला आढळत नाहीं. यावरून हें मत त्यांचे स्वानुभवावरून ठरलेलें आहे किंवा ग्रंथामधील आहे हें कळण्यास आज मार्ग नाहीं. सृष्टी नियमानें विचार करितां जो वार किंवा चंद्र मेषराशीचे पुरुषास अनिष्ट जावा तो स्त्रीस अनिष्ट कां जाऊं नये असा प्रश्न साहजिक उत्पन्न होतो. जी गोष्ट किंवा योग एकास विशिष्ट कारणानें अनिष्ट असतो तोच लिंगभेदानें दुसऱ्यास अनिष्ट असूं नये असें वाटत नाहीं व असा फलज्योतिषशास्त्राचा अनुभवही सांगत नाहीं. शनिरवीची युति पुरुषकुंडलीमध्यें अनिष्ट फळ दर्शविते तर ती त्यासारखें किंवा लिंगभेदानुरूप फरकानें अनिष्ट फल स्त्रीकुंडलींत दर्शविणार नाहीं असें कोणाही ज्योतिर्विदांस मान्य होणार नाहीं.

वरील कोष्टकावरून घातवारासंबंधीं विचार करितां जन्मकाळीं चंद्र ज्या राशीमध्यें असतो त्या राशिस्वामीच्या शत्रुग्रहाचा जो वार तो घातवार सांगितला आहे परंतु हा नियम सगळ्या ठिकाणीं पाळलेला नाहीं. उदाहरणार्थ मेष वृषभ राशीचा घातवार रविवार व शनिवार हें सांगितलें आहे. मंगळ रवि व शनि शुक्र हे एकमेकांचे मित्र ग्रह असतां त्यांचा वार घातवार कां

मानावा हें कळत नाहीं. मिथुन, कर्क, सिंह, तुला, वृश्चिक, धनु, मकर व मीन ह्या राशींना दिलेले घातवार राशिस्वामीच्या शत्रुत्वाच्या नियमानें आहेत. श्रुतिबोधपंचांगामध्यें स्त्रियांस अधिपतीचा जो वार तोच घातवार सांगितलेला आहे. म्हणजे मेष राशि असतां मंगळवार, वृषभराशि असतां शुक्रवार ह्याप्रमाणें घातवार सांगितलेले आहेत. हाच नियम पुरुषांना कां लागू असूं नये असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो.

घातचंद्रासंबंधानें विचार करितां तो अमुक एका तत्वावर सांगितलेला आहे असें मुळींच आढळत नाहीं. कित्येक राशींना त्या राशीपासून षडाष्टकी असलेला चंद्र घातचंद्र सांगितला आहे तर कित्येक ठिकाणीं त्यांचे त्रिकोणांतील म्हणजे ९।५ स्थानीं असणारा चंद्र घातचंद्र सांगितला आहे व कित्येक राशींना त्याच राशीचा चंद्र घातचंद्र सांगितला आहे. घातनक्षत्रा-संबंधानें तर ह्याहूनही मजेदार प्रकार पाहण्यास मिळतो. जन्मकालीन चंद्रराशीला जी घातनक्षत्रें सांगितलीं आहेत तीं सर्व त्या त्या राशीच्या त्रिकोण राशीमधील आहेत. उदाहरणार्थ मेष राशीच्या पंचमांत सिंह राशि येते व ह्या राशीमधील मघानक्षत्र हें मेषराशीला घातनक्षत्र सांगितलेलें आहे. चंद्रराशीपासून त्रिकोणराशि घातकारक होईल किंवा नाहीं यासंबंधानें शंका वाटते. नक्षत्र म्हणजे विशिष्टराशीपैकीं १३ अं. २०कलेचा भाग होय व ह्या दृष्टीनें पाहतां कोणाही विचारी माणसास घातनक्षत्र व घातचंद्र यांमध्यें कांहीं संबंध असावा असें वाटणें साहजिक आहे. म्हणजे जर मेषराशीला पहिला चंद्र घातचंद्र दिलेला आहे तर त्याच राशीपैकीं असलेल्या सवादोन नक्षत्रांपैकीं एखादें नक्षत्र घातनक्षत्र असणें जास्त सयुक्तिक वाटतें. येथें तर एकमेकांत मुळींच मेळ नाहीं. त्यापेक्षां अमुक नक्षत्रास अमुक नक्षत्रें विपत् व नैधन आहेत त्याअर्थी तीं घातनक्षत्रें मानावींत असें सांगितलें असतें तर तें जास्त सशास्त्र झालें असतें. घातमासाची कल्पना त्या त्या महिन्यामध्यें होत असलेल्या संक्रमणावरून म्हणजे चैत्रामध्यें मेष, वैशाखामध्यें वृषभ या न्यायानें पाहतां दोन ठिकाणीं ८ वी संक्रांत, दोन ठिकाणीं तीच संक्रांत, दोन ठिकाणीं



११ वी संक्रांत, दोन ठिकाणीं ९ संक्रांत व एक ठिकाणीं दुसरी, सातवी, बारावी व नववी ह्याप्रमाणें संक्रांती अनिष्ट मानल्या आहेत. म्हणजे घातमासाची उपपत्ति कोणत्या एका विशिष्ट तत्वास धरून आहे असें म्हणतां येत नाहीं. तिथीसंबंधानें अगोदर एकमत नसल्याचें पूर्वींच सांगितलें आहे. व त्यावरून कांहीं विशिष्ट बोध होईल असें वाटत नाहीं. त्याचप्रमाणें करण, योग, व प्रहर यांचें आहे. या सर्व गोष्टी एकमेकांच्या अनुभवानें ठरल्या पाहिजेत असें आम्हांस वाटतें. ग्रंथांतरीं सांगितलेले घातमास, घातवार, घातचंद्र व घाततिथि हीं जेव्हां एखाद्या महिन्यामध्यें एकत्र येतात त्या वेळीं कसकसा अनुभव मिळतो याचें प्रत्येकानें टांचण ठेवलें पाहिजे म्हणजे त्यावरून कदाचित् सत्य बाहेर पडल्यास नकळे. नुसत्या एकट्या घातवाराचा किंवा घातचंद्राचा कित्येक प्रसंगीं अनुभव येत नसल्यास दोन अथवा तीन घातद्योतक गोष्टी जेव्हां एकच आढळतात त्या त्या वेळीं काय होतें ह्याचें प्रथमतः निरीक्षण झालें पाहिजे.

असो येथपर्यंत ग्रंथांतरीं उपलब्ध असलेल्या घातप्रकरणासंबंधानें सविस्तर विवेचन केलें आहे व आतां यासंबंधी आम्ही आमचे विचार सांगून प्रस्तुत लेख आटोपतां घेणार आहों. प्रथमतः नुसत्या जन्मकालीन विशिष्ट राशी-मधील चंद्रावरून विशिष्ट महिना, दिवस, वार व तिथि शुभाशुभ जावी असें आम्हांस वाटत नाहीं. जन्मकालीन संबंध विचार झाला पाहिजे. विशिष्ट माणसास विशिष्ट महिना किंवा दिवस लाभकारक किंवा हानिकारक जात असल्याचें पाहण्यास मिळतें व तो दिवस (वार) किंवा तो महिना ह्या घातचक्रामधील आढळत नाहीं. कांहीं ठिकाणीं विशिष्ट महिन्यामध्यें कुटुंबांतील माणसांचे मृत्यु, आजार, किंवा संकटें पाहण्यास मिळतात तर कित्येकास विशिष्ट महिन्यामध्यें लाभ झालेले आढळतात. यासंबंधानें खालीलप्रमाणें आमचे विचार आहेत.

जन्मकुंडलीमध्यें जे ग्रह बलहीन व पीडित असतात त्यांचे वार बहुशः अशुभ गेलेले पाहण्यास मिळतात व जे ग्रह बलवान व शुभसंबंधित असतात त्या त्या वारीं अनुकूल चंद्र असतां लाभ झालेला पाहण्यास मिळतो. नक्षत्रा-

संबंधीं विचार करितां जन्मलग्नावरून व जन्मचंद्रावरून जीं जीं नक्षत्रें विपत् व नैधन आढळतात त्या त्या नक्षत्रामधून गोचरीच्या चंद्राचें भ्रमण होत असतां कटु अनुभव आलेला पाहण्यास मिळतो. व जेव्हां जन्मकुंडलीमध्यें ह्या नैधन किंवा विपत् नक्षत्रामध्यें एखादा पापग्रह असून तो जन्मकालीन रवि किंवा चंद्राबरोबर अशुभसंबंधित असतो त्या वेळीं फारच अशुभ अनुभव पाहण्यास मिळतो. खलग्रहांमध्यें मंगळ हर्शल यांचे परिणाम फार तीव्र व शीघ्र असतात. घातमास किंवा अशुभमासासंबंधानें विचार करितां जन्मकुंडलीमध्यें ज्या ज्या राशीमध्यें पापग्रह शनि, मंगळ, हर्शल व नेपच्युन असतात ते यांस म्हणजे तद्योतक संक्रांति म्हणजे ज्या राशीमध्यें पापग्रह असतात तीं संक्रमणें व त्या पापग्रहाचे समोरील राशीचीं संक्रमणें साधारणपणें अनिष्ट जातात. परंतु हा नियम बराच स्थूल आहे. कारण ह्याप्रमाणें पाहिल्यास प्रत्येक कुंडलीमध्यें आठ महिने अनिष्ट असलेले भासतील. म्हणून या गोष्टीसंबंधानें विचार करतेवेळीं नुसत्या पापग्रहाचे स्थितीकडे लक्ष देऊन भागणार नाहीं. तर ते पापग्रह कोणत्या स्थानांत आहेत, ते रवि, चंद्र, दशम, व लग्न यांबरोबर शुभ दृष्टियोग किंवा अशुभ दृष्टियोग करीत आहेत या गोष्टीचा अवश्य विचार केला पाहिजे. जर पापग्रह—शनि, मंगळ, हर्शल व नेपच्यून—हे रवि चंद्राबरोबर किंवा दशमाबरोबर अशुभ संबंधित असतील तर ते मास खात्रीनें अनिष्टसूचक जाणावे, ह्याचप्रमाणें ज्या ज्या ठिकाणीं शुभग्रह असतात व जर ते रवि, चंद्र किंवा दशमावरोबर शुभसंबंधित असे आढळतील तर ते मास किंवा त्या संक्रांति खात्रीनें शुभफलदायी होतील. घातमास, घातवार, घातचंद्र, किंवा घातनक्षत्र ह्यांसंबंधानें विचार करतेवेळीं ते कोणकोणत्या वर्षामधील आहेत याचा विचार केला पाहिजे. एखाद्या संकटप्रचुर वर्षामध्यें हे घातमासादि प्रकार फार तीव्र अनुभवास येतील तर शुभवर्षामध्यें त्यांची तीव्रता कमी असलेली पाहण्यास मिळेल. असो येथपर्यंत आम्हीं आमच्या वाचकापुढें आमचे विचार मांडले आहेत. व आमची खात्री आहे कीं प्रत्येक वाचक आपलें स्वानुभव मालेच्याद्वारें प्रसिद्ध करील.

---

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्‌आप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रांद्रघुवररचिताद्‌आचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. } जुलै १९१७. { अंक ४ था.

## भावसाधन

ज्योतिर्मालेच्या दुसऱ्या वर्षाच्या अकराव्या अंकामध्यें रा. अंबाप्रसाद यांनीं सुलभ जातकांत आणि कुंडलीविज्ञान पुस्तक १ मध्यें मी दिलेले ध्रुवोन्नतांश यांत अंतर येतें म्हणून ते कोणत्या आधारानें आणले व तेच खरे कां हें दाखविण्याबद्दल आव्हान केलें होतें त्यावर रा. नवाथे यांनीं सुलभ जातकांतील ध्रुवोन्नतांश इंग्लिश ग्रंथावरें घेतले आहेत व त्यांत ते खरे असल्याबद्दल अनुभव आला म्हणून ते ग्राह्य केले आहेत असें लिहिलें आहे.

युरोपांत जे ध्रुवोन्नतांश घेतात ते टॉलमीनें काढलेले आहेत व तेच अद्याप उपयोगांत आहेत. भाववृत्तें हीं विषुववृत्तास असलेलीं लघुवृत्तें आहेत. म्हणून अक्षांशवृत्त आणि विषुववृत्त यांचेमधील चर रूप कंसाचे तीन समान

भाग करून त्या प्रत्येकाचे ध्रुव आगले तेच भाववृत्ताचे ध्रुवोन्नतांश होत अशी त्यांची समजूत आहे म्हणून त्यांनीं ते आणण्याची रीति दिली आहे ती

त्रिज्या : महत्तर क्रांतिकोप. रे :: $\frac{1}{3}$ चरकंसाची ज्या : एकादश ध्रुव ज्या परंतु या रीतीनें ध्रुवोन्नतांश स्थूल येतात व ते आलेले ध्रुवोन्नतांश जवळ जवळ अक्षांशाचा $\frac{1}{3}$ आणि $\frac{2}{3}$ असतात.

कंसाचे ३ समान भाग केले तर ते त्या कंसानें झालेला जो प्रदेश त्याचे ३ भाग करीत नाहीं. म्हणजे विषुववृत्त आणि अक्षांश यांच्यामधील जो प्रदेश म्हणजे कटिबंध त्याचे तीन समान भाग होत नाहींत. भाववृत्तें म्हणजे समान भाग करणारीं वृत्तें आहेत तीं तुरीयाचे भाग ६ आणि ३० अंश यांच्या भुजज्येच्या प्रमाणानें केले तर होतील म्हणजे $\frac{1}{2}$ $\frac{4}{5}$ आणि $\frac{1}{1}$ या प्रमाणानें केले तर होतील. ते विषुवृत्तापासून अक्षांशाचे अंतराचा $\frac{1}{2}$ एकादश भावाचें वृत्त ( अक्षांश ) $\frac{4}{5}$ द्वादश भावाचें वृत्त ( अक्षांश ) हे सूक्ष्म पाहिजे तर त्रिकोणमितीनें येतात. मी दिलेले ध्रुवोन्नतांश साधारण त्याच प्रमाणांत आहेत.

टाल्मी इ. स. १५० चे सुमारास होता त्या वेळीं गणिताचें ज्ञान हल्लीं सारखें पूर्णावस्थेंत नव्हतें आणि त्यानें काढलेल्या ध्रुवोन्नतांशांनीं भाव आगले तर फलाचा अनुभव अद्यापपर्यंत साधारण मिळत आहे तेव्हां जरी त्या ध्रुवोन्नतांशांत चुकी असली तरी ती सुधारून भावसाधन कोष्टकें तयार करण्याची खटपट कोणी केली नाहीं. यावरून चुकी कोणाच्या लक्षांत आली नाहीं असें नव्हे. स्पष्टपणें नजरेस आली परंतु फलांत फारसा फरक येत नाहीं म्हणून गतानुगतिकाची कांस कोणी सोडली नाहीं. आलन लिओ अस्ट्रालाजी फॉर ऑल भाग २ पृष्ठ २१ वर म्हणतो :—

The system of division here treated of is known as the "rational method:" it is not identical with that by which, as explained above, the ordinary tables of houses are constructed, though the **ascendant** is the same by both methods; but with regard to the succedent and cadent houses it may be said that the difference is



not sufficient, in the majority of cases, to make the above description in any general sense misleading.

It should however be added that the "Poles" of the houses in this method differ from those given in the table and at end of book and in the "**Table of Ascendants.**"

They are computed as follows :—

( 1 ) For, XII, II, VI & VIII tan Pole=cos 30° ×tan Latitude of the place.

( 2 ) For XI, III, V & IX tan Pole=Cos 60° ×tan Latitude of the place.

तेव्हां ज्यास फुरसत असेल त्यानें या आधारानें शुद्ध भाव आणले तर ते अधिक शुद्ध येतील आणि फल पाहण्यास ज्यास्त मदत होईल.

याप्रमाणें शुद्ध ध्रुवोन्नतांश घेऊन मुंबई अक्षांशाचे भाव दोन मिनिटांत आणण्याकरितां मुंबईचें भावसाधनपत्रक तयार करून सोबत पाठविलें आहे. ( १ ) त्यावरून आलेले भाव ( २ ) शुद्ध ध्रुवोन्नतांश घेऊन त्रिकोणमितीच्या रीतीनें आलेले आहेत आणि ( ३ ) सुलभजातकांतील मुंबईच्या भावसाधन कोष्टकावरून आलेले भाव खालीं दिले आहेत त्यावरून तुलना करतां येईल.

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| दशम | ४-२८-३६ | ४-२८-३६ | ४-२९ |
| एकादश | ६-०-५० | ६-०-४६- | ६-१ |
| द्वादश | ६-२९-५१ | ६-२९-२५ | ६-२९ |
| लग्न | ७·२६-८ | ७-२६-१० | ७-२६-३१ |
| द्वितीय | ८-२३-५२ | ८-२३-५० | ८-२४ |
| तृतीय | ९-२५-३ | ९-२५-० | ९-२७ |

## २ मिनिटांत भाव आणण्याकरितां भावसाधन कोष्टक तयार करण्याची रीति.

( १ ) प्रथम अंशाचे लंकोदय आणावे तसेंच स्वीय अक्षांश, आणि द्वादशभावाचे आणि एकादशभावाचे ध्रुवोन्नतांश यांचे प्रत्येक अंशाचे चर आणावे.

( २ ) लंकोदय १ पासून ९० अंशांपर्यंतचे जे आणलेले तेच होत ९१ पासून १८० अंशांपर्यंतचे लंकोदय १८०० तून उलटक्रमानें लंकोदय वजा करावे म्हणजे ८९ अंशांचे लंकोदय १८०० तून वजा केले तर ९१ अंशाचे येतात.

१ पासून १८० अंशांपर्यंतचे लंकोदयांत १८०० मिळवावे म्हणजे १८१ पासून ३६० अंशापर्यंतचे लंकोदय होतील.

वरप्रमाणें आलेले लंकोदय तेच दशमाचे लंकोदय स्वोदय होत.

( ३ ) वर आणलेले लग्नाचे, द्वादशाचे आणि एकादशाचे चर १ पासून ९० अंशांपर्यंत दशमाचे लंकोदयांतून वजा करावे. ९१ पासून १८० अंशांपर्यंत लंकोदयांतून चर उलट क्रमानें वजा करावे. १८१ पासून २७० पर्यंत चर क्रमानें मिळवावे आणि २७१ पासून ३६० पर्यंत उलट क्रमानें मिळवावे म्हणजे लग्न, एकादश आणि द्वादश यांचे स्वोदय होतील.

### द्वादश भाव तयार करणें

( ४ ) इष्ट कालीन नाक्षत्र कालाचीं पळें करावीं ( १० पळें म्हणजे एक अंश ) जीं पळें होतील तीं दशमांच्या कोष्टकांत पाहून त्यावरून प्रथमचे अंश कोष्टकांतून अंश घ्यावे बाकी राहील त्याच्या त्रैराशिकानें अंशापुढील भाग म्हणजे कला आणाव्या. तो दशमाचा भोग होय.

( ५ ) दशमाच्या नाक्षत्रकालांत ३०० पळें मिळवावीं म्हणजे एकादशाचे



स्वोदय येतील त्यांनीं एकादश कोष्टकांतून पळें पाहून प्रथम कोष्टकांतून अंशादि आणावे म्हणजे एकादशाचे भोग येतील.

( ६ ) एकादशाचे पळांत ३०० पळें मिळवून जे स्वोदय येतील त्यांवरून द्वादशाचे भोग द्वादशाच्या कोष्टकावरून आणावे.

( ७ ) द्वादशाच्या पळांत ३०० किंवा दशमाच्या पळांत ९०० पळें मिळवून जीं पळें येतील त्यांवरून लग्नाच्या कोष्टकावरून लग्नाचे भोग आणावे. याचप्रमाणें ३००,३०० पळें मिळवून द्वादशाचे कोष्टकांतून द्वितीय आणि एकादशाचे कोष्टकांतून तृतीय भाव आणावा. १०,११,१२,१,२,३ यांत ६ राशी मिळविल्या म्हणजे ४,५,६,७,८,९ भाव येतील.

### नाक्षत्रकाल काढण्याची रीति.

हिंदीपंचांगावरून नाक्षत्रकाल काढण्याची रीति खालीं दिली आहे. या नाक्षत्रकालांत एक दोन पळांचा फेर येईल.

सायन रवि करण्याकरितां अयनांश घेणें ते केतकी पंचांगांचे घेतले तर इतर अयनांशांपेक्षां उत्तर जास्त शुद्ध येईल.

रीति—इष्ट कालीन सायन स्पष्ट सूर्य करून त्याचा मेषारंभापासून स्वोदयांनीं मुक्त काल आणून त्यांत इष्ट काल मिळवावा म्हणजे लग्नाच्या मुक्तकालाचे विषुवकाल ( नाक्षत्रकाल ) येईल त्यांतून ९०० पळें वजा केलीं म्हणजे दशमाचा नाक्षत्रकाल येईल.

उदाहरण सुलभ जातकांतील ( सुलभ जातक भाग ३ रा ) घेतलेलें तेंच घेऊं त्यांत १३ एप्रिल १९१५ चे बदल १२ एप्रिल १९१५ पाहिजे.

तारीख १२ एप्रिल १९१५ सकाळचे लोकल ९ वाजतां मुंबईस शके १८३७ चैत्र वद्य सोमवार सकाळीं ९ वाजतां, नाक्षत्र काल आणणें आहे.

रविउदय ५-४९ | स्पष्टरवि ११-२८-३९-२४

इष्टकाळ घटि ७-४७ पळें | सायनरवि ०-२१-१८-५४

अयनांश २२-३९-३० | रविभुक्तकाल १६८ पळें

लग्नभुक्तकाल ६४५ पळें

६४५–९००=३३४५ पळें दशमाचा नाजत्रकाल रफायलवरून आणलेला ३३४३ पळें दशमाचा नाक्षत्रकाल.

---

उदाहरण दुसरें—जन्म मुंबई—शके १७८० कार्तिक शुद्ध ३ सोमवार इष्टकाल घटि २ तारीख ८ नोवेंबर १८५८

रविउदय ६-५ जन्मकाल ६ तास ५३ मिनिटें.

अयनांश २१-१-४९ रविभुक्तकाल २२८९पळें

स्पष्टरवि ६-२३-२३-२६    २३७ मेष

सायनरवि ७-१५-१५-१५    २६६ वृषभ    २२८९ रविभुक्तकाल

३०९ मिथुन    १२० इष्टकाळ

---

३३७ कर्क    २४०९ लग्नभुक्तकाल

३३२ सिंह    –९००

३१९ कन्या

३१९ तुल

---

१६६ वृश्चिक    १५०९ दशमाचे नाक्षत्रकाल

रफायलप्रमाणें १५०९ पळें दशमाचा नाक्षत्रकाळ

मोरवी,    **केशव त्रिंबक पेंडसे**

———o———



मुंबई अक्षांश १८–५७ चे भावलाग्न कोष्टक. ध्रुवोन्नतांश १६–३६ ९–४६

| अंश | दशम | ११ | १२ | लग्न | अंश | दशम | ११ | १२ | लग्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९ | ९ | ८ | ७ | ३६ | ३३७ | ३१३ | २९६ | २९० |
| २ | १८ | १७ | १६ | १५ | ३७ | ३४७ | ३२३ | ३०५ | २९८ |
| ३ | २८ | २६ | २४ | २४ | ३८ | ३५६ | ३३१ | ३१३ | ३०६ |
| ४ | ३७ | ३४ | ३२ | ३२ | ३९ | ३६६ | ३४० | ३२२ | ३१५ |
| ५ | ४६ | ४३ | ४० | ३९ | ४० | ३७६ | ३५० | ३३१ | ३२४ |
| ६ | ५५ | ५१ | ४८ | ४७ | ४१ | ३८६ | ३५९ | ३४० | ३३३ |
| ७ | ६४ | ६० | ५६ | ५४ | ४२ | ३९६ | ३६९ | ३४९ | ३४२ |
| ८ | ७३ | ६८ | ६४ | ६२ | ४३ | ४०५ | ३७७ | ३५७ | ३४९ |
| ९ | ८३ | ७८ | ७२ | ७१ | ४४ | ४१५ | ३८७ | ३६६ | ३५८ |
| १० | ९२ | ८६ | ८० | ७८ | ४५ | ४२५ | ३९६ | ३७५ | ३६७ |
| ११ | १०१ | ९५ | ८८ | ८६ | ४६ | ४३५ | ४०६ | ३८४ | ३७६ |
| १२ | ११० | १०३ | ९६ | ९४ | ४७ | ४४५ | ४१५ | ३९३ | ३८५ |
| १३ | १२० | ११२ | १०५ | १०२ | ४८ | ४५५ | ४२४ | ४०२ | ३०४ |
| १४ | १२९ | १२० | ११२ | ११० | ४९ | ४६५ | ४३४ | ४११ | ४०४ |
| १५ | १३८ | १२८ | १२० | ११८ | ५० | ४७६ | ४४४ | ४२१ | ४१३ |
| १६ | १४७ | १३७ | १२८ | १२६ | ५१ | ४८६ | ४५४ | ४३० | ४२२ |
| १७ | १५७ | १४६ | १३७ | १३४ | ५२ | ४९६ | ४६३ | ४३९ | ४३१ |
| १८ | १६६ | १५४ | १४५ | १४२ | ५३ | ५०६ | ४७३ | ४४९ | ४४० |
| १९ | १७५ | १६३ | १५३ | १४९ | ५४ | ५१६ | ४८२ | ४५८ | ४४९ |
| २० | १८५ | १७२ | १६२ | १५८ | ५५ | ५२६ | ४९२ | ४६७ | ४५८ |
| २१ | १९४ | १८० | १६९ | १६६ | ५६ | ५३७ | ५०२ | ४७७ | ४६८ |
| २२ | २०३ | १८८ | १७७ | १७३ | ५७ | ५४७ | ५१२ | ४८७ | ४७७ |
| २३ | २१३ | १९७ | १८६ | १८२ | ५८ | ५५७ | ५२१ | ४९६ | ४८६ |
| २४ | २२२ | २०६ | १९४ | १९० | ५९ | ५६८ | ५३२ | ५०६ | ४९६ |
| २५ | २३२ | २१५ | २०३ | १९८ | ६० | ५७८ | ५४२ | ५१५ | ५०६ |
| २६ | २४१ | २२४ | २११ | २०६ | ६१ | ५८९ | ५५२ | ५२५ | ५१६ |
| २७ | २५१ | २३३ | २२० | २१५ | ६२ | ५९९ | ५६२ | ५३५ | ५२५ |
| २८ | २६० | २४१ | २२७ | २२३ | ६३ | ६१० | ५७२ | ५४५ | ५३५ |
| २९ | २७० | २५१ | २१६ | २३१ | ६४ | ६२० | ५८२ | ५५४ | ५४४ |
| ३० | २७९ | २५९ | २४४ | २३९ | ६५ | ६३१ | ५९३ | ५६५ | ५५५ |
| ३१ | २८९ | २६८ | २५३ | २४८ | ६६ | ६४१ | ६०२ | ५७४ | ५६४ |
| ३२ | २९८ | २७७ | २६१ | २५६ | ६७ | ६५२ | ६१३ | ५८५ | ५७४ |
| ३३ | ३०८ | २८६ | २७० | २६४ | ६८ | ६६२ | ६२३ | ५९४ | ५८४ |
| ३४ | ३१७ | २९४ | २७८ | २७२ | ६९ | ६७३ | ६३४ | ६०४ | ५९४ |
| ३५ | ३२७ | ३०४ | २८७ | २८१ | ७० | ६८४ | ६४४ | ६१५ | ६०४ |

| अंश | दशम | ११ | १२ | लग्न |
|---|---|---|---|---|
| ७१ | ६९४ | ६५४ | ६२४ | ६१३ |
| ७२ | ७०५ | ६६५ | ६३५ | ६२४ |
| ७३ | ७१६ | ६७५ | ६४६ | ६३५ |
| ७४ | ७२६ | ६८५ | ६५५ | ६४४ |
| ७५ | ७३७ | ६९६ | ६६६ | ६५५ |
| ७६ | ७४८ | ७०७ | ६७६ | ६६५ |
| ७७ | ७५९ | ७१७ | ६८७ | ६७६ |
| ७८ | ७७० | ७२८ | ६९८ | ६८७ |
| ७९ | ७८० | ७३८ | ७०७ | ६९६ |
| ८० | ७९१ | ७४९ | ७१८ | ७०७ |
| ८१ | ८०२ | ७६० | ७२९ | ७१८ |
| ८२ | ८१३ | ७७१ | ७४० | ७२८ |
| ८३ | ८२४ | ७८२ | ७५० | ७३९ |
| ८४ | ८३५ | ७९२ | ७६१ | ७५० |
| ८५ | ८४६ | ८०३ | ७७२ | ७६१ |
| ८६ | ८५६ | ८१३ | ७८२ | ७७१ |
| ८७ | ८६७ | ८२४ | ७९३ | ७८१ |
| ८८ | ८७८ | ८३५ | ८०४ | ७९२ |
| ८९ | ८८९ | ८४६ | ८१५ | ८०३ |
| ९० | ९०० | ८५७ | ८२६ | ८१४ |
| ९१ | ९११ | ८६८ | ८३७ | ८२५ |
| ९२ | ९२२ | ८७९ | ८४८ | ८३६ |
| ९३ | ९३३ | ८९० | ८५९ | ८४७ |
| ९४ | ९४४ | ९०१ | ८७० | ८५९ |
| ९५ | ९५४ | ९११ | ८८० | ८६९ |
| ९६ | ९६५ | ९२२ | ८९१ | ८८० |
| ९७ | ९७६ | ९३४ | ९०२ | ८९१ |
| ९८ | ९८७ | ९४५ | ९१४ | ९०२ |
| ९९ | ९९८ | ९५६ | ९२५ | ९१४ |
| १०० | १००९ | ९६७ | ९३६ | ९२५ |
| १०१ | १०२० | ९७८ | ९४७ | ९३६ |
| १०२ | १०३० | ९८९ | ९५८ | ९४७ |
| १०३ | १०४१ | ९९९ | ९६९ | ९५८ |
| १०४ | १०५२ | १०११ | ९८० | ९६९ |
| १०५ | १०६३ | १०२२ | ९९२ | ९८१ |
| १०६ | १०७३ | १०३२ | १०[illegible]२ | ९९१ |

| अंश | दशम | ११ | १२ | लग्न |
|---|---|---|---|---|
| १०७ | १०८४ | १०४३ | १०१४ | १००३ |
| १०८ | १०९५ | १०५५ | १०२५ | १०१४ |
| १०९ | ११०६ | १०६२ | १०३६ | १०२६ |
| ११० | १११६ | १०७६ | १०४७ | १०३६ |
| १११ | ११२७ | १०८८ | १०५८ | १०४८ |
| ११२ | ११३८ | १०९९ | १०७० | १०६० |
| ११३ | ११४८ | ११०९ | १०८१ | १०७० |
| ११४ | ११५९ | ११२० | १०९२ | १०८२ |
| ११५ | ११६९ | ११३१ | ११०३ | १०९३ |
| ११६ | ११८० | ११४२ | १११४ | ११०४ |
| ११७ | ११९० | ११५२ | ११२५ | १११५ |
| ११८ | १२०१ | ११६४ | ११३७ | ११२७ |
| ११९ | १२११ | ११७४ | ११४८ | ११३८ |
| १२० | १२२२ | ११८६ | ११५९ | ११५० |
| १२१ | १२३२ | ११९६ | ११७० | ११६० |
| १२२ | १२४३ | २२०७ | ११८२ | ११७२ |
| १२३ | १२५३ | १२१८ | ११९३ | ११८३ |
| १२४ | १२६३ | १२२८ | १२०३ | ११९४ |
| १२५ | १२७४ | १२४० | १२१५ | १२०६ |
| १२६ | १२८४ | १२५० | १२२६ | १२१७ |
| १२७ | १२९४ | १२६१ | १२३७ | १२२८ |
| १२८ | १३०४ | १२७१ | १२४७ | १२३९ |
| १२९ | १३१४ | १२८२ | १२५८ | १२५० |
| १३० | १३२४ | १२९२ | १२६९ | १२६१ |
| १३१ | १३३५ | १३०४ | १२८१ | १२७३ |
| १३२ | १३४५ | १३१४ | १२९२ | १२८४ |
| १३३ | १३५५ | १३२५ | १३०३ | १२९५ |
| १३४ | १३६५ | १३३६ | १३१४ | १३०६ |
| १३५ | १३७५ | १३४६ | १३२५ | १३१७ |
| १३६ | १३८५ | १३५७ | १३३६ | १३२८ |
| १३७ | १३९५ | १३६७ | १३४७ | १३३९ |
| १३८ | १४०४ | १३७७ | १३५७ | १३५० |
| १३९ | १४१४ | १३८७ | १३६८ | १३६१ |
| १४० | १४२४ | १३९८ | १३७९ | १३७२ |
| १४१ | १४३४ | १३०८ | १३९० | १३८३ |
| १४२ | १४४४ | १३१९ | १४०१ | १३९४ |



| अंश | दशम | ११ | १२ | लग्न |
|---|---|---|---|---|
| १४३ | १४५३ | १३२९ | १४११ | १४०४ |
| १४४ | १४६३ | १३३९ | १४२२ | १४१६ |
| १४५ | १४७३ | १३५० | १४३३ | १४२७ |
| १४६ | १४८३ | १३६० | १४४४ | १४३८ |
| १४७ | १४९२ | १३७० | १४५४ | १४४८ |
| १४८ | १५०२ | १३८१ | १४६५ | १४६० |
| १४९ | १५११ | १४९० | १४७५ | १४७० |
| १५० | १५२१ | १५०१ | १४८६ | १४८१ |
| १५१ | १५३० | १५११ | १४९६ | १४९१ |
| १५२ | १५४० | १५२१ | १५०७ | १५०३ |
| १५३ | १५४९ | १५३१ | १५१८ | १५१३ |
| १५४ | १५५९ | १५४२ | १५२९ | १५२४ |
| १५५ | १५६८ | १५५१ | १५३९ | १५३४ |
| १५६ | १५७८ | १५६२ | १५५० | १५४६ |
| १५७ | १५८७ | १५७१ | १५६० | १५५६ |
| १५८ | १५९७ | १५८२ | १५७१ | १५६७ |
| १५९ | १६०६ | १५९२ | १५८१ | १५७८ |
| १६० | १६१५ | १६०१ | १५९२ | १५८८ |
| १६१ | १६२५ | १६१२ | १६०३ | १५९९ |
| १६२ | १६३४ | १६२२ | १६१३ | १६१० |
| १६३ | १६४३ | १६३१ | १६२३ | १६२० |
| १६४ | १६५३ | १६४२ | १६३४ | १६३२ |
| १६५ | १६६२ | १६५२ | १६४४ | १६४२ |
| १६६ | १६७१ | १६६१ | १६५४ | १६५२ |
| १६७ | १६८० | १६७१ | १६६५ | १६६२ |
| १६८ | १६९० | १६८२ | १६७६ | १६७४ |
| १६९ | १६९९ | १६९१ | १६८६ | १६८४ |
| १७० | १७०८ | १७०१ | १६९६ | १६९४ |
| १७१ | १७१७ | १७११ | १७०६ | १७०५ |
| १७२ | १७२७ | १७२२ | १७१८ | १७१६ |
| १७३ | १७३६ | १७३१ | १७२८ | १७२६ |
| १७४ | १७४५ | १७४१ | १७३८ | १७३७ |
| १७५ | १७५४ | १७५१ | १७४८ | १७४७ |
| १७६ | १७६३ | १७६० | १७५८ | १७५८ |
| १७७ | १७७२ | १७७० | १७६८ | १७६८ |
| १७८ | १७८२ | १७८१ | १७८० | १७७९ |

| अंश | दशम | ११ | १२ | लग्न |
|---|---|---|---|---|
| १७९ | १७९१ | १७९१ | १७९० | १७८९ |
| १८० | १८०० | १८०० | १८०० | १८०० |
| १८१ | १८०९ | १८०९ | १८१० | १८११ |
| १८२ | १८१८ | १८१९ | १८२० | १८२१ |
| १८३ | १८२८ | १८३० | १८३२ | १८३२ |
| १८४ | १८३७ | १८४० | १८४२ | १८४२ |
| १८५ | १८४६ | १८४९ | १८५२ | १८५३ |
| १८६ | १८५५ | १८५९ | १८६२ | १८६३ |
| १८७ | १८६४ | १८७१ | १८७२ | १८७४ |
| १८८ | १८७३ | १८७८ | १८८२ | १८८४ |
| १८९ | १८८३ | १८८९ | १८९४ | १८९५ |
| १९० | १८९२ | १८९९ | १९०४ | १९०६ |
| १९१ | १९०१ | १९०९ | १९१४ | १९१६ |
| १९२ | १९१० | १९१८ | १९२४ | १९२६ |
| १९३ | १९२० | १९२९ | १९३५ | १९३८ |
| १९४ | ११२९ | १९३९ | १९४६ | १९४८ |
| १९५ | १९३८ | १९४८ | १९५६ | १९५८ |
| १९६ | १९४७ | १९५८ | १९६६ | १९६८ |
| १९७ | १९५७ | १९६९ | १९७७ | १९८० |
| १९८ | १९६६ | १९७८ | १९८७ | १९९० |
| १९९ | १९७५ | १९८८ | १९९७ | २००१ |
| २०० | १९८५ | १९९९ | २००८ | २०१२ |
| २०१ | १९९४ | २००८ | २०१९ | २०२२ |
| २०२ | २००३ | २०१८ | २०२९ | २०३३ |
| २०३ | २०१३ | २०२९ | २०४० | २०४४ |
| २०४ | २०२२ | २०३८ | २०५० | २०५४ |
| २०५ | २०३२ | २०४९ | २०६१ | २०६६ |
| २०६ | २०४१ | २०५८ | २०७१ | २०७६ |
| २०७ | २०५१ | २०६९ | २०८२ | २०८७ |
| २०८ | २०६० | २०७९ | २०९३ | २०९७ |
| २०९ | २०७० | २०८९ | २१०४ | २१०९ |
| २१० | २०७९ | २०९९ | २११४ | २११९ |
| २११ | २०८९ | २११० | २१२५ | २१३० |
| २१२ | २०९८ | २११९ | २१३५ | २१४० |
| २१३ | २१०८ | २१३० | २१४६ | २१५२ |
| २१४ | २११७ | २१४० | २१५६ | २१६२ |

| अंश | दशम | ११ | १२ | लग्न |
|---|---|---|---|---|
| २१५ | २१२७ | २१५० | २१६७ | २१७४ |
| २१६ | २१३७ | २१६१ | २१७८ | २१८४ |
| २१७ | २१४७ | २१७१ | २१८९ | २१९६ |
| २१८ | २१५६ | २१८१ | २१९९ | २२०६ |
| २१९ | २१६६ | २१९२ | २२१० | २२१७ |
| २२० | २१७६ | २२०२ | २२२१ | २२२८ |
| २२१ | २१८६ | २२१३ | २२३२ | २२३९ |
| २२२ | २१९६ | २२२३ | २२४३ | २२५० |
| २२३ | २२०६ | २२३४ | २२५४ | २२६१ |
| २२४ | २२१५ | २२४३ | २२६४ | २२७२ |
| २२५ | २२२५ | १२५४ | २२७५ | २२८३ |
| २२६ | २२३५ | २२६४ | २२८६ | २२९४ |
| २२७ | २२४६ | २२७६ | २२९८ | २३०५ |
| २२८ | २२५५ | २२८६ | २३०८ | २३१६ |
| २२९ | २२६५ | २२९६ | २३१९ | २३२८ |
| २३० | २२७६ | २३०८ | २३३१ | २२३९ |
| २३१ | २२८६ | २३१८ | २३४२ | २३५० |
| २३२ | २२९६ | २३२९ | २३५३ | २३६१ |
| २३३ | २३०६ | २३३९ | २३६३ | २३७२ |
| २३४ | २३१६ | २३५० | २३७४ | २३८३ |
| २३५ | २३२६ | २३६० | २३८५ | २३९४ |
| २३६ | २३३७ | २३७२ | २३९७ | २४०६ |
| २३७ | २३४७ | २३८२ | २४०७ | २४१७ |
| २३८ | २३५७ | २३९३ | २४१८ | २४२८ |
| २३९ | २३६८ | २४०४ | २४३० | २४४० |
| २४० | २३७८ | २४१४ | २४४१ | २४५० |
| २४१ | २३८९ | २४२६ | २४५३ | २४६२ |
| २४२ | २३९९ | २४३६ | २४६३ | २४७३ |
| २४३ | २४१० | २४४८ | २४७५ | २४८५ |
| २४४ | २४२० | २४५८ | २४८६ | २४९६ |
| २४५ | २४३१ | २४६९ | २४९७ | २५०७ |
| २४६ | २४४१ | २४८० | २५०८ | २५१८ |
| २४७ | २४५२ | २४९१ | २५१९ | २५३० |
| २४८ | २४६२ | २५०१ | २५३० | २५४० |
| २४९ | २४७३ | २५१२ | २५४२ | २५५२ |
| २५० | २४८४ | २५२४ | २५५३ | २५६४ |

| अंश | दशम | ११ | १२ | लग्न |
|---|---|---|---|---|
| २५१ | २४९४ | २५३४ | २५६४ | २५७४ |
| २५२ | २५०५ | २५४५ | २५७५ | २५८६ |
| २५३ | २५१६ | २५५७ | २५८६ | २५९७ |
| २५४ | २५२६ | २५६७ | २५९७ | २६०८ |
| २५५ | २५३७ | २५७८ | २६०८ | २६१९ |
| २५६ | २५४८ | २५८९ | २६२० | २६३१ |
| २५७ | २५५९ | २६०१ | २६३१ | २६४२ |
| २५८ | २५७० | २६१३ | २६४२ | २६५३ |
| २५९ | २५८० | २६२२ | २६५३ | २६६४ |
| २६० | २५९१ | २६३३ | २६६४ | २६७५ |
| २६१ | २६०२ | २६४४ | २६७५ | २६८६ |
| २६२ | २६१३ | २६५५ | २६८६ | २६९८ |
| २६३ | २६२४ | २६६६ | २६९८ | २७०९ |
| २६४ | २६३५ | २६७८ | २७०९ | २७२० |
| २६५ | २६४५ | २६८९ | २७२० | १७३१ |
| २६६ | २६५६ | २६९९ | २७३० | २७४१ |
| २६७ | २६६७ | २७१० | २७४१ | २७५३ |
| २६८ | २६७८ | २७२१ | २७५२ | २७६४ |
| २६९ | २६८९ | २७३२ | २७६३ | २७७५ |
| २७० | २७०० | २७४३ | २७७४ | २७८६ |
| २७१ | २७११ | २७५४ | २७८५ | २७९७ |
| २७२ | २७२२ | २७६५ | २७९६ | २८०८ |
| २७३ | २७३३ | २७७६ | २८०७ | २८१९ |
| २७४ | २७४४ | १७८७ | २८१८ | २८२९ |
| २७५ | २७५४ | २७९७ | २८२९ | २८३९ |
| २७६ | २७६५ | २८०८ | २८३९ | २८५० |
| २७७ | २७७६ | २८१८ | २८४० | २८६१ |
| २७८ | २७८७ | २८२९ | २८५० | २८७२ |
| २७९ | २७९८ | २८४० | २८७१ | २८८२ |
| २८० | २८०९ | २८५१ | २८८२ | २८९३ |
| २८१ | २८२० | २८६२ | २८९३ | २९०४ |
| २८२ | २८३० | २८७२ | २९०२ | २९१३ |
| २८३ | २८४१ | २८८३ | २९१३ | २९२४ |
| २८४ | २८५२ | २८९३ | २९२४ | २९३५ |
| २८५ | २८६३ | २९०४ | २९३४ | २९४५ |
| २८६ | २८७३ | २९१४ | २९४३ | २९५५ |



| अंश | दशम | ११ | १२ | लग्न |
|---|---|---|---|---|
| २८७ | २८८४ | २९२५ | २९५४ | २९६५ |
| २८८ | २८९५ | २९३५ | २९६५ | २९७६ |
| २८९ | २९०६ | २९४६ | २९७५ | २९८६ |
| २९० | २९१६ | २९५६ | २९८५ | २९९६ |
| २९१ | २९२७ | २९६६ | २९९६ | ३००६ |
| २९२ | २९३८ | २९७७ | ३००६ | ३०१६ |
| २९३ | २९४८ | २९८७ | ३०१५ | ३०२६ |
| २९४ | २९५९ | २९९८ | ३०२६ | ३०३६ |
| २९५ | २९६९ | ३००७ | ३०३५ | ३०४५ |
| २९६ | २९८० | ३०१८ | ३०४६ | ३०५६ |
| २९७ | २९९० | ३०२८ | ३०५५ | ३०६५ |
| २९८ | ३००१ | ३०३८ | ३०६५ | ३०७५ |
| २९९ | ३०११ | ३०४८ | ३०७५ | ३०८४ |
| ३०० | ३०२२ | ३०५८ | ३०८५ | ३०९५ |
| ३०१ | ३०३२ | ३०६८ | ३०९४ | ३१०४ |
| ३०२ | ३०४३ | ३०७९ | ३१०४ | ३११४ |
| ३०३ | ३०५३ | ३०८८ | ३११३ | ३१२३ |
| ३०४ | ३०६३ | ३०९८ | ३१२३ | ३१३२ |
| ३०५ | ३०७४ | ३१०८ | ३१३३ | ३१४२ |
| ३०६ | ३०८४ | ३११८ | ३१४२ | ३१५१ |
| ३०७ | ३०९४ | ३१२७ | ३१५१ | ३१६० |
| ३०८ | ३१०४ | ३१३७ | ३१६१ | ३१६९ |
| ३०९ | ३११४ | ३१४६ | ३१७० | ३१७८ |
| ३१० | ३१२४ | ३१५६ | ३१८० | ३१८७ |
| ३११ | ३१३५ | ३१६६ | ३१८९ | ३१९७ |
| ३१२ | ३१४५ | ३१७६ | ३१९८ | ३२०६ |
| ३१३ | ३१५५ | ३१८५ | ३२०७ | ३२१५ |
| ३१४ | ३१६५ | ३१९४ | ३२१६ | ३२२४ |
| ३१५ | ३१७५ | ३२०४ | ३२२५ | ३२३३ |
| ३१६ | ३१८५ | ३२१३ | ३२३४ | ३२४२ |
| ३१७ | ३१९५ | ३२२३ | ३२४३ | ३२५१ |
| ३१८ | ३२०४ | ३२३१ | ३२५१ | ३२५८ |
| ३१९ | ३२१४ | ३२४१ | ३२६० | ३२६७ |
| ३२० | ३२२४ | ३२५० | ३२६९ | ३२७६ |
| ३२१ | ३२३४ | ३२६० | ३२७८ | ३२८५ |
| ३२२ | ३२४४ | ३२६९ | ३२८७ | ३२९४ |
| ३२३ | ३२५३ | ३२७७ | ३२९५ | ३३०२ |

| अंश | दशम | ११ | १२ | लग्न |
|---|---|---|---|---|
| ३२४ | ३२६३ | ३२८७ | ३३०४ | ३३१० |
| ३२५ | ३२७३ | ३२९६ | ३३१३ | ३३१९ |
| ३२६ | ३२८३ | ३३०६ | ३३२२ | ३३२८ |
| ३२७ | ३२९२ | ३३१४ | ३३३० | ३३३६ |
| ३२८ | ३३०२ | ३३२३ | ३३३९ | ३३४४ |
| ३२९ | ३३११ | ३३३२ | ३३४७ | ३३५२ |
| ३३० | ३३२१ | ३३४१ | ३३५६ | ३३६१ |
| ३३१ | ३३३० | ३३५० | ३३६४ | ३३६९ |
| ३३२ | ३३४० | ३३५९ | ३३७३ | ३३७७ |
| ३३३ | ३३४९ | ३३६७ | ३३८० | ३३८५ |
| ३३४ | ३३५९ | ३३७६ | ३३८९ | ३३९४ |
| ३३५ | ३३६८ | ३३८५ | ३३९७ | ३४०२ |
| ३३६ | ३३७८ | ३३९४ | ३४०६ | ३४१० |
| ३३७ | ३३८७ | ३४०३ | ३४१४ | ३४१८ |
| ३३८ | ३३९७ | ३४१२ | ३४२३ | ३४२७ |
| ३३९ | ३४०६ | ३४२० | ३४३१ | ३४३४ |
| ३४० | ३४१५ | ३४२९ | ३४३८ | ३४४२ |
| ३४१ | ३४२५ | ३४३८ | ३४४७ | ३४५१ |
| ३४२ | ३४३४ | ३४४३ | ३४५५ | ३४५८ |
| ३४३ | ३४४३ | ३४५५ | ३४६३ | ३४६६ |
| ३४४ | ३४५३ | ३४६४ | ३४७२ | ३४७४ |
| ३४५ | ३४६२ | ३४७२ | ३४८० | ३४८२ |
| ३४६ | ३४७१ | ३४८१ | ३४८८ | ३४९० |
| ३४७ | ३४८० | ३४८९ | ३४९५ | ३४९८ |
| ३४८ | ३४९० | ३४९८ | ३५०४ | ३५०६ |
| ३४९ | ३४९९ | ३५०७ | ३५१२ | ३५१४ |
| ३५० | ३५०८ | ३५१५ | ३५२० | ३५२२ |
| ३५१ | ३५१७ | ३५२३ | ३५२८ | ३५२९ |
| ३५२ | ३५२७ | ३५३२ | ३५३६ | ३५३८ |
| ३५३ | ३५३६ | ३५४१ | ३५४४ | ३५४६ |
| ३५४ | ३५४५ | ३५४९ | ३५५२ | ३५५३ |
| ३५५ | ३५५४ | ३५५७ | ३५६० | ३५६१ |
| ३५६ | ३५६३ | ३५६६ | ३५६८ | ३५६८ |
| ३५७ | ३५७२ | ५७४ | ३५७६ | ३५७६ |
| ३५८ | ३५८२ | ५८३ | ३५८४ | ३५८५ |
| ३५९ | ३५९१ | ३५९१ | ३५९२ | ३५९३ |
| ३६० | ३६०० | ३६०० | ३६०० | ३६०० |

**नाक्षत्रकालः**–कोणत्याही वर्षाच्या पाहिजे त्या तारखेचा माध्यान्हीचा नाक्षत्रकाल पाहिजे असल्यास तो खालील रीतीनें काढावा. हा येणारा नाक्षत्रकाल थोडा स्थूल असतो; तारीख २२ मार्च रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाल ० तास ० मिनिटें असतो. तारीख २२ एप्रिल रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाल २ ता ० मिनिटें असतो. तारीख २२ मे रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाल ४ तास ० मिनिटें असतो. तारीख २१ जून रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाल ६ तास ० मिनिटें असतो. तारीख २२ जुलई रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाल ८ तास ० मिनिटें असतो. तारीख २२ आगस्ट रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाल १० तास ० मिनिटें असतो. तारीख २१ सप्टेंबर रोजीं १२ वाजतां नाक्षत्रकाल १२ तास ० मिनिटें असतो. तारीख २१ आक्टोबर रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाळ १४ तास ० मिनिटें असतो. तारीख २१ नोव्हेंबर रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाल १६ तास ० मिनिटें असतो. तारीख २१ डिसेंबर रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाल १८ तास ० मिनिटें असतो. तारीख २१ जानेवारी रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाल २० तास ० मिनिटें असतो. तारीख २० फेब्रुवारी रोजीं दुपारीं १२ वाजतां नाक्षत्रकाल २२ तास ० मिनिटें असतो. नाक्षत्रकाल दररोज सरासरी ४ मिनिटांनीं वाढतो. उदाहरणार्थ आपणास तारीख ५ एप्रिलचा माध्यान्हीचा नाक्षत्रकाल काढणें आहे. तारीख २२ एप्रिलचा नाक्षत्रकाल २ ता. ० मि.उणें १ ता. ८ मि. ( तारीख ५ एप्रिल तें २२ एप्रिलपर्यंतचे दिवस १७ व दररोज ४ मिनिटांप्रमाणें नाक्षत्रकालाची दैनिक गति )=०ता. ५२ मि. साधारणपणें आपणांस ज्या महिन्याच्या तारखेचा नाक्षत्रकाल पाहिजे असेल त्याच महिन्याच्या त्याच तारखेचा नाक्षत्रकाल कोणत्याही वर्षाचे पचांगांत पाहावा व तो उपयोगांत आणावा हा थोडा स्थूल असतो.

संपादक.

---



# बालमृति.

( ले. राम नारायण )

---

( ३२ पानावरून संपूर्ण. )

कुंडली नंबर ८ मध्यें पुढें लिहिल्याप्रमाणें आयुष्यहानिकारक योग घडले आहेत:—

**लग्नः—**

( १ ) लग्न बलहीन राशीचें आहे. नियम ३ रा.

( २ ) लग्नेश शनि नीच असून लयदर्शक स्थानांत आहे. नियम ४ था.

( ३ ) उदित अंशाबरोबर चतुर्थेश मंगळ व ( ४ ) गुरु केंद्रयोग करीत आहेत. नियम ५ वा.

**चंद्रः—**

( ५ ) चंद्र बलहीन असून ( ६ ) त्याच्या बरोबर शुक्र केंद्रयोग व ( ७ ) मंगळ षडाष्टक योग करीत आहे. नियम १ ला.

**रविः—**

( ८ ) रवि स्थानबलहीन असून ( ९ ) नेपच्युन बरोबर षडाष्टक योग करीत आहे. नियम २ रा.

**इतर योगः—**

( १० ) केंद्रांतून हर्शल शनींचा केंद्र योग ( ११ ) शनि-नेपच्युनांचा केंद्रयोग व ( १२ ) हर्शल नेपच्युनांचा प्रतियोग होत आहे. नियम ८वा.

वर लिहिल्याप्रमाणें अशुभ योग झाले आहेत त्यामुळें बालवयांत मृत्यु घडून आला. बालमृतीचे योग या कुंडलीमध्यें स्पष्टच आहेत.

मागील अंकांत दिलेल्या चार कुंडल्यांमध्यें कोणते योग आयुष्यवर्धक व आयुष्यहानिकारक झाले आहेत हें दाखविलें आहे त्यावरून आयुष्यवर्धक योगांपेक्षां आयुष्यहानिकारक योग बालमृतीच्या कुंडल्यांमध्यें किती प्रबल असतात याची स्पष्ट कल्पना वाचकांस होईल. उदाहरणाकरतां घेतलेल्या कुंडल्यांमध्यें दाखविल्याप्रमाणें या दोन प्रकारच्या योगांची तुलना पान २९ वर दिलेल्या नियमानुसार कोणालाही करतां येण्यासारखी आहे. अशी तुलना करून आयुष्यहानिकारक योगांचें प्राबल्य अधिक आहे असें ठरल्यावर भविष्यकालनिर्णयपद्धतीप्रमाणें मूळचे अनिष्टयोग केव्हां फलद्रूप होतात हें ठरविलें पाहिजे. मूळ कुंडलीमध्यें कोणताही योग झालेला असला तरी तो फलद्रूप होण्याच्या वेळीं भविष्यकालनिर्णयाप्रमाणें तद्योतक ग्रहस्थिति यावी लागते या ज्योतिषशास्त्रांतील मूलभूत सिद्धांताप्रमाणें बालमृतीचे द्योतक योग झाले असले तरी मूळच्या योगांचा अनिष्टपणा तीव्रतर करणारे योग यावे लागतात

भविष्यकाल निर्णय करण्याच्या पद्धति अनेक आहेत पण त्यांमध्यें दिनवर्षपद्धति व परिभ्रमणपद्धति या दोन पद्धती अधिक विश्वसनीय आहेत असा आमचा अनुभव आहे. या दोन पद्धतीनें बालमृतीचा कालनिर्णय होण्यासारखा आहे. प्रस्तुत निबंधांत तत्वतः जे बालमृतीचे नियम सांगितले आहेत ते लक्षांत घेतले व दिनवर्ष व परिभ्रमण या पद्धतीनें कोणत्या वेळीं अनिष्ट योग घडून येतात हें लक्ष्यपूर्वक पाहिलें तर बालमृतीच्या संबंधानें पुष्कळच समाधानकारक असा निर्णय करतां येतो. बालमृतीचे प्रथम नियम नमूद करून त्यांची सत्यता दाखविण्याकरतां प्रस्तुत निबंधांत कांहीं उदाहरणें दिलीं आहेत त्याचप्रमाणें बालमृतीच्या कालनिर्णयासंबंधानें हीं उदाहरणें द्यावयास पाहिजेत परंतु असें करण्यास निबंधाचा विस्तार अधिक करावा लागेल हें जाणून फक्त एकच कुंडलीचा विचार येथें करतों.



बालमृति योगाची नं. ९ ची कुंडली मागील अंकाच्या २७ व्या पानावर दिली आहे. त्या कुंडलीमध्यें मृत्युकारक असे १९ योग झाले आहेत असें दाखविलें आहे. या कुंडलींतील योगावरून मृत्युकाल कोणता याचा विचार करूं, दिनवर्षपद्धतीप्रमाणें जे योग चालू होते ते लक्ष्यांत घेण्यासारखे आहेत.

( १ ) लग्न व नेपच्युन यांचा प्रतियोग ( २ ) मूळ चंद्र व शनि यांचा प्रतियोग ( ३ )मूळ चंद्र व मंगळ यांचा केंद्रयोग ( ४ ) शनि—मंगळांचा केंद्रयोग, हे चारही भयंकर स्वरूपाचे योग चालू होते. 'एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम्" अशी स्थिति होती. हे चार योग चालले असतां मृत्यु नक्की घडणार असें अनुमान करणें कठीण नाहीं. हे योग चालले असतां गोचर ग्रहावरून कोणता महिना अनिष्ट होता हें पाहूं. ज्या ग्रहामध्यें अनिष्ट स्वरूपाचे योग घडून येत आहेत त्या ग्रहांना पीडित करणारीं गोचर ग्रहांचीं भ्रमणें लक्ष्यांत घेतलीं पाहिजेत. नेपच्युन, हर्शल व शनि यांचीं भ्रमणें मूळच्या पीडित ग्रहांवरून पहिल्या वर्षीं होत नव्हतीं. मंगळाचें भ्रमण सप्टेंबर महिन्यामध्यें चंद्राच्या सप्तमांतून, मूळच्या शनीवरून व स्वस्थानाच्या केंद्रांतून होत होतें अर्थात ह्या महिन्यामध्यें मूळ व चलित अशा दोन्ही प्रकारांनीं दर्शविलेल्या मृत्युकारक योगांची तीव्रता अधिक होत होती. त्याच्या नंतर पुढील वर्षाच्या फेब्रुआरीमध्यें मंगळ धनुराशींत शिरून तसाच योग करीत होता. म्हणजे पहिल्या वर्षांत सप्टेंबर व फेब्रुवारी हे दोन महिने मृत्युकालदर्शक होते. सप्टेंबर महिन्यांत चलित चंद्र व गोचर गुरु यांची युति आहे व मंगळाचें भ्रमण प्राणशक्तिकारक रवीच्या त्रिकोणांतून होत होतें. फेब्रुवारी महिन्यांत चंद्रगुरूंचा शुभ योग नसून रवीच्या बरोबर मंगळाचाही शुभ योग होत नव्हता म्हणजे फेब्रुवारी महिना हाच अधिक अनिष्ट ठरतो आणि त्याप्रमाणेंच त्या महिन्यामध्यें मृत्यु घडून आला.

## उपसंहार.

प्रस्तुत निबंधांत बालमृतीचे योग कोणत्या स्वरूपाचे असतात हें पूर्वाचार्यांच्या मताचें निरीक्षण करून सांगितलें आहे. त्यानंतर योगदर्शक कुंडल्यांचा विचार करून कालनिर्णयासंबंधानें स्वमत नमूद केलें आहे आणि एक उदाहरण देऊन कालनिर्णयाची दिशाही दाखविली आहे. अशा रीतीनें बालमृतीचा विचार केलेला आहे त्यावरून वाचकांना बालमृतीच्या शेंकडा नव्वद कुंडल्यांचा निर्णय करतां येईल असें आम्हांस वाटतें.

बालायुष्याचा विचार करतांना आईबापांच्या कुंडल्याही विचारांत घ्याव्या असें कांहीं ज्योतिर्विदांचें मत आहे. मुलांच्या कुंडल्यावरून जो निर्णय करतां येईल त्याला आईबापांच्या कुंडल्यांवरून दुजोरा मिळेल असें आम्हांसही वाटतें. बालमृतीसंबंधानें दुसरी एक महत्वाची गोष्ट कांहीं पाश्चिमात्य ज्योतिर्विदांनीं पुढें आणलेली आहे ती ही कीं जन्मकुंडलीबरोबरच आधानकुंडलीचाही विचार केला तर बालमृतीच्या शेंकडा नव्याण्णव कुंडल्यांचा समाधानकारक निर्णय करतां येतो. या मताचा विचार प्रस्तुत निबंधांत करणें अशक्य आहे कारण आधानकालची कुंडली पाश्चिमात्य ज्योतिर्विद कशी मांडतात या संबंधानें येथें सांगितलें पाहिजे. शेंकडा नव्याण्णव कुंडल्यांचा समाधानकारक निर्णय करणाऱ्या पद्धतीची माहिती कितीही विस्तार करावा लागला असता तरी दिली असती पण या पद्धतीसंबंधानें पाश्चिमात्य ज्योतिर्विदांमध्यें हल्लीं जो वाद चालला आहे त्यावरून निश्चयात्मक असें कांहीं विशेष सांगतां येईल असें दिसत नाहीं. म्हणून प्रस्तुत प्रसंगीं त्या पद्धतीसंबंधानें विचार न करणें हें चांगलें.

---

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्दाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचिताद्दाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. | आगष्ट १९१७. | अंक ५ वा.

## स्फुट विचार

आर्यन एक्सल्शिऑर लीगतर्फे जुन्या गांधर्व महाविद्यालयाच्या जागेंत डॉ. केळकर यांच्या हॉलमध्यें "रोग बरे होण्यास शास्त्रीय पद्धति कोणती ? या वादविवादाच्या सप्ताहास सोमवार ता. १६ जुलै रोजीं सायंकाळीं सुरवात झाली. त्यावेळीं सातारा जिल्ह्यांतील वाटेगाव येथील श्रीयुत **भास्कर रामचंद्र** ज्योतिषी यांचा **"वैद्यकांत फलज्योतिषाचा उपयोग"** यावरील आलेला निबंध वाचून दाखविण्यांत आला होता. हा निबंध जरी सर्वांगसुंदर नाहीं तरी महत्वाचा असल्यामुळें तो आम्हीं ता. १७ च्या इंदु प्रकाशावरून मालेच्या वाचककारितां किंबहुना फल ज्योतिष शास्त्राच्या विद्यार्थ्यांकरितां पुन्हा छापीत आहों. श्रीयुत भास्करराव यांनीं पुणें येथें भरलेल्या वैद्यक

संमेलनांत हेच विचार निबंध रूपानें मांडले होते. परंतु कोणत्याच वर्तमानपत्रांत त्यासंबंधानें उल्लेख नसल्यामुळें आजपर्यंत त्यांतील विचार इतर कोणास कळले नाहींत. पुष्कळ ज्योतिर्विद आपले विचार व शोध इतर मासिककार किंवा वर्तमानपत्रकार यांचेकडे प्रसिद्ध करण्याकरितां पाठवितात परंतु त्यांस ह्या विषयांची गोडी नसल्यामुळें बहुशः केराच्या टोपलीचा आश्रय करण्याचा प्रसंग येतो, तर कित्येक वेळां ते प्रसिद्ध होऊन त्याचा फलज्योतिष विद्यार्थ्यांस जसा उपयोग व्हावयास पाहिजे तसा होत नाहीं. असले विषय फलज्योतिष विषयास वाहिलेल्या मासिकामध्यें आले असतां त्यापासून जितका उपयोग होईल तितका वर्तमान पत्रांत किंवा इतर ठिकाणीं प्रसिद्ध झालेल्या लेखावरून होईल असें वाटत नाहीं.

## वैद्यकांत ज्योतिषाचा–फलज्योतिषाचा उपयोग

"हा आजचा माझा निबंध आहे. ज्योतिषाचें नांव ऐकतांच पुष्कळांना त्यांत कांहीं अर्थ नाहीं, ही वेडी समजूत आहे, हा भोळेपणा आहे असें वाटेल. पण तें चुकीचें होय. फलज्योतिष नैसर्गिक शास्त्रांपैकीं एक होय हें कोणाच्याही कुंडलीच्या भावस्थानावरून विचार करितां आढळून येईल. त्यांतील भावस्थानें व त्यांचीं नांवें आणि त्यांवरून होणारे विचार निसर्गसिद्ध येणाऱ्या अनुभवावरूनच ठरविलेले आहेत. फलज्योतिषाच्या नांवाखालीं पुष्कळ शकुनी भाग जोडल्यामुळें मूळचें स्वरूप ध्यानांत येईनासें झालेलें आहे. अशानें तें शास्त्र भिक्षुकांचे झाल्यानें त्याचा फार थोड्यांना अनुभव येत असतो.

कुंडलींतील **षष्ठ** व **अष्टम** हीं स्थानें **रोगदर्शक** असतात. त्या स्थानांची अनिष्ट ग्रहदशा आली म्हणजे रोग होतो. ग्रह पीडा करितात तेव्हां शरिरांत रोग दोन कारणांनीं उत्पन्न होतात. एक ग्रहांचीं तत्वें शरिरांत कमी झाल्यानें किंवा ग्रहांचीं तत्वें अंगांत जास्त झाल्यानें, जन्मकालच्या ग्रहस्थित्यनुसार जें ठरलेलें आयुष्य असेल तें वाढवितां येणें शक्य नाहीं. त्या वेळीं क्षुल्लक रोगानें



अंत होईल. पण एरव्हीं होणारे रोग बरे करतां येतील. ज्योतिषाचा उपयोग करून तदनुरूप औषधपथ्यादि योजिलें पाहिजे. याचा मी आज दोन वर्षें अनुभव घेत आहें. शेंकडा ८० जणांना गुणही आलेले आहेत. पूर्वीं माझा ज्योतिषावर विश्वास नव्हता, पण आतां निसर्गसिद्ध नियम करण्याकरितां शेंकडों लोकांच्या कुंडल्यांचे परिशीलन करण्याचा मी उपक्रम सुरू केला व असें ठरलें कीं, षष्ठ किंवा अष्टम स्थानीं क्षीण चंद्र, शुक्र, राहु हे ग्रह असतील त्यांना **ऑपरेशन** सोसणार नाहीं. यासाठीं त्यांनीं ऑपरेशन करून घेऊं नये, व डॉक्टर किंवा वैद्य यांनीं तसा सल्लाही देऊं नये. अष्टम स्थानीं **शनि** असल्यास प्लेगसारखे रोग होतात. तेथेंच **शुक्र** असल्यास कॉलेऱ्यासारखे रोग होतात. तेथें **मंगळ** असेल तर मुळव्याधीसारखे रोग जडतात. त्या ठिकाणीं **मंगळ** वक्री व विकृत असेल तर अग्निकांग व्यंग–सहावें बोट, आवाळु वगैरे होत असतें. त्या स्थानीं **रवी** असल्यास अनिष्ट दशा आली तर हिंवताप येऊं लागतो व तो किनाइननें रहात नाहीं, पण देशी वैद्यांच्या काढ्यानें रहातो. लहान मुलांचे रोग मंगळाच्या कमीपणामुळें झाले असतील तर डोंगरे यांचें **बालामृत** देऊन बरे होतात खास. पण तेंच मूल चंद्राच्या दशेनें पीडित असलें तर बालामृताचा कांहीं उपयोग होत नाहीं. षष्ठस्थानाचा स्वामी शुभ असून तो पापग्रहानें दूषित झाला असेल तर मधुमेहासारखे विकार जडतात षष्ठ स्थानीं मेष राशि असेल तर अर्धांगासारखे वातरोग संभवतात. विस्तारभयास्तव जास्त न सांगतां एवढें मात्र सांगणें आहे कीं, फल ज्योतिष शास्त्र शिकून मग रोग्यांना औषधोपचार करणें जास्त हिताचें होणार आहे ॲलोपथी, होमिओपथी, हायड्रोपथी, व्यायामोपचार, उपोषणादि प्रकार वगैरेंत केव्हां कोणत्या उपायानें रोग साध्य व बरा होण्यासारखा आहे हें या शास्त्रानें चांगलें कळेल.

समजा, एका क्षयरोग्याची कुंडली घेतली आणि तिच्यांत षष्ठस्थानीं चंद्र क्षीण आहे, तेथेंच शुक्र आहे, चतुर्थस्थानीं मंगळ असून तो ग्रह

अनिष्ट आहे. डॉक्टर व वैद्य यांनीं क्षयरोग निश्चित केला, औषधोपचार सुरू झाले, प्रथम गांवठी वैद्य थकला—ॲलोपाथी डाक्टर दमले, होमिओपाथी श्रमले, अन्योपचार झाले मग रोगी कंटाळला तेव्हां सर्व सोडून देऊन तो मर्जीप्रमाणें वागूं लागला; व कांहीं उपचार न करितां बरा झाला. असे प्रकार पुष्कळ घडलेले आहेत व नेहमी घडतात पण कोणी **देव पावला** म्हणो, कोणी ताईत बांधोन गुण आला म्हणो, मी म्हणेन कीं, ग्रहानेंच गुण आला. तो इष्ट होता तेव्हां ठीक होतें. अनिष्ट झाला तेव्हां रोग झाला व पुन्हा इष्ट होतांच रोग गेला. मग औषधोपचार होवोत किंवा राहोत; औषधानें बरे होतात तर मग अपवाद कां असतात ? याचें कारण ग्रह होत. यासाठीं रोग्याची परीक्षा दर्शनापेक्षां त्याची कुंडली पाहून करावी. व त्या रीतीनें औषध द्यावें. अशानें औषध अचूक देतां येतें. त्यानें गुण येतो. पैशाचा फुकट व्यय होत नाहीं. रोग असाध्य कोटींत जात नाहीं. पुण्यास भरलेल्या आठव्या वैद्यसंमेलनांत निबंध रूपानें हेच विचार मी मांडले आहेत. मी वैद्य किंवा डॉक्टर नाहीं. पण ज्योतिषशास्त्राची चिकित्सक-बुद्धीनें परीक्षा करतांना आलेला अनुभव आपणांपुढें मांडलेला आहे."

* * * *

त्यानंतर **डॉ. माधव सदाशिव केळकर** यांचें भाषण खालील-प्रमाणें झालें,—

"मी दोन वर्षांत पांच पन्नास कुंडल्या पाहिल्या आहेत. कुंडली बरोबर असली तर रंग, शरीराची ठेवण, व रोग होणारे भाग त्यांवरून कळून येतात. मी एका रोग्याला डाक्टरच्या दृष्टीनें जी माहिती सांगितली तीच त्याला एक ज्योतिषी भेटावयास आला त्यानें सांगितली. दुसरा एक ज्योतिषी मजकडे आला. त्याला मूळव्याध झाली होती ती कापण्यांत धोका आहे असें त्याला ठाऊक होतें ही गोष्ट त्यानें मला सांगितली, तेव्हां न कापतां उपाय मी करीन असें सांगितलें पुढें तो मिरजेस गेला तेथें त्यानें ऑपरेशन



करून घेतलें. त्याला न्यूमोनिया झाला. या दोन महिन्यांत सुख कां वाटत नाहीं, याचा तो विचार करूं लागला. त्याला वाटलें कीं मुहुर्तावर घरून निघालों नाहीं म्हणून असें झालें. पुन्हा तो घरीं जाऊन सुमुहूर्तावर निघाला पण वाटेंतच मरण पावला. इंग्रजींत मेडिकल ॲस्ट्रॉलजी पॅरीस व जर्मनी-मध्यें शिकवितात."

* * * *

डॉ. माधवराव सदाशिव केळकर यांचा अनुभव विशेष महत्वाचा आहे. जन्मकाळ बरोबर असल्यास त्या वेळच्या कुंडलीवरून केलेलें स्वभाववर्णन, आयुष्यांत होणाऱ्या घडामोडी व होणारे रोग वगैरे यांचें वर्णन फारच मार्मिक रीतीनें करितां येतें असा आमचा पुष्कळ वर्षांचा अनुभव आहे. कुंडली-वरून जन्मलेल्या प्राण्यास कोणत्या प्रकारचे रोग कोणत्या वर्षीं होतील याची कल्पना जितकी **ज्योतिर्वैद्यकावरून** करितां येईल तितकी इतर कोणत्याच साधनावरून किंवा परीक्षेवरून करितां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. ज्योतिर्वैद्यकावर मराठीमध्यें किंवा संस्कृतमध्यें आज चांगला ग्रंथ उपलब्ध नाहीं. जुन्या ग्रंथामध्यें यासंबंधानें बरेंच विवेचन पाहण्यास मिळतें परंतु तें जितकें उपपत्तीस धरून असावयास पाहिजे तेवढें वाटत नाहीं. या संबंधांत आम्ही कुंडल्यांचा संग्रह करून अनुमानें बसविलीं आहेत. तीं सवडीनुसार **मालें**मध्यें प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे.

**ज्योतिर्वैद्यकास** डाक्टर लोकांच्या मदतीची अवश्य जरूर आहे. त्यांच्या साह्यशिवाय तें सशास्त्र बनणार नाहीं असें आम्हांस वाटते. ह्या बाबतीमध्यें डॉ. माधवराव सदाशिव केळकर यांचेसारख्यांचें लक्ष वेधत आहे, ही फार आनंदाची गोष्ट आहे. पाश्चात्य देशांत अनेक डाक्टर ज्योतिष जाणणारे असून त्यांनीं रोगी प्रथम भेटण्यास केव्हां आला किंवा तो आजारी केव्हां झाला वगैरे गोष्टींची नोंद ठेऊन नंतर ज्योतिष ग्रंथामध्यें वर्णन केलेल्या कोण कोणत्या गोष्टी कशा अनुभवास येतात याचा चांगला

शोध चालविलेला आहे. मोठमोठालीं ऑपरेशनस् कोणत्या वेळीं केलीं असतां उत्तम यशस्वी होतात याची कल्पना ज्योतिष शास्त्राचे साह्यानें फारच चांगली करितां येते. प्रत्येक गोष्टीस कालाची विशेष आवश्यकता आहे. योग्य हंगाम योग्य नक्षत्रावर व योगावर वनस्पति गोळा केल्या किंवा औषधांचें खल केलें असतां तीं औषधें विशेष गुणकारी होतात असें चांगल्या चांगल्या वैद्यांचें मत आहे. ज्योतिषशास्त्राचें मुख्य काम **कालज्ञान** करून देण्याचें आहे.

* * * * *

ज्योतिर्विद भास्करराव रामचंद्र यांचा निबंध फारच स्थूल दृष्टीनें लिहिलेला असून त्यांतील कित्येक विधानें उपपत्तीस धरून नाहींत. आर्य ज्योतिष ग्रंथामध्यें सांगितलेला रोगविचार फार स्थूल व कित्येक ठिकाणीं तो साफ चुकीचा आहे असें आम्हांस वाटतें. कोणत्याही रोगाचा विचार करते वेळीं तो आधुनिक शारीरशास्त्रास धरून झाला असतां जास्त चांगला असें आम्हांस वाटतें. उदाहरणार्थ क्षय हा विकार किंवा रोग कोणकोणत्या गोष्टींमुळें होतो. त्याचेमुळें शरिरामधील कोणकोणतीं इंद्रियें पीडित किंवा रोगग्रस्त होतात किंवा क्षयाच्या किती जाती आहेत वगैरे गोष्टींची अगोदर माहिती घेऊन नंतर क्षयरोगासंबंधानें नियम केले पाहिजेत. नुसतें षष्ठ किंवा अष्टमस्थानामध्यें चंद्र किंवा शुक्र पीडित असल्यानें क्षय होईलच असें म्हणतां येणार नाहीं. कुंडलीमध्यें षष्ठ अष्टमस्थानामध्यें ग्रह नसतांही क्षय किंवा असेच दुसरे विकार झालेले पाहण्यास मिळतात. जेथें फुफुसाची क्रिया बिघडून किंवा फुफुसामध्यें विकृती झाल्यानें क्षयरोग झाला असेल तेथें विशिष्टच ग्रहस्थिति पाहण्यास मिळते. व जेथें आंतड्यामध्यें विकृती होऊन क्षयाची भावना झाली असेल तेथें निराळीच ग्रहस्थिति पाहण्यास मिळेल. मूत्रपिंडाचे रोग होण्यास किंवा मधुमेह होण्यास षष्ठच स्थान बिघडावें लागतें असें नाहीं. क्रांतिवृत्तामधील द्वादश राशींचा व शरीराच्या निरनिराळ्या अवयवांचा अति निकट संबंध आहे. विशिष्ट राशीमध्यें विशिष्ट ग्रहस्थिति



असतां तद्योतक शरीराचे विभागामध्यें रोग झालेला पाहण्यास मिळतो. ज्योतिर्वैद्यक हा विषय फारच गमतीचा असून फलज्योतिष शास्त्राची सत्यता पटवून देण्याचे कामांत फारच महत्त्वाचा आहे; श्रीयुत भास्करराव हे या विषयामध्यें मन घालून मालेच्या द्वारें आपले विचार म्हणजे कोणती दशा कशी आली असतां कसकशी अनिष्ट फळें मिळतात वगैरे विषयाचें विवेचन करतील अशी आम्हांस आशा आहे.

* * * *

आमचे मित्र ज्योतिर्विद् **अंबाप्रसाद** यांचेकडून **'नक्षत्रांचा घोटाळा'** या विषयावर लहान पण चटकदार लेख आलेला आहे तो आम्हीं आमच्या वाचकांकरितां चालू अंकामध्यें छापिला आहे. ज्यो. अंबाप्रसाद यांनीं आम्हीं पुण्यास स्थापन झालेल्या ज्योतिर्विचारिणी सभेसंबंधें व त्या सभेमार्फत होणाऱ्या सभांची व पंचांग शोधन कार्यासंबंधी माहिती न देण्याचें कारण विचारलें आहे. एक तर या सभेमध्यें काय कार्य होत आहे, ती कोणत्या उद्देशानें स्थापित झाली आहे वगैरे गोष्टींसंबंधानें अद्याप पावेतों आम्हांस मुळींच कोणत्याही प्रकारची माहिती तिच्या चिटणिसांकडून देण्यांत आलेली नाहीं म्हणून या सभेच्या कार्यक्षेत्रासंबंधानें आम्हीं कोणत्याच प्रकारें लिहिलें नाहीं. दुसरें मालेची सांपत्तिक स्थिति एखादा रिपोर्टर ठेऊन बातमी मागविण्यासारखी नसल्यामुळें तशा रिपोर्टांच्या बातमीचा फायदा घेतां आला नाहीं. ज्योतिर्विचारणी सभेकडून कोणतीही माहिती वगैरे मालेमध्यें प्रसिद्ध होण्याकरितां आली असती तर ती आम्हीं मोठ्या आनंदानें प्रसिद्ध केली असती. ज्योतिर्विचारिणी सभेस ज्योतिर्मालेची माहितीच नाहीं असें आमच्यानें म्हणवत नाहीं.

# नक्षत्राचा घोंटाळा !

[ लेखक—अंबाप्रसाद. ]

पुण्यास स्थापन झालेल्या ज्योतिर्विचारणी सभेमार्फत दर आठवड्यास या ज्योतिष विषयावर व्याख्यानें होत आहेत. अशीं व्याख्यानें होत असून त्याचा सारांश वर्तमानपत्रांतूनही येतो. केवळ ज्योतिष विषयास वाहिलेल्या 'ज्योतिर्मालेंत' असल्या सभांचे व त्या सभांतून झालेल्या व्याख्यानांचे खुलासेवार रिपोर्ट येणें वाजवी असतां तसें झाल्याचें आजपर्यंत दिसलें नाहीं, इतकेंच नव्हे तर अशा सभा होत असल्याची वार्ताही ज्योतिर्मालेच्या संपादकांनीं आपल्या वाचकांस दिली नाहीं असें कां ? जर ज्योतिर्विचारांस जागा दिली नाहीं तर मग कोणत्या विषयास द्यावयाची ? मला वाटतें असा एखादा रिपोर्टर मालाकारांनीं पुण्यास ठेवला नसावा.

पण असा रिपोर्टर जरी ठेवला नसला तरी ज्योतिर्विचारिणी सभेच्या चिटणिसांनीं तरी सभेची साग्र हकीकत ज्योतिर्मालेकडे पाठवावयाची होती. ती पाठवून छापली जाणार नाहीं असें मला तरी वाटत नाहीं. जर हीच खरी स्थिति असेल तर तिची सुधारणा यापुढें तरी ज्योतिर्विचारिणी सभेचे चिटणीस करतील अशी आशा करितों.

ज्योतिर्विचारिणी सभेमार्फत झालेल्या व्याख्यानमालेंत वे. भाऊ शास्त्री लेले यांचें एक व्याख्यान झालें व त्यांनीं एक चमत्कारिक कोडेंच उलगडिलें म्हणावयाचें. हें कोडें ऐकून सर्व सायन व निरयन ज्योतिषवर्गास आश्चर्यच वाटेल व त्या कोडयामुळें येथील पंचांगकार सिद्धांती ज्योतिष्यांस नक्षत्रें करितांना मोठें संकट पडेल ! हें कोडें भाऊ शास्त्र्यांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे "सायनवादी नक्षत्रें विभागात्मक मानतात तें खरें न मानतां आपलीं निरयन नक्षत्रेंच मानावीं" असें आहे.



या अभूतपूर्व सिद्धांताचा उच्चार करतांना भाऊशास्त्र्यांपुढें काय विचार असतील कोणास ठाऊक ! ते कोणत्याही धार्मिक विवेचनाचा मनांत विचार करीत असावेत. नाहींतर असे उद्गार ते कधींच काढतेना. सायन व निरयन हा वाद अयनचलनामुळें आहे. अयनचलनाशिवाय इतर कोणताही मुद्दा या सायननिरयनवादाच्या मुळाशीं नाहीं. सायन व निरयन नक्षत्रें हीं विभागात्मकच आहेत. तारकात्मक नाहींत. तारकात्मक नक्षत्रें हीं आकाशांत नेमक्या १३ अंश २० कला अंतरानें क्रांतिवृत्तांत बसलेलीं नाहींत, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट असतां भाऊ शास्त्र्यांस निरयन नक्षत्रें तीं हींच असा भ्रम झाला आहे. पण हा त्यांचा भ्रम त्यांनीं एखाद्या सिद्धांती पंचांगगणकास—मोघे शास्त्री अगर ज्यो. केतकर यांस—आगाऊ विचारल्यास सहज दूर झाला असता. आतां तरी भाऊ शास्त्री येवढे श्रम घेऊन निरयन नक्षत्रेंही विभागात्मक आहेत असें कबूल करतील काय ? तारकात्मक नक्षत्रांचा खुलासा पुढें एखादे वेळीं करण्याचा मानस आहे.

# ग्रहांच्या गोचर भ्रमणाचा विचार

भविष्य कालनिर्णय करण्याच्या पद्धतीविषयीं सोपपत्तिक विवेचन करण्याबद्दल अम्हांस अनेकांकडून पत्रें येत असल्यामुळें पालेच्या चालू अंकामध्यें यासंबंधानें चार शब्द लिहिण्याचा आमचा विचार आहे. जातक विभागामध्यें हा विभाग फार महत्वाचा असून तो तितकाच बिकट आहे. निरनिराळ्या ज्योतिर्विदांनीं ह्यासंबंधीं अनेक प्रयत्न केलेले आढळतात. परंतु अद्यापि हा विभाग पूर्ण झालेला आढळत नाहीं. कुंडलीमध्यें दर्शविलीं जाणारीं फळें कधीं मिळतील हा प्रश्न सर्वांसच सारखा महत्वाचा आहे. एखाद्या कुंडलीमध्यें अल्पायुत्व दर्शविलें जात असल्यास तो योग कधीं पूर्णत्वानें अनुभवास येईल हें जाणण्याची इच्छा मानवी प्राण्यास होणें साहजिकच आहे. कुंडलीवरून जर भविष्यकालाची मर्यादा बांधतां आली नाहीं तर सर्व ज्योतिषशास्त्र लंगडें

पडतें हें येथें आज नव्यानें सांगितलें पाहिजे असे वाटत नाहीं. व हा काळ जर कळला नाहीं तर अनिष्ट फलें टाळण्याचा प्रयत्न देखील करितां येणें शक्य नाहीं. भविष्यकाल निर्णय करण्याचा एखादा चांगला सोपा व सहज सर्वांस आकलन करणारा मार्ग अद्याप पावेतों उपलब्ध झालेला नाहीं. निरनिराळ्या राष्ट्रांतील ज्योतिर्विदांनीं यासंबंधानें अनेक शोध करून अनेक प्रकार कल्पिले आहेत. **भारतवासीय** आर्य ज्योतिर्विदांनीं कालनिर्णयाकरितां **दशा** व **गोचर** ग्रहांची पद्धति विचारामध्यें घेतलेली आहे. या दशा अनेक असून आजच्या निबंधांत त्यांसंबंधानें कांहींच उल्लेख करण्याचा आमचा विचार नाहीं. यूरोपीय ज्योतिर्विद हे सध्या **गोचरी** ( Transits ) **प्रायमरी डायरेकशनस, सेकंडरी डायरेकशनस, सोलर रेव्होल्युशन** ( वर्षप्रवेश ) वगैरे आणखी तीन चार प्रकार उपयोगांत आणीत आहेत. त्यांत विशेषत: हल्लीं प्रायमरी डायरेकशननें फलें वर्तविणारे व सेकंडरी डायरेकशननें ह्यालाच प्रोग्रेसिव्ह डायरेकशनस असें म्हणतात ( दिनवर्ष पद्धतीनें ) फलें वर्तविणारे असे दोन मुख्य वर्ग झालेले आहेत. गोचरीनें ग्रह पाहण्याची पद्धति दोन्ही वर्गांस कबूल आहे परंतु आर्यांची गोचर पद्धति यूरोपीय पद्धतीपेक्षां भिन्न असून अपुरी आहे. आपल्याकडे बहुजन समाजामध्यें विशेषत: **ताजीक, दशा** व **गोचर** पद्धतीनेंच कालनिर्णय करीत असल्याचें मागें सांगितलें आहे. त्यानंतर कै. रा. रा. चिटणीस यांनीं आपल्या **परिभ्रमणपद्धती**संबंधानें पूर्वीच्या ज्योतिर्मालेमध्यें उल्लेख केला असून त्या पद्धतीसंबंधानें आम्हीं वाचकांस लवकरच माहिती देणार आहोंत; या पद्धतीसंबंधानें वारंवार आम्हीं ज्योतिर्मालेमध्यें उल्लेख केलेला आहे. पाश्चिमात्य पद्धतींपैकीं दिनवर्ष पद्धतीसंबंधानें सविस्तर विवेचन आम्ही **जातकनिधि** पुस्तकामध्यें केलेलें आहे, करितां प्रस्तुत निबंधामध्यें गोचर पद्धतीचा किंवा ग्रहाच्या दैनंदिन परिभ्रमणानें होणाऱ्या कालज्ञानपद्धतीचा विचार करण्याचें योजिलें आहे. गोचर ग्रहासंबंधानें आर्य व यूरोपीय कल्पनासंबंधानें थोडासा खुलासा आम्हीं आमच्या **बालबोध ज्योतिष** पुस्तकामध्यें केला आहे तो पहावा. त्याचप्रमाणें



ज्योतिर्माला अंक ३ वर्ष २ मध्यें **नाक्षत्र गोचरी**संबंधानें खुलासा केलेला आहे तोही महत्वाचा आहे. आतां प्रस्तुत अंकामध्यें जन्मकालीन ग्रहावरून गोचर ग्रहांच्या भ्रमणानें प्राप्त होणाऱ्या फलादेशाचा खुलासा करणें आहे.

सर्व पतद्धीमध्यें गोचर ग्रहानें भविष्य वर्तविण्या इतकी सोपी व सरळ पद्धति आज उपलब्ध नाहीं. या पद्धतीनें भविष्य करणें असतां जन्मकुंडली व पुढील पंचवीस वर्षांचे स्पष्ट ग्रह असले म्हणजे काम भागतें. पुढील २०० किंवा ८०० वर्षांचे ग्रह अंशात्मक व बरेच सूक्ष्म असे कै. चिटणीसांच्या **ग्रहसाधन** पुस्तकावरून पांच मिनिटांत तयार करितां येतात; करितां हें पुस्तक प्रत्येक ज्योतिषविद्यार्थ्याचे संग्रहीं अवश्य असलें पाहिजे. गोचर पद्धतीनें भविष्य करते वेळीं कित्येकजण लहान सहान क्षुद्र गोष्टींवरून मोठमोठाल्या संकटांची किंवा अनिष्ट काळाची कल्पना करितात तर कित्येकजण लहान सहान योगावरून अनेक मोठाल्या लाभांची कल्पना करितात हे दोन्ही प्रकार फारच गौण आहेत. व त्याचमुळें गोचर ग्रहासंबंधी पूर्ण ज्ञान होण्यास अनेक कुंडल्यांचें परीक्षण व अनुभवाची विशेष जोड असावी लागते. त्याकरितां प्रथमत: कोणत्याही कुंडलीवरून भविष्यकाल निर्णय करण्यापूर्वीं जन्मकुंडलीचा पूर्ण विचार करितां आला पाहिजे व कुंडलींतील कोणते ग्रह कोणत्या गोष्टींचे द्योतक किंवा कारक आहेत याचा बोध झाला पाहिजे. नंतर जन्मकालीन ते ग्रह कोणत्या राशीमध्यें आहेत याचा विचार केला पाहिजे व शेवटीं गोचरीनें कुंडलीच्या कोणत्या स्थानामधून गोचर ग्रहाचें भ्रमण होत आहे याचा साग्र विचार करावा. व अशा रीतीनें व काळजीपूर्वक केलेलें भविष्य सहसा चुकणार नाहीं. डॉक्टर **सिमोनाईट** हे आपल्या सोलर रेव्होल्युशन–वर्ष प्रवेशावरील पुस्तकामध्यें गोचर ग्रहासंबंधानें खालीलप्रमाणें म्हणतात "गोचर ग्रहांच्या परिणामासंबंधीं जी आधुनिक व प्राचीन ज्योतिर्विदांची कल्पना आहे त्यापेक्षां किती तरी पटीनें गोचरग्रह जेव्हां दैनंदिन भ्रमणानें जन्मकालीन स्थानावरोबर दृष्टियोग करितात किंवा दुसऱ्या एखाद्या ग्रहावरून

जातात किंवा त्यांचेबरोबर प्रतियोग–पूर्ण दृष्टियोग करितात त्या वेळीं त्यांचीं फलें विशेष स्पष्टपणानें व विशेष बाबतींमध्यें अचुक अनुभवास आलेलीं पाहण्यास मिळतात. कित्येक ज्योतिर्विदांचे मतें वर्षप्रवेश झाला नाहीं तोंच पुढील दोन तीन आठवड्यांत होणारीं गोचर ग्रहांचीं भ्रमणें तेवढींच महत्वाचीं आहेत; परंतु ही कल्पना मला हास्यास्पद वाटते; कारण अनुभव मला असें सांगत आहे कीं मोठ्या ग्रहांचे ज्या वेळीं कुंडलींतील इतर ग्रहांवरून भ्रमण होतें त्या वेळीं त्यांचे परिणाम फारच ठळक पाहण्यास मिळतात. व प्रायमरी डायरेक्शनपेक्षां किती तरी स्पष्ट व अचुक रीतीनें गोचर ग्रहांच्या भ्रमणानें भावी कालाची कल्पना करितां येते.”

**जन्मकालीन कुंडलींतील ग्रहावरून व इतर स्थानामधून जें ग्रहांचें दैनंदिन भ्रमण होतें त्यास गोचर असें येथें म्हटलें आहे.** चंद्राच्या अमुक एका स्थानांतून होत असलेल्या ग्रहांच्या भ्रमणास हा शब्द लावण्याचा प्रचार आहे परंतु येथें तो त्या अर्थानें उपयोगांत आणलेला नाहीं. पुष्कळ दिवसांच्या अनुभवावरून पाहतां विशिष्ट तऱ्हेचीं गोचर भ्रमणें चाललीं असतां तद्योतक गोष्टी घडल्या नाहींत असें फार क्वचित् पाहण्यास मिळतें. गोचर ग्रहांचीं भ्रमणें दिनवर्ष पद्धतीबरोबर विशेषतः घेतलीं पाहिजेत. ज्या वर्षीं दिनवर्ष पद्धतीनें अनिष्ट काल दर्शविलेला असतो त्या वर्षांतील अनिष्ट गोचर ग्रहांचीं भ्रमणें फारच तीव्रतेनें अनुभवास येतात.

गोचर ग्रहांच्या भ्रमणासंबंधीं विचार कर्तव्य असतां जन्मकालीं **रवि** व **चंद्र** ज्या राशीमध्यें आहेत त्या राशि, ह्या दोन ग्रहांबरोबर ज्या राशीमधून दृष्टियोग होत असतील त्या राशि व त्यांच्या क्रांति इत्यादि गोष्टी फार महत्वाच्या आहेत. त्याचप्रमाणें जन्मकुंडलींचीं **केंद्रस्थानें** त्यांत विशेषतः दशमस्थानावरील उदित अंश हा अति महत्वाचा आहे. त्याचे खालोखाल **लग्नीं** उदित असलेला अंश हा आहे. त्यानंतर **चतुर्थ** स्थानावरील उदित अंश कारण या अंशामधून जाणारा ग्रह दशमस्थनाबरोबर पूर्ण दृष्टियोग करित असतो, धनस्थान



व नंतर सप्तमस्थान होय याप्रमाणें गोचरग्रहांचीं भ्रमणें पाहतांना वरील स्थलें विचारांत घ्यावींत. कुंडलीमधील विशिष्ट कोणता विभाग विशेष शीघ्रसंस्कार ग्रहण करणारा आहे याची कल्पना गोचर ग्रहावरून फार उत्तम करितां येते. व ज्यांनां ग्रहांचे परिणामासंबंधीं विशिष्ट बारकाईनें अनुभव घेणें असेल त्यांनीं गोचर ग्रहांचीं भ्रमणें कोणकोणत्या ग्रहावरून वगैरे होत आहेत याचें टांचण करून काय काय गोष्टी घडतात याचें निरीक्षण केलें पाहिजे. जन्मकालीं ग्रह ज्या मानानें बलवान व शुभ किंवा अशुभसंबंधित असून ज्या स्थानामध्यें असतात त्याप्रमाणें गोचर ग्रहांचे परिणाम पाहण्यास मिळतात. जन्मकालीं गुरु कन्या राशीमध्यें असतां निर्बळी असतो करितां त्याचे गोचर भ्रमणामुळें विशेष फायदा होईल अशी कल्पना करणें चुकीचे होईल. ह्याचप्रमाणें प्रत्येक ग्रहासंबंधानें विचार केला पाहिजे म्हणजे जन्मकालीं जे ग्रह राशिबली, स्थानबली व शुभसंबंधित असतील त्यांचींच फलें शुभ मिळतील व जे ग्रह नीचीचे पापदृष्ट व पीडित असतील त्यांचीं फलें अशुभ मिळतील. जेव्हां **गुरु** किंवा **शुक्र** आपल्या जन्मकालचे स्थानीं येतात किंवा आपल्या उच्चांत येतात, जन्मकालचे **रवि चंद्रा**वरून जातात व ते जन्मकालीं जर शुभसंबंधी असतील तर त्या त्या वेळीं शरीरप्रकृती चांगली राहते, धंदा रोजगार चांगला चालतो. परंतु जन्मकालीं **रवि** व **चंद्र** पीडित असतां वरील अनुभव मिळणार नाहीं, शरीरप्रकृती चांगली रहात नाहीं व पुष्कळ खर्च होतो. जन्मकुंडलींत ज्याप्रमाणें ग्रह शुभसंबंधित व बलवान असतात त्याप्रमाणें ते शुभाशुभ फलें दर्शवितात. कुडलींत जो ग्रह बलवान व शुभसंबंधित असतो त्याचेच गोचरीनें होणारें भ्रमण विशेष महत्वाचें असतें. वर सांगितल्याप्रमाणें साग्र विचार करून खालील फलावरून भावी कालाची कल्पना केली असतां ती सहसा चुकणार नाहीं.

———o———

# प्रजापती किंवा हर्शलचें भ्रमण

जन्मकालीन **शनीवरून** ज्या वेळीं हर्शलचें भ्रमण होतें त्या वेळीं आकस्मिक रीतीनें नुकसान होतें, उंचावरून पडण्याची भीति असते, क्वचित कैद होईल, एखाद्या म्हाताऱ्या मित्राचा मृत्यु होतो; लग्नाच्या उदित अंशावरून होत असतां अपघातासंबंधीं सावध रहावें; दशमाच्या उदित अंशावरून होत असतां धंद्यामध्यें काळजी उत्पन्न होते. सप्तमस्थानाच्या उदित अंशावरून होत असतां भागीचे व्यापारासंबंधीं सावध राहावें.

वरील ठिकाणीं शनि असून त्यावरून भ्रमण होत असता वरील फळें तीव्रतेनें मिळतील. गोचरीनें हर्शल शनीबरोबर ज्या ज्या वेळीं अशुभ दृष्टियोग करील तो काळ वाईट जाणावा. केन्द्रामध्यें शनि जन्मकालीं असून त्याचेबरोबर हर्शल गोचरीनें ज्या वेळीं केन्द्र किंवा प्रतियोग करील त्या काळीं नसत्याच भानगडी स्थानपरत्वें उत्पन्न होतील करितां जपून वागावें. हर्शलचें भ्रमण जन्मकालीन **गुरूवरून** होत असतां आकस्मिक रीतीनें लाभ होतात; बहुशा सार्वजनिक कंपन्या किंवा त्यांचे शेअर्स यांचेपासून लाभ होतो; कित्येकांना सरकारी नोकरीमध्यें प्रमोशन, बढती प्राप्त होते; कित्येक कंपन्यांचे डिरेक्टर्स होतात. जर जन्मकुंडलीमध्यें गुरु बलवान असेल तर लाभ खात्रीनें होतात. परंतु गुरु पीडित असतां नुकसान व बेअब्रु होते. गुरु व हर्शल जन्मकाळीं शुभसंबंधित असून बलवान असतां हर्शल ज्या ज्या वेळीं गुरूबरोबर शुभ दृष्टियोग करील किंवा गुरु आपल्या गोचर भ्रमणानें जन्मकालीन हर्शलबरोबर ज्या ज्या वेळीं शुभदृष्टियोग करील त्या काळीं आकस्मिक रीतीनें किंवा सट्टे वगैरेमध्यें मोठाले लाभ होतात; वारसा मिळतो; किंवा श्रीमंत मित्र मिळून सांपत्तिक लाभ होतात.

जन्मकालीन **रवि** किंवा चंद्रावरून ज्या वेळीं हर्शलचें भ्रमण होतें त्या वेळीं आयुष्यामध्यें मोठमोठाले फेरफार घडतात, महत्वाच्या गोष्टी घडतात. कुंटुंबांत



मृत्यु घडतात. व हे बहुशा आकस्मिक रीतीनें होतात. दशमस्थानमधील **रवि** किंवा **चंद्र** बलवान नसून त्यावरून हर्शलचें भ्रमण होत असतां धंद्यामध्यें किंवा नोकरीमध्यें अनेक अडचणी येतात, धंद्यांत बूड येते, किंवा धंद्यामध्यें चमत्कारिक घडा मोडीहोऊन अपयश प्राप्त होतें.

रवि किंवा चंद्र **लग्नांत** असून त्यावरून हर्शलचें भ्रमण होत असतां स्वभावामध्यें अनिश्चितपणा वाढतो, सर्व बाजूनें त्रास होतो, झोंप बरोबर लागत नाहीं व शरीरप्रकृती जन्मत:च अशक्त असून जीवनशक्ति निर्बळ असतां मज्जातंतूंची क्रिया क्षीण होते; चमत्कारिक तऱ्हेनें सट्ट्यामध्यें, स्पेक्युलेशनमध्यें अपयश येतें; हातून वारंवार चुका घडतात, विचारशक्ति दुर्बळ होते. **सप्तमस्थानामध्यें रवि** किंवा **चंद्र** असून त्यावरून हर्शलचें **भ्रमण** होत असतां; प्रतिस्पर्धि उत्पन्न होतात; भागीचे व्यवहार बंद पडतात; पार्टनरशिप सुटते चमत्कारिक गोष्टी घडतात; काय होईल कसे होईल याप्रमाणें धंद्यामध्यें एकसारखें वाटतें व त्यामुळें शरीरप्रकृती अस्वस्थ राहते. धंदा रोजगारामध्यें मनासारखे होत नाहीं.

जन्मकालीन **मंगळावरून** हर्शलचें भ्रमण होत असतां अपघात होतात, दुखापति होतात; व ज्या स्थानामध्यें ही हर्शलमंगळाची युति होते त्याप्रमाणें नानाविध प्रकारच्या अडचणी येतात. स्वभाव रागिट व जहाल बनतो; सर्व प्रकारच्या स्फोटक द्रव्यांपासून, अपघातापासून व अत्याचारापासून सावध रहावें.

हर्शलचें भ्रमण **शुक्रावरून** होत असतां मनाचा ओढा चैनबाजीकडे, ख्यालीखुशालीकडे, विषयोपभोगाकडे होतो; पैशाचा अपव्यय होतो; दुराचाराचा अतिरेक होतो; इष्कबाजी, जारकर्म घडतें. गृहकृत्यामध्यें भांडण, विपर्यास, मन संशयी होण्यासारख्या गोष्टी दृष्टोपत्तीस येतात; स्त्रीबरोबर भांडण तंटे घडतात.

हर्शलचें भ्रमण बुधावरून होत असतां शोधकपणा व चौकस बुद्धि वाढते. अध्यात्म विद्या, तत्वज्ञान किंवा गूढ विद्यांची आवड उत्पन्न होते; कचित प्रसंगीं वाचाळपणा जास्त वाढलेला पाहण्यास मिळतो; स्पष्ट बोलण्यामुळें व अशुनुकसानकारक लेख लिहिण्यामुळें त्रास होतो.

हर्शलच्या गोचर भ्रमणाचा विचार करते वेळीं तो कुंडलींतील कोणत्या स्थानामधून व कोणत्या ग्रहावरून भ्रमण करीत आहे व तो कुंडलीमध्यें कसा दृष्ट आहे वगैरे गोष्टींचा साग्र विचार करून नंतर त्याच्या गोचर फलाच्या तीव्रतेची किंवा परिणामाची कल्पना केली पाहिजे. हर्शल जन्मकुंडलीच्या धन-स्थानामधून भ्रमण करीत असतां सांपत्तिक अडचणी येतात, तोटे होतात, व जर सट्टे किंवा अशाच तऱ्हेचा व्यापार असेल तर त्यांत मोठी ठोकर लागते. ह्याचप्रमाणें हर्शलचे इतर स्थानांमधून होत असलेल्या गोचर भ्रमणाचे फला-देशाची कल्पना करावी. व हाच नियम इतर सर्व ग्रहांचे गोचर भ्रमणास लागू आहे. त्याचप्रमाणें ग्रहांच्या गोचर भ्रमणाचे परिणाम ग्रह ज्या राशीमध्यें असतात त्या राशीचे धर्माप्रमाणें कमी अधिक प्रमाणानें अनुभवास येतात. **स्थिर राशि**—वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ ह्या राशीमधून होणारीं ग्रहांचीं भ्रमणें दीर्घकालद्योतक व विशेष कंटाळा येण्याजोगी स्थिति दर्शवितात व ही गोष्ट **शनि** व **हर्शल** यांचे भ्रमणास तर विशेष लागू पडते. गोचर **गुरूच्या** भ्रमणाचा परिणाम तो स्तंभि नसला तर फार काळ आढळत नाहीं. **मंगळ, बुध** व **शुक्र** यांचे भ्रमणाचा परिणाम फारच थोडा काळ असतो.

(अपूर्ण.)

---

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आम्नायः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद‍ाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्रमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

| अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. | सप्टेंबर १९१७. | अंक ६ वा. |
|---|---|---|

श्री.

## पंचांगशोधन अयनांशविचार.

( लेखकः–प्रो० गोविंद सदाशिव आपटे एम्. ए., बी. एस्सी. ग्वाल्हेर. )

१. आजपर्यंत पंचांगशोधनासाठीं जे प्रयत्न जाहले त्याचा तादृश उपयोग जाहला नाहीं अशी तक्रार बऱ्याच लोकांकडून ऐकूं येते. परंतु थोडक्या विचारांतीं असें दिसून येईल कीं त्यांनीं एक मोठी कामगिरी केली

ती ही कीं त्यांनीं पंचांगशोधनाच्या कामांत लोकमत तयार करण्याचे मार्गांत बराच पल्ला आक्रमिला.

( १ ) एक तर पंचांगशोधनाची गरज फार आहे असें लोकांस विशेष तीव्रतेनें वाटूं लागलें. ( २ ) दुसरें पंचांगशोधनांत नवीन मार्गाची पद्धत स्वीकारण्याची कल्पनाही ज्योतिष्यांना सहन होत नव्हती, ती आतां सहन होऊं लागली. ( ३ ) सिद्धांतग्रंथ व करणग्रंथ यांनीं मिळणारी ग्रहस्थिति व चमत्कारदर्शन दृक्प्रत्ययांशीं मिळत नाहींत हें कानानें ऐकणें सहन होत नव्हतें व असें म्हटल्यानें शास्त्रांचा अनादर होतो अशी एकदम भावना उत्पन्न होत असे, ती स्थिति आतां उरली नाहीं. ( ४ ) हल्लीं दृग्गणितानें उपलब्ध झालेले वास्तव नाक्षत्र वर्षमान दि. ३६५ घ. १५ प. २२.९८ घेण्यास दहा पंधरा वर्षांपूर्वीं फारच विरोध होता तो पुष्कळ दूर होऊन तें वर्षमान घेण्याकडे लोकांची ( ज्योतिषी लोकांची ) प्रवृत्ति झाली आहे. ( ५ ) त्यामुळें अयनांशांची वास्तविक वर्षगति वि. ५०.२ ही आतां मान्य होत चालली आहे. ( ६ ) ग्रहसाधन करितांना जे हल्लीं आकर्षणोत्पन्न कित्येक संस्कार उपलब्ध जाहले आहेत त्यांचा उपयोग करण्यास आतां विरोध राहिला नाहीं. ( ७ ) इतकेंच नव्हे तर त्यामुळें तिथिनक्षत्रादिकांमध्यें जो फरक पडतो त्यांसंबंधीं अडचण दूर करण्यास धर्मशास्त्री आतां तयार जाहले आहेत. ( ८ ) ज्या गणितानें दृश्य चमत्कार बरोबर जमतात त्याच गणितानें तिथ्यादिकांचा निश्चय करणें अवश्य आहे ही गोष्ट आतां संमत होऊं लागली आहे ( ९ ) अयन व ऋतु सायनमानानें घेतले पाहिजेत अशी आतां ज्योतिष्यांची खात्री पटूं लागली आहे.

२. नक्षत्रांसंबंधीं वैमत्य हल्लीं दूर होऊं लागलें आहे. पंचांगशोधन हें धर्मकृत्यें व मुहूर्त यांकरितां मुख्यत्वें केलें पाहिजे. या कृत्यांना व मूहूर्तांना लागणारीं नक्षत्रें मूळचीं तारात्मकच होत. हीं तारात्मकच नक्षत्रें श्रुतिसंमत आहेत तशीं चलविभागात्मक नाहींत इत्यादि रा. दीक्षित यांनीं



आपले ग्रंथांत जें सांगितलें आहे त्यास अनुसरून सायनवाद्यांचीही संमति मिळूं लागली आहे. इतक्या गोष्टी अनुकूल असतां पंचांगशोधनाचा प्रश्न सुटण्यास आतां केवळ अयनांशनिश्चयाची बाकी उरली आहे असें वाटतें. हल्लीं पंचांगशोधनाचा प्रश्न पुणें येथील ज्योतिषविचारिणीसभेनें हातीं घेतला आहे करितां या वेळीं खालील विचार वाचकांपुढें मांडिले आहेत त्यांचा या कामीं कांहीं उपयोग होईल अशी आशा आहे.

३. वास्तविक पाहिलें असतां आरंभस्थान व अयनांश या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. यांपैकीं कोणती तरी एक ठरली कीं दुसरी ओघानेंच निश्चित होते. आरंभस्थान किंवा अयनांश अमुकच असावे असा खरोखर कोणास आग्रह धरतां येणार नाहीं. यामुळें अनेक पक्ष उत्पन्न होतात तेव्हां यांतून कांहीं मार्ग निघाला तर पहावा हा या लेखाचा हेतु आहे. पंचांग ज्या अर्थीं मुख्यतः ज्योतिष्यांकरितां आहे त्या अर्थीं सुचविलेल्या योजनेस त्यांची संमति बहुमतानें तरी मिळाल्याशिवाय ती व्यवहार्य नाहीं, हें उघड आहे. ही संमति मिळणें कसें शक्य आहे, याचा थोडक्यांत विचार करूं. **ग्रहलाघव, मकरंद, भास्वतीकरण, करणकुतूहल,** वाक्यकरण इत्यादि जे ग्रंथ हल्लीं हिंदुस्थानांत प्रचलित आहेत त्यां सर्वांवरून २२।२३ अंशांचे जवळ जवळ अयनांश येतात. करितां कोणतीही योजना कितीही सशास्त्र व निर्दोष असली तरी तिजवरून येणारे ( १ ) **अयनांश जर २२।२३ अंशांचे जवळ जवळ नसतील तर ती योजना व्यर्थ होईल.** याच कारणानें कै० केरोपंत छत्रे यांचें पंचांग व ग्रंथ मागें पडत चालले आहेत. दर महिन्यास संक्रमण ३।४ दिवस आधीं होणें ही गोष्ट रूढीच्या दृढ परिचयामुळें सहन होत नाहीं. रा. केतकर यांना आपला **रैवतपक्ष** सोडून **चैत्र-**

पक्ष उत्पन्न करावा लागला तो याच कारणकरितां. पं० बापूदेव शास्त्री व रघुनाथाचार्य यांना ही याच दृष्टीनें आपले पंचांगांत अयनांश मानावे लागले. अजित प्रकाश पंचांगांत व तिरुवादि पंचांगांतही अयनांश २२ व २३ यांचे मध्येंच आहेत. प्रचलित असलेल्या सर्व दृक्‌तुल्य निरयण पंचांगांवरून व प्रचलित सर्व सिद्धांतागत शके १८३९ च्या मेषार्क समयीं साधलेल्या सायन स्पष्ट रवीवरून अयनांश २२ व २३ यांचे दरम्यान येतात.

मुंबई येथील पंचांगशोधनसभेनें अयनांश २२ व २३ यांचे दरम्यान कोणतेही मानावेत असें ठरविलें त्यांतही हाच हेतु आहे. करितां २२ व २३ अंशांच्यामध्यें कितीही अयनांश मानिले तरी ते बहुसंमत होतील असें मानण्यास हरकत नाहीं. तेव्हां ही शर्त **सर्वांत मुख्य** मानून मग एखादी सुचविलेली योजना दुसऱ्या कांहीं विचारसरणीनें ग्राह्य होईल कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. यासंबंधीं विचार करितां असें मनांत येतें कीं **२२ व २३ अंशांचे दरम्यान किती अयनांश मानिले असतां ( २ ) नक्षत्रांच्या योगतारा अधिकांत अधिक आपआपल्या स्थिर विभागांत येतील हें ठरविलें असतां आपल्या शास्त्रकारांचा आशय साधून ती योजना बहुसंमत होईल.** या तत्वांना अनुसरून बऱ्याच प्रयासानें पुढील कोष्टक तयार केलें आहे त्यावरून निर्णय करण्यास बरीच मदत होईल.



| नक्षत्रें | विभाग मर्यादा<br>अं. क. पर्यंत | अयनांश २२ ५४'<br>शके १८३९ अं. क. | अयनांश २१ ५९,<br>शके १८३९ अं. क. | योगतारा | १ कोलब्रुक, केरोपंत ३ बेंटली, ४ व्हिटने, ५ बर्जेस, ६ बापुदेव, ७ केतकर, ८ दीक्षित यांपैकी कोणाला संमत.<br>यांना. | शके१८३९<br>अ.२२°४१ |
|---|---|---|---|---|---|---|
| अश्विनी | १३ २० | ९ ५५ | १० ५० | बीटाईरेटीज | न.२ते५, ७, ८ | १० ८ |
| भरणी | २६ ४० | २२ ५२ | २३ ४७ | ३५ इरेटीज | नं.१ ते६ | २३ ५ |
| कृत्तिका | ४० ० | ३५ ५६ | ३६ ५१ | ईटाटॉरी | १ ते ८ | ३६ ९ |
| रोहिणी | ५३ २० | ४५ ४४ | ४६ ३९ | अल्डीबॅरान् | ,, | ३५ ४७ |
| मृग | ६६ ४० | ५९ ३८ | ६० ३३ | लांब्डाओराय | १व४ते८ | ५९ ५१ |
| आर्द्रा | ८० ० | ७५ ३ | ७५ ५८ | ग्यामाजेमिना | नं. ८ | ७५ १६ |
| पुनर्वसु | ९३ २० | ८९ ११ | ९० ६ | पोलक्स | १ ते ८ | ८९ २४ |
| पुष्य | १०६ ४० | १०४ ४० | १०५ ३५ | डेल्टा क्रांकी | ,, | १०४ ५३ |
| आश्लेषा | १२० ० | १०९ ३५ | ११० ३० | अल्फा क्रांकी | १, ६, ७ | १०९ ४८ |
| मघा | १३३ २० | १२५ ४७ | १२६ ४२ | रेग्यूलस | १ ते ८ | १२६ ० |
| पूर्वा | १४६ ४० | १३९ २१ | १४० १६ | थीटा लिऑनि | २-३-७-८ | १३९ २४ |
| उत्तरा | १६० ० | १४७ ३४ | १४८ २९ | डेनिबोला | १ ते ८ | १४७ ४७ |
| हस्त | १७३ २० | १६९ २४ | १७० १९ | डेल्टाकार्व्ही | २ ते ८ | १६९ ३७ |
| चित्रा | १८६ ४० | १७९ ४७ | १८० ४२ | स्पायका | १, ते ८ | १८० ० |
| स्वाती | २०० ० | १८० ११ | १८१ ६ | आल्क्टयुरस | १ ते ८ | १८० २४ |
| विशाखा | २१३ २० | २०६ ५७ | २०७ ५२ | अल्फा लिब्रो | १,६.८ | २०७ १० |
| अनुराधा | २२६ ४० | २१८ ३१ | २१९ २६ | डेल्टा स्कार्पी | १व४ते८ | २१८ ४४ |
| ज्येष्ठा | २४० ० | २२५ ४३ | २२६ ३८ | अंटॅरिस | ,, | २२५ ५६ |
| मूळ | २५३ २० | २४० ३१ | २४१ २६ | लांब्डा स्कार्पी | ४, ५, ८ | २४० ४४ |
| पूर्वाषाढा | २६६ ४० | २५० ३१ | २५१ २६ | डेल्टा सॅजिटॅरि | १ ते ७ | २५० ४४ |
| उत्तराषाढा | २८० ० | २५८ ३६ | २५९ ३१ | सिग्मासॅजिटॅरि | ४, ५, ७ | २५८ ४९ |
| श्रवण | २९३ ० | २७७ ४२ | २७८ ३७ | अल्टेर | १ ते ८ | २७७ ५५ |
| धनिष्ठा | ३०६ ४० | २९३ २० | २९४ १७ | अल्फाडेल्फी | १ते३,६८ | २९३ ३३ |
| शततारका | ३२० ० | ३१७ ३१ | ३१८ २६ | लांब्डाअक्केरि | १ ते ८ | ३१७ ४४ |
| पूर्वभाद्रपदा | ३३३ २० | ३३० २९ | ३३१ २४ | मर्काब | ,, | ३३० ४२ |
| उत्तराभाद्रपदा | ३४६ ४० | ३४५ ६ | ३४६ १ | अल्जेनिब | २ते५व८ | ३४५ १९ |
| रेवती | ३६० ० | ३५९ ४ | ३५९ ५९ | म्यूपिशियम | ७, ८ | ३५९ १७ |

स्वाती, ज्येष्ठा, पूर्वाषाढा, उत्तराषाढा व श्रवण या योगताराशिवाय बाकी सर्व योगतारा आपआपले स्थिरविभागांत पडतात.

४ वरील कोष्टकांत आधुनिक विद्वानांनीं दिलेल्या योगतारांच्या भोगांचा स्वीकार केला आहे. याचें कारण इतकेंच कीं पूर्वींच्या ग्रंथांत दिलेले भोग हल्लींच्या दृक्प्रतीत भोगांशीं जुळत नाहींत. उदाहरणार्थ, **चित्रा व स्वाती** या ठळक ताऱ्यांविषयीं केव्हांही कोणास शंका येण्याचें कारण नाहीं. असें असून त्या दोन ताऱ्यांमधील कदंबाभिमुख भोगांमध्यें जें वास्तविक अंतर २४ कला आहे तेंच सूर्यसिद्धांतांत अं. २ क. १४, ब्रम्हगुप्त सिद्धांतांत अं. १ क. ८, **आर्यसिद्धांतांत** अं. १ क. ७ व **सार्वभौमसिद्धांतांत** अं. १ क. ३६ दिलें आहे. त्यांतही आश्चर्याची गोष्ट ही कीं **मुनीश्वरानें स्वातीचा** भोग **चित्रेपेक्षां** कमी दिला आहे म्हणजे स्वातीचें पश्चिमेस स्थान दिलें आहे. इतर भोगांसही हीच गोष्ट कमीजास्त प्रमाणानें लागू आहे.

५. वरील कोष्टकांवरून हेंही लक्षांत येईल कीं सदरील दोन तत्त्वांना अनुसरून **रेवती**भोग ३५९ अं. ४ क पासून ३५९ अं. ५९ कलापर्यंत कोठेंही मानिला तरी फक्त पांचच योगतारा आपले स्थिर विभागांचे मागें पडतात. टॉ. स्कॉर्पी नांवाची एक ज्येष्ठा पुंजांतील ३.२ प्रतीची तारा जर दुय्यम योगतारा किंवा उपयोगतारा मानिली तर तिचा भोग अं. २२७ क. ४२ येत असल्याकारणानें ज्येष्ठा ही आपले विभागांत पडते असें मानितां येतें. म्हणजे फक्त चारच योगतारा आपले विभागांचे मागें पडतात ही या योजनेनें विशेष साधलेली गोष्ट आहे. कारण ग्रहलाघवांतील भोग बरेचसे अवास्तव असून ही ६ योगतारा आपले प्रांतांतून ढळल्या आहेत. रा० छत्रे यांच्या ११ चुकतात व सूर्यसिद्धांतांतील ८ चुकतात.

६. आतां तारांचे भोग ठरवितांना कोणती तरी तारा मुख्य मानावी लागते. म्हणजे कोण मोजण्याचे जे दोन भुज त्यांपैकीं एक या मुख्य तारेंतून जातो व दुसरा ज्या तारेचा भोग मोजावयाचा तिचे मधून जातो असें मानावें लागतें.



हे भोग क्रांतिवृत्तावर मोजावयाचे आहेत करितां ज्यांचा शर फार लहान आहे अशा तारांपैकींच कोणती तरी एखादी मुख्य मानून तिच्या अनुरोधानें भोग ठरविले असले पाहिजेत हें उघड आहे. २७ योगतारांपैकीं क्रांतिवृत्ताला फार जवळ अशा ४ योगतारा आहेत. **पुष्य, मघा, शततारका** व **रेवती** यांचे शर ३० कलांचे आंत आहेत. या कारणानेंच **चक्रयंत्र** हें भोगशर पाहण्याकरितां या चार तारांतून जाणाऱ्या पातळींत धरावें असें **भास्कराचार्यांनीं** लिहिलें आहे. या चारी योगताऱ्यांपैकीं **मघा** सर्वांत ठळक व १.२ प्रतीची आहे. ही मुख्य मानावी असा मनाचा ओढा सहज होतो. आपल्या प्राचीन ज्योतिष्यांच्याही मनांत ही गोष्ट वागत होती असें दिसतें. कारण **सूर्यसिद्धांत, ब्रम्हसिद्धांत, लल्लतंत्र, ग्रहलाघव, सुंदरसिद्धांत** व **दामोदरीयभटतुल्य** या ग्रंथांत ध्रुवाभिमुख भोग दिले आहेत; व **द्वितीयार्य** व **सार्वभौम** या सिद्धांतांत कदंबाभिमुख दिले आहेत. ( दीक्षितकृत भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास पृ. ४९१, ४९२, ४९४ पहा ). तथापि सर्व ठिकाणीं **मघा**चा भोग पूर्ण अंशात्मक मानिला आहे. मलाही तसेंच करणें सयुक्तिक दिसतें. **पुष्या**शिवाय इतर दोन ताऱ्यांचे भोग असे कलाविकलाविरहित नाहींत. परंतु पुष्यतारा ४ थ्या प्रतीची असल्याकारणानें **मघा**पेक्षां अधिक आहे. अयनांश २२ व २३ यांचे दरम्यान यावेत याकरितां **मघा** भोग अं. १२५ क. ४७ व अं. १२६ क. ४२ यांचे दरम्यान मानितां येतो. यावरून कलारहित भोग अं. १२६ मानिला पाहिजे हें वरील कोष्टकावरून उघड दिसेल. या योगानें रेवती योगतारा ( म्यूपिशिअम ) अं. ३५९ क. १७ इतक्या अंतरावर येत असल्याकारणानें ती आरंभीं मानिल्यासारखें होतें. रेवतीभोग **लल्लतंत्रांत** अं. ३५९, **सूर्यसिद्धांतांत** अं. ३५९ क. ५० व इतर ग्रंथांत अं. ३६० दिला आहे. म्हणजे रेवती तारा ३६० व्या अंशांत कोठेंही असली तरी ती आरंभींच आहे असें समजण्याचा ग्रंथकाराचा प्रघात आहे. या नियमानुसार आपल्याही वरील योजनेंत रेवतीतारा आरंभीं मानिली आहे असें आपल्यास म्हणतां येतें. **चित्रा** तारा जरी सर्वांत ठळक आहे तरी तिचा भोग १८०, १८३, १८४।२०, १८२।५३, १८३।५० असा निरनि-

राळा व कांहीं ग्रंथांत कलासहित दिला आहे. शिवाय तिचा शरही अं. २ पेक्षां जास्त आहे. या कारणानें **मघा**तारेशीं तुलना करितां चित्राला मघापेक्षां अधिक महत्त्व यावें असें वाटत नाहीं. करितां **रेवती** तारा आरंभीं मानावी ही सर्व ग्रंथकारांना संमत असलेली गोष्ट साधून मघाचा भोग कलारहित अं. १२६ घेतला असतां शके १८३९ चे आरंभीं अयनांश २२।४१ येतात ते २२ व २३ अंशांचे मध्यवर्ती असल्याकारणानें बहुसंमत होतील अशी आशा वाटते. मघापासून चित्रा बरोबर ५४ अंशांनीं पूर्वेस असल्याकारणानें चित्राभोग सहजगत्या १८० अंश येतो. त्यांत चैत्रपक्षाभिन्यांची सोय निघते. आपली त्यांत कांहीं हानि नसल्याकारणानें या योजनेस विरोध करण्याच्या मोहांत समंजस लोक पडणार नाहींत अशी आशा आहे. केवळ स्वतःच्या मताकरितां किंवा व्यक्तिविषयक पाडाव करण्याकरितां आपल्यास या प्रश्नाचा निकाल करण्याचें नसून समुदायाकरितां आपण हें काम करीत आहों ही भावना मनांत बागवावी म्हणजे आपली टीका विघातक नसून विधायक असावी या दृष्टीनें या योजनेचा विचार व्हावा अशी वाचकांस व तज्ज्ञांस विनंति आहे.

७. आतांपर्यंत जाहलेल्या प्रयत्नांत अयनांश ठरवितानां साधारणतः तीन मार्गांचा अवलंब केलेला दिसतो. ( १ ) पहिला मार्ग असा आहे कीं ग्रहलाघवाप्रमाणें किंवा दुसरे कोणते तरी एखाद्या प्रचलित ग्रंथाप्रमाणें प्रतिवर्षाच्या मेषसंक्रमणकाळीं नॉटिकल्वरून येणाऱ्या सायन स्पष्ट सूर्याइतके अयनांश मानावयाचे. यांत वर्षमान त्या त्या ग्रंथकाराचें घेतल्यासारखें होऊन आरंभस्थान चल राहातें हा एक दोष राहतो. ( २ ) दुसरा मार्ग म्हटला म्हणजे प्रथम कोणत्या तरी शकारंभीं वरीलप्रमाणें अयनांश मानावयाचे व वर्षमान वास्तवनाक्षत्र घ्यावयाचें. अर्थात निरनिराळ्या शकवर्षाप्रमाणें सुरवातीस निरनिराळे अयनांश घ्यावे लागतात, ही एक यांत अडचण येते. ( ३ ) तिसरा एक मार्ग कै. केरोपत छत्रे यांनीं स्वीकारलेला या दोहोंहून भिन्न आहे. त्यांचा रेवतीतारा अमुकच असा मनाचा ग्रह करून तो थेट आरंभस्थानीं मानून बाकीच्या सर्व गोष्टींकडे अजिबात दुर्लक्ष केलें आहे. याचा परिणाम काय जाहला तो



मागें सांगितलाच आहे. ग्रंथामध्यें असा एक घोंटाळा जाहला आहे, कीं वर्षमान सूर्यसिद्धांताचें धरून अयनगति ५०. २ विकला मानिली आहे. आपल्या वरील योजनेंत असा कोणत्याही प्रकारचा आग्रह न धरितां **शास्त्रकारांचा आशय** व **योजनेचा व्यवहार्यपणा** या गोष्टी विशेषतः नजरेपुढें ठेविल्या आहेत. या दृष्टीनें तयार केलेल्या योजनेमध्यें कोणते कोणते फायदे साधिले आहेत, ते खालीं संकलित केले आहेत.

( १ ) आरंभीं रेवती योगतारा सांपडते.

( २ ) आरंभस्थान निश्चल राहतें.

( ३ ) शके १८३९ चे आरंभीं येणारे अयनांश २२।४१ हे **बहुसंमत मर्यादेच्या आंत** म्हणजे २२ व २३ अंशांचे मध्यवर्ती आहेत.

**( ४ ) नक्षत्रांच्या योगतारा आपआपले स्थिर विभागांत असाव्यात हा जो शास्त्रकारांचा मूळचा हेतु, तो हल्लीं उपलब्ध असलेल्या किंवा सुचविलेल्या कोणत्याही योजनेपेक्षां या योजनेनें उत्तम साधतो.**

( ५ ) भोगमापनास सोईची अशी बहुतेक निःशर मघातारा १२६ अंशांवर म्हणजे निष्कल येते व चित्राही कांहीं बाबतींत महत्वाची असलेली तारा सहजगत्या १८० अंशांवर येते.

( ६ ) एकाद्या विशिष्ट वर्षाच्या करणागत मेषकालाच्या सायन स्पष्ट सूर्यावरून हे अयनांश साधलेले नाहींत त्यामुळें भिन्न येणार नाहींत.

( ७ ) आतांपर्यंतच्या योजनांपेक्षां ही अधिक व्यवहार्य व सशास्त्र दिसते.

---

## जाहीर विनंति.

**एकनाथ, ज्ञानेश्वर,** व **तुळसीदास** यांचे ग्रंथांत आलेले ज्योतिषासंबंधीं उल्लेख वाचकवर्गानें खालील पत्त्यावर कळविण्याची कृपा करावी. ओवी, अध्याय, चौपाई यांचा निर्देश स्पष्ट करावा अशी विनंति आहे.

**गोविंद सदाशिव आपटे.**

४१८ नारायण पेठ, **पुणें सिटी.**

# शनीचें गोचर भ्रमण.

जेव्हां **शनि** आपल्या जन्मकालच्या मूळच्या स्थानीं येतो व तो बलवान व शुभदृष्ट असतो तेव्हां त्याच्या गोचर भ्रमणापासून जमीन, शेती, खाणी, खाणीचे शेअर्स, वडील किंवा म्हातारी माणसें किंबहुना शनि ज्या ज्या वस्तूंचा व पदार्थांचा किंवा व्यक्तींचा कारक असतो त्या सर्वांपासून लाभ दर्शवितो. **शनीचें** भ्रमण जन्मकालीन गुरूवरून होत असतां साधारणपणें मान मिळतो व अधिकारी वर्गाकडून लाभ होतो. धंदा साधारण बरा चालतो. परंतु जन्मकालीं गुरु निर्बली असतां फायद्याच्या ऐवजीं तोटेच झालेले पाहण्यास मिळतात; खर्च फार होतो; आयापेक्षां खर्च जास्त झालेला पाहण्यास मिळतो.

जन्मकालीं **मंगळ** बलवान व शुभसंबंधित असतां त्यावरून होत असलेल्या गोचर शनीच्या भ्रमणापासून, धातूच्या व्यापारापासून, मंगळानें दर्शविल्या जाणाऱ्या लोकांकडून फायदा होतो; परंतु मंगळ पीडित असतां चोरटे, लबाड लोकांपासून भीति उत्पन्न होते; त्रास होतो; स्वभाव भांडखोर व चिडखोर होतो; अपघात होतात; वृत्ति बेफिकीर होते, हातून लबाड्या किंवा लुच्चेगिऱ्या होण्याचा संभव असतो. हा काळ एकंदरीनें अनिष्टच जातो.

शनीचें भ्रमण जन्मकालीन किंवा चलित **रवी**वरून होत असतां अधिकारीवर्ग, अंमलदार, धनी यांचेबरोबर विरोध उत्पन्न होतो. अपकीर्ति होते; उत्पन्नाची किंवा स्थावर मिळकतीची नासाडी होते. **रवि** जन्मकालीं निर्बली असतां शरीरप्रकृती नादुरुस्त होते. शरिरांतील जीवनशक्ति कमी होते, सर्दीचे विकार वारंवार होतात; मन उदास व निरुत्साही बनतें. पुष्कळ



अडचणी येतात. बापास आजार प्राप्त होतो. त्यास अडचणी येतात. रवीवरून शनीचें भ्रमण कोणत्या स्थानांमधून होत आहे व जन्मकालीं रवि शुभसंबंधित आहे किंवा काय याचा चांगला विचार केला पाहिजे.

शनीचें भ्रमण गोचरीनें जन्मकालीन **शुक्रा**वरून होत असतां स्त्रियांपासून त्रास होतो; मन उच्छृंखल बनतें; आचरण बदफैली, छिचोर किंवा दुर्व्यसनी बनतें. व जन्मकालीं शुक्र केन्द्रामध्यें पीडित असून त्यावरून शनीचें भ्रमण होत असतां विशेष अनिष्ट फळें मिळतात व त्यापासून त्रास होतो; व शुक्र किंवा शनि तृतीय, षष्ठ किंवा नवमाचा अधिपति असतां एखाद्या स्त्रीनातेवाइकाचा मृत्यु होतो. हा काल सद्व्याचे व्यवहारास प्रतिकूल असतो. मन उल्हसित राहत नाहीं; मनावर एक प्रकारची नैराश्यतेची छटा पसरते. ह्या कालांत शरिरांत अशक्तता उत्पन्न होते किंवा विषारी औषधाचे सेवनानें त्रास होतो.

जन्मकालीन बलिष्ठ अशा **बुधा**वरून शनीचें गोचर भ्रमण होत असतां लेखनवाचनाची किंवा ज्ञान संपादन करण्याची आवड वाढते; मन विचारी व प्रत्येक गोष्टीमध्यें चौकस व दक्ष असतें; परंतु बुध पीडित असतां लेखापासून किंवा लिहिण्यापासून त्रास, स्वभाव रागीट, लहरी, लोभी, भांडखोर, थोडक्याकरितां सर्वस्वाची नुकसानी किंवा हानी करणारा होतो. जन्मकालीं बुध विशेष पीडित असतां नातेवाईक त्यांत विशेषतः आपल्यापेक्षां वयानें लहान माणसें यांचे मृत्यु होतात, व बुध चतुर्थ किंवा दशमाचा अधिपति असून कुंडलींत जन्मकालीं विशेष पीडित असतां मातृ किंवा पितृनाश होतो.

शनीचें भ्रमण जन्मकालीन **चंद्रा**वरून होत असतां जलापासून भीति, व जन्मकालीं चंद्र निर्बली व पीडित असतां आजार, मानसिक अस्वस्थता प्राप्त होते; चंद्र ज्या राशीमध्यें असतो तद्योतक अवयवासंबंधी रोग किंवा दुखणीं होतात. आईची प्रकृती नीट राहत नाहीं; नातेवाइकामध्यें मृत्यु घडतात;

स्त्रियांचें शत्रुत्व होतें. सट्ट्याचे व्यापारामध्यें अपयश किंबहुना ज्या ज्या स्थानाचे हे ग्रह अधिपति असतात ( शनि व चंद्र ) व ज्या ज्या स्थानामध्यें युक्त होतात तद्योतक गोष्टींपासून किंवा त्या स्थानानें मिळणाऱ्या सुखासंबंधी त्रास व संकटें प्राप्त होतात. चंद्राबरोबर शनि गोचरीनें शुभ संबंध करीत असतां लाभ होतात परंतु हे लाभ फार दीर्घकालानें प्राप्त होतात. व जन्म-कुंडली जमीनजुमला, स्थावर मिळकत यासंबंधानें लाभ दर्शवीत असतां हा काळ घरें बांधण्यास, जमिनीची सुधारणा करण्यास, जमीन किंवा घर विकत घेण्यास सर्वप्रकारें अनुकूल असतो.

शनीचें भ्रमण दशमभावारंभीं उदित असलेल्या अंशावरून किंबहुना दशमस्थानामधून होत असतां तो काळ कंटाळवाणा किंवा उदासीनतेचा जातो; व त्याच वेळीं शनि हा केन्द्रामधील किंवा चर राशीमध्यें असलेल्या एखाद्या ग्रहाबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां उद्योगधंद्यामध्यें अति मोठाले तोटे होतात; धंदा बसतो. ह्या काळांत उद्योगधंद्यास सुरवात करूं नये किंवा कोणत्याही तऱ्हेचे फेरफार करूं नयेत कारण ह्या काळांत शत्रुत्व होतें; आपल्या विरुद्ध कट होतात; कंपन्यांचें दिवाळें निघतें; मालकांचे मृत्यु घडून उद्योगधंदा किंवा रोजगार सुटतो. मनाची समाधान वृत्ति राहत नाहीं व पुष्कळ वेळां प्रत्येक गोष्टीमध्यें मागें पाऊल येतें व त्यामुळें मन निरुत्साही होतें.

लग्नाच्या उदित अंशावरून शनीचें भ्रमण होत असतां धंदारोजगारा-संबंधानें वरप्रमाणेंच अनुभव येतो, परंतु त्यामध्यें विशेषत: शरीरप्रकृतीच बिघडते; दंतविकार होतात किंवा लग्न ज्या राशीचें असतें तद्योतक शरिराचे विभागासंबंधानें आजार किंवा दुखणीं होतात. लग्नीं अग्नि राशि-मेष, सिंह, व धनु-उदित असतां शरीरप्रकृति एवढी बिघडत नाहीं.



शनीचें भ्रमण चतुर्थ स्थानामधून होत असतां साधारणपणें धंद्यामध्यें अडचणी येतात. त्याचप्रमाणें दशमस्थानानें दर्शविल्या जाणाऱ्या गोष्टींमध्यें अडचणी येतात; आईला व बापाला हा काळ देहकष्ट दर्शवितो.

शनीचें भ्रमण सप्तमस्थानामधून होत असतां भागिदारांपासून त्रास व संकटें येतात; स्त्रीची प्रकृति चांगली राहत नाहीं. हा काळ घर बदलण्यास; धंद्यामध्यें नवीन सुरवात करण्यास किंवा फेरफार करण्यास, धंद्याकरितां एखाद्या नवीन शहरामध्यें जाण्यास प्रतिकूल असतो. ह्या कालामध्यें धंद्यामध्यें नवीन प्रतिस्पर्धी उत्पन्न होतात.

———o———

## गुरूचें गोचर भ्रमण.

गोचरीच्या गुरूचें भ्रमण जन्मकालचे हर्शलवरून होत असतां व त्यांत विशेषत: हर्शल बलवान व उत्तम स्थानामध्यें असतां अनेक शुभ व महत्वाच्या गोष्टी घडतात. नोकरी लागते, बढती मिळते; सट्ट्याचे व्यापारामध्यें लाभ होतात. विशेषत: रेलवे शेअर्स, किंवा इलेक्ट्रिकल कंपन्यांचे शेअर्समध्यें धंदा केला असतां उत्तम फायदा होईल.

गुरूचें भ्रमण जन्मकालीन शनीवरून होत असतां वडील माणसें, जमीन-जुमला व शेतीभातीपासून लाभ होतो. ह्या कालामध्यें कित्येकांस नोकरी-मध्यें एखाद्या वयातीत मनुष्यानें पेनशन घेतल्यामुळें लाभ किंवा प्रमोशन मिळतें. मन विचारी, प्रगल्भ, मिताहारी होतें व प्रत्येक गोष्टीमध्यें नेमस्त-पणा अंगीं येतो. परंतु जन्मकालीं गुरु पीडित असतां अनेक भानगडी उपस्थित होतात; सावकार लोक कर्जाकरितां त्रास देतात; इस्टेट वगैरे

ग्हाण पडते व ह्या व अशाच गोष्टींनें त्रास होतो. गुरु जन्मकालीं बलवान असून केन्द्रामध्यें असतां तो ज्या ज्या वेळीं आपल्या मूळच्या ठिकाणीं गोचर भ्रमणानें येतो त्या वेळीं अनेक प्रकारें फायदा करितो. सांपत्तिक लाभ व मानमान्यता मिळते; संततिसुख मिळतें; नवीन मित्रांची ओळख होते; दशमस्थानाच्या उदित बिंदूवरून गुरूचें भ्रमण होत असतां धंदारोजगारास हा काळ फारच अनुकूल असतो. परंतु त्या ठिकाणीं गुरु बलवान व शुभसंबंधित असला पाहिजे.

गुरूचें भ्रमण जन्मकालीन मंगळावरून होत असतां मंगळाच्या लोकां-बरोबर मैत्री होते; पुष्कळ खर्च होतो; प्रवास होतो; मन धाडसी व हिमती बनतें. स्त्रियांचे कुंडलीमध्यें मंगळ पंचम किंवा सप्तमाचा अधिपति असतां या गुरूच्या गोचर भ्रमणामध्यें लग्न ठरतें, लग्नें होतात. मंगळाबरोबर गुरु अशुभ दृष्टियोग करीत असतां किंवा मंगळ मूळचा निर्बळी व पीडित असतां त्यावरून होत असलेलें गुरूचें भ्रमण पैशासंबंधीं वारंवार अडचणी दर्शवितें, खर्च फार होतो. सट्ट्यामध्यें नुकसान होतें. सर्व प्रकारच्या अडचणी येतात. त्यांत विशेषतः मन साहसी झाल्यामुळें केलेल्या उद्योगधंद्यामध्यें सांपत्तिक अडचण विशेष भासते.

गुरूचें भ्रमण जन्मकालचे **रवीवरून** होत असतां नानाप्रकारचे फायदे होतात. अधिकारी किंवा उपरी लोकांकडून फायदा होतो, नवीन मित्र मिळतात. कित्येकांस पुरुषसंतति होते; मानसन्मान मिळतो. परंतु जन्म-कालीं रवि पीडित असतां अनेक प्रकारचे खर्च, सांपत्तिक अडचणी उत्पन्न होतात. रक्तविकार होतात; स्वभाव गर्विष्ठ बनतो; जिकडे तिकडे अडथळे येतात, अपमान घडतो; पैशाची उधळपट्टी होते; हेंच फळ गुरु ज्या वेळीं रवीबरोबर अशुभ दृष्टियोग करितो त्या वेळीं मिळतें.



गुरूचें भ्रमण जन्मकालचे **शुक्रावरून** होत असतां सांपत्तिक लाभ होतात; मन उल्हसित असतें, सर्व गोष्टी सुरळीत चालतात; मुलांचे सर्व व्यवहार सुरळीत जातात व त्यांचेपासून सुख मिळतें. परंतु शुक्र पीडित किंवा निर्बली असतां कपड्यालत्त्यामध्यें विनाकारण खर्च होतो; स्त्रियांमुळें विशेष खर्च होतो.

गुरूचें भ्रमण जन्मकालचे **बुधावरून** होत असतां विद्येची अभिरुची व विद्येमध्यें चांगली यशप्राप्ति होते, परीक्षा उतरतात, हातून शोध होतात; वाङ्मयाची अभिरुची वाढते; हातून लेख वगैरे लिहिले जातात. शिक्षणसं-स्थांकडे विशेष लक्ष्य लागतें, त्यासंबंधी हातून कांहीं कामें घडतात; आचार-विचार चांगले राहतात, वेदान्त विषयाची आवड उत्पन्न होते; धर्माकडे विशेष श्रद्धा उत्पन्न होते. परंतु बुध जन्मकालीं पीडित असतां विशेष लाभ होत नाहीं.

जन्मकालीं **चंद्र** बलवान असून पीडित नसतां त्यावरून होणारें गोच-रीच्या **गुरूचें** भ्रमण उत्तम शरीरस्वास्थ्य दर्शवितें; सार्वजनिक कामामध्यें यश मिळतें व त्यापासून लाभ होतात; हा काल नवीन धंद्यास सुरवात कर-ण्यास, प्रवास करण्यास फारच शुभ आहे; या वेळीं पुष्कळांचीं लग्नें होतात तर कित्येकांना संतति होते. परंतु चंद्र पीडित असतां ह्यावरून होत अस-लेलें गुरूचें भ्रमण सांपत्तिक अडचणी दर्शवितें. कित्येक सट्टेवाले लोक ह्या काळामध्यें बहुशः शेअर, कापूस, चांदी वगैरे पदार्थ त्यांचे तेजीचे भाव चालू असतां देखील आणखी तेजी होईल या आशेनें खरेदी करितात व त्यामुळें त्यांस फार नुकसानी लागते; पुष्कळ ह्या वेळीं सट्ट्यांकडे वळतात व अशा रीतीनें आपल्या पैशाची उधळपट्टी करितात.

जन्मकालीं **दशमावरोबर** रवि किंवा **चंद्र** शुभसंबंध करीत असतां

ज्या ज्या वेळीं दशम स्थानाचे उदित बिंदूवरून गुरु गोचरीनें भ्रमण करितो त्या त्या वेळीं अनेक सांपत्तिक लाभ; प्रमोशन; धंद्यामध्यें चांगलें यश प्राप्त होतें. त्याचप्रमाणें गुरूचें भ्रमण दशमस्थानामधून होत असतां जर तो जन्मकालचे रवि, चंद्र किंवा दुसऱ्या एखाद्या बलवान ग्रहाबरोबर शुभ संबंध करीत असतां जाणावें. या वेळीं नवीन धंद्यास सुरवात करावी किंवा धंदा वाढवावा. दशमभावारंभीं **कर्क, तुळा,** किंवा **मेष** राशि असेल तर ह्या राशीमधून होणाऱ्या गुरूच्या भ्रमणापासून विशेष फायदा होतो. **मकर** राशीमधील गुरूच्या भ्रमणाचा इतका चांगला अनुभव मिळत नाहीं.

गुरूचें लग्नामधून भ्रमण होत असतां शरीरप्रकृती उत्तम रहाते. व गुरु सप्तमाधिपति असतां ह्या काळामध्यें लग्न होतें.

चतुर्थस्थानामधून गुरूचें भ्रमण धंद्यास चांगलें असतें. ह्या काळामध्यें स्थावर मिळकत विकावी किंवा विकत घ्यावी. सर्वसाधारणपणें त्या स्थानामधील गुरूचें भ्रमण एकंदरीनें फायदा दर्शवितें परंतु दशमांतून गुरूचें भ्रमण होत असतां जो लाभ होतो तितका लाभ ह्या स्थानामधील गुरूचे भ्रमणानें होत नाहीं; तरी पण हा ग्रह ज्याप्रमाणें ह्या स्थानामध्यें शुभसंबंधित असेल त्याप्रमाणें लाभ होतात.

गुरूचें भ्रमण सप्तमस्थानामधून होत असतां भांडण तंटे, कोर्टातील खटले वगैरे गोष्टींसंबंधानें तडजोड करण्यास हा काळ अनुकूल असतो. ह्या वेळीं भागिदारीमध्यें किंवा भागीचे व्यवहार करावेत. त्याचप्रमाणें ह्या काळामध्यें वैद्य, डाक्तर, वकील, सावकार यांचेबरोबर सर्व प्रकारचे व्यवहार करण्यास हा काल चांगला असतो. एखादें शक्तिवर्धक किंवा आपल्या प्रकृतीस हितावह औषध वगैरे घेणें असेल किंवा त्यासंबंधानें वैद्य डाक्तर यांचेकडून या काळामध्यें सल्ला मसलत घ्यावी.

———o———

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद‍ाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

| अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. | ऑक्टोबर १९१७. | अंक ७ वा. |
|---|---|---|

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

## नाक्षत्रिक भूल !

[ A Member of Bombay Astrological Society. ]

**चित्र**मय जगताच्या जुलईच्या अंकांत 'सायन आणि निरयन' या मथळ्याखालीं श्री. पटवर्धन यांनीं एक लेख लिहिला आहे. लेखाचें धोरण असें ठेवण्यांत आलें आहे कीं सायनवाद माजविणारे मूर्ख व निरयनवादी भ्रमांत असून आपण स्वतः केवळ तटस्थ आहों. दोघांचीं व्यंगें चित्रित केलीं पण आपलें 'खरें' मात्र मुठींत ठेविलें !

"सायनवाद्यांनो, झाली कीं नाहीं तुमची हुर्रेवडी !" असें आतां निरय-

नाभिमान्यांनीं म्हणावें व सायनवाद्यांनीं "तुमचें सांप्रतचें निरयन पंचांग म्हणजे केवळ रद्दी—छे, रद्दी नव्हे तर रद्दीपेक्षांही कमी प्रतीचें लेखकानें अखेर ठरविलें ना!" असें म्हणावें. याप्रमाणें दोनही वादी एकमेकांवर तुटून पडल्यावर इतरांनीं त्यांची मौज पहावी!! असला जादूचा खेळ म्हणजे केवळ नजरबंदी होय.

या विचित्र लेखांत मुख्यत्वें दोन मुद्दे आहेत. त्यांपैकीं पहिला मुद्दा म्हणजे क्रांतिवृत्तावर अश्विन्यादि २७ तारात्मक नक्षत्रें हीं कायमचीं कंदिलासारखीं डांबून टाकलीं आहेत त्यांत बदल कोणासही करतां येत नाहीं. दुसरा मुद्दा सायनवादी आपलें राशिचक्र चलसंपातबिंदूपासून धरीत असतां आपल्या विभागांस अश्विन्यादि नांवें देतात, त्यामुळें ज्या भागास आज अश्विनी म्हणण्यांत येतें त्या विभागास कांहीं वर्षांनीं दुसरें कोणतें तरी नांव देण्यांत येईल व असें करणें हें अयोग्य आहे.

यांतील पहिला मुद्दा जो लेखकांनीं मांडला आहे तोच मुख्यत्वें निरयनवाद्यांस भ्रमांत टाकीत असतो. लेखकाप्रमाणेंच अजूनही कित्येक निरयन ज्योतिष्यांस हाच भ्रम आहे जोंपर्यंत ते या भ्रमांत आहेत, तोंपर्यंत सायनाभिमान्यांस ते मूर्खांतच गणणार. क्रांतिवृत्ताच्या पट्ट्यांत जे २७ नक्षत्रपुंज आहेत ते सांप्रतचे निरयनवादी पंचांगगणितांत अथवा फलज्योतिषांत उपयोगांत आणीत नाहींत. तर ज्याप्रमाणें संपातबिंदूपासून सायनाभिमानी क्रांतिवृत्ताचे २७ सम भाग करितात त्यांप्रमाणेंच एके काळीं अयनांशांत वसंतसंपात असतां जे २७ सम विभाग मानिले होते तेच विभाग अद्यापही निरयनवादी मानितात व यांस अश्विन्यादि नांवें सर्व देतात. अर्थात् हें स्पष्टपणें कळेल कीं जे कंदील (नक्षत्रें) क्रांतिवृत्तावर टांकून कालमार्ग प्रकाशित केला आहे त्या कंदिलांचा उपयोग कोणीही—सायन वा निरयन पक्षांतील मंडळी फलशास्त्रांत करीत नाहींत. सायनवादी म्हणतात २७ विभागात्मक नक्षत्रें संपातबिंदूपासून घेऊन कालगणना करणें प्रशस्त आहे.



त्यामुळें ऋतुविपर्यास होऊन मुसलमानांप्रमाणें वाटेल त्या महिन्यांत उन्हाळा, पावसाळा होण्याची धास्ती राहिली नाहीं. हेंच मत श्री. पटवर्धन यांस मान्य आहे, पण त्यांस सांपातिक वर्ष म्हणजे अपुरें वर्ष असल्यामुळें तें घ्यावें कीं न घ्यावें याबद्दल शंका वाटत आहे त्यांस संवत्सर या नांवास योग्य महत्व द्यावयाचें असेल तर पुन्हा वर्षाचा मोह बाजूस सारावा लागेल. एकदां संपातीं आलेला रवि परत संपातीं आला कीं वर्ष पुरें झालें हीच स्थिति धरल्याशिवाय ऋतूंची स्थिति कायम टिकणार नाहीं. हें तत्व जरी पटलें तरी पूर्ण प्रदक्षिणेचा मोह श्रीयुत पटवर्धनांस सोडवेना व यामुळेंच त्यांस सायनवाद्यांस मूर्ख ठरवावें लागलें.

संपातावर ऋतु अवलंबून आहेत हें तत्व मान्य असून जे अश्विन्यादि तारकापुंज आहेत तीं नक्षत्रें पंचांगांत आहेत असें गृहीत धरल्यामुळें या तारकापुंजांचीं नांवें बदलूं नयेत तर पहिलें नक्षत्र, दुसरें नक्षत्र असें म्हणावें. व असें करणें पूर्वापार पद्धतीस धरून आहे असें श्री. पटवर्धनांस म्हणावें लागलें.

ताऱ्यांना जीं नांवें दिलीं आहेत तीं बदलावीं असें सायनवादी म्हणतच नाहींत. या ताऱ्यांची जी सूक्ष्म गति आहे ती हिशेबांत धरून यांचे क्रांतिवृत्तावरील अंश ता. १ जानेवारी १९०० ह्या वर्षी किती होते हे राकेल या आंग्लज्योतिर्वेत्त्यानें आपल्या पुस्तकांत दिले आहेत. फलशास्त्रांत यांचा उपयोग कसा करावा याचें विवेचन कुंडलीविज्ञानच्या ९ व्या वर्षांत आलेलें आहे. या २७ ताऱ्यांचीं नांवें सायनवादी बदलीत नसून ते आपला संपात सांप्रत कोणत्या कंदिलाजवळ आहे हें वारंवार जाहीर करतात. या कंदिलाजवळ चंद्र केव्हां जाईल हें दीक्षित लेले यांनीं काढलेल्या सायनपंचांगांत 'ताराचंद्रयुति' या सदरांत पाहण्यास सांपडेल. सांप्रत प्रसिद्ध होत असलेल्या कोणत्याही पंचांगांत ही सोय नाहीं.

दुसरा मुद्दा म्हणजे मेष व अश्विनी यांची सांगड घालण्याचा मोह सायन-

वाद्यांस सुटला हा होय. मेष वृषभ वसंतऋतु, 'अश्विनी भरणी कृत्तिकाः पादं मेषः' किंवा बृहज्जातकांतील 'मेषाश्विप्रथमा नवर्क्षचरणाश्चक्रस्थिता राशयो' हीं सूत्रें सायनाभिमान्यांनीं या ग्रंथांतून घुसडलीं नाहींत ना ? मेष व अश्विनी यांची सांगड सर्वजण कायमच धरीत आहेत. कृत्तिकादि, मृगादि असा नक्षत्रक्रम पूर्वीं होता असें सिद्ध करण्यांत आलें आहे असा हवाला लेखक देत आहेत. मग सांप्रत अश्विन्यादि न धरितां उत्तराभाद्रपदादि अनुक्रम धरून गणना करण्याचा उपदेश त्यांनीं सांप्रतच्या पंचांगकर्त्यांस करावा. *मेष व अश्विनी यांचा क्रम पूर्वीं कोणी सोडला नाहीं व पुढेंही कोणी सोडणार नाहीं. हा क्रम सोडला नाहीं म्हणजे संपातापासून पहिले ३० अंश तो मेष राशि व पहिले १३ अं. २० कला हें अश्विनी नक्षत्र हा क्रम सारखा चालू राहणार मग संपात आकाशांतील कोणत्याही तारकापुंजाजवळ असो.

श्री. पटवर्धन यांचे लेखाचा झोंक निरयन खरें असें ठरविण्याचा दिसतो, म्हणून सांप्रत त्यांस पुढील तीन मुद्दे विचारासाठीं देत आहें.

( १ ) निरयनमताप्रमाणें लग्नादि द्वादशभाव तयार करतांना त्यांस रवि सायन घेऊन प्रथम सायनलग्नादि साधून नंतर त्या सायन लग्नांतून अयनांश वजा करून निरयन लग्नादि करावे लागतात. निरयनवाद्यांनीं हें गणित करितांना सायन रवि कां घ्यावा ?

( २ ) सांप्रत निरयनमानाप्रमाणें रोहिणी मृगावर पर्जन्यकाळास आरंभ होत असतां पंचांगांतून आर्द्राप्रवेशफल कां दिलेलें असतें, मृगप्रवेशफल अथवा रोहिणीप्रवेशफल कां वर्तवीत नाहींत ? पर्जन्यकाळाचें धोरण पर्जन्यारंभकालावरून करावयाचें असतें. मग ही सुधारणा कोणत्याच पंचांगांत कां

---

वदोक्त कालमानपद्धति या मथळ्याखालीं कुंडलीविज्ञान वर्ष ११।१२ तील लेखांत विसाजी रघुनाथ लेले यांनीं हें प्रसिद्ध केलें आहे.



दिसून येत नाहीं ? ही सुधारणा सुधारणेच्छु म्हणून नांवाजलेल्या केतकी पंचागांत तरी कां दिसूं नये ? ऋतूंचा आरंभ सायनमानाप्रमाणें केतकी पचांगांत दिलेला असतो. पण असें करितांना त्यांनीं सूर्यसंक्रांति व ऋतु यांची असलेली जोडी केवळ निरयनमतास चिकटून राहिल्यामुळें फोडली आहे. ( उदाहरणार्थ मकरसंक्रमण व उदगयन होऊन गेल्यानंतर २०।२२ दिवसांनीं मकरसंक्रमण दिलेलें असतें. ) मग जो फरक सहज सर्वांस कळतो ती पर्जन्यारंभकाळाची अगर रोहिणीमृगप्रवेशाची सुधारणा या पंचांगांत कां दिसूं नये ?

३ रामायणांत रामजन्म कालीं चैत्र शु. नवमी तिथि, रवि, गुरु इ. ५ ग्रह उच्च होते व चंद्र पुनर्वसु नक्षत्रांत होता असें म्हटलें आहे. ग्रहांचें उच्चनीचत्व नक्षत्रांवर न ठरवितां राशींवर ठरविलेलें आहे. म्हणजे रामायणकालीं राशि प्रचलित होत्या. रवीची उच्च राशि मेष. आतां मेष राशीच्या अगदीं प्रथमांशांत जरी आपण रवि मानला तरी अष्टमी तिथि पूर्ण करण्यास चंद्राचें रवीपासून अंतर ९६ अंश असलें पाहिजे. रामजन्म नवमीस माध्यान्हीं आहे. या वेळीं पुनर्वसुनक्षत्र न येतां पुष्य नक्षत्र असलें पाहिजे हें या ढोबळ हिशोबावरून सहज कळेल. पण वाल्मिकीनें तर नक्षत्र लिहिलें आहे पुनर्वसु ! तेव्हां हें पुनर्वसु नक्षत्र कोणतें ?

---o---

# ज्योतिर्विद् मंडळ, मुंबई.

प्राचीन काळीं आपल्या देशांत फलज्योतिषशास्त्र चांगलेंच परिणत झालें होतें. आर्यांचे सर्व व्यवहार या शास्त्राच्या आधारावरच चालत असत. या शास्त्राची योग्यता सारावलीकार म्हणतो त्याप्रमाणें

"अर्थार्जने सहायः पुरुषाणामापदर्णवे पोतः ।
यात्रासमये मंत्री जातकमपहाय नास्त्यपरः ॥"

'द्रव्यार्जनाच्या कामीं सहायक, संकटसमुद्रांत नौकारूप व प्रवासप्रसंगांत सल्लागार फलज्योतिषाशिवाय दुसरें कोणीच नाहीं' असा आमच्या पूर्वजांचा अनुभव होता. पण अलीकडच्या काळांत या शास्त्राच्या योग्य अध्ययनाच्या अभावामुळें तें मागें पडत चाललें आणि सांप्रत तर तें एकदेशी विद्वानांच्या उपहासास पात्र झालें आहे ! हें अत्यंत उपयुक्त शास्त्र, त्याची योग्यता न कळल्यामुळें आज कवडीमोल होऊं पहात आहे. ही त्याची स्थिति जाऊन तें पूर्वस्थितिप्रत यावें, यावर अनेक शतकांचा चढलेला गंज जाऊन त्याचा प्रकाश सर्वोपयोगी व्हावा म्हणून कै. रा. रा. जिवनराव त्रिंबक चिटणीस यांनीं

"ज्योतिर्विद् मंडळ"—

ही संस्था सन १८९२ मध्यें स्थापन केली. मंडळाच्या पहिल्या दोन वर्षांत फलज्योतिषशास्त्रासंबंधानें बरेच वादविवाद झाले होते असें जुन्या दप्तरावरून दिसतें. ह्या वर्षांत मंडळाच्या सभासदांची संख्या साठाच्यावर होती. पुढें सायन—निरयणवादावरून सभासदांमध्यें बराच खटका उडून पुष्कळसे सभासद "मंडळास" सोडून गेले. यानंतर कै. चिटणीस व मंडळांत राहिलेले सभासद यांनीं फुकट वर्ग चालविले होते. कै. चिटणीस हें वर्तमानपत्रांत व मासिकांत ज्योतिष—विषयक लेख लिहिण्याचें कामही करीत. पुढें सन १८९८ च्या सुमारास कै. चिटणीसांनीं "ज्योतिर्माला" नांवाचें मासिक सुरू केलें. लोकाश्रयाच्या अभावामुळें हें मासिक दोनच वर्षांनीं बंद पडलें.



कै. चिटणीस यांनीं ज्योतिर्माला काढण्याच्या पूर्वींच परिभ्रमणपद्धतीसंबंधानें बरेच परिश्रम करून ती पद्धति सोपी व भविष्यनिर्णयाच्या कामीं अत्यंत महत्वाची आहे हें ज्योतिर्विदांच्या नजरेस आणून दिलें. या पद्धतीसंबंधानें त्यांनीं Astrologer's Magazine या मासिकांत बरेच मार्मिक लेख लिहिले आहेत. पाश्चात्य ज्योतिर्विद् व कै. चिटणीस यांमध्यें फलज्योतिषासंबंधानें झालेला पत्रव्यवहार आज जो थोडाबहुत "मंडळाच्या" दप्तरांत आहे त्यावरून शास्त्रसंशोधनासाठीं—चिटणीसांचे अतिशय प्रयत्न चालले होते असें दिसतें. या कामीं कै. चिटणीसांस रा. पटवर्धन हे पुष्कळ सहाय्य करीत असत.

सन १८९७ त कै. चिटणीस व त्यांनीं चालविलेल्या वर्गांतील कांहीं विद्यार्थी यांनीं "१८९७ सालाचे स्पष्ट ग्रह व भावसाधन कोष्टकें" हें पुस्तक प्रसिद्ध केलें. सन १८९८ त कै. चिटणीस व रा. बा. ना. नवलकर ( मंडळाचे हल्लींचे अध्यक्ष ) यांनीं "ग्रहसाधन पुस्तक" हें अत्यंत महत्वाचें पुस्तक प्रसिद्ध केलें. रा. चिटणीस व त्यांच्या वर्गांतील विद्यार्थी यांचें संघटित स्वरूपाचें काम—विशेषतः ज्योतिषशास्त्राचें फुकट शिक्षण देण्याचें काम—१९०९ पर्यंत चालू होतें. ह्या वर्षी रा. चिटणीस हे कैलासवासी झाले. चिटणीसांच्या मरणानंतर पुढें सुमारें दोन तीन वर्षें सोसायटीचें काम विशेष झालें नाहीं. ज्योतिष—शास्त्राच्या प्रसारासाठीं चिटणीसांनीं अत्यंत निर्लोभपणानें जे परिश्रम केले ते लक्ष्यांत घेऊन मंडळांतील कांहीं सभासदांनीं चिटणीसांच्या निराश्रित कुटुंबास मदत करण्याकरतां एक फंड काढला. या फंडांतून अद्यान मदत करण्यांत येत असते.

१९०९ पासून १९१२ पर्यंत मंडळाचें संकलित असें काम झालें नाहीं तरी सभासदांच्या व्यक्तिशः ज्योतिषशास्त्राचें फुकट शिक्षण देण्याच्या कामाला खळ पडला नव्हता. गुरुवर्य लक्ष्मण बाळकृष्ण राजे हे बऱ्याच लोकांस ज्योतिषशास्त्राचें शिक्षण देण्याचें काम अत्यंत निरपेक्षपणें करीत होते.

त्यांच्या जवळ ज्योतिष शिकलेल्या मंडळीपैकींच प्रस्तुत लेखक हा एक आहे. सन १९१२ च्या आरंभीं गुरुवर्य लक्ष्मण बाळकृष्ण राजे व त्यांचे विद्यार्थी यांची व मिस्तर पी. एम्. सुखडवाला यांची भेट होण्याचा सुयोग आला. मिस्तर सुखडवाला हेही त्या वेळीं ज्योतिषशास्त्राचे अध्ययन करीत होते. समानशीलत्वामुळें मि. सुखडवाला यांचा परिचय होऊन १९१२ च्या अखेरपर्यंत सहाध्ययनाचें काम चाललें होतें. पुढें नवीन विद्यार्थी मिळण्याचा संभव दिसूं लागला तेव्हां त्यांच्याकरितां वर्ग काढावे असें "मंडळाच्या" सभासदांनीं सुचविलें. ह्या कल्पनेच्या सिद्ध्यर्थ मि. सुखडवाला यांनीं बरीच मेहनत घेतली. "मंडळाच्या" मार्फत वर्ग काढून काम पूर्ववत् सुरूं करण्याकरतां २२ डिसेंबर १९१२ रोजीं एक सभा भरविण्यात आली होती. ह्या सभेचे अध्यक्ष, ज्योतिर्विद् विष्णु गोपाळ नवाथे, संपादक कुंडलीविज्ञान, हे झाले होते. याच वेळीं ज्योतिषवर्ग सुरूं करण्यांत आले. १९१३ मध्यें ज्योतिषवर्गाचें काम बरेंच समाधानकारक झालें. "मंडळाचे" ज्योतिषवर्ग चालू झाले तेव्हां सभासद व विद्यार्थी यांच्या साठीं ज्योतिष वाङ्मयाचें वाचनालय असावें असें सभासदांस वाटूं लागलें व त्याप्रमाणें वाचनालय काढण्याचें ठरलें. वाचनालयाची कल्पना जुनीच होती पण ही कल्पना तुटपुंज्या सामुग्रीनें सिद्धीस जाणें शक्य नव्हतें. ज्यो. चिटणीस कैलासवासी झाल्यापासून १९१३ त वर्ग सुरू होऊन "मंडळाच्या" कामास पुन्हां सुरवात होईतोंपर्यंत मंडळाजवळ कांहीं थोडीबहुत पुस्तकांची जुळवाजुळव झाली होती. १९१३ त मंडळाचे मि. सुखडवाला व आणखी पांचसहाजण सभासद झाले व ज्योतिषवर्गामध्यें विद्यार्थी येऊं लागले. सारांश मंडळामध्यें अध्ययनासाठीं जमाव होऊं लागला तेव्हां पुस्तकांची उणीव अधिक भासूं लागली. मि. सुखडवाला यांच्या जवळ ज्योतिषशास्त्राचा संग्रह बऱ्यापैकीं होता तो त्यांनीं उदार मनानें मंडळाच्या वाचनालयामध्यें ठेऊन सभासदांस व विद्यार्थ्यांस त्याचा लाभ घेण्याची संधि दिली. मंडळाचे इतर सभासद रा. राजे, रा. प्रधान वगैरे मंडळीनें सुद्धां आपलीं पुस्तकें



वाचनालयासाठीं दिलीं. मि. सुखडवाला व इतर सभासद यांच्या पुस्तकांच्या संग्रहामध्यें सभासद व विद्यार्थी यांच्या वर्गणीनें विकत घेतलेल्या पुस्तकांची भर पडूं लागली व आज या वाचनालयामध्यें ज्योतिषवाङ्मयाचा उत्कृष्ट संग्रह झाला आहे व त्याचा फायदा अनेक विद्यार्थ्यांस व सभासदांस हल्लीं होत आहे. मंडळाच्या या वाचनालयाचें नांव कै. चिटणीसांच्या स्मरणार्थ "चिटणीस मेमोरिअल लायब्ररी" असें ठेविलें आहे.

सन १९१३ मध्यें मंडळाचे वर्ग सुरूं झाले, १९१४ त वाचनालय उघडलें आणि या वर्षी कै. चिटणीसांचें बंद पडलेलें ज्योतिर्माला मासिक पुस्तक सुरूं करावें असें कांहीं सभासदांस वाटूं लागलें. ह्या कल्पनेसंबंधानें "मंडळाचा" १९१४ चा जो अहवाल रा. रा. यशवंत केशव प्रधान (मंडळाचे चिटणीस) यांनीं वाचून दाखविला त्यामध्यें म्हटलें आहे कीं "It was resolved to continue our old & first journal "ज्योतिर्माला" & subsequently every effort was made to complete the project. Mr. Y. K. Pr. han has undertaken the responsibility in conducting the magazine with the help of Mr. Rama Narayen & others" मंडळाचे उत्साही चिटणीस रा. प्रधान यांच्या परिश्रमामुळें "ज्योतिर्माला" पुन्हा सुरू झाली व ती सुरूं करण्यास मंडळाच्या इतर सभासदांनीं शक्य ती मदत केली. मासिक चालविण्याची जबाबदारी सभासदांनीं घेतली नाहीं आणि त्यामुळें त्यावरील मालकी त्यांच्याकडे नाहीं तरी ज्योतिषशास्त्राची प्रगति होण्याकरतां मंडळापैकींच कांहींजणांनीं मासिक काढलें व त्या मासिकास इतर सभासदांनीं मदत केली. सारांश ज्योतिषवर्ग, ज्योतिषवाङ्मयाचें वाचनालय व ज्योतिर्माला हीं मंडळाच्या सभासदांचींच कामें आहेत. आणि हीं सर्व आजपर्यंत विशेष गाजावाजा न करितां झालीं आहेत.

आतांपर्यंत "मंडळानें काय केलें हें सांगितलें परंतु पुढें काय करावें हें

सांगावयाचें आहे. "मंडळाच्या" सभासदांनीं निरपेक्षपणानें आतांपर्यंत काम केलें आहे पण प्रस्तुत काळीं एवढ्या कामानें भागण्यासारखें नाहीं. "मंडळाच्या" सभासदांची संख्या हल्लीं बरीच कमी झाली आहे. १९१३ च्या सुमारास जे लोक काम करीत होते त्यांमध्यें गेल्या चार वर्षांत मुळींच भर पडली नाहीं. चालू वर्षांत ज्योतिषवर्गही विशेष जोरानें चालले आहेत असें वाटत नाहीं. ज्योतिषवर्ग चालविणें हें महत्वाचें काम खरें पण यापेक्षांही शास्त्र-संशोधनाचें काम विशेष महत्वाचें आहे. ह्या कामाकरितां अनेक ज्योतिर्विद एकत्र येऊन काम करतील तरच तें होण्यासारखें आहे. "मंडळानें" १९०९ सालीं निश्चित केलेले उद्देश पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत:—

( १ ) फलज्योतिषास सशास्त्र संशोधनानें शुद्ध स्वरूप देऊन पूर्वीप्रमाणें त्यास मान्यतेस आणणें व फलज्योतिषाचा सर्व शाखांसह अभ्यास करणें.

( २ ) फलज्योतिष व तत्सदृश दुसरीं शास्त्रें यांचें अध्ययन करणाऱ्यांचा संघ बनविणें.

( ३ ) फलज्योतिष शास्त्राच्या सर्व शाखांवर उपयुक्त व स्वस्त अशीं पुस्तकें लिहून शास्त्रप्रसार करणें.

( ४ ) फलज्योतिषाच्या गूढ तत्वांच्या सोपपत्तिक अभ्यासानें मानवी उत्क्रांतीस मदत करणें.

( ५ ) ज्योतिष व तत्सदृश शास्त्रें यांवरील पुस्तकांचा संग्रह करणें.

ह्या पांच उद्देशांपैकीं पांचवा उद्देश आतांपर्यंत बराच तडीस गेला आहे. बाकीचे उद्देश सिद्धीस जावयास संघशक्तीचा अवलंब केला पाहिजे आणि येवढ्याकरतां मंडळामध्यें निरनिराळ्या ठिकाणचे ज्योतिषी यावयास पाहिजेत. संशोधनाचें कार्य दोन चार मनुष्यांच्या हातून होण्यासारखें नाहीं. सोसायटीचा आतांपर्यंतचा कार्यक्रम कांहींसा बदलला पाहिजे. मंडळाच्या सभासदांचे आतांपर्यंतचे बिनबोभाट चाललेलें काम म्हणजे ज्योतिषाचें फुकट शिक्षण



देणें हें होय. यापुढें शक्य असल्यास तें तसेंच चालवावें पण त्याबरोबरच त्यांनीं इतर कामें हातीं घ्यावीं. मंडळाच्या २ ऱ्या उद्देशाकडे आतां त्यांनीं वळावें. आणि माझी खात्री आहे कीं त्यांना या कामांत यश येईल. मंडळानें देशांतील इतर ज्योतिर्विदांशीं दळणवळण ठेऊन त्यांच्याबरोबर शास्त्रचर्चा करावी, मंडळाच्या मार्फत विद्वान ज्योतिर्विदांची व्याख्यानें करवावीं, त्यांचे लेख एकत्र करावे. अमेरिकेंत स्थापन झालेल्या एका ज्योतिषाच्या मंडळाचे सभासद वर्षांत शोधपूर्वक एकच निबंध लिहून पाठवितात. पण अशा एकेक निबंधानें नीट विचारपूर्वक लिहिलेल्या अनेक लेखांचा संग्रह मंडळाजवळ होतो. अशीच कांहीं तरी व्यवस्था मुंबई ज्योतिर्विद मंडळ करील अशी आशा आहे. मंडळानें मुंबईच्या बाहेरील सभासद घेण्याचें सुरू करावें अशी त्यास आग्रहाची विनंति आहे. जर मंडळाच्या हल्लींच्या नियमांत कांहीं फेर-फार करून संघटित कार्य करण्याचा प्रयत्न झाला तर महाराष्ट्रांतीलच काय पण दुसऱ्या देशांतील ज्योतिर्विदांकडूनही त्यांस शक्य ती मदत होईल असें आम्हांस वाटतें.


"राम नारायण"

सभासद, मुंबई ज्योतिर्विद् मंडळ.

———o———

# हिंदु मिशनरी सोसायटी

लग्न.




चालू मन्वंतरांत सहिष्णु हिंदु धर्म जयिष्णु होऊं पहात आहे. "पालटला मनु सर्व पूर्वीचा भारत जीवन नव प्याला" ह्याची साक्ष दिवसेंदिवस पटूं लागली आहे. भरतखंड जागृत होण्याचीं चिन्हें, मकरराशींतील गुरु—शनींचे होणारे युतियोग आधींच दर्शवीत आहेत. धर्मप्रवृत्तिदर्शक गुरु व तत्त्वज्ञानदर्शक शनि यांची युति भरतखंडाच्या तनुस्थानीं होत असतां सांचलेल्या पाण्याप्रमाणें देशांतील धर्म रहाणें अशक्य आहे. त्यांतून हे



युतियोग आमच्या देशांत केंद्रस्थानीं झाले आहेत.* या युतियोगांच्या कुंडल्यांमध्यें सर्वव्यापी जागृति दर्शविणारी ग्रहस्थिति विचार करण्यासारखी आहे. मकरराशींतील गुरु—शनींच्या पहिल्या योगाच्या कुंडलींत गुरु व शनि हे अनुक्रमें धर्मस्थान व दशमस्थान यांचे अधिपति आहेत. नवम व दशम या स्थानांच्या अधिपतींची युति महत्त्वदर्शक अशा दशमस्थानीं झाली असल्यामुळें आपल्या देशांत मागील अर्धशतकापासून धार्मिक चळवळींना विशेष जोर आला होता. आणि शेवटीं आर्यधर्माची पताका पश्चिमकडील देशांतही रोंविली गेली, शिकागो येथें भरलेल्या धर्मपरिषदेमध्यें आर्यऋषींच्या धर्माचा—आत्मविद्येचा—दिव्य संदेश सर्व मानवजातीस जाहीर करण्यांत आला. त्या वेळेपासूनच हिंदु धर्म जिवंत आहे हें सर्व जगास कळलें. प्रगति जिवंतपणाचें लक्षण होय. हिंदुधर्माच्या प्रगतीचा एक दरवाजा आतांपर्यंत बंद होता पण तोही आतां हिंदु मिशनरी सोसायटीनें उघडला आहे.

धर्मांतर केलेल्या हिंदूंना पुन्हां आपल्या धर्मांत आणण्याविषयींची कल्पना बऱ्याच लोकांना सुचली असेल पण त्यासंबंधानें विचारजागृति करण्याचें काम बरेच दिवस करून रा. रा. गजानन भास्कर वैद्य, संपादक बालबोध, यांनीं त्या कल्पनेला मूर्तस्वरूप दिलें. ह्या कल्पनेचें मूर्तस्वरूप म्हणजेच "हिंदु मिशनरी सोसायटी" होय, ही सोसायटी ता० ९ जुलई १९१७ रोजीं दुपारीं १२ वाजून ७ मिनिटांनीं ( स्टँ. टा. ) स्थापन झाली असें जाहीर करण्यांत आलें. सोसायटीचा हा जन्मकाळ होय. या वेळीं पूर्वक्षितिजावर तुलाराशीचा ९ वा अंश उदय पावत होता. सोसायटीचें कार्य नवीन आहे व नवीन गोष्टी अंमलांत आणतांना पुष्कळ वेळां सुधारकी आचरटपणा

* मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिष. पान ७३।७४ पहा.

किंवा बेतालपणा होण्याचा संभव असतो पण प्रस्तुत सोसायटी तुलाराशीवर जन्म पावली आहे म्हणून तिचें कार्य सारासार विचारास धरून राहील, तिच्याकडून जुन्या धार्मिक मतांचें अतिक्रमण होणार नाहीं. सोसायटीच्या धार्मिक कार्याची साक्ष नवम ( धर्म ) स्थानांतील सुरगुरु देत आहे. सोसायटीचा तनुस्थानाधिपति शनि—नेपच्युनांच्या युतींत असल्यामुळें तिच्या कार्यास पदोपदीं अडथळे येतील पण लग्नेश शुक्र गुरूबरोबर शुभ दृष्टियोग करीत असून नवमस्थानामध्यें गुरु आहे. या योगांच्या जोरावर सोसायटी आपलें कर्तव्य करण्यास समर्थ होईल. नवमस्थानांत मंगळ ग्रह सुद्धां असल्यामुळें सोसायटीमध्यें परधर्माविषयीं सहिष्णुता न बाळगणारे लोक येतील. गुरूप्रमाणें शांत, धीरोदात्त व कर्मठ आणि मंगळाप्रमाणें तापट स्वभावाचे व परधर्माविषयीं सहिष्णुता न बाळगणारे अशा दोन प्रकारचे प्रचारक हिंदु मिशनरी सोसायटीमध्यें असतील. मंगळानें दर्शित केलेले प्रचारक आरंभापासून दिसणार नाहींत. कारण मंगळ साधारणपणें भावमध्याजवळ आहे व स्थानारंभींच गुरु आहे त्यामुळें गुरूच्या स्वभावाचे लोक प्रथम दिसूं लागतील. सोसायटीच्या दहाव्या वर्षापासून मंगळाचा अंमल विशेष दिसूं लागेल. व १९ व्या वर्षापासून तर मंगळाप्रमाणें सोसायटीचें कार्यक्षेत्र होईल असें वाटतें.—सोसायटीचा नवमस्थानाधिपति बुध दशमभावारंभीं असल्यामुळें वक्तृत्व व लेखनकला यांमध्यें निपुण अशा प्रचारकांची जोड सोसायटीस मिळेल.

तृतीयस्थानावरून पराक्रमाचा विचार करावा असें आर्य ज्योतिष ग्रंथांत सांगितलें आहे. प्रस्तुत कुंडलींत तृतीयेश गुरु धर्मस्थानांत असून पंचमेश शनीला आपल्या पवित्र किरणांनीं ( शुभ दृष्टियोगानें ) पुनीत करीत आहे. पंचमेश व पंचमस्थान यांवरून संततीचा विचार होतो. सोसायटीची संतति



म्हणजे परधर्माच्या ग्रहणांतून सुटून हिंदु धर्मांत येणारे लोक. त्यांचा द्योतक ग्रह नेपच्युननें दूषित झालेला शनि आहे. ह्या शनीबरोबर धर्मस्थानांतील तृतीयेश गुरु शुभदृष्टीनें पहात आहे. हा योग सोसायटीच्या कार्यास अनुरूप असाच आहे. ह्या योगामुळें सोसायटी आपलें कार्य करण्यास समर्थ होईल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

सोसायटीच्या कुंडलीमध्यें ग्रहांस राशिबल व दृष्टिबल नाहीं व लग्नेश शुक्र, शनि व नेपच्युन या खलग्रहांबरोबर युक्त असल्यामुळें सोसायटीच्या कार्यास आरंभापासूनच अडथळे येतील व पहिलीं नऊ वर्षें अतिशय त्रासाचीं जातील. चिकाटीनें व श्रमसातत्यानेंच सोसायटीला नवव्या वर्षीं स्थैर्य प्राप्त होईल. हें स्थैर्य प्राप्त होण्यापूर्वीं सोसायटीच्या कार्यांत अनेक अडचणी उपस्थित होतील. सोसायटीचें दुसरें वर्ष बरेंच घडामोडीचें जाईल. दुसऱ्या वर्षीं परिभ्रमण काळाचा मंगळ दशमस्थानांतून जात असतां नीच होत आहे व बुध, रवि व चंद्र यांना दूषित करणार आहे. या भ्रमणामुळें सोसायटीच्या कार्यासंबंधानें विरुद्ध टीका, चालकांना मानसिक व शारीरिक त्रास होतील. सोसायटीशीं उघड शत्रुत्व करणाऱ्या व्यक्ति या वर्षापासून दिसूं लागतील. मंगळाच्या भ्रमणाच्या पाठोपाठ गुरूचेंही भ्रमण दशमस्थानांतून होणार आहे. म्हणजे दुसऱ्या वर्षीं नीच मंगळ व उच्च गुरु दशमांतून जाणार आहेत. मंगळगुरूंच्या या भ्रमणामुळें सोसायटीच्या धार्मिक स्वरूपाबद्दल खडाजंगीचे वादविवाद होतील. सोसायटीला दुसऱ्या वर्षापासून तों पुढें नवव्या वर्षापर्यंत प्रतिकूल परिस्थितीशीं झगडण्याचे बरेच प्रसंग येतील. सातव्या वर्षीं सोसायटीचें कार्य व स्वरूप यांमध्यें फेरबदल होईल. नवव्या वर्षीं तिला स्थैर्य प्राप्त होईल, तिच्या कार्याची ओळख पटून तिला मान्यता मिळेल.

सोसायटीच्या लाभस्थानांत लग्नेश शुक्र व शनि—नेपच्युन आहेत. या योगांमुळें तिच्या सहायक मंडळींतूनच गुप्त रीतीनें विश्वासघाती मनुष्यें निघण्याचा संभव दिसतो. शुक्र, नेपच्युन व शनि त्यांच्या युतीचा परिणाम जातकांत नैतिक दृष्ट्या अनिष्ट असतो असा अनुभव आहे. हा योग सोसायटीच्या कुंडलींत झाला आहे. त्याचीं फळें काय मिळतील याचें अनुमान करण्यापेक्षां भविष्यकाळाकडे नजर ठेवणें प्रस्तुतच्या परिस्थितींत श्रेयस्कर आहे असें वाटतें.

सोसायटीच्या कुंडलींत झालेल्या महत्त्वाच्या योगांसंबंधानें वर लिहिलेंच आहे. आतां सांपत्तिक स्थितीचा विचार करून लेख पुरा करूं. धनेश मंगळ भाग्यभुवनांत असून त्याबरोबर कोणत्याही ग्रहाचा अनिष्ट योग झालेला दिसून येत नाहीं. कुंडलींत सांपत्तिक योगासंबंधानें अनिष्ट योग झालेले दिसून येत नाहींत व संपत्तीचा कारक ग्रह गुरु भाग्यभुवनांतच आहे. यामुळें सोसायटीच्या कार्यास सांपत्तिक अडचणी येणार नाहींत असें वाटतें.

"राम नारायण"

---

## लोकशिक्षणाचा अभिप्राय.

"**मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिषः**—लेखक रामनारायण. पृ. १०८, किं. ०१०. व्यक्तीच्या शुभाशुभ फलाप्रमाणें राष्ट्राचींहि शुभाशुभ फलें वर्तविण्याबद्दल प्राचीन आर्यज्योतिषामध्यें विचार केलेला आहे. ज्योतिषाच्या या भागास मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिष म्हणतात. यावर अनेक ग्रंथ झाले होते, पण त्यांपैकीं पुष्कळ आज अनुपलब्ध आहेत. वराहमिहिरसंहिता काय ती आज उपलब्ध आहे. ज्योतिषाच्या या भागासंबंधानें स्वतः **शोध करून व अनुभव मिळवून ठरलेले सिद्धांत ग्रंथकारानें यांत दिले आहेत.** राष्ट्राची कुंडली कशी मांडावयाची, निरनिराळ्या स्थानांपासून कोणकोणत्या गोष्टीचें शुभाशुभ वर्तवितां येतें, ग्रहांचे परिणाम, कोणत्या देशांवर व शहरांवर विशिष्ट राशींचा विशेष परिणाम होतो, वगैरे माहिती देऊन ग्रहणें, भूकंप, धूमकेतु या विषयासंबंधानेंहि कांहीं विवरण केलें आहे. त्या **शास्त्राच्या विद्यार्थ्यांनीं अवश्य वाचनीय आहे.**"

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्याप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रीद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. | नोव्हेंबर १९१७. | अंक ८ वा.

## अर्धवटपणाची कमाल.

( लेखकः—राम नारायण. )

सत्य मत सिद्ध करण्यास शिष्टसंमत मार्ग अनेक असतील, त्या मताविरुद्ध असणाऱ्या इतर मतांचें खंडन करण्यास कडक भाषा वापरणें किंबहुना त्यांचा उपहास करणें हेंही एक वेळ करावें लागेल पण सत्य मत स्थापण्याकरतां खोडसाळ किंवा अर्धवट गोष्टींचा पसारा करण्याचें कारणच नसतें. खोडसाळपणाचें असत्याशीं जवळचें नातें असतें याचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास वेळीं अवेळीं जी निरयनाची तरफदारी करण्यांत येते ती पहावी. ही तरफदारी करण्यांत कधीं काल्पनिक तर कधीं खोडसाळ, कधीं अर्धवट तर कधीं असत्य अशा गोष्टींची सरभेसळ करून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यांत येते व याचें ताजें उदाहरण म्हणजे रा. रामचंद्र विनायक पटवर्धन यांनीं निरयनाच्या तर्फेनें लिहिलेल्या

लेखांचें होय. चित्रमय जगतूच्या जुलैच्या अंकांत त्यांनीं "सायन आणि निरयन" असा एक अर्धा लेख लिहिला आहे. ह्या अर्धवट लेखासंबंधानें "मुंबई ज्योतिर्विद् मंडळाच्या एका सभासदाचा" लेख ज्योतिर्मालेच्या मागील अंकांत प्रसिद्ध झाला होता. ह्या सभासदाच्या लेखास पटवर्धनांनीं उत्तर म्हणून "विनाकारण घोळ" या सदराखालीं "संदेश" च्या २३ तारखेच्या अंकांत दीड रकानाभर मजकूर लिहिला आहे. ह्या दोन्ही लेखांतील खोडसाळपणा व अर्धवट माहिती बाजूला ठेविली तर सायन नक्षत्रें चुकीचीं आहेत असें प्रतिपादन करण्याचा पटवर्धनांनीं अट्टहास केला आहे. सायन नक्षत्रें चुकीचीं आहेत ह्याबद्दल त्यांनीं जीं कारण-परंपरा दिली आहे ती लोकांस पटणार नाहीं असें त्यांनाच वाटून ते लिहितात "तुम्ही सायन पद्धति खुशाल उराशीं बाळगा पण तुमच्या नक्षत्रांना जुनीं ( आमचीं ? ) नांवें देऊं नका." सायनवाद्यांनीं अश्विनी, भरणी अशीं नांवें दिल्यामुळें निरयनवाद्यांचें काय नुकसान होतें हें पटवर्धनांस ठाऊक. आपल्या पूर्वार्जित धनाचा अपहार करणाऱ्यावर सुद्धां एखाद्यानें इतका रोष केला नसता पण सायनवाद्यांनीं आपल्या नक्षत्रांस जुनीं नांवें दिलीं म्हणून पटवर्धनांनीं रोष व्यक्त केला आहे. "जुनींच नांवें उपयोगांत आणणें चुकीचेंच नव्हे तर गर्ह्य आहे" असा त्यांनीं शेरा मारला आहे ! सायनवाद्यांचीं नक्षत्रें पूर्व शास्त्रकारांच्या अभिप्रायास व आशयास धरून आहेत म्हणून पूर्वींचींच नांवें त्यांस असलीं पाहिजेत. सायन नक्षत्रांत नक्षत्रांच्या नांवाप्रमाणें स्थिरतारकापुंज नाहींत म्हणून त्यांचीं नांवें बदलावीं असा आक्रोश रा. पटवर्धन करीत आहेत पण त्यांच्या निरयन नक्षत्रांची काय दशा आहे हें त्यांनीं लक्षांत घेतलें नाहीं असें दिसतें. पंचांगांत स्वाती नक्षत्र दिलें असतां आकाशांतील "स्वाती नक्षत्र-पुंजांत" चंद्र असत नाहीं मग निरयनवाद्यांनीं त्यास स्वाती असें नांव कां द्यावें ? निरयन नक्षत्रांपैकीं कांहींच्या योगतारा निरयन विभागात्मक नक्षत्रांत पडत नाहींत. ज्या नक्षत्रांच्या विभागांत त्यांचे योगतारे पडत नाहींत त्यांचीं नांवें बदलण्याची सोय रा. पटवर्धन करणार आहेत काय ? श्रवण नक्षत्रावर श्रावणी करण्याचा प्रघात आहे. पंचांगांत ज्या वेळीं श्रवण नक्षत्र दिलें असतें त्या वेळीं चंद्र श्रवणतारकापुंजांत नसतो म्हणून हल्लीं ज्याला निरयनवादी श्रवण नक्षत्र म्हणतात त्याचें नांव बदललें पाहिजे. निरयन मृग नक्षत्रांत मृग व आर्द्रा अशा दोन योगतारा येतात व आर्द्रा नक्षत्रांत मुळींच योगतारा



नसतें. ज्या नक्षत्रांत दोन योगतारा आहेत त्याचें नांव मृग नक्षत्र असें कां ? आर्द्रा नक्षत्रांत मुळींच योगतारा नसतां त्याला आर्द्रा कां म्हणावयाचें ? आधीं पटवर्धनांनीं निरयन नक्षत्रांची ही भानगड सोडवावी. त्यांचा पुन्हा एकवार नामकरणविधि करावा व नंतर सायनवाद्यांना नक्षत्रांचीं नांवें बदलण्यास सांगावें.

नक्षत्रांचीं नांवें मूळ कशीं पडलीं असतील तीं असोत त्यांतील कांहीं नांवें अन्वर्थक आहेत आणि हीं नांवें प्राचीन काळापासून तशींच आहेत. उदाहरणार्थ आर्द्रा हें नक्षत्र घ्या. ह्या नक्षत्राच्या नांवावरून तें पर्ज्यन्याचें द्योतक आहे. आर्द्रा नक्षत्रांत सूर्य प्रवेश करतांच पर्ज्यन्यकाळास आरंभ होतो असा प्राचीनकाळापासून शास्त्रकारांचा अभिप्राय आहे. पूर्वशास्त्रकार पर्ज्यन्याचें आर्द्रा हें पहिलें नक्षत्र समजतात व त्याप्रमाणें त्यांनीं आर्द्राप्रवेशाचीं फलें दिलीं आहेत. पण निरयनवाद्यांच्या मृग नक्षत्रावर पर्ज्यन्यकाळाचा आरंभ होतो असें असून निरयनवादी आर्द्राप्रवेशाच पंचांगांत देतात ! पटवर्धन म्हणतात कीं पंचांगशोधकांच्या ही गोष्ट लक्ष्यांत आहे व त्याप्रमाणें ते मृगप्रवेश म्हण किंवा रोहिणीप्रवेश म्हणा अशी सुधारणा करणार आहेत. ही सुधारणा अशी होणार आहे कीं मृगप्रवेश म्हणून म्हणावयाचें व त्याचीं फलें पूर्वशास्त्रकारांच्या आर्द्राफलाचीं द्यावयाचीं. तोंडानें मृगनक्षत्र म्हणून म्हणावयाचें व शास्त्रकारांचीं आर्द्राफलें द्यावयाचीं हा प्रकार गर्ह्य आहे असें पटवर्धनांस वाटत नसेल पण विचारी मनुष्यांस तसें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. आज निरयनपंचांगकर्त्यांना मृगप्रवेश द्यावा लागेल तर पुढें रोहिणीप्रवेश व त्यापुढें कृत्तिकाप्रवेश देण्याची जरूरी वाटेल. व कांहीं काळानें ते अश्विनीप्रवेश देऊन त्याचीं फलें मात्र पूर्वशास्त्रकारांच्या आर्द्राप्रवेशफलांच्या भाषेंत देतील आणि तरीही त्यांस आपण कांहीं गैर करीत आहों असें वाटणार नाहीं व यामध्येंच त्यांच्या पक्षांधतेची साक्ष पटणार आहे. अगदीं प्राचीनकाळापासून आर्द्रा हें पर्जन्याचें नक्षत्र आहे. सायनमानानें आर्द्रा नक्षत्र घेतलें तरच तें पर्ज्यन्याचें नक्षत्र रहाणार आहे. सारांश नक्षत्रें ताऱ्यांत अडकविलीं तर त्यांचा अन्वर्थकपणा जातो आणि म्हणून सायनवादी अन्वर्थकपणा राखण्याकरतां संपातापासून पहिल्या नक्षत्रास अश्विनी असें म्हणतात. ज्याप्रमाणें संपातबिंदूपासून ३० अंशाच्या विभागास

मेषराशि ही संज्ञा आहे त्याप्रमाणेंच पहिल्या १३ अं. २० कलेच्या विभागास "अश्विनी" नक्षत्र असें म्हणतात. रा. पटवर्धन म्हणतात "संपातवर्ति नक्षत्राला अश्विनीच कां म्हणावें हे कोणीच शहाणा सायनवादी सांगूं शकत नाहीं." "अश्विनीचे देव्हारे यूरोपीय पद्धतीस अनुसरून माजविलेले दिसतात" राशींचा अनुक्रम मेषपासून आहे यांत शंका नाहीं व "मेषाश्वि प्रथमा" अशी सांगड पूर्वाचार्यांनीं घातलेली आहे. त्यांचें उत्पादकत्व अलीकडच्या सायनवाद्यांकडे नाहीं व यूरोपिअन पद्धतीस तर खास नाहीं. हा प्रकार यूरोपियन पद्धतीस अनुसरून आहे असें म्हणणें एक तर अज्ञानाचें तरी प्रदर्शक असेल किंवा जाणून बुजून खोडसाळपणा असेल. सायन नक्षत्र अन्वर्थक आहेत, पूर्वशास्त्रकारांच्या अभिप्रायास अनुसरून आहेत आणि म्हणूनच त्यांच्या संज्ञा बदलण्याचें कारण नाहीं. सायनपद्धतीची सशास्त्रता दिवसेंदिवस लोकांच्या अनुभवास पटत आहे हें त्यांच्या वाढत्या संख्येवरून सहज सिद्ध होत आहे. अशा वेळीं पटवर्धनांनीं कितीही अकांडतांडव केलें तरी तें निरर्थकच होईल.

निरयन नक्षत्रांची तरफदारी व सायनवाद्यांचा उपहास करण्याकरितां रा. पटवर्धनांनीं कित्येक गोष्टींचा विपर्यास करण्याचा जो प्रयत्न केला आहे तो तर अत्यंत गर्हणीय आहे. सायनवाद ऋतूंपुरता त्यांस मान्य आहे पण ज्या ज्या वेळीं ते सायनवाद्याविषयीं बोलतात तेव्हां तेव्हां "अयुक्तिक, असमंजस अज्ञानी, खुळचट" असें कांहीं तरी उपपद लाविल्याशिवाय त्यांस लिहितांच येत नाहीं. कै. लेले, मोडक, दीक्षित यांच्या सारख्यांना वरीलप्रमाणें संबोधणारे हे कोणी तरी महान ज्योतिषशास्त्रविशारद असतील असा जर कोणी समज करून घेतला तर तो साफ चुकीचा ठरेल. राजश्रींना निरयन कुंडली करतांना सायन रवि घेण्याचा प्रघात केव्हांपासून पडला याचीही माहिती नाहीं. सायनवाद्यांचा नुसता उपहास करून जर निरयन नक्षत्रें मान्य होण्यासारखीं असतीं तर त्यांनीं खुशाल करावीं. त्यांत त्यांचा शिष्टपणाच दिसून येईल. कै. मोडकांच्या अज्ञानाची कींव करून रा. पटवर्धनांचें समाधान होण्यासारखें नव्हतें. त्यांना कै. लेले व दीक्षित यांचीं मतें शेवटीं बदललीं



असें खोडसाळ विधान करण्यासही दिक्कत वाटलीं नाहीं.* आम्हीं त्यांना त्याविषयीं खुलासा करण्यास ज्योतिर्मालेच्या सप्टेंबरच्या अंकांत जाहीर विनंति केली होती पण त्याविषयीं खुलासा करण्याचा सरळपणा त्यांनीं दाखविला नाहीं. रा. पटवर्धनांच्या खोडसाळपणाचें दुसरें उदाहरण पहा. ते म्हणतात "झडकिएल, राफेल, ओल्डमूर, ॲलन लियो हीं नांवें ( नक्षत्रांस ) द्या. कारण सायनवाद्यांचे गुरु हेच आहेत. हे यूरोपियन ज्योतिषी सायनवादी म्हणून आपल्याकडेही सायनवादाला महत्व आलें आहे" "अश्विनीचे देव्हारे युरोपियन पद्धतीस अनुसरून माजविलेले दिसतात." सायनपद्धति असमंजसपणाची आहे येवढें सांगून पुरेसें झालें नाहीं तेव्हां सायनवादप्रवर्तकांची शेवटीं मतें बदललीं अशी गप्प ठोकून दिली. सायनपद्धतीवर आणखी शितोडे उडविण्यासाठीं ती युरोपियन ज्योतिषांपासून चोरली असा पुकारा केला आहे. सायन नक्षत्रें सायनवाद्यांनीं यूरोपियनांचीं चोरलीं हें विधान करण्यांत रा. पटवर्धन सपसेल घसरले आहेत व त्यांत त्यांचें अज्ञान मात्र जगाच्या दृष्टीस पडलें आहे. यूरोपियन ज्योतिषांत नक्षत्रांचा विचारच नाहीं. झडकील, राफेल, ॲलन लियो इत्यादि अनेक ज्योतिर्विदांच्या शेंकडों ग्रंथांतून चुकून सुद्धां सायननक्षत्रांचा विचार नाहीं. पण रा. पटवर्धनांच्या विचारशक्तीस पक्षांधतेनें ग्रासल्यामुळें ते खोटीं विधानें करण्यांत मागेंपुढें मुळींच पहात नाहींत. सायनवाद्यांनीं ज्यांच्यापासून नक्षत्रांची चोरी केली असें रा. पटवर्धन म्हणतात त्या यूरोपियन ज्योतिषांजवळ तीं मुळींच नव्हतीं व नाहींत. सायननक्षत्रांचा वाद स्वतंत्रपणें आपल्याकडेच आहे. रा. पटवर्धनांना सायनवादाची माहिती बिलकूल नाहीं असें दिसतें. सायननक्षत्रांचा वाद आपल्याकडे जेव्हां निघाला त्या वेळीं पटवर्धनांनीं उल्लेखिलेले यूरोपियन ज्योतिर्विद ज्योतिषाची

* कै. लेले किंवा दीक्षित यांचीं मतें मुळींच बदललीं नव्हतीं. रा. पटवर्धनांनीं ही कांहींतरी गप्प उठवली अशाबद्दलचें कै. वि. र. लेले यांच्या चिरंजीवांकडून आम्हांस पत्र आलें आहे. लेले मृत्यूशय्येवर पडले असतांना देखील आपल्या चिरंजीवाकडून सायनवादातर्फे पत्र लिहीत असतां त्यांचें देहावसान झालें असें असतां शेवटीं त्यांचीं मतें बदललीं असें लिहिणें म्हणजे खोडसाळपणाची कमाल होय.

परिभाषा शिकत होते. अर्थात त्यांच्याजवळून हीं नक्षत्रें आम्हीं घेतलेलीं नाहींत व सायनवाद्यांचे ते गुरूही नव्हत.

पटवर्धन स्वमत प्रतिपादनांत विरुद्धपक्षास मूर्ख व गचाळ म्हणतात पण स्वतः त्यांच्या लिहिण्यांत गचाळपणा व अर्धवटपणा सर्वत्र भरला आहे. त्यांच्या चित्रमयजगतांतील लेखासंबंधानें ज्योतिर्मालेंत आलेला लेख ते ज्योतिर्मालाकारांचा आहे असें समजतात. तरी त्यावर "ज्योतिर्विद्मंडळाच्या सभासदाकडून" असें म्हटलें आहे. यावरून तो लेख त्यांनीं अर्धवट वाचला असावा व त्यास आणखी एक पुरावा आहे. लेखकानें प्रश्न विचारला आहे "रामजन्मकाळीं **रवि उच्च म्हणजे मेषेंत** असतां नवमीस पुनर्वसु नक्षत्र कसें आलें ?" पटवर्धनांनीं तो लेख अर्धवट वाचल्यामुळें ते लिहितात "चैत्र शु॥ ९ मीस पुनर्वसु नक्षत्र अनेक वेळां येतें" पण त्यावेळीं मेषेंत रवि नसून मीनेंत असतो. प्रश्न विचारला होता, मेषेंत रवि असून चैत्र शुद्ध ९ मीस पुनर्वसु नक्षत्र कसें येतें" ह्या प्रश्नास पटवर्धनांनीं अर्धवटपणें उत्तर दिलें आहे 'दहा पांच वर्षांचीं पंचांगें चाळून पहावीं"! लेखकाच्या पहिल्या प्रश्नाच्या उत्तरांत तर पटवर्धनांनीं आपल्या अज्ञानाचें प्रदर्शन केलें आहे. "हल्लींच गणित इंग्रजी पद्धतीचें आहे सबब रवि सायन घेण्याचा प्रघात सुरू झाला असावा" या उत्तरानें पटवर्धनांनीं आपल्या अर्धवटपणावर शिक्कामोर्तबच केलें आहे. निरयनवादी कुंडली तयार करतांना रवि सायन घेतात हा प्रकार केव्हांपासून आहे हें त्यांनीं पुन्हां एकवार चौकशी करून ठरवावें.

निरयन नक्षत्रांची तरफदारी करतांना सायनप्रवर्तकांचीं मतेंच बदललीं, ते मूर्ख व अजागळच होते, सायन नक्षत्रें यूरोपीय ज्योतिषावरून घेतलीं आहेत असले अनेक प्रलाप आपल्या अर्धवट माहितीच्या आधारावर रा. पटवर्धनांनीं काढले आहेत. ते सत्यास किती सोडून आहेत हें वर दाखविलेंच आहे. खरें पहातां त्यांच्या लेखांतील असंबद्ध प्रलापांस मुळींच महत्व नव्हतें पण पुष्कळ वेळां असले प्रलाप लोकांस संशयांत पाडतात तेव्हां त्यांचा वेळींच प्रतिकार करणें हें आम्हांस श्रेयस्कर वाटलें म्हणून पटवर्धनांच्या विधानांची खरी किंमत किती आहे हें प्रस्तुत लेखांत दाखविलें आहे.

———o———



# ज्योतिर्विद्या.

( लेखकः—राम नारायण. )

शास्त्रें फार व अपार आहेत. तीं सर्वच सर्वांना प्राप्त होत नाहींत. कोणतीं शास्त्रें कोणाला येतील ह्याचा ज्योतिषशास्त्रदृष्ट्या विचार करणें फार महत्वाचें आहे. त्याप्रमाणेंच मनोरंजकही आहे. कोणत्या ग्रहयोगांवर कोणतें शास्त्र किंवा विद्या प्राप्त होते हें सांगतां आलें तर बऱ्याच लोकांचे श्रम वांचतील. आपल्याकडे अशा प्रकारचा विचार विशेष झालेला दिसून येत नाहीं. ह्या विषयाची चर्चा व्हावी म्हणून आम्हीं त्यासंबंधानें चार शब्द लिहिण्याचा विचार केला आहे व ह्या चर्चेला आरंभ—**ज्योतिर्विद्येपासून** करीत आ े. व्यवहारापुरतें गणित सर्वांस येतें पण सर्व कांहीं गणिती नसतात. त्याप्रमाणेंच व्यवरोपयोगी ज्योतिष सर्वांस येईल मात्र सर्वांनाच—"ज्योतिषी"—वराहमिहिराच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे सांवत्सरिक—होतां यावयाचें नाहीं. ज्योतिषी होण्यास कांहीं विशिष्ट योगच जन्मकाळीं व्हावयास लागतात. हे विशिष्ट योग कोणते याचा आज विचार करूं.

जुन्या ग्रंथांचा सारभूत असा "जातकतत्व" नांवाचा ग्रंथ आहे. ह्या ग्रंथांत ज्योतिर्विद्येसंबंधानें पुढें दिल्याप्रमाणें योग दिले आहेत.

( १ ) ज्ञाच्छौ सौत्यार्थगौ ज्योतिर्विदां श्रेष्ठः ।

( २ ) धनेशे बलिनि, केंद्रायकोणेज्ञे ज्योतिर्विदां श्रेष्ठः ।

( ३ ) स्वोच्चे धने जीवे ज्योतिर्विदां श्रेष्ठः ।

( ४ ) धी कारके केंद्रे कोणे शुभदृष्टे भविष्यद् वक्ता ।

( १ ) बुध, शुक्र द्वितीय, तृतीय स्थानांत असतील किंवा ( २ ) धनेश बलवान असून बुध केंद्र, कोण किंवा लाभांत असेल किंवा ( ३ ) उच्च गुरु धन स्थानीं असेल तर श्रेष्ठ ज्योतिर्विद होतो ( ४ ) पंचमेश केंद्र कोणांत शुभदृष्ट असेल तर भविष्यवक्ता होतो.

वरील नियमांत विद्यास्थानें ( पंचम, तृतीय व द्वितीय ) —विद्येचे कारक

ग्रह बुध, गुरु व शुक्र यांचे योग दिले आहेत व ते सामान्यत: सर्वसाधारण विद्येचे द्योतक आहेत, निश्चयात्मक असे ज्योतिर्विद्येचे द्योतक नाहींत. निश्चयात्मक नियम सांगण्यास कारकग्रहांचा निश्चय झाला पाहिजे. वरील नियमांत त्याच विचारांचा अभाव आहे आणि म्हणून वरील एखादा योग एखाद्याच्या कुंडलींत होऊनसुद्धां त्यास ज्योतिर्विद्येचा गंधही नसतो अशीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील.

ज्योतिर्विद्येचें कारकत्व कोणत्या ग्रहाकडे आहे हें दोन प्रकारानें ठरवितां येईल. एक प्रकार असा आहे कीं ज्योतिषशास्त्रांत पारंगत होण्यास कोणत्या **गुणांची** आवश्यकता आहे व ते गुण कोणत्या ग्रहांचे आहेत हें ठरविलें पाहिजे. दुसरा प्रकार म्हणजे अनेक ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांत सामान्ययोग कोणते असतात व या योगांत कोणत्या ग्रहांचें प्राबल्य असतें याचा निश्चय झाला पाहिजे. आपण दोन्ही प्रकार विचारांत घेऊं.

ज्योतिषग्रंथांचें नुसतें पाठांतर करून किंवा नुसता अर्थ समजून घेऊन ज्योतिष्याचें भागत नाहीं. ग्रहादिकांच्या गुणधर्मांचें ज्ञान करून घेऊन प्रत्येक वेळीं कल्पनेच्या जोरावर समीकृत असें अनुमान करावें लागतें. येथें स्फूर्तिकारक कल्पना व विचार ह्यांची सारखीच जरूर असते. मनुष्याचे मानसिक व बौद्धिक कोष हे अनुक्रमें चंद्र व बुध यांच्या अंमलाखालीं आहेत. नुसती कल्पना चंद्र दर्शवील व नुसते विचार बुध ग्रह दर्शवील. कल्पना, विचार व स्फूर्ति हे तिन्ही प्रकार दर्शक ग्रहामध्येंच पहावयास सांपडतात आणि म्हणून ज्योतिषशास्त्राचें कारकत्व हर्शल ग्रहाकडे आहे असें मानतात आणि हीच गोष्ट दुसऱ्या प्रकारानें म्हणजे ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांच्या विचारावरून दिसून येते.



# गोचरीच्या मंगळाचें भ्रमण.

साधारणपणें म्हटलें असतां **मंगळाचे** परिणाम तीव्र, आकस्मिक, जहाल असून दीर्घकाळ टिकणारे नसतात; व ह्याचमुळें **मंगळाचे** परिणामाची कल्पना इतर ग्रहांपेक्षां फार लौकर करितां येते. शनि व मंगळ या दोन ग्रहांचे परिणामाची कल्पना करणें असतां खालील उदाहरणावरून ती चांगली करितां येईल. शनि हा दीर्घकालदर्शक राहणाऱ्या सर्दीच्या व साथीच्या-मलेरिआ वगैरे सारख्या पुष्कळ दिवस येणाऱ्या तापासारखा असून मंगळ हा नवज्वरासारख्या थोडा काळ राहणाऱ्या पण अति तीव्र तापासारखा आहे. मंगळ हा फार तीव्र किंवा जहाल ग्रह असून तो कुंडलीमध्यें ज्याप्रमाणें स्थानबली, राशिबली असतो त्याप्रमाणें त्याचे परिणाम पाहण्यास मिळतात. त्याचप्रमाणें तो कुंडलीमध्यें जन्मकाळीं केन्द्रामध्यें आहे किंवा काय तसेंच तो कोणते कोणते दृष्टियोग करीत आहे याचा विचार करून नंतर या ग्रहाचे गोचर फलाची कल्पना केली पाहिजे. या ग्रहाच्या जहालपणाचेच धर्मामुळें याचे इतकी सूक्ष्म फळें दुसऱ्या कोणत्या ग्रहाची सांगतां येत नाहींत. पण त्याबरोबर हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं याचे स्वरूपाची पूर्ण कल्पना झाली नाहीं तर याचे इतकी दुसऱ्या कोणत्याच ग्रहाचीं फळें चुकत नाहींत. एखाद्या कुंडलीमध्यें ज्या वेळीं **मंगळाचें** जन्मकाळच्या **रवीवरून** भ्रमण होतें त्या वेळीं कांहींच महत्वाच्या गोष्टी घडून येत नाहींत तर दुसऱ्या कुंडलीमध्यें याच मंगळाचें रवीवरून होत असलेल्या **गोचर** भ्रमणानें दाहजन्यविकार, ताप, भांडणें, पोलीसमधील किंवा कायद्यासंबंधीं भानगडी, त्रास व हजारों नाना तऱ्हेच्या उपाधि उत्पन्न होतात.

गोचर ग्रहांचे विचार करतेवेळीं वाचकांनीं एक फारच महत्वाचा मुद्दा लक्षांत नेहमीं बाळगला पाहिजे तो हा कीं जन्मकुंडलीमध्यें त्याचप्रमाणें दिनवर्षपद्धतीप्रमाणें ग्रह कोठें आहेत, कोणकोणते वार्षिक दृष्टियोग

चलित किंवा जन्मकालचे होत आहेत. कोणत्या स्थानावरून गोचर ग्रहांचें भ्रमण होत आहे वगैरे पूर्ण विचार केल्याखेरीज गोचर ग्रहावरून अचूक भविष्य कालनिर्देश करितां येईल असें वाटत नाहीं. दिनवर्षपद्धतीसंबंधानें आम्हीं पुढें एखाद्या वेळीं स्वतंत्र विवेचन करण्याचें योजिलें आहे.

जन्मकाळीं पूर्व क्षितिजावर **मेष, वृश्चिक, मकर** राशि उदय पावत असतां लग्नामधून होत असलेले मंगळाचे गोचर भ्रमणानें स्वभाव उत्साही, धाडसी असा बनून अनेक उद्योगधंदे करण्यास नवा जोम येतो.

**दशम** भावारंभीं सदरहू वर सांगितलेल्या राशि उदय पावत असतां ह्या स्थानामधून गोचर मंगळाचें भ्रमण होत असतां उद्योगधंदा चांगला चालतो, मानसन्मान कीर्ति मिळते; ह्या वेळीं सर्व प्रकारचीं धाडसाचीं किंवा सार्वजनिक लोकांपुढें आगणारीं कामें करावींत. परंतु इतर राशि दशम भावारंभीं उदित असून त्यामधून मंगळाचें भ्रमण होत असतां अनेक प्रकारचीं संकटें, त्रास, व अपयश प्राप्त होतें. करितां ह्या काळामध्यें विशेष भानगडीचीं किंवा धाडसाचीं कामें करूं नयेत; कारण ह्या काळामध्यें नैसर्गिक मनुष्य धाडसी, अविचारी, उद्धट किंवा आपलाच हेका चालविणारा, चिडखोर बनतो व त्यामुळें त्याचे अनेक प्रकारें नुकसान होण्याचा संभव असतो. ज्यांच्या कुंडलीमध्यें जन्मकाळीं **मंगळ** बलवान् असतो त्या मंडळीस ह्या वरील सर्व गोष्टींसंबंधानें विशेष सावध राहिलें असतां खात्रीनें इतका त्रास होणार नाहीं.

सप्तस्थानामधून गोचरीचे मंगळाचें भ्रमण होत असतां साधारणपणें लग्नांतील भ्रमणाप्रमाणेंच फळें मिळतात परंतु जर सप्तम स्थानांत तो राशिबली नसून पीडित होत असेल तर त्यापासून विशेष वाईट फळें अनुभवास येतात, शत्रुत्व होतें, भांडणें होतात; हा काळ भागीदारांबरोबर चांगला जात नाहीं; मैत्रीमध्यें विरोध येतो; स्त्रीची प्रकृति चांगली राहत नाहीं, गृहकलह होतात.



**मंगळाचें** भ्रमण जन्मकालीन **हर्शल** किंवा प्रजापतीवरून होत असतां अपघात होतात; स्वभाव फार जहाल किंवा चिडखोर–भांडखोर बनतो; कित्येक वेळां कित्येकांचा स्वभाव फार लहरी व रागीट बनतो; व त्यामुळें त्यांचे ताब्यामध्यें मन राहात नाहीं; हातून अविचाराचीं कृत्यें घडतात; मंगळाचें भ्रमण जन्मकालीन द्वितीय स्थानामधील **हर्शल**वरून होत असतां हा काल सांपत्तिक सुखास चांगला नसतो; ह्या काळामध्यें कोणत्याही प्रकारचे सट्याचे व्यवहार करूं नयेत कारण या वेळीं मोठी सांपत्तिक हानी होण्याचा संभव असतो. हर्शल **दशम** स्थानामध्यें असून त्यावरून **मंगळाचें** भ्रमण होत असतां आपल्या वरिष्ठाबरोबर किंवा धन्याबरोबर भांडणतंटे होतात. हर्शलमंगळाचे युतीचीं फळें फार तीव्र, जहाल व भयंकर आहेत व त्यामुळें घडून येणाऱ्या गोष्टी फारच भयंकर व अति तीव्रतेनें घडतात, व म्हणून या योगाच्या फलाचा विचार चांगला काळजीपूर्वक केला पाहिजे. या कालांत धंद्यामध्यें अडचणी येतात; पितृकष्ट होतात; नाना प्रकारचे आरोप येतात; नोकरी सुटते. या ग्रहामध्यें शुभदृष्टियोग गोचरीनें होत असतां इतकी विशेष जोरानें फळें पाहण्यास मिळत नाहींत परंतु राशिबली व शुभदृष्ट असतां चांगलीं फळें मिळतात.

जन्मकालचे **शनी**वरून मंगळाचें भ्रमण होत असतां नाना प्रकाराच्या अडचणी किंवा संकटें प्राप्त होतात. व ही युति पश्चिमषटकांत म्हणजे नवम, अष्टम, सप्तम, षष्ठ, पंचम व चतुर्थ स्थानांमध्यें होत असतां म्हणजे या स्थानामध्यें शनि असून त्यावरून गोचरीच्या मंगळाचें भ्रमण होत असतां शत्रुत्व होतें, भांडणें होतात, अपघात होतात. त्याचप्रमाणें हे दोन ग्रह ज्या राशीमध्यें युत होतात तद्योतक शरिराच्या अवयवास दुखापत, जखम किंवा इजा होते. पित्यास किंवा आज्यास देहकष्ट होतात. व त्यांच्या मृत्यूच्या वेळीं अशीच कांहींतरी शनिमंगळाची गोचरीनें स्थिति असते. चतुर्थामधील शनीवरून

मंगळाचें भ्रमण अशुभ असतें. इमारतीचा किंवा स्थावर मिळकतीचा नाश होतो. सप्तम स्थानांतील शनीवरून मंगळाचें भ्रमण होत असतां स्त्रीस कष्ट, जुलुम होतो, बलात्कार होतो, अत्याचार होतात. शनि दशमांत असून त्यावरून मंगळाचें भ्रमण होत असतां अपकीर्ति, अब्रुनुकसानीच्या फिर्यादी आर्यादी होतात. द्वादश स्थानामधील शनीवरून मंगळाचें भ्रमण होत असतां त्रास उत्पन्न होतो अनेक भानगडी उत्पन्न होतात; आपल्याच अत्याचाराच्या कृत्यानें तुरुंगामध्यें जाण्याचा प्रसंग येतो; कैद घडते वर दर्शविलेलीं अशुभ फलें जन्मकालीं शनि पीडित असतां किंवा गोचरीनें अति पीडित असतां विशेषेंकरून अनुभवास येतात.

मंगळाचें भ्रमण जन्मकाळचे गुरुवरून होत असतां सावकार, बँकर्स, वकील, जजीस यांचे बरोबर व्यवहार करण्यास हा काळ सर्वप्रकारें अनुकूल असतो. धंद्यामध्यें लाभ होतो. कांहीं महत्वाचें कृत्य करून लोकांमध्यें आपली महती व्हावी अशा तऱ्हेची मनाची वृत्ति होते. एकंदरीनें हा काळ चांगला अनुकूल असतो. परंतु मंगळ गुरुबरोबर अशुभ दृष्टियोग करीत असतां सट्ट्याचे किंवा पैजेच्या व्यापारामध्यें सांपत्तिक अडचणी येतात, अविचारीपणा विशेष वाढतो, त्रास व कष्ट होतात, लोकांमध्यें अपकीर्ति होते.

जन्मकालीं रवि सप्तम, लग्न व व्ययस्थानामध्यें अति पीडित असून मंगळाचें भ्रमण जर गोचरीनें त्यावरून होत असेल तर अति अशुभ फलें दृष्टोत्पत्तीस येतात. ह्या कालांत कैदेचा योग येतो; आपल्या वर्तणुकीमुळें लोकांचीं मनें कलुषित होतात; खाण्यापिण्यांत, वागण्यांत किंबहुना सर्व गोष्टींमध्यें अतिरेक होतो; परंतु जर जन्मकालीं मंगळ बळवान असून रवि शुभसंबंधित असेल तर या मंगळाचे भ्रमणानें सार्वजनिक मानसन्मान किंवा कीर्ति मिळते म्हणून महत्वाचीं मोठालीं कार्यें घडतात.

( अपूर्ण )



# ग्रहविचार.

जातकग्रंथांत ग्रहांचें राशिफल व स्थानफल निरनिराळें दिलेलें असतें. चंद्र उच्च असून त्याचें त्या राशींत फल शुभ अनुभवास येतें पण तोच चंद्र स्थानबली नसला तर तें शुभ फल मिळेलच असें म्हणवत नाहीं. मग अनुभव जसा असेल तसा ज्योतिषी आपली कांडी फिरवितो. फल अनुभवास अनिष्ट आलें तर 'चंद्र अष्टमांत आहे' हें कारण व शुभ आलें तर "चंद्र कोठेंही का असेना तो उच्च आहेना ?" अशी दुहेरी कारणपरंपरा ज्योतिषी सांगून टाकितो. ही दुटप्पी पद्धति हितावह नाहीं. साधकबाधक प्रमाणें देऊन योग्य फळ ज्योतिष्यानें सांगितलें पाहिजे. अशा प्रकारचीं उदाहरणें लेखकाच्या बरींच पाहण्यांत आलीं आहेत. त्यांचें प्रदर्शन करून ज्योतिर्मालेची जागा अडविणें प्रशस्त वाटत नाहीं. अशा दुहेरी कारणांचा निर्देश करणारांनीं व इतर जिज्ञासु वाचकांनीं पुढील राशि व स्थल यांच्या मेलनानें ग्रहांचें फल बसविलें आहे तें कितपत जमतें याचा प्रयोग करून पहावा. शास्त्रीय प्रमेयें असले प्रयोग केल्याखेरीज होत नसतात व नूतन शोधही लागत नसतात. म्हणून असल्या प्रयोगांस माझ्या मतें ज्योतिर्मालेनें जागा देणें योग्य आहे. बसविलेलीं फलेंही पूर्ण झालेलीं नव्हत. त्यांचा अनुभव प्रत्येकानें आम्हास कळवावा व कांहीं सुधारणा घडवितां आल्यास आणावी ही सर्वत्रांस प्रार्थना आहे. तीं बसविलेलीं फलें.—

## रवि.

कालपुरुषाचा रवि हा **आत्मा** आहे. प्रत्येक सजीव निर्जीव वस्तूंमध्यें जें आत्मतत्व भरलेलें आहे त्याचा कारक ग्रह रवि हा आहे. म्हणून कुंडलींत हा ग्रह राशिपरत्वें, स्थानपरत्वें व योगपरत्वें विशेष बलवान् असला पाहिजे. हा रवि राशिरवीचें स्वगृह असून मेष हा राशि उच्च व तुला हा त्याचें नीच आहे. सिंह राशींत रवि अतिशय बलवान् असतो. मेषराशींतही त्याचा तसाच प्रभाव दृष्टीस पडतो. हा ग्रह मुख्यत्वें स्वतंत्रवृत्ति, दुसऱ्यावर हुकमत चाल-

विणें, तेजस्विता, बल, राजवैभव, वरिष्ठपणा, कोणत्याही विषयाचें मूलतत्व जाणणें, निर्भीडपणें स्वमत जाहीर करणें वगैरे परिणाम घडविणारा आहे. या ग्रहाचें लग्नीं निरनिराळ्या राशींत काय फळ मिळावें हें पुढें दर्शविलें आहे.—

### लग्नस्थ रविफल.

तनुस्थो रविस्तुंगयष्टिं विधत्ते मनः संतपेद्दारदायादिवर्गात् ।
वपुः पीड्यते वातपित्ते न नित्यं स वै पर्यटन् ह्रासवृद्धिं प्रयाति ॥

लग्न ( मेष )—बांधा उंच, सडपातळ, तांबुसगोरा, नेत्र पिंगट, केश तांबुस व अल्प, प्रकृति उष्ण, प्रवासी, चंचल, स्वभाव करारी व उतावळा, राहणी साधी, कुलीन, शिरोव्यथा, बुद्धिमान् व विद्वान्, संतति अल्प.

लग्न ( वृषभ )—बांधा मध्यम, वर्ण गौर, प्रकृति वातपित्तात्मक, निश्चयी पण पोकळ डौल मिरवणारा, चैनी व ऐहिक सुखाची इच्छा करणारा, घशाचे विकार ज्याला होतात असा पशुसौख्य व वाहनसौख्य भोगणारा असा होतो.

लग्न ( मिथुन )—बांधा उंच व सडपातळ, बोलका, पाठांतर विशेष, शास्त्री, कायदेपंडित, मेंदूची शक्ति उत्तम असून स्वतंत्र वृत्तीचा होतो.

लग्न ( कर्क )—बांधा मध्यम, प्रकृति शीतपित्तात्मक, चित्त अतिशय चंचल, प्रवासी, खेळाडू, शिक्षण कमी, हुकमत चालवणारा, मानी व चैनी होतो.

लग्न ( सिंह )—दृढनिश्चयी, अंमलदार, मानी, वरिष्ठ, राजकीय व्यवहार करणारा, बांधा मजबूत, धाडशी, राजधान्या व किल्ले अशा ठिकाणीं राहणारा व उदयास येणारा अशा प्रकारचा होतो.

लग्न ( कन्या )—हस्तकलाकुशल, मायावी, आडव्या बांध्याचा, थापा देणारा, आपमतलबी व खर्चिक असा होतो.

लग्न ( तुला ).—बांधा उंच, सडपातळ, वर्ण काळा, प्रकृति वातोष्ण, समतोल वृत्ति, सत्यप्रिय, विद्वान्, धनवान्, न्यायी, दयाळू, प्रवासी असा होतो.

लग्न ( वृश्चिक )—बांधा मध्यम, कित्येक अवयव तोकडे, गूढविचारी, अति-



शय रागीट, मोठा हिंमती, अंतर्यामीं जळफळणारा, सूड घेणारा, कठोर वाणीचा, रासायनिक क्रिया करणारा, डॉक्टरी विद्या जाणणारा असा होतो.

लग्न ( धनु ).—बांधा काटक व मजबूत, वर्ण तांबुस, प्रकृति उष्ण, अतिशय रागीट, मोठा हिंमती, राजाचा मित्र अथवा सल्लागार, कुलदीपक, स्वपराक्रमानें दैव काढणारा, राजधानीच्या ठिकाणीं राहणारा असा होतो.

लग्न ( मकर ).—रोगी, वर्ण काळा, वायफळ बोलणारा, अविचारी, भांडखोर, खादाड, परावलंबी, देवधर्माचें बंड माजविणारा, अनेकांचा शत्रु असा होतो.

लग्न ( कुंभ )—बांधा मध्यम, केश अल्प, टक्कल पडलेला, चेहरा गोल, मेंदु बौद्धिक, वकील अथवा ग्रंथकार, प्राचीन विद्यांचा संशोधक, स्त्रीविषयक प्रेम अत्यल्प, संततिहीन असा होतो.

लग्न ( मीन )—शरीर सूक्ष्म व ठेंगणें, अधीर, दुःखी, दरिद्री, प्रकृति शीतपित्तात्मक, निरुपद्रवी, सच्छील, शत्रुकडून उपद्रव पावणारा असा होतो.

### द्वितीयस्थ रविफल.

धने यस्य भानुः स भाग्याधिकः स्याच्चतुष्पात्सुखं सद्व्यये संचयाति ॥
कुटुंबे कलिर्जायया जायतेपि क्रिया निष्फला यातिराभस्य हेतोः ॥ २ ॥

रवि हा धनस्थानीं कोणत्याही राशीचा असला तरी चांगला नाहीं.

धन ( मेष )—कुटुंबांत मिळून मिसळून न वागणारा, कुटुंबासंबंधानें दुःख भोगणारा, नेत्र उष्ण व पिंगट, खर्च फार, शिल्लक कमी, स्त्री अल्पायु, कुटुंबांत कलह, असा होतो.

धन ( वृषभ )—कंठरोगी, नेत्र मोठे व पाणीदार, गाणारा, पोषाखाचा शोकी, मिष्टान्न खाणारा, कुटुंबांत ऐक्यानें वागणारा होतो.

धन ( मिथुन )—उत्तम वक्ता, शास्त्री, विद्वान, लेखक, कुटुंबापासून सुख पावणारा, इष्टेटवाला व भोगी असा होतो.

धन ( कर्क )—खेळांवर व वैद्यकीवर उत्तम बोलणारा, वाणींत दोष,

प्रवाही पदार्थांचे धंद्यावर फायदा मिळविणारा, बेफिकीरपणानें द्रव्याचा व्यय करणारा अशा प्रकारचा होतो.

धन ( सिंह )—श्रीमंत, कुटुंबांत प्रमुखत्वानें वागणारा, नेत्र पिंगट, शिल्लक कमी व मौल्यवान् वस्तु बाळगणारा होतो.

धन ( कन्या )—व्यवहारकुशल, हस्तकलानिपुण, गोड बोलणारा, संसारांत टापटिप ठेवणारा, विद्वान् व आपमतलबी होतो.

धन ( तुला )—विद्येचा भोक्ता, व्यवहारांत नीतीनें वागणारा, बोलणें कमी अगर वाणींत दोष, व शिल्लकही कमी असा होतो.

धन ( वृश्चिक )—कुटुंबांत कलह करणारा, स्त्री अल्पायु, कर्जबाजारी, बोलणें निष्ठुर, नेत्र दूषित, पोटांत विषारी पदार्थ जाण्याचा संभव, अशा प्रकारचा होतो.

धन ( धनु )—नेत्र पिंगट व मोठे, कुटुंबांत प्रौढी मिरविणारा, शिल्लक कमी, राजापासून अथवा फार मोठ्या योग्यतेच्या माणसांपासून भाग्योदय पावणारा, व संपत्तिमान् होतो.

धन ( मकर )—कुटुंबांत कुत्सित बुद्धीनें वागणारा, स्त्री अल्पायु, जमा-खर्ची वागणूक, खर्च मोठा, आवाज घोगरा, बोलणें तुटक व आहार मोठा असा होतो.

धन ( कुंभ )—विद्वान् व कल्पक, लेखक, कायदेपंडित, सांपत्तिक स्थिति दुर्बल पण मृत्युपत्राधारें अल्पसंपत्तीचा लाभ मिळणारा असा होतो.

धन ( मीन )—वागणूक साधी, साधारण संपत्तिमान्, स्त्रीविषयक प्रेम कमी, स्त्री कुटुंबांत कलहकारक, साधारण विद्वान्, काव्यविनोदी, असा होतो.

### तृतीयस्थ रविफल.

तृतीयो यदाऽहर्मणिर्जन्मकाले प्रतापाधिकं विक्रमं चातनोति ॥
सदा सोदरैस्तप्यते तीर्थचारी सदारिक्षयः संगरे संनरेशात् ॥ ३ ॥

सहज ( मेष )—भावंडांशीं विरोध करणारा, स्वावलंबी, कानाचा तिखट धीट, महत्वाकांक्षी, प्रमुखत्वानें वागणारा असा होतो.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्दाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्राद्रघुवररचितादाच सेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु सभजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. } डिसेंबर १९१७. { अंक ९ वा.

## प्रासंगिक विचार.

पुणें येथें ज्योतिर्विचारणी सभेच्या चालकांच्या खटपटीनें महाराष्ट्रांतील "ज्योतिषांचें संमेलन" भरविण्यांत आलें होतें. हल्लीं निरयणमानाचीं जीं निरनिराळीं पंचांगें प्रचारांत आहेत तीं एकमुखी व्हावीं हा ह्या संमेलनाचा मुख्य उद्देश होता. हें स्तुत्य कार्य घडवून आणण्याकरितां महाराष्ट्रांतील विद्वान गणितज्योतिषी जमले होते. ह्या विद्वान ज्योतिष्यांनीं जमून जें कार्य उरकलें त्याची जी त्रोटक हकीकत वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध झाली आहे त्यावरून असें दिसतें कीं पंचांग एकमुखी करण्याचे ठराव बहुमतानें पसार झाले आहेत व त्या ठरावांप्रमाणें पुढील पंचांगें प्रसिद्ध होतील अशी लोकांनीं आशा करण्यास हरकत नाहीं.

सर्वत्र एक प्रकारचेंच पंचांग असलें व त्याप्रमाणें लोकांनीं आपलीं धार्मिक कृत्यें केलीं म्हणजे तीं फलद्रूप झालींच पाहिजेत. मग हें एकमुखी पंचांग चुकीचें असलें म्हणून काय झालें? उत्तरायण सुरू झाल्याचीं चिन्हें केव्हां कां दिसेनात, पंचांगकर्त्यांनीं एकमतानें कोणत्याही एका तारखेस मकरसंक्रांत दिली व त्याप्रमाणें लोकांनीं ती पाळली म्हणजे झालें. खबरदारी घ्यावयाची ती हीच कीं सर्व पंचांगांत एकाच दिवशीं मकरसंक्रांत दिसली पाहिजे. एवढा कडेकोट बंदोबस्त केला म्हणजे कर्मदेवता बिनचुक कर्मफलांचीं मापें लोकांच्या पदरांत टाकणारच! लोकमताच्या दराऱ्यापुढें कर्मदेवता झाल्या म्हणून काय झालें, त्यांनाही मान वांकविलीच पाहिजे! अशा तऱ्हेचा युक्तिवाद आमच्या "गणितज्योतिष्यांनीं" स्वीकारला आहे असें दिसतें. योग्य कालीं यथासांग धर्मकृत्यें व्हावीं म्हणून पंचांगांची योजना; पण पंचांग--सुधारक (?) म्हणणार आम्हीं म्हणूं तोच योग्य काल! गणितज्योतिष्यांच्या या अभिमानासंबंधानें आम्हांस कांहींच म्हणावयाचें नाहीं. त्यांच्या विद्वत्तेप्रमाणें त्यांना अभिमान असणें योग्यच आहे पण लोकांची स्थिति मात्र अनुकंपनीय आहे. आधींच धर्मश्रद्धा कमी होण्यास अनेक कारणें उपस्थित झालीं आहेत व त्यामध्येंच आमचीं निरयण पंचांगें हीं आहेत आणि ही गोष्ट कोणासही लपवितां येणार नाहीं. पूर्वींचे ऋषी सांगणार "स्नानदानजपश्राद्धव्रतहोमादि कर्मभिः । सुकृतं चलसंक्रांतावक्षयं पुरुषोश्नुते ।" स्नानदानजपश्राद्धादि कर्में चल म्हणजे सायनसंक्रांतिकालीं केलीं असतां पुण्यप्रद आहेत पण आमच्या पंचांगांत चल (सायन) संक्रांतींचा मागमूसही नसावयाचा! हल्लींचीं पंचांगें श्रुतिस्मृत्यनुरूप धर्मकृत्यांस मुळींच उपयोगीं पडणारीं नाहींत व यासंबंधानें पुष्कळ चर्चा होऊनही विद्वानांच्या आग्रहामुळें आमच्या पंचांगाची **खरी** सुधारणा अजूनही होत नाहीं हें आमच्या देशाचें दुर्दैवच होय.

* * * *

संमेलनाचे अध्यक्ष लो. टिळक आपल्या भाषणांत म्हणाले "ही गणित-



ज्योतिषांची परिषद आहे, फलज्योतिषांची अगर धर्मज्योतिषांची नाहीं. ज्ञा. प्र." संमेलनांत धर्माच्या अगर फलाच्या दृष्टीनें पंचांगांत सुधारणा व्हावी अशाविषयीं प्रश्नच निघूं नये येवढ्याकरितां तर ही प्रस्तावना नव्हती ना? कारण धर्मदृष्ट्या निरयन पंचांग कितीसें उपयोगी आहे याची विचारणा कोणी न करील तितकी बरी! "कै. केरू नाना, मद्रासचे रघुनाथशास्त्री व काशीचे बापूदेवशास्त्री ह्यांना सरकारी वेधशाळेंत प्रत्यक्ष शिक्षण मिळालें, त्याचेंच फळ पंचांगशोधनाचा प्रश्न हें होय" (केसरी). लोकमान्यांनीं उल्लेखिलेल्या ज्योतिर्विदांपैकीं रघुनाथशास्त्री व बापुदेवशास्त्री यांना सायनमान पसंत होतेंच पण लोकमान्यांचे गुरु कै. छत्रे यांनांही तें मान्य झालें होतें. ता. १।७।१८८० च्या ज्ञानप्रकाशांत छत्रे यांनीं "कालमापन" या सदराखालीं एक लेख दिला होता त्यामध्यें ते म्हणतात "त्यांनीं (लेले यांनीं) **सायनमानाविषयीं जें कांहीं लिहिलें आहे तें आम्हांस पसंत आहे.** आणि त्याप्रमाणें जर आपल्या देशांत प्रचार चालू असता तर आज या वादविवादाची गरजही पडली नसती. **आम्हीं हें कबूल करतों कीं निरयनमान खरें व सायनमान खोटें असें आम्हांस अजून एकाही ग्रंथांत सांपडलें नाहीं.**" म्हणजे छत्र्यांच्या मताप्रमाणें निरयनमानास श्रुति-स्मृतींचा मुळींच आधार नाहीं असें स्पष्ट होत नाहीं काय? निरयनमान खरें कां हें कै. केरूनानासारख्यांनाही माहिती नव्हतें. निरयनवाद्यांनो, हा कबुली जबाब तुमच्या ध्यानांत असूं द्या. निरयनमान खरें व सायन खोटें असें लोकमान्यांचे गुरु कै. छत्रे यांना कोठेंच सांपडलें नाहीं. तें यांच्या पाठीमागें एखादा शहाणा निरयनवादी कोठें सांपडवून देईल काय?

पंचांग श्रुतिस्मृत्यनुरूप पाहिजे असल्यास सायनमानच घेतलें पाहिजे ही गोष्ट काशीचे बापूदेव शास्त्री व पुण्याचे केरुनाना छत्रे यांनीं कबूलच केली आहे. या सायनमानासंबंधानें आतांपर्यंत वर्तमानपत्रांतून पुष्कळच उहापोह झाला आहे. हा महत्वाचा पत्रव्यवहार कुंडलीविज्ञानाच्या द्वारें

"वेदोक्त कालमानपद्धति" या नांवाखालीं पुन्हां एकदां प्रसिद्ध झाला आहे. तो जिज्ञासु वाचकांनीं अवश्य वाचावा व सायनमान खरें कां याची खात्री पटवून घ्यावी.

* * * * *

"वेदांत सायनमानाचा विचार केला आहे असें सायनवादी म्हणतात परंतु वेदांत आगगाडी आहे असें म्हणण्यासारखाच हा प्रकार आहे" असें लोकमान्य आपल्या भाषणांत म्हणाले. सायनवाद्यांचें म्हणणें "वेदोक्त कालमानपद्धतींत" साधार असें जगाच्या पुढें आलेंच आहे, लोकमान्य मात्र आपल्या म्हणण्यास आधार काडीचाही देत नाहींत. त्यांनीं सप्रमाण व साधार विधान करावें हें बरें. आधारावांचून लोकांनीं तरी उधारोक्तीवर विश्वास कसा ठेवावा ?

* * * *

आम्हांस कळविण्यास वाईट वाटतें कीं प्रसिद्ध ज्योतिर्विद् व "मॉडर्न अस्ट्रॉलॉजी" नामक मासिकाचे संपादक अॅलन लिओ हे ता. ३०-८-१९१७ रोजीं एकाएकीं मरण पावले. मि. लिओच्या मृत्यूनें जगांतील नामांकित ज्योतिर्विद् नाहींसा झाला आहे. आंग्लज्योतिषवाङ्मयामध्यें लिओ हे उत्तम ग्रंथकार होते. सर्व जगांतील ज्योतिषग्रंथकारांमध्यें मि. लिओंचा दर्जा फारच मोठा होता याबद्दल मुळींच शंका नाहीं. इंग्रजी भाषेचा प्रसार जेथें जेथें आहे तेथें तेथें लिओंच्या ग्रंथांचा प्रसार आहेच. गेलीं पंचवीस वर्षें फलज्योतिषशास्त्राची प्रगति व्हावी, तें सर्वमान्य व्हावें म्हणून लिओंनीं अत्यंत श्रम करून अनेक लहानमोठे ग्रंथ लिहिले व लिहविले आहेत. आंग्लभाषेंत फलज्योतिषवाङ्मयाची वाढ होण्यास लिओंचे परिश्रम विशेषत्वानें कारणीभूत झाले आहेत. मरणसमयीं लिओंचें वय अवघें ५८ वर्षांचें होतें. लिओंच्या अकालिक मृत्यूनें ज्योतिषवाङ्मयाची हानि झाली आहे ह्याबद्दल कोणाही ज्योतिषास वाईट वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

---



# महाराष्ट्रीय ज्योतिषसंमेलन.

( ले.—प्रेषित. )

पुण्याच्या ज्योतिर्विचारिणी सभेच्या खटपटीनें महाराष्ट्रांतील हें ज्योतिषसंमेलन भरून आलें याबद्दल त्या सभेच प्रथमारंभीं अभिनंदन करणें जरूर आहे. या संमेलनांत विशेष कांहीं घडणार नव्हतें हें संमेलनांतील जे विषय जाहीर करण्यांत आले होते त्यावरून सहज समजत होतें.

## एकमुखी पंचांग.

तडजोडीनें एकमुखी पंचांग करणें ( मग तें श्रुतिस्मृतिपुराणोक्त फलाकांक्षी लोकांस अवश्य अशा कालाचें निदर्शक नसलें तरी चालेल ) हेंच या संमेलनांतील मुख्य उद्दिष्ट होतें. तें कितपत सिद्धीस गेलें हें शके १८४० साल उजाडल्यावर सर्वांस कळेलच. सांप्रत झालेल्या संमेलनामुळें लोकांना तरी समाधान मानण्यास जागा आहे कीं गांवांत सर्वत्र दसरा, दिपवाळी, गणपति इ. सणांची विभागणी होणार नाहीं. सर्वजणांस एकाच दिवशीं सण साजरा करतां येईल अशी या सभेंतील ठरावांत योजना केली आहे. ठरावांतील व्यवस्था शके १८४० सालीं अंमलांत आणण्यासाठीं कमिटीही नेमिली आहे. पण शके १८४० चीं पंचांगें लोकांस सांप्रत विकत मिळत असून तीं संमेलनांतील ठरावानुरूप केलेलीं नाहींत. तेव्हां त्यांचा प्रसार बंद करण्याची व्यवस्था करण्याचा बोजा कमिटीनें प्रथम अंगावर घेणें जरूर होतें. अथवा शके १८४१ सालापासून ठराव अमलांत आणावयाचे होते. याप्रमाणें व्यवस्था न झाल्यास लोकांस पंचांगांतील निरनिराळीं मतें व त्या मतांस धरून तयार होत असलेलीं पंचांगें दृष्टीस पडतील तर ठराव करून न करून सारखाच.

## वर्षमान.

संमेलनांतील ज्योतिर्विदांनीं वर्षमान शुद्ध नाक्षत्रसौर धरलें आहे. सूर्यसि-

द्धांतांतील वर्षमानास वेधोपलब्ध बीजसंस्कार करून शुद्ध नाक्षत्रसौरवर्ष घेण्याबद्दल जी शिफारस ज्योतिर्विद्महाशयांनीं केली ती खरोखर चुकीची होय. हें वर्षमान घेण्यानें ऋतुविपर्यास खात्रीनें होणार. ऋतुविपर्यास या योजनेनें टळणार नाहीं. 'षण्णामृतूनामेकः संपूर्णः पर्ययः' ही संवत्सराची व्याख्या कायम राहण्याची सोय या संमेलनांत झाली नाहीं. ही संवत्सराची व्याख्या सांपातिक सौर वर्ष घेतल्याशिवाय टिकणार नाहीं. तडजोड करण्यासाठींच बसलेल्या या सभेंत ऋतुविपर्यास वृद्धिंगत न होण्याची योजना तयार झाली नाहीं हें महाराष्ट्राचें दुर्दैव होय. "एकस्मिन् वर्षे विषुवद्द्वयमेव भाव्यम् । वर्षमध्ये अधिकमासक्षयमासत्वेपि विषुवद्द्वयन्यूनाधिक्यं भवितुं नार्हति ।" हा नियम सुद्धां निरयन पंचांगांत केव्हां विषुवत्त्रय तर केव्हां एकमेव विषुवदिन होईल. ही स्थिति सर्व ज्योतिषज्ञ प्रतिनिधींस समजत असतां त्यांनीं पहिल्या ठरावास संमति कशी दिली याचें आश्चर्य वाटतें.

## सायन संक्रांति.

उदगयन, दक्षिणायन, वसंतविषुवदिन व तुलाविषुवदिन इत्यादि सायनाप्रमाणें ज्या दिवशीं होतील त्या दिवशीं पंचांगांत दर्शविण्याचा ठराव जो मुंबईंत झालेल्या भारतीय ज्योतिषसंमेलनांत झाला तोच कायम असल्याचें अध्यक्ष लो. टिळक यांनीं आपल्या समारोपांत जाहीर केलें, पण हा नियम सर्वत्र अंमलांत आलेला नाहीं. तो यापुढें तरी अमलांत आल्यास ऋतुविपर्यास सामान्य लोकांसही सहज आढळेल.

## १९॥ म्हणजेच २३ !

अयनगति वास्तविक मानली याबद्दल सभेस धन्यवाद दिले पाहिजेत. पण त्याबरोबरच जो चवथ्या ठरावांत लपंडाव झाला तो मात्र चमत्कारिक होय. "आमचा वर्षारंभबिंदु रेवतीयोगताराच" असें म्हणणारा प्रत्येक ज्योतिर्विद् अयनांश सांप्रत २३ घ्यावे असें मत देतो ! हा रेवतीयोगतारा तर संपातबिंदूपासून केवळ १९॥ अंश अंतरावर असतां "१९॥ म्हणजेच २३" हा विचित्र सिद्धांत ज्योतिर्विदांनीं मान्य केला असें म्हणणें चमत्कारिक तर



खरेंच पण सत्य आहे. किंवा "आम्हीं पूर्वी जरी रेवतीयोगतारा हा आरंभस्थान मानला असला आणि वेधशाला झाल्यानंतर जरी आम्ही तोच तारा आरंभस्थानीं धरणार असलों तरी सांप्रत आम्हांस रेवतीयोगताऱ्याची जरूरी नसून 'मूर्खं छंदानुबंधेन' या सूत्रान्वयें संपातबिंदूपासून २३ अंशांवर असलेला एक बिंदूच आरंभस्थान मानणें प्रशस्त वाटतें." असा अभिप्राय सर्व प्रतिनिधींचा असावा. वेधशाला जोपर्यंत नाहीं तोंपर्यंत वाटेल त्या मार्गानें लोकांस धर्मकर्में करण्यास लावूं ही प्रतिज्ञा या ठरावामुळें जगजाहीर झाली ! कर्मलोपापेक्षां अकालीं कर्म घडणें पापसंचयास कारण होतें हें सर्वत्रांस माहीत आहे. केवळ एकमुखीपंचांग करून लोकांस त्याप्रमाणें वागावयास लावण्यानें लोकांचीं कार्यें योग्य कालीं घडत नाहींतच, पण "तीं तशीं घडलीं नाहींत तरी चालेल पण आमचें एकमुखी पंचांगच लोकांनीं आचारांत आणावें" हा हट्ट ज्योतिर्विदांनीं धरल्यामुळें त्यांनीं लोकांच्या अकालकर्मजन्य दोषांस आपणांस भागीदार करून घेतलें आहे.

## दोन मुद्दे.

संमेलनाचे अध्यक्ष लो. टिळक यांचे भाषणांत दोन मुद्दे विशेष प्रामुख्यानें आढळले. एक संपात पूर्वी निरनिराळ्या नक्षत्रांत होता व ज्या नक्षत्रांत तो असेल तेथपासून वर्षारंभ धरण्याची वहिवाट आहे. पूर्वी संपात कृत्तिकांत होता व सूर्यसिद्धांतकारांचे वेळीं तो रेवतीयोगताऱ्याजवळ होता. म्हणजे सूर्यसिद्धांतकालापर्यंत तो जवळ जवळ २६ अंश मागें आला व सूर्यसिद्धांतकालानंतर आजपर्यंत तो संपात रेवतीयोगताऱ्याचे मागें १९॥ अंश तरी आला आहे. म्हणजे २६-१९-४५ अंश सुमारें तो कृत्तिकांत असल्या वेळेनंतर मागें आला आहे. अर्थात् संपाताचे आंदोलनाची कल्पना त्यांचे विधानांत नाहींशी झाली. पूर्वी कृत्तिकांत संपात होता असें त्यांनीं ठरविलें त्या कृत्तिका तारकात्मक होत. त्याचप्रमाणें संपातानुरोधानें वर्षारंभ होता हेंही स्पष्ट झालें. मग वर्षारंभ जर संपाताप्रमाणें न तर वर्षमान सांपातिक कां नको ?

त्यांचे भाषणांतील दुसरा मुद्दा म्हणजे "वसंतसंपात एक रास मागें आल्यावर फाल्गुन हा पहिला महिना धरावा व त्याप्रमाणें परिभाषा बदलावी. मात्र राशि अश्विनीपासून मोजाव्या. ऋतूंतील कार्यें ऋतूंत करावीं व मासांतील कार्यें मासांत करावीं. ऋतु संपाताप्रमाणें घ्यावे व मास निरयन घ्यावे. चैत्रांत पावसाळा आला तरी चैत्रांतील कार्यें त्या पावसाळ्यांत करावीं. याप्रमाणें व्यवस्था झाली म्हणजे वर्षातील प्रत्येक मासास वर्षारंभाचा मान मिळेल !" संपात बदलत असल्याचे पुरावे जसे आढळतात तसे परिभाषा बदलल्याचे पुरावे मात्र कोठें आढळत नाहींत. पुढील कालाचें धोरण फार दूरवर विचार करून ठरविण्याबद्दल लोकमान्यांची हिंदुस्थानांतच नव्हे तर सर्व जगांत कीर्ति आहे. मग याच एका बाबतींत त्यांनीं दूरवर विचार करणें जरूर नव्हतें काय ? त्या वेळच्या भावी ज्ञात्यांवर हवाला देऊन डोळेझांक करावी व सुधारणेच्या ऐवजीं गोळाबेरीज करावी हें विचार करून पाहिल्यास योग्य नव्हे. भारतांतील नक्षत्रांचा प्रश्न एक बाजूस ठेविला तरी त्यांतील जे ऋतु आहेत ते तरी त्यांनीं ठरविलेल्या अथवा इतर विद्वानांनीं ठरविलेल्या कालीं त्या त्या महिन्यांत येतात काय ? त्या वेळीं कार्तिकांत शरदृतूचा अंत व हिमाचा आरंभ होत असे हें "कौमुदे मासि रेवत्यां शरदंते हिमागमे" या भारतांतील वचनावरून सिद्ध आहे. शके ४४० सालीं अयनांश शून्य असतां कार्तिकांत शरदृतूचा अंत व हिमागम होत असे. मग काय भारतकालापासून शके ४४० पर्यंतच्या कालांत संपाताचें पूर्ण ( सुमारें २५००० वर्षांचें ) भ्रमण झालें होतें. हें मान्य केल्यास पांडवांस आज जवळ जवळ २६००० वर्षांवर काल झाला असें ठरवावें लागेल. कोणत्याही निरयनमतानें भारतकालीं कार्तिकांत हिमागम आधुनिक विद्वानांनीं ठरविलेल्या कालीं संभवणार नाहीं. ऋतु व मास यांची सांगड कधींच कोणी बदलली नव्हती. ऋतु जर सांपातिक तर मासच निरयन कसे ? चैत्रवैशाखांतच भूतकालीं वसंतऋतु होता, वर्तमानकालींही तो चैत्रवैशाखांतच असला पाहिजे व भविष्यकालींही चैत्रवैशाखांतच राहिला पाहिजे. प्रत्येक ऋतूंत



कोणताही मास येत होता असें आजपर्यंत कोणी दाखविलें नाहीं. "मासानां मार्गशीर्षोऽहं" या वचनाधारें कोणी मार्गशीर्ष हा वर्षारंभमास होता असें सिद्ध करतात, मग "पांडवानां धनंजयः या सूत्रानें धनंजय ( अर्जुन ) पांडवांत पहिला होता असें सिद्ध होईल ! पण ज्याप्रमाणें अर्जुनास पांडवांत 'पहिला' हा मान मिळणार नाहीं, त्याचप्रमाणें मार्गशीर्षास वसंतांत बसवितां येणार नाहीं. म्हणून परिभाषा बदलण्याचें व पंचांगांतील राशिनक्षत्रें स्थिर मानण्याचें विधान अत्यंत विसंगत होय. 'विषुवस्थानतो भागैः स्पष्टैर्भगणलक्षणात्' या सूत्रानें राशि व नक्षत्रें हे विभाग संपातबिंदूपासूनचे आहेत हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. नक्षत्रांच्या नकाशांत जीं राशींचीं चित्रें दर्शविलीं आहेत तीं तर फारच विलक्षण आहेत. मिथुन व कर्क राशींचीं चित्रें जो पाहील त्यास कन्या व तुला हीं फार मोठा भाग व्यापणारीं कां असा सहज प्रश्न उत्पन्न होईल. राशि सर्व ३०।३० अंशांच्या कां दाखविल्या नाहींत. ज्या नक्षत्रांचे चार चरण करावयाचे तीं नक्षत्रें संपातापासूनचींच समविभागाचीं आहेत. तारात्मक नक्षत्रें हीं खुणेचीं आहेत व तीं कोणत्याही कालीं खुणेचीं म्हणूनच उपयोगांत आणलीं पाहिजेत. संपातानुरोधें गणितागत चार चरणात्मक नक्षत्रांत कोणीही बदल केला नाहीं. स्थिरराशि व स्थिरनक्षत्रें ठरावानें जाहीर करणें म्हणजे निरयनास एक जास्त खांब आधारासाठीं लावणें होय. अगोदर आभासवत् जें घर त्यास नवीन खांब लाविला तरी तें आभासवतच टिकणार ! असो. वाचकहो, स्थिर नक्षत्रें हीं तारात्मक आहेत व त्या तारका कोणीही पंचांगांत उपयोगांत आणणार नाहींत, मग तो सायनवादी असो वा निरयनवादी असो. याप्रमाणें या नक्षत्रांची अनावस्था होत आहे. सुमारें २५००० वर्षांनीं केवळ एकदांच काय तीं निरयन चार चरणात्मक नक्षत्रें व सायन चार चरणात्मक नक्षत्र एक होतील. हा नक्षत्रांचा प्रश्न अद्याप समाधानकारक सुटला नाहीं व भ्रमालाच निश्चयाचें दृढीकरण झालेलें या संमेलनांतील ठरावांत आढळलें. असो ज्याप्रमाणें अयनगति आज इतक्या कालावधीनंतर वास्तविक वेधतुल्य अशी मान्य झाली त्याचप्रमाणें

गणितागत नक्षत्रें व तारात्मक नक्षत्रें निरनिराळीं आहेत हेंही कालांतरानें मान्य होईल, यांत आम्हांस मुळींच संशय वाटत नाहीं. सत्य हें आज नाहीं पुढें केव्हां तरी सर्वत्रांस मान्य होईलच.

वे. भाऊशास्त्री लेले यांनीं लोकमान्यांचे आभार मानतांना त्यांनीं या तडजोडींत कोणत्याही पक्षाचें थोडें थोडें घेतल्यामुळें प्रत्येक मतवाल्यास आपलाही समावेश या ठरावांत आहे असें सांगितलें. प्रत्युत्तरादाखल बोलतांना अध्यक्ष लो. टिळक यांनीं कै. केरोपंतांचें स्मरण सर्वत्रांस दिलें व त्यांनीं शुद्ध पंचांग करण्याचा केलेला संकल्प त्यांच्या हयातींत जरी सिद्धीस गेला नाहीं तरी त्यांच्या भावी पिढीनें तो सिद्धीस न्यावा असें म्हटलें. कै. केरूनाना यांनीं सायनमानच शुद्ध आहे असें म्हटलेलें सर्वत्रांस आठवत असेलच. तरी जे सायनपंचांग शुद्ध असें आहे त्याचाच भावी पिढीनें उपक्रम केल्यास कै. रा. ब. केरूनानांच्या श्रमाचें चीज होईल. तें चीज निरयन पंचांग रूढ केल्यानें होणार नाहीं.

---

## मुमुक्षुकारांचा अभिप्रायः—

**मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिषः**—लेखक राम नारायण, किं. १२ आणे. "ज्योतिर्माला नामक मासिकाचा जो लेखक वर्ग आहे त्यांत प्रस्तुत पुस्तकाच्या कर्त्याचा नंबर फार वर लागेल. रा. **राम नारायण यांची विषय मांडण्याची पद्धति नेहमींच सुंदर आणि सुबोध असते. भाषा बालबोध असून विषयाच्या मानानें चित्ताकर्षक असते.** प्रस्तुत पुस्तकाचा विषय राष्ट्राची कुंडली मांडून राष्ट्रीय प्रश्न पाहाणें हा आहे. तो कालमानानुरूप अत्यंत महत्वाचा आहे हें सांगणें नकोच. **पुस्तक सुंदर वठलें आहे.** ज्योतिषाचा अभ्यास करणाऱ्यांनीं पुस्तकाचा अवश्य संग्रह करावा. राष्ट्राच्या प्रारब्धाचा व्यक्तीच्या प्रारब्धावर कमीअधिक परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं. या दृष्टीनेंही प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग करून घेण्यासारखा आहे." ता. १ एप्रिल १९१७.



# ग्रहविचार.

( मागील अंकावरून पुढें चालू )

सहज ( वृषभ )—गर्विष्ठ, हौशी, भावंडांशीं सख्यानें वागणारा, विद्या साधारण अशा प्रकारचा होतो.

सहज ( मिथुन )—भावंडांचें सुख भोगणारा, विद्येच्या जोरावर उपजीवन करणारा, चतुर, शास्त्री असा होतो.

सहज ( कर्क )—प्रवासी, महत्वाकांक्षी खेळाडू, बेफिकीर, भावंडांशी फटकून वागणारा असा होतो.

सहज ( सिंह )—राज्यासारख्या वैभवाची इच्छा करणारा, आपलें म्हणणें खरें करून दाखविणारा, विलक्षण धाडशी व शूर असा होतो.

सहज ( कन्या )—कठीण कार्य करण्यांत कुशल, हरकाम्या, नादलुब्ध साधारण विद्वान् व कपटवृत्तीचा होतो.

सहज ( तुला )—विद्वानांशीं मैत्री संपादणारा, सात्विक आचाराचा-प्रवासी व भावंडांचें सुख भोगणारा होतो.

सहज ( वृश्चिक )—वैद्यकी करणारा, भावंडांशीं कुत्सितपणानें वागणारा, खुनशी, विद्वत्तेचा दुरुपयोग करणारा होतो.

सहज ( धनु )—परोपकारी, धैर्यशाली, न्यायानें वागणारा, भावंडांचें सौख्य भोगणारा, स्वपराक्रमानें उपजीवन चालविणारा होतो.

सहज ( मकर )—भावंडांचें सौख्य कमी, विद्येकडे दुर्लक्ष करणारा, भटक्या मारणारा अथवा प्रवासी होतो.

सहज ( कुंभ )—भावंडांशीं विरोध करणारा, विद्वान्, एकलकोंडी, छातीठोक व्यवहार करणारा.

सहज ( मीन )—सात्विक, भावंडांचें सौख्य भोगणारा, जलप्रवास अगर जलमार्गानें व्यापारादि करणारा, कर्णरोगी असा होतो.

## चतुर्थस्थान.

तुरीये दिनेशेऽतिशोभाधिकारान् जनः संलभेद्विग्रहं बंधुतोपि ॥
प्रवासी विपक्षाहवे मानभंगं कदाचिन्न शांतिं भवेत्तस्य चेतः ॥ ४ ॥

**रवि ( मेष )**—मातृसुख कमी, माता रोगी, आम्लपित्ताचा उपद्रव, वाहनसौख्य व पशुसौख्य कमी, परगृहीं वास व दारिद्र्य.

**रवि ( वृषभ )**—चैनीकडे व ऐषआरामाकडे प्रवृत्ति, शेतीची आवड, सुंदर इमारतींचें सौख्य व पशूंचें यश या गोष्टी प्राप्त होतात.

**रवि ( मिथुन )**—विद्याव्यासंगी, ज्योतिषी, मित्रांच्या आश्रयानें उदय पावणारा व गृहसौख्य कमी असा होतो.

**रवि ( कर्क )**—पोहण्याची आवड, मातेला दुःख देणारा, बागाईत व शेतीची आवड, छातीचे विकार, सामान्य समृद्ध.

**रवि ( सिंह )**—किल्ल्यांत, डोंगराळ मुलखांत अथवा राजधानीचे शहरीं वास्तव्य करणारा, पोटांत उष्णता जास्त असा, दृढनिश्चयी व मातृदुःखी असा होतो.

**रवि ( कन्या )**—घरांत व शेतवाडींत टापटीप ठेवणारा, आप्तांशीं सलोख्यानें वागणारा व स्वपराक्रमानें उदयास येणारा असा होतो.

**रवि ( तुला )**—पितृसौख्य अल्प, गृहसौख्य व मातृसुख कमी, प्रवासी, वाहनाची आवड ज्याला, सत्पक्षाची कड घेणारा असा.

**रवि ( वृश्चिक )**—अंतःकरण कठोर, मातेस दुःख देणारा, आप्तवर्गाशीं तुसडेपणानें वागणारा व खोट्या मार्गानें इष्टेट संपादन करणारा असा होतो.

**रवि ( धनु )**—अपघात अगर दुखापती (विशेषतः वाहनांतून,) इष्टेटीचा ऱ्हास, अग्निभय, श्रीमंतीचा पोकळ डौल मिरविणारा व वाहनांचा शोकी होतो.

**रवि ( मकर )**—मातृदुःखी, विपत्ति भोगणारा, अविचारानें धंदे करणारा व सुखासाठीं तळमळणारा असा होतो.

**रवि ( कुंभ )**—सच्छील, उदारचित्त, विद्वान व साधारण श्रीमंत होतो.

**रवि ( मीन )**—पोहण्यांत पटाईत, तलाव, विहिरी खोदणारा, बागा-



इतांकडे विशेष लक्ष पुरवणारा व मातेवर प्रेम करणारा होतो.

## पंचमस्थान.

सुतस्थानगे पूर्वजापत्यतापी कुशाग्रामतिर्भास्करे मंत्रविद्या ॥
रतिर्वंचने संचकोपि प्रमादी मृतिः क्रोडरोगादिजा भावनीया ॥ ९ ॥

**रवि ( मेष )**—संतति अल्प, प्रथमापत्यनाश, तेजस्वी, मेधावी, बुद्धिमत्तेनें भाग्योदय पावणारा व महत्वाकांक्षी होतो.

**रवि ( वृषभ )**—मांत्रिक, जुगारी, खेळाडू, संततिसौख्य चांगलें, बुद्धीचा गर्व वाहणारा असा होतो.

**रवि ( मिथुन )**—अतिशय बुद्धिमान शास्त्री, लेखक व ग्रंथकर्ता, बौद्धिक कामें करणारा, पुत्रसौख्य चांगलें अशा प्रकारचा होतो.

**रवि ( कर्क )**—बुद्धीचा दुरुपयोग करणारा, संतति पुष्कळ पण त्याजबरोबर विरोध, खेळाडू—विशेषतः मर्दानी खेळांचा शोकी होतो.

**रवि ( सिंह )**—राजकीय उलाढाली करणारा, पुढारी, धैर्यवान, लोकोत्तर बुद्धीचा, संतति फार अल्प व संपन्न असा होतो.

**रवि ( कन्या )**—विद्वान, मायावी, कलाकुशल, वैद्यकी करणारा व टापटिपीचा होतो.

**रवि ( तुला )**—संतति मध्यम, पितृसुख कमी, न्यायी, तडजोड करणारा व बुद्धिमान होतो.

**रवि ( वृश्चिक )** रसायनशास्त्रज्ञ, डॉक्टर, वाङ्मयाची आवड कमी, संततीपासून दुःख भोगणारा व कापट्यबुद्धीचा होतो.

**रवि ( धनु )**—संततिसौख्य कमी, साधारण विद्वान, नशीबवान् व राजप्रिय.

**रवि ( मकर )**—संतति फार पण तिच्यापासून दुःख भोगणारा, बुद्धिहीन, मंत्रचळ्या व दरिद्री होतो.

**रवि ( कुंभ )**—पुत्रहीन, विद्वान, शोधक, सुधारक व ग्रंथकार होतो.

**रवि ( मीन )**—मुत्सद्दी व राजमंत्री, ऐश्वर्यवान् व राजापासून वैभवप्राप्ति करून घेणारा, पुत्रसुखी असा होतो.

## षष्ठस्थान.

रिपुध्वंसकृद्भास्करो यस्य षष्ठे तनोति व्ययं राजतो मित्रतो वा ॥
कुले मातुरापच्चतुष्पादतो वा प्रयाणे निषादैव पादं करोति ॥ ६ ॥

**रवि ( मेष )**—एखादा प्रख्यात उत्रु असेल, मेंदूचे विकार असतील, राजकीय उलाढालींत अप्रतिष्ठा व मानभंग होईल.

**रवि ( वृषभ )**—मुखरोग, व कंठरोग असेल, पशुसौख्य कमी, खडतर दैव असून नास्तिक होईल.

**रवि ( मिथुन )**—रोगाची चिकित्सा उत्तम करणारा, विद्वानांचा द्वेषी मातुलसौख्य चांगलें व साधारण विद्वान होईल.

**रवि ( कर्क )**—पाण्यापासून भीति, मातुलपक्षाशीं वैर, उन्नतीसाठीं धडपडणारा व छातीचे रोग ज्यास असा होईल.

**रवि ( सिंह )**—उत्तम योद्धा, शत्रुहंता, अग्निभय, पोटशूळ व कदाचित् राजभय व अधिकाऱ्यांचा वैरी असा होतो.

**रवि ( कन्या )**—कमरेंत अशक्तता, कपटवृत्तीचा, संततीपासून दुःखी असा होतो.

**रवि ( तुला )**—दुर्बल, बस्तीचा विकार, इष्टेटीला शत्रुपीडा, व दरिद्री असा होतो.

**रवि ( वृश्चिक )**—गुह्यरोगी, विषभय, सर्वांशीं वैर करणारा, हट्टी, द्रव्य व्यर्थ खर्ची घालणारा होतो.

**रवि ( धनु )**—अग्निभय, शस्त्रभय, शत्रुहंता, शूर, मांड्यांचे विकार, व योद्धा होतो.

**रवि ( मकर )**—रोगी, दुःखी, दरिद्री, अपयशी, कमनशिबाचा, अतिशय भांडखोर, सर्वत्र शत्रु व वागणुक मूर्खपणाची असा होतो.

**रवि ( कुंभ )**—उत्तम चिकित्सक, राजविरोधी, सांपत्तिक स्थिति वाईट व पोटऱ्यांचे विकार ज्याला होतात असा होतो.

**रवि ( मिन )**—मित्रांशीं व सज्जनांशीं विरोध करणारा, पावलांस विकार पावणारा, साधारण विद्वान् होतो.



## ज्योतिर्विद्या.

लेखांक २ रा.

मागील अंकांत ज्योतिर्विद्येचें कारकत्व हर्शल ग्रहाकडे आहे हें दर्शविलें होतें. आतां यापुढें कारक ग्रहाचे योग कसे असतात हें पाहूं. लग्न, तृतीय, पंचम व नवम या बौद्धिक स्थानांत आणि त्याचप्रमाणें दशम व लाभ या स्थानीं **हर्शल** ग्रह असतां ज्योतिषशास्त्राकडे कल दिसून येतो. ह्या स्थानांत हर्शल असून त्याबरोबर बुध, किंवा चंद्र दृष्टियोग करीत असेल तर किंवा बुध—चंद्र बौद्धिक स्थानांत असून त्याजबरोबर हर्शल दृष्टियोग करीत असेल तर ज्योतिषशास्त्र अवगत होतें. ज्योतिषशास्त्र येण्यास वरील योग प्रमुखत्वानें कारणीभूत होतात. हर्शलबरोबर होणाऱ्या शुक्राच्या शुभदृष्टियोगानें सुद्धां ज्योतिषशास्त्र अवगत होतें.

वर दिलेले योग जेव्हां मिथुन, तूळ, व कुंभ या शास्त्रीय राशींत होतात तेव्हां ज्योतिषशास्त्रविद्येचा योग विशेष बलवत्तर असतो. शास्त्रीय राशींतील कुंभ राशि ही ज्योतिषशास्त्राला विशेष अनुकूल असते असें अनुमान होतें. सारांश ज्योतिषशास्त्र उत्तम येण्यास बौद्धिक स्थानांतून किंवा दशम व लाभ या स्थानांतून हर्शल आणि बुध, चंद्र किंवा शुक्र यांचे शुभदृष्टियोग झाले पाहिजेत आणि या योगांस शास्त्रीय राशीची जोड मिळाल्यास अधिक चांगलें.

प्रसिद्ध ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांमध्यें वर दिलेले योग स्पष्टपणें पहावयास सांपडतात. त्यांचीं कांहीं उदाहरणें येथें नमूद करतों.

| | |
|---|---|
| ( १ ) रा. चिटणीस, | लाभस्थानांत मिथुन राशीचा हर्शल बरोबर शुक्राचा द्विराश्यंतर योग. |
| ( २ ) सूर्यनारायणराव, | लाभस्थानांत हर्शल व त्याबरोबर शुक्राचा त्रिकोण योग. |
| ( ३ ) सर्फेरिअल | हर्शल—चंद्र द्विराश्यंतर योग व शुक्र—हर्शल त्रिकोण योग. |
| ( ४ ) ॲलन लिओ | चंद्र—हर्शल द्विराश्यंतर योग व बुध—हर्शल द्विराश्यंतर योग. |

( ९ ) झडकील तृतीय स्थानीं हर्शल व त्याजबरोबर चंद्राचा द्विराश्यंतर योग.

वर सांगितल्याप्रमाणें हर्शल आणि बुध, चंद्र किंवा शुक्र यांचे योग ज्योतिर्विद्येचे कारक असतात हें स्पष्ट होईल. वर नमूद केलेले योग आमच्या मतें पहिल्या दर्ज्याचे आहेत व खेरीज दुसरेही कांहीं थोडेबहुत कमी महत्वाचे योग आहेत त्यांचा आतां विचार करूं.

हर्शलग्रहाप्रमाणेंच नेपच्युनबरोबर बुध, चंद्र किंवा शुक्र यांचे शुभदृष्टियोग ज्योतिर्विद्येचे कारक असतात असा समज आहे. ह्या योगांमुळें प्रेरणाशक्ति विशेष जागृत असते. केवळ प्रेरणेनें सांगणाऱ्या ज्योतिषांच्या कुंडल्यांमध्यें हे योग आढळून येतात पण ते स्वतंत्रपणें ज्योतिषशास्त्राकडे प्रवृत्ति करतील असें मानण्यास कांहीं आधार नाहीं.

ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांमध्यें रवि राशिबली किंवा स्थानबली असतो असें पहाण्यांत येतें. चिटणीस, लिओ, ग्रीन यांच्या कुंडल्यांमध्यें रवि सिंहेचा आहे, सर्फेरिअलच्या कुंडलींत तो मेषेचा आहे. स्थानबली म्हणजे लग्न, दशम, नवम, तृतीय या स्थानीं पुष्कळच ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांत पहाण्यांत येतो. "ज्योतिषां रविरंशुमान्" "ग्रहनक्षत्रादिकांचा स्वामी" रवि अर्थात् ज्योतिर्विद्येची देवता ज्योतिषांच्या कुंडल्यामध्यें बलवान कां असणार नाहीं ?

रवि व शुक्र यांचा अर्धकेंद्र योग ज्योतिर्विद्येचा द्योतक असतो असें एका यूरोपीय ज्योतिर्विदाचें म्हणणें आहे. हा योग पुष्कळ ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांमध्यें आढळून येतो पण त्याची उपपत्ति लक्ष्यांत येत नाहीं.

ज्योतिषांचा धंदा करणाऱ्या ज्योतिर्विदाच्या कुंडलींत बुध, चंद्र किंवा शुक्र यांचे शुभ योग हर्शलबरोबर होत असून धनेश किंवा दशमेश याचा शुभसंबंध पूर्वोक्त योगाशीं अवश्य झालेला असावा. ह्या योगावर ज्योतिषाचा धंदा करून अर्थप्राप्ति होत असते.

प्रस्तुत लेखांत सांगितलेले योग विशेष स्पष्ट रीतीनें लक्ष्यांत येण्यासाठीं पुढील अंकीं कांहीं नामांकित ज्योतिर्विदांच्या कुंडल्या देण्याचा विचार आहे.

राम नारायण.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. } ज्यानेवारी १९१८. { अंक १० वा.

## स. १९१८ सालांतील ग्रहस्थिति.

### नेपच्युन.

तारिख १ जानेवारी १९१८ रोजीं नेपच्युन सिंह राशीच्या ६ अं. २४ व्या कलेंत वक्री आहे. तो वक्रगतीनें एप्रिल महिन्याच्या १५ व्या तारखेस सिंहेच्या ४ अं. १८ कलेपर्यंत जात आहे. नंतर नोव्हेंबर १२ तारखेपर्यंत मार्गीच असून ९ अंश २० कलेपर्यंत येऊन पुन्हां वक्री होत आहे. वर्षाच्या अखेर म्हणजे डिसेंबर ३१ तारखेस सिंह राशीच्या ८ अं. ४२ कलेमध्यें वक्री आहे.

नेपच्युनच्या भ्रमणामुळें अनियंत्रित सत्ता संपुष्टांत येते, देशांत अनर्थकारक प्रसंग घडतात, सर्वत्र झोटिंगपादशाही सुरू होते. प्रस्तुत काळीं

सिंहराशीच्या अमलाखालच्या देशांत हे प्रकार दिसतील. सिंहराशीखालीं फ्रान्स, इटाली, बोहेमिया, सिसिली, वगैरे प्रांत व रोम, बाथ, पोर्टमाऊथ, प्रॅग हीं शहरें आहेत. नेपच्युनच्या भ्रमणामुळें ज्यांचे जन्म २७ जुलैपासून ३० आगष्टपर्यंत आणि २९ जानेवारी ते ३१ जानेवारीपर्यंत झाले असतील त्यांना अनिष्ट जाईल. हृद्रोग, अस्वस्थता व सुहृदांचा वियोग यामुळें हें वर्ष वाईट जाईल.

नेपच्युनच्या भ्रमणामुळें अनिष्ट परिणाम पहावयास सांपडतात. प्रस्तुत वर्षी या अनिष्टपणाचा कळस होणार आहे असें दिसतें. कारण वर्षारंभापासून तो जूनअखेरपर्यंत नेपच्युनबरोबर शनीचेंही भ्रमण होत आहे. ह्या युतियोगाचीं फलें पुढें वर्णन केलीं आहेत तीं पहावीं. आगष्ट महिन्याच्या २९ व्या तारखेस नेपच्युनमंगळांचा केंद्रयोग होत आहे. मंगळ वृश्चिकेंत आहे. या काळांत रोगराई, अत्याचार, खून, मारामाऱ्या यांमुळें फार अस्वस्थता माजेल. प्रशिया, रशिया, फ्रान्स, इटाली, मारोक्को व नार्वे या देशांत या केंद्रयोगानें अतिशय धामधूम होईल.

## हर्शल.

१ जानेवारी रोजीं हर्शल उर्फ प्रजापति कुंभ राशींत २१ अंश २४ व्या कलेंत आहे. २ जून रोजीं तो स्तंभी होऊन पुढें वक्रगतीनें ४ नोव्हेंबरपर्यंत भ्रमण करणार आहे. त्यानंतर तो मार्गीच आहे. ता. ३१ डिसेंबर रोजीं कुंभेच्या २९ अंश ४९ व्या कलेंत आहे.

हर्शलाच्या भ्रमणाचीं फलें मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिषांत पुढें दिल्याप्रमाणें आहेतः—"हर्शलाच्या भ्रमणामुळें देशांतील राज्यव्यवस्थेसंबंधानें चळवळी सुरू होतात, प्रजापक्ष जोरानें काम करूं लागतो, देशावर आकस्मिक संकटें येतात. ज्या वेळीं हर्शल पीडित होतो त्या वेळीं तंटे, मारामाऱ्या, संप व दंगे होतात. हा काळ मोठ्या वडामोडीचा असतो; इतिहासांत नमुद करण्यासारखे फरक या वेळीं घडतात" (पान ६९) कुंभराशीखालीं



प्रशिया, रशिया, पोलंड, स्वीडन, पीडमांट वगैरे देश आहेत. हर्शलचें भ्रमण कुंभराशीमध्यें १९१२ पासून सुरू असून १९१९ पर्यंत चालणार आहे. प्रस्तुत वर्षी हर्शलची आकस्मिक अनिष्ट फळें विशेषत्वानें दृष्टोत्पत्तीस येतील कारण या वर्षी तो शनीच्या प्रतियोगानें दूषित होत आहे. सप्टेंबरपासून शनिहर्शलांच्या प्रतियोगांचीं फलें दिसावयास लागतील. हर्शल कुंभराशींत शिरल्यापासून त्याबरोबर शनीच्या प्रतियोगाइतका अनिष्ट योग झाला नव्हता. प्रस्तुत वर्षी हा अनिष्ट योग घडत आहे. १९१७ त रशिया पोलंड वगैरे देशांत जे अनिष्ट प्रकार घडले त्यांनाही बरे म्हणविणारे प्रसंग पुढें येतील असें दिसतें. हा प्रतियोग दीर्घ काळानें घडणारा आहे. त्याचें सविस्तर वर्णन पुढें केलें आहे तें पहावें.

१ जुलै रोजीं हर्शल गुरु यांचा नवपंचम योग होत आहे. ज्यांच्या कुंडलींत हा योग लग्न, नवम, धन, लाभ, व दशम या स्थानांतून होईल व जर हर्शल जन्मकालीन **रविचंद्रांबरोबर** शुभसंबंधित असेल तर त्यांस ह्या वर्षी अचानक रीतीनें सांपत्तिक लाभ घडण्याचा संभव असून त्यांस अध्यात्मिक, धार्मिक व ऐहिक स्थितीमध्यें समाधान प्राप्त होईल. ज्यांचे रवि, चंद्र, लग्न, दशम यांवरून चालू सालीं हर्शलशनींचा प्रतियोग घडेल त्यांस भयंकर आजार, कष्ट, नोकरीधंद्यामध्यें अपयश व संकटें प्राप्त होतील. हा अनिष्ट योग जन्मलग्नाचे उदित अंशावर होत असतां भयंकर आजार व स्त्रीकष्ट होतील.

चालू सालीं ज्यांचे वर्षप्रवेश १३ फेब्रुवारी, १९ मे, १९ आगष्ट व १७ नोव्हेंबर रोजीं होतील त्यांस हें वर्ष वाईट जाईल असें वाटतें.

## शनि.

जानेवारीच्या १ ल्या तारखेस शनि सिंहराशीच्या १३ अं. २२ कलेंत वक्री आहे. ९ एप्रिल रोजीं ७ अंश ३७ कलेपर्यंत येऊन पुन्हां मार्गी होत आहे. डिसेंबर १० व्या तारखेस सिंहेच्या २८–१९ कलेंत येऊन

पुन्हां वक्र होत आहे. वर्षाच्या शेवटच्या दिवशीं तो सिंहेत २७–४९ कला आहे.

शनीच्या भ्रमणामुळें दुर्भिक्ष्य व रोगराई यांमुळें लोक पीडित होतात. प्रस्तुत वर्षीं नेपच्युनप्रमाणेंच सिंहराशीच्या देशांतील लोकांस पीडा करीत आहे. सिंहराशीखालील देश मागें सांगितलेच आहेत. तेथें काय अनिष्ट प्रकार होतात हें पहाणें आहे. शनि नेपच्युनच्या युतींतून सुटून आक्टोबर महिन्याच्या पहिल्या तारखेस हर्शलबरोबर प्रतियोग करीत आहे. हा योग मुंबई शहरालाही वाईट जाईल, येथील व्यापाराची बरीच धांदल व त्रेधा उडेल, पोर्टट्रस्ट व म्युनिसीपालिटी बाँड्स यांची किंमत उतरेल असें अनुमान आहे.

ज्याच्या जन्मकालीन उदित अंशावरून किंवा चंद्रावरून शनीचें भ्रमण होईल त्यांना देहकष्ट होतील, औदासिन्य प्राप्त होईल. दशमस्थानांतील रवि किंवा चंद्र यांजवरून चालू सालीं शनीचें भ्रमण होईल तर धंद्यामध्यें तोटा, नुकसान, व हानि होईल, मातृ–पितृकष्ट होतील. धनस्थानांतील रवि किंवा चंद्रावरून शनीचें भ्रमण होत असेल तर कर्जबाजारी होण्याचा प्रसंग येईल. १३ फेब्रुवारी व १८ आगष्ट ह्या दिवशीं ज्यांचा वर्षारंभ होईल त्यांना ह्या वर्षी अनेक कष्ट होतील व विशेषेंकरून सन १८६०, १८६७ व १८८९ ह्या सालांतील वरील तारखांस ज्यांचा जन्म झाला असेल त्यांना अतिशय त्रास होईल.

## गुरु.

१ जानेवारी रोजीं गुरु मिथुन राशीच्या २ अंश ३१ कलेंत वक्री आहे. तो त्याच महिन्याच्या २७ व्या तारखेस १ अंश २८ कलेंत येऊन मार्गी होत आहे व १३ जुलै रोजीं कर्क राशींत प्रवेश करील. ४ नोव्हेंबर रोजीं कर्केच्या १९ अंश ५० कलेपर्यंत येऊन पुन्हां वक्री होत आहे. व वर्ष अखेरपर्यंत वक्रीच आहे. ३१ डिसेंबरला गुरु कर्केचा ११ अंश ० कला आहे.



जुलै महिन्यापर्यंत अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, इंग्लंडचा पश्चिम भाग, इजिप्त, लंडन, मेलबोर्न वगैरे ठिकाणीं गुरूच्या भ्रमणामुळें भरभराट होईल. कर्केंत गुरु शिरल्यावर स्कॉटलंड, हालंड व चीन या देशांत गुरूच्या शुभप्रद किरणांमुळें भरभराट होऊं लागेल. **चीन देशांत शांतता होऊन तो देश प्रगतीच्या मार्गाला लागेल.** मेदिनीय ज्योतिषांत आम्हीं निजाम हैद्राबादची राशि कर्क दिली आहे ( पान ६७ ) गुरूचें कर्केंतील भ्रमण हैद्राबादची भरभराट करील, तेथें स्वस्ताई व आरोग्य यांची वृद्धि होईल, महत्वाच्या **सुधारणा केल्या जातील व शिक्षणाचा प्रसार विशेष होईल.** चालू वर्षी गुरूचें भ्रमण ज्यांच्या लग्नाच्या उदित अंशावरून, दशमावरून किंवा रवि–चंद्रांवरून होईल त्यांस १९१८ हें साल चांगलें जाईल, उद्योगधंदा वाढेल व शरीरप्रकृती उत्तम राहील. ज्यांच्या जन्मकाळीं रवि किंवा चंद्र २।५।११।९।१० या स्थानांत असून त्यांवरून चालू सालीं गुरूचें भ्रमण होत असेल तर ह्यावर्षी संपत्ति, संतति, उद्योगधंदा, नोकरी वगैरेमध्यें बढती प्राप्त होईल. चतुर्थस्थानामध्यें रवि किंवा चंद्र असून त्यावरून गुरूचें भ्रमण होत असेल तर नवीन इस्टेट खरेदी घेण्यांत येते असा अनुभव आला आहे.

## मंगळ.

१ जानेवारीला मंगळ कन्या राशींत २७ अंश १३ कला आहे. याच महिन्यांत ११ तारखेस तूळेंत प्रवेश करून ४ फेब्रुवारीला ३ अंश ४ कलेंत वक्री होत आहे. वक्रगतीनें २६ एप्रिलपर्यंत भ्रमण करणार असून पुढें सबंध वर्षभर मार्गीच आहे. मंगळ वक्रगतीनें कन्या राशींत भ्रमण करीत असल्यामुळें त्या राशीखालच्या देशांत व शहरांत अग्निप्रलय, मारामाऱ्या, रोगराई व असंतोष पसरेल. पुणें व नागपूर ह्या शहरामध्यें मंगळाच्या भ्रमणामुळें प्लेग, गोवर, ताप व देवी वगैरेमुळें मृत्युसंख्या वाढेल व अग्निप्रळयही होईल. मंगळ ग्रह शनि हर्शलादि ग्रहांबरोबर दृष्टियोग करीत नसतां किंवा वक्री नसेल तर त्याच्या नुसत्या भ्रमणामुळें कांहीं

विशेष फलें अनुभवास येत नाहींत म्हणून चालू वर्षी इतर राशींतील त्याचीं भ्रमणें दिलीं नाहींत.

वर ग्रहांच्या भ्रमणाचा सामान्य विचार केला आहे व त्यावरून चालू सालच्या भविष्याची रूपरेखा वाचकांच्या लक्ष्यांत येईल. यापुढें सूर्यसंक्रमणांचा विचार करूं.

## मकर संक्रमण.

मकर संक्रमणाचा अंमल २२ डिसेंबर १९१७ पासून मेष संक्रमणापर्यंत म्हणजे २१ मार्च १९१८ पर्यंत आहे. या संक्रमणकालीं वृषभ राशीचा १८ वा अंश उदय पावला आहे. लोकपक्षकारक चंद्र उच्चराशींत असून पूर्व क्षितिजावर नुकताच वर येत आहे. रवि अष्टमांत असून मंगळाबरोबर केंद्र योग करीत आहे. लग्नांतील बलवान चंद्राबरोबर बुध व मंगळ हे नवम व पंचम या स्थानांतून त्रिकोण योग करीत आहेत या योगांमुळें लोकपक्ष बलवान राहील, चंद्र शनीचा केंद्रयोग सोडून बुधाबरोबर केंद्रयोग करण्यास जात आहे. बुध त्रिकोणयोगानंतर हर्शेलबरोबर केंद्रयोग होणार आहे व ह्या अनिष्ट योगानंतर मंगळाबरोबर त्रिकोणयोग होईल. शनीच्या केंद्रयोगानें असंतोष व खिन्नता पसरेल, हर्शेलच्या अनिष्ट योगानें असंतोष वाढविणाऱ्या गोष्टी घडून येतील पण बुध—मंगळांच्या त्रिकोणयोगानें शनि—हर्शेलांच्या अशुभ योगांचीं फलें कमी होऊन लोकांत उत्साह वाढेल, प्रस्तुत संक्रमण कालीं बुध नवम स्थानांत असून मंगळाबरोबर त्रिकोण योग करीत आहे. चंद्र तृतीय भुवनाचा अधिपति असून बुधाबरोबर शुभदृष्टियोग करीत आहे म्हणून ह्या काळांत वर्तमानपत्रकर्ते, लेखक व ग्रंथकार यांची भरभराट होईल असें दिसतें. जनतेकडून एखाद्या लोकप्रिय लेखकाचा गौरव होईल. फेब्रुआरी महिन्यांत हीं फलें दृष्टोत्पत्तीस येतील. चतुर्थस्थानीं शनि—नेपच्युनची युति असून हे दोन्ही ग्रह वक्री आहेत व अष्टमांत रवि आहे. ह्या योगांमुळें देशांत आरोग्य रहाणार नाहीं, मृत्युसंख्या वाढेल, ताप, देवी, गोवर वगैरे मंगळाच्या द्योतक रोगानें बालमृत्यूंची संख्या वाढेल. चतुर्थ-



स्थानांतील खलग्रहांच्या युतीनें शेतकी, इमारती बांधणें व खाणी वगैरेच्या कामांना हा काळ अनिष्ट आहे. या वेळीं हवामान बिघडेल. कन्येंतील वक्री मंगळ नागपूर, पुणें शहरांना अनिष्ट आहे. या ठिकाणीं विद्याखातें, शाळा व विद्यार्थी वर्ग यांच्यासंबंधानें समाधानकारक स्थिति रहाणार नाहीं, नाटककंपन्या, सर्कशी वगैरे पंचमस्थानाच्या द्योतक गोष्टींची स्थिति समाधानकारक रहाणार नाहीं.

सांपत्तिक स्थितीचा विचार करतां प्रस्तुत संक्रमणकालीं अनिष्टग्रहस्थिति दिसत नाहीं पण पुढें होणाऱ्या रविचंद्रसंयोगकालीं ही स्थिति अनिष्ट आहे. १३ जानेवारी रोजीं होणाऱ्या रविचंद्रसंयोगकालीं बुध धनस्थानांत असून मंगळाच्या केंद्रांत आहे. ११ फेब्रुवारी रोजीं होणाऱ्या र. चं. संयोगकालीं शनि—नेपच्युन धनस्थानांत आहेत! ही ग्रहस्थिति देशाच्या सांपत्तिक स्थितीस मुळींच चांगली नाहीं. पैशाच्या दृष्टीनें लोकांची बरीच ओरड होईल. मार्च महिन्यांतील र. चं. संयोगकालीं रवि, चंद्र व बुध तृतीय स्थानांत मीनराशींत असून कन्येंतील मंगळाच्या पूर्ण दृष्टींत आहेत. यामुळें रेल्वे व पोष्ट यांसंबंधानें प्रश्न प्रमुखत्वानें पुढें येतील. प्रेस ॲक्टाची अंमल बजावणी जारीनें होईल.

## मेष संक्रमण.

ता. २१ मार्च १९१८ रोजीं ३ वाजून १५ मिनिटांनीं रवि मेष राशींत प्रवेश करणार आहे. ह्या वेळीं पूर्वक्षितिजावर २० अंश उदय पावत असून लग्नकेंद्रीं कोणताही ग्रह नाहीं व लग्नेश रवि अष्टमांत आहे. दशमांत गुरु असून तो रवीबरोबर द्विद्वादश दृष्टि करीत असल्यामुळें तो वर्षाधिपति. गुरु वर्षाधिपति असून रवीबरोबर शुभदृष्टियोग करीत असल्यामुळें जोंपर्यंत ह्या मेषसंक्रमणकालीन कुंडलीचा अंमल असेल तोंपर्यंत शांतता, स्वास्थ्य व आरोग्य यांची वृद्धि होईल. मात्र प्रस्तुत वर्षाच्या मेषसंक्रमणाच्या कुंडलीचा अंमल वर्षभर राहील इतकी ती बलवत्तर नाहीं व पुढें होणाऱ्या संक्रमणाच्या

कुंडल्या अधिक बलवत्तर आहेत. प्रस्तुत संक्रमणाच्या कुंडलींत रवि-गुरु यांचा द्विराश्यंतर योग, चंद्र-मंगळांचा द्विराश्यंत योग, दशम केंद्रीं गुरु व सप्तम केंद्रीं शुक्र हे योग शांतता, आरोग्य व भरभराट यांचे द्योतक आहेत. जून महिन्याअखेर या संक्रमणाचा अंमल सहज रहाणार आहे तेव्हां येवढा काळ आपल्या देशांतील लोकांस सुखाचा जाईल. मेषसंक्रमणाची कुंडलींतील ग्रहस्थिति पहातां गेल्या साडे तीन वर्षे चाललेल्या घनघोर युद्धाला खळ पडेल असा संभव आहे. १९१८ मध्यें येवढाच काळ शांततेला अनुकूल आहे. गुरूच्या शुभप्रद किरणांचा लाभ सर्व मानवजातीस होत आहे त्याचा योग्य उपयोग होतो किंवा नाहीं हें पहाणें आहे. असो.

प्रस्तुत कुंडलींत गुरु दशम केंद्रीं असून रवि, बुध, शनि व नेपच्युन ह्या ग्रह चतुष्टयाबरोबर शुभदृष्टियोग करीत आहे. व्यापार आणि विशेषतः शिक्षण यांची प्रगति होईल व त्यासंबंधानें लोकोपयोगी कायदे करण्यांत येतील. अधिकारी वर्ग जनतेशीं सहानुभूतीनें व उदारपणानें वागेल, कायदेकौंसिलांत उपयुक्त ठराव पसार होतील. प्रस्तुत कुंडलींत शनि-नेपच्युन व्ययस्थानांत आहेत परंतु ह्या खलग्रहांबरोबर गुरु, बुध व रवि शुभसंबंधित असल्यामुळें अनिष्ट फलें दिसणार नाहींत असें अनुमान करण्यास चिंता नाहीं. धनस्थानीं कन्या राशींत वक्री मंगळ आहे. या मंगळाबरोबर चंद्र-द्विराश्यंतर शुभदृष्टियोग करीत आहे. या योगानें व्यापाराची वाढ होईल, व्यापारीवर्गांत चढाओढ व धाडसी प्रयत्न होतील, सध्याच्या व्यवहाराला तेजी येईल. नवीन कर बसविण्यांत येईल किंवा असलेले कर वाढविण्यांत येतील.

११ एप्रिल रोजीं होणाऱ्या रविचंद्रसंयोगकाळीं गुरु लग्न केंद्रीं व रविचंद्र लाभस्थानीं आहेत. गुरु लाभस्थानाचा अधिपति असून त्याच्याबरोबर उच्च शुक्र शुभदृष्टियोग करीत असल्यामुळें कायदेकौंसिलांत महत्वाचें व लोकहिताचें काम होईल. यापुढील रवि-चंद्र-संयोगकाळीं हर्शल लाभस्थानांत आहे व हर्शलबरोबर गुरु त्रिकोणयोग करीत आहे. या वेळीं लोकनियुक्त



सभासद व पुढारी यांच्या हातून उत्कृष्ट कामगिरी होईल, सनदशीर चळवळीस जोर येईल. कायदेकौंसिलाची सुधारणा होण्याचा संभव आहे.

## कर्क संक्रमण.

ता. २२ जून रोजीं दुपारीं ११-५१ मिनिटांनीं कर्क राशींत रवीचा प्रवेश होणार आहे. या वेळीं लग्नकेंद्रीं कन्याराशि उदय पावत असून उदित अंशाबरोबरच मंगळ उदय पावत आहे. लग्नांतील मंगळाबरोबर बुध, गुरु व रवि हे दशमांतून केंद्रयोग करीत आहेत व लाभस्थानांतील शनि अर्ध केंद्रयोग करीत आहे. तनुस्थानांतील मंगळाबरोबर झालेले योग देशांतील स्वास्थ्यास, आरोग्यास व प्रगतीस सर्वथैव प्रतिकूल आहेत. बुध-मंगळांच्या केंद्रयोगानें असंतोष व अस्वस्थता उत्पन्न होईल. गुरुमंगळांच्या केंद्रयोगानें देशांतील सांपत्तिक स्थिति खालावेल व रोगराई उत्पन्न होईल. मंगळ धनेश असल्यामुळें व्यापाऱ्यांचीं दिवाळीं निघतील. हा काळ राज्यकर्त्यांस अत्यंत त्रासाचा जाईल व देशांत मृत्युसंख्या फार वाढेल. या संक्रमणानंतरचे रवि-चंद्रसंयोगही अनिष्ट झाले आहेत. पहिल्या रवि-चंद्र सं. काळीं दशमांत शनि नेपच्युन असून चतुर्थांत हर्शल आहे व कर्केंतील रविचंद्राबरोबर व्यय स्थानांतून मंगळ केंद्रयोग करीत आहे. ७ आगष्ट रोजीं होणाऱ्या रवि-चंद्र सं. काळीं रवि-चंद्र हे नेपच्युन शनीच्या कर्तरींत तृतीयस्थानीं आहेत. आगष्ट सपटेंबर महिन्यांत रेल्वेवर अपघात होतील, संप होण्याचा संभव आहे. रेल्वे, पोस्ट व टेलिग्राफ यांना हा काळ अनिष्ट आहे. ५ सपटेंबर रोजीं होणाऱ्या रवि-चंद्र स. काळीं हर्शल लग्नांत, शनि-नेपच्युन, शुक्र सप्तमांत, रवि, चंद्र-बुध अष्टमांत, व गुरु षष्ठांत आहे. ह्या ग्रहस्थितींत शुभत्व कितीसें आहे ? कर्कसंक्रमणाचा अंमल सुरू झाल्यापासून पुढें केव्हांही शुभयोग दर्शविणारी कुंडली दिसत नाहीं ! हा काळ जनतेस दुःखकारक जाईल, रोगराई व दुष्काळ यांनीं लोक हैराण होतील.

## तूळ संक्रमण.

ता. २४ सपटेंबर रोजीं पहांटेस १ वाजून ३६ मिनिटांनीं रवि तूला राशींत प्रवेश करील. या वेळीं सिंह राशीचा १ ला अंश लग्नकेंद्रीं उदय पावत आहे. लग्नांत नेपच्युन, धनस्थानांत सिंह राशीचा शनि व शनीच्या केंद्रांत वृश्चिकेचा मंगळ व शनीच्या समोर अष्टमांत हर्शल आहे. दशमस्थानीं उच्च चंद्र आहे परंतु शनि, मंगळ व हर्शल हे तीन्ही ग्रह त्यास दूषित करीत आहेत. धन स्थानांत सिंह राशीचा शनि आणि तोही मंगळ हर्शलांनीं दूषित झाला आहे यावरून देशाची सांपत्तिक स्थिति अत्यंत निकृष्ट होईल. ह्या योगामुळें देशांत दारिद्र्य वाढेल, दिवाळीं निघतील, व्यापार बसेल, हा धनस्थानांतील शनि राष्ट्राला सांपत्तिक बाबतींत भयंकर आपत्तींत आणील. शनि–हर्शलांचा प्रतियोग धनस्थान व अष्टमस्थान ह्यांतून होत आहे तेव्हां दुष्काळामुळें व भयंकर रोगामुळें मृत्युसंख्या वाढेल. ह्या दोन्ही खल ग्रहांच्या अनिष्ट योगांस मंगळाच्या केंद्र योगानें अत्यंत भयंकरपणा आणला आहे. हा योग भयंकर लोकसंहार दर्शवीत आहे. दुष्काळ भयंकर स्वरूप धारण करील, नाना तऱ्हेचे रोग होतील, चोऱ्या, मारामाऱ्या, व रक्तपात होऊन मनुष्यहानि होईल, प्लेग, कालरा सर्वत्र पसरतील. हिंदुस्थानांत प्लेग सुरू झाला त्या वेळीं शनि हर्शल वृश्चिकेंत होते. आतां या ग्रहांचा प्रतियोग सिंह व कुंभ राशींतून म्हणजे मूळच्या युतिस्थानापासून केंद्रांत होत आहे. आपल्याकडे हा योग धन–अष्टमांतून होत असल्यामुळें मृत्युसंख्या कमालीची वाढेल. तुला संक्रमणाच्या कुंडलींत उपरिनिर्दिष्ट अनिष्ट योगाशिवाय एक महत्त्वाचा शुभयोग झाला आहे. कन्या राशींत बुध–शुक्रांची युति गुरूच्या द्विराश्यंतर दृष्टींत व चंद्राच्या त्रिकोणांत होत आहे. ह्या योगावर स्वभाषेंत उच्च शिक्षण देणारी संस्था जन्मास येईल. महाराष्ट्राचा तनुस्वामी गुरु उच्च असून बुध, चंद्र व शुक्र यांबरोबर शुभ



दृष्टियोग करीत आहे. लोकपक्षकारक चंद्र उच्च, महाराष्ट्राचा तनुस्वामी गुरु तोही उच्च व विद्वानांचा कारक बुध तोही उच्च आणि या तीन्ही ग्रहांमध्यें शुभ योग अर्थात ही ग्रहस्थिति महाराष्ट्रीयांच्या हातून चिरस्मरणीय अशी कामगिरी घडवून आणील. या काळांत कायदेकौंसिलांत लोकनियुक्त सभासदांचा विजय होईल, महाराष्ट्रांतील लोकप्रिय पुढाऱ्यांचा गौरव होईल व नवीन उपयुक्त संस्था निर्माण होतील.

## सन १९१८ सालामधील ग्रहणें.

चालू सालीं एकंदर तीन ग्रहणें होत आहेत. त्यांपैकीं दोन सूर्यग्रहणें असून एक चंद्रग्रहण आहे. ही तीन्हीही ग्रहणें आपल्या देशामध्यें दिसणार नाहींत.

( १ ) तारीख ८ जून सन १९१८ रोजीं खग्रास सूर्यग्रहण असून तें **उत्तर अमेरिकेकडील** सर्व प्रदेश, **प्यासिफिक महासागराच्या उत्तरेकडील प्रदेश, सायबीरिया, चीन** व **जपान** या देशांमध्यें दिसेल व ह्या ग्रहणाचे परिणाम सदरहू देशांवर विशेष स्पष्टपणें पाहण्यास मिळतील.

हें सूर्यग्रहण **मिथुन** राशीच्या द्वितीय द्रेष्काणामध्यें होत असून **रवि** व **चंद्र** हे **मंगळा**बरोबर केन्द्रयोग करीत आहेत. मुंबईइलाख्यामध्यें हा केंद्रयोग धन व पंचमस्थानामध्यें बसत असून **शनि नेपच्युन** ह्या दोन खल ग्रहांची जोडी चतुर्थस्थानामध्यें येत आहे. **रवि, चंद्र** व **गुरु** धनस्थानामध्यें असून **मंगळ** हा पंचमांत आहे त्यामुळें सट्याचे व्यवहारामुळें पुष्कळ दिवाळीं निघण्याचा संभव वाटतो. देशांतील जमाबंदी कमी होईल. नाण्याची टंचाई भासेल व लहान मुलांची मृत्युसंख्या वाढेल. बरेचसे मुलांचे मृत्यु ताप, गोंवर, कांजण्या, देवी व आंत्रविकार यांपासून होतील किंवा लहान मुलांमध्यें संग्रहणीचा विकार किंवा वर दर्शविलेल्या गोंवर, देवी किंवा कांजण्याच्या साथीनें होतील व रोगाचा प्रकार तीव्रतेचा भासेल. हवेमध्यें फेरफार होऊन फार पाऊस पडल्यानें एकदम भयंकर गारठा उत्पन्न होईल व पीकपाण्याची

वरीच नासाडी होण्याचा संभव आहे. पेढी व ब्यांकवाले लोकांस हा काळ कठीण वाटतो.

( २ ) तारीख २४ जून सन १९१८ ह्या रोजीं चंद्राचें खंडित असें ग्रहण आहे परंतु ह्या ग्रहणाचा ग्रास फारच अल्प असल्यामुळें विशेष महत्वाचें वाटत नाहीं. हें ग्रहण **दक्षिण अमेरिका, उत्तर अमेरिकेचा** कांहीं भाग, **प्यासिफिक महासागर** व आस्ट्रेलिया या देशांमध्यें दिसेल. हें ग्रहण मकर राशीच्या पहिल्या द्रेष्काणामध्यें होत असल्यामुळें **मेक्सिको**मध्यें या ग्रहणाचे बरेच अनिष्ट परिणाम पाहण्यास मिळतील.

( ३ ) तारीख ३ डिसेंबर सन १९१८ रोजीं **कंकणाकृति सूर्यग्रहण** होणार आहे व तें **दक्षिण अमेरिके**च्या पश्चिमेकडील प्रदेशांत, **दक्षिण अटलान्टिक महासागर,** दक्षिण प्यासिफीक महासागर व सर्वसाधारणपणें सर्व **दक्षिण अमेरिके**मध्यें दिसेल. व त्यामुळें दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्याकडील प्रदेशामध्यें अनेक भानगडी, भूकंप व त्रास उत्पन्न होईल. हें ग्रहण **धनु** राशीच्या द्वितीय द्रेष्काणामध्यें होत आहे व त्यामुळें उंट व रवंथ करणाऱ्या जनावरांचा नाश होईल. रशियामध्यें राजकीय भानगडी उत्पन्न होतील. आपल्याकडे ह्या वेळेच्या रविचंद्रसंयोगाचे कुंडलीमध्यें धन स्थानामध्यें **शनि** बसत असून गुरुमंगळाचा प्रतियोग लग्न व सप्तम स्थानांतून होत आहे त्यामुळें परदेशी व्यापार, धार्मिक मतें, आचारविचार यांसंबंधानें कांहीं खळबळ होईल. देशांतील सांपत्तिक स्थिति निकृष्ट राहील.

## सन १९१८ सालांतील बृहत् ग्रहांचे योग व प्रतियोग.

चालू सालामध्यें **मंगळ, शनि, नेपच्युन** व हर्शल ह्या मोठाल्या ग्रहांचे युतियोग मुळींच होत नाहींत. परंतु चालू वर्षी **शनि** व हर्शल या दोन ग्रहांचा **प्रतियोग** तारीख १ आक्टोबर सन १९१८ रोजीं संध्याकाळीं



मुंबई वेळा ८ वाजून २ मिनिटांनीं **सिंह** व **कुंभ** राशीच्या २४ अं. १४ कलांमध्यें होणार आहे. ह्या ग्रहांचा याच राशीमधील प्रतियोग सन १८२९ सालामध्यें जुलईच्या ९ व्या तारखेस झालेला आहे. या प्रतियोगानें वातावरणामध्यें बराच घोंटाळा उठून हवेमध्यें विलक्षण फेरफार घडण्याचा संभव आहे. **कुंभ** व **सिंह** राशींचा अंमल ज्या ज्या प्रदेशावर आहे अशा देशांमध्यें बऱ्याच भानगडी व रोगराई उत्पन्न होतील. **रशिया**—कुंभ राशीचा अंमल या देशावर आहे—मध्यें भयंकर रोगाची साथ पसरेल, व्यापारधंदा बसेल व राजकीय वातावरणामध्यें बऱ्याच अनिष्ट अशा भानगडी होतील. **इटाली, फ्रान्स, सिसली** व **रोम** यांनाही ह्या प्रतियोगाचा कटुतर अनुभव पाहण्याचा प्रसंग येईल असें वाटतें. सदरहू देशामध्यें भूकंप व रोगराई यांनीं अत्यंत प्राणहानी होईल असें वाटतें. हिंदुस्थानामध्येंही **दिल्ली, आग्रा** वगैरे उत्तरेकडील प्रदेशांमध्यें भूकंपामुळें अरिष्ट ओढवेल व सरहद्दीवरील प्रदेशामध्यें यंदा बरीच भानगड उठण्याचा संभव वाटतो.

हिंदुस्थानासंबंधानें या प्रतियोगाचा स्वतंत्रपणें विचार करितां सन १८९६ मध्यें शनि व हर्शल हे दोन ग्रह वृश्चिक राशीमध्यें बरेच जवळ जवळ आले होते. परंतु इसवी सन १८९७ मध्यें या दोन खल ग्रहांची वृश्चिक राशीमध्यें खालीलप्रमाणें तीन वेळां युति झालेली आहे. ( १ ) जानेवारी २६वी, वृश्चिक २७ अं. ४० क. ( २ ) जून १ ली, वृश्चिक २६ अं. २६ क. व ( ३ ) सप्टेंबर ९ वी, वृश्चिक २९ अं. ३९ क.

सन १८९६ व सन १८९७ मध्यें हिंदुस्थानामध्यें प्रथमच प्लेगचा प्रारंभ होऊन व्यापारधंदा व जीवित यांची कशी दुर्दशा झाली व मुंबईस प्लेगचा कसा कहर झाला याची स्मृति अद्यापि नष्ट झाली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. चालू सालीं हा वर दर्शविलेला होत असलेला शनि व हर्शल यांचा **प्रतियोग** वरील अनिष्ट फल दर्शविणाऱ्या वृश्चिकेमधील योगाचे केंद्र-

योगांत होत आहे. त्यामुळें चालू सालामध्यें सन १८९६ व १८९७ सालामध्यें जसा भयंकर हाहाकार प्लेगमुळें उडाला तसा उडतो किंवा काय यासंबंधानें धास्तीच आहे. चालू वर्षी हर्शल हा तारीख १८ मार्च रोजीं कुंभेमध्यें २९ अं. व ३४ कला होणार असून वरील युतीबरोबर प्रथम केंद्रयोग करणार आहे. नंतर ता. २१ मेमध्यें हर्शल कुंभेमध्यें २७ अं. व ३ कला होऊन पुन्हा दुसऱ्यानें केन्द्रयोग करील व याच म्हणजे तारीख २ जून रोजीं हर्शल कुंभेमध्यें २७ अं. ४३ कलांमध्यें स्तंभी होणार आहे !! **शनि** हा वरील युतीचे केन्द्रयोगांत आक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांमध्यें राहणार आहे. व या प्रतियोगाचे केन्द्रामधून व सन १८९७ मध्यें झालेल्या युतियोगावरून **मंगळाचें** भ्रमण तारीख २४ सप्टेंबर ते २७ सप्टेंबरपर्यंत होणार आहे ! ! वरील सर्व गोष्टींचा विचार करितां तारीख १७।१८ सप्टेंबरपासूनचा काळ व त्यांतले त्यांत आक्टोबर व नोव्हेंबर महिने भारतवासियांस व त्यांतलेत्यांत मुंबईशहराचे रहिवाश्यांत हा काळ फारच अनिष्ट जाईल असें वाटतें. या काळामध्यें भयंकर रोगराई, अत्याचार, खून, मारामाऱ्या होऊन लोकांना हा काळ फारच कष्टतम भासेल. जून नंतरचा काळ ह्या देशांतील उद्योगधंद्यांस, सांपत्तिक स्थितीस, सार्वजनिक आरोग्यास अत्यंत विघातक वाटत आहे. ईश्वर करो व ही आमची भविष्यवाणी खोटी ठरो.

सप्टेंबरमध्यें सट्ट्याचे व्यापार व मुंबईमधील सर्व प्रकारचे उद्योगधंदे यांमध्यें भयंकर क्रांतिकारक फेरफार घडतील करितां ह्या काळीं जोखमीचे धंदे करणारे लोकांनीं विशेष सावधगिरी बाळगावी. मुंबई शहरीं यंदा फेब्रुवारी महिन्यापासूनच प्लेगचा बराच तीव्र उपद्रव भासेल व मृत्यु फारच त्वरित होतील. व यंदांच्या प्लेगमध्यें हृदय Heart व रक्ताभिसरणासंबंधीच विशेष भानगडी होऊन बरेच रोगी फारच अल्पकाळामध्यें काळवश होतील असें वाटतें. असो ज्या अर्थी शनि व हर्शल यांचे युतीवर हिंदुस्थानामध्यें



प्लेगचा आजार प्रथमतः उत्पन्न होऊन तो तेच ग्रह पुन्हा केन्द्रामध्यें येईपर्यंत सारखा सतत टिकून राहिला आहे त्या अर्थी या प्रतियोगानें पुन्हा एकदा तीव्रतम अनुभव येऊन तो कायमचाच कां बंद होऊं नये ? किंवा हर्शलच्या गुणधर्माप्रमाणेंच एखाद्या कल्पकास ह्याच रोगावर चालू सालीं अचुक गुण देणारा असा उपाय कां सुचणार नाहीं ? ईश्वरी योजना कांहीं अगाध आहे तीमुळें पुढें काय काय घडेल यासंबंधानें तरी आज निश्चित असें फारच कमी सांगतां येईल असें आम्हांस वाटतें. मानवी बुद्धिमत्तेप्रमाणें आम्हांस सुचलेले विचार वाचकवर्गापुढें मांडले आहेत.

## खालीलप्रमाणें चालू वर्षामध्यें ग्रह स्तंभी आढळतील.

**बुध**—तारीख १४ जानेवारी मकर ३ अं. २८ क.
" १६ एप्रिल वृषभ १० अं. २९ क.
" १० मे वृषभ ० अं २९ क.
" १९ आगस्ट कन्या १६ अं. ५४ क.
" ११ सप्टेंबर कन्या ३ अं. १५ क.
" ९ डिसेंबर व २८ डिसेंबर मकर ३ अं. ५० क. व धनु १७ अं. २३ क.

**शुक्र**—तारीख २० जानेवारी कुंभ २८ अं. ३१ क.
" २ मार्च कुंभ १४ अं. ४४ क.

**मंगळ**—तारीख ३ फेब्रुवारी तुला ३ अं. ४ क.
" २५ एप्रिल कन्या १३ अं. ५१ क.

**गुरु**—तारीख २६ जानेवारी मिथुन १ अं. २८ क.
" ३ नोव्हेंबर कर्क १५ अं. ५० क.

**शनि**—तारीख ९ एप्रिल सिंह ७ अं. ३७ क.
„ ९ डिसेंबर सिंह २८ अं. १५ क.

**हर्शल**—तारीख २ जून कुंभ २७ अं. ४३ क.
„ ३ नोव्हेंबर कुंभ २३ अं. ४८ क.

**नेपच्युन**—तारीख १९ एप्रिल सिंह ४ अं. १८ क.
„ १२ नोव्हेंबर सिंह ९ अं. २० क.

**सूचना**—ज्यांचे जन्मकालीन **रवि, चंद्र, दशम** भावारंभाचा उदित बिंदु व **लग्नाचा** उदित बिंदु यांवर **शनि, हर्शल** व **नेपच्युन** हे ग्रह **स्तंभी** होतील त्यांस चालू वर्षी धंद्यांत नुकसान व शारीरिक कष्ट, अपमान, संकटें प्राप्त होतील. परंतु ज्यांचे वरील दर्शित ठिकाणीं **गुरु** किंवा **शुक्र** स्तंभी होतील त्यांस चालू वर्षी धंदारोजगारामध्यें लाभ किंवा सांपत्तिक लाभ प्राप्त होतील, **बुध** हा मूळ कुंडलींत ज्याप्रमाणें शुभाशुभसंबंधित असेल त्याप्रमाणें फळें देईल. चालू वर्षी चंद्र हा फक्त दोनच वेळां **पिधान*** योग करीत आहे. तारीख ३ आगस्ट शनिवार रोजीं रात्रीं १२ वाजून ४७ मिनिटांनीं ( मुंबई टाईम ) गुरु व चंद्राचा पिधानयोग होईल. हा पिधानयोग आपल्याइकडे दिसेल. व तारीख ९ आक्टोबर बुधवार रोजीं रात्रीं १० वाजून ५३ मिनिटांनीं ( मुंबई टाईम ) चंद्र मंगळांचा पिधानयोग होईल. हाही आपल्याकडे दिसेल.

---

* **पिधान** म्हणजे काय व त्याचे फलासंबंधीं खुलासा **ज्योतिर्मालेच्या** दुसऱ्या वर्षाच्या जानेवारीच्या अंकामध्यें केलेला आहे.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्राद्रघुवररचिताद्राचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. | फेब्रुवारी १९१८. | अंक ११ वा.

## स्फुट विचार.

**भा**रतीय प्राचीन ज्योतिर्विदांनीं उज्जयिनी हें स्थान हिंदुस्थानाच्या मध्य भागीं मानिलें असून हीच मध्यरेषा ग्रहगणितास योग्य अशी ठरविली आहे. युरोपीय राष्ट्रांस जसा **ग्रीनविचचा** अभिमान आहे तसाच अभिमान भारतवासीयांस आपल्या **उज्जनीचा** आहे. येथेंच पूर्वी जयपुरचे महाराज श्रीसवाई जयसिंह यांनीं वेधशाळा बांधलेली आहे. ही हल्लीं भग्नावस्थेंत आहे. तिचा जीर्णोद्धार करण्याकरितां उज्जनी येथें स्थापन झालेल्या **पंडिताश्रम सभे**संबधानें माहिती आम्हीं ज्योतिर्माला वर्ष १ लें अंक १० मध्यें दिली आहे. या वेधशाळेचे दुरुस्तीचें काम व **माधव वेधशालेची** कोणशिळा सुमुहूर्तावर बसविण्यांत यावी या हेतूनें पंडिताश्रमसभेनें खालीलप्रमाणें

जाहिर विनंतिपत्र काढिलें असून त्याच्या कांहीं प्रति आमचेकडे वांटण्यास पाठविल्या आहेत. हें जाहिर विनंतिपत्र आम्हीं आमच्या वाचकांच्या सोई-करितां मालेंत प्रसिद्ध करीत आहों. ज्या कोणास या संस्थेस मदत करणें असेल त्यांनीं ती परभारें पंडिताश्रम सभेचे प्रधान मंत्री यांचेकडे पाठवावी. वेधशाळा ही सर्वांसच हवी आहे. भरतखंडामध्यें एकही वेधशाळा उत्तम स्थितीमध्यें असूं नये ही मोठी खेदाची गोष्ट आहे. या गोष्टीकडे आमचे राजे, महाराजे, सरदार, सावकार व दानशूर लोक लक्ष देतील काय ?

### विनंति पत्रिका. पंडिताश्रम सभा उज्जयिनी मालवा.

विदित होकि, उज्जयिनी में सभा द्वारा यंत्रशाला स्थापन पूर्वक पंचांग गणित शोधन का कार्य आरंभ होगया है. इस विषय में उज्जयिनी में सन १९१९ में जो आलइंडिया ज्योतिर्वित्कान्फरेन्स हुई थी उस में उज्जयिनी यह स्थान हिन्दुस्थान में ज्योतिर्विद्या का केन्द्रस्थान मानकर यहां पर ही प्राचीन व नवीन पद्धति की बडी वेधशाला कायम की जाकर उसका नाम "माधव वेधशाला" रखा जावे ऐसा ठहराव हुवा था. इस वेधशाला का फाउंडेशन के ( कोनशिला स्थापन करने के ) साथ यहां की प्राचीन वेधशाला की दुरुस्ती करने का कार्य सुमुहूर्त पर करने का निश्चित हुवा है. श्रीमान् शिंदे महाराज ने सभा का प्रधान संरक्षक पद स्वीकार करके इस भग्न वेधशाला की मरम्मत करने का हुकुम देदिया है. सबब सब ज्योतिर्विदों की सेवा में प्रार्थना है कि आगामी चैत्र या वैशाख में अपनी संमति के अनुसार मुहूर्त निश्चित करके माघ कृष्ण ३० अर्थात् तारीख १२ मार्च सन १९१८ तक पत्रिका भेजना चाहिये. एक मत से मुहूर्त निश्चित करने का कार्य ज्योतिर्विन्महा मंडल करेगा. मुहूर्त निश्चत हो जाने पर उत्सव मे उपस्थित होने के लिये पंडितों की सेवा में निमंत्रण पत्रिका भेजी जावेगी.

**मुहूर्त पत्रिका भेजने का पता—ज्योतिर्विद्भूषण पंडित विष्णुदेवजी अध्यक्ष ज्योतिर्विन्महा मंडळ लष्कर ग्वालियर ठि० खासगी.**



## ग्रह विचार.

### सप्तमस्थ रविफल.

( मागील अंकावरून पुढें चालू )

द्युनाथो यदा द्यून यातो नरस्य प्रियातापनं पिण्डपीडाविचिंत्या ॥
भवेत्तुच्छलब्धिः क्रयेविक्रयेपि प्रतिस्पर्द्धयानेतिनिद्रांकदाचित् ॥

**सप्तम ( मेष )**—अतिशय फिरणारा, व्यापारांत यशस्वी, कायद्याची कामें करण्याची आवड जास्त; द्विभार्यत्व अथवा विधुरता. स्त्रीसौख्य मध्यम मानाचें.

**सप्तम ( वृषभ )**—भागीनें धंदा करणारा, स्त्रीजित, ऐषआराम व भोग यांची इच्छा करणारा व मनमिळाऊ आणि आपमतलबी असतो.

**सप्तम ( मिथुन )**—ऐतिहासिक वाङ्मयाची आवड, प्रवासवर्णनें लिहिण्यांत कुशल, कायदेपंडित, स्त्रीलोलुप, दोन धंदे करणारा, स्त्री देखणी व कुशल, कायद्याचीं भांडणें भांडणारा.

**सप्तम ( कर्क )**—स्त्री सुंदर व चंचल, कौटुंबिक कलह करणारा, भागीनें धंदे केल्यास नुकसान पावणारा व प्रवासी होतो, खेळण्यांत पटाईत.

**सप्तम ( सिंह )**—व्यापारांत यशस्वी, कलहप्रिय, वादविवाद करणारा, उत्तम शिपाईबाण्याचा, कोर्टांतील कामीं यशस्वी होणारा, निश्चयी.

**सप्तम ( कन्या )**—व्यापारांत नुकसान, स्त्रीशीं प्रतारणा करणारा, कुटिल, कारस्थानी, पोटव्यथा.

**सप्तम ( तुला )**—स्त्री सद्गुणी, विचारी, व्यापारांत सामान्य यश मिळविणारा, विद्वत्तेचा भोक्ता, प्रवास, कवि, कल्पक, विमानें वगैरेंतून हिंडणारा.

**सप्तम ( वृश्चिक )**—गुह्य रोगी, द्विभार्य, स्त्रीस अस्वस्थता, तेढ्या मार्गानें जाणारा, नाहक कलह करणारा, व्यापारांत गुंतागुंती करणारा होतो.

**सप्तम ( धनु )**—स्त्रीसुदृढ व सशक्त, आप्तांशीं मित्रभावानें वागणारा द्विभार्य, साहसानें व चिकाटीनें व्यापार करणारा.

**सप्तम ( मकर )**—प्रवासांत त्रास, नेत्र व पाय यांस विकार असलेला स्त्रीसौख्य कमी, भागीदारीनें धंदा केल्यास अपयश व तंटे.

**सप्तम ( कुंभ )**—स्त्रीशीं विरोधीवृत्ति, उत्तम कायदेपंडित, भागीनें धंदा केल्यास नुकसान, नेत्रदोषी, प्रवासांत अडचणी.

**सप्तम ( मीन )**—स्त्रीस वारंवार आजार, खर्चिक, फसणुकीमुळें नुकसान, स्वतंत्र धंद्यापेक्षां नोकरींत यश उत्तम, लांबलांबचे प्रवास फार होतील.

## अष्टमस्थ रविफल.

क्रियालंपटत्वष्टमे कष्टभाजं विदेशीय दारान्भजेद्वायवस्तु ॥
वसुक्षीणता दस्युतो वा विलंबा द्विपद्धुवाजाभानुरग्रं विधत्ते ॥ ९ ॥

**अष्टम ( मेष )**—गुह्यरोगी, कारस्थानी, ज्योतिषादि गुह्यविद्यांनीं उपजीवन चालविणारा, गुप्तधनाची सामान्य प्राप्ति ज्यास होते असा, मेंदूच्या विकारनें अथवा अतिप्रवासाचे श्रमानें किंवा प्रवासांत मृत्यु येतो ज्यास असा.

**अष्टम ( वृषभ )**—मित्रधनाची प्राप्ति, गळ्याचे विकारानें अथवा शुक्रदोषानें मृत्यु येतो ज्यास असा, वाद्यविद्येच्या नादानें सर्वस्वाची हानि करून घेणारा.

**अष्टम ( मिथुन )**—मोहिनीविद्या, मंत्रविद्या यांचीं मूलतत्वें जाणणारा पण त्याचा दुरुपयोग करणारा, अभागी अथवा अपयशी, दम्याखोकल्याच्या विकारानें मृत्यु

**अष्टम ( कर्क )**—बालपणीं प्रकृति अशक्त, पाण्यापासून भय, अपघाताची धास्ती. मानसशास्त्राचीं तत्वें जाणणारा. चंचल वृत्तीचा, स्वप्नें जास्त पडतात असा. उदरासारख्या विकारानें मृत्यु.

**अष्टम ( सिंह )**—गुप्तधनाची प्राप्ति, मृत्यु पित्तप्रकोपानें अथवा हृदयक्रियेच्या अव्यवस्थेनें; गूढविद्या—रमलादि विद्येचा अभिमानी.

**अष्टम ( कन्या )**—परस्त्रीलंपट, मायावी, खोटीं कारस्थानें रचणारा, कळलाव्या, स्त्रीसाठीं खर्च जास्त करणारा. भागीनें व्यवहार करून नुकसान पावणारा; ओटीपोटांतील अव्यवस्थेनें त्रास पावणारा.



**अष्टम ( तुला )**—मोठाली दुखणीं येतील, उन्नतीसाठीं फार धडपड करावी लागेल, गुप्तधन मिळण्यांत अडथळे येतील; मातुलपक्षाची मदत, पोटांतील व्यथेनें मृत्यु.

**अष्टम ( वृश्चिक )**—संततिसौख्य फार अडचणींचें मिळेल, विद्येंत अडथळे जास्त येतील, गुह्य विकारानें मृत्यु होतो.

**अष्टम ( धनु )**—खाणींतील काम करणारा; भूमिगत द्रव्य अथवा मातृपक्षाकडून द्रव्यप्राप्ति, शर्यतींत द्रव्य कमविणारा, अपघातानें किंवा रक्तदोषानें मृत्यु पावणारा.

**अष्टम ( मकर )**—त्रास व दगदग फार, स्त्रीसौख्य कमी, भावंडांचें सौख्य कमी, गुडघ्यास इजा, प्रवासांत मृत्यु.

**अष्टम ( कुंभ )**—पायांस इजा, सट्टे, लॉटरींत धनप्राप्ति ( सामान्य ), बौद्धिक विषयांत गति, विद्येचा दुरुपयोग करणारा, वातोष्ण प्रकोपानें मृत्यु.

**अष्टम ( मीन )**—शारीरसौख्य कमी, दगदगी, रुग्णालयांत वावरणारा, जुगाराचा नादी व अपयशी, जलापघात अथवा मद्यपानाचें व्यसन जडवून घेणारा, शीतज्वरानें मृत्यु पावणारा होतो.

## नवमस्थ रविफल.

दिवानायके दुष्टता कोणयाते न चाप्नोति चिंताविरामोऽप्यचेत: ॥
तपश्चर्ययाऽनिश्चयापिप्रयाति क्रियातुंगतां तप्यते सोदरेण ॥ १० ॥

**नवम ( मेष )**—परोपकारी, दैवीसंपत्तीनें युक्त, भाग्यवान्, कीर्तिशाली, धर्मसंस्थापक; साधुसमागमाची इच्छा करणारा; राजमान्यत्व मिळविणारा, स्वतंत्र डोक्याचा व प्रवासी; पूर्वेकडे भाग्योदय, अनोळखी इसमांकडून द्रव्यलाभ.

**नवम ( वृषभ )**—चांगल्या कार्यांत द्रव्याचा व्यय करणारा, अडचणींतून सोडविणारा, यशस्वी रीतीनें गुंतागुंती सोडविणारा, गुप्त कारस्थानें उघडकीस आणणारा, गायनविद्येची आवड असणारा; खुष्कीचे प्रवास फार करणारा.

**नवम ( मिथुन )**—पूर्वी दरिद्रीपणा पुढें मोठी श्रीमंती व वैभव भोगणारा, मित्र फार, शास्त्रीय विषय व संस्कृत वाङ्मयांचा पुरस्कर्ता, तत्वज्ञानी,

**नवम ( कर्क )**—स्वतंत्रतेनें उन्नति करून घेणारा, धार्मिक बुद्धीचा, पुण्यकर्मे करणारा, खेळण्याची आवड, स्तुतिप्रिय, भाग्यवान्, पितृधन मिळविणारा.

**नवम ( सिंह )**—भाग्यवान्, राजमान्य, यशस्वी, प्रतिभासंपन्न स्वधर्मनिष्ठ, मुत्सद्दी.

**नवम ( कन्या )**—सावकारी करणारा, जूरर्चें व ट्रस्टीचें काम करणारा, धर्मविचाराची शाब्दिक चर्चा करणारा, यांत्रिक कामांत भाग्योदय.

**नवम ( तुला )**—न्याय करण्यांत कुशल, भाग्यशाली, विवाहानंतर भाग्योदय, तत्वज्ञानी व ऐहिक सौख्य व पारलौकिक कल्याण यांची जोड मिळविण्याची इच्छा करणारा; बुद्धिबळें खेळणारा.

**नवम ( वृश्चिक )**—दुर्दैवी, डॉक्टरी विद्येत प्रवीण, रसायणशास्त्रज्ञ, धर्माचरण कमी अथवा भ्रष्टासारखें. गूढविद्याभ्यासंगी. खाणीचे धंद्यांत यशस्वी.

**नवम ( धनु )**—विद्वान्, राजकारण पटु, शिक्षक, ग्रंथकार ( उदात्त ग्रंथ रचणारा ), धर्मासंबंधानें विशिष्ट मताचा, सांपत्तिक स्थिति साधारण, क्रिकेटादि बाह्य खेळांत कुशल.

**नवम ( मकर )**—पत्रव्यवहार करण्यांत कुशल, मातृभक्त, उपासना करणारा, प्रवासी, शेतकी करणारा, परबुद्धीनें चालणारा, वारंवार मतें बदलणारा, गृहसौख्यास साधारण.

**नवम ( कुंभ )**—स्वतःच्या बुद्धिसामर्थ्यावर कीर्ति मिळविणारा, उत्तम ग्रंथकार, वकील, कायद्याचें ज्ञान मिळविणारा, नीतिज्ञ.

**नवम ( मीन )**—धनाढ्य, सत्कर्मी व्यय करणारा, देवालयें बांधणारा, सूर्योपासक, जलप्रवास करणारा, कौटुंबिक स्वास्थ्यास जपणारा.




## पत्रव्यवहार.

श्रीयुत रा. रा. संपादक ज्योतिर्माला यांस—

सा. न. वि. वि.

आपणाकडेस एका जन्मान्ध मनुष्याची कुंडली मी पाठवीत आहें ती येत्या अंकीं प्रसिद्ध कराल अशी आशा आहे. मी आपले विचारानें जे योग जन्मान्ध योगाला कारणीभूत झालेले दर्शविले आहेत त्यांशिवाय इतर योग आपणास सुचतील तेही प्रसिद्ध करण्याची कृपा करावी.

जन्मः—संवत १९३२ शके १७९७ पौष शुद्ध १३ रविवार तारीख ९ जानेवारी सन १८७६ रात्रीं दहा वाजतां. जन्म दिल्लीचेजवळ अक्षांश २८ अ. ३९ क. उत्तर. रेखांश ७७ अं. १६ क. पूर्व.



## ग्रहांच्या क्रांति

| | | |
|---|---|---|
| रवि २२।७ द. | बुध २२।४९ द. | शनि १४।४६ द. |
| चंद्र २८।१९ उ. | गुरु १८।१४ द. | हर्षल १९।४६ द. |
| मंगल २।३० द. | शुक्र १७।१६ द. | नेपच्युन ९।९९ उ. |

## ग्रहांचे दृष्टियोग.

**चंद्र** केन्द्रयोग मंगळ; चंद्र १५० अंश किंवा षडाष्टक योग बुध व गुरूबरोबर; चंद्र १३५ अंश किंवा सार्धचतुष्टयराश्यंतरयोग शुक्राबरोबर, चंद्र त्रिकोण किंवा १२० अंश शनि.

**बुध** ६० अंश किंवा द्विराश्यंतर गुरु; बुध ३० अंश किंवा एकराश्यंतर शनि; द्विराश्यंतर योग मंगळाबरोबर.

**रवि** १२० अंश किंवा त्रिकोण दृष्टियोग लग्नाचे उदित अंश रवि शुक्र ३० अंश. रवि हर्षल १५० अंश किंवा षडाष्टकयोग. रवि मंगळ ६० अं. किंवा द्विराश्यंतर; रवि गुरु द्विराश्यंतर.

**शुक्र** प्रतियोग हर्षल.

**मंगळ** ३० अंश शनि त्रिकोणयोग गुरु.

**गुरु** केंद्रयोग शनि.

**शनि** हर्षलप्रतियोग.

रवि बुध समक्रांतियोग; शनि हर्षल समक्रांति योग; शुक्र गुरु समक्रांति.

या कुंडलींत हर्षलचे योग विशेष लक्षांत घेण्यासारखे झालेले आहेत. लग्नाला व्ययस्थानीं रवि, मंगळ व बुधाला षडाष्टकीं, गुरूला केंद्रीं शुक्र व शनीला १८० अंशांच्या योगांत ( प्रतियोग ) राहूच्या १३५ अंशांत व केतूच्या ४५ अंशांत आहे. येणेंप्रमाणें एक चंद्र खेरीज करून इतर सर्व ग्रहांना हर्षलनें आपल्या क्रूर दृष्टीनें पीडिलें आहे. हर्षल नुसत्या डोळ्यानें दिसणारा ग्रह नाहीं व याचीं फळें अद्भुत व अलौकिक अशीं आहेत. याप्रमाणें हर्षल या अदृश्य ग्रहाकडून इतर सर्व ग्रह निर्बली झाल्याकारणानें हा जन्मान्ध



निपजला, मात्र हा संस्कृत विद्येंत निष्णात आहे. शेखर मनोरमा महाभाष्यापर्यंत व्याकरण शिकलेला आहे. तसेंच वैद्यक, ज्योतिष व मंत्रशास्त्रांतही याची गति आहे. याचें कारण पंचमस्थानांतील बुध, शुक्र व त्यांचे रवि, मंगळ, गुरु व शनि यांजबरोबर झालेले शुभ योग होत. सप्तमांत मंगळ व राहु असल्या कारणानें लग्न झालें नाहीं. तृतीय स्थानीं गुरु असल्यामुळें वडील भाऊ व बहिण आहे. षष्ठांत शनि असल्याकारणानें शरीर रोगयुक्त आहे व शत्रुही पुष्कळ आहेत. कारण याला वादाची फार हौस असून त्यांत पराजय मानून घेत नाहीं. स्वभावांत हट्टीपणा जास्त आहे. अष्टमांत नेपच्युन असल्यामुळें पाण्यांत बुडून मरण्याची वेळ आली होती परंतु संकट बचावलें, या कुंडलींत सिंह राशीचा पराक्रमी हर्शल समस्त ग्रहांशीं योगकारक झाल्यामुळें योगसिद्धीकडे याचें मन कांहीं दिवसांपासून वेधलें आहे. चंद्राचा मंगळाबरोबर कन्द्रयोग झाल्यामुळें स्वभाव चंचल व कलहप्रिय, रागीट, व धीट आहे. दशमस्थानामधील चंद्र याला एके ठिकाणीं बसूं देत नाहीं. यात्रांत भ्रमण होत असतें. वृत्ति भिक्षान्देहीची आहे. कळावें हें विनंति

आपला,

**मन्नालाल दुबे.**

[ कुंडलीमधील ग्रहांचे अंशात्मक दृष्टियोग कसे पाहावे यासंबंधानें बराच पत्रव्यवहार आमचेकडे आला असल्याकारणानें ह्या कुंडलींतील योग स्पष्ट कळण्याकरितां वर दर्शविले आहेत. या विषयावर एक विस्तृत निबंध पुढील वर्षाचे अंकामध्यें देण्याचा विचार आहे.

द्वादश भावांपैकीं धन व व्यय स्थानाचा अंमल दक्षिण व वामनेत्रावर असल्याचें ग्रंथांतरीं वर्णन आहे; व ग्रहांपैकीं रवि व चंद्र यांचा नेत्रांबरोब

संबंध आहे, राशिचक्रामधील सिंह व कुंभ राशींचा दृष्टीबरोबर विशेष संबंध असलेला पाहण्यास मिळतो. येथें चंद्र केन्द्रामध्यें मंगळानें पीडित असून सिंह व कुंभ राशीमध्यें पापग्रह आहेत. व्ययस्थानामध्यें पापग्रह धनाधिपति शुक्र पीडित व रवि हर्शलनें दूषित असे योग झाल्याकारणानें हा मनुष्य जन्मान्ध झाला असावा.

बुधाचे राशीचें लग्न उदय पावत असून चंद्रही बुधाचे राशीमध्यें आहे. लग्नाधिपति बुध पंचमांत, बौधिक स्थानामध्यें गुरु, नवमेश शुक्र पंचमांत, शुक्र, शनि व चंद्र हे शास्त्रीय राशीमध्यें; शनि, चंद्र शुभसंबंधित व बुध, गुरु शुभसंबंधित असल्यामुळें या माणसाची बुद्धिमत्ता उत्तम असून शेखर मनोरमा महाभाष्यापर्यंत अध्ययन झालें आहे.

लग्नीं वंध्या राशि उदय पावत आहे; चंद्रही वंध्या राशीमध्यें आहे. स्त्रीसुखाचे कारक शुक्र व चंद्र हेही पीडित आहेत. सप्तमेश गुरु शनीनें पीडित असून सप्तमांत पापग्रह त्यामुळें विवाह झाला नाहीं.

लग्नीं निर्बली राशि उदय पावत असून रवि चंद्र पीडित असल्यामुळें शरीर दुर्बल व रोगयुक्त.

रवि मकर या चर राशीमध्यें चंद्र मिथुन या द्विस्वभाव राशीमध्यें, चंद्रमंगळ केन्द्रयोग; लग्नमंगळ प्रतियोग असल्यामुळें स्वभाव मानी, महत्वाकांक्षी, हट्टी, चंचल, वादाची आवड बाळगणारा कलहप्रिय, रागीट व धीट असून त्याचमुळें शत्रुत्व पुष्कळ होईल. ]

संपादक—

---



# प्रसिद्ध ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांचा संग्रह.

## ( १ ) मि. ॲलन लिओ.

डिसेंबर महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध केल्याप्रमाणें प्रसिद्ध ज्योतिर्विदांच्या कुंडल्या त्रोटक वर्णनासह देण्याचा उपक्रम चालू अंकापासून करीत आहों. "ज्योतिर्विदे" संबंधानें दोन लहानशा लेखांत जे नियम सांगितले त्यांची सत्यता ह्या कुंडल्यांवरून पटण्यास मुळींच कठीण जाणार नाहीं. ॲलन लिओनें फलज्योतिष शास्त्राचा सार्वत्रिक प्रसार करण्यांत सर्व जगांतील ज्योतिर्विदांत अग्रस्थान पटकाविलें होतें तेव्हां त्याच्याच कुंडलीचा विचार प्रथम करीत आहों. ॲलन लिओच्या जन्मकाळीं सिंह राशीचा २८ वा अंश पूर्व केंद्रावर उदय पावत असून उदित अंशाबरोबरच शनि संलग्न झाला आहे. पूर्व केंद्रावर नुकताच बुध ग्रह उदय पावला असून त्याच्या बरोबर नवमस्थ चंद्र त्रिकोण योग करीत होता. सिंह राशीचें लग्न व रविसुद्धां सिंह राशींत असल्यामुळें मि. लिओची शरीरप्रकृति निकोप व सुदृढ, स्वभाव गंभीर, धीरोदात्त आणि निर्भय होता; अग्नि राशींतील रवि-चंद्रांमुळें काम करण्याची धमक वाखाणण्यासारखी होती. लग्नांतील शनीमुळें चिकाटीनें सतत श्रम करण्याचा गुण त्याच्या अंगीं विशेष होता. जगांतील ज्योतिर्विदांच्या समाजांत त्याला जें महत्व प्राप्त झालें होतें तें ह्या वरील गुणांमुळेंच होय. मि. लिओचा जन्म अगदीं गरीब कुळांत झाला होता परंतु दीर्घ श्रमानें त्यानें आपली स्थिति सुधारून घेतली. रवि-गुरूंची बादशाही राशींतील युति व या युतीबरोबर भाग्यभुवनांतील चंद्राचा त्रिकोण योग हे दोन योग भाग्याचे द्योतक आहेत. रवि-गुरूंची युति व्ययस्थानांत झाली असल्यामुळें तिचें कमी झालेलें महत्व भाग्यभुवनांतील चंद्राच्या त्रिकोण योगानें पुष्कळ अंशानें भरून आलें आहे. रवीकडे तन्वाधिपत्य असून कर्तृत्ववान राशींत शुभ योग झाला असल्यामुळें लिओचा भाग्यारंभ केवळ स्वतःच्या कर्तबगारी-


वर झाला व चंद्र **प्रथम** रवीबरोबर शुभ योग करण्यास **जात** आहे. ह्या योगानें त्याच्या लग्नसंबंधामुळें त्याची सांपत्तिक स्थिति फारच चांगल्या स्वरूपाला आली.

दशमांतील हर्शलमुळें लिओनें ज्योतिषाचा धंदा करण्यापूर्वी इतर बरेच धंदे केले होते पण त्यांमध्यें त्याला म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. अखेरीस त्याच्या दशमस्थ हर्शलनें ज्योतिषशास्त्राकडे वळविलें. लिओच्या कुंडलींत ज्योतिर्विदांचे योग झाले आहेत ते असे:—(१) हर्शल—चंद्र द्विराश्यंतर योग, (२) बुध—हर्शल द्विराश्यंतर योग आणि (३) दशम केंद्रीं मिथुन राशीचा हर्शल. या महत्वाच्या योगानें लिओस ज्योतिषशास्त्राची आवड फार लवकर म्हणजे विसाव्या वर्षापूर्वीच उत्पन्न झाली. सन १८८१ नंतर तो फिरत्या एजंटाचा धंदा करीत असतां इंग्लंडांतील तत्कालीन ज्योतिषशास्त्राच्या विद्यार्थ्यांबरोबर त्याचा परिचय घडला व ज्योतिष शास्त्राध्ययनास जोरानें सुरवात झाली व त्याचें पर्यवसान १८९० सालीं एक मासिक काढण्यात झालें. मासिकाचें नांव "Astrologers' Magazine" असें होतें. लिओ या मासिकाचा दुय्यम संपादक होता. पुढें पांच वर्षांनें या मासिकाच्या मुख्य संपादकानें राजिनामा दिला व मासिक पुढें चालविण्याची जबाबदारी लिओनें आपल्या अंगावर घेतली. मासिकाचें पूर्वीचें नांव बदलून "Modern Astrology" या नूतन नांवानें लिओनें मासिक पुढें चालविलें. या वेळीं लिओच्या कुंडलींत अत्यंत महत्वाचा योग घडून येत होता. त्याच्या कुंडलींत रवि-गुरूंची युति आहे व गुरु रवीच्या पाठीमागें सुमारें सात अंश आहे तो त्याच्या ३० व्या वर्षाच्या सुमारास म्हणजे १८९० मध्यें मूळच्या रविबरोबर युतियोग करीत होता. गुरूची गति अतिशय अल्प असल्यामुळें चलित गुरु व मूळ रवि यांचा युतियोग अनेक वर्षेपर्यंत चालणार होता. हा योग सुरू झाला आणि लिओ मासिकाचा संपादक झाला. इतक्या महत्वाच्या योगावर त्यानें ज्या कार्यास सुरवात केली तें कार्य त्यानें आमरणांत चाल-



विलें होतें. त्यानें २७ वर्षें आपलें मासिक उत्कृष्ट रीतीनें चालविलें. ज्योतिषशास्त्राला वाहिलेलें इतकें अव्याहत व दीर्घकाल टिकलेलें उच्च दर्जाचें मासिक आंग्ल भाषेंत तर काय पण जगाच्या कोणत्याही भाषेंत नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे. लिओचें हें मासिक त्याच्या पाठीमागेंही पूर्ववत् चालू रहाण्याची योग्य व्यवस्था झाली आहे. एखादें मासिक दीर्घकाळपर्यंत टिकणें यामध्यें कांहीं विशेष नाहीं परंतु ज्योतिषशास्त्राची २५ वर्षांपूर्वीची स्थिति व आतांची स्थिति यामध्यें जें महदंतर पडलें आहे आणि असें होण्यास ज्या

**सा. ल.**



मासिकानें सर्वस्वी पुढाकार घेतला होता त्याची किंमत विशेष आहे. वर नमूद केलेले बुध, चंद्र व हर्शल यांच्या योगानें ज्योतिषवाङ्मयामध्यें लिओच्या हातून कार्य घडण्याचा योग आला व या योगांच्या जोडीस रवि, चंद्र व गुरु यांच्या शुभ योगानें त्या लिओला यश आलें. लिओनें स्वतः पुरीं सत्तावीस वर्षें उत्कृष्ट रीतीनें मासिक चालविलें, सात मोठमोठाले ग्रंथ, शेंसवाशें पानांचीं पंधराच्या वर पुस्तकें लिहिलीं, ज्योतिर्विदांची संस्था काढिली आणि ज्योतिष वाङ्मयाचें संशोधन पुढें चालू रहाण्यासाठीं एक संघ तयार केला. ज्योतिष वाङ्मयाच्या क्षेत्रांत इतकें कार्य करणारा ज्योतिषी हल्लीं तरी खास नाहीं. ( १ ) बुध—चंद्रांचा त्रिकोण योग ( २ ) चंद्र हर्शल तृतीय—एकादश योग ( ३ ) बुध हर्शल तृतीय—एकादश योग ( ४ ) रवि चंद्र त्रिकोण योग, ( ५ ) रवि गुरूंचा युति योग व ( ६ ) गुरु—चंद्रांचा नवम पंचम इतके महत्वाचे योग लिओच्या कुंडलींत झाले होते तेव्हांच त्याच्या हातून वर सांगितल्याप्रमाणें चिरस्थायी कार्य झालें.

लिओच्या कुंडलींत यशकारक योग होऊन ते ज्योतिष वा मयाच्या क्षेत्रांत फलद्रूप झाले याचें कारण राजसुवनांतील शास्त्रीय राशींतील हर्शल ग्रह बुध—चंद्रांच्या शुभ दृष्टींत आहे हें स्पष्टच आहे.

लिओच्या कुंडलींत उदित अंशाच्या युतींतच शनि आहे. ह्या शनीच्या धर्माप्रमाणें वयाचीं तीस वर्षेंपर्यंत कोठेंच ठाम बसला नाहीं. शनीचें एक भ्रमण पुरें झाल्यावर त्याच्या आयुष्यांतील मुख्य कार्यास आरंभ झाला व ३६ व्या वर्षीं भाग्योदयास सुरुवात झाली हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. लिओच्या कुंडलींत प्रबळ अशा शुभ योगांचें दिग्दर्शन वर केलें आहे त्याबरोबर चंद्र—मंगळ केंद्रयोग, शुक्र—चंद्र केंद्रयोग व शुक्र मंगळ प्रतियोग ह्या तीन अशुभ योगांचींही फलें लक्ष्यांत घेण्यासारखीं आहेत. पंचमांत वक्री



मंगळ असून दोन ग्रहांबरोबर अशुभ दृष्टियोग करीत आहे, त्याचप्रमाणें लाभस्थानांतील ग्रहसुद्धां पीडितच आहे व पंचमेश शनि निर्बळी आहे म्हणून लिओला संतति झालीच नाहीं. नवम स्थानांतील चंद्र शुक्र—मंगळांनीं पीडित आहे यामुळें कोर्टांत जाण्याचे प्रसंग आले, दिनवर्ष पद्धतीनें ज्या वेळीं शुभदृष्टि योग चालले होते तेव्हां लिओला कोर्टांतील कज्यांमध्यें यश आलें. व शेवटीं म्हणजे रवि—शनींच्या अर्धकेंद्र योगासारखे योग चालू असून त्याचा आत्मकारक रवि व्ययस्थानांत शनि व हर्शल याच्याकडून पीडित असतां "Vagrant" Act भविष्य वर्तवून पैसे घेतल्याच्या आरोपावरून लिओला २५ पौंड दंड झाला. या खटल्याच्या वेळीं फल ज्योतिषासंबंधानें इंग्लंडांतील जनसमूहाचें मत पुष्कळसें अनुकूल होत चालल्याचें दिसून आलें. ज्याच्या समोर ही शेवटची फिर्याद चाललेली होती त्या लंडनच्या मेयर साहेबांनीं स्पष्ट कबूल केलें कीं "फल ज्योतिष हें इतर शास्त्रांप्रमाणेंच अनुभवसिद्ध शास्त्र आहे पण कायद्याच्या दृष्टीनें भविष्य वर्तवून पैसे घेतल्यामुळें गुन्हा घडला आहे" लिओच्या विरुद्ध हा दुसरा खटला होता. या पूर्वीं एक खटला झाला होता पण त्यामध्यें तो निर्दोषी ठरला. इंग्लंडातील सध्यांच्या कायद्यामुळें अशी स्थिति झाली आहे कीं भविष्य करण्याबद्दल पैसे घेतले तर शिक्षा होते पण कुंडलीचें गणित करण्याबद्दल कितीही पैसे घेतले तरी तो गुन्हा होत नाहीं.

नवम स्थानांतील चंद्रामुळ लिओस दूर देशांतील प्रवासही घडला. तो ज्योतिष शास्त्राच्या माहेरघरीं—भरतखंडांत आला होता. मुंबई येथें त्याचा मुक्काम असतां येथील ज्योतिर्विदमंडळांतील कांहीं मंडळी त्याच्या भेटीस गेली होती. या भेटीच्या वेळीं हल्लींचे मंडळाचे—अध्यक्ष यांनीं लिओच्या चेहेऱ्यावर तनुस्थानीं शनि आहे हें सांगून त्यास चकित केल्याचें "मंडळाच्या"

सभासदांच्या लक्ष्यांत चांगलें राहिलें असेल. लिओच्या कुंडलींत १९१७ सालांत अनिष्ट योग चालले होते त्यांमध्यें चलित रवि मूळ उदित अंश व शनि यांबरोबर अर्धकेंद्र योग करीत होता व शनि नेपच्युनची युति मूळच्या रवीजवळच होत होती. परिभ्रमणकाळचे रविशनि युतींत होते. मूळचा शनि वाईट राशींत असल्यामुळें व रवीपासून फक्त १३ अंशांच्या अंतरावर आहे म्हणून रवि–शनींच्या अर्ध केंद्रयोगावर मृत्यु झाला. मृत्युकाळीं भाग्यस्थानचें वर्ष हीतें. *मृत्युकाळीं तूळ लग्न उदय पावत असून शुक्र–बुध लग्नांत होते व दोन्ही ग्रहांबरोबर चंद्र, गुरु, शनि व नेपच्यून यांचे शुभ दृष्टियोग असून कोणत्या ग्रहामुळें ते बिघडले नव्हते. मरणानंतर कीर्तिरूपें उरणाऱ्या व्यक्तींच्या मरणसमयीं ग्रहस्थिति अशीच असावयास नको काय?

* ३०–८–१९१७ रोजीं सकाळीं १० वाजतां कॉर्नवाल कौंटींतील ब्युड येथें.



॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्याप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ३ रें. } मार्च १९१८. { अंक १२ वा.

## वार्षिक समारोप.

चालू वर्षाचा हा शेवटला अंक असून तो वाचकांच्या स्वाधीन करून आम्हीं आमच्या चालू वर्षाचे वार्षिक ऋणामधून मोकळे होणार आहोंत. गेल्या तीन वर्षांचे अवधीमध्यें मालेच्या हातून कोणत्या प्रकारें ज्योतिषशास्त्र-सेवा घडली आहे ती मालेच्या वाचकवर्गास माहित आहे. गेल्या तीन वर्षांमध्यें कुंडल्यांचें चारित्र्यवर्णन, अनेक उपयुक्त निबंध, निरनिराळ्या लेखकांचे फलज्योतिषासंबंधानें विविध लेख प्रसिद्ध केले आहेत. प्रसंगोपात भावी परिस्थितीचेंही वर्णन केलें असून पाश्चिमात्य व आर्यज्योतिषशास्त्राचा ठिकठिकाणीं तुलनात्मक विचारही केलेला आहे. देशकालमानानुरोधानें ज्योतिषशास्त्राच्या मूळ तत्वास धरून निरनिराळ्या नवीन योगांचा कसा विचार करावा लागतो याचेंही यथामति दिग्दर्शन केलें आहे.

चालू सालांतील नवीन विषयांसंबंधानें पाहतां रा. **राम नारायण** यांचे **बालस्मृति** व **ज्योतिर्विद्या** हे लेख पूर्वीप्रमाणेंच सर्वांगसुंदर आहेत. रा. **नारायण सदाशिव मराठे** यांचा **ग्रहविचार** हा अगदींच नवीन अशा धरतीवर आहे. राशिस्थानपरत्वें ग्रहांचीं फळें अद्याप कोणत्याच ग्रंथांत आलेलीं नाहींत. हें काम किती जीकीरीचें व नाजूक आहे याची कल्पनाच करावी लागते. प्रत्येक ग्रहाचे बारा राशि व बारा स्थानें याप्रमाणें १४४ भेद होतात व ह्याप्रमाणें फक्त रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र व शनि ह्या सात ग्रहांचें विवेचन करण्यास ९०८ प्रकारची कल्पना करावी लागते. हा विषय एकदम पुरा होईल असें वाटत नाहीं करितां याची थोडीं थोडीं पानें देऊन तो सवडीनें पूर्ण करण्यांत येईल. त्याचप्रमाणें याविषयासंबंधानें वाचकवर्गांनीं आपला अनुभव कळविल्यास तोही देण्याचा विचार आहे. भविष्यकालनिर्णय पद्धतीसंबंधानें चालू वर्षांत गोचर ग्रहासंबंधानें सविस्तर विवेचन केलें आहे; ह्या लेखांतील बराच भाग अनुभवजन्य असून इतरत्र प्रसिद्ध न झालेली अशी माहिती या लेखांत पुष्कळ आहे. पुढील वर्षी या विभागासंबंधानें जास्त विचार करण्याचा आमचा विचार चालू आहे. कै. रा. रा. जीवन त्रिंबक चिटणीस यांचे **परिभ्रमण पद्धती**संबंधानें लिहिण्याबद्दल अनेकांकडून सूचना आल्या असल्याकारणानें या पद्धतीसंबंधानें सविस्तर विवेचन करण्याचें योजिलें आहे. हा लेख लिहीत असतां कै. रा. रा. चिटणीस यांचे परिभ्रमणपद्धतीसंबंधाचे प्रसिद्ध व अप्रसिद्ध लेख या लेखासोबत देणार आहोत.

चालू सालीं राष्ट्रीय आपत्तीमुळें व एकंदर महर्गतेमुळें आम्हांस कोणताच नवीन ग्रंथ प्रकाशित करून वाचकांस देतां आला नाहीं. परंतु या बाबतीमध्यें निराश होण्याचें कारण वाटत नाहीं. मिथुन राशीमधून सुरगुरूचें भ्रमण होत असतां व तो ज्या वेळीं हर्शलबरोबर नवम पंचमयोग करील त्याचे सुमारास ज्योतिषशास्त्राची प्रगती चांगली होऊन फारच उपयुक्त असे ग्रंथ निर्माण होतील असें आम्हांस वाटत होतें व तें त्याचप्रमाणें आज पुष्कळ अंशानें खरें झालें आहे. कुंडलीविज्ञानकारांचे बंधु दत्तात्रय गोपाळ नवाथे



व रा. नारायण सदाशिव मराठे यांचे दीर्घ प्रयत्नानें **योगमाला** जगांत अवतीर्ण झाली आहे व तिच्याच द्वारानें पुन्हा सर्व वाचकांस कुंडलीविज्ञानाच्या विद्वान संपादकाच्या ज्ञानाचा लाभ मिळणार आहे. **योगमालेची** आतांपर्यंत तीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत व तीं एकापेक्षां एक सरस अशींच झालेलीं आहेत योगमालेची भावी सुस्थिति वर्गणीदारांवरच अवलंबून राहणार असल्याकारणानें मालेचे वाचक शक्य ती मदत करतील अशी आम्हांस खात्री वाटते.

आमच्या अनेक मित्रांकडून व **मालेच्या** आश्रयदात्यांकडून परिस्थितीस न डगमगतां मासिक चालू ठेवण्याबद्दल जीं प्रोत्साहनपर पत्रें आलीं आहेत त्या सर्वांचे आम्हीं अत्यंत आभारी आहोंत. पुढील वर्षांत काय काय करणार आहों याचें थोडेसें दिग्दर्शन केलेंच आहे. चालू वर्षामध्यें ज्या आश्रयदात्यांमुळें, स्नेहीमंडळीमुळें व लेखकांमुळें ज्योतिषशास्त्रसेवा करण्याचा सुयोग प्राप्त झाला त्या सर्वांचे आम्हीं अत्यंत आभारी आहोंत. शेवटीं **दिव्यशक्ती**मुळें आम्हांस एकंदर चालू वर्षाचें काम निर्विघ्नपणें पार पाडतां आलें तीस अनन्यभावें शरण जाऊन हा तृतीय वार्षिक समारोप आटपता घेतों.

संपादक.

**एप्रिल** सन १९१८ पासून मालेच्या चवथ्या वर्षास आरंभ होईल. पुढील वर्षी ज्यांना वर्गणीदार राहण्याचें नसेल त्यांनीं मार्च अखेरपर्यंत आम्हांस पत्रद्वारें कळवावें. पुष्कळ लोक आगाऊ न कळवितां व्ही. पी. चे अंक परत करून **मालेचें** विनाकारण नुकसान करितात. कित्येक व्ही. पी. येईपर्यंत येणारे अंक मुकाट्यानें घेऊन व्ही. पी. आलेली परत करितात. असें करणें नीतिदृष्ट्या योग्य आहे किंवा काय याचा विचार मालेच्या सुहृद वाचकांनींच करावा. ज्यांना अनपेक्षित अडचणीमुळें किंवा इतर कोणत्याही कारणानें पुढील सालाकरितां मासिक चालू ठेवणें नसेल त्यांनीं तसें आम्हांस **आगाऊ कळविलें असतां आम्हीं त्यांचे अत्यंत आभारी होऊं.**

हल्लींच्या बिकट परिस्थितीमध्यें प्रत्येक व्ही. पी. पाठीमागें होत असलेलें सवा आण्याचें नुकसान विनाकारण मालेच्या भांडवलास फारच जड जात आहे. करितां मालेचे आश्रयदाते व मित्रवर्ग या आमच्या विनंतीकडे लक्ष देतील काय ? ज्यांचेकडून पत्रद्वारें कळणार नाहीं ते पुढील सालीं वर्गणीदार होण्यास कबूल आहेत असें समजून रीतीप्रमाणें त्यांचेकडे पहिला अंक रु. १-९-० आण्यांच्या व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल. ज्यांना ज्यांना आगाऊ वर्गणी मनीआरडरनें पाठविणें शक्य असेल त्यांनीं ती ता. १५ एप्रिलचे आंत पाठविली असतां व्ही. पी. करण्यांत विलंब वांचून आमच्या कामामध्यें बरीच मदत होईल करितां याही गोष्टीकडे आमच्या आश्रयदात्यांनीं लक्ष द्यावें अशी त्यांस आमची नम्र विनंति आहे. ज्यांना कांहीं कारणामुळें एप्रिलमध्यें व्ही. पी. चा स्वीकार करितां येणार नाहीं त्यांनीं तसें कळविलें असतां त्यांचेकडे अंक चालू ठेऊन पुढें त्यांचे सूचनेप्रमाणें व्ही. पी. पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.

**मालेचे** अंक नियमित वेळीं-प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्यें प्रसिद्ध करून वर्गणीदारांकडे वेळच्या वेळीं पाठविण्याबद्दल शक्य तेवढा प्रयत्न करीत आहोंत. परंतु चालू वर्षांत संपादकास अनपेक्षित रीतीनें सरकारी नोकरीमुळें फिरतीवर जाण्याचा प्रसंग आल्याकारणानें सप्टेंबरपासून मालेचे अंक नियमित वेळीं प्रसिद्ध करितां आले नाहींत. नोकरी संभाळून फावल्या वेळीं मालेचें काम करावयाचें असतें त्यामुळें किती अडचणी येत असतात याची कल्पना वाचकांनींच करावी. मालेचा प्रत्येक अंक शक्य तेवढी काळजी घेऊन वर्गणीदारांकडे रवाना करण्याचें काम आम्हीं फारच काळजीपूर्वक करीत आहोंत परंतु दर महिन्यास बरेच अंक पोष्टांत गहाळ म्हणण्यापेक्षां चोरीस जात आहेत. अंक गहाळ होण्याचें काम बरेंच अंगवळणी पडलेलें आहे परंतु अलिकडे नाटपेड पाठविलेलीं बुकपोष्टेंही गहाळ होऊं लागलीं आहेत. पोष्टखातें या गोष्टीकडे लक्ष देईल तेव्हां खरें. परंतु असेंच तेथपर्यंत चालणार आहे करितां एखाद्या वर्गणीदारास वेळेवर अंक न मिळाल्यास चारपांच



दिवस वाट पाहून आम्हांस पत्र लिहावें म्हणजे अंक पुनः पाठविण्याची व्यवस्था केली जाईल. प्रत्येक वर्गणीदाराला मालेचा अंक अगदीं पहिल्या तारखेस मिळावा अशी आमची इच्छा आहे. व त्याप्रमाणें आमचे प्रयत्न चालू आहेत. पुष्कळ वर्गणीदार आपले बदललेले पत्ते कळवीत नाहींत व त्यामुळें कित्येकांस अंक वेळेवर मिळत नसतील. करितां वर्गणीदारांनीं पत्ता बदलला असतां आम्हांस व पोष्टास ताबडतोब कळविण्याची कृपा करावी. पत्रव्यवहार करते वेळीं आपलें नांव, पत्ता व रजिष्टर नंबर सुवाच्य कळविण्याबद्दल आमची त्यांस नम्र सूचना आहे. त्याचप्रमाणें सर्व पत्रव्यवहार प्रीपेड असून उत्तराकरितां अर्ध्या आण्याचें पोष्टाचें तिकीट असावें. तिकीटाच्या अभावीं उत्तर देण्यांत येणार नाहीं. सर्व प्रकारचा पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

**म्यानेजर-ज्योतिर्माला ऑफिस, दादर, मुंबई नं. १४.**


## प्रसिद्ध ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांचा संग्रह.

### ( २ ) कै. जीवनराव त्रिंबक चिटणीस.

निरयण गणना अशास्त्र व वैदिक अभिप्रायास सोडून असल्यामुळें सायन गणना प्रचारांत यावी म्हणून कै. लेले यांनीं प्रथम प्रयत्न केला. ते सायनमानाचे प्रवर्तक होते. त्याचप्रमाणें निरयण गणना फलितास निरुपयोगी असून सायनगणनाच घेतली पाहिजे हें तत्व कै. चिटणीस यांनीं सप्रमाण महाराष्ट्रीयांच्या निदर्शनास आणून दिलें. सायन **फलज्योतिष्यांचे** ते आद्यप्रवर्तक होते. कै. लेल्यांनीं साधारणपणें सन १८७२ मध्यें उघडपणें वर्तमानपत्रद्वारा चर्चा करण्यास सुरवात केली. त्यानंतर सुमारें वीस वर्षांनीं कै. चिटणीसांनीं फलितांत सायन गणनाच घेतली पाहिजे हें तत्व निदर्शनास आणण्याचा पहिला प्रयत्न केला. स. १८९१-९२ या वर्षी सायनासंबंधीं इंदुप्रकाशांत त्यांनीं लेख लिहून फलितांत सायनमानच अनुभवास येतें ही गोष्ट सिद्ध केली. या गोष्टीस आज पंचवीस वर्षें होऊन गेलीं. ह्या पंचवीस

वर्षांत "सायनांशखचरैः फलनिर्णयः" हा सिद्धांत ह्या महाराष्ट्रभूमींत दृढमूल झाला आहे. हें कार्य घडण्यास विशेषेंकरून कै. चिटणीस व कुंडली-विज्ञानकार ह्या दोन व्यक्ति कारणीभूत झाल्या आहेत. त्यांपैकीं आज कै. चिटणीसांच्या कुंडलीचा विचार करण्याचें योजिलें आहे.

**सा. ल.**




कै. चिटणीस यांच्या जन्मकालीं पूर्वक्षितिजावर कर्कराशीचा १९ वा अंश उदय पावत होता. लग्नाधिपति चंद्र शास्त्रीय राशींत परंतु मृत्युस्थानांत आहे. लग्नीं उच्च गुरु आहे. कुंडलींत लग्नेश शनि-मंगळांसारख्या खलग्रहांनीं बिघडला असून अष्टमांत आहे आणि त्याच्या जोडीला रवीही बिघडला



आहे. शनिमंगळ एकाच वेळीं रवि-चंद्रांना धन व अष्टम स्थानांतून दूषित करीत आहेत. हा योग अल्पायुष्याचा द्योतक आहे. पण उच्च गुरु लग्नांत असल्यामुळेंच हा अल्पायुष्याचा योग टळला. लग्नांतील गुरु भाग्येश आहे हेंही लक्ष्यांत घेतलें पाहिजे.

प्रस्तुत कुंडलींत स्वगृहींचा रवि, शनिमंगळांच्या युतींत धनस्थानांत आहे. रवीला राशिबल उत्तम आहे परंतु शनिमंगळांमुळें ह्या बलास वैगुण्य आलें आहे. रवि शनींची युति अत्यंत अपयशी असते हें सर्वविश्रुतच आहे. या युतियोगाच्या जोडीला मंगळ व केतु हेही धनस्थानांत आहेत. या दरिद्रयोगामुळें सरदार कुळांत जन्मास येऊन कै. जीवनरावांचें आयुष्य सांपत्तिक दृष्ट्या असमाधानकारक गेलें. त्यांचा जन्म इतिहासप्रसिद्ध बाळाजी आवजी चिटणीस यांच्या कुळांत झाला होता व त्यांचे वडील सरदार होते. परंतु रवि-शनि-मंगळांच्या धनस्थानांतील योगानें पूर्वार्जित संपत्तीचा त्यांना कांहीं एक लाभ झाला नाहीं. सिंह राशींत रवि, भाग्याधिपति गुरु बलवान व दशमेश मंगळ बादशाही राशींत आहे. हा योग त्यांच्या मोठ्या घराण्याचा द्योतक आहे असें वाटतें. या योगांस सिंह राशींतील शनीनें दूषित केल्यामुळें तो फुकट गेला आहे. जप्त झालेलीं वतनें व सरदारी परत मिळविण्याचे खटपटींत असतां त्यांचा शेवट झाला ! सारावलीकारानें रवि, शनि, मंगळ व शुक्र यांच्या योगाचें फल दिलें आहे तें असें:—

"सूर्य-कुज-शुक्रसौरैः पराभवं सर्वतो याति ।"

वर दिलेले योग अनेक प्रकारांनीं अनिष्ट आहेत याविषयीं मतभेद होण्याचें कारण नाहीं. धनस्थानांतील शत्रुगृहींचा शनि धनेशाला दूषित करीत आहे तेव्हां धनप्राप्तीचा योग मुळांतच आंखडला, त्यामध्यें मंगळाचें वास्तव्यही धनस्थानांतच. आधीं प्राप्ति कमी त्यांत खर्चाचें मान वाढलेलें. याची तोंड-मिळविणी कशी झाली असेल याची कल्पनाच केली पाहिजे. रवि, शनि व मंगळ हे ज्या ज्या स्थानांचे अधिपति आहेत त्या त्या स्थानांसंबंधानें सौख्य मिळणें असंभवनीय होतें व अनुभवही तंतोतंत तसाच आला. पूर्वार्जित

धनाचा नाश झाला होता, स्वतःला दरमहा तीस पसतीस रुपयांपेक्षां जास्त प्राप्ति झाली नाहीं, कुटुंबस्थानांतील हा योग म्हणून कुटुंबसौख्यही बेताचेंच. पहिली स्त्री १८।१९ व्या वर्षी वारली, दुसरें लग्न पुढें सहा वर्षांनीं झालें. पंचमेश मंगळ कुटुंबस्थानीं आहे म्हणून चार मुलें झालीं. त्यांपैकीं २ बालपणींच वारलीं. पंचमेश, शनीच्या युतींत असल्यामुळें पुत्रसंतान झालें नाहीं. पंचमावरून शिष्यांचाही विचार होतो. कै. जीवनरावांकडे ज्योतिषशास्त्र शिकण्याकरितां पंचमावरील प्रसव राशीस अनुसरून शेंकडों शिष्य आले परंतु त्यांपैकीं शेंकडा ९९ वृश्चिक राशीप्रमाणें केवळ स्वार्थी व आपमतलबीच ठरले. मंगळाकडे दशमेशत्व आलेलें आहे. त्यामुळें नोकरीमध्येंही मोठ्या बढतीची प्राप्ति कधींच झाली नाहीं. त्यांचें उपरी अधिकाऱ्यांशीं कधींच पटत नसे. इतक्या प्रकारांनीं रवि, शनि व मंगळ यांचा योग फलद्रूप झाला. कै. जीवनरावांच्या चरित्राचा हा एक गौण भाग होता.

प्रस्तुत कुंडलींत वर नमूद केलेला योग जसा ठळक आहे तसाच दुसराही एक ठळक योग आहे. मात्र हा योग शुभ आहे. तनुस्थानीं नवमेश गुरु उच्च, तृतीयेष बुध तृतीयांत व या दोन्ही ग्रहांचा परस्परांमध्यें द्विराश्यंतर शुभयोग झाला आहे. हा बुद्धिमत्तादर्शक अप्रतीम योग होय. कुंडलींत बुध-गुरु उच्च असून बौद्धिक स्थानांत, चंद्र-हर्शल शास्त्रीय राशींत, गुरूच्या नवमांत नेपच्युन आणि लाभभुवनांतील शास्त्रीय राशीच्या हर्शलबरोबर शुक्र द्विराश्यंतर योग करीत आहे. हें योगचतुष्टय कै. जीवनरावांच्या सर्व आयुष्यांतील महत्वाच्या कामगिरीचें द्योतक आहे. चंद्र-हर्शल व गुरु-नेपच्युन यांचे योग अंशात्मक नाहींत. चंद्र-हर्शलांचा नवपंचम योग ज्योतिशास्त्राची आवड दर्शविणारा आहे. त्याचप्रमाणें शुक्र-हर्शलांचा शुभयोग ज्योतिर्विद्येचा कारक आहे. प्रस्तुत कुंडलींत चद्र-हर्शलांचा योग अंशात्मक नाहीं पण हर्शल-शुक्रांचा योग तंतोतंत आहे. ह्या योगांमुळें ज्योतिर्विद्येंत असामान्य प्राविण्य प्राप्त झालें. बुध-गुरूंच्या शुभयोगानें प्राप्त झालेली उत्तम बुद्धिमत्ता व हर्शल-शुक्रांच्या योगानें येणारें ज्योतिषशास्त्रांतील वैशारद्य यांचा एके



ठिकाणीं झालेला योग अपूर्व आहे. कै. जीवनरावांचें नांव त्यांच्या पाठीमागें राहिलें आहे व पुढें राहील याचें कारण वरील योग होत.

कै. चिटणीसांनीं ज्योतिषशास्त्राचें अध्ययन करण्यास केव्हांपासुन आरंभ केला हें कळलें नाहीं पण हर्शलच्या तृतीय स्थानांतील भ्रमणावर म्हणजे २१ व्या वर्षाच्या सुमारास आरंभ केला असेल असें अनुमान आहे. प्रथम ते निरयणवादी होते. त्या वेळीं सायनमान प्रवर्तकाची गर्जना दुमदुमत होती. जरी त्या गर्जनेनें अज्ञानांत घोरत असलेला समाज जागृत झाला नाहीं तरी पण तिनें चिटणीसासारख्यांना खऱ्या मार्गावर आणिलें. चिटणीस तत्कालीन सायन निरयण वादामुळेंच सायनवादी झाले असें दिसतें. ते सायनवादी झाल्यावरच त्यांच्या आयुष्यांतील खऱ्या कार्यास आरंभ झाला. त्यांनीं ज्योतिषशास्त्रांत जी प्रगति केली ती यानंतरच.

सन १८९० च्या सुमारास त्यांनीं **परिभ्रमण पद्धतीवर** अत्यंत परिश्रम करून ती लोकांच्या पुढें मांडण्यास सुरवात केली असें त्यांच्या पत्रव्यवहारावरून दिसतें व यापुढें एकदोन वर्षांनीं 'Astrologers' Magazine मध्यें ह्या पद्धतीसंबंधानें पुष्कळच चर्चा केली. या वेळच्या त्यांच्या लेखांनीं आंग्ल ज्योतिर्विदांमध्यें ते विशेष प्रसिद्ध झाले. परिभ्रमण पद्धति त्या वेळीं कोणताही ज्योतिषी उपयोगांत आणीत नव्हता. ही पद्धति ग्रहांच्या ज्या भ्रमणकाळावर बसविली आहे ते भ्रमणकाळ ज्योतिषशास्त्रज्ञांस माहिती होते एवढेंच नव्हे तर त्यांचा भविष्यकालनिर्णयास उपयोग होतो असें एका ज्योतिर्विदानें १८२० च्या सुमारास नमूद केल्याचें आढळतें. पण निव्वळ या भ्रमणकाळावरून दुसऱ्या कोणत्याही पद्धतीचा आधार घेतल्यावांचून विश्वसनीय भविष्यें करतां येतील अशी खात्री उपरिनिर्दिष्ट ज्योतिर्विदांसही नव्हती हें लक्ष्यांत ठेविण्यासारखें आहे. पुष्कळशा जुन्या ग्रंथांतुन ग्रहांचीं वर्षें दिलेलीं आढळतात. उदाहरणार्थ वराहमिहिरानें १९।२५।१५।१२।१५।२१।२० हीं इत्यादि ग्रहांचीं वर्षें दिलीं आहेत. अशींच वर्षें मेटननें दिलीं आहेत. वराहमिहिरानें दिलेलीं रवि व मंगळ यांचीं वर्षें मेटनच्या संख्येशीं जुळतात.

सारांश अशी जी ग्रहांना वर्षसंख्या दिली आहे त्यावरून भविष्य करण्याची पद्धति रा. चिटणीसांनीं मोठ्या कुशलतेनें बांधिली. ह्या पद्धतीचें विवेचन ज्योतिर्मालेच्या वाचकांकरतां लवकरच करणार आहों त्या वेळीं तिच्या गुण-दोषासंबंधानें लिहूं. प्रस्तुत ठिकाणीं इतकेंच नमूद करतों कीं स्वतः चिटणीसांनीं केवळ परिभ्रमण पद्धतीनेंच भविष्य करण्यामध्यें असामान्य सिद्धी मिळविली होती. परिभ्रमणकालीन ग्रहयोगांचें नक्की अनुमान करण्यांत त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या इतका बरोबर भविष्य वर्तविणारा ज्योतिषी सूक्ष्म गणिताधारें डायरेक्शन काढणाऱ्या आंग्लज्योतिषांमध्यें काय किंवा घटिका पळांपर्यंत दशा काढणाऱ्या आमच्या इकडील ज्योतिषांमध्यें काय त्या वेळीं तरी नव्हता ! कदाचित त्यांच्यापेक्षांही उत्तम भविष्य करणारे ज्योतिषी पुढें होतील किंवा मागें झाले असतील पण महत्वाची गोष्ट ही होती कीं चिटणीस ज्या पद्धतीनें भविष्य करीत ती पद्धति त्यांनीं स्वतः बसविली होती. परिभ्रमण पद्धतिरूपी इमारत त्यांनीं स्वतःच्या परिश्रमानें उभारली होती. ज्याप्रमाणें इमारतीस लागणाऱ्या पाषाणादि वस्तूंची निर्मिति आधींच झालेली असते त्याप्रमाणें परिभ्रमण पद्धतीला आवश्यक गोष्टींची तयारी पूर्वींच झालेली होती हें खरें परंतु कुशल कारागीर भेटल्याशिवाय नुसत्या सामुग्रीचा उपयोग काय ? कै. जीवनरावांसारखे कुशल कारागीर जन्मास येतात तेव्हांच एखादी उपयुक्त पद्धति जगांत येते. असो. परिभ्रमण पद्धतीची सिद्धता हें महत्वाचें कार्य चिटणीसांनीं केलें. हें कार्य करण्यास बुधगुरूंचा शुभ योग व शास्त्रीय राशींतील हर्शलबरोबर होणारा शुक्राचा द्विराश्यंतर योग व नवम भुवनांतील नेपच्युन कारणीभूत झाले. नवमस्थान हें शास्त्रीय शोधांचें स्थान आहे. प्रस्तुत कुंडलींत ह्या स्थानाचा अधिपति उच्च आहे व ह्या स्थानांत नेपच्युनसारखा गूढ शास्त्रांत प्राविण्य देणारा ग्रह आहे म्हणून चिटणीसांना ज्योतिषशास्त्रांत शोध लावतां आले. हे शोध किती निरनिराळ्या प्रकारचे होते हें पाहिलें असतां आश्चर्य वाटतें. मेदिनीय ज्योतिषांत त्यांची प्रगति अपूर्व होती, शरीरलक्षणांवरून कुंडली कशी मांडावी



हें त्यांनीं ठरविलें होतें व व्यापारांतील चढामोडी ज्योतिषशास्त्राधारें कशा सांगाव्या यासंबंधाचे नियम १८९२ सालीं एकदोन आंग्ल ज्योतिर्विदांना पाठविल्याची नोंद त्यांच्या पत्रव्यवहारांत केलेली आढळते.

ज्योतिषशास्त्रांत शोध लावून त्याचा उपयोग पैसे मिळविण्याकडे त्यांनीं कधींच केला नाहीं. जे जे शोध त्यांनीं लाविले ते ते शोध त्यांच्या जवळील विद्यार्थ्यांना ते सांगत असत. चिटणीसांच्या कुंडलींत जर मि. लिओसारखा बुधहर्शलाचा शुभ योग असता तर ज्योतिषशास्त्रांतील शोधावर त्यांना उत्तम ग्रंथ लिहून कीर्ति आणि पैसा मिळवितां आला असता परंतु त्यांच्या कुंडलींत पडला बुधहर्शलांचा केंद्रयोग आणि धनस्थानांतच झालेला दरिद्र-योग ! ह्या दोन्ही योगांनीं त्यांना जगांत पुढें आणिलें नाहीं.

रा. चिटणीस ज्योतिषशास्त्राच्या विचारांत नेहेमी गढलेले असत, असें असतां ते लोकांना ज्योतिषशास्त्र शिकविण्याबद्दल किंवा कुंडल्यांचा विचार करण्याबद्दल यत्किंचितही पैसा घेत नसत. कोणीही मनुष्यानें केव्हांही आपल्या कुंडलीवर मत घ्यावें व त्याबद्दल पैसे देऊं केले असतां सुद्धां चिटणीसांनीं घेऊं नयेत. ज्योतिषशास्त्राचा विक्रय करून त्यांनीं शास्त्राला कमीपणा कधींच आणला नाहीं आणि म्हणूनच त्यांना अमोघसिद्धि प्राप्त झाली होती किंवा काय नकळे ! अलीकडे या मुंबई शहरांत सट्टयाच्या व्यवहाराकडे पुष्कळ ज्योतिर्विदांचें लक्ष्य लागलें आहे. बारा बारा वर्षें ज्योतिषशास्त्राचें अध्ययन करून महालक्ष्मीच्या मैदानावर शास्त्राध्ययनाच्या तपाचें पुण्य सोडण्यास बरेच ज्योतिर्विद जात असतात त्यांनीं रा. चिटणीसांचें उदाहरण पुढें ठेवावें. ज्योतिर्विद्या मनुष्यांना दिव्य दृष्टी देणारी आहे. ह्या दिव्य दृष्टीचा उपयोग शर्यतीच्या घोड्यावर पैसे मिळविण्यासाठीं करणें म्हणजे दैवयोगानें कामधेनु प्राप्त झाली असतां तिला नांगराला जुंपण्यासारखें आहे. जाहिराती फडकविणारे स्वयंमन्य ज्योतिषी आणि रा. चिटणीस यांच्यामध्यें जें जमीन अस्मानाचें अंतर आहे तें वरील भावनेंत आहे असें आम्हांस वाटतें. स्वतः शोध लावून शास्त्रप्रसाराचें उच्चतम ध्येय त्यांच्यासमोर होतें

व ह्या ध्येयास अनुसरून त्यांनीं शक्य तितके प्रयत्न केले. त्यांचा पहिला प्रयत्न म्हणजे "मुंबई ज्योतिर्विद मंडळाची." स्थापना होय. हें मंडळ सन १८९२ च्या डिसेंबरांत शास्त्रसंशोधनाच्या उद्देशानें त्यांनीं स्थापन केलें पण थोडक्याच अवधींत सायन निरयण वादावरून मंडळाच्या सभासदांमध्यें फूट पडली व रा. चिटणीसांची संघशक्तीनें काम करण्याची इच्छा जागच्या-जागींच राहिली.* त्यानंतर चिटणीसांनीं ज्योतिषशास्त्राचे वर्ग काढून शास्त्रप्रसाराचें कार्य आरंभिलें व हें कार्य आमरणांत चाललें होतें. कै. जीवनरावासारख्या उत्साही मनुष्यांस नुसतें वर्ग काढून स्वस्थ रहाणें शक्य नव्हतें. "मंडळापासून" विशेष कार्य होण्यासारखें नाहीं असें पाहून शास्त्रप्रसाराच्या दुसऱ्या मार्गाकडे ते वळले. मासिकाच्या द्वारें विचारजागृति करण्याचें ठरवून १८९५ त "ज्योतिर्माला" सुरू केली. ज्योतिषशास्त्रासंबंधीं हें मासिक महाराष्ट्रांत पहिलेंच होतें. रा. चिटणीसांनीं पहिल्याच अंकांत आपलें ध्येय नमूद केलें होतें तें असें "पत्रिकेचें गणित सायनगणनेचें असून पंचांगें निरयण गणनेचीं आहेत, त्यामुळें मूळ पायाच चुकला आहे. पत्रिका सायन गणनेवरून केल्यास अनुभव जास्त येईल. ह्या मालेचा उद्देश, फलज्योतिषाचा शास्त्रीय रीतीनें उहापोह करून सत्यता दाखविण्याचा आहे म्हणून ह्यांत (मासिकांत) सायनगणनेचा स्वीकार केला आहे" ह्या उद्देशाप्रमाणें चिटणीस कार्य करण्यास उद्युक्त झाले पण त्यांच्या कुंडलींत रवि, शनि व मंगळांचा योग त्यांस यश कसें देणार ? मासिकाचा आरंभ पंचमांतील हर्शलवर झाला पण त्याच वेळेस हर्शल मूळच्या रवि, शनि, मंगळ व चंद्र यांच्या केंद्रांतून जात होता. ह्या अशुभ योगानें द्रव्याभावामुळें मासिक बंद झालें. केव्हां तरी आपण पुन्हां मासिक सुरू करूं अशी त्यांना उमेद होती परंतु त्यांच्या आयुष्यांत तसा योग आलाच नाहीं. मासिकाच्या पाठीमागून त्यांनीं "१८९६ सालचे सायन स्पष्टग्रह" व "ग्रहसाधन" हीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं.

* मुंबई ज्योतिर्विद मंडळाची हकीकत आक्टोबर महिन्याच्या अंकांत दिली आहे ती पहावी.



ह्या पुस्तकांच्या प्रकाशनापासून त्यांना कांहीं एक अर्थप्राप्ति झाली नाहीं. त्यांच्या विद्यार्थिवर्गानें प्रकाशनाच्या खर्चाची व्यवस्था लाविली नसती तर तोही भूर्दंड त्यांस पडला असता. ग्रहसाधनाचीं कोष्टकें तयार करण्यांत विशेष कल्पकता योजिली आहे. हें पुस्तक तयार करण्यांत कै. जीवनरावांना रा. बापुजी नारायण नवलकरांचें पुष्कळच सहाय होतें.

रा. चिटणीसांनीं ज्योतिषवाङ्मयाचा प्रसार करण्याचा शक्य तितका प्रयत्न करून पाहिला परंतु त्यांना यश आलें नाहीं. रवि, शनि, मंगळ व चंद्र यांचे दुर्धर अनिष्ट योगांचा हा परिणाम आहे. ज्योतिषशास्त्रांत प्राविण्य मिळविण्याचा योग त्यांनीं जन्मतःच आणिला होता परंतु लिओप्रमाणें ज्योतिषवाङ्मयांत यशस्वी होण्याचा नव्हता हें आमचें दुर्दैव होय.

सर्व आयुष्य ज्योतिषशास्त्राच्या अध्ययनांत व अध्यापनांत घालून चिटणीसांनीं ९० व्या वर्षी इहलोकींची यात्रा संपविली. पन्नासावें वर्ष धनस्थानाचें होतें वर्षलग्नाधिपति रवि मीन राशीच्या अंतीं भ्रमण करीत असून मेषराशीच्या आरंभींच असणाऱ्या शनीबरोबर सहा अंशांच्या युतींत होता. ही रविशनींची युति वर्षलग्नाच्या अष्टमांत झाली होती. मूळच्या कुंडलींत रवि–शनींचा योग झालेला आहेच म्हणून हा भ्रमण काळच्या योगानें मृत्यु घडवून आणिला. हा योग चालला असतां १३ फेब्रुवारी १९०९ रोजीं कर्क लग्नावर त्यांचें देहावसान झालें. कै. चिटणीसांनीं आपला मृत्यु काळ बरींच वर्षें आधीं आपल्या मित्रमंडळीजवळ सांगितला होता. कै. चिटणीसांची कीर्ति त्यांच्यामागें राहिली आहे हें भाग्याधिपति गुरु तनुस्थानीं उच्च आहे त्याचें फळ आहे. या सुरुगुरूंच्या कृपाप्रसादानें त्यांनीं ज्योतिषवाङ्मयोद्यानांतील लाविलेला वृक्ष त्यांच्या पाठीमागें पल्लवित होत असल्याचें प्रस्तुतच्या ज्योतिर्मालेच्या कार्यावरून दिसत आहे व यापुढें त्यांच्या ज्योतिषशास्त्रसेवेच्या पुण्याईनें हा त्यांनींच लाविलेला वृक्ष मधुर फलानें समृद्ध होवो.

"राम नारायण".

## द्विर्द्वादशयोग.

[ ले. अंबाप्रसाद ]

कोणत्याही दोन ग्रहांत ३० अंश अंतर झालें म्हणजे त्यास एकराश्यंतर योग झाला असें म्हणतात. हा योग आपलेकडील ज्योतिषी फलितांत विशेष विचारांत घेत नाहींत व घेतल्यास तो रवि व चंद्र यांच्याशीं झालेला घेतात. रवीचे द्वितीयांत ( चंद्राखेरीज इतर ) ग्रह असून त्यांत जर ३० अंश अंतर असेल तर त्यास वेशियोग, रवीचे व्ययस्थानीं ग्रह असून जर रवि व तो ग्रह यांत ३० अंश अंतर असेल तर त्यास वाशियोग अशा निराळ्या संज्ञा देतात. रवीचे द्वितीयांत व द्वादशांत एकाच काळीं ग्रह असतां त्यास उभयचरी योग असें म्हणतात.

याचप्रमाणें चंद्राच्या द्वितीयस्थानीं ३० अंश अंतरावर असलेला रवी-शिवाय इतर ग्रह सुनफा नामक योग करितो, चंद्राच्या द्वादशस्थानीं ३० अंश अंतरावर असलेला ग्रह अनफा नामक करितो, व चंद्राच्या द्वितीय द्वादश या दोनही स्थानीं एकाच काळीं दोन ग्रह ३० अंशांचा योग करीत असल्यास दुरुधरा नामक योग करितो. असें या द्विर्द्वादशयोगाबद्दल रवि व चंद्रांच्यी संबंधीं स्पष्टीकरण आहे. व हें स्पष्टीकरण सर्व आर्यज्योतिषी मान्य करितात.

रवि व चंद्र यांचे विषयीं हा विस्तारपूर्वक द्विर्द्वादशयोगाचा विचार झाला असुन त्यांचीं फलेंहीं ग्रंथांतरीं पाहण्यास सांपडतात. पण इतर ग्रहांचे जर परस्परांत असे योग होतील तर त्यांस काय म्हणावें किंवा त्या योगांचा परिणामच घडत नाहीं याविषयीं स्पष्ट मत आर्यज्योतिष्यांचें मजला कोठेंही आढळलें नाहीं.

बहुतेक सर्व ज्योतिषी या वेशि-वाशि-उभयचरी अथवा सुनफा, अनफा व दुरुधरा या योगांचीं फलें पाहतात. त्याचप्रमाणें चंद्राच्या द्वितीय व द्वादशस्थानीं कोणीही ग्रह नसल्यास 'केमद्रुम' नामक योग मानतात, पण



तसा रवीचे २।१२ स्थानीं कोणीही ग्रह नसल्यास मानीत नाहींत. इतर ग्रहांचीं या द्विर्द्वादशयोगाचीं फलें तर विशेष कोणी घेत नाहींत. असें अ-सण्याचें कारण आपण अथवा आपल्या वाचकांपैकीं कोणी तरी सोपपत्तिक कळवील काय ?

त्याचप्रमाणें रवीचे द्वितीय अथवा द्वादशस्थानीं चंद्र असतां, अथवा चंद्राचे द्वितीय द्वादशस्थानीं रवि असतां त्यांच्यांत नेमकें ३० अंश अंतर असल्यास त्यास काय म्हणावें ?

* * * * *

### बृहज्जातक पृ १०७.

त्रिंशत्सरूपाः सुनफानफाख्याः षष्टित्रंय दौरुधरे प्रभेदाः ॥
इच्छा विकल्पैः क्रमशोऽभिनीय नीते निवृत्तिः पुनरन्यनीतिः ॥ ४ ॥

बृ. जा. अ. १३ वा.

अर्थ—३१ प्रकारचे सुनफा, ३१ प्रकारचे अनफा व १८० प्रकारचे दुरुधरा योग असे यांचे प्रतिभेद ( ? ) पडतात व ते ग्रहांचा फेरबद्दल क-ल्पिला म्हणजे स्पष्टपणें ध्यानांत येतील." याप्रमाणें श्लोक दिला आहे. बृहज्जातकांत शनीपर्यंत सात ग्रह आहेत. त्यांतील मंगळ, बुध, गुरु, शुक्र व शनि हे पांच ग्रह रवि किंवा चंद्राच्या द्वितीय किंवा द्वादशस्थानीं अस-ल्यास हे योग व्हावयाचे हा नियम असतां सुनफा ३१ प्रकारच्या, ३१ प्रकारच्या अनफा व १८० प्रकारचे दुरुधरायोग ग्रहांच्या फेरबदलानें कसे होतील ? चंद्राचे द्वितीयांत ९ ग्रह निरनिराळे असतां ९ सुनफायोग होतील चंद्राचे द्वादशांत ९ ग्रह निरनिराळे असतां ९ अनफायोग होतील. चं-द्राचे द्वितीय द्वादशांत उलट सुलट ग्रह घेतले असतां २० प्रकारचे दुरु-धरायोग होतील. कांहीं २ ग्रह द्वितीयांत व ३ तीन ग्रह द्वादशांत असतात अशा विकल्पानें दुरुधरायोगांचीं मापणी केल्यास दुरुधरायोगांत आणखी ९ ची भर होईल. हीच विचारसरणी सुनफा व अनफा यांत घेतल्यास त्यांची संख्या अनुक्रमें १९।१९ होईल.

वराहमिहिरानें अगदीं त्रोटक म्हणुन हा ग्रंथ लिहिला असल्यामुळें त्यानें यांची नुस्ती खानेसुमारी दिली पण खानेसुमारींत सुनफा अनफा दुरुधरा या योगांच्या केवळ आंकडयानें विशेष समाधान नहोतां जिज्ञासा अतृप्त राहते. तरी ही संख्या कशी जुळते हेंही विस्तरशः कळल्यास बरें. मराठींत भाषांतर करणाऱ्या श्रीयुत देवजी अप्पूराव देशपांडे यांनीं भाषांतर करतांना बऱ्याच ठिकाणीं टीपा दिलेल्या आहेत व त्या उपयुक्तही आहेत, पण तशी टीप किंवा स्पष्टीकरण यावर मुळींच झालेलें नाहीं तरी यांचे विवरण जितकें स्पष्ट रीतीनें होईल तितकें उत्तमच.

सुनफाउनफादुरुधरांचे प्रभेद सांगितले तसे वेशिवाश्यादि योगांचेही भेद असले पाहिजेत. पण त्यांचेविषयीं संशयित असा मजकूर प्रचलित ग्रंथांत कोठेंही आढळत नाहीं. तरी ज्यांचे जवळ अप्रकाशित संग्रह असेल त्यांनीं या गोष्टी प्रकाशांत आणल्यास फार चांगलें होईल.

* * * * * *

३

या एक राश्यंतर योगाचा वधूवर पत्रिकामेलनांत बराच प्रमुखत्वानें विचार करण्यांत येतो. वधूचा किंवा वराचा चंद्र वराच्या किंवा वधूच्या चंद्राशीं एकराश्यंतर योग करील किंवा दुसरा वा बारावा असेल तर त्यास मोठी अडचण समजली जाते व अशी अडचण वधूवरांस निर्वंन करून सोडण्यास कारण होते. यांत ग्राह्य अग्राह्य असे दोन भेद आहेत. मेष—वृषभ, मिथुन—कर्क, सिंह-कन्या, तुला-वृश्चिक, धनु—मकर, आणि कुंभ-मीन या राशींत वधूवरांचे चंद्र असतां तें द्विर्द्वादशक अग्राह्य ठरवितात. वृषभ, मिथुन, कर्क—सिंह, कन्या—तुला, वृश्चिक—धनु, मकर—कुंभ, मीनमेष या राशींत वधूवरांचें चंद्र असतां तें द्विर्द्वादशक ग्राह्य समजतात.


# उगाच नाहीं मनांत भरली !

सायंकाळीं ठाकुरद्वारीं राममंदिरांत देवदर्शनास आलेल्या दोघी मैत्रिणींचा सहज झालेला संवादः—

**उमाबाईः**—कायहो बाई ! आतांशा अगदीं भेटत सुद्धां नाहीं फार दिवस !

**रमाबाईः**—उमाबाई. आहे कुणाला वेळ ? नोकरी ही अशी, हे दोन महिने कसे गेले कळले सुद्धां नाहीं.

**उमा०**:—आणि ही मुलगी कोण बरोबर ? सुनबाई वाटतं ?

**रमा०**:—ही माझी गिरिजा. तुम्हीं ओळखलीत नाहीं वाटतं ? गेल्या माघांत लग्न केलं. कोल्हापुराजवळच दिली आहे. चांगलं गडिगंज सासर मिळालं आहे. देवदयेनं कांहीं कमी नाहीं. दागिनेबिगिने बरेच घातले आहेत.

**उमा०**:—ह्या नव्या दागिन्यांचीं नांवेंसुद्धां ठाऊक नसतील इकडे. कुठली घडण ही?

**रमा०**:—हा कोल्हापुरी साज, बेलपानी वज्रटीक, ठुशी, मोहनमाळ, नथ, कुडीं, मोत्याचे दागिने,· डोकींतील फुलं, सारं तिकडलंच आहे. परवाच आमच्या घरांत म्हणत होते—कीं गिरगांवांत माझे एक स्नेही मोठे सोन्या-चांदीचे व जवाहिराचे व्यापारी आहेत. त्यांच्याकडे हे सारं तयार मिळतं.

**उमा०**:—त्यांचं नांव मला सांगाल कां ? माझी भारीच हौस आहे असलं मंगळसूत्र घालण्याची.

**रमा०**:—त्यांची पाटी मांगलवाडीसमोर,—‘**गोपाळ रामचंद्र जोशी, सोन्याचांदीचे व जवाहिराचे व्यापारी**’ अशी मी परवां पाहिली तीच असावी.

**उमा०**:—बरं तर, सांगत्यें मी तिकडे आजच.



**बक्षिसाच्या आशेनें २-२॥ रुपयांचीं घड्याळें घेऊन फसूं नका;** तर **बर्नो** वॉच कंपनीच्या खास मालकीच्या कारखान्यांत तयार झालेलें घडयाळ घ्या. हें एक वेळ घेतलें असतां १०।१५ वर्षें दुसरें घेण्याची जरूर पडणार नाहीं आमचेकडे सर्व चांगले मेकरचीं घडयाळें मिळतील.

**जोशी ब्रदर्स, ठाणें, मुंबई.**

# कर्णिक

**फ्ल्यु मिक्श्चरः**—हिंवताप, मलेरिया, पाळीचे ताप वगैरे तापांवर एक खात्रीलायक उपाय म्हणून नांवाजलेलें असून त्याचा प्रतिबंध करण्याकरितां मुद्दाम संग्रहीं ठेवा. किं. १० आणे ट. ख. ४ आणे. **कर्णिक ब्रदर्स. गिरगांव, मुंबई.**

---

## फोटो एन्लार्जमेन्टस्

पेस्ट्ल, वॉटर, ऑइल, व ब्लॅक ॲंड व्हाइट वगैरे सर्व जातीच्या रंगांमध्यें फारच माफक दरानें व सुबक करून दिलीं जातील. तसेंच बुककव्हर, बॉर्डर, व ॲडव्हरटाइजमेंट डिझाइन्स करून दिलीं जातील. कामासंबंधानें सर्व पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा किंवा समक्ष भेटावें. के. **बाळकृष्ण**, फोटोएन्लार्जर ॲंड डिझाइनर.

ग्रंथसंग्रहालयासमोर, भाई जिवनजीची गल्ली, ठाकूरद्वार, मुंबई.

---

## विक्रीस तयार.

**सन १९१६ सालचे रोजचे सायन स्पष्टग्रह.**

किंमत ४ आणे. ट. ख. वेगळा.

**मागविण्याचीं ठिकाणें.**

( १ ) कुंडलीसंग्रहालय, सदाशिवस्ट्रीट, मुंबई नं. ४

( २ ) ज्योतिर्माला ऑफिस दादर, मुंबई.

---

## मनोहर आणि कंपनी.

उत्तम निलगिरी चहाचे व्यापारी व कमिशन एजंटस—आम्ही उत्तम निलगिरी चहा थेट एस्टेट्सवरून मागवीत असल्यामुळें फारच माफक दरानें व खात्रीचा विकतों. कमिशननें एकतृतीयांश किं. आगाऊ पाठविल्यास कोणताही माल खरेदी करून पाठवूं.

**पत्ता—घरनंबर ६६५ लेडी जमशेटजी रोड, दादर-मुंबई.**

NOT TO BE ISSUED
HANSA MEHTA LIBRARY BARODA
RARE BOOK COLLECTION
UNIVERSITY LIBRARY
NOT TO BE ISSUED
SHML
M2128
M.2128.
NOT TO BE ISSUED.
BF
1651
J9-1
M.2128